An imagination
प्रतिभा
दिवाळी अंक
२०२२

# कोकण

## समृद्धी ते स्वयंसिद्धता

संपादक : नीलेश बसंत गायकवाड

मूल्य ४००/-



व्यास क्रिएशन्स

व्यास क्रिएशन्स्

व्यास क्रिएशन्स् प्रा. लि.

VYAS Publication House

राज्ञी
वुमन वेलफेअर असोसिएशन
आनंद | उत्सव | उत्कर्ष

फॅमिली कट्टा
दापोली
आपलं कमावणारं घर

साजराई
गुहागर
ज्येष्ठांचे आत्मनिर्भर घर

Vyas Infra

समाजहित जपत... साहित्य संस्कृतीच्या
संवर्धनासाठी अखंड कार्यरत असणारी संस्था...

गेली १७ वर्षे यशस्वितेचे नवनवे उच्चांक प्रस्थापित करणारी

# व्यास क्रिएशन्स्

## ग्रुप ऑफ कंपनीज

श्वास तोच
ध्यास नवा...

**ASHIDA** ®

**ELECTRONICS Pvt. Ltd.**




**ASHIDA** ®

**ELECTRONICS Pvt. Ltd.**

Ashida House, Plot No.A-308, Road No. 21,
Wagle Industrial Estate, Thane-400604.INDIA
Tel :+91 22 6129 9123/4 / Fax :+91 22 2580 4262
Email :sales@ashidaelectronics.com
Web :www.ashidaelectronics.com




An Imagination

# प्रतिभा

## कोकण समृद्धी ते स्वयंसिद्धता

मूल्य रु. ४००/-


- संस्थापक संपादक :
  **श्री. वा. नेर्लेकर**
- प्रकाशक
  **नीलेश वसंत गायकवाड**
  व्यास क्रिएशन्स्
  डी-१, सामंत ब्लॉक, श्रीघंटाळीदेवी मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.
  संपर्क : ०२२-२५४४ ७०३८
  ९९२०९४९९७७
- संपादक
  **नीलेश वसंत गायकवाड**
- समन्वयक
  **डॉ. अनुप्रिता नाईक-देशपांडे**
- संपादकीय सहाय्य
  **प्रतिष्ठा कुलकर्णी – सोनटक्के, रामदास खरे, भारत नगरकर, जयेश मेस्त्री, दीपक देशमुख, प्रवीण कदम, शुभांगी बगाडे**
- मुखपृष्ठ चित्र
  **ओमकार मेस्त्री**
- मुखपृष्ठ व सजावट
  **मिलिंद नार्वेकर**
- मांडणी
  **हेमंत गोखले**
- कोकणप्रांत समन्वयक
  **सुबोध पटवर्धन**
- व्यवस्थापन समिती
  **वैशाली गायकवाड, गायत्री डोंगरे, साक्षी गायकवाड**
- विशेष सहकार्य
  **गौरव संभूस आणि टीम, आकाश भडसावळे, मंजिरी नगरकर, कैलास कोलते**
- जाहिरात प्रमुख
  **संदेश जिमन**
- मुद्रित शोधन
  **नागेश धावडे**

सदर अंक व्यास क्रिएशन्स् करिता मालक, मुद्रक व प्रकाशक **नीलेश वसंत गायकवाड** यांनी आर्यादुर्गा एन्टरप्रायजेस येथून मुद्रित करून डी-1, सामंत ब्लॉक्स, श्रीघंटाळीदेवी मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प) येथून प्रकाशित केला. या विशेषांकातील लेखांमधील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक असून या संदर्भात प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत. सदर विशेषांकातील लेखांबाबत आपल्या प्रतिक्रिया/सूचना आम्हाला जरूर कळवा.


Each time you open a book and read it,
a tree smiles knowing there's life after death.


- vyascreations@gmail.com
- www.vyascreations.com
- www.facebook.com/joinVyascreations

www.infigoeye.com



# डोळ्यात वाच माझ्या
# तू गीत भावनांचे

## डोळ्यांची भाषा डोळ्यांनाच समजते.

डोळे म्हणजे आरोग्य आणि भावनांचा आरसा.
आपल्या जोडीदारासह आजच 'इन्फिगो' ला भेट द्या.
आपली दृष्टी वेळेवर तपासून घ्या.

**साळवी स्टॉप, रत्नागिरी.**

इन्फिगोमध्ये कॉल करा
+ 91 93727 66491

फॉलो करा

इन्फिगो हॉस्पिटल नेटवर्क

बोरीवली • भाईंदर • विरार
पालघर • बोईसर • वाशी • मुरबाड
रत्नागिरी • खेड • पुणे

इन्फिगो
आय केयर हॉस्पिटल्स

50 YEARS OF HEALTHCARE EXPERTISE

महाराष्ट्रातील सर्वात मोठे डोळ्यांचे हॉस्पिटल नेटवर्क

संपादकीय

# अवघ्या अंतरीचे तराणे

***अथांग निळाई, त्यात माडांची गर्द वनराई***
***झेलीत लाटा चैतन्याची नवलाई***
***विरघळती त्यात वाळूची दुलई***
***मोहक रंगाची कोकण हिरवाई.***

नितळ, निळेशार किनारे लाभलेल्या हिरवा साज ल्यालेल्या... विविध बोलींच्या, लोककलांची परंपरागत वारसा जपलेल्या संस्कृतींचा आपलेपणाच्या ओढीचा शहाळ्यातील पाण्याच्या गोडीचाज्या भूमीने अनेक नररत्ने दिली आहेत. अशा शूरवीरांचा गड आणि किल्ले यांतून इतिहासाची साक्ष देणारा निसर्गाच्या अनुपम लावण्याने मोहवणारा असा हा कोकणचा परिसर म्हणजे जणू सृष्टिसौंदर्याचं कोंदणच!

कोकण म्हणजे महाराष्ट्राचं भूषण. इथली मातीच निराळी. इथला रंगच निराळा. या भूमीला स्वत:चा असा चेहरा आहे. तिची स्वतंत्र ओळख आहे. इतिहास आहे. पण आता केवळ गुणगान करून चालणार नाही, तर कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने झटलं पाहिजे. या निसर्गाने भरभरून दिलं आहे, त्याचा आदर राखत कोकण अधिक समृद्ध कसा करता येईल याचा सर्वांगाने विचार झाला पाहिजे. कोकणवासीयांना आणि समस्त महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकांच्या मनात ही ज्योत तेवत राहावी यासाठी आम्ही यंदा दीपावलीनिमित्त हे अक्षरपुष्प गुंफत आहोत. ‘कोकण : स्वयंपूर्णता ते स्वयंसिद्धता’ हा दिवाळी विशेषांक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे.

हे नयनरम्य कोकण भविष्यात नक्की कसं असेल? काय आणि कसा असेल कोकणचा चेहरा-मोहरा? धावत्या युगात काळाची गणितं दिवसागणिक बदलत जातात. जगण्याची समीकरणं बदलतात.वेगवेगळे प्रवाह येतात या साऱ्या प्रवाहात आणि प्रवासात आपलं कोकण कोणतं रूप धारण करेल? एक कोकणवासीय म्हणून आपल्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात.

कोणताही प्रदेश असं आपण म्हणतो तेव्हा डोळ्यासमोर येतो तो तिथला सामान्य माणूस. आर्थिक, सामाजिक दृष्ट्या त्याचा होणारा विकास म्हणजेच पर्यायाने त्या प्रदेशाचा होणारा विकास. माणूस समृद्ध तर देश समृद्ध. म्हणून त्या प्रदेशातील उपलब्ध साधनसामग्रीचा जास्तीत जास्त वापर कसा करून घेता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे आणि तेही इथला मूळ गाभा, घटकांना धक्का न पोहोचता, भावीपिढीच्या भवितव्याचा विचार करून, राजकीय, सामाजिक, वैचारिक संघटन लक्षात घेऊन शाश्वत विकासाचा मूलमंत्र जपत, सर्व स्तरांतून जाणीवपूर्वक प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे वाटते.

निसर्गाची मुक्त उधळण, शेजारी लांबलचक अथांग समुद्र, आंबा-काजूसारखी नगदी पिके असूनही आजही कोकणात बेरोजगारी वाढते आहे. इथला प्रत्येक गावातील वाडीवरचा तरुण स्वत:च्या अस्तित्वासाठी आपलं गाव सोडून मुंबई उपनगरात मिळेल त्या जागेत राहत, लोकलमध्ये लोंबकळत प्रवास करीत दिवस रेटीत आहे. अर्थात याला अनेक सन्माननीय अपवादही आहेत की ज्यांनी मुंबईसारख्या महानगरातही आपले बस्तान घट्ट स्थिर केले आहे. पण शेवटी गावातील वाडीवरच्या उंबरठ्यावर म्हातारी माणसे मुलांच्या परतीकडे आशेने डोळा लावून असतात. हे मात्र विसरता येणार नाही.

इथला तरुण गावापासून दूर झालाय, पण त्याची गावची ओढ, जन्मभूमीशी असलेली नाळ तुटलेली नाही. हेही नसे थोडके! म्हणून इथला तरुण कोकणपासून कायमचा दूर जाता कामा नये यासाठी मनातील नकारात्मकता संपवून सकारात्मकता जोपासून 'कोकणच्या समृध्दीचे' स्वप्न साकारण्याची जिद्द या लालमातीची ओढ व प्रेम मनामनात चेतवली पाहिजे.

कोकण कृषी विद्यापीठ तसेच अनेक सामाजिक, औद्योगिक आणि स्वयंसेवी अशा कोकणप्रेमी संस्था विविध उपक्रमांद्वारे सर्व बाजूंनी लक्ष केंद्रित करून खऱ्या अर्थाने कोकणच्या विकासाला हातभार लावत आहेत. त्यांच्या प्रयत्नांना आपणही साथ दिली पाहिजे. कोकणचे निसर्गवैभव एवढे संपन्न आहे की, इथे भेट देणारा पर्यटक त्याच्या प्रेमात न पडला तर नवलच! पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी, विकासाच्या वाटा खुणावत आहेत. देशातील सुमारे ६०० जिल्ह्यांपैकी 'सिंधुदुर्ग' हा एकमेव असा जिल्हा आहे की, जो 'संपूर्ण पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित केला गेला आहे. कोकणातील इतरही जिल्ह्यांना राष्ट्रीय स्तरावर मानाचे स्थान मिळावे यासाठी सगळ्यांचाच सहयोग असणं गरजेचं आहे.

विकासाच्या अनेक संधी इथे उपलब्ध आहेत. कोकणचा कॅलिफोर्निया कधी होणार? हा प्रश्न न पडता तो प्रत्यक्षात साकारण्याची वेळ आता आली आहे. कोकणच्या विकासाला गती देणाऱ्या औद्योगिक संस्था, मूळ निवासी उद्योजक विशेष पुढाकार घेऊ शकतात. यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आणि पूरक वातावरणाची गरज आहे. त्यासाठी सगळ्यांचा विकास आणि सगळ्यांचीच साथ मोलाची ठरणार आहे. स्वयंशिस्त आणि स्वयंसिद्धता कशी अंगीकारता येईल याचाही यानिमित्ताने विचार करू या!

कोकणच्या मातीची ओढ जागृत राहावी या विचाराने आम्ही व्यास क्रिएशन्स् ग्रुप ऑफ कंपनीज् गृहप्रकल्पाच्या निमित्ताने आपले पाऊल टाकत आहे. 'चला खेड्याकडे' या धर्तीवर 'कोकणात येवा' हा आनंदसंदेश या निमित्ताने पोहोचवण्यासाठी 'फॅमिली कट्टा' आणि फक्त ज्येष्ठांसाठी आनंदधाम 'सांजराई' हे प्रकल्प उभारत आहोत. मनामनांतील कोकणप्रेम वाढून मनामनांतील हिरवं कोकण ताजेतवाने करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

प्रस्तुत दिवाळी अंकाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नामवंत लेखकांनी, साहित्यिकांनी कोकणच्या गौरवाचं, समृद्धीचं प्रतिबिंब मांडलं आहे. भविष्यकालीन चिंतनासाठी हे विवेचन मौलिक ठरणार आहे, याची आम्हाला खात्री आहे.

सुंदर विचारांची बीजे फार पूर्वापार पेरली गेली आहेत. कोकणच्या अनुपम लावण्याने ती अधिकाधिक मोहरावीत हीच अपेक्षा. दिवाळी हा सणच तर यासाठी आहे. हा सण आहे दिव्यांचा, प्रकाशाचा. नात्यांना जपणारा. चला उत्तम विचारांची पेरणी करू या आणि यंदाची दिवाळी संस्मरणीय करू या!!

***या काळजाचे त्या काळजात ओतणे***
***सुमधुर बोल... जो जागवील आपले गाणे***
***तयातूनच घडेल, अवघ्या अंतरीचे तराणे !!***

**- नीलेश वसंत गायकवाड**

# अंतरंग

## १ ऐतिहासिक विभाग


**परशुराम क्षेत्रातले कोकण**
डॉ. अनुराधा सुधीर कुलकर्णी........१०

**कोकणातील कातळशिल्पे**
ऋत्विज आपटे ..........१३

**प्राचीन कोकणातील बंदरे**
अंकुर काणे ...........१८

**छत्रपती शिवाजी महाराज आणि कोकण प्रेम**
सदाशिव टेटविलकर ...........२२

**छत्रपती संभाजी महाराजांचे इंग्रज, सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याशी संबंध**
भास्कर धाटावकर ...........२७

**कोकण : मराठा आरमाराची भूमी**
धीरज वाटेकर ...........३०

**स्वातंत्र्यसंग्राम : कोकणातील क्रांतिकारक**
अरविंद दोडे ...........३७

**सर्वंकष संदर्भमूल्य ग्रंथ दर्शनिका (गॅझेटिअर)**
डॉ. दिलीप बलसेकर ...........४१


## २ साहित्य विभाग


**कोकणातील बोली भाषांचे सौंदर्य**
मनमोहन रोगे ...........४७

**कोकणातील गतकालीन कवी आणि लेखक**
रमेश सावंत ...........५०

**कोमसाप एक ध्यास एक प्रवास**
मेघना साने ...........५४

**कोकण कलावंतांची खाण**
प्रा. प्रदीप ढवळ ...........५९

**कोकणातल्या निवडक साहित्यिकांचा संक्षिप्त परिचय**
रामदास खरे ...........६३


## ३ भौगोलिक विभाग


**कोकणातील देवराया**
भारत गोडांबे ............७३

**कोकणातील वन्यजीव, त्यांचे संरक्षण**
उदय कोतवाल ............७६


**कोकणची माती आणि तिचे संरक्षण**
डॉ. नागेश टेकाळे ..........७९

**कोकण समुद्र : त्यातील जीव आणि वनस्पती वैभव**
प्रा. स्वप्नजा मोहिते ........८२

**उपलब्ध पाणी हे कोकण विकासाला सहाय्यक ठरू शकेल काय?**
डॉ. दत्ता देशकर............८७

**इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारा ठाणे आणि पालघर**
भारत नगरकर............९२

**मुंबई मेरी जान...**
जयेश मेस्त्री............१०३






## ४ संस्कृती विभाग

**कोकणी माणसाचे इरसाल नमुने**
वैभव साटम ..................११३

**कोकणातील लोकसंस्कृती आणि परंपरा**
सदानंद राणे ..................११६

**कोकण, नारळ आणि कोकम**
वृंदा दाभोलकर .........१२१

**कोकणातील मंदिर वारसा**
आशुतोष बापट ...........१२४

**कोंकणातील मंदिरे काल, आज आणि उद्या**
प्रवीण कदम .................१२८

**कोकणातील राजकीय परंपरा**
संतोष वायंगणकर ...........१३२

**कोकणातील पारंपरिक पद्धतीने बांधलेली घरे**
पर्णवी बांगर ...............१३५

## ५ दळणवळण विभाग

**कोकण रेल्वे : असामान्य आणि अफलातून इंजिनिअरिंग**
भारत नगरकर ..................१४०

**ग्रामसडक ते हमरस्ता**
राजेंद्रप्रसाद मसुरकर ..................१४६

**कोकणातील बंदरे**
दिलीप भटकर..................१४९

## ६ उद्योग विभाग

**'वेलकम टू कोंकण'**
डॉ. पराग कारुळकर..................१५४

**कोकणातील बागायती फळ शेती**
डॉ. राजेंद्र मुंबरकर ..............१५८

**कोकणभूमीतील घरगुती व्यवसाय**
अरविंद कोकजे..............१६१

**कोकण प्रांतातील औद्योगिक वाढ**
केशव भट ..............१६४

**समृद्ध शेती, श्रीमंत शेतकरी काल, आज आणि उद्या**
डॉ. हनुमंतराव जगताप ..............१६८

**कोकणातील सागरी मासेमारी**
प्रा. डॉ. बाळासाहेब चव्हाण ..............१७२

**कोकणभूमीतील औषध निर्मिती आणि आयुर्वेद विकास**
वैद्य सुविनय दामले ..............१७५

**कोकणातील पत्र(क)कारिता**
अमित पंडित ..............१७८

## ७ मनोरंजन विभाग

**शोध**
अनंत जोशी ..............१८२

**कोणाच्यो म्हशी?**
नितीन राणे ..............१८४

**म्हावरा**
कॅप्टन वैभव दळवी ....१८७

**माझं कोकण**
विकास भावे ....१८८

**कसबा संगमेश्वर**
निबंध कानिटकर .............१८९

**मनाने कोकणवासी झालो**
किशोर महाबोले....१९१

**गंध व्हा**
हेमंत बर्वे....१९३

**कोकणचा कुलाचार**
गौरी बावडेकर....१९३

**लावण्यखणी भूलोकीची!**
गौरी कुलकर्णी....१९४

**कोकण भूमीवरील निबंध व काव्य स्पर्धेचे निवडक विजेते**
१९५ ते २००

- प्रतिक्षा गुरव (निबंध)
- लेखा मराठे (निबंध)
- आर्या सापळे (कविता)
- प्रमोद जोशी (कविता)

# PROVIDING ONE STOP FIRE PROTECTION SOLOUTIONS

(Fire Hydrant, Sprinkler, Drencher, Alarm, PA, Detection & Passive Fire System )

CRESCENDO
THINK OF FIRE BEFORE IT STARTS !

Govt. Approved License Agency




Technical sales -
Prerna H
(BBA)
M.: 7039016591

Project & Commissioning
Smita G
(B.E in EXTC)
M.: 9820223644

Design & Engineering
Apurva G
(Architect)
M .: 9930471516

Maintenance & Services
Chinmay S
(B.E in EXTC)
M.: 9619823712

## Our Distictive Qualities

- Affordable Products
- Training of usage of all equipment
- Unparalleled customer service
- On time Service

## Vision

- Excel in what we do and build a safe and secure environment for our community

## Get in Touch

A/3, Sarveshwar CHS. Ltd. Gholai Road,
Behind Raj Park Complex, Parasik, Kalwa (E)-400 605

Email : crescendoglobalgroup@gmail.com



# ऐतिहासिक

## विभाग १



# परशुराम क्षेत्रातले कोकण

डॉ. अनुराधा सुधीर कुलकर्णी

वनराईच्या बोलण्याने आनंदलेल्या आभाळाने एक सुंदर इंद्रधनू जमिनीवर खोवलं. त्यामुळे अवघी कोकणभूमी दृष्ट लागण्याइतकी लोभस दिसू लागली! त्यावेळी समुद्राच्या लाटांची गाज कोकणभूमीला सांगू लागली. 'हे अपरान्त कोकणभूमे, भारताची पश्चिम भूमी तुझ्यापाशी परिपूर्ण होते, म्हणून तू अपरान्ता. तुझी निर्मिती या आकाशाइतक्याच विशाल मनाच्या दैवी पुरुषामुळे झाली. त्यांचे नाव परशुराम.

आपले निळेशार प्रतिबिंब ज्यात पूर्णतः उतरलेय त्या भरतभूमीतील पश्चिमेकडील कोकणकिनाऱ्याच्या समुद्राकडे आकाश लोभावून पाहात होते. गर्द वनराईचा हिरवागार काठ त्या समुद्राला किती शोभत होता. समुद्रही आपल्या लाटांनी त्या तजेलदार भूमीवर पुन्हापुन्हा झेपावत होता. जैववैविध्याने नटलेल्या त्या वनराईचे आकाशालापण मोठे कौतुक वाटले. तेव्हा वनराई आकाशाला म्हणाली, 'तूच तर आम्हाला केवढे भरभरून वर्षाजलाचे दान देतोस, हे उंच उंच डोंगरमाथे तुझे जलदान ओंजळीत घेऊन खळाळून वाहणाऱ्या नद्यांच्या रूपाने मला अखंड सुजलाम्-सुफलाम् करतात. त्यामुळेच तर आमच्या नारळीपोफळी, काजू, फणस, आम्रवृक्ष सजतात आणि या नानाविध वनस्पती बहरतात. आमची भातशेती तर केवळ तुझ्या जलवर्षावानेच रसरशीत होते '

वनराईच्या बोलण्याने आनंदलेल्या आभाळाने एक सुंदर इंद्रधनू जमिनीवर खोवलं. त्यामुळे अवघी कोकणभूमी दृष्ट लागण्याइतकी लोभस दिसू लागली! त्यावेळी समुद्राच्या लाटांची गाज कोकणभूमीला सांगू लागली. 'हे अपरान्त कोकणभूमे, भारताची पश्चिम भूमी तुझ्यापाशी परिपूर्ण होते, म्हणून तू अपरान्ता. तुझी निर्मिती या आकाशाइतक्याच विशाल मनाच्या दैवी पुरुषामुळे झाली. सज्जनांचे रक्षण आणि दुष्टांचा विनाश करणाऱ्या श्रीविष्णूचा तो सहावा अवतार होता. त्यांचे नाव परशुराम. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र महर्षी भृगू यांच्या वंशात महर्षी जमदग्नी व साध्वी रेणुका यांच्या पोटी परशुरामांचा जन्म झाला, भृगुवंशातील म्हणून परशुराम, जमदग्नी, ऋचिक यांना भार्गव असेही म्हणतात. भार्गव परशुराम अतिशय तल्लख बुद्धीचे होते. त्यांनी कश्यप ऋषीकडे सर्व विद्यांचे अध्ययन केले. नंतर गंधमादन पर्वतावर तप करून शिवाला प्रसन्न करून घेतले. भगवान शिवाने त्यांना अनेक अस्त्रे दिलीत. त्यातच त्यांचा प्रसिद्ध परशुही दिला. परशुरामांचे मूळ नाव राम होते पण शिवाकडून त्यांना परशू मिळाला आणि तो परशू त्यांच्या सतत जवळ असे म्हणून त्यांचे परशुराम नाव पडले. ऋषिश्रेष्ठ परशुरामांना खरी अंतरिक ओढ निसर्गाच्या सान्निध्यात शांतपणे अध्यात्मचिंतन करण्याची होती, पण जनताजनार्दनावर झालेल्या अत्याचाराची वार्ता कानी आल्यावर ते शांतही बसू शकत नव्हते. अन्यायाचा प्रतिकार करून ते पुनश्च योगसाधनेसाठी आपल्या आवडत्या महेंद्रगिरीवर येत. म्हणजेच परशुराम ज्ञानयोगी जसे होते तसेच ते कर्मयोगीही होते. त्याचप्रमाणे अतिशय पितृभक्त होते.

एकदा परशुराम महेंद्रगिरीवर तप करण्यास गेले असता त्यांचे पिता महर्षी जगदग्नी यांची निर्घृण हत्या झाली. दुःखसंतप्त झालेल्या परशुरामांनी जमदग्नींची हत्या करणाऱ्या हैहय वंशियांच्या महिष्मती राज्यावर जोरदार हल्ला केला. त्यांना प्रतिकार करण्यासाठी आलेल्या सहस्रार्जुनराजाचे बंधू, पुत्र, सामंत, मांडलिक या सर्वांचा त्यांनी संहार केला, आणि नंतर परत ते तपश्चर्येसाठी महेंद्रगिरीवर गेले. पण त्यांची पाठ फिरताच परत काही उन्मत्त क्षत्रियांचा सामान्य जनांवर अत्याचार सुरू झाला. परशुराम महेंद्रगिरीवरून परत आले, त्यांनी त्या क्षत्रियांचा निःपात केला आणि पुनश्च तपासाठी महेंद्र पर्वत गाठला. पुन्हा दुष्ट क्षत्रिय माजले की पर्वतावरून खाली उतरून त्यांचा समाचार घ्यावा, अशा परशुरामांच्या एकवीस मोहिमा झाल्या.

या मोहिमांमुळे समुद्रवलयांकित पृथ्वी परशुरामांच्या ताब्यात आली होती. तेव्हा त्यांनी अश्वमेध यज्ञ केला. या यज्ञाचे अध्वर्यु त्यांचे गुरू महर्षी कश्यप होते. यज्ञाच्या अखेरीस यज्ञाची दक्षिणा म्हणून परशुरामांनी आपण जिंकलेली संपूर्ण भूमी महर्षी कश्यप यांना दिली आणि पुढच्या क्षणाला स्वतः परशुराम अकिंचन झाले, निःसंग झाले. पण महर्षी कश्यपांनाही हे पृथ्वीचे दान घेऊन राज्य करायचे नव्हते. तर त्यांना उत्तम राज्यकारभार करू शकणाऱ्या क्षत्रियांची पुनर्स्थापना करायची होती. बरेच क्षत्रिय परशुरामांच्या भयाने अज्ञातवासात गेले होते. त्यामुळे कश्यपांनी परशुरामांना सांगितले की, 'आता तू मला दान केलेल्या भूमीवर यायचे नाही.'

गुरुवर्य कश्यपांची आज्ञा मानून परशुराम तेथून निघून गेले. जेथे भारतभूमीची पश्चिमभूमी संपते आणि माझे म्हणजे समुद्राचे साम्राज्य सुरु होते, त्या माझ्या काठावर ऋषिश्रेष्ठ परशुराम उभे होते. त्यांच्या मागची सगळी भूमी आता त्यांची राहिली नव्हती. त्यांच्या विलक्षण तेजस्वी व्यक्तिमत्वाने मी भारावून गेलो होतो. अन्यायी जुलमी राजसत्तांचा बिमोड करून साध्याभोळ्या पापभिरू जनतेचे संरक्षण करण्याचे मोलाचे कार्य करणाऱ्या त्या महात्म्याला चरणस्पर्श करून मी बराच मागे हटलो... आणि त्यामुळे हे कल्याणी, भारतमातेच्या पश्चिम किनारी तुझा जन्म झाला. सह्याद्रीचे कडे आणि पश्चिम सागर यांच्यामध्ये परशुराम भार्गवांच्या पुण्याईने तू जलप्रपातांनी, नदी-ओढ्यांनी दाट वृक्षांनी आणि फळाफुलांनी बहरून गेलीस.

*ततः शूर्पारकं देशं सागरस्तस्य निर्ममे ।*
*सहसा जामदग्न्यस्य सोऽपरान्तमहीतलम् ।।६६।।*

महाभारत, शांतिपर्व, अ. ४९

जमदग्निकुमार परशुरामांसाठी समुद्र मागे हटला. त्यामुळे शूर्पारक देश निर्माण झाला. त्याला अपरान्तभूमी असेही म्हणतात किंवा परशुरामक्षेत्र असेही म्हणतात. वैतरणेपासून कन्याकुमारीपर्यंतचे हे परशुरामक्षेत्र होय. हे निसर्गरम्य कोकणभूमे, तुझ्या कुशीत जन्मलेल्या गोऱ्या घाऱ्या चित्पावनांनाही ऋषिश्रेष्ठ परशुरामांचे वरदान आहे. ज्यावेळी माणसातल्या कार्यशीलतेचा रजोगुण मंदावून निष्क्रियतेचा तमोगुण फोफावला होता त्यावेळी त्याचे आयुष्य निरर्थकतेच्या चितेत जळू लागले होते. ज्ञानयोग आणि कर्मयोग साधनेत अखंड मग्न असलेल्या तेजस्वी परशुरामांना असे मानवी जीवन बघणे शक्य नव्हते. त्यांनी त्या माणसांमध्ये सत्कार्याची चेतना निर्माण केली. त्यांना निष्क्रियतेच्या चितेतून बाहेर काढले. त्या चितेतून बाहेर आलेले आणि परशुरामांच्या या दिव्य प्रेरणेने पावन झालेले ते चित्पावन होत. आद्य क्रान्तिकारक वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, सेनापती बापट ही सर्व त्या चित्पावन समाजाची तेजस्वी उदाहरणे होत. विष्णूचा अवतार असलेल्या या परशुरामाचे चिपळूणजवळ लोटे परशुराम या गावी प्राचीन मंदिर आहे. त्यातूनच कोकणातील जनतेने त्यांच्यावरील पूज्यभाव अखंड राखला आहे, हे लक्षात येते ''

सागराच्या गाजेमधले हे बोल ऐकून कोकणभूमी स्वतःच्या पावन निर्मितीकथेने हर्षभरित झाली. आपल्या मातीत त्या थोर ऋषीचे ब्राह्मतेज व क्षात्रतेज दोन्ही मुरलेले आहे, या जाणीवेने धन्य झाली. तिने आकाशाकडे पाहिले. तर तेही भारावलेल्या अवस्थेत मेघांनी दाटून आले होते...!!

स्कंदपुराणातील सह्याद्री खंडात जरा वेगळा उल्लेख आहे की परशुरामांनी एक बाण समुद्रामध्ये मारला. जेथपर्यंत तो बाण समुद्रात पोचला, तेथपर्यंत समुद्राला मागे सरण्याची आज्ञा परशुरामांनी दिली, त्यामुळे जो भूभाग निर्माण झाला तो कोकण होय.

कोकण नावाची व्युत्पत्ती पाहू गेल्यास ती अनेक प्रकारे मिळते. जुन्या संस्कृत भाषेत कोकण शब्द निरनिराळ्या पद्धतीने लिहिलेला दिसतो. कुकुण, कुङ्कुण, कोङ्कण, कोकण अशी रूपे दिसतात. कानडीत कोङ्कु असा शब्द आहे. कोङ्कु म्हणजे उंचसखल जमीन. कोङ्कु-वन यावरून कोकण शब्द आला असावा. सागरीमार्गामुळे कोकणाचा व इतर प्रान्तांचा व्यापारसंबंध खूप जुना आहे. त्यामुळे त्या त्या प्रान्तातले शब्द कोकणात बरेच आले. फारसीत कोह म्हणजे पर्वत आणि कुण्ड म्हणजे खड्डा. या कोह - कुण्ड मधून कोकण शब्द तयार झाला असावा. तसेच कोंग नावे लोक येथे वसाहत करून आले असावेत, त्यांच्यावरूनही कोंकण शब्द आला असावा.

कोकणातल्या या शुद्ध निसर्गरम्य पवित्र वातावरणात सर्वेश्वराबद्दल श्रद्धा रुजणारच. ज्याला दक्षिण काशी म्हणून गौरविले जाते ते कोकणातले हरिहरेश्वराचे मंदिर सर्व शिवमंदिरात श्रेष्ठ समजले जाते. कारण तेथे उत्पत्ती-स्थिती-लयाचे ब्रह्मा, विष्णू, महेश हे तिन्ही देव आहेत. हरि म्हणजे विष्णू आणि हर म्हणजे शंकर यांच्या पूर्णैक्याचे हे अपूर्व स्थळ आहे. हरिहरेश्वरमंदिर, कालभैरव व योगेश्वरीमंदिर, सिद्धिविनायकमंदिर व हनुमानमंदिर अशी येथे चार मंदिरे आहेत. सावित्री नदी जेथे समुद्राला मिळते तिच्या मुखावर हरिहरेश्वर गाव वसले आहे. डोळ्याचे पारणे फिटावे असे मनोहर निसर्गसौंदर्य या गावाला लाभले आहे. एका बाजूला जणू पाचूंनी मढलेले ब्रह्माद्री, पुष्पाद्री, हर्षिनाचल आणि हरिहर हे हिरवेगार चार डोंगर आणि दुसऱ्या बाजूला अत्यंत निर्मळ असा निळा निळा अथांग समुद्र. त्या सागराच्या लाटा केवळ वसुंधरेच्या सुषमेने उत्तेजित होऊनच नव्हे तर एकत्वाची साक्ष देणाऱ्या श्रीहरिहरेश्वराच्या दर्शनासाठीही उसळताना दिसतात!! असे म्हणतात की वामन अवतारात बटू वामनाने आपले दुसरे पाऊल याच स्थळापासून ठेवले. म्हणजे पृथ्वीवर विश्वंभराचे पहिले नाते कोकणभूमीशी जोडले गेले..!

हरिहरेश्वराप्रमाणे कोकणातील इतरही अनेक शिव, गणेश इ. देवदेवतांच्या प्राचीन मंदिरांचा पुराणांत, इतिहासात, आख्यायिकांत असा दाखला मिळतो. पुरातन काष्ठशिल्पाकृतीचा वारसा कोकणातल्या बऱ्याच मंदिरांनी जपला आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात कोकणचा अपरान्त म्हणूनच उल्लेख आहे. या प्रदेशात विपुल प्रमाणात पाऊस पडत असल्याने हा प्रदेश नैसर्गिकदृष्ट्या अतिशय संपन्न आहे, असेही यात म्हटले आहे.

खरोखर सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीने कोकण हे महाराष्ट्राचे गौरवस्थानच होय.



# कोकणातील कातळशिल्पे

**ऋत्विज आपटे**

मार्च २०२२ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीमध्ये कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनुक्रमे ५ आणि एक आणि गोव्यातील एक ठिकाण अशा एकूण ७ कातळ खोदशिल्पे असलेल्या गावांचा समावेश करण्यात आला. कोकणाला खूप मोठा सांस्कृतिक ऐतिहासिक वारसा लाभला आहे. ह्या कातळ खोद चित्रांच्या रूपाने तो पुढे येत आहे.

महाराष्ट्राच्या पश्चिम दिशेला असणारा अरबी समुद्र आणि पूर्वेकडचा सह्याद्री पर्वत ह्या दोघांच्या मध्ये असणारा भाग हा कोंकण म्हणून ओळखला जातो. हीच महाराष्ट्रातील कोंकण किनारपट्टी ही निसर्गसंपन्न आणि सांस्कृतिक आणि खाद्यासंस्कृतीने संपन्न अशी आहे. एकूण ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा महाराष्ट्राला लाभलेला आहे. ह्या भागात असणारे नितळ समुद्र किनारे, जंगलं, मंदिरे आणि इतर अनेक गोष्टींसोबतच ह्या भागाचा इतिहास सुद्धा तेवढाच महत्त्वाचा आहे. ऐतिहासिक कालखंडाबाबतचे विविध पुरावे आपल्याकडे शिवाजी महाराजांच्या काळात आणि त्याच्या आधी बांधले गेलेले अनेक किल्ले जसे की सिंधुदुर्ग, मुरुड-जंजिरा, सुवर्णदुर्ग, पूर्णगड इत्यादी आणि त्याच्याही आधी बांधल्या गेलेल्या विविध लेणी ज्या साधारणपणे इसवी सनाच्या तिसऱ्या ते ७-८ व्या शतकापर्यंत अशा स्वरूपात दिसतात. परंतु त्याच्या आधीच्या कालखंडाचे कोणतेच पुरावे मोठ्या प्रमाणावर समोर आले नव्हते. पुरातत्त्वीय भाषेत त्याला dark age असे म्हणतात.

भौगोलिकदृष्ट्या जरी हा प्रदेश एक सारखा दिसत असला तरी भूशास्त्रीय जडणघडणीनुसार या भागाचे अजून ३-४ विभाग करता येतात. उत्तर कोंकणातील ठाणे, रायगड जिल्हा ह्या भागाचा भूप्रदेश मुख्यतः बेसाल्ट दगडाचा म्हणजेच काळ्या पाषाणाचा आहे आणि दक्षिण कोकणातील म्हणजेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग ह्या जिल्ह्यांमधील भूप्रदेश हा मुख्यत्वे जांभ्या दगडाचा असून त्याचा विस्तार अगदी महाराष्ट्राच्या दक्षिणेकडे गोवा, कारवार करत केरळपर्यंत दिसतो. कोकणाची ओळख असलेला जांभा दगड प्रामुख्याने दक्षिण कोकणात किनाऱ्या जवळच्या पठारांच्या माथ्यावर आढळून येतो. ह्या जांभ्या दगडाच्या कमी उंचीच्या पठारांना स्थानिक भाषेत 'सडा' असे म्हणतात. तर ही सगळी प्रस्तावना द्यायचे मूळ कारण म्हणजे हा जांभा दगड ज्याला भूगर्भीय भाषेत laterite असे म्हणतात तो गेली अनेक वर्ष पुरातत्त्वीयदृष्ट्या महत्त्वाची अशी अश्मयुगीन अनेक रहस्य दडवून बसला आहे.

अश्मयुगात शिकार करून पोट भरणारा माणूस हळूहळू एके ठिकाणी राहून साधारणपणे आतापासून १२,००० वर्षांपूर्वी स्थिर जीवन जगू लागला होता. शिकार करण्यासाठी त्याच्याकडे असणारी दगडी हत्यारे आता जास्त विकसित झाल्यामुळे शिकार करण्यासाठी त्याला लागणारा वेळ खूप कमी झाला होता त्या उरलेल्या वेळेचा वापर त्याने व्यक्त होण्यासाठी केला म्हणजेच त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना, तो बघत असलेले प्राणी, त्याचं स्वतःच जीवन याबाबतच्या गोष्टी तो चित्र रूपात दगडी भिंतींवर अथवा जमिनीवर कोरून किंवा रंगवून काढू लागला होता. ह्या कलेच्या प्रकाराला पुरातत्वशास्त्राच्या भाषेत Rock art किंवा भित्ती चित्र/ खोदचित्र असे म्हटले जाते. रंगवलेल्या चित्रांना pictograph आणि खरवडून काढलेल्या चित्रांना petroglyph असे म्हटले जाते. कलेच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा गणला जातो. ही अशा प्रकारची चित्र जगभरात अंटार्क्टिका खंड सोडल्यास सगळीकडे सापडतात.

गेल्या काही वर्षात कोकणात अशा प्रकारच्या जमिनीवर निर्माण केलेल्या गूढ आणि अगम्य अशा खोदचित्ररचना हजारोंच्या संख्येने आढळून येत आहेत स्थानिक भाषेत त्याला 'कातळ खोदशिल्प' असे म्हटले जाते. मानवी उत्क्रांतीच्या एका विशिष्ट टप्प्यातील कालखंडावर प्रकाश टाकणाऱ्या अत्यंत बहुमोल अशा या खोदचित्र रचनांमध्ये लहान आकारच्या खळग्यापासून अगदी चौकोन त्रिकोण आणि अनेक गूढ अगम्य अशा प्राण्यांच्या पक्ष्यांच्या चित्ररचनांचा समावेश होतो. परंतु कोकणातल्या चित्रांचे वैशिष्ट्य म्हणजे ती आकाराने प्रचंड मोठी आहेत, आणि आता पर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात, जवळपास ३५० किलोमीटर एवढ्या प्रदेशात, विविध ठिकाणी पसरलेली आहेत. ह्या चित्रांमध्ये एक शिंगी गेंडा, हत्ती, वाघ, पाणघोडा, सोबतच अनेक पक्ष्यांची चित्रेसुद्धा कोरून ठेवली आहेत जे आता कोकणात अस्तित्वात नाहीत. ह्या चित्रांचा कालखंड सांगणे फारच अवघड आहे त्याच्या दृष्टीने सुद्धा संशोधन चालू आहे. गेल्या शतकात साधारणपणे १९९० च्या आसपास रत्नागिरी गणपतीपुळे ह्या रस्त्याच्या रुंदीकरण कामाच्या वेळी पहिल्यांदा एक चित्ररचना लोकांच्या नजरे समोर आली, त्यानंतर पुण्यातील डेक्कन महाविद्यालयातील अभ्यासक डॉ. श्रीकांत प्रधान, प्रा. गोगटे आणि डॉ. प्रबोध शिरवळकर ह्यांनी काही नवीन ठिकाणे शोधून काढली आणि तो अभ्यास जगासमोर मांडला. डॉ. अनिता राणे, डॉ. दाउद दळवी, प्रा. प्र .के. घाणेकर, डॉ. रवींद्र लाड तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवासी असणारे श्री. सतीश लळीत ह्यांनी काही नवीन ठिकाणी संशोधन केले. कातळ शिल्पांचा शोध आणि संरक्षणाबाबत महत्त्वाचे काम केले

ते म्हणजे रत्नागिरी येथे असलेल्या 'निसर्गयात्री संस्थे'च्या सदस्यांनी म्हणजेच सुधीर रिसबूड, धनंजय मराठे आणि प्रा. सुरेंद्र ठाकूरदेसाई ह्या त्रयीने. २०१४ सालापासून ह्यांनी कातळशिल्पांच्या शोधाबरोबर त्याचे पुरातत्वीय महत्त्व स्थानिक लोकात पटवून दिले आणि संरक्षणाचे काम ही हाती घेतले. २०१७ सालापासून ह्या अगम्य ठेव्याला कायदेशीर संरक्षण मिळावे म्हणून पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालय, महाराष्ट्र शासनसुद्धा कामी लागले आहे. निसर्गयात्री संस्था, रत्नागिरी आणि महाराष्ट्र शासन आता एकत्रित ह्या गूढ आणि अगम्य विषयावर संशोधनात्मक आणि संरक्षणाचे काम करीत आहेत. ह्या उत्साही अभ्यासकांनी विभागाच्या सोबतीत आतापर्यंत रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७२ गावात १०२ ठिकाणी जवळपास १५०० हून जास्त शिल्परचना शोधून काढल्या आहेत ही सर्व कातळशिल्प महत्त्वाची असून त्याची महसूलविषयक कागदपत्रांची पूर्तता करून ती राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करावीत यासाठीचे प्रयत्न चालू आहेत.

मार्च २०२२ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीमध्ये कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनुक्रमे ५ आणि एक आणि गोव्यातील एक ठिकाण अशा एकूण ७ कातळ खोदशिल्पे असलेल्या गावांचा समावेश करण्यात आला. ह्याचा पाठपुरावा प्रथमतः राज्य पुरातत्त्व विभाग आणि मग केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण ह्यांच्यामार्फत झाला. पुढील काळात ह्यातील एखादी जरी जागा जागतिक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोने घोषित केली तर त्याचा कोकणातल्या पर्यटनावर फार मोठा परिणाम होईल. भारतात एकूण पर्यटनापैकी जवळपास ५०% पर्यटन हे ऐतिहासिक आणि वारसास्थळांच्या ठिकाणी केले जाते. कोकणात आधीच धार्मिक आणि निसर्ग पर्यटन मोठ्या प्रमाणावर चालू आहे सोबतीला ह्याची भर पडली तर स्थानिकांना रोजगार मिळेलच सोबत स्थानिक पदार्थ, चालीरिती परंपरा, जीवनशैली ह्यांची सुद्धा जपणूक होऊन आर्थिक प्राबल्य निर्माण होईल.

कोकणाला खूप मोठा सांस्कृतिक ऐतिहासिक वारसा लाभला आहे. ह्या कातळ खोद चित्रांच्या रूपाने तो पुढे येत आहे. माणसाच्या उत्क्रांतीच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर निर्माण झालेली कला आणि तिचा इतिहास आपल्याकडे दडून बसला आहे जो जगासमोर आणणे महत्त्वाचे आहे. त्याबाबत आम्ही पाऊलपुढे टाकले आहे. आता आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे काम पुढे न्यायचे आहे.

भारतात विशेषतः कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, लांजा, राजापूर आणि देवगड तालुक्यात आणि तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात जवळपास ५० ठिकाणी अशी कातळचित्रे आढळतात. रत्नागिरी, लांजा व राजापूर तालुक्यात ४२ गावांमधून ८५० कातळशिल्पे-चित्रे सापडली आहेत.**रत्नागिरी जिल्हा** : जयगड, चवे, रामरोड, करबुडे, मासेबाव, निवळी, गोळप, निवळी-गोवडेवाडी, कापडगाव, उमरे, कुरतडे, कोळंबे, गणेशगुळे, मेर्वी, गावखडी, डोर्ले इत्यादी. जिल्ह्यात ४९०हून अधिक कातळशिल्पे आढळतात. राजापूर तालुका : देवाचे गोठणे, सोगमवाडी, गोवळ, उपळे, साखरे कोंब, विखारे गोठणे, बारसू, पन्हाळे, शेंडे, कोतापूर, खानवली, देवीहतोळ, नाचण इत्यादी. राजापूर तालुक्यात २९० हून अधिक कातळ-शिल्पे आढळतात.

**लांजा तालूका** : भडे, हरुचे, रुण, खानावली, रावारी, लोवगण इत्यादी या तालुक्यात ७० हून अधिक कातळ-शिल्पे आढळतात.

**देवगड तालुका** : वाघोटन, बापर्डे.

**गोवा** : उसगाळीमळ, महाराष्ट्र-गोवा सीमेवरील विर्डी, हिवाळ, कुडोपी.

**सिंधुदुर्ग जिल्हा** : सिंधुदुर्ग येथील शोधमोहीम सुरू असून देवगडमध्ये काही ठिकाणी सापडली आहेत. कुडोपी, वाघोटन आणि हिवाळे येथे कातळ-शिल्पे आढळून येतात. कोकणातील प्रामुख्याने कातळ सड्यांवर हे काम सुरू आहे. रत्नागिरी, लांजा, राजापूर येथील समुद्र किनाऱ्यापासून पूर्व दिशेला २५ किलोमीटर अंतरापर्यंत आणि दक्षिणोत्तर सुमारे १५० किलोमीटर अंतरात आणि ३७०० चौरस किलोमीटर गावांमधील परिसरात कातळ चित्रे शोध संशोधन कार्य सुरु आहे. या कातळ शिल्प-चित्रांचा काळ मध्य अश्म युगीन म्हणजे इसवी सन पूर्व १०००० (दहा हजार वर्षे) असावा सिंधुदुर्गप्रमाणे कोकणातील ठाणे, रायगड या जिल्ह्यातील विविध ठिकाणी जांभा पाषाणावर चित्रे,नकाशे, काष्ठ शिल्पे, गुहा, लेणी, मंदिरे आढळून येतात.

**चवा** : मुंबई-गोवा महामार्गावरून गणपतीपुळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर चवा गाव आहे. तेथील कातळशिल्पात तीन मानव आणि तीन प्राणी कोरण्यात आले आहेत. मानवाची धड विरहीत असून दोन्ही हात पसरलेले आहेत. दुसऱ्या मानवाच्या हातात फुलासारखा आकार दिसतो, तर तिसऱ्यात मानवाच्या बाजूला अस्वलासारखा प्राणी दिसतो.

**दावूद** : येथील चित्रात एकशिंगी गेंडा, हरिणाच्या

कुळातील प्राणी, काही अनाकलनीय प्राणी आणि भौमितीय रचना आहेत. गेंड्याचा कान आणि शिंग उठून दिसतात. या चित्रात गेंड्याचे अस्तित्व विस्मयकारक आहे कारण हा प्राणी कोकणात आता आढळत नाही. या आकृतीचा आकार ४ मीटर बाय ३ मीटर आहे. काही प्राणी माकड व कोल्ह्यासारखे दिसतात.

**जांभरुण** : या ठिकाणी मात्र २५ मीटर बाय २५ मीटर क्षेत्रफळात जवळपास ५० आकृत्या कोरल्या आहेत. त्यापैकी ८ मानवाकृत्या तर इतर जलचर प्राणी आणि चतुष्पाद प्राण्यांचे आकार आहेत.

**कोळंब** : रत्नागिरी शहरापासून राजापूर सागरी मार्गावर ७ कि.मी. अंतरावर आहे. येथे १० प्राणी आणि मानवाकृती आहेत. मानवाकृतीचा आकार मोठा असून इतर प्राणी प्राण्यांच्या प्रत्यक्ष आकाराएव्हढे आहेत. यातील हरणाची आकृती लक्षवेधी आहे. या हरणाला दुहेरी शिंगे, वळलेली शेपटी, उघडेतोंड इत्यादी बारकाव कोरलेले आहे.

**कापडगांव** : हे ठिकाण रत्नागिरीपासून २० कि.मी. अंतरावर मुंबई-गोवा महामार्गावरील हातखंबा गावाजवळ आहेत. इथल्या चित्र समूहात मानव, कासव, मानवी पावले आणि काही भौमितीय आकृत्या कोरलेल्या आहेत.

**कशेळी** : हे स्थळ थोडे दुर्गम भागात असून रत्नागिरी-राजापूर रस्त्यावर गावखडी-गावडेवाडी बसस्टॉप पासून पाऊल वाटेने जावे लागते. दोन्हीकडून हे ४० कि.मी. अंतरावर आहे. इथले शिल्प भारतातील सर्वात मोठे कातळ-शिल्प असावं. इथल्या हत्तीची आकृती १८ मीटर बाय १३ मीटर इतकी भव्य आहे. हत्तीच्या अकृतिबंधाच्या पोटात वाघ, माकड, शार्क, गेंडा, स्टिंगरे, पक्षी, मोर यांसारख्या ७०/८० प्राणी व पक्षी यांच्या आकृत्या आहेत.

**देवीहसोळ** : येथे जाण्यासाठी पावस-आडिवरे मार्गे भूगावाकडून पुढे देवी हसोळला पोचता येते. येथील आर्यादुर्गा मंदिराजवळ कातळ-शिल्पे आहेत. इथली चित्रे खरोखरच अनाकलनीय आहेत कारण आयतामध्ये वेगवेगळ्या भौमितीय रचना असून त्या कुठलाही प्राणी, पक्षी किंवा मीनवी आकृत्या नाहीत.

**बारसू** : राजापूर-आडिवरे रस्त्यावर बारसू हे गाव आहे. रत्नागिरीपासून ६० कि.मी.वर असून इथे दोन वाघांच्या मध्ये माणूस उभा असल्याची रचना मानवाच्या खऱ्या आकारापेक्षा मोठ्या प्रमाणावर कोरलेली आहेत. माणसाच्या शेजारी मासा, ससा आणि मोर सुध्दा आहेत. माणसाच्या छातीवर योनी सदृश्य आकृती दिसून येते.

**उक्षी** : मुंबई-गोवा महामार्गावर हातखंब्याजवळ उक्षी गावात ६ मीटर बाय ६ मीटर आकाराचे हत्तीचा कातळ शिल्प आहे. हत्ती हा अतिशय देखणा असून त्याचा भव्य कान, शेपूट, सोंड व पाय हे सर्व अवयव सुबकपणे कोरलेले आहेत.

प्रागैतिहासिक गूढ आकृत्या - निवळीफाटा निवळी फाट्यापासून गणपतीपुळ्याकडे जाताना साधारण ८०० ते ९०० मीटरवर डाव्या बाजूस नारळाची झाडे दिसतात त्या झाडांच्या समोर रस्त्याच्या उजव्या बाजूस जमीनीवर काळ्या कातळावर काही गूढ आकृत्या कोरलेल्या दिसतात. चौरस आकारातील ह्या आकृत्या नेमक्या कशाच्या आहेत, त्या केव्हा कोरल्या गेल्या, त्याचा उद्देश काय यावर काहीच संशोधन झालेले नाही. कोरलेल्या एकसारख्या वाकार रेषा, आयत, त्रिकोण, अर्धवर्तुळ, उभ्या-आडव्या पट्ट्या, अशा आकृत्या आपणाला संभ्रमात टाकतात. तसेच काही मीटर पुढे रस्त्याच्या डाव्या बाजूस काळ्या कातळात खोदलेली विहीर आहे. तिला पायऱ्या खोदलेल्या असून त्याची रचना, वैशिष्ट्यपूर्ण आकार पाहाण्याजोगा आहे.

राजापूरच्या कातळावरही तब्बल १४ किलोमीटर अंतरावर अनाकलनीय शिल्पे आढळली आहेत. मासा, जलकुंभ, जलसर्प अशा जलस्थानाशी निगडीत चित्रविचित्र शिल्पाकृती आढळल्या आहेत. कोकणातल्या जांभा दगडाच्या कातळावर आढळणारी शिल्पे हा आजही मोठे गूढ आहे. ह्या आकृत्या कोणी आणि कधी खोदल्या असाव्यात याची नेमकी कोणालाही कालगणना आजतरी उपलब्ध नाही. एप्रिल-मे महिन्यात कातळावरचे सर्व गवत वाळल्यावर त्यावरील संबंधित आकृत्या दिसतात. कोकणातील जांभा दगडाचा विशेषतः कातळ रचनेचा अभ्यास करीत असताना असे आढळले की, इथल्या दुय्यम जांभा पठारावर ती कोरली गेली आहेत. कोकणातील आदिमानवाच्या अश्मयुगातील कालखंडातील ही कातळ-शिल्पे राज्य संरक्षित स्मारके होणार आहेत. आणि भविष्यात जागतिक पातळीवर संरक्षित वारसास्थळ म्हणून मान्यता पावतील. या अमोल कातळशिल्पामुळे कोकणच्या पर्यटनाला वेगळीच दिशा आणि भरीव चालना मिळेल. कातळशिल्पांसाठी राज्य सरकारने विशेष निधी मंजूर केला असून, त्या अंतर्गत त्यांच्या जतन संवर्धनाची योजना अंमलात येणार आहेत. कोकणवासीयांनी देखील या जागतिक स्तरावरच्या अमूल्य ठेव्याची जाण ठेवून त्याच्या संरक्षण करावे.

BOOKGANGA.com
Creation | Publication | Distribution

सर्व लेखक आणि प्रकाशकांची
विविध विषयांवरील सर्व पुस्तके
२५% सवलतीत* घरपोच उपलब्ध!


२ लाख+ प्रिंट बुक्स
१५,०००+ ई-बुक्स
१००+ ऑडिओ बुक्स

www.BookGanga.com

Please use
8888 300 300
For WhatsApp communication only

बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस,
डेक्कन जिमखाना, पुणे

*अटी लागू



# प्राचीन कोकणातील बंदरे

अंकुर काणे

व्यापार बहराला येण्यासाठी राजकीय स्थैर्य असण्याची आवश्यकता असते. मौर्य काळात आणि पुढे महाराष्ट्रात सातवाहन काळात अशा प्रकारचे राजकीय स्थैर्य मोठ्या काळासाठी उपलब्ध झाले आणि म्हणूनच सातवाहन काळात कोकणातील बंदरांतून पश्चिमेकडील देशांशी आणि विशेषकरून रोमन साम्राज्याशी मोठ्या प्रमाणात व्यापार होत असे. कोकण आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी हा आर्थिक सुवर्णकाळ म्हणता येईल.



भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीची विपुलता असलेला देश आहे. मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीमुळे, औद्योगिकीकरण होण्याच्या पूर्वीच्या काळात भारतातून फार मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय व्यापार चालत असे. भारतातील मालाला परदेशात मोठी मागणी होती. भारतातील वस्त्रे, मसाल्याचे पदार्थ, विविध प्रकारचे प्राणी, मौल्यवान दगड, हस्तिदंती कलाकुसरीच्या वस्तू, औषधी वनस्पती इत्यादी वस्तू निर्यात होत असत. हा आंतरराष्ट्रीय व्यापार भारताला अतिशय फायद्याचा ठरत होता. भारतातील मालाच्या बदल्यात, आपले व्यापारी सोने चांदी घेऊन येत असत. भारतातून सोन्याचा धूर निघतो असे जे म्हटले जायचे ते या संपन्न व्यापारी संबंधांमुळेच.

अतिप्राचीन काळापासून भारताचा इतर देशांशी व्यापार सुरू असून भारतातील तसेच भारताबाहेरील पुरातत्वीय उत्खननांतून तसेच साहित्यिक उल्लेखातून आपल्याला यासंबंधी भरपूर पुरावे मिळाले आहेत. अगदी सिंधू सरस्वती संस्कृतीच्या काळातदेखील हा व्यापार जोमाने सुरू होता. अनेक इतिहास संशोधकांच्या मते सिंधू सरस्वती संस्कृतीची समृद्धता या व्यापारावरच अवलंबून होती. सिंधू सरस्वती संस्कृती लयाला गेल्यावर काही काळ हा व्यापार थंडावला होता. परंतु भारतातील दुसऱ्या नागरीकरणानंतर या व्यापारात पुन्हा वाढ झाल्याचे दिसते. मौर्य - सातवाहन काळात हा व्यापार परमोच्च शिखरावर गेल्याचे आपल्याला दिसून येते. भारत हा पश्चिमेकडे असलेले देश आणि पूर्वेकडील नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न असलेले देश यांच्या बरोबर मध्ये आहे आणि त्यामुळे पाश्चात्य देशांसाठी या पूर्वेकडील देशातील माल विकत घेण्यासाठीचे महत्त्वाचे ठिकाण म्हणून देखील भारताचे स्थान महत्त्वाचे ठरले. भारताचा हा आंतरराष्ट्रीय व्यापार खुष्कीच्या मार्गाने आणि जलमार्गाने अशा दोन्ही पद्धतींनी होत असे. उत्तर भारतातील व्यापार हा मुख्यत्वे करून खुष्कीच्या मार्गाने तर दक्षिण भारतातून चालणारा व्यापार हा मुख्यत्वे समुद्रमार्गे होत असे.

दक्षिण भारतातून समुद्रमार्गाने होणाऱ्या या व्यापारात महाराष्ट्राचा वाटा अतिशय महत्त्वाचा होता. महाराष्ट्राला जवळ जवळ ७२० किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. समुद्राला लागून असलेल्या आणि सह्याद्री पर्वताच्या रांगेपर्यंत असलेल्या चिंचोळ्या भूपट्टीला कोकण म्हणतात. कोकणचा समुद्र किनारा दंतुर आहे आणि अंतर्गत भागात काही अंतरापर्यंत नौकायन करता येतील अशा अनेक खाड्या इथे आहेत आणि त्यामुळेच अनेक नैसर्गिक व सुरक्षित बंदरे उपलब्ध आहेत. व्यापार बहराला येण्यासाठी राजकीय स्थैर्य असण्याची आवश्यकता असते. मौर्य काळात आणि पुढे महाराष्ट्रात सातवाहन काळात अशा प्रकारचे राजकीय स्थैर्य मोठ्या काळासाठी उपलब्ध झाले आणि म्हणूनच सातवाहन काळात कोकणातील बंदरांतून पश्चिमेकडील देशांशी आणि विशेषकरून रोमन साम्राज्याशी मोठ्या प्रमाणात व्यापार होत असे. कोकण आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी हा आर्थिक सुवर्णकाळ म्हणता येईल. कोकणातील ही बंदरे सह्याद्री पर्वतातील घाटमार्गांनी देशावरील व्यापारी बाजारपेठांशी जोडली गेली होती.

सातवाहन साम्राज्याला या व्यापारातून प्रचंड आर्थिक फायदा होत होता. सातवाहन सम्राटांसाठी हा व्यापार किती महत्त्वाचा असेल हे यज्ञश्री सातकर्णी आणि वासिष्ठीपुत्र पुळुमावी यांच्या नाण्यांवर कोरलेल्या जहाजांच्या आकृतीवरून समजून येते. गुजरात माळवा भागात राज्य करणाऱ्या आणि सातवाहन साम्राज्याचे प्रतिस्पर्धी असलेल्या

पश्चिमी क्षत्रपांची नजर उत्तर कोकणातील भरभराटीला आलेल्या आणि प्रचंड आर्थिक फायदा देणाऱ्या बंदरांवर आणि त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशावर होती. या प्रदेशावरील प्रभुत्वासाठी दोन्ही राजसत्तांमध्ये प्रचंड युद्धे झालेली दिसून येतात.

महाराष्ट्राला वैभवाच्या शिखरावर नेणाऱ्या कोकणातील काही महत्त्वाच्या बंदरांचा आपण आता थोडक्यात परिचय करून घेऊया. व्यापारी वर्गाने बौद्ध धर्माला उदार आश्रय दिलेला होता त्यामुळे या बंदरांना देशावरील बाजारपेठांशी जोडणाऱ्या व्यापारी महामार्गांच्या आजूबाजूला आपल्याला बौद्ध लेणी कोरलेल्या आढळून येतात.

**सोपारा -** कोकण किनारपट्टीच्या उत्तरेकडच्या भागात शूर्पारक किंवा सोपारा नावाचं एक अतिशय प्रख्यात बंदर होते. सोपाऱ्याची ओळख आता नालासोपाऱ्याशी पटवण्यात आली आहे. मौर्यकाळापासून किंवा कदाचित त्याही आधीपासून ते साधारण १५व्या शतकापर्यंत सोपारा हे एक अतिशय प्रसिद्ध बंदर होते तसेच हे एक राजकीय, आर्थिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे नगर होते. इ.स. पूर्व १५०० ते इ.स. १३०० इतक्या प्रदीर्घ काळासाठी सोपारा ही अपरान्ताची राजधानी होती. कोकणाला प्राचीनकाळी अपरान्त म्हणत असत. नालासोपाऱ्यात मौर्यकालीन बांधीव स्तूपाचे अवशेष मिळाले आहेत तसेच येथे सम्राट अशोकाच्या धर्माज्ञांचे काही भाग देखील मिळाले आहेत. जातक कथांमध्ये सुप्पारक जातक नावाची एका नौकाप्रमुखाची कथा आहे ती सोपाऱ्याशी संबंधित असावी असे मानले जाते. पूर्णावदान नावाच्या बौद्ध धार्मिक कथेत सोपाऱ्यातील पूर्ण नावाच्या व्यापाऱ्याची गोष्ट आली आहे. सोपारा हे बंदर म्हणून किती मोठे होते हे आपल्याला या कथेतून समजते. महाभारतात देखील सोपाऱ्याहून होणाऱ्या नौकायनाचा थोडक्यात उल्लेख आहे. बायबलमध्ये ओफीर नावाच्या बंदराचा उल्लेख आला आहे. ह्या बंदरातून सोलोमन राजाच्या राज्यात व्यापारी मालाने भरलेली जहाजे येत असत. हे ओफीर बंदर म्हणजेच सोपारा असे अनेक संशोधकांचे मत आहे.

'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' हा इसवी सनाच्या पहिल्या शतकात लिहिला गेलेला ग्रंथ. इजिप्शियन ग्रीक नाविकाने हा ग्रंथ लिहिला असला तरी लेखकाचे नाव मात्र समजू शकलेले नाही. या ग्रंथातून आपल्याला इजिप्तमधील बंदरांतून भारताशी होणारा व्यापार, त्यासाठी लागणारा कालावधी, वाटेतील बाजारपेठा, भारतातील बाजारपेठा, शहरे, बंदरे, भारतातील व्यापारी माल, येथील राजकीय स्थिती तसेच इतर विविध प्रकारची माहिती मिळते. दक्षिणाबेडस असा महाराष्ट्राचा उल्लेख लेखकाने केला आहे. दक्षिणापथ या संस्कृत शब्दाचे हे अपभ्रंशित रूप आहे. या दक्षिणाबेडस मधील शहरांचा उल्लेख करताना सोपाऱ्याविषयीची माहिती लेखकाने नमूद केली आहे. भृगुकच्छ नंतर दक्षिणेकडे असलेल्या महत्त्वाच्या बाजारपेठांच्या नावांची एक यादी या ग्रंथात दिली गेली आहे ज्या मध्ये सोपाऱ्याचा समावेश केलेला आपल्याला दिसून येतो.

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात क्लोडियस टॉलेमी नावाचा एक प्रसिद्ध इजिप्शियन ग्रीक विद्वान होऊन गेला. याने अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. टॉलेमीचा भूगोल हा त्यातीलच एक प्रसिद्ध ग्रंथ. भूगोल विषयाशी संबंधित असलेल्या इतर समकालीन ग्रंथांपेक्षा या ग्रंथाचे स्वरूप आणि उद्दिष्ट वेगळे असून जगाचा नकाशा बनवण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या माहितीचा समावेश यात करण्यात आहे. आधुनिक शोधांमुळे टॉलेमीची अनेक मते आता चुकीची सिद्ध झालेली असलेली तरी ऐतिहासिक माहिती मिळवण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ आजही महत्त्वाचा मानला जातो. टॉलेमीने कोकण किनारपट्टी विषयी माहिती देताना त्याचा उल्लेख अराईके असा केला आहे. अराईके प्रांतामधे येणाऱ्या महत्त्वाच्या बंदरांमध्ये सोपाऱ्याचा समावेश करण्यात आला आहे तसेच सोपाऱ्याच्या अक्षांश आणि रेखांशांविषयी देखील येथे उल्लेख मिळतो.

याव्यतिरिक्त अनेक साहित्यिक आणि शिलालेखीय पुराव्यातून आपल्याला सोपारा बंदराविषयी माहिती मिळते. सोपाऱ्यात स्तूपाच्या जवळच एका पांढरीचे अवशेष मिळाले असून तिथे उत्खनन झाल्यास प्राचीन सोपारा बंदराचे अवशेष मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**कल्याण -** उल्हास नदीच्या किनारी वसलेले आजचे कल्याण हे देखील सातवाहनकाळातील अतिशय प्रसिद्ध असे व्यापारी बंदर होते. पेरिप्लसमधे याचा कलियण असा उल्लेख आढळतो. या ग्रंथातील नोंदीवरून असे वाटते की कल्याण बंदर म्हणून सातवाहनकाळातच उदयाला आले किंवा जाणीवपूर्वक बंदर म्हणून त्याचा विकास केला गेला. उत्तर कोकणात झालेल्या पश्चिमी क्षत्रप आणि सातवाहनयांच्या संघर्षात कल्याणचा मोठ्या प्रमाणावर विनाश केला गेला आणि एखादे ग्रीक जहाज व्यापारासाठी कल्याणमधे आलेच तर ते क्षत्रपांच्या सैनिकांकडून जबरदस्तीने बेरीगाझा म्हणजेच भृगुकच्छ बंदरात नेले जात असे. भृगुकच्छ म्हणजेच आजचे भडोच शहर जे क्षत्रपांच्या राज्यातील अतिशय महत्त्वाचे बंदर

होते. कल्याणचे बंदर म्हणून महत्त्व काही काळासाठी कमी झाले असावे म्हणूनच टॉलेमीने आपल्या ग्रंथात कल्याणचा उल्लेख केलेला नसावा. पुढील काळात कल्याण बंदर पुन्हा भरभराटीला आलेले दिसते कारण तसा उल्लेख आपल्याला कॉमस इंडिकोप्लेस्टसच्या ग्रंथात मिळतो.

मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाल्यामुळे सातवाहनकालीन वसाहतीचे काहीच अवशेष आज आपल्याला आढळत नाहीत. १९५७-५८ मधे कल्याणमध्ये सातवाहनकालीन वसाहतीचे काही अवशेष मिळाल्याची आणि काही रोमन पद्धतीची खापरे मिळाल्याची एक नोंद आढळते. कल्याण पूर्व मधे असलेल्या एका टेकडीवर एक छोटे कोरीव लेणे असल्याची नोंद देखील आपल्याला आढळते परंतु लेण्याच्या कालखंडाविषयी निश्चित विधान करता येत नाही. अनेक सातवाहनकालीन आणि नंतरच्या शिलालेखांतून आपल्याला कल्याणच्या समृद्धीचे पुरावे मिळतात.

**चौल -** रायगड जिल्ह्यातील कुंडलिका नदीच्या मुखाजवळ चौल बंदर वसलेले होते. कल्याण बंदराचा वापर कमी झाल्यामुळे कदाचित त्याला पर्याय म्हणून चौलचा बंदर म्हणून विकास झाला असण्याची शक्यता वाटते. पेरिप्लसमधे याचा उल्लेख सेमिल्य असा तर टॉलेमीच्या ग्रंथात सिमिल्य असा आढळतो. ग्रंथांमध्ये चौलचा उल्लेख चंपावती किंवा रेवतीक्षेत्र असा देखील मिळतो. कान्हेरी लेण्यांमध्ये चौलचा उल्लेख आढळतो. पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या डॉ. विश्वास गोगटे यांनी चौलमध्ये उत्खनन केले होते. उत्खनकाच्या अंदाजानुसार प्राचीन चौल २ किलोमीटर्सपेक्षा जास्त भागावर पसरलेले होते. सातवाहन काळातील अनेक महत्त्वाच्या गोष्टी या उत्खननात आढळून आल्या ज्यात सातवाहनकालीन खापरे, रोमन मद्यकुंभाचे अवशेष, बंदराच्या धक्क्याचा भाग इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

**मांदाड -** रायगड जिल्ह्यातील मंदार नदीच्या किनाऱ्यावर हे बंदर वसलेले होते. पेरिप्लस आणि टॉलेमीच्या ग्रंथामधील मंदगर या जागेची ओळख मांदाड बरोबर पटवण्यात आली आहे परंतु इतिहासकारांमध्ये याविषयी एकमत दिसत नाही. मांदाडपासून जवळ असलेल्या सातवाहनकालीन कुडा लेण्यांमध्ये असलेल्या शिलालेखात व्यापाऱ्यांशी संबंधित काही उल्लेख आढळून आले आहेत.

**दाभोळ -** वाशिष्ठी नदीच्या किनाऱ्यावर दाभोळ वसलेले आहे. पेरिप्लसमध्ये पालाईपट्टमई असा एका बंदराचा उल्लेख केलेला आढळतो. संशोधकांच्या एका गटाच्या मतानुसार हा उल्लेख दाभोळचा आहे. सातवाहनकाळात असलेल्या समुद्राच्या पाण्याची पातळी लक्षात घेता दाभोळ हे सातवाहनकाळात प्रसिद्ध बंदर असण्याची शक्यता कमी आहे. शिलालेखांमधून देखील दाभोळचा उल्लेख मध्ययुगापासून मिळायला सुरुवात होते. डेक्कन कॉलेजचे संशोधक डॉ. विश्वास गोगटे यांनी पालाईपट्टमई हे पालशेत असावे असे मत मांडले आहे. पालशेत गावात अनेक प्राचीन परंतु निश्चित कालखंड सांगता येणार नाही असे अवशेष आढळून येतात. सातवाहनकालीन खापरे देखील येथे मिळाली असली तरी या संदर्भात अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी अधिक संशोधनाची आवश्यकता आहे असे म्हणता येईल.

वर उल्लेख केलेल्या बंदरांव्यतिरिक्त अनेक छोटी मोठी बंदरे कोकणात आहेत. जागेअभावी सगळ्यांचा समावेश करता येत नाही म्हणून त्यातील निवडक बंदरांची माहिती आपण करून घेतली. ही सर्व बंदरे सह्याद्रीतील घाटवाटांनी देशावरील बाजारपेठांशी जोडलेली होती. उदाहरण घ्यायचं झालं तर कल्याण हे नाणेघाटातून जुन्नर आणि तेथून पुढे सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान म्हणजेच पैठणशी व्यापारी मार्गाने जोडलेले होते. या व्यापारी मार्गांच्या आसपास अनेक बौद्ध लेण्या कोरलेल्या आपल्याला आढळून येतात. जुन्नरमध्ये असलेले विविध लेणी समूह किंवा कार्ले, भाजे, बेडसे, नासिक लेणी ही याची प्रातिनिधिक उदाहरणे आहेत.

महाराष्ट्राच्या सुवर्णयुगाचा अंत या बंदरांचा अस्त झाल्यानंतरच झालेला इतिहासात आपल्याला दिसून येतो. कोकणातील मुंबई आणि आसपासची बंदरे सोडली तर इतर बंदरांचा विकास केल्यास कोकण आणि महाराष्ट्राला पुन्हा एकदा सोन्याचे दिवस येतील हे निश्चित.

**संदर्भ ग्रंथ -** १) **गाथा प्राचीन महाराष्ट्राची भाग १** - अंकुर काणे, सागर सुर्वे, संपदा कुलकर्णी, श्वेता काजळे २) **सह्याद्री** - स. आ. जोगळेकर ३) **The Ancient Routes of the Deccan and the Southern Peninsula** - Dilip K. Chakrabarti. ४) **The Periplus of the Erythrean Sea** - Translated by Wilfred H. Schoff. ५) **Ancient India as described by Ptolemy** - J.W. McCrindle ६) **सिद्धार्थ जातक खंड १ ते ७** - दुर्गा भागवत ७) **Trade and trade routes in Ancient India** - Moti Chandra.



# छत्रपती शिवाजी महाराज आणि कोकण प्रेम

**सदाशिव टेटलिवलकर**

मध्ययुगात विशेषतः शिवकाळात मैदानावरील युद्धपट सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात सरकला. डोंगरी किल्ल्यांना महत्त्व आले. या गड-किल्ल्यांचा वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी चतुराईने करून शत्रूला पराभवाची धूळ चारली. प्रतापगड हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. आजही सैन्य दलात प्रतापगड युद्धाचा अभ्यास केला जातो. गनिमी कावा तंत्र आणि गिरिदुर्ग, स्थळदुर्ग, वनदुर्ग आणि जलदुर्गाचा प्रभावी वापर छित्रपती शवाजी महाराजांएवढा कोणीही केला नाही.

महाराष्ट्राच्या पश्चिमेला ७२० किमी लांबीचा अरबी समुद्रकिनारा आहे, तर दक्षिणोत्तर धावणारा लांबीचा सह्याद्री पर्वत आणि त्याच्या उत्तरेकडून पूर्व-पश्चिम पसरलेला सातपुडापर्यंत असून या दोन्ही पर्वतांमध्ये त्रिकोण साधत झालेला पूर्वेकडील प्रचंड पठारी प्रदेश आणि पश्चिमेला सह्याद्रीच्या पायतळी उत्तरेकडील दमणगंगेपासून दक्षिणेला तेरेखोल नदीपर्यंत निसर्ग श्रीमंतीने नटलेली चिंचोळी कोकणपट्टी, हे आहे. महाराष्ट्राचे हे भौगोलिक स्थळविशेष होय. या स्थळ वैशिष्ट्याने महाराष्ट्राची सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जडणघडण झाली आहे. इथल्या गिरिशिखरांवर, जमिनीवर, सागरकिनारी गड-किल्ले, लेणी, मंदिरे, वाडे हुडे, तलाव, विहिरी, घाट, वाटा इत्यादींचा प्राचीन व मध्ययुगीन खुणा जागोजागी दिसतात. विशेषतः या इतिहास खुणांचा केंद्रबिंदू आहे दक्षिणोत्तर धावत गेलेली सह्याद्रीची मुख्य रांग आणि त्याच्या पूर्व-पश्चिम पसरलेल्या उपशाखांच्या शिखर माथ्यावरील दुर्ग.

या दुर्गांची संकल्पना व निर्मिती फार प्राचीन आहे. सह्याद्री व सातमाला रांगातील, गिरी-शिखरांवरील दुर्गनिर्मितीला सातवाहन काळापासून सुरुवात झाली. अपरान्तातून (कोकण) देशावर जाणारे थळघाट, कातुरबाघाट, माळशेज, नाणेघाट, बोरघाट, कावळ्याघाट, लिंग्याघाट, उंबरखिंड, भोरघाट, कुंभार्लीघाट, अंबाघाट, तिवऱ्याघाट, फोंडाघाट, वरदावा अशा अनेक घळ्या सह्याद्रीत नैसर्गिकरित्या तयार झाल्या असून प्राचीन व मध्ययुगीन काळात त्यांच्या माध्यमातून कोकण व देश जोडले गेले आहेत. यातील काही घाट सातवाहन काळात बांधण्यात आले होते. त्यातून मनुष्य, बैल, घोडे, खेचरे यांच्या साहाय्याने लमाण व्यापारी तळकोकण ते देशावर वाहतूक करीत असत. घाटमाथ्यावर तेव्हा अनेक दुर्ग बांधण्यात आले. त्याचा उपयोग प्रवासी, व्यापारी मालाचे संरक्षण करणे एवढाच असे. त्यामुळे सह्याद्रीच्या कुशीत, दऱ्याखोऱ्यात युद्ध झाल्याचे एकही उदाहरण तत्कालीन इतिहासात सापडत नाही. युद्ध होत ती मोकळ्या मैदानावर किंवा राजधानी असलेल्या भुईकोट वा नगराभोवती. पण पुढे उत्तरेकडून आलेल्या मुस्लीम टोळधाडीत ही सर्व नगरे भुईसपाट झाली. मध्ययुगात विशेषतः शिवकाळात मैदानावरील युद्धपट सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात सरकला. डोंगरी किल्ल्यांना महत्त्व आले. या गड-किल्ल्यांचा वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी चतुराईने करून शत्रूला पराभवाची धूळ चारली. प्रतापगड हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. आजही सैन्य दलात प्रतापगड युद्धाचा अभ्यास केला जातो. गनिमी कावा तंत्र आणि गिरिदुर्ग, स्थळदुर्ग, वनदुर्ग आणि जलदुर्गाचा प्रभावी वापर शिवाजी महाराजांएवढा कोणीही केला नाही.

शिवाजी महाराज, सह्याद्री आणि सागर या तीन 'स'कारात सामावलेल्या गड-किल्ल्यांचा स्फुर्तिपद, प्रेरणादायी इतिहास मराठी मुलखातील तमाम घराघरातून आबालवृद्धांच्या तनमनात घट्टपणे रुजला आहे. हा इतिहास रुजविणारा राजा कसा होता?

***निश्चयाचा महामेरू। बहुत जणांसी आधारू।***
***अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।***

या योग्याला अनेक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. राज्यशास्त्र, युद्धशास्त्र, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, पर्यावरणशास्त्र, जलशास्त्र, भूशास्त्र, स्थापत्यशास्त्र. थोडक्यात १४ विद्या आणि ६४ कलांमध्ये पारंगत असा हा शूर, पराक्रमी, जिद्दी, मुत्सद्दी, दूरदृष्टीचा आणि अखंड सावधचित्त असा होता शिवाजी महाराजांकडे आपल्या आणि परराज्यातील वस्तू वास्तूंचे आणि तिथल्या भौगोलिक स्थानाचे अचूक ज्ञान होते. पूर्व इतिहास, भूगोल, भूगर्भशास्त्र, जलशास्त्र, स्थापत्यशास्त्र या ज्ञानाच्या जोरावर त्यांचा वावर नवख्या ठिकाणीही सुरक्षित व सहजपणे होत असे. हे आपण त्यांच्या ५ जानेवारी इ.स. १६६४ व २ ऑक्टोबर इ.स. १६७० ची सुरतेची दोनदा केलेली लूट, इ.स. १६६६ मध्ये शेकडो मैल दूर असलेल्या आग्र्याहून सहीसलामत करून घेतलेली सुटका किंवा इ.स. १६७६-७७ सालातील दक्षिण दिग्विजयाची मोहीम वाचल्यावर लक्षात येते. बातमी काढणारा हेर हा त्यांचा तिसरा डोळाच. या त्रिनेत्राच्या जोरावर शिवाजी महाराजांनी अनेक अकल्पित व अविस्मरणीय साहसे यशस्वीपणे पार पाडली आहेत. त्यांनी बांधलेले राजगड, प्रतापगड, रायगड हे डोंगरी किल्ले आणि सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, खांदेरीसारखे सागरी किल्ले ते उत्कृष्ट स्थापत्य विशारद असल्याचे ग्वाही देतात.

हे माझे राज्य आहे असे रयतेला वाटायला लावणारे कल्याणकारी स्वराज्य निर्माण करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी इ.स. १६४६ मध्ये गुंजन मावळातील वेल्हा गावाच्या मागे उभ्या असलेल्या प्रचंडगडाला तोरण बांधून स्वराज्य उद्योगास सुरुवात केली. तोरणागडाच्या डोंगर धारेवरच मुरुंब देवाचा बेलाग डोंगर होता. पंख्याप्रमाणे त्याला सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती माची असून मधल्या उंच बेलाग कड्यावर बालेकिल्ला बांधून तिन्ही माचींना तटा बुरुजाच्या अंगडेटोपड्याने सजविण्यात आले. राजांचा हा आवडता गड. त्याला चढण्यास अवघड दुर्घट आणि दुर्गम करण्यात येऊन तिथे स्वराज्याची पहिली राजधानी बनवण्यात आली. स्वराज्यातील महत्त्वाच्या घडामोडींचा राजगड हा साक्षीदार आहे. शाहिस्तेखानाची फजिती, प्रतापगड युद्ध, पन्हाळागडावरून सुटका, जयसिंगाशी तह,

आग्र्याहून बालराजे संभाजी व सर्वसोबत्यांसह सुरक्षितपणे करून घेतलेली सुटका, सुरतेची लूट याबरोबर काही दुखःद घटनाही घडल्या. महाराजांची आवडती राणी सईबाई यांचा मृत्यू, जिवाभावाचा सखा तानाजी मालुसरा याला सिंहगडावर आलेले वीरमरण, राजगडाभोवती शाहिस्तेखानाने टाकलेला फास आणि औरंगजेबाच्या स्वराज्याच्या दिशेने वाढत चाललेल्या हालचाली पाहून स्वराज्यासाठी सुरक्षित व अभेद्य स्थळांचा शोध ते घेऊ लागले.

महाराजांचा तोरणा ते रायगड हा २८ वर्षांचा प्रवास म्हणजे ज्वलंत इतिहास आहे. राज्य करायचे ते वाढवायचे, रयतेची काळजी घ्यायची म्हणजे त्याला आर्थिक बळ हवे. ते बळकट करायचे म्हणजे त्यासाठी समुद्र, बंदरे आणि घाटमार्ग स्वराज्यात असायला पाहिजेत. ती संधी लवकरच त्यांच्याकडे चालून आली. इ.स. १६४८ साली चंद्रराव मोरे म्हणजे यशवंतराव मोरे (चंद्रराव ही त्यांची पदवी होती) जावळी बळकावून अधिकार गाजवू लागला. त्यामुळे त्याचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाही दरबारातून त्याचे पारिपत्य करण्यासाठी अफझल खानाला पाठविण्यात आले. अफझलखानाला घाबरून चंद्रराव मोरे याने शिवाजी महाराजांना मदतीसाठी बोलविले, परंतु पुढे याची जाण न ठेवता मोरे शिवाजी महाराजांविरुद्धच उलटला. या संघर्षात इ.स. १६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी चंद्रराव मोरेचा पूर्ण पाडाव करून जावळी काबीज केल्यावर जावळी प्रांतातील व कोकणातील किल्ले आणि देश व कोकणला जोडणारे महत्त्वाचे मार्ग ताब्यात घेतले. लष्करी हालचालींच्या दृष्टीने हे घाट अतिशय महत्त्वाचे होते. शिवाय राज्याच्या खजिन्यात व्यापारी मालावरील जकातीची भर पडू लागली. यात पारघाटातील एका डोंगराने त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्याचे नाव 'ढोरप्या डोंगर'. महाराजांनी तटा-बुरुजांनी त्याला भक्कम व बळकट केला. अफजलखानाच्या वधाने स्वराज्यावरील संकट टळले.



लाखो सैनिक, प्रचंड धनसंपत्ती व ताकदीची घमेंड असणाऱ्या भीमकाय अफझलखान आणि नुकताच स्वराज्य स्थापनेचा उद्योग सुरू केलेले तरुण शिवाजी महाराज आणि त्यांचे मूठभर मावळे यांचा संग्राम ज्या ठिकाणी झाला तो जावळी खोऱ्यातील घनदाट झाडीने व्यापलेला प्रतापगड हे स्थान ऐतिहासिक आणि आधुनिक युद्धनीतीतील दूरदृष्टी, मुत्सद्दीपणा आणि शौर्याची कमाल परिसीमा गाठणारे रणयुद्ध स्थान आहे. असे इतिहासकार आणि युद्धशास्त्रातील तज्ज्ञांना वाटत असल्यामुळे प्रतापगडावर अनेकांचे अभ्यासपूर्वक लेख, कथा, कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्राचे किंबहुना संपूर्ण भारतीयांचे स्फूर्तिस्थान असलेल्या प्रतापगडावर शिवप्रेमी, गडप्रेमी व देशप्रेमींची पाऊले आपसुकपणे वळत असतात.

**स्वराज्यात कोकणातील किल्ल्यांचे महत्त्व**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रात स्वराज्यात ३६० गड-कोट असल्याचे म्हटले आहे. त्यापैकी कोकणात डोंगरी किल्ले, भुईकोट आणि जलदुर्ग मिळून १६७ किल्ले आहेत. या किल्ल्यात रायगड, प्रतापगड, माहुली, जव्हार, दुर्गाडी - कल्याण, अलिबाग, मुरूड-जंजिरा, देवगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या किल्ल्यांचे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. जागेअभावी त्यांचा धावता आढावा येथे घेत आहे.

प्रतापगडाचे काम पूर्ण होत असतानाच आबाजी सोनदेव यांनी २४ ऑक्टोबर १६५७ रोजी कल्याण-भिवंडी जिंकून घेतले. शिवाजी महाराज जातीने कल्याणला आले. त्यांनी साष्टी ऊर्फ ठाणे परिसरातील समुद्रातून आत येणारे खाडी मार्ग अभ्यासपूर्वक पाहिले. व्यापाऱ्याच्या निमित्ताने आलेल्या दर्यावर्दी पोर्तुगीजांच्या वखारी त्यावेळी ठाण्याच्या खाडी किनारी होत्या. वखारीच्या आडोशाने त्यांनी स्वतंत्रपणे कोटकिल्ले बांधून हातपाय पसरण्यास सुरुवात केली होती. शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज व इंग्रज या बेरकी व धूर्त लोकांचा अंतःस्थ हेतू दूरदर्शीपणे हेरला आणि कल्याण खाडीकिनारी दुर्गाडी किल्ला बांधून आरमारी जहाजांची गोदी सुरू केली. या गोदीतून तरांडी, तारवे, शिवाडे, गुराबा, पगारा, तीरकाठी, मचवा, पाल, संगमिऱ्या आणि फत्तेमाऱ्या अशा निरनिराळ्या आकारांची लढाऊ जहाजे कल्याण बंदरात तयार होऊ लागली.

याच काळात ठाण्यातील सर्वात उंच, बलदंड माहुली किल्लाही स्वराज्यात दाखल झाला. बाल शिवाजी महाराजांची चिमुकली पाऊले जपून ठेवणारा माहुलीगड शहापूर तालुक्यात आहे. शहाजी राजे निजामाचा लहानगा वारसदार मूर्तजा याला मांडीवर घेऊन निजामाचे राज्य स्वतः चालवू लागले. याचा राग मोगल बादशहा शहाजहान

याला आला. त्याने विजापूरच्या बादशहाला सोबत घेऊन शहाजीराजांच्या मागावर आला असता, शहाजी राजे मूर्तजाला घेऊन माहुलीगडावर आले. इ.स. १६३६ साली त्यांच्यासोबत जिजाबाई, थोरले संभाजीराजे आणि बाल शिवाजीही होते. ठाणेकरांच्या दृष्टीने ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे.


जव्हार संस्थान सुरतेच्या लुटीचा साक्षीदार आहे. कोलवनातील घनदाट अरण्यात जव्हार, मोखाडा, डहाणू, तलासरी हे प्रांत मोडतात. या कोलवनावर जव्हारच्या आदिवासी राजाचे राज्य होते. मोगली अत्याचाराची भरपाई म्हणून ५ जानेवारी १६६४ आणि पुन्हा १६७०च्या ऑक्टोबरमध्ये शिवाजी महाराजांनी सुरतेची लक्ष्मी स्वराज्यात आणली. शिवाजी महाराजांच्या ठाण्यातील या हालचालीवर अनेक तात्कालीन प्रत्यक्षदर्शी युरोपियन प्रवाशांनी लिहिले आहे. त्यापैकी फ्रेंच प्रवासी 'कारे बार्तेलमी (१६६८ ते १६७४)' याने मोरोपंतांच्या जव्हार व रामनगरविरुद्धची मोहीम व सुरतेची लूट याबद्दलची सविस्तर माहिती दिली आहे. परंतु महत्त्वाचे म्हणजे त्याने शिवाजी महाराजांची तुलना अलेक्झांडर, स्वीडनचा राजा गुस्टाव ॲडॉल्फ आणि ज्युलियन सीझर यांच्याशी केली आहे. आपल्या विरोधकांच्या मनातही आदराची भावना निर्माण करणाऱ्या या युगपुरुषाची पाऊले ठाणे परिसरात उमटली आहेत. ही आम्हाला ठाणेकरांना गौरवास्पद व मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे.

प्रतापगडावर अफझलखान आणि त्याच्या लाखो सैनिकांची धुळधाणीची बातमी ऐकून पोर्तुगीज, इंग्रज व हिंदुस्थानच्या चारही पातशाह्या पार हादरून गेल्या. त्यांच्या या बधीर अवस्थेचा फायदा घेत शिवरायांनी भराभर कोकणात उतरून मुलुख ताब्यात घेण्याचा सपाटा लावला व कोणाच्या ध्यानीमनी नसताना विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात असलेला धैरीया नामक किल्ला इ.स. १६५३ मध्ये स्वराज्यात दाखल झाला. त्यांनी जातीने गड पाहिला आणि ठरवले की स्वराज्य निर्धोक करावयाचे असेल तर किनारपट्टीवरील समुद्र आपल्या ताब्यात हवा. त्यांनी गडाची नव्याने बांधणी करून स्वराज्याचे नवे आरमार उभे केले. (कल्याण बंदरी त्यांनी गोदी उभारलीच होती.) त्यांनी धेरियागड हे नाव बदलून त्याचे नाव विजयदुर्ग असे ठेवले. विजयदुर्गाने महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीच्या प्रवेशद्वाराची चावीच जणू महाराजांच्या हाती दिली. आरमारप्रमुख दौलतखान, दर्यासारंग, मायनाक भंडारी आणि सी. व्ही. मेस्ती यांनी शत्रूच्या आरमारावर महाराष्ट्राचा धाक बसविला व स्वराज्याचा भगवा झेंडा मोठ्या डौलाने सागरावर फडकत ठेवला.

विजयदुर्गावर उभारलेल्या आरमारामुळे, आदिलशाही, मुरूड-जंजिऱ्याचा सिद्धी आणि व्यापाराच्या निमित्ताने हिंदुस्थानात हातपाय पसरू पाहणाऱ्या पोर्तुगीज व इंग्रज यांना वचक बसला तरी शिवाजी महाराजांच्या मनात अफलातून जलदुर्गाची निर्मिती व्हावी अशी इच्छा होती. मालवणच्या किनाऱ्यापासून दीड-दोन कोसावर भर समुद्रात कुरटे नावाचे बेट त्यांना दिसले. ते प्रत्यक्ष त्या बेटावर उतरले आणि १० नोव्हेंबर १६६४ ला त्यांच्या कल्पनेतला जलदुर्ग प्रत्यक्ष साकारू लागला. जवळ जवळ तीन वर्षे अहोरात्र काम करून हा गड सजला. तीन-साडेतीन किमी लांबीची नागमोडी वळण असलेली तटबंदी, १० मीटर उंच व २ ते ४ मीटर रूंद असून तिला एकूण ५२ भक्कम बुरूज बांधले आहेत. समुद्रातील वादळी लाटा आणि कैक झुंजी अंगावर झेलून सुद्धा सिंधुदुर्गाचे तट अद्याप अभेद्य आहेत. त्याचे कारण तटा बुरुजांच्या पायामध्ये शेकडो मण शिसे वितळवून त्या रसाने पायाचे दगड एकजीव करण्यात आले आहेत. सिंधुदुर्गाच्या बांधणीत केलेला हा प्रयोग तत्कालीन पाणकोट स्थापत्य शास्त्रात नावीन्यपूर्ण होता. सिंधुदुर्गाचे दोन उपदुर्ग राजकोट व सर्जेकोट आणि त्याचवेळी पद्मगड बांधण्यात येऊन त्याच्या शेजारी लढाऊ जहाज बांधणीचा कारखाना सुरू केला आणि राज्याचे, आरमाराचे मुख्यालय सिंधुदुर्गातच स्थापन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी शिवतीर्थ रायगड कसा आहे? 'चखोट जागा, दीडगाव उंच, कड्यावर कुठे पाखरू उतरायलासुद्धा जागा नाही. असा बेलाग कडा. एकांड्या डोंगर तेव्हा ही जागा तख्तास बहुत उत्तम' हे शब्द दस्तुरखुद्द महाराजांचे आहेत. राजधानी कशी असावी? याचा सुंदर आदर्श रायगडावर पहावयास मिळतो. गंगासागर, कुशावर्त तलाव, हत्ती तलाव, कोलीम तलाव, काळा तलाव आदी आठ तलाव आणि सुमारे ९० पाण्याची टाकी अशी पाण्याची चोख व्यवस्था, शिवाय पर्जन्य मापक, रूंद रस्ते, त्याच्या दोन्ही बाजूला पुरुषभर उंचीची जोत्यावरील दुकाने तथा बाजारपेठ, राजप्रसाद, राण्यांचे व अष्टप्रधानांचे महाल, राजसभा, नगारखाना, महाद्वार, नाना दरवाजा, वाघ दरवाजा, गंगासागर तलावात आपले प्रतिबिंब पाहाणारे उंच मनोरे, त्याच्या मध्यातून थुई थुई उडणारे कारंजे, राजसेवकांची लहानमोठी सुमारे तीनशे घरे, अश्वशाळा, गजशाळा, गोशाळा, अठरा कारखाने, जगदीश्वर मंदिर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे गडावरील या नगरीच्या सांडपाण्याची त्वरित निचरा होणारी फरसबंदी नाळीची व्यवस्था २१ व्या शतकातील नगरपालिकेला लाजविल अशी चोख होती. हे रायगडावरील राजवाडा व इतर वास्तूंचे अवशेष पाहिल्यावर लक्षात येते.

महाराजांच्या स्वराज्याची भव्य राजधानी बनविणाऱ्या शिल्पज्ञाचे नाव हिरोजी इंदुलकर. जगदीश्वर मंदिराच्या



प्रवेशद्वारापाशी पायरीवर त्याचा शिलालेख आहे आणि प्रवेशद्वाराच्या बाहेरील बाजूस भिंतीवर आठ ओळींचा शिलालेख असून त्याचा भावार्थ असा

**।।श्री गणपतये नमः।।**

सिंहासनाधीश छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आज्ञेने शके १५९६ आनंदनाम संवत्सर यावर्षी शुक्ल पक्षाच्या एकादशी तिथीला आश्लेषा नक्षत्र असताना ज्योतिषशास्त्रात कीर्तिवान मानलेल्या या मुहूर्तावर तिन्ही लोकांना आनंद देणारा जगदीश्वराचा प्रासाद ज्याच्या सभोवती मनोरे, गजशाळा, विहिरी, तळी, उंच राजवाडे आहेत अशा त्या वास्तू रायगडावर हिरोजीने निर्माण केल्या आणि मंदिराच्या प्रवेशद्वारावरच्या पायरीवरच्या शिलालेखात कोरले आहे. सेवेचे ठाई तत्पर, हिरोजी इंदूलकर वरील लेख संस्कृतमध्ये असून त्याचे छायाचित्र सोबत आहे.

राजधानीची सिद्धता झाल्यावर ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६, आनंदनाम संवत्सर ६ जून १६७४ रोजी शिवाजी राजांचा राज्याभिषेक झाला. आजवर घेतलेल्या कष्टांचे लढ्याचे सार्थक झाले. मराठा राजा छत्रपती झाला. ही सामान्य गोष्ट नव्हे.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**वेंकटलक्ष्मी कासार्ले**
**यांसकडून**
**दिपावलीच्या शुभेच्छा!**





# छत्रपती संभाजी महाराजांचे इंग्रज, सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याशी संबंध

**डॉ. भास्कर धाटावकर**

छत्रपती संभाजी महाराजांनी अवघ्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये पोर्तुगीजांशी असा लढा दिला की पोर्तुगीजांची यापूर्वी कधीही फजिती झाली नव्हती अशी फजिती झाली. अवघ्या ३२ वर्षांच्या वादळी आयुष्यात त्यांनी अनेक विजय संपादन केले. एकूण १२० मोहिमांचे त्यांनी नेतृत्व केले. तरीही छत्रपती संभाजी महाराजांनी एकदाही हार पत्करली नाही.

छत्रपती संभाजी महाराजांची कारकिर्द हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवरायांच्या इतकीच चित्रथरारक व अभ्यासनीय आहे. त्यांच्या ठायी आपल्या पित्याप्रमाणेच शौर्य, पराक्रम, राष्ट्रप्रेम व धर्मप्रेम इत्यादी सर्वोत्कृष्ट गुण भरपूर होते. या गुणांची बाजू इतिहासकारांनी विशेषतः बखरकारांनी पुढे न आणता त्यांचे विकृत चारित्र्य, बखरी, दंतकथा, द्वेषमुलक लिखाणाचा आधार घेऊन त्यांची प्रतिमा रंगविली आणि पत्करलेल्या हौतात्म्यामुळे त्यांना धर्मवीर म्हणून गौरविले. हीच त्यांच्या बलीदानाविषयी जमेची बाजू होती.

संभाजी महाराजांनी अवघ्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी पोर्तुगीजांशी लढा देऊन त्यांची यापूर्वी कधीही फजिती झाली नव्हती अशी फजिती केली. अवघ्या ३२ वर्षांच्या वादळी आयुष्यात त्यांनी अनेक विजय संपादन केले. एकूण १२० मोहिमांचे त्यांनी नेतृत्व केले. एकदाही हार पत्करली नाही. सिद्दीच्या पाठीशी इंग्रज सतत उभे राहात. ते सिद्दीला रसद पुरवित. अशा इंग्रजांना धडा शिकवून दमात ठेवले होते. पोर्तुगीजांना गोव्यात जाऊन त्यांनी जाब विचारला होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांचा लढा चालूच होता. मुंबई बेट इंग्रजांच्या ताब्यात १६६४ डिसेंबर महिन्यात आलं. शिवाजी महाराजांनी सुरतेची लूट करून इंग्रजांना योग्य तो संदेश दिला होता. म्हणून त्यांनी मराठ्यांशी सख्य राखण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता. त्यात गुपचूपपणे ते सिद्दीशी लागूलचालनही ठेवीत होते. हे महाराजांना समजताच त्यांनी पावसाळ्यात मुंबई बंदराच्या आश्रयाला जात होते ते थांबविले. असेच धोरण संभाजी महाराजांनी आपल्या नऊ वर्षाच्या कारकिर्दीत स्वीकारून इंग्रजांवर चांगलेच नियंत्रण ठेवले होते. १६८० च्या सुरुवातीला इंग्रजांनी राजापूरला जाण्यास परवानगी मागितली ती नाकारली होती.

सिद्दी याचवेळी पेण-नागोठणे भागात लुटालूट करीत होता आणि याला इंग्रजांनी मदत केल्याचे लक्षात येता, संभाजी महाराजांनी राजापूरच्या वखारीवर सैन्य पाठविले. इंग्रज सपशेल घाबरला आणि त्यांनी संभाजी महाराजांशी तह करून त्यांनी घातलेल्या सर्व अटी मान्य केल्या. त्यात सिद्दीला मदत न करणे ही प्रमुख अट होती. सिद्दीने १६ मार्च १६८१ रोजी मराठ्यांची दोन गलबते व चार माणसे पकडली. मात्र याचवेळी संभाजी महाराजांचे तीन हजार सैन्य आणि मराठा अधिकारी तेथे तैनात असल्याने इंग्रजांनी सिद्दीलाच दम देऊन ती गलबते सोडावयास लावली. एकवेळ ईस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर रिचर्ड केजविनने संभाजी महाराजांशी मैत्री करून मुंबईच्या संरक्षणाची जबाबदारी संभाजी महाराजांवर सोपविली होती. मुंबईची बेटे ४० हजार पागोड्यांना संभाजी राजांना विकण्याच्या मनःस्थितीत असल्याचे सुरतेच्या गव्हर्नरने लिहून ठेवले आहे.

सिद्दीने संभाजी राजांच्या मुलुखातून मुले पळवून मुंबईत ती गुलाम म्हणून विकण्याचा संतापजनक प्रकार सुरू केल्यावर संभाजी महाराजांनी आपला संताप व्यक्त करून हे प्रकार त्वरित थांबवावे असा सज्जड दमच दिला. परिस्थिती आणखीन बिघडली जावू नये म्हणून इंग्रजांनीही माघार घेतली. याचवेळी कारंजा बेटावर महाराजांनी ताबा मिळविल्यावर तर इंग्रजांनी लागलीच त्यांच्याशी तह करण्याकरिता संभाजी राजेंकडे, केजवीनकडे मुंबई बेटाचा अधिकृत ताबा आल्यावर त्यांनी कॅप्टन गॅरीला संभाजी महाराजांकडे तह करण्यास पाठविले. जोडीला थॉमस बिल्कीस व दुभाषा म्हणून राम शेणवी याला पाठविले. हे सर्वजण महाडजवळील खाडीच्या छावणीत भेटले. या तहामध्ये इंग्रजांनी सिद्दीला थारा देऊ नये, युद्ध सामग्री पुरवून उपद्रव देण्यास मदत करू नये व दिवसेंदिवस मैत्रीचे संबंध अधिक घट्ट करावेत. 'तुमचा मित्र तो आमचा मित्र आणि तुमचा शत्रु तो आमचा शत्रु' हे जाणून आपल्या मैत्रिला तह करण्यास संमती दिली. त्याप्रमाणे तहाच्या अटी निश्चित करण्यात आल्या. या तहाच्या मसुद्यात कर्नाटकासाठी ११ कलमे व मुंबईसाठी ३० कलमे संभाजी महाराजांनी मान्य केली. अशाप्रकारे इंग्रजांवर त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. यामध्ये शिवाजी महाराजांच्या वेळी विकत घेतलेल्या माणसामागे कडक जकात द्यावी लागत असे. मात्र संभाजी महाराजांनी गुलामाच्या व्यापाराला संपूर्ण बंदीच घातली होती. ही एक क्रांतिकारी लक्षणीय बाबच लक्षात घ्यावी लागते. या महत्त्वपूर्ण तहामुळे संभाजी महाराजांच्या इच्छेप्रमाणे इंग्रजांनी सिद्दीला मुंबईत थारा व साहित्य दिले नाही. त्यामुळे मराठ्यांच्या मुलुखात सिद्दीचे उपद्रव देणे महाराजांच्या अंतापर्यंत बंद पडले.

संभाजी महाराजांनी सिद्दीला प्रचंड जेरीस आणलेच होते. जंजिरा किल्ल्यास शिड्या लावून समुद्रात कापसाच्या गाद्या टाकून सेतू बांधण्याचा अचाट प्रयोगही करून पाहिला. त्यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी पद्मदुर्ग किल्ल्याचा चतुराईने उपयोगही केला. सिद्दीसोबतचे फास आवळत असतानाच औरंगजेब आपल्या सामर्थ्यासह स्वराज्याचा घास घेण्यासाठी सर्व शक्तीनिशी आल्यावर संभाजी महाराजांना ही सिद्दीवरील आटोक्यात आलेली मोहीम नाईलाजाने

आवरती घ्यावी लागली आणि स्वराज्य संरक्षणार्थ त्यांना सिद्ध व्हावे लागले. काही वेळा नशिबाची साथही मिळाली आणि पुढील इतिहासच बदलून गेला. मात्र त्यांनी सिद्दीच्या अत्याचारांना आणि जुलुमाचा चांगलाच बंदोबस्त केला हे महत्त्वाचे आहे. या मोहिमेत त्यांनी युद्धनितीचे अनेक डावपेच वापरून पाहिले. त्यांच्या धाडसी, पराक्रमाची योग्या त्या प्रकारे नोंद घेतली गेली नाही. संभाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्या संबंधाविषयी लाखो कागदपत्रे गोव्याच्या पुरालेखागारामध्ये उपलब्ध आहे. पिसुर्लेकरांनी गोव्याचे पोर्तुगीज आणि मराठेयांच्या संबंधीचे अभ्यासपूर्ण असे ऐतिहासिक दस्तावेजावर पुस्तकच लिहिले आहे.

व्हिसेरेईने शिवाजी महाराजांच्या निधनाबाबत २९ मे १६८० या दिवशी संभाजीस दुखवट्याचा संदेश पाठवून दिला. त्यामध्ये त्यांनी लिहिले आहे की, ‘आपले दूत रामजी नाईक ठाकूर यांच्याबरोबर पाठविलेले आपले पत्र मिळाले. आपले पिता शिवाजी राजे यांच्या निधनाबद्दल आम्हाला फार दुःख झाले. मृत्यू कुणालाच चुकत नाही. दैवी इच्छेसमोर कुणाचीच मात्रा चालत नाही. आपणासारखा शांततेने राज्य करणारा राजा आपल्या प्रजेला लाभला याबद्दल आपली प्रजा अभिनंदानास पात्र आहे. प्रजेच्या दृष्टीने न्याय आणि शांतता यासारखे सुख दुसरे कोणतेच नसते.’ मात्र लवकरच २० जानेवारी १६८१ च्या पत्राद्वारे गोव्याच्या व्हिसेरेईने संभाजी महाराजांविरुद्ध कटकटी सुरू झाल्याचे पत्र कोकणचा सुभेदार तानाजी रामयांस लिहिल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी त्याचवेळी संभाजी महाराजांकडे आश्रयार्थ आलेल्या औरंगजेबाचा मुलगा अकबर याला डिचोलीत एक वाडा बांधून दिल्याची तक्रारही नोंदवली होती. पुढे पोर्तुगिजांशी अनेक कारणावरून बेनाव होत गेला. त्यातच आंजेदिव बेट घेण्यासाठी हालचाली सुरू केल्याचा सुगावा त्यांना लागला. दोन्हीकडून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र याचवेळी संभाजीराजांचा कोकणचा सुभेदार अण्णाजी पंडित यांनी वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारून या बेटावरून अप्रत्यक्षरित्या पोर्तुगिजांवरदबाव आणण्याचे काम चतुराईने केले.गोव्याचे पोर्तुगीज, संभाजी महाराज आणि औरंगजेब या दोघांना खूश करण्यासाठी संधीसाधूपणाचे राजकारण नेहमीच खेळत असत. याबाबत व्हिसेरेई काँट द आल्बेर याने १२ एप्रिल १६८३ रोजी औरंगजेबाला लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे. त्यामध्ये ‘तुम्ही संभाजीराजांवर आक्रमण करण्यास येत आहात ते कळले. मी तुम्हास सर्वतोपरी आवश्यक त्या मदतीचे आश्वासन देतो,’ असे स्पष्टपणे लिहिले आहे. इकडे संभाजी महाराजांविरुद्ध कारस्थाने सुरूच होती. तिकडे औरंगजेबाला खूश करणारे पत्रव्यवहार ते करीत होतेच. दुटप्पी निती होती. तत्पूर्वी संभाजी महाराजांशी जो तह, करार केलेला होता. त्याला सपशेल हरताल फासण्याची तयारी या पोर्तुगीज गोव्याच्या व्हिसेरेईने दाखविली होतीच. आणि प्रत्येक वेळी ते अशाच प्रकारची भूमिका घेत असत. ही असंख्य अशा कागदपत्रांवरून दिसून येते आणि या गोव्याच्या पोर्तुगिजांचा ढोंगीपणा संभीजा महाराजांच्या चांगल्या प्रकारे लक्षात आला होता.

याच दरम्यान १६८३ मध्ये संभाजी महाराजांनी चौलचा पाडाव करून पोर्तुगीजांना जबरदस्त दणका दिला होता. पुढे १६ डिसेंबरला फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला. हा नऊ दिवस सतत हल्ला चालला. संभाजी महाराज जातीने या युद्धात सहभागी झाले. या युद्धात संभाजी महाराजांनी न भूतो न भविष्यती असा पराक्रम गाजवून पोर्तुगीज व्हिसेरेई कसाबसा जीव घेऊन त्याचे नशीब बलवत्तर म्हणून दोन वेळा मृत्यूच्या दाढेतून निसटला. शेवटी अशा प्रकारचा लाजीरवाणे अपयश स्वीकारून ११ नोव्हेंबर १६८३ रोजी पोर्तुगीलला परतला तो थेट जेसुइटांच्या मठात जाऊन चार दिवस राहिला. त्याने स्वतःलाच कोंडून घेतले होते. संभाजी महाराजांनी नंतर अजिबात उसंत न घेता जुवे बेटावरील पोर्तुगीजांची वाताहात केली. येथील किल्ल्यांची शिबंदी फारच थोडी. ती पण गैरसावध असल्याने मराठ्यांना हा किल्ला सहज घेणे शक्य झाले. याचवेळी संभाजी महाराजांनी गोवा शहरावर चाल करण्याचे ठरविले. पण नदीला भरती आल्याने ते शक्य झाले नाही. इकडे भयभीत, पळपुट्या व्हिसेरेईने आपला राजदंड आणि इतर राजचिन्हे पोर्तुगाल राज्याच्या वतीने सेंट झेवियरला अर्पण केली आणि त्याच्या प्रेतासमोर करुणा भाकली ती मान्य झाल्याने संभाजी महाराजांनी आक्रमण केले नाही, अशी त्यांची धारणा आहे. अशाप्रकारे शूर संभाजी राजांनी पोर्तुगीजांचा चांगलाच दणका दिला होता.पुढे पोर्तुगीज आणि मराठ्यांमध्ये तहाच्या वाटाघाटी झाल्या. यामध्ये कविकलश याने वाटाघाटीत भाग घेतला होता. यामध्ये आजेदिव बेट खाली करणे. पोर्तुगिजांनी एक लक्ष होणांचा नजराणा देणे, पोर्तुगिजांनी या तहाच्या अटी मान्य करण्यासाठी अक्षम्य अशी चालढकल केली. अखेरपर्यंत पोर्तुगीज आणि मराठे यांच्यातील संघर्ष चालूच राहिला. संभाजी महाराजांनी गोव्याच्या पोर्तुगिजांवर आपले वर्चस्व त्यांच्या अखेरपर्यंत कायमचे राखले होते.



# कोकण : मराठा आरमाराची भूमी

**धीरत वाटेकर**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीचा वनराईने व्यापलेला इतरांना जिंकायला अवघड असलेला हा प्रदेश स्वराज्यासाठी निवडला. वणव्याप्रमाणे पसरत चाललेल्या मोगलांच्या सत्ताप्रसारापुढे संपूर्ण देश हतबल असताना, 'संकटं पराक्रम गाजविण्याची संधी देतात' या तत्त्वाने स्वराज्य निर्मितीसाठी, सह्याद्रीच्या शिखरावरील किल्ले आणि पाताळाला, समुद्राला जाऊन भिडणाऱ्या कोकणदऱ्या, खाड्यांचा आधार घेतला.

भौगोलिक महाराष्ट्रातला समुद्रकिनाऱ्यालगतचा प्रदेश म्हणजे कोकण. कोकण प्रदेश हा सह्याद्रीचा कडा, अरबीसमुद्र, दक्षिण-उत्तरेस असलेल्या डोंगरदऱ्यांच्या वाटा आणि नद्या-खाड्यांच्या दलदलीने व्यापलेला आहे. इथले दळणवळणाचे जवळपास मार्ग हे खाड्यांच्या भरती ओहोटीच्या गणितांवर अवलंबून असणारे. सह्याद्री सान्निध्यामुळे इथली भूमी बहुतांश डोंगराळ आणि घनदाट जंगलांनी युक्त असल्याने इथले लोक शरीराने काटक होते. शिवपूर्वकाळात मुस्लिम सत्ताधीश त्यांना आपल्या सैन्यात आवर्जून भरती करत. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी याच मावळ्यांना एकत्र करून मराठा साम्राज्य उभारले. सह्याद्रीसह कोकण किनारपट्टीच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक रचनेचा उपयोग त्यांनी यासाठी करून घेतला. राजांचं पश्चिम किनारपट्टीवरील आरमारी सामर्थ्य अभ्यासताना, कोकणच्या भौगोलिकतेचा केलेला नियोजनबद्ध उपयोग पानलोपावली जाणवतो. प्रस्तुत लेखात आरमारी 'शिव'सत्तेतील समुद्रीकोकणच्या भौगोलिक प्रभावाचा आढावा घेऊया !

सर्वात प्रभावी आणि जलद प्रवासाची सोय असलेल्या नौकानयनात आपले भारतीय प्राचीन काळापासून निष्णात असल्याचे उल्लेख इतिहासात भेटतात. अर्थात भारतीय राज्यकर्त्यांची नौकानयन परंपरा ही शांतता आणि व्यापाराची होती. प्राचीन लेण्यांमध्ये सागरीप्रवास आणि व्यापाराचे संदर्भ सापडतात. महाराष्ट्रातील सातवाहन राजे 'त्रिसमुद्रतोयपितवाहन' या गौरवास्पद उपाधीने स्वत:ला भूषवित. हजारभर वर्षापूर्वी दक्षिणेतील चोल राजांनी पूर्वआशिया (कंबोडिया-अंकोरवाट) भागात भारतीय संस्कृतीचा प्रभाव निर्माण केलेला. तद्नंतर समुद्रबंदीसारख्या घातक रूढींमुळे भारतीयांनी समुद्राशी नाते तोडले आणि आपले वर्चस्व गमावले. महाराष्ट्राचा सागराशी असलेला संबंध हा यात्रा आणि अभ्यंगस्नानापुरता राहिला. त्यात समुद्री पर्यटनाचे अनुभव नसायचे. तेव्हा कोकण किनारपट्टी आरमारीदृष्ट्या विकसित नव्हती. इथे गुजरातप्रमाणे खुल्या खोल समुद्रात थेट मार्गस्थ होता येत नसायचे. भौगोलिक मर्यादांमुळे येणाऱ्या अडचणी, साहित्याच्या अनुपलब्धतेमुळे इथले लोकजीवन किनाऱ्यालगत ५/७ किलोमीटरच्या परिघाच्या मर्यादेत वावरायचे. दक्षिण कोकणात तर खाड्या आणि खडकाळ भागांमुळे किनाऱ्यालगतचा प्रवास सावधपणे करावा लागे, आजही काही ठिकाणी अशी स्थिती आहे. उत्तरेकडील दमणगंगेपासून दक्षिणेकडे गोवा सीमेवरील तेरेखोल खाडीपर्यंतची कोकण किनारपट्टी भौगोलिक वैशिष्ट्यांनी युक्त होती. इथली लोकसंस्कृती, माणसांचे स्वभाव, त्यांची वृत्ती, संघर्ष करण्याची मानसिकता हे सारे इथल्या इतिहास आणि भूगोलाचा परिणाम होते. पोर्तुगीज आक्रमक वास्को-द-गामा ख्रिस्ताब्द १४९८ मध्ये कालिकत बंदरात पोहोचल्यावर इथले किनारवर्ती वातावरण बदलले. वास्को-द-गामा आल्याची नोंद जगाने घेतली, परंतु आपण नाही. पोर्तुगीजांनी भूमध्य समुद्रात प्रचलित असलेले दादागिरीचे तत्त्व भारतात अंमलात आणत सागरी सत्तेची फेरमांडणी केली. पुढे डच, फ्रेंच, ब्रिटिशकाळात हा संघर्ष वाढत गेला. या सागरी सत्तांनी बळकट जलदुर्ग आणि शक्तिशाली आरमार उभारले. तेव्हा एकाही स्थानिक भारतीय सत्ताधीशाकडे आरमार नव्हते. भारताचे बादशहा म्हणवून घेणाऱ्या मोगल सत्ताधीशांनाही समुद्रावर संचार करण्याकरता, पोर्तुगीजांना फी (कार्ताझ) देऊन विशिष्ट मार्गावर फिरायचा परवाना घ्यावा लागे. हा कार्ताझ नसल्यास पोर्तुगीज गलबतांचे कप्तान जहाजांना अडवत. मालमत्ता जप्त करत. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीचा वनराईने व्यापलेला इतरांना जिंकायला अवघड असलेला हा प्रदेश स्वराज्यासाठी निवडला. वणव्याप्रमाणे पसरत चाललेल्या मोगलांच्या सत्ताप्रसारापुढे संपूर्ण देश हतबल असताना, 'संकटं पराक्रम गाजविण्याची संधी देतात' या तत्त्वाने स्वराज्य निर्मितीसाठी, सह्याद्रीच्या शिखरावरील किल्ले आणि पाताळाला, समुद्राला जाऊन भिडणाऱ्या कोकणदऱ्या, खाड्यांचा आधार घेतला. पराक्रमासाठी आसुसलेल्या इथल्या मावळ्यांची मोट बांधली. विशेष पूर्वपरंपरा नसताना, कष्टातून, तरबेज आणि अनुभवी विरोधांना धूळ चारून, सागराचे व्यापारी महत्त्व ओळखून पहिलं स्वदेशी सागरी आरमार उभारलं. मध्ययुगात आरमार आणि सागरी व्यापाराची खंडीत झालेली परंपरा सुरू केली. याची मांडणी सचिन पेंडसे यांच्या 'मेरिटाइम हेरिटेज ऑफ कोकण' या पुस्तकात आढळते.

१६४८ मध्ये कोकणातील तळे, घोसाळे किल्ले ताब्यात घेतले तेव्हा राजांचा सिद्दीशी संबंध आलेला. राजे स्वतः खलाशी किंवा दर्यावर्दी नव्हते. त्यांना आरमारी युद्धतंत्राची माहिती नव्हती. जवळ लढाऊ जहाजेही नव्हती. पाण्यातील किल्ले लढवण्याचा, जिंकण्याचा अनुभव नव्हता. मोगल आणि आदिलशाहीला भूमीवर शह देत कोकणात आरमार उभारणे सोपे नव्हते. पोर्तुगीज, सिद्दी, इंग्रज आणि

डचांकडून आरमार उभारण्याचे कौशल्य शिकावयास मिळणे अशक्य होते. कोकणातला उंचच उंच सह्याद्री दख्खनच्या पठारापासून वेगळा होता. इथे घनदाट जंगल, अरबी समुद्र, खाड्या, समुद्रातील बेटे आदि भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे किल्ल्यांमधील अंतर कमी राहाणार होते. याचे लष्करी डावपेचांमधील महत्त्व राजांनी अचूक हेरले होते. कोकणला पश्चिमेकडे समुद्राचे संरक्षण होते. पूर्वेकडूनही आक्रमणाचा धोका कमी होता. स्थानिक सरदारांच्या माध्यमातून वर्चस्व राखणाऱ्या आदिलशाह आणि मोगल बादशाह यांचे कोकणकडे विशेष लक्ष नव्हते. त्यांनी आरमारी सामर्थ्य उभे करण्याचा विचार केलेला नव्हता. पोर्तुगीज, इंग्रज आणि डच आक्रमकांपासून देशाला वाचविण्यासाठी, स्वराज्याला पूर्णत्त्व आणण्यासाठी स्वतःच्या सामर्थ्यशाली आरमाराची आवश्यकता महाराजांना जाणवलेली होती. भौगोलिकतेचा अचूक फायदा घेत राजांनी जमिनीवर गनिमी कावा तंत्र अवलंबिलेलं. तसं इथे, सागरी सत्तांवर अंकुश मिळवण्यासाठी आरमार आवश्यक होतं. किनारपट्टीवरील अवघड जागी किल्ले बांधणं गरजेचं होतं. या भागात फिरंग्यांचा संपर्क असल्याने शहरांचा विकास झालेला. वादळात सापडलेली जहाजे समुद्रकिनाऱ्यावर फुटत असत. त्यात असलेला माल स्थानिक सार्वभौम सत्तेच्या ताब्यात येत असे. आरमाराच्या दृष्टीने कोकणातील खाड्या जहाजांसाठी उत्कृष्ट आसरा होत्या. समुद्रकिनारी असणाऱ्या कठीण दगडाच्या जमिनी आरमाराच्या तळासाठी उत्तम होत्या. आरमारी संरक्षणाच्या दृष्टीने गिरिदुर्ग आणि जलदुर्गांची बांधणी आणि नवी संरक्षक स्थळे निर्माण करण्यासाठी किनारपट्टीवरील बेटे आणि समुद्रापर्यंत घुसलेले डोंगरसुळके मोक्याच्या जागा पुरवायला सज्ज होते. हे आरमारी महत्त्व लक्षात आल्याने राजे कोकणात शिरायची संधी शोधत होते.

जानेवारी १६५६ नंतर औरंगजेब, बादशहा व्हायला दिल्लीला रवाना होत होता. विजापूरला अली आदिलशाह मरण पावला होता. या काळात राजांनी जावळी जिंकली. दाभोळवर भगवा फडकवला. तेव्हा कोकण किनारपट्टी निरनिराळ्या राज्यात विभागलेली होती. प्रजा अत्याचारांनी त्रस्त होती. सह्याद्रीतील डोंगररांगांच्या माथ्यावर उभे राहिलेल्या राजांना सागराच्या भव्यतेचे दर्शन झालेले. त्यांनी वेश पालटून कोकणपट्टीची पाहाणी करून घेतली. १६५७ ला ते उत्तर कोकणात उतरले. त्यांनी कल्याण, भिवंडी परिसर जिंकला. आता जिंकलेला समुद्रकिनारा आणि मुलुखाच्या संरक्षणासाठी आरमाराची आवश्यकता होती. आरमारी उभारणीस आवश्यक नौका भर समुद्रात बांधता येत नाहीत. त्यासाठी लष्करीदृष्ट्या उपयुक्त अशी समुद्रातून आत घुसलेली खाडी आणि तळ कोकणच्या या भौगोलिक किनारपट्टीत मुबलक होतेच. १६५७ ला कल्याणजवळील दुर्गाडी येथे उत्तम प्रतीचे सागवान वापरून पहिली २० जहाजे आणि लढाऊ गलबते बनविण्यास राजांनी सुरुवात केली. पुढच्या काळात राजांच्या आरमारात गाब्र (गुराब-तोफा ठेवण्याचं दोन शिडांचं जहाज), तरांडी (माणसांची आणि सैनिकांची वाहतूक करणारी नाव), तारव आणि गलबत (जलद चालणारे जहाज), शिबाड (मालवाहतूक करणारी व्यापारी जहाज), तिर्कटीतारू, मचवा, पडाव, होडी, डोण, पगार आदि प्रकार राहिले.

राजांनी कल्याणची ही जबाबदारी सेनापती आबाजी सोनदेव यांच्यावर सोपविली. कामात आपल्या स्थानिक लोकांचा समावेश असणं लाभदायक ठरलं. जहाजांसाठी लागणारं लाकूड, कारागीर उपलब्ध होते, पण तंत्रज्ञान नव्हतं. हे काम दर्जेदार होण्यासाठी त्यांनी वसईत तारवे बांधणारे कुशल पोर्तुगीज खलाशी लैतांव व्हियेगस आणि त्याचा मुलगा फेर्नांव व्हियेगस यांची मदत घेतली. त्यांच्यासोबत ३४० माणसं कार्यरत होती. आपल्या स्थानिक कारागिरांना नौकाबांधणीचं प्रशिक्षण मिळावं हा यातला मुख्य हेतू होता. तसं राजांनी आबाजींना, 'जी माणसे या कामावर नियुक्त कराल ती अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेची हवीत, जी ते ज्ञान आत्मसात करू शकतील' असं सांगितलं होतं.

पोर्तुगालचे मुख्यालय असलेल्या गोव्यात मराठा आरमार उभारणीची ही वार्ता पोहोचल्यावर गडबड होण्याचा धोका होता. अल्पावधीत तसं घडलं. २ महिन्यांनी व्हेगास नोकरी सोडून गेला. अर्थात तोवर मावळे बरेचसे शिकले होते. राजांनी आपल्या जहाजांचे डिझाईन युरोपियन प्रमाणे न करता कोकणच्या भौगोलिकतेला अनुसरून केले. तेव्हा युरोपियन जहाजे खोल पाण्यात लांब पल्ल्याचा प्रवास करण्यासाठी बांधण्यात येत. त्यामुळे त्यांच्या पाण्याखालच्या तळाची खोली अधिक असायची. राजांची जहाजं ही किनारपट्टीच्या आसपास अधिक वावरणार होती. त्यांनी आपली सुरुवातीची जहाजं छोटी आणि सरळ तळ असलेली, वेगाने किनारपट्टी जवळ पोहोचतील अशी बनविलेली. यामुळे राजांचे आरमार शत्रूंना आव्हान देऊ लागले.

नौकाबांधणी, समुद्र, वारा, खगोलशास्त्र, नाविक रणनीती आदि ज्ञान शिकायला एकेक जन्म पुरायचा नाही हे वास्तव असताना राजांनी हे सारे जुळविले. रामचंद्रपंत

अमात्य यांनी लिहिलेल्या 'आज्ञापत्र' ग्रंथातील, 'ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र' या वाक्यात मराठी आरमाराच्या प्रेरणेचे गुपित सामावले आहे. राजांना आरमारी, जहाज बांधणीज्ञान संपादन करण्यासोबत नौकाबांधणी, आरमाराचे सुरक्षित तळ म्हणून उपयोगी पडणारे जलदुर्ग बांधणे, माणसे प्रशिक्षित करणे आदि गोष्टी कराव्या लागणार होत्या. त्यांनी पुढे आरमाराच्या वेगवेगळ्या तुकड्या बनविल्या. प्रत्येक तुकडीत वेगवेगळ्या प्रकारची २०० जहाजं असायची. इथल्या भौगोलिकतेचा वापर करीत थेट खोल समुद्रात संचार न करता जलदुर्गांच्या संरक्षणाखाली राहून, किनाऱ्या-किनाऱ्याने शत्रूला हुलकावणी द्यायचे तंत्र वापरले. मोठी जहाजे खाडीमधून खुल्या समुद्रात संचार करत असता शत्रू समोर आल्यास एकत्र येऊन झुंजायचे आणि वाऱ्याची दिशा विरुद्ध असल्यास व गलबत योग्यरित्या चालवता येत नसल्यास शत्रूशी झुंज न देता जवळच्या जलदुर्गाच्या आश्रयाला यावे, असे युद्धतंत्र होते.

राजे स्वतः शिस्तप्रिय असल्याने, आधुनिक प्रशासनाची वैशिष्ट्ये त्यांच्या व्यवस्थेत दिसतात. नीती-नियमांचे काटेकोर पालन केले जाई. वर्षाचे ८ महिने राजांचे आरमार खुल्या समुद्रात असायचे. पावसाळ्याचे ४ महिने ते योग्य ठिकाणी छावणी करून सुरक्षित ठेवले जायचे. हे काम समुद्राला उधाण येण्याच्या १०-१५ दिवस आधी व्हायचे. जहाजे खुल्या उथळ समुद्रात किंवा जलदुर्गाच्या खाली उघड्यावर नांगरून ठेवता येत नसत. छावणी दरवर्षी वेगवेगळ्या किल्ल्यांच्या सानिध्यात होई. एकाच बंदराच्या आसपासच्या गावांना अधिक कष्ट पडू नयेत, हे त्यामागचे कारण होते. नाविकांना पावसाळ्याचे ४ महिने शेतीत काम करावे लागे. आरमारात पठाणासोबत कोकणातील कोळी, सोनकोळी, आगरी, भंडारी, दादली, कोकणी मुस्लिम आणि कर्नाटकातील अंबी समाजाचे नाविक असत. या लोकांना समुद्र संचाराचे ज्ञान होते. गावाने प्रत्येकी १०० माणसांमागे २ माणसे आरमाराला द्यावीत अशी मागणी असे. राजांच्या आरमारात ५ हजार लोक होते. सागरी युद्धाच्यावेळी जलदुर्गांमधून आरमाराला युद्ध साहित्य पुरवण्यात येई. युद्धकैदी ठेवण्यासाठी जलदुर्गांचा उपयोग होई. जलदुर्गांच्या किनाऱ्यावर नांगरून ठेवलेली जहाजे शत्रूंच्या हल्ल्यापासून सुरक्षित राहात. नजीकचा परिसर, किनारपट्टी, सागरी वाहतुकीवर लक्ष ठेवणे सोपे होई. किल्ल्यांवरील सैन्य आणि तोफांमुळे समुद्रात आणि नदीत येऊ पाहणाऱ्या जहाजांना परवून लावता येत असे. राजांचे किल्ले उघड्या मैदानात किंवा सपाटीवर अभावाने आढळतात. भौगोलिकतेचा अचूक उपयोग करून नैसर्गिक बळकटी, अभेद्यता, जलसंचय आणि संरक्षण यांचा विचार येथे दिसतो. सिद्धीचे सामर्थ्य त्याच्या जहाजात होते. त्याचे आरमार दीडशे वर्ष जुने होते. तरीही राजांनी शून्यातून आपले आरमार उभारून त्याला सर्व शक्तीनिशी झुंज दिली. महाराज समुद्राकडे वळले नसते तर कदाचित सिद्दीशी संघर्ष करण्याचा प्रश्न आला नसता. परंतु स्वराज्याचे ध्येय त्यांनी तडीस नेले. आरमाराच्या जहाजांसाठी लागणारं लाकूड रयतेला त्रास न देता उपलब्ध झालं पाहिजे याबाबत राजे दक्ष होते. जहाज बांधणीस कमी पडलेली आंबा, फणसाची लाकडं त्यांनी कर्नाटकातूनही मिळवलेली. महत्त्वाच्या जहाजांसाठी बंदुकीच्या आणि तोफेच्या गोळ्यांपासून बचाव करणारे महत्त्वाचे लाकूड म्हणून ते सागवानाचा उपयोग करीत. त्यांनी भौगोलिकदृष्ट्या वनसंवर्धनालाही खूप महत्त्व दिले. गडावर आंबा, वड, नारळ, साग, शिसव अशी झाडे लावली. चिपळूण जवळच्या दळवटणे येथे राजांची १० हजारावर फौज होती. १६७४ च्या मे महिन्यात, लष्कराच्या छावणीला त्यांनी दिलेले पत्र, 'आदर्श राज्य कसं असावं?' याचं उत्तम उदाहरण आहे. 'राई म्हणजे वनराई' तिला सोन्यासारखं मोल म्हणून कदाचित राजांनी चलनी नाण्यांना 'शिवराई' संबोधलं असावं. पुण्याजवळच्या 'शिवापूर' गावात राजांनी दाट वनराई सजवली होती. राजांच्या पश्चात सरखेल कान्होजी आंग्रे यांनीही बाणकोटला सागवानाची लागवड केली. पुढे इंग्रजांनी ते तोडले. आजही बाणकोटला काही साग दिसतात.

राजांनी सिद्दीची इतर ठाणी जिंकली तरी, चौल (उत्तर) आणि दाभोळ (दक्षिण) या दोन प्राचीन बंदरांच्या मधोमध वसलेला जंजिरा जिंकणे आरमारासाठी आवश्यक होते. त्यासाठी प्रबळ आरमार आणि आर्थिक सामर्थ्य आवश्यक होते. म्हणून १६६४ मध्ये सुरत लुटण्यात आली. १६१३ साली सुरत येथे ईस्ट इंडिया कंपनीने स्थापन केलेल्या 'हिंदुस्थानी मरीन'शी राजांच्या आरमाराशी ईस्ट इंडिया कंपनीच्या मरीनला लढावे लागले. सुरतेतून मिळालेल्या धनाचा उपयोग करून राजांनी २५ नोव्हेंबर १६६४ ला सिंधुदुर्ग उभारण्याचे काम सुरु केले. राजांच्या हस्ते पायाभरणी झालेला तिथला दगडही आज भौगोलिकदृष्ट्या 'मोरयाचा दगड' नावाने प्रसिद्ध आहे. ८ फेब्रुवारी १६६५ ला आपल्या आरमाराचा उपयोग करत राजांनी आदिलशाही राज्यातील धनाढ्य बंदर बसरूरवर स्वारी केली. हे जोखमीचे काम अभ्यासल्यावर

राजांची विज्ञाननिष्ठा, आधुनिकता आणि भविष्याचा वेध घेण्याची दृष्टी आपल्यासमोर उभी राहाते. २९ मार्च १९६७ ला सिंधुदुर्गाचे काम पूर्ण झाले. शत्रूकडून व्यत्यय येऊ नये म्हणून राजांनी येथे २ सहस्र मावळ्यांचा खडा पहारा नेमला होता. जंजिरेकर सिद्दीचा अभेद्य असणारा जंजिरे मेहरुबा हा राजांच्या महत्त्वाकांक्षेला आव्हान देत होता. त्याच्यावर मात करायची असेल, तर दुसरी राजपुरी वसवावी लागेल हा विचार करून त्यांनी मालवण नजीकच्या कुरटे बेटावर सागरीदुर्ग बांधायचा निर्णय घेतला. या कुरटे बेटाजवळील पाण्यात आडवे तिडवे छुपे खडक होते. बेटाभोवती तीन कोसपर्यंत मोठ्या नौका येणे मुश्कील होते. राजांनी तेथे गड बांधायचे निश्चित केले. गडावर चोहोबाजूंनी खारेपाणी असताना दहीबाव, साखरबाव आणि दूधबावची उपलब्धी, सुमारे ४० शौचकूपांचे बांधकाम तिथल्या भौगोलिकतेचा उपयोग स्पष्ट करते. यानंतर राजांनी पद्मगड, राजकोट, सर्जेकोट, सुवर्णदुर्ग बांधला. विजयदुर्गाची नव्याने बांधणी करून संपूर्ण कोकण किनारपट्टी नियंत्रणाखाली आणली. हर्णे बंदरातील बेटावर १६६३ मध्ये बांधलेला सुवर्णदुर्ग हा राजकीय आणि प्रशासकीय केंद्र होता. याचा उपयोग कैदी ठेवण्यासाठी केला जाई. विजयदुर्ग (घेरिया) हा शिलाहार राजा भोज याने ११९५ ते १२०५ मध्ये बांधलेला किल्ला. आरमारी महत्त्व ओळखून राजांनी तो जिंकून घेतला. या भागातले भौगोलिक वैशिष्ट्य म्हणजे विजयदुर्गजवळची खडकात खोदलेली ३५५ फुट द २२७ फुट आकाराची गिर्ये गोदी होय. तज्ज्ञांच्या अनुमानानुसार ५०० टनी जहाज येथे सहज बांधता येत असावे. अर्थात राजांकडील सर्वाधिक जहाज २५० टनी होते आणि १५० टनी जहाजे अधिक बांधली जात. विजयदुर्गपासून १५० मैल अंतरावर पश्चिमोत्तर समुद्रतळातील ४०० मीटर लांबीची तटबंदीही भौगोलिकतेचे दर्शन घडवते. ज्या भागात ही तटबंदी आहे त्या बाजूने येणारी अनेक जहाजे शिवकाळात, धडकून फुटून गेल्याची नोंद आहे. हे कशाने घडते ? याचे कोडे पोर्तुगीज आणि इंग्रजांना पडायचे. विजयदुर्ग जिंकून घेतल्यावर तेथे राजांनी पश्चिमोत्तर समुद्राच्या तळात ही संरक्षक तटबंदी उभारल्याचे किंवा ती शिलाहारांच्या काळात बांधली गेली असावी असे म्हटले जात असले तरी संशोधकांच्या म्हणण्यानुसार ती भिंत नैसर्गिक आहे. पुण्याच्या डेक्कन पुरातत्त्व संस्थेचे निवृत्त संशोधक डॉ. अशोक मराठे हे कोकण किनारपट्टीवर पाचशे वर्षांपूर्वी आलेल्या त्सुनामीचा अभ्यास करत असताना त्यांना केळशी-हरिहरेश्वर ते विजयदुर्ग दरम्यान किनारपट्टीलगत एक रेष आढळून आली होती. ही दगडी भिंत असल्याच्या प्राथमिक अंदाजानंतर डिसेंबर २००९ मध्ये त्यांनी समुद्राच्या पाण्यात पाणबुडे उतरवले. तेव्हा ही भिंत ८ हजार वर्षे पुरातन असल्याच्या निष्कर्षापर्यंत ते आले होते. इंडियन हिस्ट्री काँग्रेसमध्ये डेक्कन कॉलेजचे संशोधक सहायक सचिन जोशी यांनीही 'मिथ्स अँड रिॲलिटी-दि सबमर्ज्ड स्टोन स्ट्रक्चर ऑफ्ट फोर्ट विजयदुर्ग' या विषयावर शोधनिबंध सादर करताना, 'विजयदुर्ग किल्ल्याजवळची समुद्राखालील भिंत ही मानवनिर्मित नसून नैसर्गिक रचना आहे' असे म्हटले होते. नंतरच्या काळात आंग्रेंनीही याच भागात समुद्रातील टेकडी 'आंग्रे बँक' शोधली. अर्थात या साऱ्या भौगोलिकतेचा उपयोग सुरुवातीच्या काळात राजांनाही झाला.

इंग्रजांनी २६ नोव्हेंबर १६६४ ला ईस्ट इंडिया कंपनीला पाठविलेल्या एका पत्रात, 'शिवाजी विजयी व अनिर्बंध असून त्यांचे सामर्थ्य रोज वाढत आहे. सभोवतीच्या राजांना त्याची मोठी दहशत वाटते. त्यांनी आता ऐंशी जहाजे सुसज्ज करून भटकळकडे पाठविली आहेत.' असे लिहिले होते. इंग्रज अधिकाऱ्यांच्या नोंदीनुसार, १६६५ मध्ये मराठा आरमारात ८५ लढाऊ आणि ३ उच्च दर्जाची जहाज होती. पोर्तुगीज विजरई कोंदि द सांव्हिसेति याने राजांच्या आरमाराविषयी १६६७च्या अखेरीस पोर्तुगालच्या राजास, 'शिवाजीचे नौदलही मला भीतीदायक वाटते. त्याच्याविरुद्ध आम्ही सुरवातीस कारवाई न केल्यामुळे त्याने किनाऱ्यावर किल्ले बांधले. आज त्याजवळ पुष्कळ तारवे आहेत. पण ही तारवे मोठी नाहीत' असे कळविले होते. संपूर्ण राजवटीत तारवांमधून (संगमिरी) स्वारी करणारे राजे कदाचित एकमेव असावेत. राजांनी १६७० मध्ये नव्याने १६० जहाजांची बांधणी नांदगाव (कुलाबा) येथे केली. शास्त्री आणि सोनवी नद्यांच्या संगमावरील संगमेश्वरजवळच्या ओझरखोल (निढळेवाडी) येथेही राजांनी नौकाबांधणी सुरू केली होती. छत्रपतींच्या आरमारातील प्रसिद्ध 'संगमेश्वरी' नौका इथली. शिवकालीन नौकाबांधणीची ही तंत्रपरंपरा आजही सुरू आहे. चिपळूणजवळ वाशिष्ठी नदीवरील गोविंदगड हा दाभोळ खाडीतील आरमाराला निरोप पोचविणे, तेथून येणारे निरोप स्वराज्याची राजधानी रायगडावर पोचविणे या कामातील दुवा म्हणून काम करायचा. रायगडावर विशिष्ट ठिकाणी आग पेटविल्यावर गोविंदगडाच्या समोरील सह्याद्रीतून ती दिसायची. रायगडावर पेटविलेली आग पाहून गोविंदगडावर खुणेची आग पेटविली जाई. याद्वारे फार थोड्या वेळात राजधानी रायगड ते मराठा आरमार यांच्यात संदेशाची

देवाणघेवाण होई, इथे आपल्याला भौगोलिक महत्त्व दिसून येते. राजांनी या जलदुर्गांच्या ताकदीवर समुद्रावर जरब बसवित सागरी व्यापार सुरू केला. समुद्राला पश्चिमेकडील नद्या जिथे मिळत तिथे बंदरे होती. त्यातूनही वाहतूक चाले. खास मिठाच्या (सॉल्टफ्लीट) वाहतुकीसाठी राजांनी गलबतांचा तांडा तयार करून घेतला होता. १६६५ च्या सुरतकर इंग्रजांच्या पत्रानुसार, दरवर्षी दक्षिण कोकणातील ७/८ बंदरातून राजांची २/३ गलबते पर्शिया, बसरा, आणि मोक्का (अबेसॅनिया) बंदरात व्यापारासाठी जात. परकीय सत्तांशी व्यापार करताना राजांनी आयात कमी आणि निर्यात जास्त हे वाणिज्य अनुकूल धोरण अवलंबिले होते. कोकण आणि घाट जोडणारे घाटमार्ग हे व्यापाराचे राजमार्ग होते. त्या मार्गांवर उभारलेले किल्ले चेकपोस्टचे काम करायचे. १६६९ पर्यंत गोवा, वसई, मुंबई ही मोठी समुद्री शहरं वगळता सगळं ताब्यात घेतलं. आरमाराला एक सुसंघटित आणि फायदेशीर संस्थान बनवलं. या आरमाराने पुढे जवळपास १५० वर्ष राज्य केलं.

राजांनी मुरुड-जंजिऱ्याजवळ पद्मदुर्ग (कांसा) बांधला. या पद्मदुर्गच्या भिंतींचे दगड झिजलेत पण दरजा भरलेला चुन्याचा मसाला झिजला नाही. मुंबईजवळ खांदेरी बंदरावरच्या बेटावर १६७२ मध्ये किल्ल्याचं बांधकाम सुरू केलं. तत्पूर्वी या बेटांवर युरोपियन लोकांना गोड्या पाण्याची सोय करणे जमले नव्हते. राजांनी आपल्या संस्कृतीतील ज्ञानाच्या आधारे येथे गोड्या पाण्याचे झरे शोधले. कामास विरोध करण्यासाठी इंग्रजांनी किनारा आणि बेट यांमध्ये नाविक मोर्चेबंदी उभारण्याचे ठरवले. त्यांना आपल्या मोठ्या जहाजांचे विशेष महत्त्व वाटत होते. त्यामुळे कोकणातला उथळ समुद्र आणि खाड्यांचा विचार करायला त्यांना वेळ मिळाला नसावा. त्यांच्या मोठ्या जहाजांना खाडीमध्ये ठिय्या देणे जमले नाही. वाऱ्यामुळे त्यांच्या होड्या किनाऱ्याकडे फेकल्या जात. त्या दगडांवर आपटून फुटण्याची भीती असल्याने इंग्रजांना जहाजे खोल पाण्यात न्याव्या लागत. उथळ पाण्यात मराठ्यांच्या छोट्या बोटींविरोधात इंग्रजांच्या बोटी जिंकू शकल्या नाहीत. राजांनी आपले आरमार आपल्या हद्दीत वावरणारे केलेले. मराठे लोकं रातोरात या चिंचोळ्या होड्या वल्हवत विविध बेटांवर सामान पोहवत. इंग्रज जहाजे पूर्णपणे वाऱ्यावर अवलंबून असत. खांदेरीच्या घटनेद्वारे सागराची भरती-ओहोटी, खोल-उथळ पाणी, मतलई वारे आदींचे स्थानिक ज्ञान मराठ्यांना इंग्रजांपेक्षा अधिक असल्याचे स्पष्ट झाले. खांदेरी उभारताना आजूबाजूला मोठाले दगड टाकण्यात आले. त्याच्यावर कालवे वाढून दगडाच्या कडा धारधार होतील. पायाला इजा होऊन त्यास सागराचे खारेपाणी लागताच आग होईल आणि पोहोचणं अवघड बनेल अशी योजना होती. जवळचा काशाखडक ते खांदेरी हा सागरी प्रवास खडकाळ आहे. तिथे पाण्याला उलट-सुलट प्रवाह असून अचानक बदलणारे वातावरण अशी त्या सागरीपट्ट्याची आजही भौगोलिक ओळख आहे. १६७८ ला कुलाबा किल्ल्याचं काम सुरू झालं. मोठाले दगडी चिरे एकमेकांवर रचून भिंती बांधण्यात आल्या. चुन्याने दरजा भरल्या नाहीत. समुद्राच्या लाटा भिंतीवर आदळल्या की त्यांचं पाणी दोन दगडांच्या फटीतून आत जावं आणि पाण्याच्या प्रवाहाचा रोध कमी व्हावा, हा विचार भौगोलिकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. निसर्ग सौंदर्याचे वरदान लाभलेल्या सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या कुशीतल्या समुद्री कोकणाला राजांनी आरमारी उभारणीने बळकट बनवले. त्यांनी जमिनीवरील युद्धात जसा सह्याद्रीतले उत्तुंग डोंगर, अवघड घाटवाटा, घनदाट जंगले आदि भौगोलिकतेचा पुरेपूर वापर करून घेतला तसाच आरमारी युद्धात किनारपट्टीच्या भौगोलिक रचनेचा उपयोग केला. स्वराज्य निर्मितीसाठी निष्ठावान मावळ्यांप्रमाणे सह्याद्री, सागराच्या भौगोलिक आणि पर्यावरणीय घटकांचेही सहकार्य त्यांना मिळाले. राजांच्या आरमाराविषयी जेम्स डग्लस म्हणतो, 'शिवाजी जन्माने खलाशी नव्हता, ही त्या ईश्वराची कृपा होय. जर असता तर जशी त्याने भूमी पादाक्रांत केली त्याप्रमाणे सागरावर आपला अंमल गाजवला असता. खलाशी नसताना त्याने सागरावर आपले वर्चस्व स्थापन केलेच.' सह्याद्री आणि सागराच्या या इतिहासात मानवी सामर्थ्याला अपयशी करण्यास निसर्ग आणि भौगोलिकता कारणीभूत ठरल्याचे दिसते. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्य आणि आरमार उभारण्यापासून कोणालाही रोखता आलं नाही.

व्यास दीपोत्सव २०२२
गजानन बावडेकर
यांसकडून
दिपावलीच्या शुभेच्छा!

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
50 Years of Banking Excellence




कार लोन | ॲसेट बॅक्ड क्रेडीट | टेकओव्हर लोन
एसएमई लोन | गोल्ड लोन | ईझी क्रेडीट
होम लोन | प्रोफेशनल लोन

डिजिटल (क्यु.आर. कोड, यु.पी.आय., नेट बँकिंग, डेबिट कार्ड)

आकर्षक फेस्टीव्ह ऑफर्स* साठी
तुमच्या जवळच्या टीजेएसबी शाखेशी संपर्क साधा

*अटी लागू

www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 223 466 I 1800 266 3466







# स्वातंत्र्यसंग्राम : कोकणातील क्रांतिकारक

**अरविंद दोडे**

मराठवाडा ही साधुसंतांची भूमी आहे. क्रांतिकारकांच्या योगदानाविषयी लिहिताना जागतिक कीर्तीचे अनेक विचारवंत आठवतात. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, लोकमान्य टिळक, बाजीराव पेशवे, नाना फडणीस, कान्होजी आंग्रे, धोंडो केशव कर्वे, पां. बा. काणे, गो. कृ. गोखले किती थोरामोठ्यांनी कोकणात जन्म घेतलाय म्हणून सांगावे?

स्वातंत्र्यसंग्राम जगाच्या पाठीवर अनेक देशात झाल्याचा इतिहास आहे. इस्राएलचा संघर्ष आठशे वर्ष चालला. फ्रेंच क्रांती आणि रशियन क्रांती जाणकारांना ठाऊक आहेच. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी १८५७ सालापासून १९४७ सालापर्यंतचा इतिहास पाहिला तर सुमारे ९० वर्षे हे समर सुरू होते. देशाच्या प्रत्येक राज्यात, प्रत्येक गावात क्रांतिकारक होते. प्रस्तुत लेखात महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचा आढावा घेताना केवळ कोकण प्रांताचा विचार केला तरी एक भलामोठा ग्रंथ होईल. इतके स्त्री-पुरुष इथं क्रांतिकारक झाल्याचा इतिहास आहे.

मराठवाडा ही साधुसंतांची भूमी आहे. कोकण ही प्रतिभावंतांची सोनेरी खाण आहे. तेथील प्रज्ञावंत, समाजसेवक आणि कलावंतांची यादी फार मोठी आहे. क्रांतिकारकांच्या योगदानाविषयी लिहिताना जागतिक कीर्तीचे अनेक विचारवंत आठवतात.

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, लोकमान्य टिळक, बाजीराव पेशवे, नाना फडणीस, कान्होजी आंग्रे, धोंडो केशव कर्वे, पां. बा. काणे, गो. कृ. गोखले किती थोरामोठ्यांनी कोकणात जन्म घेतलाय म्हणून सांगावे?

आद्य क्रांतिकारक फडके हे मूळचे केळशी, रत्नागिरीचे. मात्र शिरढोण, रायगड गावी त्यांचे कुटुंब रहायला आले. त्यांचा जन्म झाला ४ नोव्हेंबर १८४५ रोजी. पुढे त्यांचे शिक्षण कल्याण, मुंबई, पुणे या ठिकाणी झाले. पाचवीनंतर त्यांनी शिक्षण सोडले. ते नोकरीस लागले. नंतर रेल्वे खात्यात आणि ग्रँट मेडिकल कॉलेजात काही काळ नोकरी केली. १८६३ मध्ये लष्कराच्या अर्थ खात्यात नोकरीस लागले. १८६५ मध्ये त्यांची पुण्यात बदली झाली.

१७ एप्रिल १८७९ रोजी त्यांनी श्री शैलमच्या मल्लिकार्जुनास आत्मसमर्पण करून आत्मचरित्र लिहायला सुरुवात केली. त्यांनी प्रथमच सशस्त्र क्रांतीचा नारा दिला. 'लढाऊ राष्ट्रवादाचे जनक' असे त्यांना म्हटले जाऊ लागले. पुण्याजवळील लोणीकंद या ठिकाणी आपले क्रांतिकार्याचे कार्यालय सुरू केले. मध्यम वर्गानं त्यांच्या कार्यात भाग घेतला नाही. तळागाळातील लोकांनी साथ दिली. नऊशे सैनिक जमले. इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करणे, जनजागृती करणे, पगार देणे... वगैरे करताना पैसा हवा होता.

**भारतीय इतिहासाला लागलेला रोग म्हणजे फितुरी**

मेजर डॅनिएलला फडक्यांची कागदपत्रं सापडली. त्यांचे सर्व बेत कळले. विजापूरमधील देवर-नावडगी या गावी एक बौद्ध मंदिरात फडके प्रचंड थकून झोपले होते. २१ जुलै १८७९ रोजी त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्यासोबत काही सैनिक होते, त्यांनाही पकडले. काळ्यापाण्याची शिक्षा फर्मावण्यात येऊन एडनच्या तुरुंगात १८८० मध्ये टाकण्यात आले. तिथे त्यांचा क्षयरोगाने अंत झाला. हे चरित्र पुष्कळ मोठे आहे. ते वाचण्याची प्रेरणा मिळावी म्हणून ही झलक. अशी अनेक मान्यवर क्रांतिवीर मंडळी झाली. त्यांच्यात चापेकर बंधूंची कहाणी चित्तथरारक आहे. वासुदेव बळवंत चापेकरांचा जन्म १८८० मध्ये झाला. त्यांचे बंधू दामोदर आणि बाळकृष्ण यांनी तरुणांना शस्त्र शिक्षण दिले. इंग्रज अधिकारी रॅण्ड क्रूर होता. चापेकर बंधूंचे वडील हरिपंत हे कीर्तनकार म्हणून मुंबई, ठाणे, पुणे येथे जात असत. तिथे भाऊ त्यांना साथ करत. 'केसरी'मध्ये टिळकांचे स्फूर्तिप्रद लेख येत. ते वाचून ते क्रांतिकारक झाले. त्यावेळी प्लेगच्या साथीत अनेक जण मरण पावले. रोगावर नियंत्रण करण्यासाठी रॉल्टर चार्ल्स रॅण्ड आला. त्याने केलेले अत्याचार भयानक होते. इथून संघर्षाला सुरुवात केली. त्यांनी सूड घेण्यासाठी २२ जून १८९७ रोजी रॅण्डवर गोळ्या झाडल्या. ३ जुलैला तो मेला.

१८ एप्रिल १८९८ रोजी दामोदरला फाशी झाली. ८ मे रोजी वासुदेवाला आणि १६ मे रोजी फाशी... तिन्ही बंधू शहीद झाले.

लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, नामदार गो. कृ. गोखले, दापोलीचे महर्षी धोंडो केशव कर्वे, रँग्लर परांजपे, पां. बा. काणे, टिळक, आंबेडकर असे सुमारे छत्तीस सुपुत्र कोकणचे होते. त्यापैकी काही नावे आहेत : भार्गवराम फाटक, पुरुषोत्तम मराठे, केशव शेडगे, सी. एच. गायकवाड, मानाजी जाधव, चंद्रकांत मेहता, शिवराम गोंधळेकर, भगतसिंह फाटक, रावजी केळकर, रतनलाल भंडारी, श्रीधर केळकर... अशी ही नामवंत मंडळी असली, तरी ज्यांची नोंद नाही, अशी क्रांतिकारक मंडळी हजारोंनी असतील, यात शंका नाही.

**भटजी पहलवान हे नाव ठाऊक आहे?**

सेनापती बापट, डॉ. खानखोजे आणि डॉ. मुंजे या

प्रसिद्ध थोर लोकांना क्रांतिकार्याची दीक्षा देणारे भटजी पहलवान अर्थात भिडे गुरुजी हे ७ डिसेंबर १९४८ रोजी देवाघरी गेले. गुरुजी मूळचे निर्बोडी गावचे. त्यांचा जन्म २२ जुलै १८७६ या दिवशी झाला. पुण्याला त्यांना फार शिकता नाही आले. मात्र दांडपट्टा, मल्लखांब, नेमबाजी इत्यादी खेळांची आवड होती. कुस्ती, घोडेस्वाररी, व्यायाम हे त्यांचे छंद.

**पुण्यात आल्यावर चापेकरांशी ओळख झाली**

अण्णासाहेब पटवर्धनांनी त्यांना गुरूदीक्षा दिल्यावर म्हटले, 'कधीही, कोणतेही पुरावे मागे ठेवू नयेत. कमी बोलावे.' गुरुजींनी गावोगावी जाऊन क्रांतिकारकांशी संपर्क साधला. शस्त्रे पुरविली, मुसलमान क्रांतिवीरांनी त्यांना 'भटजी पहलवान' ही पदवी दिली. ठिकठिकाणी नोकऱ्या केल्या. योगी अरविंदांना क्रांतिकार्य कसे करावे हे शिकवले. ७ डिसेंबर १९४८ रोजी त्यांना देवाज्ञा झाली.

**पालघर परिसरातही असंख्य क्रांतिकारक झाले**

सावंत मास्तर, सखाराम पाटील, छोटालाल श्रॉफ, बाबासाहेब दांडेकर, धर्मा तांडेल, बाबुराव जानू, रंगनाथ परुळेकर, भोगीलाल शहा, हरीभाऊ राऊत, रघुवीर शिंदे, रंगनाथ वर्दे, मुकुंद संखे... पुष्कळ. १९१८ मध्ये लोकमान्य टिळकांनी ठाणे दौरा केला. पालघरला सभा झाली. त्यावेळी ठाणे जिल्ह्यातील देशभक्त आले होते. त्या काळात तीन हजार ६०० रुपयांचा निधी जमला. १९२८ मध्ये सरदार पटेल आले होते. १४ ऑगस्ट १९४२ या दिवशी 'चले जाव' आंदोलन वाढले. तेव्हा क्रूरपणे लाठीमार करून अनेकांना ठार केले, हा ब्रिटिशांचा रानटीपणा पाहून चळवळीला जोर चढला. २६ ऑक्टोबरला पालघर-बोईसर रेल्वे अडवण्यात यश मिळाले. पाच जण हुतात्मे झाले. पाच बत्ती चौक त्यांच्या नावे आजही ओळखला जातो.

अनंत कान्हेरे हे मूळचे कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील आयनी मेटे या गावचे. शिक्षणासाठी त्यांना औरंगाबादला जावे लागले. नाशिकचा क्रूर न्यायाधीश जॅक्सन! त्याला ठार मारण्यास १९ एप्रिल १९१० या दिवशी अनंता नाशिकला गेला आणि आधीच्या अभ्यासाप्रमाणे त्याने जॅक्सनवर चार गोळ्या झाडल्या म्हणून त्याला आणि कृष्णाजी कर्वे, विनायक देशपांडे यांना ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. अनंता हा कोकणचा सुपुत्र एकोणीसाव्या वर्षी शहीद झाला.

महात्मा गांधींच्या आदेशानुसार देशभर वैयक्तिक सत्याग्रहाची जी लाट उसळली त्यात बोर्डीचे हिराकांत पाटील यांचेही टाइम बॉम्बने आग लावणे, रेल्वे रूळ उखडणे असे अनेक क्रांतिकारी उपक्रम ही मंडळी करीत असत.

रायगडमधील कर्जतचे क्रांतिकारक विठ्ठल लक्ष्मण कोतवाल ऊर्फ भाई कोतवाल! माथेरानला १ डिसेंबर १९१२ रोजी जन्म झाला. शिक्षण घेत असताना एक दिवस ते अचानक बेपत्ता झाले. मॅट्रिकला असताना क्रांतिकारकांच्या कथा ऐकून ते वेडे झाले. पुण्यात कॉलेज शिक्षण घेताना ते गायब झाले. मुंबईत आले. मुंबईचा इंग्रज अधिकारी गव्हर्नर भयानक अत्याचार करत होता. त्याला मारायला भाईंनी पिस्तुल मिळवले. इंग्रजांनी उभारलेले विजेचे खांब कसे पाडयचे याची माहिती मिळवली आणि त्यांनी साथीदारांसह खांब पाडायला सुरुवात केली!

त्यांचा मुक्काम होता सिद्धगडाच्या गढीत. पोलिसांना बातमी समजली. सुगावा लागला. सशस्त्र पोलीस गढी चढून वर आले. गोळीबार सुरू केला. मांडीवर भाईंना गोळी लागली. दुसरी गोळी डोक्यातून गेली. भाई हुतात्मा झाले.

क्रांतिकारक मृत्युमुखी पडले खरे, पण अशा सशस्त्र क्रांतीमुळेदेखील स्वातंत्र्य मिळाले!

व्यास दीपोत्सव २०२२
सुधा शिधये
यांसकडून
दिपावलीच्या शुभेच्छा!

# जिथे मराठी माणूस, तिथे गुंफण!

**मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या जतन-संवर्धनाचा वसा घेऊन गेली २८ वर्षे**
**अखंडपणे कार्यरत असलेले महाराष्ट्रातील अग्रगण्य व्यासपीठ...**
**गुंफण सद्भावना साहित्य संमेलनाच्या माध्यमातून दोन दशकांची साहित्य सेवा...**
**महाराष्ट्र, गोव्यासह सीमाभागात वाचन चळवळीला बळ देण्यासाठी गुंफण ग्रंथालयांची स्थापना...**
**नवोदितांचे व्यासपीठ म्हणून गौरवलेला दिवाळी अंक...**

प्रकाशित झाला...

## गुंफण

वर्ष २८ वे

- विशेष परिसंवाद -

**तपासनीसांचा तपास**

केंद्रीय तपास यंत्रणांची स्थापना,
त्यांचे कार्य, त्यांची कार्यकक्षा,
अधिकार यासह विविध पैलूंवर
अभ्यासपूर्ण व सडेतोड भाष्य.

- सहभाग -

- डॉ. विश्वास मेहेंदळे
- विजय चोरमारे
- ॲड. भाऊसाहेब आजबे
- राजेंद्र भोईवार
- विराज महाजन




वाचनीय सदरे :

**हृदयस्पर्शी व विनोदी कथा, व्यक्तिचित्रे यासोबतच ललित, पर्यटन,**
**आरोग्य विषयक माहिती तसेच विनोद, कविता, व्यंगचित्रांचा भरगच्च नजराणा.**

आपला अंक आजच राखून ठेवा

* संदेश एजन्सीज, पुणे, * रसिक साहित्य, पुणे
* पूनम एजन्सीज, पुणे * मॅजेस्टीक बुक डेपो, मुंबई
* सावेकर एजन्सीज, कोल्हापूर
* महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा राज्यातील प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध.

कार्यकारी संपादक
गजानन चेणगे
७५८८६३८६१३

संपादक
डॉ. बसवेश्वर चेणगे
९८५०६५९७०८




# सर्वंकष संदर्भमूल्य ग्रंथ दर्शनिका (गॅझेटिअर)

**डॉ. दिलीप बलसेकर**

महाराष्ट्र राज्यातील कोकण विभाग म्हणजेच राज्यालाच नव्हे तर देशालाही स्वर्गीय अनुभव देणारा असा हा भाग आहे. या भागास जैव विविधतेसह विशाल सागर लाभलेला आहे. निसर्ग संपन्न असा या भूप्रदेशात कुणालाही वास्तव्य करण्याची व या निसर्गाच्या अलौकिक साक्षात्काराची अनुभूती घेण्याविषयी आकर्षण वाटावे. यादृष्टीने दर्शनिका (गॅझेटिअर) विभागाने या भागातील विविध जिल्ह्यांचे दर्शनिका (गॅझेटिअर) बनविण्याचे काम हाती घेतले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधीनस्थ दर्शनिका विभाग हा एक स्वतंत्र विभाग म्हणून कार्यरत असून या विभागाचे फक्त मुंबई येथे एक मुख्य कार्यालय आहे. विभागाद्वारे खालील संदर्भमूल्य प्रकाशनाचे काम करण्यात येते. ब्रिटिश जिल्हा गॅझेटिअर (इंग्रजी) तसेच ब्रिटिश राज्य गॅझेटिअर (इंग्रजी) यांचे पुनर्प्रकाशन करणे, उपरोक्त गॅझेटिअरच्या सुधारित आवृत्ती प्रकाशित करणे, विविध जिल्ह्यांचे (मराठी) गॅझेटिअर काढणे, स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधार साहित्य या विषयी गृह विभाग व अभिलेखागारामधील अप्रकाशित कागदपत्रे या संकलनावर आधारित खंड प्रकाशित करणे, स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश प्रकाशित करणे, जिल्हा पुरवणी गॅझेटिअर तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हा विशेष पुरवणी गॅझेटिअर प्रकाशित करणे, उपरोक्त सर्व गॅझेटिअर ग्रंथाची ई-बुक आवृत्ती (सी.डी.) स्वरूपात तयार करणे, तसेच सध्याच्या माहिती व तंत्रज्ञान युगाच्या अनुषंगाने हे ग्रंथ पेनड्राईव्ह स्वरूपामध्ये तयार करणे, महात्मा गांधी संकलित वाङ्मय एकूण ९८ खंडांपैकी खंड १ ते ५० भाग-१ पेनड्राईव्ह स्वरूपात प्रकाशित तर खंड ५१ ते ९८ भाग-२ पेनड्राईव्ह स्वरूपात निर्मिती करण्याच्या दृष्टीने काम सुरू, महाराष्ट्रातील विविध विद्यापीठ व महाविद्यालये येथे 'गॅझेटिअर : महत्त्व व उपयुक्तता' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद आयोजित करणे तसेच गॅझेटिअर ग्रंथ व ई-बुकचे प्रदर्शन भरवणे, तसेच जनसामान्य व विद्यार्थी, अभ्यासक यांना विभागाच्या कार्यालयात सेतू माधवराव पगडी संदर्भ ग्रंथालय स्वतंत्रपणे उपलब्ध करून



देण्यात आले आहे. उपरोक्त कार्य हे ब्रिटिश काळापासून ते आजतागायत सातत्याने सुरू असून आजपर्यंत ८५ पेक्षा अधिक ग्रंथ निर्मिती या विभागाने केली आहे. याच ग्रंथाची ई-बुक आवृत्ती देखील तयार करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या मुख्य पृष्ठावर 'जलद दुवे' या अंतर्गत दर्शनिका या शीर्षाखाली हे महत्त्वपूर्ण ग्रंथ वाचकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याचबरोबर विभागाचे www.maharashtra.gov.in, तर दिव्यांगांसाठी विशेषत्वाने http://mahagazetteers.com या वर विभागाची माहिती, कार्य व प्रकाशने उपलब्ध करून देण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या इंडियन कल्चर या पोर्टलवर देखील ही प्रकाशने उपलब्ध करण्या हेतू प्रयत्न सुरू असून आजपर्यंत ३५ पेक्षा अधिक ग्रंथ ई स्वरूपात उपलब्ध करण्यात आले आहे. मूलतः ब्रिटिश कालखंडापासून जिल्हा गॅझिटिअरमध्ये एकूण १२ प्रकरण निहाय प्रकाश टाकण्यात येतो. जसे की भूगोल, इतिहास, लोक, कृषी व जलसिंचन, उद्योगधंदे, बँक व्यवसाय व्यापार व वाणिज्य, वाहतूक व दळणवळण, आर्थिक विकास, प्रशासन, सामाजिक सेवा, संस्कृती, प्रेक्षणीय स्थळे तसेच ग्रामनिर्देशिका या विविध प्रकरणनिहाय संबंधित जिल्ह्याची अभ्यासपूर्ण माहिती व आनुषंगिक छायाचित्रे, नकाशे, आरेखणे देऊन अभ्यासकांना आणि वाचकांना तसेच प्रशासनाला एक दर्जेदार प्रकाशन उपलब्ध करून देण्यात येते.

राज्य गॅझेटिअर मालिकेत ज्या विषयांवर जिल्हा पातळीपेक्षा राज्य पातळीवर उत्तम लेखन होऊ शकते अशा वैशिष्ट्यपूर्ण विषयांसाठी राज्य गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित करण्यात येतात. या मालिकेंतर्गत इंग्रजी राज्य गॅझेटिअरमध्ये बॉटनी, महाराष्ट्र लँड ॲण्ड इटस पिपल, लँग्वेज ॲण्ड लिटरेचर, हिस्ट्री एन्शंट पिरीअड, मेडिवल पिरिअड, मराठा पिरिअड, तर मराठी राज्य गॅझेटिअरमध्ये भूमी व लोक, इतिहास प्राचीन काळ, स्थापत्य व कला, औषधी वनस्पती, मध्ययुगीन महाराष्ट्र, महाराष्ट्रातील वनस्पतीशास्त्र व वनसंपदा आणि प्रवरा खोरे हे ग्रंथ प्रकाशित करण्यात आले आहेत.

या ग्रंथांची मागणी देखील खूप मोठ्या प्रमाणात असून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना सदर गॅझेटिअर ग्रंथांचा बऱ्याच प्रमाणात उपयोग होतो. तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांनाही या ग्रंथांची उपयुक्तता आहे हे लक्षात घेऊन विभागानी सदर ग्रंथ अगदी सहजपणे उपलब्ध व्हावेत

यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील ०६ महत्त्वपूर्ण स्थळांच्या केंद्रावर अशा प्रकारच्या ई-बुक उपलब्ध करून दिल्या आहेत.

**कोकण विभाग व गॅझेटिअर विभागाचे प्रकाशनविषयक कार्य**

महाराष्ट्र राज्यातील कोकण विभाग म्हणजेच राज्यालाच नव्हे तर देशालाही स्वर्गीय अनुभव देणारा असा हा भाग आहे. या भागास जैव विविधतेसह विशाल सागर लाभलेला आहे. निसर्ग संपन्न अशा या भूप्रदेशात कुणालाही वास्तव्य करण्याची व या निसर्गाच्या अलौकिक साक्षात्काराची अनुभूती घेण्याविषयी आकर्षण वाटावे असा हा भू-प्रदेश म्हणजेच महाराष्ट्राला लाभलेली एक देणगीच आहे. यादृष्टीने गॅझेटिअर विभागाने या भागातील विविध जिल्ह्यांचे दर्शनिका (गॅझेटिअर) बनविण्याचे काम हाती घेतले आहे. तर राज्य गॅझेटिअर मालिकेतूनही या भू-प्रदेशाशी संबंधित वैशिष्ट्यपूर्ण विषयावर आधारित गॅझेटिअर प्रकाशित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

यातच विविध विभागवार यात्रा व उत्सव, गड व किल्ले हा विषय घेऊन गॅझेटिअर निर्मिती करण्याचे काम सुरू आहे. यामध्ये यात्रा व उत्सव (कोकण खंड) लवकरच प्रकाशित होणार असून या ग्रंथामध्ये विशेष करून एकूणच कोकण विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात परंपरागत रूढीचे पालन करून व नावीन्यपूर्ण पद्धतीने हे यात्रा-उत्सव साजरे केले जातात. याची माहिती सदर ग्रंथात देण्यात येणार आहे. भारतीय संस्कृतीचा विचार करता अनादी काळापासून ती निसर्गाची पूजक आहे. या संस्कृतीच्या धार्मिकच नव्हे, तर निसर्ग पूजनाच्या दृष्टिकोनातून यात्रा व उत्सव या ग्रंथात महत्त्व नोंदविलेले आहे. या मागील एकच उद्देश की येणाऱ्या पिढीला आपली संस्कृती व परंपरेची महती कळावी व यापुढेही अनेक वर्षे ती अबाधित रहावी, सदर ग्रंथामध्ये ठाणे, पालघर, मुंबई, मुंबई-उपनगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील शेकडो यात्रा उत्सवांची नोंद घेण्यात आली. हे उत्सव देवतांच्या किंवा संतांच्या किंवा महापुरुषांच्या निमित्ताने साजरे केले जातात. यात यात्रा व उत्सवांमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांची संख्या देण्यात येत आहे. उत्सव हे स्थानिक, राज्य किंवा देशपातळीवर होतात. त्यानुसार उत्सवाचे स्वरूप याबाबतही सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे


दहावा दिवाळी अंक! वाचनीय अन् दर्जेदार!
संपादक : प्रदीप खेतमर

दिवाळी २०२२
पुणेपोस्ट

**अंकातील मान्यवर :**

- मुलाखत : विवेक सावंत : तंत्रज्ञानाच्या विकासाचा तात्त्विक-नैतिक अंगाने घेतलेला वेध. मुलाखतकार : प्रदीप खेतमर
- लेख : हेमंत देसाई : सध्याच्या राजकीय परिस्थितीवर टोकदार भाष्य.
- यमाजी मालकर : सर्वसामान्यांचं गडगडणारं अर्थकारण
- अतुल कहाते : क्रिप्टोकरन्सीचं मायाजाल
- रविप्रकाश कुलकर्णी : मराठी माणसाचं मुंबईशी असलेलं नातं घट्ट की सैल!
- अजय देशपांडे : महाराष्ट्राचं सांस्कृतिक, राजकीय संचित अडगळीत पडतंय का?
- प्रतिक पुरी : राजकारण आणि वेगळ्या शैलीतले विनोद
- प्रदीप खेतमर : जगात कुठे लोकशाही नांदते?
- संतोष शेणई : मालवणी लोकगीतात लपलेला सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक इतिहास
- नंदू गुलगुले : 'डोकोरलाव्हिया' सिनेमाविषयी
- श्रीरंजन आवटे : सोशल मीडिया : नवं कुरुक्षेत्र!
- अमृता खेतमर : उभी बाटली, आडवे संसार!
- ललित : प्रभा गणोरकर
- मान्यवरांच्या पाच कथा : लक्ष्मीकांत देशमुख, गणेश मतकरी, महावीर जोंधळे, वसंत वाहोकार, प्रशांत बागड
- तीन अनुवादित कथा : मधुकर धर्मापुरीकर, चंद्रकांत भोंजाळ, सचिन बेंडभर
- व्यक्तिचित्रण : हिम्मत पाटील, ऐश्वर्य पाटेकर
- याशिवाय मान्यवर कवींच्या कसदार कविता

किंमत : २२० रुपये | संपर्क : ७७२२००५०८१

ग्रंथामध्ये या उत्सवांचे छायाचित्रेही देण्यात आली असून ग्रंथात शेवटी विविध जिल्ह्यातील ग्रामदेवता यांचीही माहिती परिशिष्टामध्ये देण्यात आली आहे.

'महाराष्ट्र : गड व किल्ले (कोकण विभाग)' या ग्रंथाचेही काम प्रगतीपथावर असून साधारणपणे कोकण विभागातील सर्वच जिल्ह्यातील गड व किल्ल्यांच्या माहितीवर आधारित हे राज्य गॅझेटिअर काढण्याची प्रक्रिया सुरू आहे.

यामध्ये छायाचित्रे व नकाशे देण्यात येणार असून येणाऱ्या पिढीस कोकण भागातील गड किल्ल्यांविषयी जनजागृती या ग्रंथाद्वारे होईल अशी अपेक्षा आहे.

याशिवाय विभागाने कोकण प्रदेशातील विविध जिल्ह्यांविषयी वस्तुनिष्ठ माहितीआधारे खालील संदर्भमूल्य असलेले गॅझेटिअर्स ग्रंथ प्रकाशित केले आहेत. सदर गॅझेटिअरच्या ई-बुक आवृत्ती आपणास पर्यटन केंद्राच्या तारकर्ली केंद्रावर पहावयास मिळतील.

✻ विभागाचे जिल्हा गॅझेटिअर (इंग्रजी) सुधारित आवृत्ती - रत्नागिरी डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर १९६२, कुलाबा डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर १९६, ठाणे डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर १९८२, बृहन्मुंबई भाग १ - १९८६, बृहन्मुंबई भाग २ - १९८७ व बृहन्मुंबई भाग ३ - १९८६

✻ जिल्हा पुरवणी गॅझेटिअर, कुलाबा डिस्ट्रीक्ट १९८१

✻ मुंबई इलाख्याचे गॅझेटिअर्स, गॅझेटिअर ऑफ बॉम्बे सिटी ॲण्ड आयलंड (भाग १,२,३) (१९०९) रत्नागिरी ॲण्ड सावंतवाडी खंड १० - १८८०

✻ ठाणे डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर भाग १,२,३ - १८८२, कुलाबा डिस्ट्रीक्ट - १८८३

✻ ठाणे, पालघर, मुंबई, मुंबई उपनगर, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग हे ग्रंथ विभागाकडून प्रकाशित करण्यात येणार आहेत.

✻ आगामी काळात सिंधुदुर्ग जिल्ह्याचे स्वतंत्र गॅझेटिअर दोन खंडांमध्ये प्रकाशित करण्यात येणार आहे. याहूनही अधिक कामे विभागाने हाती घेतली आहेत. तथापि, या ठिकाणी लेखनास पूर्णविराम देऊन सदर लेख इथेच संपवतो.

Insurance Advisor

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावरील

आपला विमा सोबती

सर्वप्रकारच्या विमा पॉलिसी करिता संपर्क

9702603362 / 9920631712



# साहित्य

## विभाग २




# ब्रह्मविद्येचा प्रकाश योग शिका

## प्रकाश जागृत करा ! अंधार नाहीसा करा !!

**मागील २५ वर्षांत २ लाख + यशस्वी साधक**

**प्रकाश योगाचा**
**प्राथमिक अभ्यासक्रम**
मोठ्यांसाठी (१८ वर्षांवरील)
२२ आठवडे
आठवड्यातून एकदा - दीड तास

प्रकाश योगात तुम्ही शिका -
तुमच्यातील प्रकाश जागृत करणारे

- आध्यात्मिक श्वसनप्रकार
- ध्यानाच्या सोप्या पद्धती
- मानवी जीवनाचे सखोल नियम

नियमित सरावाने तुम्ही व्हा

- अधिक आरोग्यसंपन्न
- आनंदी, उत्साही
- आत्मविश्वाससंपन्न



**ब्रह्मविद्येचा प्रकाश योग प्रत्यक्ष शिका.**
**२.५ वर्षांनंतर पुन्हा ऑफलाईन / क्लास रूम वर्ग अनेक ठिकाणी लवकरच सुरू होत आहेत.**
**याशिवाय ऑनलाईन वर्ग उपलब्ध. त्वरित नाव नोंदवा**

अधिक माहितीसाठी आमची वेबसाईट पाहा www.brahmavidya.net
किंवा फोन करा : **760 100 5555**

**ब्रह्मविद्या साधक संघ** (Sponsored by Grateful Students)



# कोकणातील बोली भाषांचे सौंदर्य

**मनमोहन रोगे**

प्रत्येक बोलीभाषेत एक वेगळे सौंदर्य असते, ती बोलण्याची खुबी असते, आपला असा एक बाज असतो, गोडी असते ती सारी कोकणातील या बाणकोटी व मालवणी बोलीभाषेत पुरेपूर आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शहरात राहणारे लोक आपसात बोलताना सर्रास बाणकोटी व मालवणी बोलीभाषेत बोलत असतात ते ऐकणाऱ्यांनाही गोड वाटते. थोडे फार कोळी-आगरी बोलीबाबत असेच बोलता येईल. एकूणच कोकण ही निसर्गसौंदर्याची खाण आहे

आपण नेहमीच म्हणतो की आपला भारत देश हा विविधतेने नटलेला आहे. प्रत्येक प्रांतातील लोकांच्या चालीरिती, पेहराव, जेवण-खाणे तसेच बोलीभाषा वेगवेगळ्या आहेत. त्याचप्रमाणे नैसर्गिक विविधता ही विपुल आहे. आपल्याच राज्यापुरता विचार केल्यास वेगवेगळ्या प्रदेश, जिल्ह्यातही कितीतरी विविधता आहे. छोट्याशा कोकण प्रदेशाचा विचार केला तर, डोळ्यासमोर येते ते तेथील अप्रतिम निसर्गसौंदर्य. तसे पाहिल्यास महाराष्ट्राच्या पश्चिमेचा चिंचोळा प्रदेश म्हणजे कोकण. क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केल्यास केवळ सात जिल्हे असलेला प्रदेश. पण या सात जिल्ह्यातील लोकांच्या चालीरिती, जेवणखाणे, पेहराव, रहाणीमान आणि बोलीभाषेत बराच फरक आढळतो. कोकणी या नावाने ओळखल्या ज़ाणाऱ्या अनेक बोली आहेत. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड जिल्ह्यातली आगरी, कोळी, वाडवळ, कादोडी, ईस्ट इंडियन, साल्सेती, बाणकोटी, वारली, कोकणा, कातकरी, रत्नागिरी जिल्ह्यातली बाणकोटी, संगमेश्वरी, चित्पावनी आणि सिंधुदुर्गातली मालवणी. प्रत्येक जिल्ह्याला आपली अशी एक किंवा अनेक बोली आहेत आणि प्रत्येक बोलीभाषेचे सौंदर्य वेगळे आहे. मुंबई शहर जिल्ह्याचा विचार केल्यास येथे फार पूर्वी कोळी, आगरी, भंडारी आणि पाठारे-प्रभू यांची वस्ती होती. यातील कोळ्यांची कोळी बोली. कोळी भाषेत बहुतेक सर्वांचा एकेरी उल्लेख केला जातो परंतु तरीही ती ऐकताना खटकत नाही, छान वाटते. पूर्वी या बोलीतील, ये दादा आवर ये, येव्हरा मोठ्ठा लावलाय वाटा..... हे व अशी काही गाणी प्रसिद्ध होती. आगऱ्यांची आगरी बोली तर भंडारी व पाठारे-प्रभू यांची मराठी बोली पण त्यातही फरक होता. पाठारे प्रभूंची प्रमाण मराठी तर भंडारी समाजाची सर्वसाधारण मराठी. आज मुंबईची भाषा मराठी असली तरी महाराष्ट्रासह विविध राज्यातून काम-धंद्यासाठी आलेले लोक आपापल्या नातेवाईकांमध्ये व समाजात आपापली बोलीभाषा तर इतर ठिकाणी मराठी, हिंदी वा इंग्रजी भाषेचा वापर करतात. मुंबईप्रमाणेच विस्तार होत गेलेला जिल्हा म्हणजे मुंबई उपनगर जिल्हा. येथेही मुंबई प्रमाणेच बोलीभाषा बोलल्या जातात. वांद्रे आणि पुढील परिसरात काही समाजात साल्सेती बोलीभाषेचाही वापर होतो.

ठाणे जिल्ह्याचे मुख्यत: शहरी व ग्रामीण असे दोन भाग पडतात. शहरी भागात मुंबईप्रमाणेच मराठी, हिंदी व इंग्रजीचा वापर होतो तर ठाण्याचा मोठा भाग असलेला ग्रामीण भाग हा आदिवासी पाडे असलेला, गावे दरी डोंगऱ्यात वसलेली असा आहे. यातील ठाकर जमात आपली ठाकरी बोली बोलतात तर धोडिया समाजाचे लोक गुजराती आणि थोडाफार आदिवासी बोलीचा वापर करतात. काही वर्षांपूर्वी ठाणे जिल्ह्यापासून वेगळा झालेल्या पालघर जिल्ह्यात वारली आदिवासी, कोकणा आदिवासी विशेषत: डोंगरी भागात तर आगरी व कोळी यांची वस्ती किनारपट्टीला आहे. यातील वारली आदिवसी हे वारली बोली तर कोकणा आदिवासी कोकणी बोलीचा वापर करतात तर आगरी, कोळी आपापली बोलीभाषा बोलत असले तरी त्यात खूप वैविध्य आहे. येथील कुपारी समाज कादोडी बोली बोलतात तर वसईपासून डहाणूपर्यंतचे हिंदू कोळी मांगेली बोलीभाषेत बोलतात, उत्तर कोकणातील ठाणे जिल्ह्यात सागरी किनाऱ्यालगतच्या भागात वाडवळी बोली बोलली जाते. या भागात सोमवंशी पाठारे क्षत्रिय व सोमंवशी क्षत्रिय समाजास शेतीवाडी हा व्यवसाय करणारे म्हणून 'वाडवळ' असे नामाभिधान पडले आहे. या समाजाच्या बोलीभाषेस 'वाडवळी' असे संबोधले जाते. तिचा उगम आणि विकास बहुतांशी ठाणे जिल्ह्यात झालेला दिसतो. ही बोली वसई परिसरात बोलली जाते. या बोली मराठी असल्या तरी त्या बोलीभाषेस अनभिज्ञ असलेल्या व्यक्तीस त्याचा काही उलगडा होत नाही. कोकणातील या दोन जिल्ह्यातच बोलीभाषांमध्ये किती वैविध्य आहे.

रायगड जिल्ह्यात आगरी व कोळी समाजाची वस्ती जास्त आहे. ते आपापल्या बोलीभाषा बोलतात तर इतर समाजाचे लोक बहुतांशी मराठी भाषा बोलतात. अर्थातच ती मराठी असली तरी बोलण्याची लकब किंचित वेगळी असते. रत्नागिरी जिल्ह्यातील बऱ्याच तालुक्यात बाणकोटी बोली बोलली जाते. यातही तालुका - तालुका किंवा जाती - जातीतील बोलीभाषेत थोडाफार फरक आहे. खोत मराठा समाज आणि बहुसंख्य असलेल्या कुणबी समाजाच्या बाणकोटी बोलीभाषेत बराच फरक आहे. बाणकोटी बोलणारे

वाक्यातील शेवटचा शब्द थोडा ताणून आणि प्रश्नार्थक बोलतात. बाणकोटी बोली ऐकताना खूप विनोदी बोली वाटते त्यामुळे ऐकताना छान वाटते. म्हणूनच अलिकडे विनोद निर्मितीसाठी काही वाहिन्यांवरील कार्यक्रमात तिचा वापर होतो. रत्नागिरीतील राजापूर तालुक्यातील पठारी प्रदेशातील लोक बाणकोटीपेक्षा वेगळी - 'तुम्हास....आम्हास...' अशी मराठी भाषा बोलतात आणि सागर किनाऱ्या जवळील लोक तर मालवणी बोली बोलतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये मालवणी बोली बोलली जाते अर्थात प्रत्येक तालुक्यातील लोकांच्या बोलण्याच्या लकबीत थोडाफार फरक आढळतो. मालवणी बोली ऐकणाऱ्याला गोड, मधुर वाटत असल्याने ती मालवणेतर लोकांनाही फार आवडते. कोकणात विशेषतः रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मंदिरांमध्ये, कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये देवाला गाऱ्हाणे घालायची, आपले म्हणणे सांगायची विशिष्ट पद्धत आहे. ही गाऱ्हाणी ऐकतानाही खूप गंमत वाटते. प्रत्येक बोलीभाषेत एक वेगळे सौंदर्य असते, ती बोलण्याची खुबी असते, आपला असा एक बाज असतो, गोडी असते ती सारी कोकणातील या बाणकोटी व मालवणी बोलीभाषेत पुरेपूर आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शहरात राहणारे लोक आपसात बोलताना सर्रास बाणकोटी व मालवणी बोलीभाषेत बोलत असतात ते ऐकणाऱ्यांनाही गोड वाटते. थोडे फार कोळी-आगरी बोलीबाबत असेच बोलता येईल. त्या तिन्ही बोलीभाषा ऐकताना भारी वाटतात. एकूणच कोकण ही निसर्गसौंदर्याची खाण आहे तशीच ती विविध बोलीभाषेंचीही खाण आहे. कोकणातील या पिढीजात चालत आलेल्या विविध बोलीभाषा आजही ग्रामीण भागातील माणसांनी टिकवलेल्या आहेत. नोकरी- धंद्यानिमित्त शहरात राहणारी कोकणी माणसे त्यांच्या बोलीभाषा बोलतातच असे नाही. त्यांनी आपल्या बोलीभाषा बोलल्या पाहिजेत तरच त्या पुढच्या पिढ्यांपर्यंत जातील. मुंबई, ठाणे वा अन्य शहरात जन्मलेल्या कितीतरी कोकणी मुलांना त्यांच्या बोलीभाषा बोलता येत नाहीत ही आजची परिस्थिती आहे. त्याचप्रमाणे कालौघात प्रत्येक बोलीभाषेतील कितीतरी शब्द न वापरले गेल्याने नष्ट होत आहेत, मृत पावत आहेत हे त्या त्या बोलीभाषेसाठी घातक ठरणारे आहे.

ठाणे, पालघर जिल्ह्यात सर्वात जास्त बोलीभाषा असल्या तरी रत्नागिरीतील बाणकोटी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणी बोलीभाषा अधिक प्रसिद्ध आहेत. बोलणाऱ्यांची संख्याही मोठी आहेच पण या दोन्ही बोलीभाषेतील कार्यक्रम विविध वाहिन्यांवर प्रसारित होत असतात. त्यातही मालवणी बोलीभाषेतील मालिका व नाटकांना मालवणी प्रेक्षकांबरोबरच इतर मराठी व अमराठी प्रेक्षकांची संख्याही जास्त असते. मालवणी बोलीभाषेतील अनेक नाटके देश विदेशात लोकप्रिय ठरलीत.

एखाद्या मातेची जशी वेगळ्या रंग - रूपाची, गुणांची अनेक मुले असतात तशाच या बोली भाषा अनेक असल्या तरी त्यांची जननी मराठीच आहे. आईला आपली सारी लेकरे सुखी, आनंदी, चिरंजीवी असावी अशी इच्छा असते तद्वत या अनेक बोलींची माय मराठीच असल्याने त्या साऱ्या बोली चिरंतन व्हाव्या, त्याचा वापर व्हावा, त्यांचे संवर्धन व्हावे अशीच तिची इच्छा असणार तेव्हा दैनंदिन जीवनात त्यांचा वापर करून त्यांचे जतन करण्याची आपली जबाबदारीच नव्हे तर कर्तव्यही आहे.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**विजया वळामे**
**यांसकडून**
**दिपावलीच्या शुभेच्छा!**



# कोकणातील गतकालीन कवी आणि लेखक

**रमेश सावंत**

निसर्गाने मुक्तहस्ताने केलेला कोकण साहित्यरसांनी सुद्धा तितकाच बहरला. साहित्य विश्वात त्याचे सौंदर्य कायम अधोरेखित होत आले आहे. कोकणातील साहित्यिक आणि त्यांचे साहित्य यांचे वेगळेपण इथल्या मातीशी नाते सांगणारे आहे. इथल्या मातीतील शब्द रुपी मोत्यांची पखरण करीत हे साहित्य विश्वात बहुमान मिळवित आहेत. आपल्यासाठी हे अभिमानास्पद आहे.

कोकणात मराठी साहित्यिक आणि लेखकांची वैभवशाली परंपरा आहे. त्या परंपरेतील गतकालीन लेखक आणि कवींच्या स्मृती आणि साहित्य जपणे आवश्यक आहे. या लेखात कोकणातील लेखक आणि कवी यांच्या लेखनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कवितेच्या क्षेत्रात आधुनिक मराठी कवितेचे जनक कविवर्य केशवसुत यांनी इंग्रजीतील स्वच्छंदवादी काव्यापासून प्रेरणा घेतली आणि परंपरागत कवितेचे स्वरूप बदलून समतेची, क्रांतीची, नव्या जगाची 'तुतारी' फुंकली. याच काळात रे. नारायण वामन टिळक आणि लक्ष्मीबाई टिळक (स्मृतिचित्रे) यांनी 'ख्रिस्तायन' हे वृत्तबद्ध ख्रिस्तचरित्र लिहिले. कवी आनंद आणि माधव काटदरे यांच्या स्वछंदी शैलीच्या कवितांतून कोकणातील जनजीवन आणि निसर्ग प्रतिबिंबित झाला. कवी बाळकृष्ण अनंत भिडे यांनी 'मराठी काव्याची उत्क्रांती व केशवसुत' या लेखात वेगळा दृष्टिकोन मांडला. कवी वसंत रामकृष्ण वैद्य आणि आद्य मालवणी कवी विठ्ठल नेरुरकर यांनी कवितेबरोबर कथा, बालसाहित्य आणि नाटके लिहिली. आ. ना. पेडणेकर यांनी प्रेम आणि निसर्ग या विषयावरील कविता लिहिल्या.

स्वातंत्र्योत्तर काळात मार्क्सवादी आणि गांधीवादी विंदा करंदीकर (ज्ञानपीठ पुरस्कार विजेते) हे प्रख्यात कवी, अनुवादक व समीक्षक म्हणून प्रख्यात होते. त्यांचे 'स्वेदगंगा', 'मृदगंध', 'धृपद', 'विरूपिका' हे काव्यसंग्रह आणि काही बालगीतसंग्रह प्रसिद्ध आहेत. साठोत्तरी काळात साहित्य अकादमी पुरस्कार विजेते स्वच्छंदतावादी मंगेश पाडगावकर (सलाम), मानवी जाणिवेचे संवेदनशील कवी आरती प्रभू (नक्षत्रांचे देणे, जोगवा), अस्तित्ववादी गुरुनाथ धुरी (ग्लोरिया), मानवतावादी सतीश काळसेकर (इंद्रियोपनिषद्), सौंदर्यवादी वसंत सावंत, विद्रोही कवी आ. सो. शेवरे (अंधारातला जागल्या), महानगरीय जाणिवांचे कवी तुलसी परब (हिल्लोळ), संवेदनशील कवी आणि लेखक बाळ राणे (दुर्दम्य) आणि वसंतराव आपटे (चांदणं), यांच्या कवितांनी लक्ष वेधले. ऐंशीच्या दशकात 'दीर्घकविता', 'स्वीकार', 'चित्र', 'पुन्हा दीर्घ कविता' हे कवितासंग्रह लिहिणाऱ्या कवयित्री रजनी परुळेकर यांच्या कवितांचा दृष्टिकोन मानवतावादी आहे. गझलकार बदीउज्जमां खावर आणि मधुसूदन नानिवडेकर यांचे गजलसंग्रह प्रसिद्ध आहेत. याच काळातील कवयित्री प्रतिभा आचरेकर यांनी 'प्रतिभा' आणि 'स्पंदन'या कवितासंग्रहातून सामाजिक समस्या, आणि स्त्री विषयक जाणीवा हे विषय हाताळले.

गद्यलेखनाच्या क्षेत्रात १९ व्या शतकाच्या प्रारंभी 'दर्पणकार' बाळशात्री जांभेकर यांनी अनेक ज्ञानवर्धक ग्रंथ लिहिले. त्यानंतर 'महाराष्ट्र सारस्वतकार' विनायक लक्षण भावे (मराठी ग्रंथसंग्रहालयाचे संस्थापक) यांनी महानुभाव वाङ्मयावर ग्रंथ लिहिला. 'शिवचरित्र' चे लेखक कृ. अ. केळूसकर गुरुजींनी लिहिलेले बुद्धांचे चरित्र वाचून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्धधर्माची प्रेरणा मिळाली होती. आंबेडकरवादी (दलित) साहित्याचे प्रेरणास्रोत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', आणि 'प्रबुद्ध भारत' या वृत्तपत्रातील लेखनातून त्यांचे चिंतन, अभ्यास, आणि सामाजिक दृष्टिकोन यांचे दर्शन घडले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी 'ज्ञानपीठ पुरस्कार' विजेते जीवनवादी वि. स. खांडेकर (ययाती) यांनी त्यांच्या साहित्यात आर्थिक विषमता, ध्येयवादी व्यक्तिंचे वैफल्य, दलितांवर होणारा अन्याय, दांभिकता दाखवून सामाजिक आशय आणला. 'श्यामची आई' या लोकप्रिय पुस्तकाचे लेखक साने गुरुजी यांनी बालकुमारांसाठी कथा, कादंबरी, बालसाहित्य, कविता, निबंध, चरित्र,अनुवाद असे भरपूर लेखन केले. इतर लेखकांपैकी 'बालसन्मित्र' पाक्षिकाचे संपादक पा. ना. मिसाळ, 'मार्क्सवादी लेखक आणि समीक्षक खंडेराव सुळे, आणि गणेश बाळकृष्ण ताम्हाणे (कोकणची पाउलवाट) यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. पुढील काळात ग. त्र्यं. माडखोलकरांनी कादंबऱ्या, एकांकिका, समीक्षा, आणि लघुकथा लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यातून सशस्त्र क्रांतीबद्दलचे प्रेम आणि समाजवादाचा पुरस्कार आढळतो. जवळपास १२०० कथा आणि ५० कादंबऱ्या लिहिणारे शब्दप्रभू श्रीपाद काळे यांनी त्यांच्या साहित्यातून कोकणच्या निसर्गाचे आणि लोकजीवनाचे मार्मिक वर्णन केले. १९५८ साली प्रसिद्ध झालेल्या 'कोकणी गं वस्ती' या पहिल्या कथासंग्रहापासून आजवर सातत्याने लेखन करणारे ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी 'माहिमची खाडी' या कादंबरीद्वारे मुंबईतल्या झोपडपट्टीतील माणसांचे जीवन रेखाटले. त्यांच्या साहित्यात मानवी स्वभाव, मानवी जीवन आणि कोकणातील निसर्गाचे कुतूहल व्यक्त झाले.

स्वातंत्र्योत्तर काळातील समाजवादी लेखक ना. ग. गोरे यांचे ललितनिबंध, वैचारिक लेख, बालसाहित्य आणि कथासंग्रह रेखीव मांडणी, स्पष्ट विचार आणि अभ्यासपूर्ण विवेचन यासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी कालिदासाचे मेघदूत

आणि पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचा अनुवाद केला. साहित्यिक मधुसूदन भावे यांनी कविता, गीते, कादंबरी, लेख, आत्मचरित्र आणि लोकनाट्ये लिहिली. ग्रामीण कथा व कादंबरीकार रघुनाथ वामन दिघे यांनी कथा-कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांचं दुःख व व्यथा-वेदना समर्थपणे चित्रित केल्या. बाळकृष्ण प्रभुदेसाई, यांचा कथासंग्रह आणि दोन कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांची दोन नाटके अप्रकाशित राहिली.

साठोत्तरी काळातील साहित्यिक चि. त्र्यं. खानोलकर (आरती प्रभू) यांनी नाटक, कादंबरी व कथेच्या क्षेत्रात कोकणातील दंतकथा व गूढता यांचा प्रभावी उपयोग केला. त्यांच्या साहित्यातून मानवी जीवनातील अतर्क्य आणि अद्भूत यांचा शोध घेण्यामुळे त्यांचे वेगळेपण जाणवते. मं. वि. कोल्हटकर, वि. कृ. नेरूरकर यांच्या साहित्यात कोकणातील अज्ञाताच्या भीतीचे चित्रण आहे. प्र. श्री. नेरूरकर यांनी कादंबरी, नाटक, बालसाहित्य, प्रवासवर्णन आणि चरित्रे साकारली आणि मालवणी बोलीतील साहित्यावर संशोधन केले. मराठी, संस्कृत आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेले संसदपटू बॅ. नाथ पैं यांना मराठी कवीच्या काव्यपंक्ती मुखोद्गत असत. गं. बा. सरदार यांनी आपल्या ग्रंथांतून सामाजिक प्रबोधनाचे विचार मांडले. चंद्रकांत खोत यांचे कवितासंग्रह, कादंबऱ्या ('उभयान्वयी अव्यय' आणि 'बिंब-प्रतिबिंब') प्रसिद्ध आहेत. पण खेदाची गोष्ट म्हणजे त्यांच्या लेखनावर अश्लीलतेचा शिक्का बसल्याने त्यांना मान्यता मिळाली नाही तसेच त्यांचे बालसाहित्यही दुर्लक्षित राहिले. सतीश काळसेकर यांचा 'वाचणाऱ्याची रोजनिशी' हा लेखसंग्रह (साहित्य अकादमी) आणि 'इंद्रियोपनिषद' कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. लोकप्रिय लेखक रत्नाकर मतकरी यांनी गूढकथा, भयकथा, नाटकं, आणि बालनाट्ये अशी शेकडो पुस्तकं लिहिली.

जयवंत दळवी यांनी देखील कथा, कादंबऱ्या, नाटके या साहित्यप्रकारात 'चक्र', 'महानंदा', 'संध्याछाया', 'बॅरिस्टर', 'सूर्यास्त' 'पुरुष', 'सारे प्रवासी घडीचे' अशी लोकप्रिय पुस्तके लिहिली. विवेकवादी समाजसुधारक हमीद दलवाई यांचे लेखन कोकणातील अन्य लेखकांपेक्षा वेगळे होते. त्यांच्या कथा ('लाट' कथासंग्रह) वास्तववादी जाणिवा व्यक्त करतात. साहित्यातून महानगरीय माणसाचे दुःख मांडणाऱ्या ह. मो. मराठे यांच्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' आणि 'काळेशार पाणी' या कादंबऱ्या गाजल्या. माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या पुस्तकातून वाचकांना उपेक्षित जीवनविश्वाचा परिचय झाला. ग्रामीण संस्कृतीविषयी 'बलुतेदार', 'बखर सदाशिव वाशीकरची' आणि 'शब्दानुबंध' ही पुस्तके लिहिणारे शंकर सखाराम यांची 'सेझ' कादंबरी मुंबई विद्यापीठाने 'एमए'च्या अभ्यासक्रमात लावली.

आ. ना. पेडणेकर यांच्या लेखनात कोकणातील लोकजीवन आणि निसर्ग यांचे चित्रण आढळते. त्यांनी 'शैलुक', 'मैत्र', 'वेडा', इत्यादी कथासंग्रहातून सामाजिक विकृतींचा निषेध केला. श्री. ना. पेंडसे यांच्या लेखनातून प्रादेशिक जीवनासह मानवी जीवनाचे मर्म दिसते. त्यांच्या 'एल्गार', 'हद्दपार', 'गारंबीचा बापू' आणि 'तुंबाडचे खोत' या कादंबऱ्या आणि नाटके प्रसिद्ध आहेत. विद्याधर भागवत हे 'आरती' मासिकाच्या संपादनाबरोबरच कविता, कथा, कादंबरी, नभोनाट्य, बालसाहित्य, साहित्य समीक्षा आणि चरित्रलेखन करीत असत. त्यांना बालकवी ठोंबरे यांच्यावरील 'ऐलतटावर - पैलतटावर' कादंबरीसाठी पुरस्कार मिळाले.

डॉ. विद्याधर करंदीकर यांनी कवितासंग्रह, मालवणी एकांकिका तसेच केशवसुत आणि वीर सावरकर यांची चरित्रे लिहिली. प्रसिद्धीपासून दूर असणारे लुई फर्नांडिस यांच्या साध्या, सरळ शैलीतील कथांतून ('कोऱ्या पानांची फडफड') राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्य, ध्येयनिष्ठ आणि धर्मनिरपेक्षता व्यक्त झालेली आहे. अनंत वासुदेव मराठे हे व्यासंगी लेखक आणि 'किरात' साप्ताहिकाचे संपादक होते. त्यांनी अनेक ऐतिहासिक, धार्मिक ग्रंथाचे संपादन केले होते. प्रख्यात ललित लेखक रविंद्र पिंगे यांनी अनेक २०० ललित लेख, ३०० व्यक्तिचित्रे आणि कथा-कादंबऱ्या लिहिल्या. वि. स. सुखटणकर यांच्या साहित्याची प्रेरणा मानवी स्वभाव आणि जीवनातील नाट्य ही होती. सिंधुदुर्ग साहित्य संघाचे सक्रिय कार्यकर्ते हरिहर आठलेकर हे वाङ्मयीन कार्यकर्ता, आणि ललित लेखक म्हणून परिचित होते. शरद काळे यांचे ललित लेख, कथा व कविता सत्यकथा 'आरती' मसिकांमधून प्रसिद्ध झाल्या. या काळात ज्या स्त्री लेखिका पुरुषांच्या बरोबरीने साहित्याच्या क्षेत्रांत सक्रिय होत्या, त्यातील 'विभावरी शिरुरकर' या टोपण नावाने लिहिणाऱ्या मालतीबाई बेडेकर पूर्वाश्रमीच्या कोकणातील होत्या. त्यांच्या 'कळ्यांचे निःश्वास' कथासंग्रहात स्त्रियांचा भावनिक व्यथांचे दर्शन घडते.

कोकणात अनेक नाटककार झाले. गडकऱ्यांच्या प्रभावाने ल. मो. बांदेकर यांनी 'आर्य चाणक्य', 'सेकंड लिअर' अशी नाटके लिहिली. मामा वरेरकर यांनी 'हाच

मुलाचा बाप', 'संन्याशाचा संसार', 'सत्तेचे गुलाम', 'करीन ती पूर्व' इत्यादी ३७ नाटके लिहिली आणि त्यातून सामान्यांचे प्रश्न मांडले. मो. ग. रांगणेकर यांच्या 'कुलवधु' नाटकाला फार लोकप्रियता मिळाली. चि. त्र्यं. खानोलकर यांच्या ' एक शून्य बाजीराव, 'अजब न्याय वर्तुळाचा' या दर्जेदार नाटकांनी रंगभूमी गाजविली.

श्याम फडके यांनी एकांकिका, मुलांसाठी विनोदी नाटके आणि रसिकांसाठी नाट्यलेखन केले. श्री. ना. पेंडसे यांची महापूर', 'संभूसाच्या चाळीत', 'चक्रव्यूह' ही नाटके लोकप्रिय झाली. ऐंशीच्या दशकात हौशी आणि व्यावसायिक नाटककार  प्र. ल. मयेकर यांची रूपकात्मक नाटके नाट्यस्पर्धांमध्ये गाजली. लोकप्रिय नाटककार ला. कृ. आयरे यांनी आपली नाटके कामगार रंगभूमीवर सादर केली. आत्माराम सावंत यांनी कामगार नाट्यस्पर्धांसाठी लेखन केले. याच काळात रमेश पवार, वामन तावडे, डॉ. अनिल बांदिवडेकर, तुलसी बेहरे, गंगाराम गवाणकर, मधुसूदन कालेलकर इत्यादींची नाटके प्रसिद्ध होती. प्रसिद्ध नाटककार रत्नाकर मतकरी यांच्या 'लोककथा ७८' आणि 'आरण्यक' या समांतर नाटकांना मानाचे स्थान मिळाले.

मराठी नाटकाच्या इतिहासात कोकणातील हिराबाई पेडणेकर या पहिल्या मराठी स्त्री नाटककार होत्या. परंतु त्यांना तो मान मिळाला नाही याचा खेद वाटतो. या संक्षिप्त लेखात कोकणातील साहित्यिक आणि त्यांचे साहित्य यांचे केवळ ओझरते दर्शन मिळण्याची शक्यता आहे. मात्र या लेखांतून कोकणचे साहित्यिक गतवैभव किती लक्षणीय आहे याचे प्रत्यंतर रसिकांना येईल असे वाटते.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**आकांक्षा जाधव**
**यांसकडून**
**दिपावलीच्या शुभेच्छा!**

CHOCOLATE
**AARADHYA ENTERPRISES**
Delicious HOME MADE Dryfruits chocolate

प्लेन चॉकलेट, काजू चॉकलेट,
बदाम चॉकलेट, मिक्स चॉकलेट ड्रायफ्रूट्स
Dryfruits chocolate

9702603362/9920631712



# कोमसाप
## एक ध्यास एक प्रवास

**मेघना साने**

एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतल्याशिवाय ती लवकर पूर्ण होत नाही. भाईंनी कोकणातील कवी, लेखक व रसिकांना जोडण्याचा ध्यास घेतला होता. केवळ तीन महिन्यात सगळी जुळवाजुळव करून १९९१ च्या गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कोकण मराठी साहित्य परिषदेची गुढी उभारली गेली. उत्तर कोकणातून डहाणू, पालघर, केळवे, माहीम, वसई, ठाणे, कल्याण तर दक्षिणेकडील सिंधुदुर्ग जिल्हा यातील साहित्य रसिक कोमसापच्या कल्पनेने भारून गेले.

सुप्रसिद्ध साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी कोकणात स्थापन केलेल्या 'कोकण मराठी साहित्य परिषद' या संस्थेचा प्रवास आता ३० हून अधिक वर्षे झालेला आहे. मुळात ही संस्था स्थापन करण्यामागचा मधुभाईंचा हेतू शुद्ध होता. कोकणातील साहित्यिक नावारूपाला यावेत, त्यांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि संस्थेच्या माध्यमातून अनेक साहित्यिक जोडले जाऊन त्यांची प्रगती व्हावी हा होता. 'कोमसाप'च्या आता वृक्षाला फळे रसाळ गोमटी येऊ लागली आहेत. महाराष्ट्राला कोकण प्रांताने १९४० पासून अनेक साहित्यिक दिले होतेच. आता या संस्थेच्या उपक्रमामुळे कोकणातून नवी पिढी उदयास आलेली आहे आणि महाराष्ट्राला नवनवे लेखक, कवी माहीत झाले आहेत.

अशी एखादी संस्था स्थापन करण्याची संकल्पना कशी सुचली याबद्दल मधुभाईंनी स्वतःच मला सांगितलेल्या आठवणी अशा -

१९९० साली मधु मंगेश कर्णिक यांनी 'महाराष्ट्र साहित्य परिषदे' तर्फे होणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी फॉर्म भरला. त्यावेळी प्रतिस्पर्धी उमेदवार होते द .मा .मिरासदार. मतदारांची यादी पाहता असे दिसून आले की रत्नागिरीत मोठे संमेलन होणार असूनही, कोकणातील मतदार होते अवघे दोनच ! भारतभरातील इतर मतदारांच्या मतांमुळे कर्णिक निवडून आले खरे पण कोकणातील लोक साहित्य संस्थेशी जोडले गेले नाहीत हे सत्य हे कळून आले. कोकणच्या लोकांना आपली वाटेल अशी एखादी साहित्यसंस्था निर्माण करण्याची गरज आहे हे भाईंच्या लक्षात आले. मग रत्नागिरीच्या साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषण करताना त्यांनी कोकणात आपण 'कोकण मराठी साहित्य परिषद' अशी संस्था स्थापन करणार असल्याची घोषणा केली. तसेच आपले साहित्यातील आदर्श केशवसुत यांचे एक स्मारक मालगुंड येथे उभे करण्याचा प्रकल्पही घोषित केला. दोन्ही संकल्पनांचे रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे आणि शं.ना. नवरे यांनीही या योजनेला पत्र लिहून पाठिंबा दिला.

एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतल्याशिवाय ती लवकर पूर्ण होत नाही. भाईंनी कोकणातील कवी, लेखक व रसिकांना जोडण्याचा ध्यास घेतला होता. केवळ तीन महिन्यात सगळी जुळवाजुळव करून १९९१ च्या गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कोकण मराठी साहित्य परिषदेची गुढी उभारली गेली. उत्तर कोकणातून डहाणू, पालघर, केळवे, माहीम, वसई, ठाणे, कल्याण तर दक्षिणेकडील सिंधुदुर्ग जिल्हा यातील साहित्य रसिक कोमसापच्या कल्पनेने भारून गेले. त्यावेळी कोकणात अशी एकही साहित्य संस्था अस्तित्वात नव्हती. भाईंनी आणि त्यांच्या मित्रमंडळींनी खूप दौरे केले. कोमसापची शाखा सुरू करण्यासाठी सबंध कोकणातून निमंत्रणे येत होती. भाई प्रत्येक प्रांतात जाऊन त्यांच्याशी संवाद करायचे. कोमसापची स्थापना का करावी लागली, तिचे कार्य काय आहे हे भाई सर्वांना समजावून सांगत. साहित्य संमेलने, पुस्तक प्रकाशन, कार्यशाळा, परिसंवाद, कथाकथन, कवी संमेलन असे संकल्पित कार्यक्रम सर्वांपुढे ठेवत असल्याने गावोगावी स्वागत होत होते. २४ मार्च १९९१ ला रत्नागिरीला कोकणातील सर्व जिल्ह्यातून प्रतिनिधींची दाटी झाली आणि 'लोकसत्ते'चे संपादक माधव गडकरी यांच्या हस्ते कोकण मराठी साहित्य परिषदेचं रीतसर उद्‍घाटन झालं.

संस्थात्मक कार्य मी करू शकलो कारण माझ्याजवळ माणसं चांगली होती. असे भाई आवर्जून सांगतात. कोमसापच्या उभारणीतील सुरुवातीचे कार्यकर्ते होते अरुण आठल्ये, राजा राजवाडे, वसंत सावंत, प्राचार्य कोडोलीकर, अरुण नेरूरकर, डॉ. वि. म. शिंदे, श्रीकांत शेट्ये, पाटणे वकील, विद्याधर भागवत. कोमसापची स्थापना ही कोकणासाठी एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना होती. मात्र 'मराठी साहित्य परिषदे'च्या अधिकाऱ्यांनी कोमसापला संलग्नता देण्याचे नाकारले. पण प्रत्येक जिल्ह्यात कमिटी स्थापन करून कोमसापने आपले काम स्वबळावरच सुरू केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात जाहीर केलेला दुसऱ्या महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे कविवर्य केशवसुत यांचे स्मारक. त्याचे भूमिपूजनही मधुभाईंनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा एक वर्षाचा काळ संपायच्या आतच केले. मालगुंड येथील शिक्षण संस्थेने उत्स्फूर्तपणे मदत केली, त्यामुळे हे शक्य झाले. यासाठी निधी जमवणे हे मात्र कष्टाचं आणि जोखमीचं काम होतं. मधुभाई आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी, या स्मारकासाठी निधी जमवण्यासाठी खूप वणवण केली. एकूण साठ लाखांचा निधी त्यांनी जमवला. त्यामध्ये महाराष्ट्राचे तात्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक आणि शरदरावजी पवार या दोघांनी सिंहाचा वाटा उचलला होता. काही रक्कम कोकणातील नगरपालिका आणि तत्सम

संस्था, एनरॉन तसेच केशवसुतांचे वंशज, कुटुंबीय, पंकज कुरुलकर, अचला जोशी यांनी स्मारक प्रकल्पास दिली. गोरेगावचे दोशी वकील, रमेश कीर व अशोक बहुलकर यांनी काही गृहोपयोगी वस्तू दान केल्या. पुण्याच्या कवयित्री स्वाती सामंत यांनी आपल्या कवयित्री मैत्रिणींसह काव्यदिंडी गावोगाव नेली आणि जमलेली रक्कम स्मारकाकडे पाठविली. शाळांच्या विद्यार्थ्यांनीही निधी जमवून कोमसापला दिला. अशा तऱ्हेने समाजातील अनेक घटक या प्रकल्पाच्या निमित्ताने कोमसाप परिवारात सामील झाले आणि संस्थेला बळकटी आली.

केशवसुत स्मारकाचे भाईंचे स्वप्न साकारले गेले. या स्मारकाचे डिझाईन अभय कुलकर्णी या तरुण स्थापत्यकाराने केले होते. स्मारकामध्ये खुला रंगमंच, मोफत वाचनालय, सुसज्ज ग्रंथालय, अतिथी गृह, आधुनिक मराठी काव्यसंपदा दालन (श्रेष्ठ कवींचे समीक्षात्मक परिचयही तेथे लिहिले आहेत) पहावयास मिळते. या स्मारकाचे उद्घाटन कविवर्य कुसुमाग्रज यांचे हस्ते मे १९९४ मध्ये झाले. उदघाटनप्रसंगी, केशवसुतांच्या मूळ घरात प्रवेश करताच कुसुमाग्रजांनी तेथील माती कपाळाला लावली आणि म्हणाले 'आज मी धन्य झालो.' हे स्मारक म्हणजे एक काव्यतीर्थ असल्याचे कुसुमाग्रज आपल्या भाषणात म्हणाले, तेव्हा मधुभाईंना गहिवरून आले. कोमसापकडून एक चांगला प्रकल्प पूर्ण झाला होता.

या संस्थेने आपल्या वाटचालीत खूप महत्त्वाची कामगिरी केली आहे. ती म्हणजे सातत्याने कोकणात साहित्य जागर करणे. लोकांना साहित्याशी जोडून ठेवणे. कोमसपच्या मुंबई, ठाणे, पालघर येथील शाखाही उत्तम काम करत आहेत. कोमसापचे पहिले संमेलन चिपळूण येथे झाले. त्यावेळी अध्यक्ष होते कविवर्य मंगेश पाडगावकर. अध्यक्षाची निवड निवडणूक घेऊन नव्हे तर त्याच्या कार्यावरून सर्वानुमतेच होत असते. तीच प्रथा आजवर कायम आहे. त्यानंतर झालेल्या साहित्य संमेलनात एकापेक्षा एक दिग्गज साहित्यिक अध्यक्षपदासाठी लाभले. श्री. पु. भागवत, श्री. ना. पेंडसे, विंदा करंदीकर, शं. ना. नवरे, वि. वा. प्रभूदेसाई, विजया राज्याध्यक्ष, नारायण सुर्वे, माधव गडकरी, म. सू. पाटील, दिनकर गांगल, भालचंद्र मुणगेकर हे 'कोमसाप'चे संमेलनाध्यक्ष झाले.

२००० सालानंतर झालेल्या संमेलनांचे अध्यक्ष कवी अशोक नायगावकर, नाटककार व पत्रकार जयंत पवार हे झाले. ही सगळी संमेलने कोकणात गुहागर, महाड, अलिबाग, सावंतवाडी, नवी मुंबई, वसई, केळवे अशा गावातून, शहरातून झाली. त्यामुळे कोकणातील नवीन कवी, लेखकांना चांगले व्यासपीठ मिळाले. प्रथितयश लेखकांचा सहवासही मिळाला. साहित्य विचारांचे आदान प्रदान होत गेले. कवीसंमेलने, कवीकट्टा, साहित्यावरील परिसंवाद अशी साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल आणि कोकणातील निसर्गरम्य पर्यटन, त्यामुळे मुंबई, ठाणे येथील साहित्यप्रेमीही कोकणातील संमेलनांना येऊ लागले. कोमसापची संमेलने गोवा आणि बेळगावातही झाली होती. मधुभाई सर्व लेखक, कवी सभासदांचे हसतमुखाने स्वागत करतात आणि लहान-मोठ्या सर्व लेखकांच्या प्रगतीचा आलेख त्यांच्या लक्षात असतो हे विशेष. त्यांच्यासोबत सुरुवातीपासून काम करणारी मंडळी गजानन पाटील, रेखा नार्वेकर, नमिता कीर, प्रदीप ढवळ, उषा परब, रुबारियो पिंटो, अशोक चिटणीस, भारती मेहता, सुनीता जोशी, एल. बी. पाटील, गजानन परब आणि दत्तात्रय सैतावडेकर अजूनही कार्यकर्ते म्हणून काम करत आहेत.

आज कोमसाप ही एक वाङ्मयीन उपक्रम राबवणारी नव्या तरुण कार्यकर्त्यांची उत्साहाने रसरसलेली अशी साहित्य संस्था आहे. अनेक महिला कार्यकर्त्याही संस्थेसाठी काम करत आहेत. महिलांसाठी वेगळे संमेलन करून त्यांच्या विषयांना प्राधान्य देण्याची कल्पना अमलात आणली गेली. कोमसापाची एकूण सहा महिला साहित्य संमेलने झाली. महिलांच्या साहित्यावर विचार करण्याला अग्रक्रम देण्यात आला. डॉ. तारा भवाळकर, वीणा गवाणकर, डॉ. अरुणा ढेरे, उषा मेहता अशा साहित्यिका संमेलनाध्यक्ष म्हणून लाभल्या.

संस्था स्थापन झाल्यापासून १५ वर्षे मधुभाई संस्थापक अध्यक्ष होते. त्यानंतर त्यांनी संस्थेची धुरा खंद्या कार्यकर्त्यांवर सोपवली. न्यायमूर्ती भास्करराव शेटे, पु. द. कोडोलीकर, महेश केळुस्कर, यांनी अध्यक्षपद भूषविले. कोमसापाची कार्यकारणी दर तीन वर्षांनी बदलत असते. नुकत्याच आलेल्या २०२१ च्या केंद्रीय कार्यकारिणीने ठाणे जिल्ह्यात अनेक उपक्रमांची रेलचेलच केली. केंद्रीय अध्यक्ष नमिता कीर (कोकणातील 'रत्नागिरी एक्सप्रेस'च्या संपादिका) व केंद्रीय कार्याध्यक्ष सुप्रसिद्ध लेखक प्रदीप ढवळ, कार्यवाह माधव अंकलगे व ठाणे जिल्हाध्यक्ष बाळ कांदळकर यांनी पदे स्वीकारल्यावर लगेचच युवा साहित्य संमेलनाचे ठाण्यात आयोजन केले आणि तरुण लेखकांना या साहित्य दिंडीत सामील करून घेतले. ११-१२ जानेवारी

२०२२ मध्ये काशिनाथ घाणेकर सारख्या भव्य रंगमंदिरात युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले. युवाशक्तीच्या केंद्रीय अध्यक्ष दीपा ठाणेकर व त्यांच्या तरुण टीमने अहोरात्र मेहनत करून हे संमेलन यशस्वी केले. ठाणे शहर कोमसापची टीम, तसेच आनंद विश्व गुरुकुलच्या कार्यकर्त्यांची फळी या कार्यात सहभागी होती. या संमेलनात कथाकथन, कवितावाचन याबरोबरच कवितेवरील नृत्येही सादर झाल्याने तरुणाईचा सहभाग वाढला. भव्य रांगोळी प्रदर्शन, नाटके, चर्चा इत्यादी आकर्षणे ठरली.

त्या पाठोपाठ पालघर येथे केंद्रीय कार्यकारिणीने राज्यस्तरीय सहाव्या महिला साहित्य संमेलनाचे आयोजन केले. अपरांत भूमीतील सागरी डोंगरी आणि नागरी अंग असलेल्या पालघर जिल्हा या साहित्य सिंचनाने पुलकित झाला. संमेलन समितीवर असलेल्या उषा परब आणि स्वागताध्यक्ष ज्योती ठाकरे (अध्यक्ष, महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य) यांनी उत्तम आयोजन करून संमेलनात शेकडो महिलांचा सहभाग घडवून आणला. सुप्रसिद्ध लेखिका मोनिका गजेंद्रगडकर या संमेलनाध्यक्ष होत्या. 'आजची आत्मनिर्भर स्त्री ', 'साहित्याच्या बदलत्या दिशा', 'महिलांचे राजकीय आरक्षण' अशा काही विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली गेली. महिलांची प्रचंड उपस्थिती लाभली. कवी कट्ट्यावर दोन दिवस महिलांनी स्त्रीजीवनातील अस्पर्श विषयांवरही आपल्या कविता सादर केल्या.

कोमसापने लेखकांना सतत कार्यरत ठेवण्यासाठी काही खास उपक्रम आयोजिले आहेत. 'झपूर्झा' हे त्रैमासिक कोमसापचे मुखपत्रच आहे. नमिता कीर आणि कवी दत्तात्रय सैतावडेकर हे संपादक म्हणून काम करत आहेत. 'झपुर्झा'मधे सभासद लेखक सातत्याने कविता, कथा व लेख लिहीत असतात. १९९५ ते २०१५ या काळात प्रसिद्ध झालेल्या निवडक लेखांचे संकलन नमिता कीर यांनी संपादिका या नात्याने प्रसिद्ध केले.


गेली २५ वर्ष कोकण मराठी साहित्य परिषद वाङ्मय पुरस्कारही जाहीर करत आहे. उत्तम लेखक समोर यावेत, त्यांचे साहित्य वाचले जावे यासाठी हा गुणांचे कौतुक करण्याचा सोहळा असतो. आत्मचरित्र, नाटक, एकांकिका, कादंबरी, एवढेच नव्हे तर वैचारिक साहित्यासाठी संकीर्णवाङ्मयासाठीही पुरस्कार दिले जातात. त्यामुळे नवे नवे लेखक दरवर्षी प्रकाशात येतात. 'कविता राजधानी' हा मोठा पुरस्कार साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या कवीला दिले जातो. आजपर्यंत कवी महेश केळुसकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, नीरजा, अनिल कांबळी, सौमित्र अशा अनेक मान्यवर कवींना या पुरस्काराने गौरविले गेले आहे. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या कवी संमेलनात या कवींची मैफल नेहमीच रंगत असते. तसेच कोकणातून साहित्यक्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या लेखकाला 'कोकण साहित्य भूषण' हा पुरस्कार दिला जातो. महाड शाखेतील दोन साहित्यिकांना हा मानाचा पुरस्कार मिळाला होता.

ठाणे शहरात कोमसापाची शाखा प्रा. अशोक चिटणीस यांनी स्थापन केली. तेरा वर्षे ते अध्यक्ष होते. त्यांनी विद्यार्थ्यांनाही वेगवेगळ्या उपक्रमातर्फे साहित्याची ओळख करून दिली. त्यानंतर काही वर्षांनी मी ठाणे शहर अध्यक्ष झाले. सहा वर्षांच्या माझ्या कारकिर्दीत मी अनेक साहित्यिक उपक्रम राबवले. त्यात दोन लेखन उपक्रम होते. प्रसिद्ध अशा कथासंग्रह व कादंबऱ्यांवर सभासदांकडून परीक्षणं लिहून घेऊन त्याचे संकलन 'पुस्तकांवर बोलू काही' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केले. या उपक्रमात ५२ लेखकांनी ८० पुस्तकांची परीक्षणे लिहिली. या पुस्तकाला कोमसापचा संकीर्ण वाङ्मयाचा २०२२ चा अरुण नेरूरकर स्मृतीपुरस्कार मिळाला. तसेच मधु मंगेश कर्णिक यांच्या कथासंग्रह, कादंबरी व कविता संग्रह यांवर आस्वादात्मक लेख लिहून त्याचे संकलन 'मधुबन' या नावाने प्रसिद्ध केले. यात ४५ लेखकांनी भाग घेतला आणि मी संपादक म्हणून काम केले. 'मधुबन' या शीर्षकांनी प्रसिद्ध झालेला हा ग्रंथ 'उद्वेली प्रकाशन'च्या साहाय्याने आम्ही सभासदांनी मधुभाईंच्या ९०व्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित केला. या ग्रंथाचे प्रकाशन सुप्रसिद्ध लेखक प्रवीण दवणे यांचे हस्ते झाले. त्या कार्यक्रमाला मधु मंगेश कर्णिक स्वतः आणि नमिता कीर, प्रदीप ढवळ आणि कोमसापचे सभासद असलेले 'उद्वेली'चे विवेक मेहत्रे यांची उपस्थिती लाभली. लेखकांची तिसरी पिढी कार्यरत झाली आहे. आता नातवंडे लिहू लागली आहेत असा उल्लेख मधुभाईंनी आपल्या मनोगतात केला.

कोमसापचा प्रवास सुरूच राहील. आज एकूण पन्नास ते साठ शाखा कार्यरत आहेत. रायगड जिल्ह्यात जास्तीत जास्त शाखा आहेत. कोकणातून नवे नवे लेखक महाराष्ट्राला मिळतील. नवी मूल्ये, नव्या संकल्पना येतील. समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जातील. भाईंचे स्वप्न पूर्ण करायला आम्ही सगळे सतत झटत राहू.



अभ्यंग
सिद्ध धूप
परिजातक
जोशी सुगंधी
सत्यनारायण पूजा साहित्य
गणपती पूजा साहित्य
अष्टगंध
जोशी सुगंधी : उदबत्ती, अष्टगंध, धुपकांडी, कापूर, भिमसेनी कापूर, हळद, कुंकू, गुलाल, बुक्का, शेंदूर, शाही स्नान, रांगोळी, सुगंधी वाती, फुलवाती, समई वाती, अखंड वात, गंधगोळी, गुलाबपाणी, चंदन पावडर, अत्तर, जानवीजोड, रांगोळी छाप, केशरी उटणे, उटणे मसाला, सुवासिक मसाला केश तेल, आवळेल तेल, अभ्यंग गिफ्ट पॅक
पुण्यातील १२५ वर्षाहून अधिक समर्थ परंपरा असलेल्या गोविंद दाजी जोशी उर्फ लडके सुंगधी पुणे यांची वैशिष्ट्यपुर्ण उत्पादने व पुजा सामग्री आता ठाण्यातही उपलब्ध
पत्ता : लक्ष्मी निवास, घंटाळी पथ, लॉरेन्स अँड मेयो समोर, नौपाडा, ठाणे (पश्चिम).
संपर्क : सौ. निलाक्षी जोशी, मो. ९८२०१२०८८४ / ९९३००११७१५
दुकानाची वेळ : स १० ते २ वाजेपर्यंत व सा. ४.३० ते ८.३० वाजेपर्यंत



# कोकण कलावंतांची खाण

**प्रा. प्रदीप ढवळ**

कलावंतांशी तुलना करताना आम्हा राजकारणी लोकांचे जीवन हे अगदी सामान्य आहे. आपल्या लोकांचे जीवन थोडेफार अधिक सुखकारक करण्याचे काम आम्ही करत आहोत. अशा विश्वासापोटी काळाच्या वाळूर आम्ही आमची नावे कोरण्याचा व्यर्थ प्रयत्न करतो, पण त्यात काही अर्थ नाही. कलाकार, संगीतकार, कवी, लेखक हेच केवळ अजरामर राहतात.

कोकणातील वेंगुर्ले येथे गोरगरिबांविषयी, समाजाविषयी आणि देशाविषयी आत्मियता असणारे बॅ. नाथ पै यांचे जन्मशताब्दी वर्ष. सर्वगुणसंपन्न भाषाप्रभू, अतिशय हुशार, अंगी ज्ञानलालसा असल्यामुळे उत्कृष्ट वक्तृत्वकला आणि चिकित्सक अभ्यासवृत्तीचे संसदपटू म्हणून ज्यांचा कोकणच नव्हे, तर उभ्या देशाला अभिमान वाटणारे नाथ पै म्हणजे कोकणातील सुसंस्कृत राजकारणी.

पु. ल. देशपांडे यांनी ज्याचे वर्णन करताना म्हटले होते. ते म्हणजे, 'बुद्धिवंतांतील प्रतिभावंत आणि जनतेतील सर्वसामान्य' देशाचा अमृत महोत्सव साजरा होत असताना अशा प्रतिभावंत आणि जनतेतील सर्वसामान्य' देशाचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना अशा प्रतिभावंतांची आठवण आजच्या पिढीला करून देणे ही काळाची गरज आहे. या देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी अनेकांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. किती काळ जगण्यापेक्षा कसं जगावं हे ज्या कर्तृत्वात मंडळीने आपल्याला शिकवले त्यापैकी बॅ. नाथ पै हे एक होते.

प्रत्येकाने प्रथम अंतर्मुख व्हावे. आत्मनिरीक्षण करावे. आपल्या गुणदोषांसह व मर्यादांनिशी स्वतः ला जाणून घ्यावे व स्वरूपाचा स्वीकार करावा, मग आपल्या ठायी असणाऱ्या क्षमतांचे परिणत रूप कल्पनेने जाणून घ्यावे व त्यांच्या संवर्धनाचा निश्चय करावा. एकदा का परिवर्तनाचा आलेख निश्चित झाला म्हणजे आत्मविकासाची वाटचाल होत राहील. या वाटेने जो जो चालत राहावे तो तो प्रत्येक पुढचा टप्पा मागे पडत जाईल. आपल्या गुणवत्तेची स्थानके मागे टाकत पुढे जात राहणे हाच आपला धर्म हेच आपले जीवन. ज्या ज्या मंडळींने स्वीकारले त्यात एक नाव अनेक वर्षे कोकण कधीही विसरू शकणार नाही ते बॅ. नाथ पै... त्यामुळे त्यांच्या स्मृती जिवंत करण्याचा हा थोडासा प्रयत्न.

२५ सप्टेंबर १९२२ वेंगुर्ल्यातील गावी त्यांचा जन्म झाला. असाधारण बुद्धिमत्ता, मंत्रमुग्ध करणारे त्यांचे वक्तृत्व आणि अथक परिश्रम करणारे हे सातवे आपत्य पंढरीनाथ सर्वसाधारण कुटुंबात बापू आणि अन्नपूर्णा (तापी बाई) या दाम्पत्यापोटी जन्माला आले.

वेंगुर्ल्याला अप्रतिम सृष्टीसौंदर्य आणि नैसर्गिक साधनाचे वरदान लाभलेले पण अतीव दारिद्र्याचा शापही मिळाला होता. बहुतेकांची गुजराण शेती किंवा मासेमारी. त्याकाळी फारच थोड्यांच्या मालकीच्या आबा, काजूच्या बागा असत.

नाथांचे वडील त्याकाळचे सुशिक्षित, मुंबईच्या विल्सन कॉलेजचे बी.ए. पदवीधर. काही काळ पोस्ट मास्तर. पण पुढे वेंगुर्ल्यातच अमेरिकन मिशन स्कूलमध्ये इंग्रजीचे शिक्षक झाले.

पण पुढे त्यांच्या जीवनाची संथ लय एक दिवस बिघडली. एकदा बापू एका गुंतागुंतीच्या खटल्यात कोर्टात खोटं बोलण्याऐवजी खरं बोलण्यामुळे कुटुंबाला हालाखीचे दिवस वाट्याला आले. बापूंना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. सगळंच कुटुंब निराधार झाले. पण नाथांच्या आईने आपल्या आठही मुलांचे पालनपोषण केले कधीही कोणाकडे आर्थिक मदत मागितली नाही. भीषण दारिद्र्याचा सामना कसा करायचा हे नाथ आपल्या आईकडून शिकले.

नाथांचे बालपण रम्य निसर्गात दारिद्र्यात पण आनंदाने व्यतीत झाले. हिरवाई मिरवणाऱ्या डोंगररांगांनी वेढलेल्या आंबे, काजू आणि नारळाच्या बागा. स्वच्छ समुद्रकिनारे आणि निळ्याशार लाटा अंगावर झेलत नाथ मोठे होत होते. दूर क्षितिजांपर्यंत पसरलेला विशाल सागर हा छोटा मुलगा तासन् तास पहात, क्षितिजापलीकडे असलेल्या अज्ञात प्रदेशाची स्वप्ने तो पहात लोककथा, कथाकादंबऱ्या, पुराणकथा इतकेच काय धार्मिक आणि इतिहासाची पुस्तके तो वाचून फडशा पाडत असे.

सृष्टिसौंदर्याच्या आड सगळेच कोंकण अठराविश्वे दारिद्र्य, अपमृत्यू आणि अत्यंत अपुऱ्या वैद्यकीय सुविधा अशा अनेक असह्य गोष्टींनी ग्रासले होते. नोकरीच्या संधी जवळ जवळ नाहीच. त्यामुळे पै कुटुंब हलाखीत जगत होते. काहीतरी केले पाहिजे हा विचार थोरला भाऊ अनंत (अण्णा) याने वेंगुर्ला सोडायचे ठरवले आणि बेळगावकडे कुटुंबासह जाण्याचे ठरविले. आयुष्याला नवी सुरुवात झाली. बेळगाव हे गजबजलेले बाजारपेठेचे शहर. पै कुटुंब तेथे स्थिरावले. किराणा मालाच्या दुकानात चार पैसे मिळायला लागले. कुटुंबाला चांगले दिवस आले.

नाथांचे वेंगुर्ल्यातले ते जुने परिचित जीवन भूतकाळात जमा झाले. त्यांनी बेळगावच्या स्थिथ हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. 'नित्य नवा दीस जागृतीचा' अनुभवत पुढचा प्रवास सुरू केला. आपण गतिमान

असावे व प्रगतिपथावर राहावे या अपेक्षेने त्यांनी आपल्या जीवनाकडे पहायला सुरुवात केली. त्यांना नव्याच रोमहर्षक दुनियेचा शोध लागला. इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच, इंग्लिश साहित्य याचं नाथांच्या आवडीच्या जागा झाल्या. 'वाचनालय जणू एन धगधगती भट्टी बनली आणि पुस्तके तिच्या घडवित्या ज्वाळा' नाथांच्या मनाला योग्य आकार मिळत होता. निबंध लेखन, वक्तृत्व, वादविवाद यात नाथ कायम पुढे असत.

मॅट्रिक परीक्षा पास झाल्यावर, पुढील शिक्षण बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांनी सुरू केलेल्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये करायचे त्यांनी ठरविले. त्याच सुमारास बेळगावातील गोविंदराव याळगी व त्यांच्या पत्नी यांनी सत्याग्रह चलवळीचे आयोजन केले होते. ब्रिटिशविरोधी चळवळ जोरात सुरू होती. आपणही या चळवळीत सहभाग घ्यायचा ही उर्मीदेखील त्यांची प्रज्वलित होत होती.

पुण्यातील कॉलेजात वक्तृत्व स्पर्धेत आपली निवड झालीच पाहिजे हा हट्टच त्यांनी आपल्यापेक्षा १९ वर्षे सिनियर असलेल्या ग. प्र. प्रधान यांच्याकडे व्यक्त करून गोखले करंडक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. बेळगावातून आलेल्या शिडशिडीत शरीरयष्टीचा उंच तरुण, डोळ्यात भरावे असे रूप नसलेला, रूंद भुवया, कुरळ्या केसांचा तीक्ष्ण, चमकदार डोळ्यांचा, परंतु व्यक्तिमत्त्वात काहिसे अजब वेगळेपण दिसणारा हा तरुण लोकांच्या नजरेत भरला.

तीक्ष्ण आणि अलौकिक स्मरणशक्ती लाभलेला हा तरुण साहित्य, नाट्य, कविता, कादंबऱ्या, वक्तृत्व या सगळ्याच क्षेत्रात मुशाफिरी करू लागला. राजकारणात गेले नसते, तर नक्कीच एक उत्तम नाटककार, साहित्यिक झाले असते. राजकारण हे त्यांच्या वाट्याला योगायोगाने आले. कोकणात असताना त्यांनी कोकणातील अनेक कला जपल्या. त्यांचा अभ्यास केला होता. बेळगावात एकदा बाळ कोल्हटकरांच्या 'वाहतो ही दुर्वांची जोडी' या नाटकाचा प्रयोग होता. प्रयोग संपला होता. नाथ नाटकाला आलेले पाहुणे प्रेक्षक जागीच थांबले. खरं तर त्यावेळी नाथ चळवळीचे कार्यकर्ते म्हणून नावारूपाला आले होते. आईला भेटण्यासाठी म्हणून ते आले होते. पण उपजत ते साहित्यिक-नाटकवेडे असल्यामुळे प्रयोग संपल्यावर लेखकाला, कलावंतांना भेटत. त्यांचे कौतूक करत असत. आयोजकांना जेव्हा कळले नाथ नाटकाचा प्रयोगाला बसले आहेत. त्यांनी बाळ कोल्हटकरांना सांगितले. त्यांना खूप आनंद झाला. म्हणाले, 'प्रयोग संपलाकी पडदा टाकू नका. नाथांना रंगमंचावर बोलवा. त्यांचा सन्मान करा व दोन शब्द बोलायला सांगा.' नाटकाने लोकांच्या हृदयाला हात घातला होता. एरवी स्थिरचित्र असणाऱ्या नाथांनाही भावनावेग अनावर झाला होता.

रंगमंचावर बोलावताच ते गेले आणि म्हणाले, 'कोल्हटकरांविषयी मी काही बोलावे, तो अधिकार माझा नाही. मी काही लेखक नाही. मी मराठी नाटकांचा केवळ एक प्रेक्षक आहे. आपली मराठी नाटके निव्वळ मनोरंजन करत नाहीत. ती प्रेक्षकांना विविध जाण देतात, शिकवतात आणि त्याचे लक्ष समकालीन संवेदनशील विषयांकडे वेधतात. कोकण काय किंवा हे बेळगाव काय, ही मराठी नाटकांची जन्मभूमी. अण्णासाहेब किर्लोस्करांनी बेळगावला मराठी नाटक नावारूपाला आणण्यासाठी केलेले प्रयत्न एकूणच समाजाच्या विकासात कला आणि संस्कृती यांचे महत्त्व नाकारता येणार नाही.'

कलावंतांशी तुलना करताना आम्हा राजकारणी लोकांचे जीवन हे अगदी सामान्य आहे. आपल्या लोकांचे जीवन थोडेफार अधिक सुखकारक करण्याचे काम आम्ही करत आहोत. अशा विश्वासापोटी काळाच्या वाळूर आम्ही आमची नावे कोरण्याचा व्यर्थ प्रयत्न करतो, पण त्यात काही अर्थ नाही. कलाकार, संगीतकार, कवी, लेखक हेच केवळ अजरामर राहतात. ज्याप्रमाणे अकबराच्या दरबारातल्या प्रमुख दरबाऱ्यांची नावे फारशी कुणाला आठवत नाहीत. पण तानसेनचे नाव ऐकले नाही असा माणूस या देशात सापडणार नाही. विक्रमादित्याचा प्रधान विसरला गेलाय, पण कालिदास आपल्या हृदयात कायमचा बसलेला आहे.

नाथ पै कोकणचे, महाराष्ट्राचे नव्हे, तर देशाचे एक अद्वितीय लेणे होते. भारतीय लोकशाहीचे संवर्धन आणि संगोपन आदर्श पद्धतीने व्हावे. हा त्यांचा ध्यास होता. संघर्ष हा त्यांचा स्थायीभाव होता. पण सघर्षातून समन्वय आणि अंतिमतः भारताचा सर्वांगीण विकास हेच त्याचे स्वप्न होते. आणि म्हणूनच विरोधक असले तरी संसदपटू म्हणून ते पंडित जवाहरलाल नेहरूंनाते आदर्श वाटत होते. दुर्दैवाने त्यांना अल्पायुष्य लाभले.

आज आपण देशाचा अमृत महोत्सव साजरा करतो आहोत. पण ज्या ज्या मंडळींनी या देशासाठी दिलेले योगदान कधीच विसरता कामा नये. प्रा. मधु

दंडवते म्हणत नाथ ज्यावेळी बोलत त्या त्यावेळी आमच्या मनातील अंतरीच्या तारा छेडल्या जात. त्यांच्या विचारांचा प्रवाह त्यांच्या बुद्धीतून प्रकटे. परंतु त्याच्या भावनांचा प्रवाह त्यांच्या हृदयातून आलेला असे. अशा या राजकारणाच्या धकाधकीतही कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक यांच्या सारखे मित्र जपून आपली संवेदनशीलता अबाधित राखणाऱ्या दुर्मिळ प्रतिभावंताला कोकण विसरत चालले आहे की काय? अशी शंका मनात येते. पण निराश होऊन चालणार नाही. ज्या नाथांनी कधीही हार मानली नाही.

ज्याप्रमाणे अभ्यासाशिवाय नुसती आरती लाभदायक ठरत नाही. हेजरी खरे असले तरी अभ्यास हीच विद्येची आरती मानली तर सरस्वती प्रसन्न झाल्याशिवाय राहणार नाही. हे ज्यांनी सिद्ध केले ते नाथ सर्वसामान्य लोकांना सांगते. सध्या मंदिरांची संख्या वाढते आहे, पण देव जागेवर नाही. गावोगावच्या महाराजांची मठ संख्या वाढत आहे व त्यातून अंधश्रद्धेच्या नव्या पाठशाळा चालविल्या जात आहेत. ही परिस्तिती निवळण्याचा मार्ग एक आहे. शुद्ध बुद्धीने वागावे, मुखवट्याशिवाय जगावे, अंधश्रद्धा नसावी, पण श्रद्धा असावी, देव पाठीशी असावा, देश नजरेसमोर दिसावा. मुखी सर्वकल्याणाचे गाणे गावे आणि ध्यानी पसायदान असावे.


**व्यास दीपोत्सव २०२२**


**मोहनी ओजाळे**

**यांसकडून**

**दिपावलीच्या शुभेच्छा!**







विंदा करंदीकर


आरती प्रभू


श्री. ना. पेंडसे


रत्नाकर मतकरी



वसंत सावंत


वीणा गवाणकर


पद्मश्री मधू मंगेश कर्णिक


माधव कोंडविलकर


मंगेश पाडगावकर


रविंद्र पिंगे

# कोकणातल्या निवडक साहित्यिकांचा संक्षिप्त परिचय

**रामदास खरे**

कोकणभूमीला देदीप्यमान इतिहासाची परंपरा लाभली आहे. या भूमीत जसे शिल्पकार, चित्रकार, संगीतकार घडले तसेच या कोकणावर विलक्षण प्रेम करणारे, कोकणातल्या मातीचा सुगंध कागदावर उमटवणारे प्रतिभाशाली लेखक,कवी, नाटककार यांनीही कोकणाचे नाव दशदिशात नेले. कोकणातील साहित्यिकरत्ने इतकी प्रतिभावंत की अवघ्या साहित्य विश्वाच्या अवकाशात त्यांची स्थाने आढळ झाली. त्यांचा प्रकाश आजही नव साहित्यिकांना मार्गदर्शनपर ठरतो.

पूर्वेस पसरलेली सह्याद्रीच्या कणखर डोंगररांगा तर पश्चिमेस विस्तारलेला निळाभोर सिंधुसागर यामध्ये विसावलेला हिरवागार, समृद्ध कोकण प्रांत. या कोकणभूमीला देदीप्यमान इतिहासाची परंपरा लाभली आहे. या भूमीत जसे शिल्पकार, चित्रकार, संगीतकार घडले तसेच या कोकणावर विलक्षण प्रेम करणारे, कोकणातल्या मातीचा सुगंध कागदावर उमटवणारे प्रतिभाशाली लेखक,कवी, नाटककार यांनीही कोकणाचे नाव दशदिशात नेले. या कोकण विशेषांकाच्या निमित्ताने काही निवडक प्रतिभाशाली साहित्यरत्नांचा संक्षिप्त परिचय आम्ही आपणाला करून देणार आहोत. धन्यवाद.

**१. ज्ञानपीठकार विंदा करंदीकर**

***हा रस्ता अटळ आहे!***
***अन्नाशिवाय, कपड्याशिवाय,***
***ज्ञानाशिवाय, मानाशिवाय,***
***कुडकुडणारे हे जीव***
***पाहू नको! डोळे शीव!***
***नको पाहू जिणे भकास;***
***ऐन रात्री होतील भास;***
***छातीमध्ये अडेल श्वास.***
***विसर यांना, दाब कढ;***
***माझ्या मना बन दगड!***

गोविंद विनायक करंदीकर. म्हणजेच कविता, समीक्षा, अनुवाद लघुनिबंध अश्या विविध क्षेत्रामध्ये स्वच्छंद विहार करणारे तुमचे, आमचे ज्ञानपीठ विजेते कवीश्रेष्ठ विंदा करंदीकर. ही कविता त्यांनी निसर्गरम्य कोकणात म्हणजेच आपल्या मूळ गावी रत्नागिरीला ४ नोव्हेंबर १९४९ रोजी लिहिली. म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्ती नंतर दोन वर्षांनी लिहिलेली ही कविता. विंदांच्या अनेक सुंदर कवितांपेक्षा मला प्रचंड भावलेली आणि अस्वस्थ करणारी ही कविता.

तसे पाहिल्यावर ही कविता तशी उपेक्षितच. पण उपेक्षितांना अटळ असणाऱ्या जीवनमार्गावरून माणूस म्हणून चालण्याची प्रेरणा ही कविता प्रत्येकाला देते. माझ्या मना बन दगड, हा टाहो आहे. ज्वालामुखीपासून बनलेल्या या दगडाला प्रचंड उद्रेकाचे पाठबळ आहे. आजच्या आधुनिक काळात, जिथे संस्कृतीचे आणि माणसाच्या एकूण जगण्यामरण्याचे संदर्भ बदलले आहेत अश्या कोलाहलात आणि महानगरीय कल्लोळात विंदांची ही कविता मला महत्त्वाची वाटते.

विंदांची कविता म्हणजे एक अजब रसायन आहे. त्यांच्या कवितेचे वेगळेपण, अंगभूत सामर्थ्य, त्यांच्या प्रतिभेची झेप वाचकाला अंतर्मुख करते, झपाटून टाकते. अनेकांना विंदांची कविता म्हणजे एक शक्तिकेंद्र असल्यासारखे भासते. सर्वात महत्वाचे म्हणजे विंदांची कविता वाचकाला सांस्कृतिक समस्यांची तीव्र जाणीव करून देते. त्यासाठी विंदांच्या कवितेची भाषा आपल्याला शिकावी लागते. त्यांच्या अनेक कविता वाचल्यावर त्याच्या कवितेच्या गर्भातून कधीकधी ब्राह्मणी कोकणी बोली, कधी संस्कृतवाणी,

कधी महानगरीय कल्लोळ, तर कधी संतकवींच्या प्रभावी ओवींचा तेजाळ, अध्यात्मिक प्रकाश पाझरतो, आणि आपण अवाक होतो. मर्ढेकर आणि रेगे यांच्या कवितांची परंपरा विंदानी खूप परिश्रमाने आणि अभ्यासाने सांभाळली आहे.

ज्ञानपीठकार विंदांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८ रोजी कोकणातल्या सिंधुदुर्गातील धालवली या गावी झाला. विंदांनी आपल्या कवितेला कुठल्याही ठराविक, पारंपारिक कुंपणात, प्रवाहात अथवा कोंदणात डांबून ठेवली नाही. अर्वाचीन विज्ञान, तत्वज्ञान, संत साहित्य, भारतीय विद्या, ते अगदी थेट Advance Technology. इत्यादी अनेक विषयाची क्षितिजे. विंदांच्या कवितेला काहीही व्यर्ज नाही! एकाचवेळी निखळ सौंदर्य आणि चक्रावून टाकणारं नागडं वास्तव त्याच्या अनेक कवितेतून आपणास सापडतं. विंदांच्या जातिवंत, अस्सल कविता अनेक समीक्षकांना खुणाऊ लागल्या. डॉ. विजय राजाध्यक्ष यांनी विंदांच्या समग्र साहित्याचे परिशीलन चक्क दोन खंडांत केले आहे. बहुपेडी विंदा हा तो महान ग्रंथ. विंदांना २००३ मध्ये ज्ञानपीठ या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले.

१४ मार्च २०१० रोजी विंदा हे जग सोडून गेले. आयुष्यभर विंदांनी कवितांच्या माध्यमातून विमुक्तपणा, संयम, गांभीर्य आणि प्रबोधन विचारांचा वारसा दिला. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे नाव अजरामर झाले.

**२. श्री. ना. पेंडसे**

निसर्गरम्य कोकणाची पार्श्वभूमी. त्या तांबड्या मातीत जन्म घेतलेल्या अनेक व्यक्तीरेखा, त्यांचे

आगळेवेगळे विक्षिप्त स्वभावधर्म, तेथील चालीरीती, नातीगोती, देवदेवस्की, दारिद्र्याचे अनेक दशावतार हे सारं सारं एखाद्या निष्णात चित्रकारानं नेमकं टिपावं तस्संच कागदावर अभिजात शब्दांच्या साहाय्याने ते चित्र जिवंत करणाऱ्या पक्क्या कोकणी स्वभावाचे

आणि त्याच लालमातीच्या मुशीत घडलेले थोर साहित्यिक श्री. ना. पेंडसे यांना मानाचा मुजरा. दापोलीच्या परिसरात गवसलेली गारंबीचा बापू ही एक अजरामर कलाकृती श्री ना पेंडसे यांनी आपल्या लेखणीतून प्रसवली. ही कादंबरी प्रचंड गाजली. नंतर याच कादंबरीचे रूपांतर प्रथम नाटकात नंतर चित्रपटात झाले. नाटक आणि चित्रपट दोन्ही गाजले. गारंबीचा बापू प्रमाणेच कोकणच्या पार्श्वभूमीवरच्या एल्गार, हद्दपार, यशोदा, रथचक्र आणि हत्या साहित्यकृतींमधल्या अनेक व्यक्तिरेखा आणि त्यातलं नाट्य वाचक रसिकांना भावलं. कादंबरी ही अखेरपर्यंत 'माणसांची कथा'च राहिली पाहिजे यावर पेंडसे यांचा कटाक्ष असे. त्याच्याशी ते अखेरपर्यंत प्रामाणिक राहिले.

श्रीपाद नारायण पेंडसे (श्रीना) यांचा जन्म ५ जानेवारी १९१३ चा. कोकणातील दापोली तालुक्यातील निसर्गसंपन्न अशा मुर्डी या खेडेगावात झाला. निसर्गाचे आणि तेथील कोकणी माणसाचे अवलोकन श्रींना पुढे लेखनामध्ये उपयोगी पडले. मुंबईत आल्यावर काहीवर्षे त्यांनी बेस्ट मध्ये नोकरी देखील केली. त्यांच्या अनेक पुस्तकांचे हिंदी, गुजराथी, इंग्रजी भाषांमध्ये अनुवाद झाले. अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. १९६३ मध्ये त्यांच्या 'रथचक्र' या कादंबरीला 'साहित्य अकादमी' पुरस्कार लाभला. २००१ मध्ये कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांचा प्रतिष्ठेचा जनस्थान पुरस्कार श्रीनांना लाभला.

आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत फक्त लेखनाचा विचार करणारे श्रीना नवीन लेखकमंडळींना नेहमी आवर्जून सांगत. लेखन संस्कृती ही नेहमी उच्च आहे; पण मनाचे 'माती'शी असलेले नाते त्यांनी कधीही तोडू नये. अस्सल कला फक्त स्वतःच्या मातीतूनच वर येते. श्रीनांनी ते खरे करून दाखवले. २४ मार्च २००७. कोकणातल्या अनेक व्यक्तिरेखांवर, मातीवर, निसर्गावर मनस्वी, पुत्रवत प्रेम करणारे श्री. ना. पेंडसे अवघ्या गारंबीला पोरके करून एका महाप्रवासास कायमचे निघून गेले.

**३. चिं त्र्यं खानोलकर (आरती प्रभू)**

चिं. त्र्यं. खानोलकर. तळकोकणातल्या लालसर मातीने मराठी साहित्य सृष्टीला दिलेली एक शापित, अलौकिक देणगी. शापित या अर्थाने म्हटले वयाच्या अवघ्या सेहेचाळीसाव्या वर्षी दुर्धर आजाराने त्यांचे निधन झाले. आज ते हयात असते तर मराठी साहित्य सृष्टीला नवंप्रतिभेची झळाळी नक्कीच लाभली असते. परंतु आपल्या मराठी साहित्याचे दुर्दैव.

खानोलकरांचा जन्म ८ मार्च १९३० रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील बागलांची राई, तेंडोली येथे झाला. चिंतामण त्र्यंबक खानोलकरांच्या आईंना एकूण अकरा अपत्ये झाली. त्र्यंबक हे सहावे अपत्य. मात्र काहीकारणांनी त्र्यंबक यांचा जन्म होऊ नये आणि तो गर्भ आतच नष्ट व्हावा म्हणून कुठलीशी जंगली मुळी उगाळून त्यांच्या आईला देण्यात आली होती. तो भयंकर प्रयोग त्यावेळी झाला होता. तरीही... तरीही.. त्याही परिस्थितीतकोणालाच नको असणाऱ्या त्र्यंबक यांचा जन्म झाला. पुढे खानोलकरांनी ही गोष्ट कळल्यावर त्यांच्या मनावर विलक्षण आघात झाला. ती वेदना, ते दुःख खानोलकरांनी आपल्या विविध प्रकारच्या साहित्यकृतींमध्ये चक्रावून टाकणाऱ्या वेगळ्या शैलीत प्रसवले. कविता, कथा, दीर्घ कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, संपादन, स्फुटलेखन या वेगवेगळ्या फॉर्ममध्ये खानोलकर व्यक्त होऊ लागले. ते व्यक्त होणं इतकं विलक्षण होतं की मनात साठलेलं कागदावर उतरवल्या खेरीज त्यांना शांती लाभायची नाही. उत्कट प्रतिभेने जणू ते पछाडलेले होते. महत्त्वाचे म्हणजे जे जे त्यांच्या लेखणीतून बाहेर येत होतं ते सारंच सकस होतं, खूप वेगळं होतं, अभिजात होतं.इतर लेखकांच्या पेक्षा खानोलकरांचे अनुभवविश्व खूप वेगळं होतं. जन्म-मृत्यूतली गूढता, माणसांमधली शारीरिक आणि मानसिक विकृती, अतृप्तता, हिंस्रभाव, बुरसटलेलं, खंगलेलं आणि उद्ध्वस्त झालेलं व्यावहारिक जीवन, नियतीचे अदृश्य फटकारे, एकटेपणा, निसर्गातल्या चित्रविचित्र कल्पना, अनुभूती, उद्रेक, आकस, लैंगिकता असं काहीसं विलक्षण थकवणाऱ्या प्रतिमा खानोकरांच्या साहित्यकृतीतून वाचकाला दिसायच्या. खानोलकरांचे वास्तव्य तळकोकणातले. तिथला रसरशीत, जिवंत

आणि प्रत्ययकारी निसर्ग त्यांच्या कवितांमधून देखील कधी डोकवायचा. खानोलकर हे 'आरती प्रभू' या टोपणनावाने कविता लेखन करीत असत. लक्षणीय कलाकृती : 'नक्षत्रांचे देणे', 'दिवेलागण', 'सनई', 'रात्र काळी घागर काळी', 'गणुराया आणि चानी', 'कोंडुरा', 'अगोचर', 'अजगर', 'एक शून्य बाजीराव', 'सगेसोयरे', 'कालाय तस्मै नमः', 'अजब न्याय वर्तुळाचा' इत्यादी.

खानोलकरांच्या साहित्यकृतींची दखल अनेक समीक्षकांनी घेतली. काहींच्या मते खानोलकर हे या पृथ्वी ग्रहावरचे वाटतच नाहीत. ते कुठल्याशा परग्रहावरचे भासतात. कारण इतका विलक्षण प्रतिभेचा माणूस या पृथ्वीवर जन्मणे अशक्य वाटते. माझ्या शालेय आणि पुढे महाविद्यालयीन जीवनात आरती प्रभूंच्या अनेक कविता वाचण्यात आल्या. पुढे त्यांची सुंदर गीतेही झाली. पं. हृदयनाथ मंगेशकरांनी अतिशय जाणीवपूर्वक आरतीच्या कवितांना उत्तम चाली लावल्या, त्या जनसामन्यांपर्यंत पोहोचल्या. पुढे तर खानोलकरांचे साहित्य वाचताना माझी अवस्था 'आलो होतो हासत मी काही श्वासांसाठी फक्त, दिवसांचे ओझे आता रात्र रात्र शोषी रक्त'; अशी व्हायची. कविता, कथा, कादंबरी, एकांकिका, नाटक अशा सर्व साहित्यप्रकारावर खानोलकरांनी जबरदस्त हुकूमत होती. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आणि इतक्या अल्पवयात खानोलकरांनी हे झपाटून टाकणारं साहित्य सातत्यानं कसं लिहिलं असेल याचे वाचकाला आश्चर्य वाटते.

खानोलकर सतत कुठल्यान कुठल्या विचारात असायचे. त्यांच्या मनात सतत लेखनाचा विचार सुरू असायचा. कुठलाही हासभास नसताना यकृताच्या विकाराने ते अचानक आजारी पडले, इस्पितळात दाखलही झाले, आणि शेवटी सर्वांना चटका लावून २६ एप्रिल १९७६ (मुंबई) रोजी हा शापित गंधर्व म्हणजेच चिं त्र्यं खानोलकर हे मराठी साहित्य सृष्टीला अक्षरशः पोरके करून गेले. मृत्यूपूर्वी खानोलकरांनी लिहिलेल्या त्या अखेरच्या कवितेचे शब्द असे होते.

***अखेरच्या वळणावर यावा***
***मंद सुगंधी असा फुलोरा***
***थकले पाऊल सहज उठावे***
***आणि सरावा प्रवास सारा***

**४. मधू मंगेश कर्णिक**

कथा, कविता, कादंबरी, नाटक, एकांकिका, प्रवासवर्णन, ललित लेखन, व्यक्तिचित्रे अशा सर्व साहित्य प्रकारात मुशाफिरी करणारे, कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधू मंगेश कर्णिक यांचा जन्म २८ एप्रिल १९३१ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली जवळच्या करूळ या गावी झाला. तळकोकणातल्या निसर्गाचे, संस्कृती-परंपरेचे, लोकजीवनाचे आणि तिथल्या परिसरात रुजलेल्या माणसांचे प्रभावी चित्रण मधुभाईंनी आपल्या लेखनात रेखाटले. मधुभाईंना त्यांच्या आजोबांकडून लेखन वारसा लाभला. दुर्दैवाने आईवडिलांचे छत्र मधुभाईंना फार काळ लाभले नाही. पुढे शालेय जीवनात मधुभाईंच्या लेखनाला धुमारे फुटू लागले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण कणकवली येथे पूर्ण झाले. घरची एकूण परिस्थिती बघता मधुभाई लगेच नोकरी शोधू लागले आणि एस.टी मध्ये रायटर म्हणून रुजू झाले. या प्रवासात अनेक व्यक्ती, लेखक, कवी जवळून बघता आले. अनेक संस्थांचा परिचय झाला. पुढे गोवा सरकारच्या प्रसिद्धी खात्यात माहिती अधिकारी आणि नंतर महाराष्ट्र शासनाच्या जनसंपर्काधिकारी म्हणूनही काम पाहिले. काही काळ ते मुख्यमंत्र्यांचे प्रसिद्धी अधिकारी होते. असा दमदार प्रवास करीत आणि जबाबदारीची पदे भूषवून मधुभाईंनी १९८३ मध्ये नोकरीला कायमचा रामराम ठोकून पूर्णवेळ लेखन कार्याला आणि साहित्यिक उपक्रमांना स्वतःला वाहून घेतले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष झाले. निवृत्तीनंतर आपल्या गावी करूळ पंचक्रोशी शिक्षण प्रसार मंडळ आणि ज्ञानप्रबोधिनी हायस्कुल सुरु केले तसेच गावातच एक काच कारखाना देखील काढला. कोकणावरचे प्रेम, साहित्यावरची अढळ निष्ठा त्यांना स्वस्थ बसू देत नाही. १९९० मध्ये रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या ६४ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. आज वयाच्या ९१ व्या वर्षी देखील ते सतत कार्यशील असतात. २०२२ मध्ये नुकतीच प्रकाशित झालेली त्यांची बहुचर्चित कादंबरी म्हणजे 'प्राप्तकाल'. या कादंबरीचे लेखन करीत असताना मधुभाईंना करोना या महामारीने ग्रासले मात्र जिद्दीने त्यावर मात करून कादंबरी पूर्ण केली. त्यांच्या जिद्दीला आणि प्रखर इच्छाशक्तीला आमचा सलाम.

विविध महत्वाच्या पुरस्कारांनी मधुभाईंना आजवर गौरवले आहे. मधुभाईंची साहित्य संपदा समृद्ध आहे. काही गाजलेल्या कलाकृती : 'भईचाफा', 'झुंबर', 'सूर्यफूल', 'लामणदिवा', 'देवकी', 'सनद', 'वारूळ', 'निरभ्र', 'कातळ', 'भाकरी आणि फुल', 'कमळण', 'अबीरगुलाल', 'सोबत', 'माझा गाव माझा मुलुख', 'विहंगम', 'गावाकडच्या गजाली', 'झुंबर', 'जैतापूरची बत्ती', 'अर्ध्य', 'जुईली', 'शब्दांनो मागुते व्हा', 'स्मृतीजागर', 'राजा थिबा', 'तारकर्ली', 'संधिकाल' इत्यादी. २०१२ मध्ये प्रकाशित झालेलं 'करुळचा मुलगा' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. मधुभाई आपण शतायुषी व्हा, औक्षवंत व्हा अशा सदिच्छा आम्ही इथे व्यक्त करतो.

**५. वीणा गवाणकर**

'एक होता कार्व्हर' आणि सुप्रसिद्ध लेखिका वीणाताई गवाणकर यांचे अतूट असं नातं आहे. आज महाराष्ट्रातच काय देशभरात कार्व्हर कोणी वाचला नाही असं आढळणारच नाही. अफाट लोकप्रियता लाभलेली ही साहित्यकृती अजरामर झाली. त्याचा इतिहास जाणून घेऊया.

'एक होता कार्व्हर' या विषयाची सुरुवात सहज सांगितलेल्या एका गोष्टीरूपाने झाली. चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. गवाणकर दांपत्य वाचनवेडे. मुंबईच्या फोर्ट परिसरात फिरताना पदपथावर विक्रीस ठेवलेले एक सेकंडहँड इंग्रजी पुस्तक वीणाताईंना दिसले. एका निग्रो शास्त्रज्ञांचे ते चरित्र होते. वीणाताई अक्षरशः त्या पुस्तकाच्या प्रेमातच पडल्या. आपल्या मुलांना निजवताना वीणाताई अनेक गोष्टी सांगत. वीणाताईंनी सांगितलेली या निग्रोची गोष्ट मुलांना प्रचंड आवडली. अनेकांच्या सूचनांमुळे ती गोष्ट त्यांनी डायरीत लिहून काढली. 'माणूस' या १९७९ च्या दिवाळी अंकात कार्व्हरची गोष्ट छापूनही आली. वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभल्यावर त्यावर आणखीन संशोधन करून, संदर्भ संकलित करून त्याचे पुस्तक १९८१ मध्ये प्रकाशित झाले. हे पुस्तक म्हणजे त्या पुस्तकाचा मराठी अनुवाद अजिबात नाही. वीणाताईंनी भारावलेल्या अवस्थेत केलेलं त्या अफाट व्यक्तिमत्वाचं चित्रण आहे. 'न भूतो न भविष्यति' असे भाग्य या पुस्तकाच्या वाट्याला आले. जगभरातून वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. एक होता कार्व्हरची नुकतीच पंचेचाळिसावी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. महत्वाचे म्हणजे थोर विदुषी दुर्गाबाई भागवतांचे देखील याच विषयावर पुस्तक तयार होते. मात्र वीणाताईंचे हे डोंगराएवढं काम पाहिल्यावर त्यांनी आपले पुस्तक मागे घेतले. कार्व्हरला प्रचंड लोकप्रियता लाभली. वीणाताईंचे पुस्तकावरील विलक्षण प्रेम पाहून दुर्गाबाईंनी वीणाताईंना एशियाटिक लायब्ररीची लाईफ मेंबरशीप मिळवून दिली. एका थोर लेखिकेनं वीणाताईंचा केलेला हा एक प्रकारे सन्मानच नव्हे का?

वीणाताईंचा जन्म जरी ( ६ मे १९४३ ) पुण्याजवळील लोणी-काळभोर इथं झाला असला तरी त्यांची कर्मभूमी कोकण भूमी ठरली आहे. वसई येथे आल्यावर वीणाताईंच्या प्रतिभेला खऱ्या अर्थाने बहर फुटू लागला. वडील मूळचे रत्नागिरीचे तर आई मालवणच्या. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी बीएची पदवी संपादन केली. घरामध्ये वाचन लेखनाचा कोणताही वारसा नाही किंवा तसे वातावरण नसताना देखील वीणाताईंना शिक्षकांमुळे वाचनाची आवड लागली. त्यांचं सारं शिक्षण मराठी माध्यमात झालेलं. त्यामुळं इंग्रजी भाषेचा थोडाफार न्यूनगंड होता.

मात्र पुढे ताईंनी इंग्रजी भाषेचा व्यासंग वाढवला. इंग्रजी ग्रंथांचे जाणीवपूर्वक वाचन केले, त्यावर प्रभुत्व मिळवले. याच ओढीनं पुस्तकांचा सहवास लाभावा, चांगले वाचन व्हावे यासाठी पुणे विद्यापीठातून त्यांनी 'ग्रंथपाल' ही पदवी घेतली आणि १९६४ ते १९६८ अशी साडेचार वर्षे मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे 'ग्रंथपाल' म्हणून नोकरी केली. यामुळे देश-विदेशातील उत्तमोत्तम साहित्याचा, ग्रंथांचा परिचय झाला. वीणाताई खऱ्या अर्थाने समृद्ध झाल्या. पुढे लग्न झाल्यावर वीणाताई वसईला आल्या आणि तेथेच कायमच्या स्थायिक झाल्या. गवाणकर हे पेशाने आर्किटेक्ट. खासगी प्रॅक्टिस. मात्र त्यांनाही वाचनाची प्रचंड आवड. वीणाताईंना वाचन-लेखनाव्यतिरिक्त शास्त्रीय संगीत ऐकण्याची आवड तसेच नाटक चित्रपट पाहण्याची देखील आवड आहे. १९७६-७७ च्या सुमारास मुंबईच्या फोर्ट विभागात पुस्तकांसाठी फिरताना त्यांच्या नजरेस पदपथावर विक्रीस ठेवलेलं कार्व्हरचं इंग्रजी चरित्र पुस्तक पडलं , ते त्यांनी घेतलं, वाचलं आणि पुढे इतिहास घडला.

वीणाताईंची समृद्ध साहित्य संपदा : 'एक होता कार्व्हर', 'डॉ. खानखोजे - नाही चिरा', 'डॉ. आयडा स्कडर', 'आयुष्याचा सांगाती', 'गोल्डा : एक अशांत वादळ', 'भगीरथाचे वारस', 'रॉबी डिसिल्वा', 'डॉ. सलीम अली', 'लीझ माईट्नर', 'रोझलिंड फ्रँकलीन', 'शाश्वती', 'सर्पतज्ज्ञ : डॉ. रेमंड डिटमार्स'.

आज वयाच्या ७९ व्या वर्षीदेखील त्यांचे लेखन, संशोधन चालूच आहे. विविध विषय त्यांना साद घालत असतात. वीणाताईंना उदंड आयुष्य लाभो अशी आम्ही सदिच्छा व्यक्त करतो.

**६. मंगेश पाडगावकर**

*तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे रे...*
*अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेउनी जाती*
*भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी*
*शुक्रतारा मंद वारा चांदणे पाण्यातुनी*
*या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे*
***शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडे***
***माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे***

अशी एकापेक्षा एक सुमधुर भावगीते लिहून रसिकांचे भावविश्व समृद्ध करणारे आनंदयात्री मंगेश पाडगावकर जन्म तळकोकणातला. वेंगुर्ल्याचा. १० मार्च १९२९. निसर्गाचे विलोभनीय अविष्कार आणि सहा ऋतूंचे सहा सोहळे लहानपणापासून मनावर उमटलेले, एखाद्या चित्राप्रमाणे ते संचित त्यांनी कवितेत रेखाटलं. पाडगावकरांचे आजोबा विश्वनाथ कुलकर्णी आणि आई या दोघांकडून त्यांना कवितालेखानाचा वारसा मिळाला. तो त्यांनी आयुष्यभर जपला. पाडगावकरांच्या कवितेवर प्रारंभी कवी भा. रा. तांबे आणि बा. भ. बोरकर यांचे संस्कार होते. आणि ते अपरिहार्य होते. 'धारानृत्य' (१९५०) या त्यांचा पहिला कवितासंग्रह वाचताना आपल्याला ते जाणवते. मात्र पुढे जिप्सी संग्रह आला आणि पाडगावकरांना आपली स्वतंत्र वाट सापडली ती कायमची. एकीकडे कवितेत निसर्गाची रूपे, प्रतिमा रेखाटणारे पाडगावकर आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर व्यथित होतात. १९७८ मध्ये त्यांचा 'सलाम' हा सामाजिक भाष्य करू पाहणारा संग्रह आला. थोर विदुषी दुर्गाबाई भागवत यांना तो अर्पण केला. १९९० मध्ये 'बोलगाणी' हा संग्रह आला. 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं' असं मिश्किलीने लिहिणारे हेच का पाडगावकर? असा प्रश्न वाचकांना पडला होता. यशवंत देव आणि श्रीनिवास खळे या दोन संगीतकारांनी पाडगावकरांच्या गाण्यांना योग्य न्याय दिला. त्यांची सर्वच गाणी प्रचंड गाजली. अरुण दाते या गायकाने पाडगावकरांची गाणी जास्त गायली आहेत. वयाच्या चौदाव्या वर्षापासून कवितालेखनाला सुरुवात करणारे पाडगावकर शेवटच्या श्वासापर्यंत अखंड लेखन करीत होते. त्याचवेळी नवोदित लेखकांना, कवींच्या कवितासंग्रहाला आवडीने प्रस्तावना देखील देत, त्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहत. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीनं पाहणारे पाडगावकर खरोखरच आनंदयात्री होते. 'वेंगुर्ल्याचा पाऊस' ही त्यांची गाजलेली कविता आपल्याला सगळ्यांना आठवत असेलच. अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांनी त्यांना गौरविले. १९९२ मध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. 'सलाम' कवितासंग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार लाभला.

३० डिसेंबर २०१५. नववर्षाच्या स्वागतासाठी सारेजण आनंदात व्यग्र असतानाच ती बातमी येउन थडकली. 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' असा संदेश देणारा हा आनंदयात्री अखेरच्या प्रवासाला निघून गेला.

**७. रत्नाकर मतकरी**

'लोककथा-७८', 'बकासुर', 'आरण्यक', 'माझं काय चुकलं?', 'घर तिघांचं हवं', 'दुभंग', 'चार दिवस प्रेमाचे', 'तनमन', 'जावई माझा भला', 'जादू तेरी नजर' ते थेट अलीकडचे 'इंदिरा' अशा आशयसंपन्न नाटकाचे सशक्त लेखन करणारे रत्नाकर मतकरी म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते. ते कादंबरीकार, गूढकथाकार, नाटककार, नेपथ्यकार, दिग्दर्शक, निर्माता, रंगकर्मी, चित्रकार म्हणून सर्वांना परिचित होते. ऐन उमेदीच्या काळात महाराष्ट्रात सर्वप्रथम बालरंगभूमी चळवळीची मुहूर्तमेढ रोवणारे, एकीकडे सकस लेखन करीत असताना सामाजिक मूल्यांचे भान ठेवून 'नर्मदा बचाओ आंदोलन' आणि 'निर्भय बनो' आंदोलनासाठी थेट रस्त्यावर उतरणारे, शहरातील तळागाळातल्या कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि तेथून व्यक्त होण्यासाठी 'वंचितांचा रंगमंच' सारखे अभिनव उपक्रम राबवणारे ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी यांच्या एकूण जीवनप्रवासाला, कार्यकर्तृत्वाला आमची

मानवंदना.

गूढकथा हा कथेचा वेगळा फॉर्म मतकरी यांनी खऱ्या अर्थाने वाचकांमध्ये रुजवला. माझ्या कॉलेज जीवनात मतकरी सरांच्या गूढकथांनी मला अक्षरशः वेड लावले होते. अनेक दिवाळी अंकातून, नियतकालिकातून दीडशेच्या वर कथा प्रकाशित झाल्या. पुढे त्या कथांचे संग्रह निघाले. काही वर्षांपूर्वी मतकरींच्या काही निवडक गूढ कथांचे टीव्ही मालिकेत रूपांतर झाले. 'गहिरे पाणी' ही अप्रतिम मालिका अनेकांच्या स्मरणात असेलच. 'ऐक टोले पडताहेत', 'ड्रॅक्युला', 'कबंध', 'खेकडा', 'फाशी बखळ', 'मध्यरात्रीचे पडघम', 'संदेह' वगैरे कथांनी माझी रात्रीची झोप उडवली होती हे नक्की. मतकरींच्या गूढ कथा या विषयावर स्वतंत्र लिहिता येईल इतका विषय मोठा आहे. मतकरींनी विविध गूढकथांमध्ये भारलेल्या वस्तूंचे, वास्तूंचे, स्थळांचे चित्रण केलेच पण त्याबरोबर माणसांच्या मनोव्यापाराचे दर्शन देखील घडवले.

बहुआयामी लेखक रत्नाकर रामकृष्ण मतकरी यांचा जन्म १७ नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबईतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातले नेरूर हे मतकरींचं मूळ गाव. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी ( चौथीत असताना ) मतकरींनी चक्क साने गुरुजींच्या 'तीन मुले' या कादंबरीवर चक्क नाटक लिहिले. मतकरींना वाचनाचा, लेखनाचा समृद्ध वारसा वडिलांकडून लाभला. मतकरींचे प्राथमिक शिक्षण ग्रॅन्टरोड इथल्या रॉबर्ट मनी हायस्कुलमध्ये झाले, तर माध्यमिक शिक्षण राममोहन इंग्लिश स्कुल, गिरगाव इथे झाले. १९५५ मध्ये मुंबई आकाशवाणीवर त्यांची पहिली श्रुतिका 'वेडी माणसं' प्रकाशित झाली. पदवी परीक्षा पास होण्यापूर्वीच मतकरी हे प्रस्थापित लेखक म्हणून ओळखू लागले. १९५८ मध्ये मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्राची पदवी घेऊन मतकरींनी बँक ऑफ इंडिया मध्ये वीस वर्षे नोकरी केली. पुढे नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेऊन मतकरी यांनी स्वतःला पूर्णवेळ लेखन कार्यात झोकून दिले. १९६२ सुमारास मतकरी कुटुंब ग्रॅन्टरोड येथून वडाळा येथील राधानिवास येथे राहावयास आले. एकाचवेळी कथालेखन, नाटक, एकांकिका, स्तंभलेखन, आकाशवाणीवर श्रुतिका लेखन यामध्ये मतकरी वेगवेगळे प्रयोग करू लागले. १९६२ मध्ये सुधाताई करमरकर यांना घेऊन त्यांनी बालरंगभूमीची स्थापना केली. चित्रकार मतकरी ही आणखीन एक वेगळी ओळख. नर्मदा बचाओ आंदोलनाचे संदर्भ घेऊन त्यांनी अनेक पेंटिंग रेखाटली होती. माणगाव येथील साने गुरुजी स्मारक उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. अवघे मतकरी कुटुंब हे कला-साहित्य-नाटक-अभिनय क्षेत्रात कार्यरत आहे. महत्वाच्या पुरस्कारांनी मतकरींना आजवर सन्मानित केलं आहे.

मार्च २०२० मध्ये भारतात करोना या भयानक विषाणूचा शिरकाव झाला. दुर्दैवाने त्याची लागण मतकरींना झाली. वैद्यकीय ईलाज सुरूही झाले. परंतु त्यात करोनाचा विजय झाला. १७ मे २०२०. तो दिवस उजाडला. मतकरी सरांनी या जगाच्या रंगमंचावरून कायमची एक्झिट घेतल्याचे समजताच सारे साहित्य विश्व हळहळले.

**८. माधव कोंडविलकर**

'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आत्मकथनाद्वारे या गावाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात, देशात, परदेशात नेणारे कोकणातले एक महत्वाचे लेखक माधव कोंडिवलकर यांचा जन्म १५ जुलै १९४१ रोजी कोकणातील सोगमवाडी, मौजे देवाचे गोठणे, तालुका-राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथे झाला. गुणाजी आणि भागीरथी हे आईवडील. स्वभावाने अतिशय गरीब. 'देवाचे गोठणे' या सांस्कृतिक, राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या अतिशय मागासलेल्या गावात, चर्मकार कुटुंबात त्यांचा जन्म झाला. आधुनिक-पुरोगामी विचारांचा साधा स्पर्श गावाला झालेला नव्हता. अज्ञान, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, दारिद्र्य याचे सर्वत्र साम्राज्य. रूढी-परंपरेने बुरसटलेला अडाणी समाज. साध्या, आवश्यक त्या सुखसुविधा देखील आसपास नव्हत्या तो काळ. आशेचा, प्रकाशाचा तुकडा कधी गावात उगवलाच नाही. अशातच चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे ते बळी ठरले. लाचारीचे, उपेक्षितांचे जगणे कोंडविलकरांच्या वाट्याला आले. या सर्वांमधून तरुन जायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही हे माधवराव जाणून होते. आपल्या वाटेला आलेले दारिद्र्य मुलाच्या वाटेला येऊ नये म्हणून मुलाने चांगले शिक्षण घ्यावे असे त्यांच्या आईवडिलांना वाटे. चौथीपर्यंतचे शिक्षण गावातच झाले तर पुढे ५ वी ते ७ पर्यंतचे शिक्षण पडवे येथे झाले. मुंबईच्या रात्रशाळेत आठवी ते नववी पर्यंत शिक्षण

घेतले तर १९६८ मध्ये स्वयंशिक्षक बनून जिद्दीने मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. मुंबईत शिकत असताना अगरबत्तीच्या कारखान्यात नोकरी केली, गिरणी कामगारांचे डबे पोचवणे ही देखील कामे केली. पुढे कोकणातले एक आदर्श शिक्षक श्री नारायण बेहरे, सावंतवाडी यांचे प्रयत्नाने कोकण विभागात माधवराव प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झाले. आर्थिक विवंचना काही प्रमाणात कमी झाल्या. १९६० ते १९९० पर्यंत रत्नागिरी जिल्ह्यातील विविध गावांमध्ये त्यांनी ही नोकरी केली. १९६५ ते ६७ दरम्यान महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांची 'साहित्यप्राज्ञ' ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे साहित्याची गोडी लागली. १९७० पासून खऱ्याअर्थाने लेखनास प्रारंभ. ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी सर्वप्रथम माधवरावांना आजवर भोगलेलं लिहिण्याचा आग्रह केला. १९६९ ते १९७७ पर्यंतच्या काळात अनुभवलेलं, सोसलेलं दैनंदिनीच्या स्वरूपात लिहून काढलं. ते एक जगावेगळं आत्मकथनच होतं. पुस्तकाचे शीर्षक 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' (मॅजेस्टिक प्रकाशन). या आत्मकथनाने इतिहास घडला. कोंडविलकर हे लेखक म्हणून उदयाला आले. वाचकांचा, समीक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला, अनेक पुरस्कार लाभले.

पिढ्यान्‌पिढ्या जातिभेदाच्या भिंतीत अडकलेल्या अनेक दलित, कष्टकरी बांधवांच्या वेदना, कामगार वर्गाची होरपळ, इथल्या लोकजीवनावर जागतिकीकरणाचा झालेला विपरीत परिणाम प्रभावीपणे साहित्यात रेखाटणाऱ्या कोंडविलकरांचा जीवन प्रवास विलक्षण आहे. माधव कोंडविलकरांनी कविता, कथा, कादंबरी, आत्मकथनपर, चरित्र, आध्यात्मिक, नाटक, बालवाङ्मय, संपादन अशा सर्व साहित्य प्रकारात विपुल लेखन केले असून त्यांची एकूण तीस पुस्तके प्रकाशित आहेत. मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या कादंबरीचे फ्रेंच आणि हिंदी भाषेत अनुवाद झालेत. त्याचप्रमाणे काही कथांचे, कवितांचे इंग्रजी, हिंदी, जपानी आणि फ्रेंच भाषेत अनुवाद झालेत. सर्वात महत्वाचे म्हणजे 'यांनी घडवले सहस्रक' या महत्वाच्या ग्रंथात गेल्या हजार वर्षात जगभरातील विविध क्षेत्रात प्रभावशाली काम करणाऱ्या व्यक्तींची ओळख दिली आहे. या ग्रंथात माधव कोंडविलकरांचे नाव आहे.

माधवरावांनी इतकं भोगलं, सोसलं मात्र त्याचा कडवटपणा आपल्या साहित्यात कधीही आणला नाही. मार्च २०२० मध्ये भारतात शिरलेल्या करोना या भयानक विषाणूने या महत्वाच्या लेखकावर आक्रमण केले. ११ सप्टेंबर २०२०. देवाचे गोठणे पोरके झाले.

**९. रवींद्र पिंगे**

कथा-कादंबरीलेखन, ललितलेखन, प्रवासवर्णनं, स्तंभलेखन, व्यक्तिचित्रण, अनुवादलेखन आणि या सर्वांबरोबरच परदेशी लेखकांच्या अभिजात साहित्याचा परिचय वाचकांना करून देणारे, कोकणभूमीचे आणि तेथील जीवनाचे जिवंत आणि यथार्थ चित्रण करणारे शांत, निर्मोही, कृतार्थ व्यक्तिमत्व रवींद्र पिंगे यांचा साहित्यप्रवास थक्क करणारा आहे. रवींद्र पिंगे यांची जवळजवळ ३० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यामध्ये विशेष नमूद करायची म्हणजे 'परशुरामाची सावली' (कादंबरी), 'सुखाचे फुल' (कथा), 'मोकळं आकाश', 'प्रकाशाची खिडकी', 'आनंदपर्व', 'रिमझिम पाऊस', 'माळावरली फुलं', 'चिरेबंदी' हे ललितलेख संग्रह, 'आनंदाच्या दाही दिशा' (प्रवासवर्णन), 'शतपावली', 'अंगणातलं चांदणं', 'जिवलग सारे', 'अत्तर आणि गुलाबदाणी' हे व्यक्तिरेखा लेखसंग्रह.

रवींद्र पिंगे यांचा जन्म १३ मार्च १९२६ चा. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग पंचक्रोशीतील 'उपळे' हे त्यांचे मूळ गाव. त्यांच्या लेखणीतून उतरलेलं 'परशुरामाची सावली' ही कादंबरी कोकणी खेड्याच्या पार्श्वभूमीवरची आहे. कसदार लेखनाला उत्कट अनुभूतीची जोड आवश्यक. निसर्ग आणि मानव यांचे अतूट नाते पिंगे यांनी शेवटपर्यंत आपल्या साहित्यात उतरवले. त्यासाठी पिंगे यांनी आसाम, अरुणाचल, ग्वाल्हेर, भुज, हंपी, कारवार, अंदमान असे करीत पन्नास वर्षे निव्वळ निसर्गदर्शनासाठी संपूर्ण हिंदुस्तान पायाला जणू भिंगरी लावून पालथा घातला. लेखकानं आधी भरपूर वाचावं मगच लिहावं असा त्यांचा प्रेमळ सल्ला असायचा. ना. ग. गोरे यांनी पिंगे यांना कलात्मक लेखन शैलीचे भान दिले आणि पिंगे खऱ्याअर्थाने लिहू लागले. सचिवालयात नोकरी लागल्यावर मंत्रालयीन कामकाजातल्या मराठीचा प्रवेश पिंगे यांच्याच हातून झाला. हे खूप जणांना माहितीही नसेल.! मुंबई राज्याच्या एकूण एक सांस्कृतिक विभागाचं दफ्तर पिंग्यांकडे सोपविण्यात आले होते. सांस्कृतिक संस्थांना अनुदान, साहित्य-संस्कृती मंडळाची निर्मिती, 'महाराष्ट्र

कवी'पदाची निर्मिती, राजा केळकर वस्तुसंग्रहालयाचे हस्तांतर इत्यादी महत्त्वाच्या कामांचा श्रीगणेशा पिंगे यांच्या कारकिर्दीत झाला. सचिवालयातील नोकरीनंतर पुढे वीस वर्षे मुंबई आकाशवाणीवर पिंगे रुजू झाले. सांस्कृतिक आणि महत्वाच्या कार्यक्रमांची सूत्र एकत्रित ठेवण्याचे काम पिंगे यांना मिळाले. तिथेही त्यांनी सोनं केलं.

१७ ऑक्टोबर २००८. कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारानं त्यांना अखेर गाठलंच. एका प्रगल्भ, कर्तृत्ववान, कृतार्थ जीवनाचा प्रवास थांबला.

**१०. वसंत सावंत**

मोती तलाव. सावंतवाडीचे आकर्षणबिंदू. या तलावापाशी फिरताना तेथे दोन मार्गिका दिसल्या. पादचारी मार्ग. कोणाच्या नावाचा ? तर एका कवीच्या नावाचा ! . तेथेच एका कठड्यावर 'त्या' कवीची कविता कोरून ठेवलेली, जपलेली. मी भारावून गेलो. कवितेचे शीर्षक होतं बैल. ती पुढे बारावीच्या पाठ्यपुस्तकात समाविष्ट झालेली. याच निसर्गरम्य सावंतवाडी परिसरात या कवीने जवळजवळ बत्तीस वर्षे सावंतवाडीच्या पंचम खेमराज महाविद्यालयात मराठीचे अध्यापन केले. एकीकडे हे सारे करीत असतानाच या कवीचा जीव रमत होता येथील झाडापेडांत, तांबड्या मातीत, देवळात, पावसात, घनदाट देवराईंमध्ये, तेथील लोककलेत, परंपरेत, चालीरीतींत, ग्रामीण वास्तवात आणि

मुलखावेगळ्या माणसांमध्येही. ते ते सारं या कवीने मोठ्या ताकदीने आपल्या कवितेत उतरवलं. कोकणातल्या मातीतला हुंकार आपल्या अनोख्या शब्दांमध्ये मांडणाऱ्या कवीचे नाव वसंत सावंत. त्यांचा पहिला स्वस्तिक प्रकाशित झाला. या त्यांच्या पहिल्याच संग्रहाला १९७४ मध्ये महाराष्ट्र शासनाचा 'कविवर्य केशवसुत पुरस्कार' लाभला. स्वस्तिक नंतर १९८४ मध्ये 'उगवाई' १९९० मध्ये 'देवराई', आणि १९९३ मध्ये 'माझ्या दरातील सोनचाफ्याचे झाड', 'सागरेश्वर' आणि शेवटचे दीर्घ काव्य वसा हे महत्वाचे संग्रह प्रकाशित झालेत. ज्येष्ठ पत्रकार श्री माधवराव गडकरी सावंतांच्या कवितेबद्दल भरभरुन बोलतात. ते म्हणतात. सह्याद्रीच्या परसात राहणारे कवी वसंत सावंत, तळकोकणचा निसर्ग आणि तिथे आशा-निराशेच्या झंझावातात वावरणारा माणूस यांचा बोलता गाता प्रतिनिधी आहे.'

वसंत सावंतांचा जन्म ११ एप्रिल १९३५ चा, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सांगुळवाडीचा (तालुका वैभववाडी). फोंडाघाट येथे प्राथमिक शिक्षण तर माध्यमिक शिक्षण मालवण येथे पूर्ण करून पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी कविराजांनी मुंबई गाठली. एकीकडे रेल्वे मध्ये नोकरी करून सिद्धार्थ कॉलेजमध्ये पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला. खऱ्या अर्थाने याच कॉलेजमध्ये सावंतांच्या प्रतिभेला धुमारे फुटले, ते कवितेतून व्यक्त होऊ लागले. १९६३ पासून सावंतवाडीचे प्रख्यात कवी, प्राध्यापक म्हणून सर्व ओळखू लागले. कोकणच्या समृद्ध निसर्गात, तिथल्या माणसांच्या गोतावळ्यात कविराज मनोमन रमले. प्रवास वर्णन एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार हा शोधनिबंध सावंतांनी लिहिला, यासाठी त्यांना डॉक्टरेट मिळाली. १९८१ पासून पीएचडी विद्यार्थ्यांसाठी ते मार्गदर्शक झाले. सावंतवाडीच्या त्या महाविद्यालयात बत्तीस वर्षे अध्यापन करून १९९५ मध्ये ते निवृत्त झाले.

१९९५ मध्ये वसंत सावंत निवृत्त झाल्यावर भांडुप, मुंबईला कायमचे राहायला आले. ते शरीराने जरी मुंबईसारख्या महानगरात आले तरी त्यांचे मन भूतकाळात, सावंतवाडीच्या तलावापाशीच रुंजी घालत होते हे नक्की. मुंबईला आल्यावर त्यांची प्रकृती अचानक खालावत गेली. २३ डिसेंबर १९९६. सर्वांना आपले आपलेसे करणारे, कवितेचा सुगंध देणारे सोनचाफ्याचे झाड अचानक कोसळले.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**शरद कुलकर्णी**
**यांसकडून**
**दिपावलीच्या शुभेच्छा!**




# भौगोलिक

## विभाग ३













# कोकणातील देवराया

**भारत गोडांबे**

जनमानसाच्या भावनांना हात घालत लोकसहभागातून राखलेली ही जंगले म्हणजे संवर्धनाची मूर्तिमंत उदाहरणेच नाहीत का? मुळात जंगल परिसंस्थेत मानवाने कोणताही हस्तक्षेप केला नाही तर तेथील वनस्पती, कीटक, पक्षी, सरिसृप, प्राणी यांच्या मदतीने अगदी काही वर्षातच तिथे अतिशय संपन्न असा वनपट्टा तयार होतो हे तर सिद्ध झालेलेच आहे.

***गोमू माहेरला जाते हो नाखवा***
***तिच्या घोवाला कोकण दाखवा***



हे गाणं ऐकलं की मन थेट धावतं ते कोकणच्या ओढीने. कोकण म्हणजे हिरवीगार वनराई, कोकण म्हणजे निळाशार समुद्र, कोकण म्हणजे लाल माती, कोकण म्हणजे चिऱ्याचा दगड, कोकण म्हणजे शांत आणि समृद्ध सागर किनारे, कोकण म्हणजे प्रचंड समृद्ध खाद्य संस्कृती, कोकण म्हणजे संस्कृती जपणारी माती. काय आणि किती वर्णन करावे त्या कोकणाचे जसे; तुलसीदासांनी रामाला उपमा देताना तो रामासारखाच श्रेष्ठ असं म्हटलं तसं कोकणाला इतर कोणतीही उपमा कमीच पडेल. कोकण म्हणजे कोकणच.

भौगोलिकदृष्ट्या पाहायला गेलो तर सप्तद्वीपांची नगरी असलेल्या मुंबईच्या उत्तरेहून कोकण सुरू होतो तो थेट जाऊन पोहोचतो सिंधुदुर्गातील दोडामार्ग पर्यंत. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग असे सहा जिल्हे आपल्या पोटात सामावणारा कोकण; पण त्याची खरी ओळख केली जाते ते रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांवरून.

समृद्ध अशा कोकणाची जी अनेक वैशिष्ट्य सांगितली जातात त्यातील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कोकणातील वनसंपदा आणि या वनसंपदेत आपले मानाचे स्थान राखून असलेल्या आणि कोकणाच्या विविधतेत भर घालणाऱ्या कोकणातील देवराया. देवराई म्हणजे देवाच्या नावाने राखलेले जंगल. अगदी देव नसले तर भूत, खेत, वन्यप्राणी ज्यांना देवत्व दिलेले आहे अशांच्या नावाने राखलेले जंगल. या जंगलाचं वैशिष्ट्य म्हणजे यातील अगदी गवताच्या काडीला देखील आपल्या घरी आणायचे नाही जे काही आहे ते त्या देवाचे आहे त्यावर फक्त त्याचाच अधिकार आहे आणि जर का हे पाळले नाही तर त्या देवाचा कोप होतो आणि गावावर अरिष्ट ओढवते या श्रद्धेपोटी कित्येक शतकापासून जपलेली ही जंगल.

याला श्रद्धा म्हणा किंवा अंधश्रद्धा पण यातून ही देवाच्या नावाने राखलेली जंगले जैविक विविधतेने समृद्ध बनली. अनेक दुर्मिळ वनस्पती, पक्षी, कीटक, सरिसृप यांच्या निवाऱ्याचे ठिकाण बनली, एवढेच नाही तर कोकणातील कितीतरी नद्यांचा उगम हा अशाच कोणत्या ना कोणत्या देवराईतून होतो हे देखील विशेष. म्हणजेच एका अर्थाने देवराया या नद्यांना जन्म घालणाऱ्या आणि पाणी पिकवणाऱ्या सिद्ध झाल्या.


देवराई या संकल्पनेची सुरुवात नक्की कोणी केली हे सांगणे कठीण आहे, पण ज्यांनी कोणीही संकल्पना राबवली ती मंडळी फार दूरदर्शी, अत्यंत अभ्यासू आणि संवर्धन क्षेत्रातील मातब्बर असतील यात मात्र शंका नाही. फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला देवराई ही संकल्पना राबवलेली दिसते त्यांची नावे वेगवेगळे असतील, कारणे वेगवेगळी असतील पण मूळ तत्व सारखेच जाणवते.

अनेक अभ्यासक म्हणतात, देवराईच्या निर्मिती मागे कोणतीही वैज्ञानिक दृष्टिकोन किंवा नियोजन दिसत नाही पण थोडा सखोल विचार केला तर जनमानसाच्या भावनांना हात घालत लोकसहभागातून राखलेली ही जंगले म्हणजे संवर्धनाची मूर्तिमंत उदाहरणेच नाहीत का? मुळात जंगल परिसंस्थेत मानवाने कोणताही हस्तक्षेप केला नाही तर तेथील वनस्पती, कीटक, पक्षी, सरिसृप, प्राणी यांच्या मदतीने अगदी काही वर्षातच तिथे अतिशय संपन्न असा वनपट्टा तयार होतो हे तर सिद्ध झालेलेच आहे. देवराई अशाच प्रकारचा लोकमान्य प्रयोग आहे असे पाहायला मिळते.

कोकणातील देवरायांच्या बाबत म्हणायचं झाल्यास आतापर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या देवरायांचा शोध कोकणात लागला आहे. गावाच्या बाहेर असणाऱ्या, देवराया गावाच्या मध्यावर असणाऱ्या देवराया, वेशीवरच्या देवराया अगदी एक झाड किंवा काही झाडांचा समूह म्हणजे अगदी छोट्या क्षेत्रफळापासून ते एक हेक्टर पासून थेट शंभर हेक्टर पर्यंत किंवा त्यापेक्षाही मोठ्या क्षेत्रफळाच्या देवराया कोकण विभागात पाहायला मिळतात. यातील कितीतरी देवरायांमध्ये बाहेरील लोकांना प्रवेश करायला गावाने बंदी घातलेली आहे. कितीतरी देवरायांमध्ये आपण चप्पल घालून जाऊ शकत नाही अनवाणीच जावे लागते त्यामुळे नैसर्गिकरित्याच फिरण्यावर मर्यादा येतात आणि जंगल मानवी हस्तक्षेप विरहित राहते. कोणत्याही प्रकारचे हत्यार जसे विळा, कोयता, कुऱ्हाड घेऊन देवराईत प्रवेश करण्यास सक्त मनाई आहे. कितीतरी देवरायातून अगदी औषध म्हणून वनस्पती देखील घ्यायची असेल तर देवाला कौल लावला जातो. आपल्याला या अंधश्रद्धा









वाटत असतील पण निसर्ग संवर्धनाची ही परमोच्च पातळी आहे असे लक्षात येते. कोकणातील अगदी मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत नोंदवलेल्या देवरायांची संख्या - मुंबई -१, ठाणे - ३२, रायगड - २१, रत्नागिरी- १७३६, सिंधुदुर्ग - १४९५.

देवराई हे एक उत्तम दर्जाचं जंगल असतं. अनेक गवताच्या जाती, कंदमुळे, लहान-मोठे झाडे, उंच वृक्ष, उक्षी- गारंबी- पळसवेल सारख्या वाढणाऱ्या वेली आणि इतर वनस्पती, कीटक, फुलपाखरे, अनेक प्रकारचे पक्षी, शैवाल, बुरशी, जंगली प्राणी अशी अनेक समृद्ध जैवविविधता आपल्याला देवराईच्या पोटात दडलेली पाहायला मिळते. त्यातील कितीतरी वनस्पती, पक्षी, मासे हे प्रदेशनिष्ठ देखील आहेत. आपल्याकडे देवराई या विषयावर अनेक मंडळींनी अभ्यास केलेला आहे. त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन हे धन जगासमोर खुले केले आहे. आजही अनेक नवनवीन कीटक, वनस्पती यांचा शोध या माध्यमातून लागतो आहे. देवराया या अनेक औषधी वनस्पतींचे भांडार आहेत. हिरडा, बेहडा, सर्पगंध, आवळा, गुळवेल, धायटी, मुरुड शेंग, कुडा, खैर, चित्रक, गारंबी, बिब्बा, पळस, मोह, टेंभुर्णी, गेळ अशी एक ना अनेक वनस्पती देवराई पाहायला मिळतात. अनेक रानभाज्या या देवराईमुळे आजही सुसंपन्न अवस्थेत पाहायला मिळतात. विविध प्रकारचे ऑर्किड म्हणजे अमरी, अतिशय दुर्मिळ असणारे कंदील पुष्प चे अनेक प्रकार, वेगवेगळ्या प्रकारच्या बुरशी, लायकेन म्हणजे दगडफूल वर्गीय वनस्पती असे एक ना अनेक वनस्पतींचे प्रकार देवराईत बहरतात. या सर्व वनसंपदेमुळे अनेक प्रकारचे जंगली पक्षी, शिकारी पक्षी, पाणथळीचे पक्षी देवराईत नांदताना दिसतात. अनेक वनस्पतींवर गुजराण करणारी विविध फुलपाखरे देवराईच्या संपन्नतेत भर घालतात. दाट जंगलामुळे सरीसृप प्राणी आणि कित्येक वेळेला जंगली प्राणी यांचे अतिशय महत्त्वपूर्ण वास्तव्य देवराईत दिसते. देवराईमुळे स्थानिक परिसंस्थेच्या बाबतीत, तेथील










मूळ जंगल संपदेच्या बाबतीत, पशु, पक्षी, कीटक, प्राणी यांचे बाबतीत अनेक ठोकताळे बांधता येतात. कित्येक शतके मानवी हस्तक्षेप विरहित असल्याने ही जंगले एक समृद्ध असा अधिवास आहे.

देवराईत अगदी माती विटा वापरून किंवा अगदी मोकळ्या जागेत एखाद्या झाडाखाली दगडाचे देव मांडलेले पाहायला मिळतात. पक्की मंदिरे क्वचितच. आता काळाच्या ओघात पक्की मंदिरे बांधण्याचे खूळ वाढलेले दिसते. कितीतरी ठिकाणी लाकडावर वाघ, नाग, इतर प्राणी कोरलेले आणि त्यावर शेंदूर फासून त्याची पूजा केलेली देवराई पाहायला मिळते.

सध्या वाढत्या शहरीकरणाचा परिणाम हा देवरायांवर देखील होताना दिसत आहे. पैशांच्या हव्यासापुढे श्रद्धा कमकुवत झाल्याने अनेक ठिकाणच्या देवरायांवर कुऱ्हाड चालवलेली पाहायला मिळते. अतिहव्यासातून आपल्या पूर्वजांनी प्राणापलीकडे जोपासलेला हा ठेवा आता धोक्यात आहे असे पाहायला मिळते, यावर विचार होणे आणि फक्त विचार नाही तर तातडीने कार्यवाही करून हे धन जपने गरजेचे आहे. आजही देवरायांमध्ये वार्षिक उत्सवांच्या निमित्ताने गावातील लोक एकत्र जमतात, त्यामुळे का होईना नवीन पिढीला या समृद्ध परंपरेची ओळख होत आहे. नवीन पिढी विज्ञानाधिष्ठित नजरेने या सगळ्याकडे पाहून, या जैवविविधतेने समृद्ध असणाऱ्या देवरायांच्या संवर्धनात खारीचा वाटा उचलतील अशी अपेक्षा. या वर्षी कोकणात गेलात तर नक्की एखाद्या देवराईला भेट द्या. तेथील जैविक विविधता समजून घ्या आणि हो एक सजग पर्यटक आणि नागरिक म्हणून या देवरायांच्या संवर्धनात हातभार लावा. देवराईत गेलात की खरंच आपले पूर्वज किती हुशार होते याची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही. मग काय येणार ना कोकणात देवराई पाहायला...

येवा कोकण आपलाच असा...




# कोकणातील वन्यजीव, त्यांचे संरक्षण

**उदय कोतवाल**

सह्याद्रीमधील उत्तुंग शिखरे, खोल दऱ्या, उभे कडे, निबिड अरण्य, मुबलक पाऊस, आणि उबदार हवा यामुळे सजीवांच्या जगण्यासाठी, त्यांच्या निवासासाठी आणि वाढीसाठी पोषक असं वातावरण तयार होते. त्यामुळेच इथे खूप मोठे जैवविविधता आहे. सुमारे ९/१० हजार प्रकारच्या वनस्पती, १४० प्रकारचे सस्तन प्राणी, ५०० च्यावर पक्षी, २०० च्या आसपास उभयचर प्राणी, आणि ६००० च्यावर कीटक प्रजातींची नोंद झाली आहे.

स ह्याद्री हे मराठी माणसाच्या ह्रदयात कोरलेले नांव आहे. याची कारणं ही ऐतिहासिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि मुख्य म्हणजे आपल्या रोजच्या जगण्याशी जोडलेली आहेत. सह्याद्री आपल्याला अनेक गोष्टी देतो स्वच्छ हवा, वनोपज आणि पाणी या त्यापैकीच. महाराष्ट्रातील सर्व नद्या त्या पूर्व वाहिनी असोत की पश्चिमवाहिनी सह्याद्रीतच उगम पावतात आणि जवळपास सर्व दक्षिण भारताला पाणी पुरवतात.

गुजरात आणि महाराष्ट्राच्या सीमेवर उगम पावणारी ही पर्वतरांग महाराष्ट्र गोवा, कर्नाटक, केरळ राज्यांमधून जाताना १६०० कि.मी. अंतर कापते. हीच पर्वतरांग केरळात समुद्राखाली जाऊन श्रीलंकेत प्रकट होते. ही पर्वतरांग उभा आडवा विस्तार मिळून सुमारे १६ लक्ष चौरस कि.मी.चा भाग व्यापते.

जगातील १० Hotest Biodiversity Hotspots मध्ये या परिसराची निवड झाली आहे.

सह्याद्रीमधील वातावरण हे उष्णकटिबंधीय असते. येथील हवा वर्षभर उबदार आणि दमट असते. इथे साधारणपणे ९००० मि.मि.पर्यंत पाऊस दरवर्षी पडतो, परंतु पावसाचे हे प्रमाण सारखे नसते. विशेषतः महाराष्ट्रतील काही भागात सर्वात जास्त पाऊस केवळ तीन ते चार महिन्यात पडतो तर केरळमधील सह्य डोंगररांगामध्ये एवढाच पाऊस वर्षभरात पडतो.

मात्र जुलै-ऑगस्टमध्ये जवळजवळ सगळीकडेच प्रचंड पाऊस असतो. इथली उत्तुंग शिखरे, खोल दऱ्या, उभे कडे, निबिड अरण्य, मुबलक पाऊस, आणि





उबदार हवा यामुळे सजीवांच्या जगण्यासाठी, त्यांच्या निवासासाठी आणि वाढीसाठी पोषक असं वातावरण तयार होते. त्यामुळेच इथे खूप मोठे जैवविविधता आहे. सुमारे ९/१० हजार प्रकारच्या वनस्पती, १४० प्रकारचे सस्तन प्राणी, ५०० च्यावर पक्षी, २०० च्या आसपास उभयचर प्राणी, आणि ६००० च्यावर कीटक प्रजातींची नोंद झाली आहे. अजूनही नक्की किती प्रजातींची नोंद व्हायची आहे याची कल्पनाच नाही.

इथल्या एकूणच भौगोलिक परिस्थितीमुळे वनस्पतींची मोठी विविधता बघायला मिळते सदाहरीत जंगलांपासून पानगळीच्या शुष्क वनस्पती इथे आढळतात. अनेक दऱ्याखोऱ्यात आणि विस्तीर्ण पठारांवर छोटी छोटी गवताळ कुरणे आणि झुडूपे उगवतात. अशा अनेक पठारांवर पाऊसकाळात फुलणाऱ्या गवतफुलांचे अगणित गालीचेच पसरतात. अशा असंख्य Valley of Flowers सह्याद्री आपल्या अंगाखांद्यावर मिरवतो.

झाडांवर वाढणाऱ्या आणि अतिशय मौल्यवान अशा Orchids च्यासुमारे ३०० पेक्षा जास्त प्रजाती आढळल्या आहेत सीतेची वेणी हे त्यापैकीच एक.

इथल्या पश्चिमवाहिनी नद्या या कमी लांबीच्या आहेत, डोंगर उतारामुळे पाण्याला प्रचंड वेग असतो, उगमापासून समुद्राला जाऊन मिळेपर्यंतच्या प्रवासात या नद्या तीरावरील भागाला डिसेंबर जानेवारीपर्यंत पाणी पुरवतात. पुढे त्यातील पाणी कमी झाल्यामुळे हा परिसर कोरडा पडतो, त्यामुळे पावसाळ्यात प्रचंड ओलावा आणि उन्हाळ्यात कोरडेपणा इथल्या वातावरणात असतो. अशा विविध गुणांच्या वातावरणात बहरणारे सजीव जग सुध्दा विविधांगीच असल्यास

नवल ते काय.

सह्याद्रीमध्ये सस्तन प्राण्यांच्या सुमारे १४० प्रजाती आढळतात. त्यातल्या १५ या पूर्णपणे स्थानिक म्हणजे फक्त सह्याद्रीमध्येच आढळणाऱ्या आहेत. यात मुख्यत्वे शेकरू, निलगिरी थार इत्यादींचा समावेश होतो.

सरपटणाऱ्या प्राण्यांच्या २२७ प्रजाती नोंदवल्या गेल्या असून स्थानिक सरपटणाऱ्या प्राण्यांची संख्या खूप मोठी आहे यात Malabar pit viper, stripped coral snake, विविध प्रकारच्या पाली यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

सरपटणारे प्राणी आणि उभयचर प्राणी यांच्यावरील संशोधन मोठ्या प्रमाणात सुरू असून नवनवीन प्रजातींची नोंद होते आहे.



उभयचर प्राण्यांच्या जवळपास १८० प्रजातींचा वावर इथे आहे यापैकी जवळपास ८० टक्के प्रजाती या स्थानिक आहेत, बेडकांच्या अनेक नवनवीन प्रजातींची नोंद होते आहे.

सह्याद्रीतल्या प्रचंड पर्जन्यमानामुळे आणि इथल्या दमट वातावरणामुळे मृदुकाय प्राणी म्हणजेच शंख किंवा गोगलगायी आणि शिंपले मोठ्या प्रमाणात सापडतात. जवळजवळ ८० प्रकारच्या गोगलगायी इथे सापडतात. त्यापैकी २५ स्थानिक आहेत, वास्तविक हा आकडा अजून बराच वाढू शकतो.

या भागात पक्ष्यांच्या पाचशेच्या वर प्रजाती नोंदवल्या गेल्या आहेत. या पाचशे पैकी १६ प्रजाती या स्थानिक आहेत यात Nilgiri pigeon, Malabar grey hornbill, crimson backed sunbird वगैरे पक्षी येतात.

कीटकांच्या प्रजातींची एकूणच जीवसृष्टीमधील संख्या मोठी असून सह्याद्रीमधील कीटकांचा अभ्यास अजूनही म्हणावा तितका झालेला नाही, कीटकांपैकी पतंगाच्या अगणित प्रजाती आहेत.

डोळ्याला सुखावणारी आणि निसर्गामध्ये महत्त्वाचा भाग असणारी फुलपाखरे सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये विपुल प्रमाणात दिसतात.

फुलपाखरांच्या एकूण प्रजातींपैकी ३१३ प्रजाती सह्याद्री मधे सापडतात. यात भारतातील सर्वात लहान फूलपाखरू Grass jewel आणि भारतातील सर्वात मोठे आणि तळकोकणात सापडणारे फूलपाखरू Southern birding यांचा तसेच महाराष्ट्राचे राज्य फूलपाखरू Blue Mormon चाही समावेश होतो.

या सर्व प्राणिजगतात भर पडते ती स्थलांतरीत पक्ष्यांची. शिवाय चातक, Indian putta सारखे local migratory पक्षी म्हणजे या भागाची नवलाई आहे. नुसते पक्षीच नव्हे, तर अनेक प्राणी आणि अगदी फूलपाखरंसुध्दा स्थानिक स्थलांतर करताना आढळतात, हे स्थलांतर मुख्यतः उन्हाचा कडाका आणि मुसळधार पाऊस यापासून वाचण्यासाठी असतं.

हा निसर्गनिर्मित अमूल्य असा ठेवा आपल्याला जपायलाच हवा.

व्यास दीपोत्सव २०२२
विवेकानंद मराठे
यांसकडून
दिपावलीच्या शुभेच्छा!



# कोकणची माती आणि तिचे संरक्षण

**डॉ. नागेश टेकाळे**

कोकणच्या मातीमध्ये रुजणारे हे सर्व वृक्ष या भागाला समृध्दी तर देतीलच पण वृक्षांच्या उत्पादनावर आधारित शेकडो कुटिर उद्योग कोकण भूमीला स्वयंसिद्धतेकडे स्वावलंबनाच्या महाद्वारामधून घेऊन जाऊ शकतात. कोकणच्या मातीचे संरक्षण करावयाचे असेल तर या भूभागाचा विकास तेथील निसर्गाला बरोबर घेऊनच करावयास हवा. निसर्गावरील ओरखडे म्हणजे मातीचा नाश. विज्ञान सांगते की, जेव्हा एक पूर्ण वाढलेला स्थानिक वृक्ष मुळापासून नष्ट केला जातो.

माती हा कृषीचा कणा आहे. जेव्हा ती सेन्द्रिय कर्ब, मूलद्रव्ये आणि उपयुक्त जीवाणूंनी समृद्ध असेल तर हा कणा नेहमीच ताठ, सरळ असतो आणि म्हणूनच अशा मातीमधून पोषण प्राप्त करणारी पिके सुद्धा तेवढीच सुदृढ असतात. मातीचा स्तर हा स्थानिक भौगोलिक परिस्थिती, तेथील पाऊस पाणी आणि वाहणाऱ्या वाऱ्यावर अवलंबून असतो. सतत पाऊस पडणाऱ्या भागात माती ही कायम चीबड असते म्हणूनच अशा जमिनीत पाणी साचतच जाते आणि त्यास पर्याय म्हणून भातासारखे पिक घेतले जाते.

भारताच्या उत्तर पूर्वेकडील राज्यात भरपूर पाऊस पडतो त्याच प्रमाणे महाराष्ट्राच्या कोकण भागातही म्हणूनच भाताशिवाय शेतकऱ्यांना पर्यायच नसतो, विदर्भामधील माती गडद काळी म्हणूनच कापसासारख्या पिकाला योग्य असते तर मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात ती काळसर रंगाची असते मात्र या दोन भूभागांच्या तुलनेत कोकणची माती मात्र लालसर रंगाची आहे आणि त्यास कारण आहे त्या मातीमध्ये असलेले लोहाचे प्रमाण. मुसळधार पाऊस, वारा, थंडी आणि तापलेला उन्हाळा यामुळे या भागामधील लाल जांभा दगडाचे विदिरीकरण होते आणि यातून लाल मातीचा जन्म होतो. ही हजारो वर्षांची प्रक्रिया आहे. कोकणात पश्चिम घाटाची श्रीमंती अफाट आहे, या वृक्ष संपन्न घाटापासून मिळणारी जमिन मात्र काळसर असते कारण मूळ लोह मिश्रीत मातीमध्ये वनस्पतींची पाने व इतर भाग पावसामध्ये कुजून जातात आणि त्यात सेन्द्रिय कर्ब जो काळसर रंगाचा असतो तो वाढू लागतो आणि मातीचा रंग बदलतो. ही माती सुद्धा कृषी उत्पादनासाठी उत्तम समजली जाते. थोडक्यात उत्तर कोकणात म्हणजे पालघर, ठाणे भागात मातीचा रंग काळपट असतो तर दक्षिण कोकण जो गोव्याला जोडलेला आहे तेथे लाल मातीचे प्रमाण जास्त आहे.

कोकणात समृद्धीपासून स्वयंसिद्धता प्राप्त करण्यामध्ये येथील मातीचे योगदान फार मोठे आहे. कोकणच्या सपाट पठारावर लाल मातीच्या खाली जांभा दगड असतो, या दगडाने आज कोकणला समृद्ध केले आहे ते त्यावर उगवून स्थिर झालेल्या हापूसच्या बागांनी. जांभा खडकामधील लोहाचे प्रमाण हापूसच्या लाल गरामध्ये उतरते आणि त्याचा स्वाद आणि चव उत्कृष्ट होते, जांभा दगड आणि त्यावर अनेक वर्षापासून स्थिर झालेल्या हापूसच्या बागांनी आज कोकणला समृद्धीपासून स्वयंसिद्धतेकडे नेले आहे हा संपूर्ण हापूस निर्यातक्षम आहे, तरी पण फळांची संपूर्णपणे निर्यात करण्यापेक्षा स्थानिक तरुण आणि महिलांना रोजगार निर्मितीसाठी त्यामधील अर्धा वाटा तरी हापूस प्रक्रिया उद्योगासाठी वापरणे गरजेचे आहे.

जांभा दगडाचे संरक्षण आणि संवर्धन होणे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे. आज या बहुमोल दगडाचे उत्खनन सुरू आहे. कोकणचा निसर्ग वाचवायचा असेल तर सर्वप्रथम पश्चिम घटामधील अवैध खाणकाम थांबवायला हवे. कोकणच्या लाल मातीवर भात, नाचणी आणि वाल यांचे उत्पादन घेतले जाते. जमिनीमधून प्राप्त झालेले लोह आणि इतर मूलद्रव्ये भाताच्या धान्यात येतात मात्र या भाताला पॉलीश केल्यामुळे ही सर्व पोषक मूल्ये कोंड्यामधून निघून जातात.

कोकणच्या समृद्ध लाल माती मधील मूलद्रव्ये म्हणजेच नत्र आणि पालाश आपणास नाचणीमध्ये आढळतात. नाचणी ही डोंगर उतारावर लावली जाते आणि हे पीक पावसामध्ये वाहून जाणाऱ्या बहुमोल लाल मातीस स्वतःच्या मुळांनी बांधून ठेवते. कोकणच्या लाल मातीचे संरक्षण करायचे असेल तर तेथील डोंगरावर नाचणी लावणे आवश्यक आहे. नाचणी हे पारंपारिक सेन्द्रिय पीक आहे, त्यांचा उताराही कमी असतो म्हणून सध्या कोकणचा शेतकरी भाताच्या तुलनेत या पिकाबद्दल बऱ्यापैकी नकारात्मक भूमिकेत आहे, आणि यास कारण आहे तेथील स्व-मालकीचे डोंगर, डोंगरावरील वृक्षतोडीमुळे तेथील दोन्हीही प्रकारचा बहुमोल मातीचा ऱ्हास होत आहे. वृक्षछायेविना उघडी पडलेली ही माती मुसळधार पावसात वाहून खाली येते आणि नदी पात्रे गाळांनी भरून जातात, चिपळूण, महाडमध्ये साचलेला नद्यांच्या पुरामुळे गुडघ्याएवढा साचलेला चिखल कोकणच्या मातीचा ऱ्हास दर्शवितो. हे सर्व स्वमालकीचे डोंगर वृक्ष संवर्धन आणि संवर्धनातून पुन्हा हरित झाले तरच आपण तेथील मातीचा ऱ्हास थांबू शकतो. अनेक उद्योग समूह या डोंगरांचे कार्बन क्रेडीट घेऊन शेतकऱ्यांना नियमित मोबदला मिळवून देताना तेथील मातीचे अगदी सहज रक्षण करू शकतात.

कोकणच्या लाल मातीला हजारो वर्षाचा इतिहास आहे पण रासायनिक खतामुळे तिच्यामधील सत्त्व नष्ट

होण्याच्या मार्गावर आहे. कोकणामध्ये अशा मातीच्या दरडी कोसळतात त्याला कारण डोंगर माथ्यावरील रासायनिक खतांचा वापर. माळीण गावची दुर्घटना याचे उत्तम उदाहरण आहे. डॉ. माधव गाडगीळ यांच्या पश्चिम घाटावरील अहवालानुसार या संवेदनशील भागात रासायनिक खते आणि कीटकनाशके यांच्या वापरावर पूर्ण बंदी केली तरच येथील माती नद्यांमधून अरबी समुद्रामध्ये जाण्यापेक्षा जागेवरच स्थिर राहून तिचे संरक्षण होऊ शकते.

वाल अथवा पावट्याच्या शेतीमधून सुद्धा कोकणच्या लाल मातीचे उत्कृष्ट पद्धतीने संवर्धन होते आणि यास कारण आहे या पिकांच्या मुळांवर असलेल्या नत्र जीवाणूंच्या गाठी. पिक काढल्यानंतर या गाठी जमिनीमध्ये तश्यात राहतात आणि माती पौष्टिक होते. कोकणमधील आंबा, नारळ, कोकम, सुपारी आणि काजू या वृक्षांचे तेथील लाल मातीशी घट्ट नाते आहे. हे वृक्ष कमी होणे म्हणजेच मातीचा ऱ्हास. म्हणूनच या वृक्षझालरी खाली येथील भूमी संपूर्ण आच्छादित होणे गरजेचे आहे.कोकणच्या मातीमध्ये रुजणारे हे सर्व वृक्ष या भागाला समृध्दी तर देतीलच पण वृक्षांच्या उत्पादनावर आधारित शेकडो कुटिर उद्योग कोकण भूमीला स्वयंसिद्धतेकडे स्वावलंबनाच्या महाद्वारामधून घेऊन जाऊ शकतात. कोकणच्या मातीचे संरक्षण करावयाचे असेल तर या भूभागाचा विकास तेथील निसर्गाला बरोबर घेऊनच करावयास हवा. निसर्गावरील ओरखडे म्हणजे मातीचा नाश. विज्ञान सांगते की, जेव्हा एक पूर्ण वाढलेला स्थानिक वृक्ष मुळापासून नष्ट केला जातो तेव्हा त्याची डेरेदार सावली आणि मूळांची खोली एवढी पौष्टिक मृदा कायमची नष्ट होते, म्हणूनच येथील मातीचे संरक्षण करावयाचे असेल तर कोकणामधील प्रत्येक डोंगर लोकसहभागामधून संवेदनशील म्हणून घोषित होणे गरजेचे आहे. हे डोंगर संरक्षित झाले तरच नद्यांचे उगम सुरक्षित राहतील, त्यांच्या वेगावर नियंत्रण राहील आणि मातीला खऱ्या अर्थाने संरक्षण मिळेल.

कोकणची लाल माती हा लोहाचा समृद्ध स्रोत आहे. तिचे जगणे, राहणे हे कोकणच्या समृद्धीशी जोडलेले आहे म्हणूनच या मातीच्या रक्षणासाठी मोकळ्या जागांवर मोठमोठी गवताळ कुरणे तयार होणे आवश्यक आहे. ही कुरणे मातीला धरून ठेवतात. यावरील गवत खाण्यास पाळीव पशुधन येते, त्यांच्या मलमूत्रामधून ही माती अजून जास्त सुदृढ होते. ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया भागात तेथील मातीचे रक्षण करण्यासाठी अशा गवत कुरणांचा यशस्वी प्रयोग करण्यात आला होता.

कोकणाच्या पश्चिम घाटामधील माती ही जास्त समृद्ध आहे. या मातीचा स्रोत शेतीच्या लाल मातीत मिसळल्यास जीवाणूचे प्रमाण त्याचबरोबर कर्ब मोठ्या प्रमाणावर वाढते आणि शेतकऱ्यांना जास्त उत्पादन मिळते. कोकणच्या माती संरक्षणासाठी तेथे रासायनिक खतांच्या अनियमित, अनियंत्रित वापरावर बंदी हवी. रासायनिक खत मिश्रित माती लोंढ्याच्या रूपात सहज़ वाहून जाते म्हणूनच रासायनिक खताऐवजी या मातीत जैविक घटक जेवढे जास्त वाढवता येतील तेवढा प्रयत्न करावयास हवा आणि यासाठीच म्हणूनच भात शेतीसाठी नील हरित शेवाळाचा जास्त वापर हवा. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रापेक्षा अजून तरी कोकणची माती रासायनिक खतापासून बऱ्यापैकी संरक्षित आहे. मात्र पश्चिम घाटामधील सेंद्रिय कर्बाचा तिला हवा तेवढा फायदा आजही मिळत नाही.

कोकण कृषी विद्यापीठ आणि त्याच्या अंतर्गत येणाऱ्या कृषी विज्ञान केंद्राचे मृदा संवर्धन आणि संरक्षणामधील संशोधन अतिशय मोलाचे आहे पण ते तळागाळामधील शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे अतिशय गरजेचे आहे. फिरत्या परीक्षण प्रयोग शाळेच्या नकाशावर कोकणचे प्रत्येक गाव आणि त्यास जोडलेल्या वाड्या येणे आवश्यक आहे. कोकणमध्ये खऱ्या अर्थाने समृद्धी हवी असेल तर येथील लाल मातीत मोठ्या प्रमाणावर पालेभाज्या आणि फळभाज्यांचे उत्पादन होणे जरुरीचे आहे कारण ही माती त्यास जास्त पोषक आहे.

कोकणच्या मातीत उबदारपणा आहे ओलावा तर आहेच पण जैवविविधता सुद्धा तेवढीच श्रीमंत आहे. कोकणच्या विकासासाठी तेथील सुंदर निसर्ग, रुपेरी समुद्र किनारे, विविध प्राणी, पक्षी, जलस्रोत याबरोबर तेथील मातीही तेवढीच जबाबदार आहे. या मातीचे रक्षण केवळ लोकसहभागामधूनच होऊ शकते. कोकणी माणसाला त्याच्या मातीचा सुगंध जेवढा आवडतो तेवढे तिचे जतन सुद्धा करणे कारण ही लाल मातीच कोकणला खऱ्या अर्थाने समृद्धी कडून स्वयंसिद्धतेकडे घेऊन जाऊ शकते.














# कोकण समुद्र : त्यातील जीव आणि वनस्पती वैभव

**डॉ. स्वप्नजा मोहिते**

समुद्राचं जग समजून घेण्यासाठीच आपल्याला त्याच्या अधिवासांची ओळख करून घ्यायला हवी. समुद्राचं जग सुरू होतं वाळूच्या किनाऱ्यापासून! वालुकामय, चिखलयुक्त किंवा खडकाळ किनारे, किनाऱ्यांवरील खारफुटीची जंगले, खाड्या आणि प्रवाळांचे क्षेत्र हे या सागरी जगाचे महत्त्वाचे भाग. त्या-त्या प्रदेशानुसार इथली जैवविविधता बदलते आणि त्यामुळेच कोकण किनारपट्टी ही समृद्ध बनते.

शास्त्रज्ञ सांगतात की, पृथ्वीची उत्पत्ती ३.५ ते ४ अब्ज वर्षांपूर्वी झाली आणि या उत्पत्तीच्या कालावधीत निर्माण झाले महासागर, समुद्र आणि जमीन. या सागरांचा आपल्या सगळीच जीवसृष्टीशी महत्त्वाचा संबंध आहे. आपले जगणे आणि श्वास घेणे, पृथ्वीवरचे कार्बन आणि प्राणवायूचे चक्र, आपल्या हवामानात होणारे बदल, पृथ्वीवरचे जलचक्र आणि त्यामुळे आपल्याला मिळणाऱ्या गोड्या पाण्याचे स्रोत, आपले खास आवडीचे सीफूड म्हणजे मासे आणि इतर जलचर, सारे समुद्राशी, त्याच्या पर्यावरणाशी निगडित आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा ७१ टक्के भाग व्यापणाऱ्या या जलस्रोतांचा हिस्सा भारतालाही लाभला आहेच. मेरीटाईम नेशन असणाऱ्या भारताच्या पश्चिमेला असणारी कोकण किनारपट्टी म्हणूनच महत्त्वाची! महाराष्ट्राला लाभलेला हा ७२० किलोमीटरचा सागरकिनारा म्हणजेच आपली कोकण किनारपट्टी. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे सहा जिल्हे कोकणात समाविष्ट आहेत.

या पार्श्वभूमीवर कोकण म्हटलं की नजरेसमोर येतो तो नजरेच्याही टप्प्यापलीकडे पसरलेला समुद्र.... त्याचा अथांग निळाशार गहिरेपणा, त्याला वेढणारे चमचमत्या वाळूचे स्वच्छ सुंदर किनारे आणि झालरीसारख्या पांढऱ्या शुभ्र लाटांचं त्याला लाभलेलं कोंदण! पण समुद्राचं जग समजून घेण्यासाठीच आपल्याला त्याच्या अधिवासांची ओळख करून घ्यायला हवी. समुद्राचं जग सुरू होतं वाळूच्या किनाऱ्यापासून! वालुकामय, चिखलयुक्त किंवा खडकाळ किनारे, किनाऱ्यांवरील खारफुटीची जंगले, खाड्या आणि प्रवाळांचे क्षेत्र हे या सागरी जगाचे महत्त्वाचे भाग. त्या - त्या प्रदेशानुसार इथली जैवविविधता बदलते आणि त्यामुळेच कोकण किनारपट्टी ही समृद्ध बनते. सूर्यप्रकाश पोहोचू शकणाऱ्या पेलॅजिक झोनपासून ते जिथे





प्रकाश पोहोचू शकत नाही अशा गडद अंधाऱ्या अबायसल झोनपर्यंत हे समुद्राचं राज्य पसरलेलं आहे. आपला हा समुद्रही अद्भुत आणि अजूनही न कळलेल्या अशा कित्येक जलचरांचे निवासस्थान आहे. या अंडर वॉटर जगाचे आपल्याला सतत कुतूहल वाटत असते. यातील फोटिक म्हणजे प्रकाशमय भागात सूक्ष्म एकपेशीय वनस्पती आणि प्राणी प्लवंगांपासून अफाट पसरलेल्या सागरी शैवाल ते अवाढव्य शरीराच्या व्हेल्सपर्यंत असंख्य जलचर राहत असतातच. पण समुद्राच्या खोल भागातही अनेक जलचर वास्तव्य करून असतात. इथल्या अंधाराला, अत्यंत कमी तापमानाला आणि इथे असणाऱ्या प्रचंड दाबाला अनुकूल अशी त्यांची शरीररचना त्यांना इथे जगायला मदत करत असते.

**वालुकामय किनारे :** वाळू, शंख - शिंपले यांचा चुरा आणि बारीक खडी यांनी व्यापलेले हे किनारे समुद्राचे बफर झोन्स म्हणता येतील. लाटांचा तडाखा सतत सहन करत, हे किनाऱ्यांचं संरक्षण करत असतात. सिलिका वाळू किंवा कार्बोनेट वाळू अशा दोन प्रकारची वाळू इथे आढळते. या वालुकामय किनाऱ्याचे निरीक्षण केल्यास इथे आपल्याला असंख्य प्रकारचे आणि आकाराचे मृदुकाय प्राण्यांच्या वर्गातील जीवांचे शंख - शिंपले वाळूत रुतलेले आढळतील. तसरे मुळ्ये, वाटी किंवा लाळी मुळ्ये, बटन शेल्स, एंजल विंग्स आणि अनेक प्रकारचे छोटे मोठे शिंपले इथे पाहायला मिळतात. तसेच वाळूवर तुरुतुरु धावणारे घोस्ट क्रॅब्स, लाटांबरोबर वाहून आलेले स्टारफिश आणि फुग्यासारखं किंवा छत्रीसारखं शरीर असणारे जेलीफिशेस ही इथे पाहायला मिळतात.

**खडकाळ किनारे :** कोकणच्या किनारपट्टीत अनेक ठिकाणी खडकाळ किनारपट्टी बघायला मिळते. महाराष्ट्राच्या किनारपट्टीत अग्निजन्य खडकामुळे तयार झालेले महत्त्वाचे ३२ खडकाळ किनारे आहेत आणि ते



इंटर टायडल इकॉलॉजीचा महत्त्वाचा भाग आहेत. वाळू आणि त्यांच्या अध्ये- मध्ये असणारे हे खडक भरतीच्या पाण्याला काही प्रमाणात अडवून रॉक पूल्स तयार करतात आणि हे पूल्स असंख्य प्रकारच्या सूक्ष्म वनस्पती, प्राणी प्लवंगांपासून मोठ्या सागरी शैवाल, मासे, समुद्रफुले, सी अर्चिन, खेकडे, सी स्लग्ज (समुद्र काकडी), प्रवाळ, स्पॉन्जेस, शंख - शिंपले आणि इतर जीवांना आसरा देतात. प्रत्येक रॉक पूल ही एक स्वतंत्र इको सिस्टिम असते. सागरी शेवाळाचे कॉलरपा, उल्व्हा, पडायना, एंटेरोमॉर्फा, पोरफायर तसेच काही कोरलाईन अल्गी ही इथे आढळतात. अनेक प्रकारचे लहान मोठे सुंदर रंगीत मासे उदाहरणार्थ डॅमसेल, टार्गेट पर्च, सार्जंट मेजर, बोयर, स्कॅट तर इथे आढळतातच पण या पूल्सचं सौंदर्य खुलतं ते इथल्या प्रवाळ आणि त्यांच्या सोबतीने वाढणाऱ्या स्पॉन्जेसमुळे! सच्छिद्र शरीर रचनेचे हे प्राणी खडकांना किंवा प्रवाळांना चिकटून वाढतात. पांढऱ्या रंगापासून ते स्पंज निर्माण करतात लाल, हिरवा, निळा, पिवळा, गुलाबी, केशरी अशा अनेक रंगांचे स्पॉन्जेस कोकण किनाऱ्यांवर आढळतात. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे या स्पॉन्जेसपासून वेगवेगळ्या रोगांवर औषधे मिळू शकतात हे आता सिद्ध झाले आहे आणि आम्ही त्यावर कामही सुरू केले आहे. या स्पॉन्जेसच्या अनेक प्रजाती आपल्याकडे आढळतात. त्यात हॅलिक्लोना, ओपलीथिओस्पॉन्जीया, अँफीमेडॉन, हायोर्टीस, आयलोक्रॉईया, झेटोस्पॉन्जीया अशा प्रजाती सापडतात. पण यांचा अजून अभ्यास आणि संशोधन करण्याची गरज आहे. खारफुटीची जंगले आणि चिखलयुक्त प्रदेश : सगळ्या सागरी किनाऱ्यांचा हा महत्त्वाचा भाग. खारे किंवा निमखारे क्षेत्र, खाड्या, बॅक वॉटर्स, सॉल्ट मार्श आणि कोस्टल मड फ्लॅट्स यांना लागून असणाऱ्या प्रदेशात क्षारतेतील बदल सहन करू शकणारी ही विशेष झाडे आढळतात. हे खारफुटीचे प्रदेश म्हणजे सागरी जलचरांची आश्रय आणि खाद्य स्थानेच! मासे आणि अनेक जलचर इथे अंडी घालायला येतात आणि त्यांची पिल्ले इथल्या पोषक वातावरणात वाढून, आपल्या पुढील जीवनक्रमासाठी सागराकडे स्थलांतर करतात. ही क्षेत्रे 'बायोझोन्स' म्हणूनही ओळखली जातात. कारण समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यांचा किंवा त्सुनामीचा तडाखा झेलून, त्यांचा वेग कमी करण्यात ते मदत करतात. म्हणूनच खारफुटी प्रदेशांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. किनाऱ्यांची धूप टाळण्यासाठी ही खारफुटी किंवा चिपीची झाडे महत्त्वाची ठरतात. या झाडांना हवेतून प्राणवायू घेण्यासाठी खास मुळे असतात. मासे, खेकडे, इतर अनेक कवचधारी प्राणी, साप, सरडे, बेडूक, मगर, ब्राह्मणी घार, गरुड, कावळे, बगळे, खंड्या असे अनेक प्रकारचे पक्षी, कीटक, शंख - शिंपले वर्गीय प्राणी या खारफुटीच्या प्रदेशात राहत असतात. तिवर, किरपा, लहान झुंबर, झुंबर, किरकिरी किंवा सोनचिपी, कांदळ, मोठा कांदळ, लाल कांदळ, करपू, मरांडी, भेलांडा असे खारफुटीचे प्रकार आपल्या इथे सापडतात. त्याचबरोबर मॅन्ग्रोव्ह असोसिएट प्रकारात मोडणारे मिस्वाक, कांदळवन नेचे, घोळ, गोट्स फूट, बरिंगटोनिया अशा अनेक वनस्पती इथे आहेत. महत्त्वाचे म्हणजे यातील कित्येक वनस्पती औषधी आहेत आणि किनारपट्टीतील लोक यांचा आपल्या आहारात किंवा औषधांत वर्षानुवर्षे वापर करत आहेत.

मड फ्लॅट्स किंवा चिखलयुक्त प्रदेश हे प्रवाहाबरोबर वाहून आलेल्या सिल्टमुळे तयार होत असतात. ही एक अतिशय उत्पादक अशी इको सिस्टिम असते. मुंबईतील शिवडी यापैकीच एक. या ठिकाणी दरवर्षी येणारे फ्लेमिंगोज आणि इतर स्थलांतरित पक्षी या आगारातील एक वेगळीच ओळख देतात.

**प्रवाळांचे क्षेत्र :** या सगळ्या सागरी परिसंस्थेत प्रवाळांच्या बेटांना खूप महत्त्वाचं स्थान आहे. केंब्रियन युगात ५३५ अब्ज वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेली ही प्रवाळ खरं तर असंख्य जलव्याल किंवा हायड्रा सारख्या प्राण्याची वसाहत असते. स्वतःच्या संरक्षणासाठी ते कॅल्शियम कार्बोनेटचं आवरण स्वतःभोवती तयार करत असतात. याचबरोबर त्यांनी स्रवलेल्या रंगद्रव्याप्रमाणे हे प्रवाळ लाल, गुलाबी. पिवळे, केशरी, जांभळे, निळे अशा



विविध रंगछटांमध्ये आढळतात. या प्रवाळाच्या कॉलनीज समुद्रतळावर तसेच खडकाळ किनारपट्टीतही वाढतात. आपल्या वन्य जीव संरक्षण कायद्याने प्रवाळांच्या सगळ्या प्रजातींना संरक्षित म्हणून घोषित केलं आहे. ही प्रवाळे आपल्या महाराष्ट्राच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग किनारपट्टीतही आढळतात. रत्नागिरी जिल्ह्यातील विजयदुर्ग किल्ल्यापासून जवळ असणारे आंग्रिया बँक हे तर खास उल्लेख करण्यासारखे बेट आहे. ८०० चौरस किमी क्षेत्रफळाच्या या समुद्रात बुडलेल्या बेटाभोवती प्रचंड जैवविविधता आढळली आहे. इथे संशोधन करणाऱ्या राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्थेच्या संशोधकांना इथे एकूण जैवविविधतेच्या २०० प्रजातींमध्ये प्रवाळाच्या ५४ प्रजाती आढळल्या आहेत. याचा विचार करतानाच आपल्या रत्नागिरी किनारपट्टीत सापडणाऱ्या प्रवाळांच्या प्रजातींचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरेल. प्रवाळांची बेटे किंवा रीफ्स असंख्य जलचरांच्या सपोर्ट सिस्टिम्स आहेत. अन्न मिळवण्यासाठी , निवारा किंवा लपण्याच्या जागा म्हणून किंवा नर्सरी ग्राउंड्स म्हणून अनेक जलचर या प्रवाळांच्या बेटांचा आश्रय घेतात.

प्रवाळांच्या सोबत वाढणारे स्पॉन्जेस, सागरी शैवांल आणि इतर जीव हे अनेक सागरी अन्न साखळ्यांचे दुवे असतात. आपल्या किनारपट्टीचा अभ्यास करताना प्रवाळ आणि या सागरी स्पॉन्जेसचा असलेला सहसंबंध लक्षात येतो. त्याच बरोबर चांदणी मासे, ब्रिटल स्टार, सी अर्चिन, इलिशियासारखे न्यूडिब्रँक्स, मासे, कालवे, शिंपले आणि सागरी शैवालाच्या कॉलरपा, सरगॅसम, पडायना, कोरॅलीना, अँफिरोआ सारख्या कोरलाईन अल्गी, उल्व्हा, ग्रॅसिलॅरिया आणि इतर असंख्य प्रजाती इथे सापडतातच पण त्याच बरोबर खेकडे, समुद्र काकडी, डॅमसेल, सार्जंट मेजर सारखे अनेक रंगीत मासे आणि स्पॉन्जेसच्या १८ प्रजाती इथे सापडल्या आहेत. हे आपल्या किनारपट्टीतील जैवविविधतेचं द्योतक आहे आणि म्हणूनच त्याची काळजी, संरक्षण तेवढंच गरजेचं आहे. रत्नागिरीच्या अलावा, मिऱ्या, उंडी, वायंगणी अशा बहुतेक खडकाळ किनाऱ्यांवर प्रवाळांच्या सॉफ्ट कोरल्स प्रजाती विशेषतः फॅविआ, हार्ड कोरलच्या पोरिट्स, अक्रोपोरा, मोन्टीपोरा अशा प्रजाती आपल्या किनाऱ्यावर आढळतात.

पण आज जगभरातील प्रवाळांचा मृत्यू आणि त्यामुळे त्यांचे होणारे ब्लिचिंग ही चिंतेची बाब बनली आहे. International Union for Conservation of Nature च्या अभ्यासानुसार जगभरातील सागर खूप जास्त प्रमाणात उष्णता शोषित आहेत आणि त्याचबरोबर त्यात विरघळणाऱ्या कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाणही अनेक पटीने वाढले आहे. समुद्रातील भौतिक, रासायनिक आणि जैविक घटकांवर त्याचा परिणाम होऊन त्याची उत्पादकता आणि कार्यक्षमता जर अशीच घटत राहिली तर त्यातील अन्नसाखळींवर त्याचे दूरगामी परिणाम होतील.

म्हणूनच आपली जैवविविधता जपणे आपले कर्तव्य आहे हे विसरून चालणार नाही. ही जैवविविधता आपल्या किनारपट्टीला एक विशेष ओळख तर देतेच पण आपल्याला मिळणाऱ्या मत्स्यसंपत्तीतही या सगळ्या प्रवाळ आणि त्यांच्या सोबतच्या या सजीवांची महत्त्वाची भूमिका असते. समुद्र किनाऱ्यावरील पर्यटनाला एक वेगळा आयाम ही जैवविविधता मिळवून देऊ शकते. पण ह्या जैवविविधतेला धक्का न लावता तिचा योग्य उपयोग करून घेता येऊ शकेल. पर्यटनाला जागरुकतेची जोड देऊन अनेक ठिकाणी तसे प्रयोग केले गेले आहेत. डोळसपणे आपल्या या नितांत सुंदर जैवविविधतेचा शोध, अभ्यास आणि योग्य उपयोग करणे आपल्याच हातात आहे. समुद्र, ज्याच्या अस्तित्वात आपले अस्तित्व आहे..... त्याचा विचार, अभ्यास आणि जोपासना याची प्रतिज्ञा आपण सगळ्यांनीच घेतली पाहिजे. बदलते हवामान, येणाऱ्या महामारी आणि एकूणच पृथ्वीवरील जाणवणारे बदल यांच्या पार्श्वभूमीवर आज आपण आपलीही जबाबदारी ओळखणे गरजेचे आहे.

## रहस्यकथांचा बादशाह म्हणजे आपला धनंजय दिवाळी विशेषांक


**या अंकातील खास आकर्षण**
**लेख :**
अरुण नेरुरकर - **मानव आणि मानवता**
वासंती फडके - **डेमॉन गलगुट**
पंकज भोसले - **पातंजलीनाथ** आणि **चर्च टॉवरची घंटी**

**कथांचे खास प्रकार :**
विज्ञान / काल्पनिका कथा
गुन्हेगारी कथा
अनुवादित कथा
दहशत कथा
फसगत कथा
चित्रकथा
गूढकथा
समर्थ कथा
वैद्यकीय कथा
भय गूढकथा

**मुखपृष्ठ** - सतीश खानविलकर
**अंतर्गत सजावट -**
सतीश खानविलकर
सतीश भावसार
भ. मा. परसवाळे
शेखर शिंपी
साईनाथ रावराणे
अनीश दाते

**धनंजय दिवाळी २०२२**
**मूल्य रुपये ४०० /-**
मागील वर्षी दिवाळी अंक प्रसिद्ध झाला. या अंकाचे उत्स्फूर्तपणे स्वागत झाले. त्याबद्दल सर्व रसिक वाचकांचे आणि वाचकांपर्यंत दिवाळी अंक पोचवणाऱ्या सर्व विक्रेत्यांचे हार्दिक अभिनंदन !

विविध प्रकारच्या कथांची रेलचेल असणारा हा रसिकमान्य दिवाळी अंक आहे.




**तब्बल १० प्रकारच्या कथा, चौकटी, वात्रटिका** आणि **चित्रांकन सजावटींनी** सजलेला **धनंजय दिवाळी अंक** आता रसिक वाचकांच्या सेवेला हजर झाला आहे.

सर्व वाचक, लेखक, चित्रकार, जाहिरातदार आणि हितचिंतकांना ही **दिवाळी आणि नूतन वर्ष सुखसमृद्धीचे, भरभराटीचे जावो यासाठी शुभेच्छा !**

**धनंजय दिवाळी २०२२**
**रहस्यकथांचा बादशाह**
**आपली अमूल्य प्रत**
**आजच राखून ठेवा.**

**व्यवस्थापन -**
धनंजय कार्यालय, महाराजा बिल्डिंग,
पहिला मजला, गिरगाव चर्चसमोर, गिरगाव,
मुंबई - ४००००४
दूरध्वनी - २३८२३५४८ भ्रमणध्वनी - ९८२००११७०३
इ मेल - neelimakulkarni19@gmail.com

**विशेष सहाय्य -** अतुल जोशी, देवयानी कानसे, अजय कदम, विजय बारगुडे



# उपलब्ध पाणी हे कोकण विकासाला सहाय्यक ठरू शकेल काय?

डॉ. दत्ता देशकर

आपल्याजवळ काय नाही याची चिंता करत बसण्यापेक्षा आपल्याजवळ काय आहे, त्याचा आपण आपल्या विकासाठी कसा वापर करू शकतो हे उचित ठरणार नाही का? एक पर्यटनस्थळ निर्माण करणे म्हणजे किमान १०० लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे होय. हा झाला प्रत्यक्ष रोजगार. यापेक्षाही अप्रत्यक्ष रोजगार तर अमाप असतो.

कोकणाच्या आर्थिक प्रगतीचा अभ्यास करण्याआधी कोकणाची काही खास वैशिष्ट्ये अभ्यासणे आवश्यक ठरेल.

(१) सह्याद्रीचे डोंगर आणि अरबी समुद्र यांच्यामध्ये निर्माण झालेल्या चिंचोळ्या पट्टीत कोकण बद्ध झाले आहे. ते पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात विभाजित झाले आहे. या चिंचोळ्या पट्टीची रुंदी फक्त ४० ते ५० किलोमीटर एवढीच आहे. पण खास वैशिष्ट्य म्हणजे या चिंचोळ्या पट्टीचेही तीन भाग पडतात. डोंगराचा अत्यंत उतार, मध्य उतार आणि सपाट जमीन असे ते तीन भाग होत. पर्यावरणाच्या दृष्टीने सहा जिल्हे आणि तीन भाग असे एकूण अठरा भाग पडतात. नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे हे पंधरा भाग पर्यावरणशास्त्राच्या दृष्टिकोनातून एकमेकापेक्षा पूर्ण अलग आहेत. त्यामुळे या संबंधात कोणताही विचार करताना एखादे तत्त्व सर्वांना एकत्र लावणे शक्य होत नाही. समुद्रसपाटीपासून डोंगरमाथ्यापर्यंतचा उतार हा जवळपास १००० मीटरचा आहे.

(२) पूर्ण कोकणाचे क्षेत्रफळ ३०३९४ चौरस किलोमाटर आहे. उत्तरेपासून थेट दक्षिणेपर्यंत एकूण ७२० किलोमीटरचा हा प्रदेश आहे. रुंदीचा उल्लेख वर आलेलाच आहे. ती ४० ते ५० किलोमीटर इतकी आहे. भूगर्भ मात्र विविध भागात विविध स्वरूपाचा आहे. काही भागात लाव्हा रसापासून तयार झालेले कठीण खडक आहेत तर काही ठिकाणी लॅटेराइट मातीचे, गाळाच्या मातीचे तर नद्यांच्या मुखापाशी रेतीचे जास्त प्रमाण आढळते. दापोलीपासून वरच्या भागात लाव्हा रसापासून बनलेल्या खडकांचा भूगर्भ आहे तर त्यांचे खाली जांभ्या खडकांचा भाग जास्त आहे. जमिनीत पाणी मुरण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येकाचे वैशिष्ट्य वेगवेगळे आहे.

(३) कोकणात एकूण मोठ्या २२ नद्या वाहतात. सर्वांचा उगम सह्याद्रीच्या रांगांमधून होतो आणि त्या सर्व अरबी समुद्राला मिळतात. सर्व नद्या डोंगराळ प्रदेशातून वाहात असल्यामुळे त्यांची खोली जास्त आहे. पण भारताच्या उत्तरेकडे वाहात असलेल्या नद्यांना जसे विशाल खोरे लाभले आहे तसे इथे आढळून येत नाही. १००० मीटर उंचीवरून वेगाने येणारे पाणी तितक्याच वेगाने समुद्रात जाते, त्यामुळे भूजल पातळीला त्याचा कोणताही लाभ मिळत नाही. कोकणाची संपूर्ण रुंदीच ४०-५० किलोमीटरची असल्यामुळे साहाजिकच नद्यांची लांबीही अत्यंत कमी आहे. नदी जेव्हा समुद्राला मिळते तिथे जो त्रिभुज प्रदेश तयार होतो तोही प्रत्येक ठिकाणी छोटा आढळतो. पावसाचे सर्व पाणी वेगाने वाहून जात असल्यामुळे जवळपास सर्वच नद्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात. काही नद्यांच्या डोहात मात्र पाणी आढळते. तेही आता उत्तरोत्तर कमी होत आहे. पडणाऱ्या पावसाच्या जवळपास ९९ टक्के पाणी वाहून समुद्राला मिळते. 'दैव देते आणि कर्म नेते' ही म्हण इथे तंतोतंत लागू पडते.

(४) पावसाचे पाणी वेगाने वाहून जात असल्यामुळे ते भूजल पातळी वाढविण्यास उपयुक्त ठरत नाही याचा उल्लेख आधी आलेलाच आहे. भूजलाच्या पातळीत मोसमाप्रमाणे खूपच चढउतार आढळतात. पावसाळ्यात ओसंडून वाहात असलेल्या विहिरी उन्हाळ्यात चक्क कोरड्या पडतात. त्यांना बारमाही पाणी नसल्यामुळे त्याचा शेतीवर विपरीत परिणाम जाणवतो. बारमाही शेती त्यामुळे शक्य होत नाही. ही एक मोठीच मर्यादा समजायला हवी. खरीप हंगामात सपाट जमिनीवर तांदळाचे पीक प्रामुख्याने घेतले जाते. तर अति उतारावर नाचणी व बाजरी ही पिके घेतली जातात. फळबागांवर जास्त लक्ष दिले जाते. आंबा, काजू, नारळ, सुपारी, आवळा, अननस, चिकू ही फळपिके प्रामुख्याने घेतली जातात. रब्बी हंगामात प्रामुख्याने दालवर्गीय पिके घेतली जातात. जमिनीतील ओल आणि दव यांचे भरवशावर ही पिके येतात. जमिनीचा हलका पोत आणि जास्त तापमान यामुळे मसालावर्गीय पिके, कॉफी. चहा, रबर यासारखी पिके घेता येत नाहीत. यात आता पुन्हा हवामान बदलाचे संकट उभे ठाकले आहे. अवेळी येणाऱ्या पावसाने फळबागांना येणारा बार कमी झाला आहे. गळती खूपच वाढली आहे. त्यामुळे फळबाग उद्योग संकटात सापडला आहे. येथील शेतकरी कष्टाळू आहे पण निर्माण झालेल्या शेतमालाला योग्य किंमत मिळत नसल्यामुळे त्याचे सर्व प्रयत्न विफल होतात. वाहतुकीचा योग्य विकास न झाल्यामुळे मुंबईसारखी बाजारपेठ उशाशी असून सुद्धा तिचा लाभ घेता येत नाही.

(५) स्थलांतर हा कोकणाला लागलेला मोठा शाप आहे असे म्हणावे लागेल. लोकसंख्येचा कार्यशील हिस्सा हा मुंबईकडे जातो आणि वयस्कर लोक व महिला यांचे प्रमाण सर्वत्र जास्त आढळते. काम करायला मजूर अभावानेच आढळतात. मी कोकणात एका ठिकाणी भाषणानिमित्त गेलो असताना सर्वसाधारण मजुरी ५०० ते ६०० रुपये आहे असे कळले. याशिवाय कामावर आल्याबरोबर पेज, दुपारचे जेवण, दुपारचा चहा हाही दिला जातो. शिवाय काम संपल्यावर ताबडतोब रोखीने मजुरी द्यावी लागते. आणि मी कामावर आलो म्हणजे तुमच्यावर उपकार केले आहेत हा भाव चेहेऱ्यावर बघावा लागतो. स्थानिक मजूर उपलब्ध नसल्यामुळे परप्रांतातून मजूर येतात. त्यात नेपाळी मजुरांचा भरणा जास्त आढळतो.

(६) शेतजमिनीची स्थिती तर फारच गंभीर असलेली दिसते. कुटुंबातील सदस्य नोकरीनिमित्त जरी बाहेरगावी जात असले तरी ते गावातील जमिनीवरील आपला हक्क सोडत नाहीत. त्याच्या मुळे एकेका सातबारावर जमिनीचा तुकडा छोटा असला तरीही ४०-५० नाव असतात. यावरून मला 'मुळशी पॅटर्न' या सिनेमाची आठवण आली. शेवटी तो गोळी मारणारा मुलगा म्हणतो, 'मी तो चाळीसावा सही करणारा.' कुटुंबातील जो माणूस शेती सांभाळतो त्याला शेतीशिवाय हा सर्व लवाजमा सांभाळावा लागतो व शेती कसण्यातील त्याचा हुरूप संपुष्टात येतो. यामुळे दीर्घकालीन विकास होणे सर्वथैव अशक्य होते. त्यामुळे शेतीत दीर्घकालीन सुधारणा अभावानेच आढळतात.

(७) कोकणात मंदिरांची संख्या भरपूर आहे. जवळपास सर्वच मंदिरांच्या परिसरात तलाव आहेत. हे तलाव पिण्याच्या पाण्याची गरज भागवतात. त्याचबरोबर बरेचसे तलाव सिंचनाच्या कामासाठी वापरले जातात. या तलावांद्वारे भूजल पुनर्भरणही होते. विकासाचे वारे लागल्यावर कोकणात सरकारने बरीच धरणे बांधण्याचा प्रयत्न केला. पण हा सर्व आतबट्ट्याचा व्यवहार ठरला. बरीचशी धरणे ६००० कोटी पेक्षा जास्त खर्च होऊनही अपूर्णावस्थेत आहेत. त्यांच्या क्षमतपैकी फक्त २० ते २५ टक्के पाणीच फक्त अडविण्यात आले आहे. त्यापेक्षाही दुर्दैवाची बाब म्हणजे होणारा वापर फक्त १ टक्का आहे ही लाजीरवाणी बाब आहे. होणारी जलविद्युत निर्मीतीही उंटाच्या मुखातील मोहरीएवढी आहे. या धरणांचा लाभ तर झाला नाहीच, पण त्यामुळे लोकांचे विस्थापन, त्यांच्या जीवन पद्धतीत बदल, पूजन होत असलेल्या स्थळांचे उच्चाटन, जंगलकटाई, जंगली जनांवरांच्या निवासांचा नाश, हत्ती, वाघ, मासे आणि वनगायी यांच्या मुक्त विहाराला अडथळे, पैशाचा वारेमाप अपहार या संकटांना तोंड द्यावे लागले. बहुतांश प्रकल्पांनी पर्यावरणीय नियमांची पायमल्लीही केलेली आढळते.

**या परिस्थितीवर उपाय काय?**

परिस्थिती भयावह आहे. संकटे अनेक आहेत पण त्यावर उपाय शोधणे यातच पुरुषार्थ आहे. सर्वात मोठा बदल अपेक्षित आहे तो लोकांच्या मानसिकतेत. तो जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सर्व प्रयत्न व्यर्थ ठरतील. व्यवस्थापन शास्त्रात स्वॉट ॲनॅलिलिस (SWOT = Strength, Weaknesses, Opportunities And Threats) नावाचा एक अभ्यास आहे. माझी शक्तिस्थाने कोणती आहेत, माझ्यात काय कमतरता आहे, माझ्यासमोर कोणत्या संधी आहेत आणि त्या प्राप्त करण्यात कोणत्या अडचणी आहेत हा अभ्यास जसा व्यक्तीसाठी महत्त्वाचा आहे तसा तो प्रदेशालाही लागू होतो. तो होत नाही हेच कोकणाचे खरे दुःख आहे. आपली ताकद कशात आहे हे सर्वप्रथम जाणून घेण्याची गरज आहे. आपली ताकद आहे, सृष्टिसौंदर्य, ७२० किलोमीटरचा लाभलेला समुद्र किनारा, शांतता आणि लोकांचा असलेला मनमिळावू स्वभाव, डोंगरराजीतील विविध स्वरूपाच्या वनसंपत्ती. या सर्वांचा वापर करून कृषी पर्यटन विकास केला तर कोकणाचे स्वित्झरलँड झाल्याशिवाय राहणार नाही.

हा प्रदेश जगाचे एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळखला जातो. आपल्याजवळ काय नाही याची चिंता करत बसण्यापेक्षा आपल्याजवळ काय आहे, त्याचा आपण आपल्या विकासाठी कसा वापर करू शकतो हे उचित ठरणार नाही का? एक पर्यटनस्थळ निर्माण करणे म्हणजे किमान १०० लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे होय. हा झाला प्रत्यक्ष रोजगार. यापेक्षाही अप्रत्यक्ष रोजगार तर अमाप असतो. आपल्या प्रदेशात पिकलेले धान्य, भाजीपाला, फळफळावळे यांना घरातच मिळालेला मोठा बाजार

दुर्लक्षून चालणार नाही. मुंबई, पुणे येथील प्रत्येक नागरिक नवनवीन पर्यटनस्थळांच्या शोधात असतो. त्याला शांतता हवी असते. चविष्ट जेवण हवे असते. महाबळेश्वर, माथेरान, अलिबाग ही स्थळे आता पाहून झाली आहेत. प्रत्येक पर्यटक जिथे जातो तिथल्या स्थानिक निर्माण झालेल्या वस्तू खरेदी करत असतो. त्यामुळे स्थानिक हस्तकलांनाही प्रोत्साहन मिळते.

एका पर्यटनस्थळामध्ये कोणकोणत्या सोयी असाव्या हा तर खास अभ्यासाचा विषय आहे. त्यांची यादी तयार केली तर कागद कमी पडतील पण यादी संपणार नाही. 'एक नवीन सोय ॲड करा आणि नवीन शंभर पर्यटक मिळवा' अशी परिस्थिती आहे. राहता राहिला कामगारांचा प्रश्न. आज देशात इतकी बेकारी आहे की असंख्य कामगार मिळवता येतील. मध्यंतरी मला वर्तमानपत्रातील एक बातमी वाचून तर आश्चर्याचा धक्काच बसला. 'कोकणात एका गावात छटपूजा मोठ्या प्रमाणात साजरी झाली' ही ती बातमी होती. छटपूजा हा परप्रांतीयांचा सण आहे. तो आपल्या प्रदेशात एवढ्या मोठ्या प्रमाणात साजरा होतो याचा अर्थ असा की, एवढ्या मोठ्या प्रमाणात परप्रांतीय आपल्या प्रदेशात वास्तव्यास आहेत. आपण पर्यटन व्यवसाय सुरू केला तर हा लोंढा आणखी वाढेल व आपल्याला कामगार कमी पडणार नाहीत याची खात्री बाळगा. पाणी जशी आपली वाट शोधून घेते, तसा रोजगारही आपली वाट शोधून घेत असतो.

आता तुम्ही म्हणाल, 'या योजनेत पाण्याचा कुठे संबंध आला.' प्रत्येक पर्यटनस्थळाला अमाप पाणी लागत असते. पाण्याशी निगडित अनेक खेळ आहेत ते आपल्या पर्यटनस्थळापाशी सुरू केले जाऊ शकतात. पाणी फक्त शेतीलाच आणि कारखान्यांनाच लागते या भ्रमात कोणीही राहू नये. पर्यटनस्थळात चांगल्या बागा उभ्या करणे, पाणी खेळवणे, कारंजी उभारणे, पाण्याचे खेळ सुरू करणे यासाठीही पाण्याचा वापर होतो हे विसरून चालणार नाही.

आणखी एका महत्त्वाच्या मुद्याकडे मी आपले लक्ष आकर्षित करू इच्छितो. पर्यटन विकास हा महिला उद्योजकांसाठी एक सुवर्ण संधी आहे. प्रत्येक पर्यटन केंद्रात भोजन व्यवस्था हा केंद्रबिंदू असतो. भोजन जितके स्वादिष्ट तितके पर्यटनस्थळ अधिक पॉप्युलर होते. शिवाय महिला बचत गटात तयार झालेले पदार्थ आणि वस्तू यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होते ती गोष्ट वेगळीच. आज समाजात महिलांचा रोजगार हा प्रश्न दुर्लक्षित आहे. त्याला या प्रकल्पामुळे भरपूर गती मिळेल.

शेतीचा प्रश्न विचारात घेतला तर कोकणातील शेतीला फक्त संरक्षित पाण्याची गरज आहे असे म्हणता येईल. ते मिळवण्यासाठी मोठी धरणे कामाची नाहीत तर जलयुक्त शिवार योजनाही ही गरज भागवू शकतात. फक्त या योजनेचे नियोजन योग्य झाले पाहिजे. उसाला भरपूर पाणी लागते आणि इथे तर भरपूर पाणी आहे. इतके असून सुद्धा हे पीक इथे घेतले जात नाही याचे प्रमुख कारण म्हणजे या ठिकाणी पाहिजे तेवढा उतारा मिळत नाही. केळी हे पीक कोकणात आदर्श पीक आहे. त्यासाठी बारमाही पाणी उपलब्ध केले तर या पिकावर लक्ष केंद्रित केले जाऊ शकते. मोठे कारखाने, मोठ्या उद्योग संस्था यांच्या जंजाळात न फसता आपली क्षमता काय आहे हे पाहून पाय पसरले तर ते निश्चितच स्वागतार्ह ठरेल.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**शुभांगी कोंदे**
**यांसकडून**
**दिपावलीच्या शुभेच्छा!**



दिवाळी २०२२

# संवादसेतू

किंमत रु.२५०/-

संपादक : डॉ वंदना बोकील-कुलकर्णी

अल्पावधित रसिकमान्यता मिळवलेला, सलग ६ वर्षे विविध पुरस्कारप्राप्त, चोखंदळ वाचकांनी नावाजलेला अंक! आजच नोंदणी करा !!

## यात वाचू या...

**संवादसेतू आयोजित**

**विनोदी कथालेखक बा.ल. शुक्ल विनोदी कथास्पर्धेतील सर्वोत्तम कथा**

**नामवंत लेखकांच्या उत्तम कथा**

ऋषिकेश गुप्ते, गणेश मतकरी, डॉ.संजीव कुलकर्णी, डॉ. शुभंकर कुलकर्णी

**रसज्ञ अभ्यासकांचे ललित लेख**

मधुकर धर्मापुरीकर, मंगला आठलेकर, डॉ. शंतनु अभ्यंकर, सौरभ खोत, स्वाती द्रवीड, मुकुंद कुळे, अदिती हर्डीकर

**जन्मशताब्दी विशेष**

अरूणा ढेरे, लीना पाटणकर, भरत पाटील

**अन्यभाषक प्रतिभावंत : भाषांतर भेट**

चंद्रकांत भोंजाळ, निस्सीम बेडेकर, सुमती जोशी

**ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांना मानवंदना..**

**एका विशेष विभागात..!!**

सादरकर्ते: राहुल देशपांडे


anupam_creations@rediffmail.com

**मुखपृष्ठ : रवी परांजपे / मांडणी : मिलिंद जोशी / आतील चित्रे : चंद्रशेखर बेगमपुरे**

**एस एम एस, ई मेल किंवा फोनवरुन आजच मागणी नोंदवा - ८००७४४६६७७, ९८२२०३३५६२, ९८८१०९८०४८**

Email: samvadsetupune@gmail.com

**महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वितरकांकडे उपलब्ध**


ठाणे शहरात एकूण ६० तलाव आणि ६० मंदिरे होती. त्यातील काही तलाव कालौघात नामशेष झाले. तरीही सध्या शहरात एकूण ३५ तलाव आहेत.

# इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारा ठाणे आणि पालघर

**भारत नगरकर**

शिलाहार घराण्यांचे शासक इ.स. ८१० ते १२४० पर्यंत ठाणे शहरावर होते, त्या सम्राटांपैकी कोणी राजाने ते शिवाचे भक्त असल्याने श्री कौपिनेश्वर मंदिर बांधले होते. या काळात शिलाहारांच्या धर्मनिरपेक्षवृत्तीमुळे आणि विविध धर्माच्या सहिष्णुतेमुळे पारशी, ख्रिश्चन, मुस्लिम आणि ज्यू यांसारख्या विविध समाजातील लोक मोठ्या संख्येने ठाण्यात स्थायिक झाले. अशा प्रकारे एक कॉस्मोपॉलिटन शहराची बीजे पेरली गेली.

भौगोलिकदृष्ट्या पूर्वीचा ठाणे जिल्हा ज्यात आजचा पालघर जिल्हादेखील समाविष्ट होता. हा महाराष्ट्राच्या कोकण विभागातील सर्वात उत्तरेकडील जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडे सह्याद्री पर्वताच्या रांगा तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे. ठाणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ ९५५८.० चौ.कि.मी. आहे. ठाणे जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी १४० कि.मी. असून पूर्वपश्चिम लांबी १०० कि.मी. आहे. उत्तरेस गुजरात हे राज्य तसेच दादरा, नगरहवेली हे केंद्रशासित प्रदेश, दक्षिणेस रायगड जिल्हा आणि बृहन्मुंबईचा प्रदेश, पूर्वेस नाशिक, अहमदनगर व पुणे तीन जिल्हे तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे. ठाणे शहर ठाणे खाडीच्या पश्चिम किनाऱ्यावर वसले असून पूर्वेला पारसिक टेकड्या आणि येऊर जंगल व टेकड्या आहेत. अपरान्त ही कोकणची प्राचीन काळातील भौगोलिक संज्ञा आहे. विशेषतः उत्तर कोकणाला अपरान्त असे म्हटले जाते. आजचा ठाणे आणि रायगड (कुलाबा) जिल्हा उत्तर कोकणात असून रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे दक्षिण कोकणात (सप्तकोकण) आहेत.

भौगोलिकदृष्ट्या या प्रदेशात बरेच उंचवट्याचे भाग आहेत. त्यांना कोन असे म्हणतात. हे कोन प्रदेशभर आढळतात (कोन-कोन) म्हणून हा भाग कोकण या नावाने ओळखला जातो. या भागाला अपरांत या नावानेही ओळखले जाते.

ठाणे जिल्हा हा स्वतःचे वैशिष्ट्य जपणारा, समृद्ध निसर्गसंपदेचे वरदान लाभलेला, औद्योगिक क्रांतीमुळे भरभराटीला आलेला आणि अनेक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेला असा हा आपला प्राचीन ठाणे जिल्हा म्हणजे एक अजब रसायनच आहे. हिरव्यागार वनराईत नटलेलं येथील सोंदर्य, उंचच उंच धबधब्यानं न्हालेलं, नारळी-पोफळीच्या बागांत लपलेली कौलारू घरं, विपुल सृष्टी सौंदर्याने नटलेला, नररत्नाची खाण असलेला हा ठाणे जिल्हा. वेगळी संस्कृती, परंपरा, वेगळी खाद्य संस्कृती (विशेषतः वसई-विरार पट्यातील) लोककला, सणवार, उत्सव, आंबा, फणस, चिकू, पेरू, जांभळं, शहाळी असा आगळा-वेगळा कोकण मेवा सारं काही या भूमीत आहे, या जिल्ह्यातील पर्यटनस्थळे, जागोजागी, गावोगावी आपल्या संपूर्ण वारशाची ग्वाही देणारी प्राचीन मंदिरे, अथांग सागर, स्मारकं, गड-किल्ले, जलदुर्ग, येथील भरणाऱ्या वैविध्यपूर्ण जत्रा, उत्सव यामुळे हा ठाणे जिल्हा सुप्रसिद्ध आहे.

**भौगोलिक रचना**

ठाणे, वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, वाडा, भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण आणि उल्हासनगर हे तेरा तालुके मिळून हा ठाणे-पालघर जिल्हा त्यावेळी तयार झाला. ठाणे शहर हे ठाणे जिल्ह्याचे प्रमुख केंद्र झाले. ठाणे जिल्ह्याला कोकण किनारपट्टीत असलेल्या अरबी समुद्राची ११२ कि.मी. इतकी किनारपट्टी लाभलेली आहे. यामुळे जिल्ह्यामध्ये खाड्यांचे प्रमाण जास्त आहे. दातीवरे, चिंचणी, तारापूर, पालघर, सातपाटी, केळवे, वसई, भाईंदर, ठाणे, कल्याण, भिवंडी या ठिकाणी खाड्या आहेत. समुद्र व खाडी यांच्यामुळे नैसर्गिक बंदरे असणे स्वाभाविक आहे. प्राचीन काळी शूर्पारक (सोपारा) व कलियान (कल्याण) ही बंदरे व्यापारीदृष्ट्या भरभराटीस होती.

ठाणे जिल्ह्यात १५ तालुके असून प्रशासकीय कामे सुलभ होण्यासाठी एकूण पाच महसूल उपविभाग करण्यात आलेले आहेत.

१) **ठाणे तालुका -** ठाणे, कल्याण व मुरबाड

२) **भिवंडी तालुका -** भिवंडी, वसई व शहापूर

३) **डहाणू तालुका -** डहाणू, तलासरी व पालघर

४) **जव्हार तालुका -** जव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड

५) **उल्हासनगर तालुका -** उल्हासनगर व अंबरनाथ अशी त्याची रचना आहे.

**ठाणे ऐतिहासिक कालानुक्रम :**

- शिलाहार घराण्यांचे शासक इ.स. ८१० ते १२४० पर्यंत ठाणे शहरावर होते, त्या सम्राटांपैकी कोणी राजाने ते शिवाचे भक्त असल्याने श्री कौपिनेश्वर मंदिर बांधले होते. या काळात शिलाहारांच्या धर्मनिरपेक्षवृत्तीमुळे आणि विविध धर्मांच्या सहिष्णुतेमुळे पारशी, ख्रिश्चन, मुस्लिम आणि ज्यू यांसारख्या विविध समाजातील लोक मोठ्या संख्येने ठाण्यात स्थायिक झाले. अशा प्रकारे एक कॉस्मोपॉलिटन शहराची बीजे पेरली गेली.

● यावेळीही शिलाहार राजांनी ठाणे शहराचे विविध विभाग करून त्यांना पाडे असे नाव दिले. उदा. नौपाडा, पाटलीपाडा, भाईंदरपाडा, आग्रीपाडा.

● इ.स. १४८० मध्ये गुजरातच्या सुलतान मेहमुदने ठाणे ही आपल्या सुभा प्रांताची राजधानी बनवली.

● इ.स. १६६३ मध्ये सेंट जॉन द बाप्टिस्ट चर्च (तलावपाळी) ठाण्यात बांधण्यात आले.

● इ.स. १७३० मध्ये प्रसिद्ध ठाणे किल्ला (हिराकोट म्हणूनही प्रसिद्ध) एकूण ४४ एकरावर बांधला. २८ मार्च १७३८ मध्ये मराठ्यांनी हा किल्ला जिंकला, पुन्हा २८ डिसेंबर १८४४ मध्ये ब्रिटिशांनी ठाणे शहर आणि ठाणे किल्ला जिंकला. तुरुंगासाठी किल्ल्याचा वापर ब्रिटिशांनी सुरू केला. तुरुंगाच्या प्रांगणात आजही शतकानुशतके जुन्या तोफा व जुने तोफ गोळे पहायला मिळतात. सध्या या किल्ल्याचा वापर ठाणे मध्यवर्ती कारागृह म्हणून केला जात आहे.

● इ.स.१८३० च्या सुमारास दक्षिण कोकणातील काही भागांचा उत्तर कोकणात समावेश करण्यात आला. या प्रदेशाला ठाणे हेच नाव देण्यात आले.

● १८४० मध्ये बोरघाट पक्का खडीचा झाला, तर मुंबई-नाशिक रस्ता भिवंडी मार्गे सुरू करण्यात आला.

● इ.स. १७६० मध्ये सरसुभेदार रामजी महादेव बिवलकर यांनी कौपिनेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. पूर्वी हे मंदिर मासुंदा तलावाच्या काठी होते (सध्याचा तलावपाळी). रस्ता रुंदीकरणात हे मंदिर दूर होत गेले.

● इ.स. १७७८ मध्ये पेशव्यांच्या प्रासादिक निवासस्थानाचे रूपांतर न्यायालयाच्या इमारतीत झाले.

● १७८० मध्ये केशवजी सोरोबजी रुस्तम पटेल यांनी ठाण्यात पहिली पारशी अग्यारी बांधली.

● १८२१ साली पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली आणि त्या शाळेस ठाणे इंग्लिश स्कूल असे नाव देण्या आले.

● सन १८३० साली पहिल्या जिल्हा न्यायालयाची स्थापना झाली

● सन १० मार्च १८६३ साली ठाणे नगरपालिकेची स्थापना झाली.

● १८६६ मध्ये ठाणे जिल्ह्याचे पुनर्संघटन करण्यात आले. काही नावे बदलण्यात आली.

● इ.स. १८६६ मध्ये ठाण्यात पहिले मराठी वृत्तपत्रे सुरू झाले. अरुणोदय, सूर्योदय, वकिलांचा साथी, न्यायलहरी, मनोहर, ज्ञानप्रदीप, ज्ञानदीपिका अशी विविध मराठी नियतकालिके त्याकाळात छापील माध्यमांचे महत्व दर्शवित होते.

● १८७९ मध्ये ठाण्याचे पहिले जैन मंदिर बांधले.

● १८८१ साली पहिली जनगणना झाली त्यावेळी ठाण्याची लोकसंख्या १४,४५६ होती.

● १८९३ मध्ये पहिले मराठी ग्रंथालय स्थापन झाले.

● १८९६ मध्ये पहिल्यांदाच शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

● १९ एप्रिल १९१९ साली नाशिकचे तत्कालीन जिल्हाधिकारी जॅक्सन यांची हत्या केल्या प्रकरणी वीर अनंत लक्ष्मण कान्हेरे, विनाय नारायण देशपांडे या प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिकांना मध्यवर्ती कारागृहात मरेपर्यंत फाशी दिली गेली.

● १९२० मध्ये मासुंदा तलावाजवलील एका रस्त्याला प्लेगच्या साथीच्या काळात स्मारक सेवेसाठी डॉ. एफ. ए. मूस यांचे नाव देण्यात आले.

● १९२६ मध्ये उत्तर साष्टीला ठाणे हे नाव देण्यात आले. तसेच केळवे-माहिम प्रदेशाला पालघर नाव देण्यात आले.

● प्रकल्प निर्माण झाला तेव्हा त्यातील १४ गावे पुन्हा मुंबईत समाविष्ट करण्यात आली.

● तोपर्यंत कुर्ला, घाटकोपर, वांद्रे व अंधेरी ही मुंबईतील उपनगरे ठाणे जिल्ह्यातच होती.

● १९३५ मध्ये ठाण्याचे प्रतिष्ठित नागरिक श्री विठ्ठल सायन्ना यांचे पुत्र दिवाण बहादूर नारायण सायन्ना यांनी सिव्हिल हास्पिटलच्या इमारतीची पुनर्बांधणी केली.

● भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट १९४७ साली ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात प्रख्यात स्वातंत्र्य सेनानी नानासाहेब जोशी यांच्या हस्ते युनियन जॅक खाली उतरवून आणि भारताचा तिरंगा ध्वज फडकवून साजरा करण्यात आला.

● १९४७ नंतर जव्हार हे संस्थान ठाणे जिल्ह्यातील स्वतंत्र तालुका बनला.

● १ ऑक्टोबर १९८२ मध्ये ठाणे

महानगरपालिकेची स्थापना झाली.

● शहापूर तालुका क्षेत्रफळाच्या दृष्टीने ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका असून उल्हासनगर हा सर्वात लहान तालुका आहे. शहापूर तालुक्याचे क्षेत्रफळ १५७४.३० चौ.कि.मी. तर उल्हासनगर तालुक्याचे क्षेत्रफळ १३ चौ.कि.मी. आहे.

**ठाणे जिल्ह्याचा अश्मयुगीन कालखंड :**

संपूर्ण ठाणे जिल्ह्याला ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. अश्मयुगीन, पौराणिक, प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन हे इतिहासाचे साधारणपणे कालखंड असून ठाणे जिल्ह्याचा या सर्व कालखंडाशी संबंध आलेला आहे. ठाणे जिल्ह्याच्या इतिहासाचा अश्मयुगाशी संबंध आहे. ठाणे जिल्ह्यातील वैतरणा या मुख्य नदीची उपनदी असलेल्या तानसा नदीच्या खोऱ्याचे तानसा नदीवर इ.स. १८९० मध्ये धरण बांधण्यापूर्वी सर्वेक्षण केले असता तानसा नदीच्या खोऱ्यात अश्मयुगीन हत्यारे व काही अवशेष ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यात आढळून आले आहेत. याशिवाय सूर्या नदीच्या खोऱ्यातील जव्हार तालुक्यातही हत्यारे सापडलेली आहेत. त्यावरून अश्मयुगीन कालखंडात हा परिसर राहण्यास योग्य होता हे स्पष्ट आहे. या उत्खननामध्ये तत्कालीन थडग्यांची (दफनाची) पद्धत अजूनही ठाण्यातील काही आदिवासी जमातीमध्ये आजही प्रचलित आहे.

**पौराणिक कालखंड :**

ठाणे जिल्ह्याचा संबंध रामायणात सापडतो. शहापूर तालुक्यातील आजोबा पर्वतावर महर्षी वाल्मिकींची समाधी असल्याचे सांगितले जाते. शहापूर पासून ३२ कि.मी. अंतरावरील डोळखांब मधील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये संपूर्ण जंगलाने वेढलेले हे ठिकाण आहे. उंच शिखरावरील डोंगरात कोरलेला सीतेचा पाळणा व तत्कालीन इतिहासाच्या खूणा जपणाऱ्या दगडावरील कोरीव शिल्प हे सर्वांना वंदनीय आहे. या आजोबा डोंगरावर महर्षी वाल्मिकी काही काळ वास्तव्य करून होते अशी आख्यायिका आहे. महर्षी वाल्मिकी समाधीजवळ काही वीरगळ सापडले असून, त्या वीरगळावरील शिल्पपटांचा अर्थ न समजल्यामुळे त्यावरील कोरीव कामांचा संबंध रामायणाशी (सीता, लव-कुश, युद्धाचा प्रसंग, महर्षींची तपश्चर्या, मारुतीचे युद्ध) जोडला गेला. रामायणातील किष्किंधा खंडात ज्या शाई नदीचा उल्लेख केलेला आहे ती शाई नदी शहापूरातील डोळखांब परिसरात वाहते. तसेच वैतरणा नदीचा उल्लेख महाभारतात आलेला आहे. गुजरातमधील वेरावळच्या सोमनाथला जाताना अर्जुन सोपारा-शूर्पारक येथे थांबल्याचा उल्लेख महाभारतात आहे. सिंधू संस्कृतीचा कल्याणशी संबंध होता. पुरातत्त्व विभागाकडून कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्याच्या परिसरात उत्खनन झाले असता इतिहासपूर्व काळातील मातीची खापरे (पॉटरी) त्याठिकाणी आढळून आली. पुरातत्त्वीय उत्खनन ठाणे जिल्ह्यात फारसे झालेले नाही. परंतु तानसा आणि सूर्या नदीच्या खोऱ्यात आढळून आलेले अश्मयुगीन अवशेष प्राचीनत्व स्पष्ट करतात.

**पूर्वेतिहास (इ.स. पूर्व )- बौद्धकालीन :**

ठाणे जिल्ह्याच्या किनारी प्रदेशाने परदेशी व्यापारात प्रभावी भूमिका बजावलेली आहे. सोपारा, कल्याण, ठाणे, संजाण (डहाणू) येथून प्राचीन काळात होणाऱ्या व्यापाराशी जिल्ह्याचा संबंध होता. इ.स.पूर्व २५०० ते इ.स.पूर्व १५०० या काळात इजिप्त, बॅबिलोनिया, पर्शिया, अरेबिया, फिनिशिया आणि आफ्रिका या प्राचीन संस्कृतीशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले होते. ठाणे जिल्ह्याच्या इतिहासात पहिला संदर्भ येतो तो इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकात. वसईपासून उत्तरेला सहा मैल दूर असलेल्या सोपारा (शूर्पारक) येथे सापडलेला शिलालेख (इ.स.पूर्व २२५) प्राचीन कालखंड स्पष्ट करतो. सोपारा हे पश्चिम किनारपट्टीवरील व्यापाराचे केंद्र असल्याचा उल्लेख बौद्ध साहित्यात आहे. गौतम बुद्धाच्या काळात सोपारा हे व्यापाराचे केंद्र असल्याचे म्हटले आहे. इ.स.पूर्व २५०० ते इ.स.पूर्व १५०० या काळात सोपारा हे केंद्र व्यापारासाठी प्रसिद्ध होते. अशोकाच्या पाचव्या शिलालेखात गांधार, राष्ट्रीक अपरांत (उत्तर कोकण) अशा प्रांतासाठी धर्ममहामात्र नियुक्त केल्याचे उल्लेखलेले असून सोपारा ही अपरांताची राजधानी असल्याचा उल्लेख या शिलालेखावर आढळतो.

पाटलीपुत्र धर्मपरिषदेचा अध्यक्ष तीस्सा याने योनाधम्मरख्खीता या धर्मप्रचारकास अपरांतात पाठविले होते. पूर्णा या बौद्धधर्मीय साहित्यात सोपाऱ्याचे वर्णन आलेले आहे. तसेच इ.स. १०० ते ४०० या काळात महायान पंथाचे केंद्र होते. चिपळूण, महाड, दापोली, कान्हेरी, मंडपेश्वर येथील चैत्य व विहार कोकणातील

बौद्ध धर्माचा प्रभाव स्पष्ट करतात.

सम्राट अशोकानंतर दक्षिणेत सातवाहनांचा उदय झाला. सातवाहनांनी कोकण परिसरावर वर्चस्व निर्माण केले होते. सातवाहनांच्या काळात पश्चिमेकडील व्यापारात वाढ झाली. इ.स.पूर्व ३०च्या सुमारास रोमन व भारत यांचे व्यापारी संबंध प्रस्थापित झाले. इ.स.पूर्व २५ च्या आसपास भारतीय जहाजे व्यापारासाठी तांबड्या समुद्रात जाऊ लागले तसेच पर्शियन आखातातही जहाजांचा संचार सुरू झाला. ठाणे बंदरातून पर्शियन आखातपर्यंत होणारा व्यापार महत्त्वाचा होता. सातवाहनांच्या काळात काही व्यापारी मार्ग विकसित झालेले होते. नाशिक-कल्याण-मुरबाड-नाणेघाट-सोपारा हा पश्चिमेकडील एक व्यापारी मार्ग जात होता. भडोचहून कल्याण, सोपारा, चेऊल (चौल-रायगड) या बंदरातून व्यापार चालत असे. या काळात सोने-चांदी, मौल्यवान रत्ने, सिल्क, सुती कापड, तलम रेशमी कापड, हस्तिदंताच्या वस्तू-भांडी, मौल्यवान लाकडी वस्तू, लोखंड, पितळ, तांबे, कथील, शीसे, विविध प्रकारची मसाले, लवंगा, दालचिनी, मिरी, मिरच्या, सुगंधी अत्तर-धूप-लोबान, संगमरवर, उंची दारू, तेले, विविध प्रकारची पीठं, उंची लाकूड, तसेच मेंढ्या, घोडे, लाल रंगाची राळ (लाख), एवढेच काय तर मानवी गुलामांचा पण व्यापार चालत असे.

सातवाहनांच्या काळातील गौतमीपुत्र व यज्ञश्री सातकर्णी यांची नाणी ठाणे जिल्ह्यातील सोपारा येथे सापडलेली आहेत. यज्ञश्री सातकर्णीचे दोन शिलालेख कान्हेरी लेण्यात असून या लेण्यात कल्याण, सोपारा यांचे उल्लेख आहेत. सातवाहनांचे वर्चस्व ठाणे जिल्ह्यावर होते. पश्चिम किनाऱ्यावरील कोकण हा महत्त्वाचा भाग असल्याची माहिती ग्रीक-रोमनांना होती यावरून स्पष्ट होते.

सातवाहनांचा पराभव पश्चिम महाराष्ट्रात अभिरांनी यांनी केला. हा अभिर घराण्यांचा संस्थापक ईश्वरसेन हा होता. सुमारे १७० वर्षे अभिरांनी गुजरात, कोकण व पश्चिम महाराष्ट्रावर राज्य केले. कान्हेरी येथील ताम्रपटावरील लेखावरून ठाणे जिल्हा त्रैकुटांच्या वर्चस्वाखाली असावा. वाकाटकांची सत्ता महाराष्ट्रात आली असली तरी कोकणालगतच्या प्रदेशावर विशेषतः ठाणे जिल्ह्यावर फारसा प्रभाव नव्हता. वाकाटकानंतर इ.स. ५५०च्या सुमारास कलचुरींची सत्ता निर्माण झाली. त्यांचे वर्चस्व ठाणे जिल्ह्यावर असावे. कलचुरी राजा कृष्णराजाची नाणी कोकणात सापडलेली असून ती अनेक वर्षे चलनात होती. कलचुरींचे मांडलिक असलेले कोकण मौर्य यांची सत्ता ठाणे-कल्याण,सोपारा, चौल, घारापुरी (एलिफंटा), राजापुरी, मरोळगाव (मरोळ व्हिलेज-अंधेरी) अशा ठिकाणी होती. ठाणे जिल्ह्यातील वाडा येथील सापडलेल्या शिलालेखात मौर्य राजा सुकेतूवर्मन याचा उल्लेख आढळतो.

उत्तरेत हर्षवर्धनची सत्ता असताना दक्षिणेत गोदावरीच्या प्रदेशात चालुक्यांचे राज्य होते. चालुक्य सम्राट पुलकेशीने कलचुरी राजा बुद्धराज यांचा पराभव केला. त्यामुळे दक्षिण कोकण चालुक्यांच्या ताब्यात आले. हर्षवर्धनच्या दरबारातील चीनी प्रवासी ह्युएनत्संग हा पुलकेशीच्या दरबारी नाशिक येथे कल्याण मार्गे गेला होता. चालुक्यांची सत्ता इ.स.७५०च्या सुमारास संपुष्टात आली. त्या अगोदर एक शतकापूर्वी राष्ट्रकुटांचा उदय झालेला होता.

राष्ट्रकुट राजा पहिला अमोघवर्ष याचा ताम्रपट संजाण (डहाणू) येथे सापडला. तो इ.स. ८७१ मधील असून ग्रहणानिमित्त झारी वल्मिका (झारोली) आणि अन्य २८ गावे दान दिल्याचा उल्लेख ताम्रपटात आहे. ही गावे ठाणे शहराच्या उत्तरेकडील आहेत. याच ताम्रपटात काळू नदीचा उल्लेख आहे. इ.स. ९७५ च्या सुमारास राष्ट्रकुटांचा पराभव झाला. राष्ट्रकुट राजा इंद्र तिसरा याचा ताम्रपट चिंचणी (डहाणू) येथे सापडला. हा ताम्रपट इ.स. ९२५ मधील असून त्यात राष्ट्रकुटांची वंशावळ दिलेली आहे. कान्हेरी येथील लेण्यांमधील कोरीव लेखानुसार अमोघवर्ष पहिला याचा मांडलिक कपार्दिन हा शिलाहार राजा कोकणावर अधिपत्य करीत होता. त्यावरुन राष्ट्रकुट व शिलाहार एकाचवेळी कोकणावर सत्ता गाजवित असाव्यात. राष्ट्रकुटांची सुमारे दोनशे वर्षाची सत्ता (इ.स ७४२ ते ९७२) संपुष्टात आली.

**शिलाहार घराणे**

राष्ट्रकुटानंतर महत्वाची सत्ता म्हणजे शिलाहार होय. एक मध्ययुगीन घराणे. शिलाहारांची तीन घराणी पश्चिम महाराष्ट्रात उदयास आली.

एक, उत्तर कोकणात ठाणे व कुलाबा ह्या जिल्ह्यावर राज्य करीत होते. त्यात १४०० गावांचा

समावेश होता. या घराण्याला उत्तर कोकणचे शिलाहार म्हणतात. त्यांची राजधानी पुरी (पूर्वीचा कुलाबा - व सध्याचा रायगड जिल्हा - राजपुरी किंवा दंडाराजपूरी) येथे होती. अरबी समुद्रावर या घराण्याचे वर्चस्व होते. त्यातील काहींनी पश्चिम समुद्र चर्कवर्ती ही पदवी धारण केली होती.

शिलाहारांचे दुसरे घराणे दक्षिण कोकणात (याला सप्त कोकण म्हणत) राज्य करीत होते. त्यांची राजधानी बलिपत्तन (सध्याचे रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटन) येथे होती.

शिलाहारांचे तिसरे घराणे कोल्हापूर, सातारा, सांगली व बेळगाव ह्या जिल्ह्यांचा काही भाग ह्या प्रदेशावर राज्य करीत होते. त्यांची राजधानी वळिवाड येथे होती. हे काल्हापूरच्या नैऋत्येस सुमारे ४८ किमी. वर वळवडे असावे. (आता राधानगरीमध्ये नाव रुपांतर झाले आहे).

इ.स.१२६५ पर्यंत शिलाहारांची सत्ता होती. शिलाहार राजा अपराजित (इ.स. ९७५ ते १०१०) याची सत्ता होती. इ.स. ९९३ साली सूर्यग्रहणाच्या निमित्ताने दिलेल्या भूदानामध्ये श्रीस्थानक (ठाणे) चा उल्लेख आहे. राजा अपराजित याने राष्ट्रकुट व चालुक्या यांचे वर्चस्व नष्ट केले. हा राजा ठाणे येथूनच राज्य करीत होता. श्रीस्थानक ही राजधानी बनली.

उत्तर कोकणच्या शिलाहार घराण्याची मूळ पुरुष पहिला कपर्दिन (काळ सुमारे ८०० ते ८२५) याने राष्ट्रकुट सम्राट तिसरा गोविंद याला उत्तर कोकणात राष्ट्रकुटांची सत्ता पसरविण्यास मदत केली असावी म्हणून गोविंदाने तो प्रदेश जिंकल्यावर येथे मांडलिक म्हणून कपर्दिन याची नेमणूक केली. उत्तर कोकणाला त्याच्या नावरुन कपर्दिपाद्वीप किंवा करडीद्वीप म्हणत. हे घराणे उत्त कोकणात सुमारे ८०० ते १२६५ पर्यंत म्हणजे सुमारे साडेचारशे वर्षे राज्य करीत होते. तेथे त्यांच्या सोळा पिढ्या झाल्या.

इ.स. १२६० मध्ये यादव राजा कृष्णदेव याने आपला सेनापती मल्ल याला शिलाहारांच्या पारिपत्यासाठी कोकणात पाठविले. इ.स.१२६५ मधील एका लढाईत शिलाहारांचा पराभव होऊन उत्तर कोकणावर यादवांनी अच्युतनायक यास प्रमुख नेमून शिलाहारांची सुमारे ४०० वर्षांची सत्ता संपुष्टात आणली. यादवांच्या काळातही व्यापारी भरभराट कायम राहिली. इ.स.१३२० मध्ये हरपालदेव या यादवराजाचा निर्णायक पराभव झाला आणि यादवांची सत्ता संपुष्टात येऊन मुस्लिम अंमल सुरू झाला.

**मध्ययुगीन राजकीय कालखंड - मुस्लिम सत्तेचा काळ (इ.स. १३०० ते इ.स. १५००) :-** यादवराजा हरपालदेव याच्या पराभवानंतर ठाणे जिल्हा मुस्लिम सत्तेच्या वर्चस्वाखाली आला. अर्थात या अगोदरच सातव्या शतकातच अरबांनी पर्शियाचा पराभव करुन कोकण किनाऱ्यापर्यंत धडक मारलेली होती. राष्ट्रकुटांच्या काळात अरबांनी सागरीमार्गे कोकणात प्रवेश केलेला होता. पुढे दिल्लीवर सत्ता प्रस्थापित केलेल्या तुर्कांनी ठाणे परिसरावर दोन्ही बाजूंनी आक्रमणे केली.

खलिफ उमर या दुसऱ्या खलिफाच्या काळात (इ.स.६३४-६४०) अरबांची एक टोळी ठाणे येथे आली होती. पश्चिम किनाऱ्यावरील अरब संजाणावर चालून आले तर राज्यकर्ते सुद्धा बनले. उत्तर भारतातून अलापखान (इ.स.१३००-१३१८) याने अल्लाउद्दीन खिलजीची सत्ता गुजरात मध्ये स्थापन केली व तो त्यानंतर संजाणपर्यंत आला. त्याने संजाणवर इ.स.१३१२ ते १३१८) या काळात अंमल बसवला. तुर्की शासक मुबारक पहिला याने आपल्या कारकिर्दीत (इ.स. १३१७ ते १३२१) माहिम व साष्टी जिंकून आपला अंमल बसवला. नंतर ठाणे जिल्ह्याच्या सागरी किनाऱ्यावरील प्रदेशात मुस्लिमांचे वर्चस्व स्थापन झाले. दौलताबाद-नंदुरबार-सोनगड-खंबायत असा एक मार्ग असून या मार्गावरील बागलाण आणि जव्हार या दोन हिंदू सत्ता दिल्लीच्या अंकित होत्या.

दरम्यान (इ.स. १३४७) बहामनींची सत्ता स्थापन होऊन त्यांचा ठाणे परिसराशी संबंध आलेला आहे. यापुढील १४व्या शतकात कालखंड राजकीय अस्थिरतेचा होता. बहामनी राज्याचे विभाजन झाले होते. माहुली, कल्याण, ठाणे परिसरावर बहामनीचे वर्चस्व होते. व्यापारी महत्त्व लक्षात घेऊन बहामनीने कोकणावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. इ.स. १४९५ मध्ये महंमद बेगडा याने कोकणवर वर्चस्व निर्माण करून कोकणचे पाच भाग केले. त्यापैकी एक ठाणे हे एक मुख्य केंद्र होते. इ.स. १५०८ पर्यंत त्याने आपली सत्ता वाढवली. वसई, केळवे-माहिम, सोपारा, भिवंडी, कल्याण, पनवेल या बंदरामधील करवसुली

गुजरात दरबारात जमा होत असे. कल्याण जवळील उल्हास नदी ही दख्खन व गुजरात सुलतान राजवटीची सरहद्द मानली जात असे. मुस्लिम सत्तेचा उदय ते पोर्तुगीजांचे आगमन या सुमारे २०० वर्षाच्या काळात सागरी व्यापारासाठी ठाणे जिल्ह्याच्या किनारी प्रदेशात संघर्ष सुरू होता.

**पोर्तुगीज कालखंड आणि ठाणे जिल्हा :-**

१४९८ मध्ये वॉस्को-डी-गामा हा पोर्तुगीज प्रवासी (केरळ) मलबार प्रांतातील कालीकत येथे येऊन पोहोचला. वॉस्को-डी-गामाच्या भारताकडे येण्याच्या नवीन जलमार्गाच्या शोधामुळे भारतीय इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. पोर्तुगीजांचे भारतात आगमन झाले त्यावेळी भारतीय सागरी व्यापारावर अरबांचे वर्चस्व होते. अरब आणि पोर्तुगीज यांच्या सागरी व्यापारी स्पर्धा सुरू झाली. पुढे अरबांचे वर्चस्व मोडीत काढून पोर्तुगीजांनी मलबार किनाऱ्यावर स्वतःचे वर्चस्व निर्माण केले. १५१० च्या अखेरपर्यंत पोर्तुगाजांनी गोव्यापर्यंत सत्ता कमावली. दक्षिणेकडील बहमनी सल्तनतच्या विघटना नंतर पाच पातशाह्या (निजामशाही -१४९० ते १६३३), (अदिलशाण - १४९० ते १६८६), (इमादशाही - १४९० ते १५७४), (कुतुबशाही - १५१८ ते १६८७) व (बरीदशाही - १५२८ ते १६१९), विजयनगर साम्राज्य - १३३६ ते १६४६), पोर्तुगीज सत्ता आणि अन्य स्वतंत्र राज्ये अशी राजकीय परिस्थिती असतानाच एप्रिल १५२६ मध्ये बाबरच्या पानिपत युद्धात विजयामुळे मुघलांचा उदय झाला.

इ.स. १५२६ मध्ये वसई येथे पोर्तुगीजांनी वखार स्थापन केली होती. हुमायुन आणि गुजरातचा सुलतान यांच्यात झालेल्या संघर्षाच्या वेळी गुजरातचा सुलतान बहादूर याने मदतीच्या मोबदल्यात इ.स. १५३४च्या अखेरीस वसई पोर्तुगीजांना बहाल केली तर १५३९ मध्ये दीव सुद्धा बहाल केले, आणि कोचिन पासून वसई-दीव पर्यंत पोर्तुगीजांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. वसई ताब्यात आल्यामुळे ठाणे जिल्ह्याचा पोर्तुगीजांचा संबंध आला. वसईवर पोर्तुगीजांनी १५३५ ते १७३९ अशी दोनशे वर्षे राज्य केले. पोर्तुगीजांच्या परवान्याशिवाय कोणतेही जहाज समुद्रात संचार करू शकत नसे. कोठेही व्यापार केला तरी वसई बंदरात जकात द्यावी लागत असे. वसई किल्ल्यात १२००० सैन्य तयार असे. इ.स. १५८० पर्यंत ठाणे, वसई, गोवा, दीव, दमण, मलबार चौल आदि भागांवर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. त्यावेळी ठाणे जिल्ह्यातील जव्हार येथे कोळी राजे स्वतंत्र होते. इ.स. १५५९ मध्ये पोर्तुगीजांनी जव्हारवर आक्रमण केले व मुरबाड, माहुली (शहापूर), कल्याण, भिवंडीपर्यंत मजल मारली. कल्याण-भिवंडी-शहापूर निजामशाहीच्या अखत्यारित होते. पोर्तुगीजांचे वाढते वर्चस्व सहन न झाल्यामुळे निजामशहा, अदिलशहा आणि कालिकतचे राजा यांनी एकत्रितपणे पोर्तुगीजांविरुद्ध आघाडी उभारली. परंतु या आघाडीचा पराभव पोर्तुगीजांनी केला. यावेळी झालेल्या लढाईत कल्याण पूर्णपणे बेचिराख करण्यात आले होते.

दरम्यान मुघल सम्राट अकबरने दख्खनवर मोहीम उघडली. मुघल, अदिलशहा, निजामशहा, कुतुबशहा, पोर्तुगीज असा परस्परांमध्ये संघर्ष सुरू झाला. मुघल-पोर्तुगीज संघर्षात मुघलांचा पराभव होऊन तह झाला. इ.स. १६००च्या सुमारास मुघलांनी कल्याण जिंकले. परंतु मलिक अंबरने कल्याण पुन्हा जिंकले. शहाजहानने कल्याणचा ताबा घेतला परंतु १६३६ मध्ये अदिलशहाने कल्याणवर वर्चस्व निर्माण केले. कल्याणच्या खाडीपलीकडील भिवंडी-पडघा, माहुली, वाडा हा भाग जव्हारच्या राजांच्या ताब्यात होता. वसई पोर्तुगीजांच्या तर ठाणे मुस्लिमांच्या ताब्यात अशी परिस्थिती होती. शिवजन्मापूर्वी ठाणे जिल्ह्याची एकंदरीत परिस्थिती या प्रकारची होती.

**शिवकाल आणि ठाणे जिल्हा :-**

शिवजन्मापूर्वी म्हणजेच इ.स. १७व्या शतकाच्या सुरुवातीस उत्तर कोकण हे अहमदनगरच्या ताब्यात तर दक्षिण कोकण अदिलशहाच्या ताब्यात होते. तसेच पोर्तुगीज, इंग्रज, डच, सिद्दी यांचे कोकण किनाऱ्यावर वर्चस्व निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु होते. मुघलांचे सुद्धा दक्षिणेत वर्चस्व निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु होते. निजामशहा व अदिलशहा यांनी अन्य सत्तांवर वर्चस्व निर्माण करण्याचे जे प्रयत्न केले त्यातून काही मराठे सरदार पुढे आले (शहाजीराजे) हा इतिहास सर्वमान्य आहे. अशा राजकीय अस्थिरतेच्या काळात शिवाजी महाराजांचा जन्म झाला. शिवाजी महाराजांचा ठाणे जिल्ह्याशी पहिला संबंध आला तो कल्याण-भिवंडीशी. मुघल-अदिलशाही संघर्ष, औरंजेबाचे

दिल्लीत प्रयाण, कल्याण येथील अदिलशहाचा सुभेदार मुल्ला अहमद याची अनुपस्थिती याचा फायदा उठवून पोर्तुगीजांविरुद्ध मोहीम हे निमित्त पुढे करुन कल्याण-भिवंडीवर मोहीम आखण्यात आली आणि २५ ऑक्टोबर १६५७ रोजी प्रथम कल्याण व नंतर भिवंडी जिंकण्यात आले. कल्याणचे सुभेदार म्हणून आबाजी सोनदेव यांची नियुक्ती करण्यात आली. खाडी किनारी असलेल्या टेहळणी चौकीचे दुर्गाडी किल्ल्यात रूपांतर करण्यात आले.

आपल्या पहिल्या आरमाराची निर्मिती कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्यावर करून कल्याणला उत्तर कोकणातील प्रवेशद्वार बनविले. नंतर जानेवारी १६५८ रोजी माहुली (शहापूर) हा ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाचा किल्ला ताब्यात घेतला. कल्याण मोहिमेत मिळाल्या संपत्तीचा उपयोग स्वराज्यासाठी व आरमार निर्मितीसाठी करण्यात आला. किल्ले ताब्यात आल्यामुळे उत्तर कोकणात (ठाणे-रायगड) मराठेशाहीचा पाया भक्कम झाला. कल्याण व भिवंडी येथील आरमारी तळामुळे पोर्तुगीज, इंग्रजांवर लक्ष ठेवणे शक्य झाले. यावेळी आरमार बांधणीचे महत्त्वाचे काम चौल-कल्याण येथे सुरू असल्याने स्वतः शिवाजी महाराज कल्याण-पेण मोहिमेवर निघाले आणि मिऱ्या डोंगरावरील खानाच्या तळावर हल्ला करून त्याचा पराभव करण्यात आला.

इ.स. १६६४ मध्ये सुरत लुटण्यात आली तेव्हा सुरतला जाताना शिवाजी महाराजांचा मुक्काम जव्हार येथील शिरप्याचा माळ येथे होता. जून १६६५ मध्ये कल्याण-भिवंडी प्रांत, माहुली, ठाणे परिसर मुघलांकडे जाऊन हा प्रदेश उझबेगखान या मुघल सरदाराकडे आले. मे १६६६ रोजी शिवाजी महाराजांनी आग्र्यास भेट दिली. आग्र्याहून सुटका झाल्यावर १६७०च्या सुमारास शिवाजी महाराजांनी गेलेले प्रदेश घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी महाराजांचा पुन्हा एकदा संबंध ठाणे जिल्ह्याशी आला. मार्च १६७० साली कल्याण स्वराज्यात दाखल झाले. त्यानंतर कर्नाळा, लोहगड, माहुली किल्ला हे किल्ले ताब्यात घेतले. या विजयाप्रत्यर्थ शहापूर येथे एक मंदिरही बांधण्यात आले, या काळात महाराजांचा मुक्काम सुमारे ४ महिने कल्याण परिसरात होता. दुसऱ्या सुरत लुटीच्या वेळी (ऑक्टोबर १६७०) सैन्यासह स्वतः शिवाजी महाराज कल्याणात होते. १६७३ मध्ये त्यांनी जव्हारचा ताबा घेतला. शिवराज्याभिषेकापर्यंत कल्याण-भिवंडी, साष्टी, जव्हार या भागात महाराजांची सत्ता होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निर्वाणानंतर छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात उत्तर कोकणातील भाग स्वराज्यातच होता. १६८२ मध्ये हसन अली खान हा नाणेघाट ओलांडून कल्याण भिवंडी येथे पोचला आणि त्याने कल्याण परिसराची लूट करण्यास सुरुवात केली. १६८४ पर्यंत मराठे जोरदार प्रतिकार करीत होते, अनेक लढाया झाल्या. फेब्रुवारी १६८९ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांना संगमेश्वर येथे अटक झाली आणि कल्याण हे सुभ्याचे मुख्य ठिकाण बनले व मातबरखान हा उत्तर कोकणचा सुभेदार बनला.

कोकणातील मराठी सत्तेचे समूळ उच्चाटन हा औरंगजेबाचा मुख्य उद्देश होता. १६८९ मध्ये मातब्बर खान याने फितुरीच्या मार्गाने माहुली किल्ला जिंकला. त्यानंतर कल्याण परिसर सततच्या युद्धाने बेचिराख झाला होता. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या कारकिर्दीत सुद्धा मुघलांविरुद्ध आक्रमणे-प्रतिआक्रमणे धोरण स्वीकारले होते. तरीही वसई, ठाणे, आगाशी, मनोर, करंजा (उरण) या भागावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. सततच्या संघर्षामुळे आणि मुंबईच्या विकासामुळे कल्याण बंदराचे महत्त्व काही काळ कमी झाले होते. पुढे मुघलांकडून शाहू महाराजांना कोकणचा मुलूख जहागीर म्हणून मिळाला. मार्च १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथ यांनी चौथाई-सरदेशमुखींच्या सनदा आणल्या. त्याच वर्षी कल्याण-भिवंडी येथील मुघलांनी लष्करी तळ हलविले.

**पेशवे काल आणि ठाणे जिल्हा :-**

पेशवेईच्या प्रारंभीच्या काळात ठाणे परिसरातील आगाशी, मनोर, वसई, ठाणे व करंजा (उरण) परिसरावर पोर्तुगीजांची सत्ता होती. मराठे-पोर्तुगीज संबंध बहुतांशी शत्रुत्वाचे होते. पहिल्या बाजीरावांच्या काळात ठाणे जिल्ह्यातील जव्हार व रामनगर या स्वतंत्र राजांवर तर पोर्तुगीजांनी वर्चस्व निर्माण करण्यात यश मिळविले. पोर्तुगीजांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी बाजीरावाने प्रयत्न सुरू केले. १७३१ मध्ये कांबे हे पोर्तुगीज ठाणे जिंकून घेतले. १७३७ मध्ये ठाणे शहराला चारही बाजूने वेढा घालून

मराठ्यांनी ठाणे जिल्हा ताब्यात घेतला तर त्याच पाठोपाठ साष्टी, बेलापूर, कामण, अर्नाळा, माहिम, केळवा, शिरगाव, तारापूर, अशेरी, धारावी, करंजा, वांद्रे हे वसईच्या आसपास असलेले प्रदेश इत्यादी मराठ्यांनी जिंकून घेतले. , व यामुळे कोकणातील पोर्तुगीजांचे महत्त्व संपले.

परंतु इ.स. १७५७च्या प्लासीच्या लढाईपासून इंग्रजांनी भारतात हातपाय पसरविण्यास सुरुवात केली. त्यामुळे इंग्रज-मराठे यांच्यात संघर्ष होणे अटळ होते. दरम्यान इंग्रजाचा ठाणे जिल्ह्यात-खाडी परिसरात हालचालींना वेग आला. त्यांनी ठाण्याचा किल्ला, साष्टी, वसई, करंजा, पारसिक-बेलापूर, कल्याण, तळोजा, पनवेल, खोपोली या प्रदेशांवर वर्चस्व निर्माण केले.

**वसईचा वेढा व लढाई** : अनंत बाळाजी भट (अर्थात चिमाजी उर्फ चिमाजी अप्पा) - इ.स. १७०७ ते मृत्यु -डिसेंबर १७४०)हे पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यांचे पुत्र आणि बाजीराव पेशव्यांचे धाकटे बंधू होते. त्यांनी पश्चिम किनार पोर्तुगीजांपासून मुक्त करण्यासाठी वसई विरुद्ध यशस्वी मोहीम राबवली. त्यांनी सतत २ वर्षे पोर्तुगीजांविरुद्ध झुंज दिली. वसई काबीज करायची असेल तर प्रथम अर्नाळा किल्ला हस्तगत करावा लागेल. या हेतूने १७३७ मध्ये शंकरराजीने या सरदाराने स्थानिक लोकांच्या मदतीने व इतर मराठे सरदार ४०० सैन्य घेऊन अर्नाळ्यावर हल्ला केला तेव्हा पोर्तुगीज सैन्य गाफिल होते व अर्नाळा किल्ला ताब्यात घेतला. नंतर फेब्रुवारी १७३९ मध्ये मराठ्यांनी चिमाजी अप्पाच्या नेतृत्वाखाली वसईवर चाल केली. मराठ्यांनी शिताफीने किल्ल्याला चारी बाजूने वेढा घातला व किल्ल्याची पूर्णपणे नाकाबंदी केली. अत्यंत चिकाटीने चालवलेल्या वेढ्यासोबतच मराठ्यांनी किल्ल्यावर गनिमे हल्ले चालूच ठेवले. तर समुद्री आरमाराने समुद्र मार्गही बंद केला. शेवटी १६ मे १६३९ रोजी मराठ्यांनी वसई किल्ल्यावर विजय मिळविला. इ.स. १७३९ ते १८०२ पर्यंत सुमारे चौसष्ट वर्षे वसई अखेर मराठ्यांच्या ताल्यात राहिली. वसईच्या लढ्यानंतर मराठ्यांनी उत्तर कोकणात आपला जम बसवला.

**ठाणे - इंग्रजांचा काळ :-**

वसईचा तह हा इ.स. ३१ डिसेंबर १८०२ मध्ये मराठा साम्राज्यातील दुसरा बाजीराव पेशवे आणि ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी यांच्या वसई येथे तह झाला होता. या तहावर दुसरा बाजीरावाने स्वाक्षरी केली. वसई किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

तिसरे इंग्रज-मराठा युद्ध इ.स. १८१७ ते १८१८ मध्ये झालेले मराठे व इंग्रज यांच्यात झालेले निर्णायक युद्ध होते. या युद्धात इंग्रजांनी मराठा साम्राज्याचा पराभव केला व जवळपास संपूर्ण भारतावर नियंत्रण मिळविले. पेशवाईने ३ जून १८१८ रोजी आत्मसमर्पण केले व आपले पेशवेपद सोडावे लागले. मराठा सैन्य, इंग्रजांच्या पाचपट सैन्य अधिक असून सुद्धा मराठ्यांत एकोपा नव्हता, आपआपसात दुही होती. इंग्रजांकडे आधुनिक शस्त्रे होती. ब्रिटिशांनी मराठे-पेशवे-शिंदे-होळकर यांना एकत्र होऊ न देता वेगवेगळे पराभूत

**भारतातील पहिल्या ट्रेनचा इतिहास :**

इ.स. १८३२ मध्ये ब्रिटीशांनी भारतात रेल्वे व्यवस्था निर्माण करण्याची कल्पना सर्वप्रथम मांडली. ब्रिटनमध्ये रेल्वे प्रवास अजूनही बाल्यावस्थेत होता. परंतु ईस्ट इंडिया कंपनीने रेल्वेचे जाळे करायचे महत्त्व जाणले. त्यावेळी भारताचे पहिले गव्हर्नर जनरल लॉर्ड होडींग्ज होते. त्यांनी खासगी उद्योजकांनी रेल्वे व्यवस्था बांधण्याची परवानगी दिली. १८४५ मध्ये द ग्रेट पेनिन्सुला रेल्वे आणि ईस्ट इंडिया रेल्वे कंपनी या दोन कंपन्यांची स्थापना झाली. सर जमशेटजी जीजीभॉय, नाना शंकरशेठ हे समितीचे भाग होते आणि त्यांनी या योजनेला ठोस स्वरूप दिले.१६ एप्रिल १८५३ रोजी भारतातली पहिली पॅसेंजर ट्रेन मुंबईच्या बोरी बंदर ते ठाणे दरम्यान धावली. भारताली पहिली ट्रेन हा एक विलक्षण अनुभव होता. द ग्रेट पेनिन्सुला रेल्वेने पहिली ट्रेन चालवली. ही पहिली ट्रेन बोरिबंदर ते ठाणे दरम्यान एकूण ३४ कि. मी. (२१ मैल) अंतर धावली. या ट्रेनमध्ये ४०० प्रवासी बसले होते. उद्घाटनाच्या वेळी २१ तोफांची सलामी देण्यात आली. ही ट्रेन ३ वाफेवरच्या इंजिनांनी खेचली होती. मुंबई ते ठाणे भाडे प्रथम श्रेणीसाठी रुपये २, द्वितीय श्रेणीसाठी रु. १ होते. या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केले गेली व उद्घाटनासाठी शेकडो लोक जमले होते. भारतातील पहिले रेल्वे इंजिन, इंग्लंड मधील व्हल्कन फॉऊंड्रीने बांधले होते.

केले. ते ब्रिटिशांच्या तुलनेत मराठे राजनैतिक आणि लष्करीदृष्ट्या कमी पडत गेले.

**ठाणे जिल्हा - औद्योगिक क्षेत्र :**

ठाणे शहर हे ठाणे जिल्ह्याचे मुख्य केंद्र झाले. तर पालघरचा वाडा, मोखाडा, शहापूर, वसई, डहाणू भाग जंगलाने व्यापलेला आहे. याच जंगलात गेली कित्येक वर्षे आदिवासी बांधव गुण्यागोविंदाने राहत आहेत. या तालुक्यात कुणबी, आगरी, आदिवासी आणि ठाकूर समाजातील लोकसंख्या जास्त आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या २६ टक्के लोक आदिवासी आहेत. त्यांच्यासाठी शिक्षण, आरोग्य, सहकारी संस्था इत्यादींची वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न होऊ लागला. या सर्व बांधवाच्या सवांगीण विकासासाठी शासन वेगवेगळे उपाम राबवत असते. योजना आखीत असते. त्याचाच भाग म्हणून १ ऑगस्ट २०१४ रोजी या ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्याचा निर्णय शासनाने घेतला. कारण प्रत्येकवेळी लहान सहान कामासाठी या बांधवांना थेट ठाणे शहराकडे यावे लागत असे. नवीन जिल्ह्याचे नाव पालघर जिल्हा असे ठेवले आणि प्रशासकीय कामासाठी पालघर हे शहर त्या जिल्ह्याचे मुख्य केंद्र झाले. त्यामुळे दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या विकासाला गती मिळाली.

आत्ताचा ठाणे जिल्हा आता ठाणे शहर (महापालिका क्षेत्र) कल्याण, अंबरनाथ, भिवंडी, शहापूर, उल्हासनगर आणि मुरबाड या सात तालुक्यांनी व्यापलेला आहे. शेती आणि मत्स्यव्यवसाय ही दोन्ही इथल्या लोकांची प्रमुख उदरनिर्वाहाची साधनं. मुंबई सारखे औद्योगिक शहर आणि उत्तम बाजारपेठा जवळच असल्याने कोकणातील अन्य जिल्ह्यांच्या तुलनेनी ठाणे जिल्ह्याची भरभराट लवकर झाली. वाहतुकीची साधने उत्तम असल्याने कच्चा-पक्का माल पाठवणं लवकर आणि सोपं होऊ लागलं. कापड, यंत्रे, अन्नपदार्थ, साखर, लाकडाच्या वस्तू, सेंद्रिय कारखाने, आगपेट्या, तंबाखू, रबरी-कातडी वस्तू, बिस्किटे, कागद, पोलाद इत्यादी वस्तूंचे कारखाने जिल्ह्यात उभे राहू लागले. इतकेच नाही तर परदेशी कंपन्या देखील जोमाने ठाण्यात गुंतवणूक करू लागल्या आहेत हे महत्त्वाचे. जिल्हा बँका, सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, पतपेढ्या आणि खासगी बँकांनी ठाणे जिल्ह्यामधील वेगवेगळ्या ग्राहकांच्या अडचणी समजून घेऊन जोमाने व्यवसाय करायला सुरुवात



केली. आर्थिक चित्र पालटू लागले. ठाणे जिल्ह्याच्या विकासाचे श्रेय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना जातेच. ठाण्यातील वागळे इस्टेट इंडस्ट्रियल एरिया मध्ये अनेक लहान-मोठ्या कंपन्यांनी आपल्या व्यवसायाचे जाळे विणले. या निमित्ताने औद्योगिक वसाहती निर्माण झाल्या. रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने अन्य जिल्ह्यातून, राज्यातून कष्टकरी, श्रमजीवी मोठ्या संख्येने ठाण्याकडे वळू लागले. केंद्र सरकारच्या अंतर्गत असलेला दारुगोळा आणि शस्त्रास्त्र बनविण्याचा कारखाना ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथे आहे. औद्योगिक विकासाच्या बाबतीत देखील ठाणे जिल्हा राज्यात तिसरा आहे. वाढत्या औद्योगिकीकरणांमुळे अन्य जिल्ह्यातील कामगार वर्ग ठाण्यात स्थायी होऊ लागला, यामुळे जमिनीचे भाव वाढू लागले. ठाण्यातील रियल इस्टेट श्रेत्रात अनेक नामवंत बिल्डरांनी प्रवेश करुन सर्व सामान्य ठाणेकरांसाठी उत्तमोत्तम गृहसंकुले निर्माण केली.

**ठाणे जिल्हा - सांस्कृतिक केंद्र :-**

ठाणे शहर राज्यातील एक प्रमुख सांस्कृतिक नगरी आहे. लेखक, कवी, पत्रकार, नाटककार, शिल्पकार, चित्रकार, अभिनेते, साहित्यिक, प्रकाशन संस्था या सर्वांनी ठाण्याचे नाव जगभर उज्वल केले. गणेशोत्सव आणि नवरात्र हे ठाण्याचे महत्त्वाचे उत्सव आहेत.  शहरातला दही-हंडी उत्सव फार लोकप्रिय असून ठाणे, मुंबई आणि उपनगर येथून गोविंदा पथके दही-हंडी फोडण्यासाठी, सहभागी होण्यासाठी येतात. श्रीकौपिनेश्वर मंदिर, मासुंदा तलाव, गडकरी रंगायतन, काशिनाथ घाणेकर नाट्यगृह,  दादोजी कोंडदेव क्रिडासंकुल ही स्थळं ठाणे शहराची भूषणे आहेत. ठाण्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रातील थोर मंडळींचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे ठाणे जिल्ह्याला वेगळी ओळख लाभली. काही महत्त्वाची नावे - ताराबाई मोडक, अनुताई वाघ, खंडू रांगणेकर, पी. सावळाराम, म.पां. भावे, पं. राम मराठे, धर्मवीर आनंद दिघे, सतीश प्रधान, मंजिरी देव, भाई गायतोंडे, सुहास जोशी, रवी जाधव, मधुवंती दांडेकर, सुधीर पटवर्धन, मामा पेंडसे, प्रवीण दवणे, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, महेश केळुस्कर, संपदा कुलकर्णी इत्यादी.

**ठाणे-पालघर जिल्ह्यातील काही महत्त्वाची पर्यटन स्थळे :**

माळशेज घाट, जव्हार-थंड हवेचं ठिकाण, माहुली किल्ला, टिटवाळा येथील श्री गणेश मंदिर, कल्याण मधील दुर्गाडी किल्ला, हाजी मलंग, वसई-अर्नाळा किल्ला, गणेशपुरी-वज्रेश्वरी, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य, केळवा बीच, घोडबंदर किल्ला, येऊर हिल्स, तानसा वन्यजीव अभयारण्य, तुंगारेश्वर धबधबा अंबरनाथचे शिव मंदिर ही स्थळे प्रसिद्ध आहेत.

येत्या काही वर्षात वडाळा आणि ठाणे शहर मेट्रो मार्गाद्वारे जोडले जातील. २६ ऑगस्ट २०१५ रोजी, एमएमआरडीएने ११८ किलोमीटरच्या मुंबई मेट्रो नेटवर्कसाठी ३५४ अब्ज डॉलर्स मंजूर केले. यात वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवाडवली मेट्रो -४ कॉरिडोरमार्गे वडाळा जीपीओ आणि आर. ए. किडवई मार्गाचा समावेश आहे. समस्त ठाणेकर आता उत्सुकतेने या मेट्रोची वाट बघत आहेत.

त्याचप्रमाणे ठाणे ते बोरिवली हा भूयारी रस्ता मार्ग प्रकल्पास नुकतीच शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे अवघ्या तीस मिनिटात आपल्याला ठाण्याहून बोरिवली येथे जाता येईल. सध्या एक ते दीड तास लागतो याच प्रवासाला.

इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारा, सण-उत्सव यांच्या माध्यमातून संस्कृती-परंपरेचं नातं जपणारा ठाणे जिल्हा, आता आधुनिक तंत्रज्ञान आणि विज्ञान कवेत घेण्याचा प्रयत्न  करीत आहे. हे फार महत्त्वाचं आहे. भविष्यातले ठाणे शहर आणि ठाणे जिल्हा कसा असेल याबद्दलची उत्सुकता सर्वांनाच असेल.

---------

**व्यास दीपोत्सव २०२२**
**समृद्धी प्रविण म्हात्रे**
**यांसकडून**
**दिपावलीच्या शुभेच्छा!**

powered by

व्यास क्रिएशन्स्

project by

Vyas Infra

# सांजराई

गुहागर

ज्येष्ठांचे आत्मनिर्भर घर





Investment For Future
Investment With Sanjrai

## चल आनंदाने जगूया

ही रात जागण्याचे
हे वय अजून आहे
बेहोश नाचण्याचे
हे वय अजून आहे
वयमान कितीही झाले
वयात काय आहे?
आनंद फुलविण्याचे
हे वय अजून आहे

## 4 बंगल्यांचे क्लस्टर टाईप-ए
1 प्लॉट = 4 बंगले (48 युनिट)

| प्लॉट एरिया | बंगलो एरिया |
|---|---|
| 4400 ते 5350 स्के.फूट | 600 स्के. फूट (बिल्टअप) 1 बी.एच.के. रूफ टाईप |

## ट्विन बंगलो टाईप-बी
1 प्लॉट = 2 बंगले (10 युनिट)

| प्लॉट एरिया | बंगलो एरिया |
|---|---|
| 3350 ते 4000 स्के.फूट | 650 स्के. फूट (बिल्टअप) 1 बी.एच.के. रूफ टाईप |

## सिंगल बंगलो टाईप-सी (31 युनिट)

| प्लॉट एरिया | बंगलो एरिया |
|---|---|
| 28000 स्के.फूट | 520 स्के. फूट **Mini Bunglow Society** compact 1bhk |

✲ रेराअंतर्गत नियोजित प्रकल्प

powered by

व्यास क्रिएशन्स्

# INVESTMENT

project by

Vyas Infra

## स्टुडिओ अपार्टमेंट (48 युनिट) Proposed

| प्लॉट एरिया | बिल्डिंग टाईप |
|---|---|
| 350 स्के.फूट बिल्ट अप एरिया | 2 Wings Stilt + 3 Floor with Lift |

✲ रेराअंतर्गत नियोजित प्रकल्प




Nilesh Gaikwad Regd. No. A51700023669

जगण्याचा वाढलेला वेग, त्यापेक्षा अधिक वेगाने होणारे बदल यामुळे साऱ्यांचं जगणं यांत्रिक होऊन बसलंय. जगण्याच्या शर्यतीत थांबला तो संपला हाच नियम झाला आहे. त्यात काही चूकही नाही. फक्त प्रश्न उरतो घरातल्या ज्येष्ठांचा. मुलांना आईवडिलांकडे मनात असूनही लक्ष द्यायला वेळ नसतो, काहींची मुलं दूर परदेशात असतात. मग या आईवडिलांनी कसा वेळ घालवायचा. साऱ्या जबाबदाऱ्या पूर्ण झालेल्या असतात, अशावेळी ज्येष्ठांना स्वतःचे घर, स्वतःचा मोकळा वेळ, स्वतःचे आयुष्य जगावे असे वाटत असते. फक्त गरज असते उत्तम पर्यायाची... अशी एक हक्काची जागा असावी असे वाटते, जिथे शरीराबरोबर मनही जपले जाते.

अशी एक जागा आहे ***गुहागर*** जवळ ***देवघर*** या निसर्गरम्य गावात.. फक्त ज्येष्ठांसाठी उभारला आहे निसर्गाच्या कुशीत वसलेला एक गृहप्रकल्प ***सांजराई...*** हे ज्येष्ठांचे स्वत:चे घर असेल, वृद्धाश्रम नव्हे.



गीर गाय

# गोशाळा

नक्षत्र वन

## Organic फळे-भाज्यांची शेती

भारतीय संस्कृती मानवाला पूर्ण सृष्टीवर प्रेम करावयास शिकविते. गाईला तर आपण आपली माता म्हणतो. ग्रामीण भागात ती पहावयास तरी मिळते, पण शहरात तिचे दर्शन दुर्मिळच. पण सांजराईत तुमची ही गोमाता रोज दर्शन देईल. इथे आहे गोशाळा. तुम्ही प्रेमाने जा.. तिच्या सहवासात राहा . कारण आपल्याला रोज दूध, ताक, तूप, लोणी मिळणार आहे. ते याच गोशाळेतून. एकदम सात्त्विक... भेसळविरहित.

# AMENITIES



## INTERNAL

- सेमी फर्निश सोफा सेटसह हॉल
- सेंटर टेबलसह टीव्ही
- Split एअर कंडिशनर
- क्वीनसाईज बेडसह सुसज्ज बेडरूम
- वॉर्डरोब, साइड टेबल
- किचन सुविधा, ग्रॅनाइट ग्रीन संगमरवरी
- इन्व्हर्टर, फायर सेफ्टी, एक्झॉस्ट फॅन आणि बरेच काही...

## EXTERNAL

- अंतर्गत 9 meter रोड
- प्रत्येक plot करिता Septic Tank
- ओपन जिम
- इनडोअर गेम्स
- गणेश मंदिर
- 24x7 सुरक्षा, C. C. टीव्ही
- सुपारीच्या झाडांचे सीमांकन (demarcation)
- यूव्ही वॉटर प्लांट
- व्हीलचेअर रॅम्प सुविधा
- खानपान सुविधा आणि बरेच काही...



**6.75 एकरचा गृहप्रकल्प (ज्येष्ठांकरिता वसलेली पहिली वहिली बंगले वसाहत)**

- POSSESSION STARTS FROM MARCH 2023
- PROJECT COMPLITION AS ON NOV-DEC 2023

अधिक माहितीसाठी संपर्क **9967637255 / 9920949177**

www.sanjraaivc.com https://www.facebook.com/SanjraaiVyasCreations/

https://www.youtube.com/channel/UC9LsO1muxxtVBJoIE8rdHgA

# Gated Community

## राहून गेलेल्या गोष्टी पूर्णत्वास नेणारं घर




### गंध आनंदोत्सवाचा

सण, समारंभ हे तर आपल्या आयुष्यातील आनंदाचे, उत्साहाचे क्षण. मग ते एकेकट्याने घरात साजरे करण्यापेक्षा आपल्या नवीन मित्र मैत्रिणींबरोबर साजरे केले तर. वर्षभरात दिवाळी, संक्रांत, होळी, रंगपंचमी, कोजागिरी असे विविध उत्सव आपण मिळून साजरे करणार आहोत. तुमचे वाढदिवस, लग्नाचे वाढदिवसही इथे साजरे होतील.. तेही जंगी पार्टी ठेवून..

### चलो पिकनिक जाऐंगे...

सांजराई ही आनंद मिळवून देणारी आणि ज्येष्ठांना आनंदित करण्यासाठी कटिबद्ध आहे. रोजच्या एकसुरी जगण्यातून निवांतपणा मिळावा, जवळपासची प्रेक्षणीय स्थळे पहावीत असं वाटत असेल तर याचीही काळजी आम्ही घेत आहोत. दर तीन महिन्यातून आम्ही तुमची पिकनिक आयोजित करणार आहोत. धम्माल करा.. दंगामस्तीही करा..

सांजराई गृहागर
ज्येष्ठांचे आत्मनिर्भर घर

### पुस्तकांच्या सहवासात

तुम्हाला पुस्तक वाचनाचा छंद असेल तर तुम्ही खरंच भाग्यवान आहात.. कारण आपण सांजराईत निवडक पण उत्तम पुस्तकांचं एक ग्रंथालयही उभारत आहोत. नोकरी, गृहकल्प यातून वाचनाला वेळ मिळाला नसेल तर वाचनाचा आनंद घ्या.

### ये घर बहोत हसीन है

आम्ही घर फक्त बांधून देणार नाही तर आवश्यक सुखसुविधाही पुरवणार आहोत. म्हणजेच सोफा सेट, टीव्ही, टेबल, फॅन, कूलर, क्वीन साईज बेड, वॉर्डरोब, साईड टेबल, स्वयंपाक घर अशा बऱ्याच गोष्टी आम्ही पुरवणार आहोत. हे करताना तुमची सुरक्षाही कशी राखता येईल याचेही नियोजन केले आहे.

### नव्या मैत्रीचा बहर

रक्ताची नाती ही जन्माने मिळतात, पण मानलेली नाती मनाने जुळतात यालाच तर मैत्री म्हणतात. तुम्ही तुमचे घर, जुने मित्र सोडून आलात तरी सांजराईत खऱ्या अर्थाने तुमच्या नव्या मैत्रीला बहर येईल.इथे नवीन मित्र मैत्रिणी मिळतील, ती तुमच्या सुख दु:खाशी एकरूप होतील.

### जगण्याचं स्वातंत्र्य

सांजराईत ज्येष्ठांना स्वतंत्रपणे जगता येईल. घरभाडं, बिलं भरणं, हाऊसकिपींग, औषधं आपणच आणणं या आणि इतर कोणत्याही गोष्टींची चिंता त्या व्यक्तीला भासणार नाही. जगणं सुसह्य करण्यासाठी सांजराई सज्ज आहे..



Powered by
व्यास क्रिएशन्स्
निसर्गरम्य
कोकणात आपलं कमावणारं
घर
मुंबई
ठाणे
दापोली
MAHARERA REGD. No. P52800017588
FAMILY KATTA
A PERFECT DESTINATION FOR INVESTMENT
A Project by Shree Balaji Realtors
Family Katta
ONE STEP TO
ENJOY
OF LIFE
फॅमिली कट्टा
दापोली
आपलं कोकणातलं घर
66 Bungalows and 3 Buildings
Magnificent project in 10.75 acres
Sanctioned N.A. Layout
Individual 7/12 Extract

फॅमिली कट्टा दापोली
आपलं कोकणातलं घर

## 1 BHK
STARTS 35 LACS



585 SQ.FT. CARPET

820 SQ.FT. BUILT-UP

2500 SQ.FT. PLOT AREA (approx)*

| PLOT AREA | INVESTMENT AMOUNT |
|---|---|
| 2200 TO 3200 SQ.FT | Rs. 35 TO 42 LAKHS |

Average Return on Investment (ARI)*

| RENT BACK AMOUNT (PER MONTH) |
|---|
| Rs. 17,000 |
| ANNUAL INCOME |
| Rs. 2,04,000<br>* 10 PERCENT INCREMENT EVERY 2 YEARS |

## 2 BHK
STARTS 48 LACS

3500 SQ.FT. PLOT AREA (approx)*



980 SQ.FT. CARPET

1370 SQ.FT. BUILT-UP

| PLOT AREA | INVESTMENT AMOUNT |
|---|---|
| 3300 TO 3800 SQ.FT | Rs. 48 TO 57 LAKHS |

| RENT BACK AMOUNT (PER MONTH) |
|---|
| Rs.25,000 |
| ANNUAL INCOME |
| Rs. 3,00,000<br>* 10 PERCENT INCREMENT EVERY 2 YEARS |

4500 SQ.FT. PLOT AREA (approx)*

1325 SQ.FT. CARPET

1855 SQ.FT. BUILT-UP

## Luxury Bunglow with Smart Amenitis

## 3 BHK
STARTS 71 LACS



| PLOT AREA | INVESTMENT AMOUNT |
|---|---|
| 3800 TO 4600 SQ.FT | Rs. 71 TO 78 LAKHS |

| RENT BACK AMOUNT (PER MONTH) |
|---|
| Rs. 40,000 |
| ANNUAL INCOME |
| Rs. 4,80,000<br>* 10 PERCENT INCREMENT EVERY 2 YEARS |

ASSURED RENT BACK

0 ZERO MAINTENANCE

### BRAMHA



| ANNUAL INCOME |
|---|
| Rs. 78,000<br>* 10 PERCENT INCREMENT EVERY 2 YEARS |

| AREA | INVESTMENT AMOUNT | RENT BACK AMOUNT (PER MONTH) |
|---|---|---|
| STUDIO APPT. 380 TO 430 SQ.FT BUILT UP | Rs. 12 TO 14 LAKHS | Rs. 6500 |

### VISHNU



| ANNUAL INCOME |
|---|
| Rs. 1,20,000<br>* 10 PERCENT INCREMENT EVERY 2 YEARS |

| AREA | INVESTMENT AMOUNT | RENT BACK AMOUNT (PER MONTH) |
|---|---|---|
| 1 BHK 560 TO 575 SQ.FT BUILT UP | Rs. 17 TO 20 LAKHS | Rs. 10,000 |

अधिक माहितीसाठी संपर्क 9967637255 / 9920949177

फॅमिली कट्टा
दापोली
आपलं कोकणातलं घर

## EXTERNAL AMENITIES



- Fitness Center
- Swimming Pool
- Internal service vehicle
- Restaurant
- Super Store
- CCTV Survillence
- 24x7 Security
- Watch Tower
- Jogging Track
- Indoor Games
- Open Gym
- Children Play Area
- Common Library

## INTERNAL AMENITIES



- Wardrobe, Side Table, Air Conditioner
- Semi Furnished Hall with Sofa Set, TV
- Semi Furnished Ready to Leave




फॅमिली कट्टा
दापोली
आपलं कोकणातलं घर

Mumbai -Thane- Dapoli

5 HOURS 2 MIN. (214.4 km) By NH-66

PANCHNADI, KOLTHARE,
TAL: DAPOLI, DIST: RATNAGIRI

9967637255 / 9920949177



powered by
व्यास क्रिएशन्स्
निसर्गरम्य
कोकणात
आपलं
कमावणारं
माझे घर
जिथून दिसतो सागर निळसर
लाटांमागून लाटा कणखर
पायवाटही अतीव सुंदर
तिथेच वसते माझे हे घर
आंबा, फणस, काजू मणभर
न्याहरी भोजन सारेच रूचकर
परशुरामाची ज्यावर पाखर
तिथेच वसते माझे घर
हिरवा निसर्ग सुंदर अंबर
सदा विहरती पक्षी सुंदर
माणुसकीचे सुगंधी अत्तर
तिथेच वसते माझे हे घर
मला भावते सदा निरंतर
कोकणभूमी सदैव मंगल
निसर्ग बहरतो ज्या भूमीवर
फॅमिली कट्टाचे कमावणारे घर
project by
Vyas Infra
PANCHNADI, KOLTHARE, TAL : DAPOLI, DIST : RATNAGIRI
अधिक माहितीसाठी संपर्क 9967637255 / 9920949177

अतुल्य ! भारत
Incredible !ndia

सत्यमेव जयते
पर्यटन मंत्रालय, भारत सरकार



**आकाश पाळणा**
(लाकडी)
**सावंतवाडी**
**महाराष्ट्र**

# ह्या सणासुदीला संस्कृतीचे प्रतिक म्हणून घरी घेऊन या एक स्थानिक कलाकृती !

## हस्तकला
## आणि कलाकुसरीच्या
## खेळण्यातून पहा
## महाराष्ट्राचे नवे रूप!!

**भारत पर्यटन, मुंबई**
www.incredibleindia.org

**भारतातील विविध पर्यटन स्थळांविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी संपर्क करा**
**दूरध्वनी क्र. 022-22044333, ईमेल : indiatourism-mum@nic.in**

QUALITY PRODUCE of INDIA

5D MASTER

NTS GROUP



**Nitin D. Dalvi**
(CEO, NTS Group)

A COMPLETE CLEANING SOLUTION FOR ALL INDUSTRIES

# YAH SAFAI KA MAMLA HAI

PREMIUM QUALITY




कोकण
आणि इतर
महाराष्ट्रामध्ये
वितरक नेमणे आहे.
-: संपर्क :-
**9326330207**

Tirumala NTS Group

Mkt & Technical Guidance by

## TIRUMALA INDUSTRIES

110A, Globe Estate, First Floor, Vikas Naka,
Contact: **+91 922 320 2977 / 922 323 0666**
Mail: **5dmastertm@gmail.com**


ब्राह्मण शिक्षण मंडळाचे
इंग्लिश मिडियम स्कूल, घंटाळी, ठाणे (प.)
विद्या विनयेन शोभते
प्रवेश प्रक्रिया सुरू
ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या घंटाळी येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत नर्सरी ते दहावीपर्यंतचे प्रवेश सुरू आहेत. संपर्क साधावा.
संपर्क : चिटणीस
ब्राह्मण शिक्षण मंडळ, ठाणे.
दूरध्वनी क्र. : २५३९ ३९७२
BRAHMAN SHIKSHAN
ब्राह्मण शिक्षण मंडळाची इंग्लिश मिडीयम स्कूल


powered by
व्यास क्रिएशन्स्
project by
Vyas Infra
फॅमिली कट्टा
दापोली
आपलं कमावणारं घर
तारांकित सोयीसुविधांसह
66 बंगले व 3 इमारतींचा गृहप्रकल्प
फॅमिली कट्टा
Nilesh Gaikwad Regd. No. A51700023669
निसर्गरम्य कोकणात आपलं कमावणारं घर
दरमहा मेंटनन्स फ्री
दरमहा शाश्वत उत्पन्न
अधिक माहितीसाठी संपर्क | 9967637255-9920949177

सांजराई
गुहागर
ज्येष्ठांचे
आत्मनिर्भर घर

कोकणातील
गुहागर येथे
ज्येष्ठांसाठी
आत्मनिर्भर घर...

COMMUNITY LIVING
FOR SENIOR CITIZEN

project by
Vyas Infra



ज्येष्ठांचे
Community Living
म्हणजे स्वत:चे घरकुल...
आनंदधाम

सांजवेळ वेगळी, साजिरी गोजिरी,
गुहागरात बहरली, सुखाची सांजराई...

Nilesh Gaikwad Regd. No. A51700023669

6.75 एकरचा गृहप्रकल्प (ज्येष्ठांकरिता वसलेली पहिली वहिली बंगले वसाहत)

• POSSESSION STARTS FROM MARCH 2023 • PROJECT COMPLITION AS ON NOV-DEC 2023

अधिक माहितीसाठी संपर्क 9967637255 / 9920949177

www.sanjraaivc.com https://www.facebook.com/SanjraaiVyasCreations/

https://www.youtube.com/channel/UC9LsO1muxxtVBJoIE8rdHgA

powered by

व्यास क्रिएशन्स्

# आयुष्याची सेकंड इनिंग म्हणजे ज्येष्ठत्व

सांजराई गुहागर ज्येष्ठांचे आत्मनिर्भर घर

project by

Vyas Infra

**नि**वृत्तीनंतर आयुष्यभर थकलेल्या शरीराला विसावा मिळावा आणि अखंड जबाबदारीच्या ओझ्याखाली दबलेल्या मनाला उसंत मिळावी असे प्रत्येक व्यक्तीला वाटतं. पण प्रत्यक्षात असं होतंच असं नाही.

खरंतर निवृत्तीनंतर प्रत्येक ज्येष्ठांनी आत्मशुद्धी मिळवावी असं आपल्या संस्कृतीत म्हटलं आहे. योग्य आहार-व्यायाम, औषधोपचार, शरीराची तसेच परिसराची स्वच्छता आणि पुरेशी विश्रांती यामुळे आपले जीवनमान उंचावते. निसर्ग आपला खरा सोबती आहे. त्यामुळे त्याच्या सान्निध्यात भटकंती करावी. त्यामुळे मनाचे आरोग्य सुधारते. आपला वेळ आनंदात जाण्यासाठी वाचन, चित्रकला, गायन, वादन, लेखन यासारखी एखादी कला तरी जोपासावी. उर्वरीत आयुष्य नव्या उमेदीने, चैतन्यपूर्ण जगण्यासाठी ***ज्येष्ठांनी आपली मनोभूमिका स्पष्ट केली पाहिजे.*** वृद्धापकाळात मुलांच्यावर अवलंबून न राहता स्वावलंबी राहू याची पूर्णपणे काळजी आधिपासून घेणे, गरजेचे आहे. कारण हे जगणं सुंदर झालं पाहिजे.

***ही रात जागण्याचे हे वय अजून आहे***
***बेहोश नाचण्याचे हे वय अजून आहे***
***वयमान कितीक जाहले वयात काय आहे***
***आनंद फुलविण्याचे हे वय अजून आहे***

ज्येष्ठांना अशा आयुष्याचा आनंद देण्यासाठी ***व्यास क्रिएशन्स्*** या प्रथितयश संस्थेने ***'सांजराई'*** हे गृहसंकुल उभारण्यास घेतले आहे. गेली ***१७ वर्षे*** ज्येष्ठांसाठी समर्पण भाव ठेवून व्यास क्रिएशन्स् काम करते आहे. ज्येष्ठांसाठी विविध उपक्रम, विशेषांक, स्पर्धा, आरोग्य शिबिरे अशा अनेक उपक्रमाबरोबर ***ज्येष्ठमहोत्सव सोहळा*** हा व्यास क्रिएशन्स्च्या कारकिर्दीतील सर्वात यशस्वी उपक्रम.

ज्येष्ठ ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहे. हे 'व्यास'ने विविध उपक्रमाद्वारे दाखवून दिले आहे. कारण ज्येष्ठ म्हणजे 'म्हातारे' नव्हे, तर ते 'महा-तारे' आहेत असे आम्ही मानतो. प्रत्येक ज्येष्ठाने आपले उर्वरित आयुष्य स्टार म्हणूनच व्यतीत केले पाहिजे असा व्यास क्रिएशन्स् [illegible] आग्रह राहिला आहे.

घर जे स्वतःचं असेल, स्वतःसाठी असेल आणि स्वतःला सुख, समाधान देणारं असेल. आपली प्रत्येक आवड येथे जोपासली जाईल. आपल्या आरोग्याच्या छोट्या मोठ्या सर्व तक्रारींचे निवारण करण्यात येईल. तेही मायेच्या वातावरणात आणि प्रेमाच्या भावनेनं, त्यासाठी सज्ज आहे ***सांजराईची हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट***ची टीम.

आजूबाजूचा हिरवागार निसर्ग आपल्याला कायम टवटवीत ठेवेल. आपली श्रद्धा जोपासण्यासाठी अनेक स्वयंभू मंदिरे, स्फूर्ती देणारी ऐतिहासिक स्थळे आणि मनाची विशालता प्रगल्भ करणारा अथांग समुद्र ही आपल्यासाठी पर्वणीच असेल. आपल्यासारखे अनेक दिग्गज, सृजनशील आणि मायाळू ज्येष्ठ मित्र येथे सोबतीला असतील. त्यामुळे मैत्रीचा निखळ आनंद आपल्याला निश्चित सुखावणारा असेल. कोकणातील ***गुहागर*** येथे ***देवघर*** या निसर्गरम्य गावात ***६.७५ एकर*** जागेवर उभारलेला ***गृहप्रकल्प सांजराई.*** मोकळं अंगण, बहरलेली झाडे, शुद्ध हवा आणि भरपूर पाणी सर्व अत्यावश्यक सेवेसहीत अगदी एका हाकेत. आपल्या स्वप्नांना मूर्तरूप देण्यासाठी आपण या सांजराईत अवश्य या. आपल्या ***हक्काचे घर*** निवडा. विकत घ्या आणि आपले उर्वरित आयुष्य निवांत जगा. अगदी मजेत रहा. ***आयुष्यात राहून गेलेल्या गोष्टींसाठी मोकळं आकाश असलेली ही सांजराई*** आपल्याला ***आत्मनिर्भर*** जीवनाचा आनंद देईल. आम्ही आपली वाट पाहतोय. आपण नक्की या. वास्तवतेचा स्वीकार करून आपल्या कल्पकतेला वाव देण्यासाठी आणि मनाला ***सर्वोच्च समाधान*** देण्यासाठी ***सांजराई*** सज्ज आहे. म्हणून आपणास प्रेमळ आग्रह आहे. आपण जरूर या. धन्यवाद!

***आयुष्याच्या सायंकाळचा***
***व्हावा ऐसा सोहळा***
***सांजराईत अनुभवा आनंदे***
***याची देही याची डोळा!***

## 6.75 एकरचा गृहप्रकल्प (ज्येष्ठांकरिता वसलेली पहिली वहिली बंगले वसाहत)

- POSSESSION STARTS FROM MARCH 2023
- PROJECT COMPLITION AS ON NOV-DEC 2023

अधिक माहितीसाठी संपर्क **9967637255 / 9920949177**


www.sanjraaivc.com

https://www.facebook.com/SanjraaiVyasCreations/

https://www.youtube.com/channel/UC9LsO1muxxtVBJoIE8rdHgA

# ARYADURGA ENTERPRISE

All Types of Design & Printing




CREATIVE DESIGN AND PRINTING SOLUTION FOR EVERY BUSINESS

- Book cover design
- Books and magazine
- Business card design
- Brochure design
- Flyer design
- Label & packaging design
- Poster design
- Shopping bag design
- Menu design
- T-shirt design
- All types of print design
- Calendar
- Folder
- Gift voucher
- Greeting card
- Invitation
- Leaflet
- Letterhead
- Manual design
- Postcard
- Sticker

Print all your printing needs

**+91 98335 09177**

*Aryadurga Enterprise*

Advanced Printing & Allied Services

Shop No. 4, Mansi Vhilla Apartment, Near Ayappa Mandir, Gharda Circle, Azade Pada, Dombivli (E)-421201

• subodh.patwardhan@gmail.com • atharva.art123@gmail.com




गेली १३ वर्ष पुर्नविकासात यशस्वीपणे काम करणारे जोशी बिल्डर्स आणि डेव्हलपर्स आता विस्तारत आहेत आपले क्षितिजं
गतिमान पुनर्विकासासाठी

JOSHI™
Builders & Redevelopers
www.joshibuilders.in

**JOSHI BUILDERS AND REDEVELOPERS LLP**
आपल्या सेवेत...

- Superior Quality Vastu Compliant Smart Homes
- Green Building with 100% Power Backup in each Room & Common areas
- All Projects at Prime Locations in Thane (West) near Railway Station
- State of Art Amenities & Technical Specifications
- Customized Interior Layouts as per Customers Requirement
- Dedicated car parking for every flat holder
- Fire fighting system for building

601,Aishwarya Laxmi Apartments, Behind New English School, Opp. Namdeo Wadi Hall, Maharshi Karve Road, Thane, Maharashtra Pin: 400602 | 95943 79111

powered by
व्यास क्रिएशन्स्

# पाळीवरती हात ठेवून 'फक्त लढ' म्हणणारं घर,
# फॅमिली कट्टा

फॅमिली कट्टा दापोली
आपलं कमावणारं घर

काय सुंदर लिहून ठेवलंय कवीने. शहरामध्ये राहणाऱ्या लोकांना घर हा शब्द खूप जिव्हाळ्याचा वाटतो. मुंबईत घर असावं असं प्रत्येकाचं स्वप्न असतं. पण ते स्वप्न बऱ्याचदा स्वप्नच बनून राहतं. कारण मुंबईत घर घ्यायचं तर किमान ७० लाख रुपये हवेत. आता मुद्दल कुठून आणायची आणि कर्ज किती काढायचं या दोन प्रश्नांच्या मध्ये मुंबईकरांचं सँडविच होतं.

मित्रांनो, घर घेणं ही अनेकांची प्राथमिकता असली तरी ते घर आपल्याला समाधान देतंय की आपल्या संकटात भर घालतंय हे पाहणं अत्यंत गरजेचं आहे. म्हणजे घराचे हप्ते फेडता फेडता आपली पाठ तर वाकत नाही ना, हे सुद्धा पाहिलं पाहिजे. हे खरं आहे मित्रांनो की, खोली घर बनते जे चार भिंतींमध्ये राहणाऱ्या माणसांची मनं जुळतात. घरात राहणारी माणसं, त्यातून निर्माण होणारे वातावरण, प्रेम, जिव्हाळा ह्या गोष्टी महत्त्वाच्या असतातच. त्या घरातून आर्थिक स्थिरता सुद्धा प्राप्त झाली पाहिजे.

साधारणतः शहरी भागातील तरुण तिशीत घर घेतो आणि साठीपर्यंत हप्ते भरत राहतो. यातही रिस्क फॅक्टर्स असतात. म्हणजे तारुण्य जातं हप्ते भरण्यात आणि ६० नंतर मुलांचा संसार सुरू होतं, त्यामुळे घेतलेलं १ बीएचके घर देखील लहान वाटू लागतं. ही अनेक लोकांची प्रॅक्टिकल समस्या आहे.

आपण गावात घर घेण्याचा विचार केला तरी टायटल क्लियर नसणे, एका जमिनीवर सबंध कुटुंबाची नावे असल्यामुळे आपल्या नावावर ट्रान्स्फर होताना अडचणी येणे अशा अनेक समस्या असतात. आता तुम्ही म्हणाल की, या लेखात अडचणीच आहेत, आम्हाला या सर्व अडचणी माहिती आहेत. आधी समस्या सांगितल्या, आता समाधान पाहा...

या सर्व समस्यांवर एकच समाधान फॅमिली कट्टा... कोकणातल्या दापोली येथे उभारलेला मनोरम्य प्रकल्प म्हणजेच फॅमिली कट्टा... कोकण म्हणजे नैसर्गिक सौंदर्याची खाण. कोकणात काय नाही? राकट पण सुंदर सह्याद्रीच्या कडा, शिवरायांच्या इतिहासाचे पोवाडे गाणारे गड-किल्ले, प्राचीन लेणी, मन प्रसन्न करणारी मंदिरे, हिरवंगार रान आणि मन निरामय करणारा अथांग समुद्र... स्वर्ग कुणी पाहिला नाही, परंतु कोकणात आल्यावर वाटतं की स्वर्ग हा असाच असावा...

अशा कोकणात स्वतःचं हक्काचं व कमावणारं घर असेल तर किती मज्जा येईल ना! काय म्हणता? स्वप्नवत आहे सगळं... स्वप्न, पण सत्यात उतरणारं. हे स्वप्न सत्यात उतरवणार आहे व्यास क्रिएशन्स प्रा. लि.

कोकणातल्या दापोलीत व्यास क्रिएशन्सने उभारला आहे भव्य गृहप्रकल्प, आनंद देणारा आणि कमवून देणारा... फॅमिली कट्ट्यातलं घर हप्ते भरून तुमचे खांदे वाकवत नाही, तर तुम्हाला स्वाभिमानाने जगायला प्रवृत्त करतं. महत्त्वाचं म्हणजे तुम्ही घर खरेदी केल्यावर तुम्हाला घराच्या देखभाल खर्च उचलावा लागणार नाही, तो खर्च आम्ही उचलणार. म्हणजे तुम्ही टेन्शन घ्यायचं नाही, तर त्या सर्व गोष्टींची जबाबदारी आमची.

फॅमिली कट्टा या गृहप्रकल्पात आजच घर खरेदी करा, आणि हप्ते भरण्याचं टेन्शन विसरा. कारण हे घर तुम्हाला दर महिन्याला पैसे कमावून देणार आहे. तुमच्या घराच्या क्षेत्रफळानुसार दरमहा भाडे स्वरूपात रेंट बँक उत्पन्न मिळणार आहे. या प्रकल्पात आठवड्याचे ७ दिवस २४ तास सुरक्षा मिळणार आहे. मेडिकल सुविधा अगदी हाकेच्या अंतरावर असून ओपन जीम, खानपान व्यवस्था, स्वीमिंग पूल, ॲम्फी थिएटर, जॉगिंग ट्रॅक अशा अनेक सुविधा तुम्हाला उपलब्ध होणार आहे. मग शहरात घर खरेदी करुन हप्ते भरता भरता आयुष्य घालवण्यापेक्षा कोकणात या... फॅमिली कट्टा येथे घर खरेदी करा, मेंटेनन्स भरु नका आणि दर महिन्याला रेंट बँकच्या माध्यमातून पैसे कमवा व त्याचं पैशाने घराचे हप्ते फेडा... आणि काय हवंय आयुष्यात?

चला तर, आम्ही तुमच्या फोनची वाट पाहतोय. आलाच फोन... हॅलो, 'मी व्यास क्रिएशन्स्'चा प्रतिनिधी बोलतोय... फॅमिली कट्टा मध्ये तुमचं स्वागत आहे...

घर असावं घरासारखं नकोत नुसत्या भिंती
इथं असावा प्रेमजिव्हाळा नकोत नुसती नाती

project by
Vyas Infra

- अधिक माहितीसाठी संपर्क -

9967637255 / 9920949177



# मुंबई मेरी जान...

जयेश मेस्त्री

खरं पाहता मुंबई ही काम करणाऱ्याची आईच आहे. कारण मुंबई कधीच कुणाला नाराज करत नाही. देशभरातून लोक इथे येतात आणि पैसे कमावतात. आता तर मुंबईची लोकसंख्या प्रचंड वाढलेली असल्यामुळे येथे ग्राहकही खूप आहेत. अगदी २० – २५ वर्षांपूर्वी जिथे कमी लोकसंख्या होती, तिथे मोठमोठे टॉवर्स उभे राहिलेले आहेत. कोरोनाकाळाचं जर तुम्ही निरीक्षण केलं असेल तर नोकरी गेल्यामुळे त्रासलेल्या लोकांना नव–रोजगार सुद्धा मिळालेला आहे.

माझ्या अमराठी मित्रांशी मुंबईवर चर्चा करताना, बऱ्याचदा ते असं म्हणतात की, 'आम्हाला मुंबईचं फार आकर्षण होतं. मुंबई जणू भव्य दिव्य असं शहर आहे, मुळात ज्याप्रमाणे पूर्वी मुली आपल्या स्वप्नातला राजकुमार येईल आणि आपल्याला घोड्यावर बसवून घेऊन जाईल अशी स्वप्न रंगवत होत्या, त्याप्रमाणे आमच्या गावचे लोक मुंबईला एक दिवस जायला मिळेल अशी स्वप्न रंगवायचे.'

दिवंगत राजू श्रीवास्तव यांचे 'गजोधर' नावाचे पात्र हे तसेच आहे. गजोधर मुंबईला येतो आणि गावी जाऊन मुंबईचे गंमतीदार किस्से सांगतो. त्यांचं हे पात्र खूप गाजलं. सांगायचं तात्पर्य की मुंबई ही अनेकांसाठी स्वप्नांची नगरी आहे. रावणाच्या काळात जर मुंबई असती तर त्याने मुंबईवर राज्य करण्यासाठी नक्कीच धडपड केली असती आणि ग.दि.मा. यांना 'रम्य ही स्वर्गाहून मुंबई' असे गीत लिहावयास लागले असते. मात्र ही मुंबापुरी समग्र कोकणचेच एक बेट, वस्ती आहे हे लोक का विसरतात!

रिझर्व्ह बँक, मुंबई शेअर बाजार, राष्ट्रीय शेअर बाजार या महत्त्वाच्या आर्थिक संस्था या शहराला लाभलेल्या आहेत. अनेक कंपन्यांची मुख्य कार्यालये मुंबईत आहेत. महाराष्ट्र व देशभरातून आपलं नशीब आजमवण्यासाठी लोक इथे येत राहतात. मराठी सिनेसृष्टीसोबत बॉलिवूड म्हणजेच हिंदी सिनेसृष्टीचं मुंबई हे केंद्र आहे.

असं म्हणतात की ही मुंबई कधीच कुणाला उपाशी ठेवत नाही. ज्याच्या मनगटात बळ असतं, तो इथे सुखी राहतो. पूर्वी मुंबईत बहुसंख्य मराठी माणूस होता. परंतु इथे वाढलेल्या व्यापाराच्या संधी, कलेला मिळालेलं प्रोत्साहन अशा अनेक गोष्टींमुळे इतर प्रांतातले लोक इथे प्रामुख्याने आकर्षित झाले. मुंबा-आईने त्या सर्वांना आपल्या कवेत घेतले.

**मुंबईचं ऐतिहासिक महत्वः**

मुंबईवर अनेक शासकांनी शासन केलेलं आहे. इ.स. १३४३ पर्यंत हा प्रदेश हिंदू राज्यकर्त्यांकडे होता. हिंदू राजांचं वर्चस्व मुंबईवरुन गेलं आणि पुढे गुजरातच्या मोहम्मदाने मुंबई पादक्रांत केली आणि त्यानंतर १५३४ रोजी पोर्तुगीज लोकांनी मुंबई आपल्या ताब्यात घेतली. त्यांनी सायन, माहिम, बांद्रा, और बेसियन येथे इमारती, चर्च बांधले. १६२५ दरम्यान डच लोकांनी देखील मुंबईवर आपलं राज्य स्थापन केलं होतं. पुन्हा पोर्तुगीजांकडे मुंबई गेली आणि १६६१ साली त्यांनी चार्ल्स द्वितीय ला भेट म्हणून मुंबई देण्यात आली.

मुंबई म्हटली की पोर्तुगाल आणि ब्रिटिश नजरेसमोर येतात. पण पोर्तुगाल आणि ब्रिटिंशांच्या पलीकडेही मुंबईचं महत्व आहे. मुंबईचा इतिहास मर्यादित नसून त्याचा मागोवा घेतला की आपण सम्राट अशोकाच्या काळापर्यंत जाऊन पोहोचतो.

नालासोपाऱ्यात सम्राट अशोकाच्या काळातील स्तूप, आज्ञाशिला आढळले होते. दहिसर नदीचे संशोधन केल्यावर आदिमानवाच्या काळातील हत्यारेही सापडली होती. म्हणजेच मुंबईला अति-प्राचीन महत्त्व प्राप्त झाले आहे.

याविषयी विशेष संशोधन न झाल्यामुळे मुंबईची ऐतिहासिक तथ्ये आजही काळाच्या पडद्याआड दडून राहिलेली आहेत. जर यावर संशोधन झाले तर मुंबईचं ऐतिहासिक रूप लोकांना कळेल आणि ते ऐतिहासिक महत्त्व पटलं तर मुंबईच्या पर्यटनातही वाढ होईल. खरं पाहता, ही सात बेटे होती. पूर्वीच्या काळात मुंबईत ८० बंदरांच्या नोंदी आढळतात. इसवीसन पहिल्या शतकातला तो काळ, त्या कालखंडात सातवाहनांचे राज्य होते.

पैठण ही त्यांची राजधानी. रोमन, ग्रीक, पर्शियन आणि अरब राष्ट्रातील लोकांशी व्यावसायिक संबंध असल्याने महाराष्ट्र हे खूप मोठे आणि समृद्ध राज्य होते. महा-राष्ट्र हे नाव त्यासाठी साजेसेच आहे. इथे अनेक लेण्या सापडतात. बोरीवलीत लेण्यांची संकुले सापडतात. मुंबई हे पूर्वीपासूनच आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र होते. कलचुरी, गुप्त सम्राट, चालुक्य, राष्ट्रकुल, शिलाहार आणि मराठे असे शासक इथे होऊन गेले आहेत.

कोळी समाज हा इथला प्राचीन समाज मानला जातो. कोलवरून कोलीय वंश आणि त्यावरून कोळी असे नामकरण झाले, कोळी हे सातवाहनांचे सरदार मानले जातात. त्याचबरोबर पांचाळ, शाक्य, मालवगण, मल्लवी अशाप्रकारची सोळा जनपदे या भागात होती. कोळी म्हणजेच कोल सरदारांमुळे कदाचित कोलाबा, कोल कल्याण, कोलडोंगरी, कोलाड अशी नावे पडली असल्याचा अंदाज आहे. याबाबतीत पुढे संशोधन झाले तर थक्क करणारे पुरावे समोर येऊ शकतात. तर वाचकांनो, मुंबईला असे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**ब्रिटिश आणि मुंबई**

१९ व्या शतकात इंग्रजी राज्य आले आणि मुंबईला फारच महत्त्व प्राप्त झाले. जे जे नवे सुधारित यावे ते प्रथम मुंबईत असा शिरस्ताच होता. त्याच काळात व्हिक्टोरिया

टर्मिनस, जनरल पोस्ट ऑफिस, नगर निगम, प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय, राजाबाई टॉवर आणि बॉम्बे विश्वविद्यालय, एल्फिंस्टन कॉलेज आणि कवासजी जहांगीर हॉल, क्रॉफोर्ड मार्केट, ओल्ड सचिवालय (ओल्ड कस्टम्स हाऊस) अशा अनेक इमारतींचे निर्माण करण्यात आले.

राजा जॉर्ज आणि राणी मेरीच्या भारत यात्रेसाठी १९११ रोजी गेटवे ऑफ इंडिया तयार झालं. आज गेटवे ऑफ इंडियाच्या परिसरात मुंबईकर व पर्यटकांची तुफान गर्दी पाहायला मिळते.

आज महाराष्ट्र आणि गुजरात नावाचे दोन वेगळे राज्य आहेत. पण ब्रिटिश इंडियामध्ये बॉम्बे राज्यात गुजरात व महाराष्ट्र ही दोन्ही राज्ये येत होती. आजची मुंबई म्हणजे ब्रिटिशकालीन बॉम्बे नव्हे.

पूर्वी कुलाबा, माहिम, छोटा कुलाबा, माझगाव, वरळी, माटुंगा आणि परळ अशी सात बेटे होती. ही बेटे जोडून मुंबई या विशाल शहराची निर्मिती झाली आहे. प्रत्येकाला मुंबईचं आकर्षण वाटू लागलं. नशीब आजमवायचं असेल तर मुंबईत गेलं पाहिजे ही भावना दृढ होऊ लागली. पण याचा वाईट परिणाम मुंबईच्या लोकसंख्येवर होऊ लागला.

दर वर्षी १० पौंडच्या बदल्यात मुंबई ईस्ट इंडिया कंपनीने मुंबई आपल्या ताब्यात घेतली. खरी पण ब्रिटिशांनी मात्र मुंबईचं स्वरुप बदललं. त्यांनी मिल्स मुंबईला हलवल्या. त्यानंतर ‘बॉम बिमा’ हे पोर्तुगीज नाव बदलून इंग्रजांनी ‘बॉम्बे’ असं नामकरण केलं. मुंबादेवी ही मुंबईची देवी, कोळ्यांची देवी म्हणून ते मुंबईला मुंबा म्हणायचे.

गेराल्ड ऑंगियर बॉम्बेचे गव्हर्नर झाले. तेव्हा त्यांनी गुजराती व्यापारी, पारसी व इतर लोकांना मुंबईकडे आकृष्ट केलं. त्यामुळे मुंबईची लोकसंख्या वाढू लागली. मुंबईतला मराठी माणूस कमी होऊ लागला, त्याचीही सुरुवात होती. १८३५ ते १८३८ पर्यंत रॉबर्ट ग्रँट बॉम्बेचे गव्हर्नर होते. त्यांच्या काळात अनेक रस्त्यांचे काम झाले. मुंबईत पक्के रस्ते निर्माण होऊ लागले.

या शहराचा जलदगतीने विकास होऊ लागला. मुंबई व्यवसायाचे केंद्र झाली. व्हिक्टोरिया टर्मिनस आणि ठाणे दरम्यान भारतातली पहिली रेल्वे धावली. या रेल्वे लाईनचं उद्घाटन १६ एप्रिल १८५३ रोजी करण्यातं आलं. १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर इंग्रजांनी मुंबई आपल्या ताब्यात घेतली. हळूहळू मुंबईचे ७ बेट जोडले गेले आणि एक विशाल औद्योगिक आणि कष्टकऱ्यांच्या शहरात मुंबईचे रुपांतर झाले.

**भारताची आर्थिक राजधानी :**

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे आणि भारताची आर्थिक राजधानी आहे. काँग्रेसने काश्मीरप्रश्न ज्याप्रमाणे जटिल करून ठेवला होता तसा मुंबईचा प्रश्नही जटिल करण्याचा त्यांचा डाव होता. १९५५ नंतर बॉम्बे इलाख्याची फाळणी करून महाराष्ट्र व गुजरात राज्यांची निर्मिती व्हावी अशी मागणी होत होती. परंतु काही लोक मुंबईला केंद्रशासित करण्यावर भर देत होते. पण इथला मराठी माणूस सावध असल्यामुळे हा प्रश्न फारसा जटिल झाला नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या माध्यमातून या कुटनीतीला प्रचंड विरोध करण्यात आला. पुढे मुंबईला महाराष्ट्र राज्याची राजधानी करण्याची मागणी केली गेली. देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी याला विरोध केला. पण मराठी माणूस केंद्रापुढे झुकला नाही आणि मुंबई ही महाराष्ट्राची झाली. दुःखास्पद गोष्ट म्हणजे यासाठी १०६ मराठी माणसांना हुतात्मा व्हावं लागलं. पण या जनरेट्यापुढे केंद्राला झुकावे लागले आणि हौतात्म्यामुळे १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि या राज्याची राजधानी मुंबईच राहिली. हुतात्म्यांच्या स्मरणार्थ फ्लोरा फाऊंटन येथील चौकाचे हुतात्मा चौक असे नामकरण करण्यात आले.

मुंबई हे भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर आहे. सुमारे १२ दशलक्ष एवढी मुंबईची लोकसंख्या आहे. मुंबई हे एक असे शहर आहे जिथे श्रीमंतांपासून गरीब अशा सर्व प्रकारचा वर्ग इथे आढळतो. अनेक कंपन्यांची मुख्य कार्यालये मुंबईत आहेत. महाराष्ट्र व देशभरातून आपलं नशीब आजमवण्यासाठी लोक इथे येत राहतात. मराठी सिनेसृष्टीसोबत बॉलिवूड म्हणजेच हिंदी सिनेसृष्टीचं मुंबई हे केंद्र आहे.

मुंबईला देशाची आर्थिक राजधानी म्हणतात याला महत्वाचे कारण म्हणजे इथले उद्योग आणि उपलब्ध असलेली रोजगाराची सुवर्ण संधी. भारताचा १०% कारखाना रोजगार, ४०% प्राप्तिकर, २०% केंद्रीय कर, ६०% आयात कर, ४०% परदेश व्यापार आणि ४० अब्ज व्यावसायिक कर हा मुंबईतून जातो. मुंबईमध्ये कोणताही उद्योग करता येतो हे रस्त्याच्या कडेला दिसणाऱ्या स्टॉल्समुळे आपल्याला कळतं.

**कष्टकऱ्यांची जननी**

खरं पाहता मुंबई ही काम करणाऱ्याची आईच आहे. कारण मुंबई कधीच कुणाला नाराज करत नाही. देशभरातून लोक इथे येतात आणि पैसे कमावतात. आता तर मुंबईची लोकसंख्या प्रचंड वाढलेली असल्यामुळे येथे ग्राहकही खूप आहेत. अगदी २० - २५ वर्षांपूर्वी जिथे कमी लोकसंख्या होती, तिथे मोठमोठे टॉवर्स उभे राहिलेले आहेत. कोरोनाकाळाचं जर तुम्ही निरीक्षण केलं असेल तर नोकरी गेल्यामुळे त्रासलेल्या लोकांना नव-रोजगार सुद्धा मिळालेला आहे.

कोरोनाकाळातील रोजगार ही तर मुंबईची करामत आहे. कितीतरी लोकांनी कोरोना काळात नोकरी गेल्यामुळे हार-फुलांचा, भाज्यांचा, मच्छी विक्रीचा व्यवसाय सुरू केला. अर्थात त्यातून सर्वांनाच चांगलं उत्पन्न मिळालं नसेल, पण किमान पोट भरण्यापुरते किंवा जगण्यापुरते तरी पैसे कमावले असतील. ही मुंबईची किमया आहे. मुंबई ही कष्टकऱ्यांना आकर्षित करते. ज्याच्यात कष्ट करण्याची क्षमता आहे, त्याला मुंबई कधीही उपाशी पोटी झोपू देत नाही आणि जर स्मार्ट वर्क करण्याची तयारी असेल तर रंकाचा रावही इथे होतो. गरिबीत वाढलेल्या अनेक लोकांनी या मुंबापुरीत बक्कळ पैसे कमावले आहेत. फक्त कष्ट आणि चिकाटी हवी.

**मुंबईतील प्रेक्षणीय स्थळे**

**नरिमन पॉइंट** : हे मुंबईतील मुख्य आणि देशातील पहिले केंद्रीय व्यापारी स्थळ आहे. एका पारसी समाजसेवक खुर्शीद फ्रामजी नरिमन यांच्या नावावरून हे नाव दिले गेले. मुंबईचे मैनहट्टन म्हणून नरिमन पॉइंटची ओळख आहे. दुसऱ्या महायुद्धामुळे येथे वापरण्यात आलेले सिमेंट आणि स्टील हे काळ्या बाजारातून आणण्यात आले होते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्राचे राजकीय मुख्यालय म्हणून ओळखले जाणारे विधान भवन देखील देखील येथेच आहे. समुद्राचे क्षेत्र मागे सारून मातीचा भराव टाकून हा भाग वसवण्यात आला आहे. पावसात तर हा परिसर स्वर्गाहून सुंदर दिसतो.

**जुहू बीच** : मुंबईकरांसाठी आठवड्याभराचा थकवा भागवणारे ठिकाण आहे. या ठिकाणी पर्यटकांची गर्दी पाहायला मिळते. शनिवार आणि रविवार या सुंदर बीचवर लोक कुटुंबासहित येतात आणि पाण्याच्या लाटांची मजा घेतात. इथला सन-सेट पाहण्यासारखा असतो. इथे अनेक खाण्याचे स्टॉल्स देखील आहेत. मनसोक्त भिजल्यावर पेट पूजा करायला लोक या स्टॉल्सवर येतात.

**तारापोरवाला मत्स्यालय** : मुंबईला सागरी मत्स्यसंशोधन केंद्र असावे अशी संकल्पना सर्वात आधी १९२३ साली बॉम्बे नेचरल हिस्ट्री सोसायटी या संस्थेचे कार्यवाहक मिलार्ड यांनी मांडली. समुद्राच्या आतील अद्भुतरम्य जग लोकांना पाहायला मिळावे, या हेतूने मरीन ड्राईव्हला ६० वर्षांपूर्वी म्हणजे १९५१ साली हे मत्स्यालय बांधण्यात आले. या मत्स्यालयात १०० हून अधिक प्रजातीचे मासे आहेत. येथे ७२ प्रजातीचे सागरी मासे व गोड्या पाण्यातील १०० प्रजाती आहेत. लक्षद्वीप बेटामधून आणलेले सात प्रकारचे प्रवाळ व मासे देखील इथे पाहायला मिळतात. 'स्टिंग रे', 'शार्क' किवा 'काळा मासा', 'कासवे' असे वेगळे मासे देखील येथे आहेत. मुंबईत येणार असाल तर या ठिकाणाला नक्कीच भेट द्या.

**हँगिंग गार्डन्स** : या हँगिंग गार्डन्सचं खास आकर्षण म्हणजे इथले वृक्ष.. या उद्यानाच्या आवारात हिरवेगार झाडांना गाय, जिराफ, हत्ती इत्यादी प्राण्याचा आकार देण्यात आला आहे. त्यामुळे लहान मुलांना खूप मजा येते. खरं पाहता दक्षिण मुंबईतील भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी १९ व्या शतकाच्या मलबार हिलच्या उंच टेकडीवर पाण्याची टाकी बांधण्यात आली होती. ३० दशलक्ष गॅलन पाण्याची टाकी उघडीच असल्यामुळे त्यामधील पाणी गढूळ होण्याची शक्यता होती म्हणून या टाकीवर बगीचा करण्याचे ठरले आणि या गार्डन्सची स्थापना १८८० साली करण्यात आली. १९२१ साली बागेची डागडुजी करून त्याला मुंबईचे पहिले मेयर फिरोजशहा मेहता यांचे नाव त्याला देण्यात आले.

**म्हातारीचा बूट** : हँगिंग गार्डन्सच्या समोर असलेलं पार्क म्हणजे कमला नेहरू पार्क. २० फुट उंच असलेले म्हातारीचा बूट या पार्कमधील प्रमुख आकर्षण आहे. या पार्कातून पूर्ण चौपाटी, मरीन ड्राईव्ह पाहता येतो हे विशेष. म्हातरीचा बूट हे नाव मुंबईतील अबालवृद्ध सर्वांना माहिती आहे.

**नेहरू तारांगण** : मुंबईतलं विशेष आकर्षण म्हणजे नेहरु तारांगण. हे ठिकाण वरळी येथे आहे. इथे छान असं गोलाकार थिएटर आहे. या तारांगणात चक्क आकाशातील तारे आणि ग्रहांचे दर्शन घडते. ग्रह-ताऱ्यांची ओळख व इतर अवकाशातील माहिती आणि त्या व्यतिरिक्त अंतराळ संशोधनाचे विविध टप्पेही या प्रदर्शनात मांडलेल्या असतात. या केंद्रात १४ कार्यशाळा आहे व त्यामध्ये भारतातील कला, बौद्धिकता व विविध सांस्कृतिक प्रदर्शने पाहता येतात. विविध ताऱ्यांच्या नावाने



इथे वजन काटे लावण्यात आले असून यावर उभे राहून वजन केल्यास त्या ताऱ्यांवरील तुमचे वस्तुमान किती हे समजते. त्यामुळे इथे येऊन लहान मुलंच काय तर मोठी माणसे देखील रमतात.

**मुंबईतील ऐतिहासिक स्थळे**

**गेटवे ऑफ इंडिया** : मुंबईत आलात तर पर्यटकांच्या दृष्टीकोनातून सर्वात आकर्षक स्थळ म्हणजे गेटवे ऑफ इंडिया. १९०५ साली इंग्लंडचे राजकुमार प्रिन्स ऑफ वेल्स भारत भेटीला आले होते, त्यानिमित्त त्यांच्या स्वागतासाठी हे प्रवेशद्वार तयार करण्यात आलं होतं. आज अनेक लोक या ठिकाणी येतात. सकाळपासून रात्रीपर्यंत पर्यपटकांची गर्दी इथे पाहायला मिळते. समुद्रात ७ किलोमीटर अंतरावर असलेल्या घारापुरी बेटावरील एलिफंटा लेणीला नक्कीच भेट द्या. गुंफामध्ये कोरलेल्या भव्य हत्ती व प्राचीनकालीन शिवकालीन लेणी पाहण्यासाठी गेट वे ऑफ इंडिया येथून फेरी बोट दर तासाला सुटतात. या वास्तू समोरच ताज हॉटेल आहे आणि तिथे उभं राहून फोटो काढण्याची मज्जाच और आहे.

**हुतात्मा चौक** : हे स्थळ प्रेक्षणीय असले तरी या स्थळाला दैदिप्यमान असा इतिहास लाभला आहे. मुंबईतील फोर्ट या भागात ही वास्तू आहे. मुंबईसाठी हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्मांना श्रद्धांजली देण्यासाठी या हुतात्मा चौकाची निर्मिती करण्यात आली होती. पूर्वी या वास्तूला फ्लोरा फाऊंटर म्हणून ओळख होती. डेव्हिड ससून यांनी त्यांच्या मरण पावलेल्या फ्लोरा या मुलीच्या स्मरणार्थ १८६४ मध्ये हे स्मारक तयार केलं होतं.

**राजाबाई क्लॉक टॉवर** : मुंबईतील आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेले हे ठिकाण आहे. १८७० मध्ये हा टॉवर उभारण्यात आला असून त्याची उंची २३० फूट इतकी आहे. हा टॉवर चर्चगेट स्थानकाच्या परिसरात आहे. ही वास्तू ब्रिटीश अभियंता जॉर्ज गिल्बर्ट स्कॉट यांच्या देखरेखीखाली तयार करण्यात आली. महत्वाचं म्हणजे ही वास्तू लंडनमधील बिग बेन टॉवरप्रमाणे दिसते.

**छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहायलय** : प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ऑफ वेस्टर्न इंडिया म्हणजे आताचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहायलय. चर्चगेट येथून गेट वे ऑफ इंडियाकडे जाताना अत्यंत सुंदर असे हे म्युझियम लागतं. या वास्तूचा आराखडा जॉर्ज विटेट यांनी तयार केला होता. या संग्रहालयात तत्कालीन इतिहास, स्थापत्यकला, संस्कृती, कलात्मकता याविषयी सुंदर माहिती मिळते. १९१५ साली या वास्तूची निर्मिती झाली. या वास्तूमध्ये काळे-पांढरे पाषाणांचे प्राचीन शिल्प आहेत. गांधारकालीन मूर्ती व बुद्धमूर्ती, सिंधू संस्कृतीचे अवशेष, रामायणातील २०० लघुचित्रे, नौकावहन तंत्रज्ञानाची माहिती, समुद्र मार्गातील नकाशांची माहिती, यूरोप, चीन, जापानमधील चित्रे पाहायला मिळतात. प्राचीन शस्त्रे आणि वस्त्रे या वस्तूंचे दालन अशा अनेक गोष्टी तुम्ही इथे पाहू शकता.

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस** : मुंबई कशी दिसते हे पाहायचं असे तर छत्रपती शिवाजी महाराज

टर्मिनस या रेल्वे स्थानकाला भेट दिलीच पाहिजे. खरं पाहता ही मुंबईची लाईफलाईन आहे. इथूनच मुंबईच्या विविध भागात लोकल गाड्या जातात. १८८७ मध्ये राणी व्हिक्टोरियाने राज्याभिषेकाच्या सुवर्णजयंतीनिमित्त या स्थानकाची निर्मिती केली होती. त्यामुळे या स्थानकाचं नाव व्हि.टी. म्हणजेच व्हिक्टोरिया टर्मिनस असं होतं. मात्र, त्यानंतर या स्थानकाचं नामांतरण करण्यात आलं.

**बृहन्मुंबई महानगरपालिका :** मुंबई महानगरपालिका ही देशातली सर्वात श्रीमंत पालिका आहे. त्यामुळे या पालिकेतल्या सत्तेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यात ही वास्तू देखील ऐतिहासिक आहे. १८९३ मध्ये देशात पहिली बृहन्मुंबई महानगरपालिका स्थापन करण्यात आली. यामुळे देखील या वास्तूला वेगळा महत्व आहे. मुंबई दर्शन करताना या वास्तूचे दर्शनही केले पाहिजे.

**मुंबई उच्च न्यायालय :** मुंबईतील उच्च न्यायालय म्हणजे सर्वात जुन्या न्यायालयांपैकी एक आहे. महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र, गोवा ही राज्ये तसेच दिव, दमण, दादरा व नगर हवेली हे केंद्रशासित प्रदेश मुंबई उच्च न्यायालाच्या न्यायक्षेत्रात येतात.

**मुंबई विद्यापीठ :** मुंबईतील फोर्ट परिसरात या विद्यापीठाची मुख्य वास्तू असून सांताक्रुझ येथे दुसरं संकुलदेखील आहे. हे विद्यापीठ भारतातील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक आहे. फोर्टमधील ही मुख्य इमारत गॉथिक शैलीत बांधल्याचं म्हटलं जातं. राजाबाई टॉवरचे घड्याळ आजही अविरत सुरू असून मुंबईची एक खास ओळख ठरला आहे. मुंबई विद्यापीठातून विविध ज्ञानशाखेंमध्ये पदवीपूर्व, पदवीचे, पदविकांचे आणि पदवी पश्चातचे शिक्षण दिले जाते. मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली अनेक महाविद्यालये मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, कोकण, आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

**वडाळ्यातील अज्ञात ऐतिहासिक बुरुज :** मुंबईतील वडाळा या ठिकाणी बांधकाम सुरू असताना वर्षानुवर्षे झाडीत आणि मातीत गढला गेलेले एक ऐतिहासिक बुरुज सापडला आहे. एका रस्त्यालगत बांधकाम सुरू असताना स्थानिकांना त्या ठिकाणी एक जुने बांधकाम दिसले. हा बुरूज इतकी वर्षे माती आणि पालापाचोळ्यामध्ये लपला होता.

सह्याद्री प्रतिष्ठानच्या दुर्गसंवर्धन विभागाचे अध्यक्ष गणेश रघुवीर म्हणाले की, शिव आणि शिवडी किल्ल्याच्या संरक्षणासाठी हा बुरुज उभारण्यात आला असावा. तरी या बुरुजाची कुठेही नोंद आढळत नाही. मुंबईच्या ऐतिहासिक वास्तूत आणखी एका वास्तूचा समावेश झाला आहे.

**मुंबईतील प्रमुख मंदिरे**

**जोगेश्वरी लेणी :** भारतातील सर्वात जुन्या हिंदू आणि बौद्ध गुंफांचे मंदिर... असा अंदाज व्यक्त केला जातो की, ही लेणी इ.स. ५२० ते ५५० दरम्यानच्या काळात बनली असावीत. महायान बौद्ध वास्तुकलेतील काळ यातून दिसतो. परंतु सध्या या वास्तूची अवस्था फारशी चांगली नाही. इथे बरेच अतिक्रमण झालेले आहे. गुहेत बरेच खांब आहेत आणि शेवटी एक लिंगम आहे. दत्तात्रेयाची, हनुमानाची मूर्ती, आणि गणेश रांग आणि द्वारपालाचे अवशेष आहेत. या गुहेत देवी जोगेश्वरी म्हणजे योगेश्वरी नावाच्या देवीची एक मूर्ती आहे, या देवीच्या नावावरुनच या विभागाला जोगेश्वरी हे नाव देण्यात आले आहे.

**पॅगोडा :** मुंबईच्या उपनगरात वसलेलं सुंदर असं गाव म्हणजे गोराई... या गावाचं आकर्षण म्हणजे गोराई बीच, एस्सल वर्ल्ड, वॉटर किंगडम आणि बाजूलाच असलेले पॅगोडा. ही वास्तू खूप मोठी आहे. हजारो लोक इथे रोज येऊ शकतात. हे एक विपश्यना केंद्र देखील आहे. साधक इथे येतात आणि एका वेगळ्याच अध्यात्मिक विश्वात वावरतात. २००० साली ही वास्तू उभारण्यात आली.

**महालक्ष्मी मंदिर :** इ. स. १८३१ ला एका हिंदू व्यापाऱ्याने या मंदिर पूनर्निर्माण केले. या मंदिरामागे बराच मोठा इतिहास आहे. महालक्ष्मी मंदिर हे मुंबईतील प्रसिद्ध मंदिर आहे. असे सांगितले जाते की, १७८५ साली वरळी आणि मलबार हिल या दोन्ही भागांना जोडण्याचे काम इंग्रज इंजिनियर करत होते. पण त्या कामात विघ्न येत होते. मुख्य इंजिनियर पाठारे प्रभू यांना वरळी जवळच्या समुद्रात लक्ष्मीच्या मूर्तीचे स्वप्न पडले. त्यांनी स्वप्नात दिसलेल्या जागी त्या मुर्तीचा शोध घेतला आणि चमत्कार म्हणजे त्यांना तिथे लक्ष्मीची मूर्ती सापडली. त्यानंतर त्यांनी तेथेच तिचे मंदिर बांधले. त्यानंअतर त्यांचे प्रकल्प पूर्ण झाले. हे मंदिर समुद्राच्या अगदी बाजूलाच आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात देवी महालक्ष्मी, देवी महाकाली व देवी महासरस्वती यांच्या मूर्ती आहेत.

**भुलेश्वर येथील मुंबईतील एकमेव सूर्यमंदिर :** भुलेश्वर येथील पांजरापोळमध्ये सूर्यदेवाचे मंदिर आहे, जे १२२ वर्षे जुने आहे. हरजीवन वसनजी मणीयार यांनी १८९९ मध्ये दक्षिण मुंबईतील भुलेश्वर उएथे या मंदिराची निर्मिती केली

होती. ते सूर्यदेवाचे भक्त आणि गुरुंचा आदेश म्हणूनच त्यांनी हे मंदिर बांधले. हे मंदिर फारसे प्रसिद्ध नाही. जुन्या जाणत्या लोकांना याबद्दल माहिती असावे. हे मुंबईतील सूर्यदेवाचे एकमेव मंदिर आहे.

**पिंपळ गणेश मंदिर, माजगाव** : गणपती ही अतिशय प्राचीन देवता अहए. गणपतीचे अनेक मंदिरे आहेत. माजगावमधील बीपीटी कंटेनर रोडवर एका पिंपळाच्या झाडाला गणेशमूर्तीसारखा आकार आलेला आहे. मग गणेश भक्तांनी येथे गणेशमंदिर स्थापन केले आहे. जिथे गणेशमूर्तीसारखा आकार झाडाला आहे, तिथे चांदीचा मुकुट बसवण्यात आला आहे.

**वझीरा नाका येथील गणेश मंदिर** : हे मंदिर शेकडो वर्षांपूर्वीचे आहे. पूर्वी केवळ कोळी, भंडारी आणि स्थानिक ग्रामस्थच या मंदिरात दर्शनासाठी येत. या ठिकाणी पाच मंदिरे आहेत. गणेशाची मूर्ती उत्तर दिशेला असून बाजूला शितला देवीची मूर्ती आहे. त्याशिवाय मारुती आणि स्थानिक ग्रामदेवता आलजी देव यांचीही मंदिरे आहेत.

**बाणगंगा, वाळकेश्वर** : वाळकेश्वर येथील बाणगंगा मंदिर १८व्या शतकात उभारले गेले आहे. या मंदिराचे बांधकाम चालू असताना तेथील जमिनीत जे शिवलिंग सापडले त्याचीच प्रतिष्ठापना या मंदिरात करण्यात आली असल्याचे म्हटले जाते. बाणगंगा हा मुंबईतील वाळकेश्वर येथील भाग आहे. आख्यायिकेनुसार राम आणि परशुराम या अवतारी पुरषांशी संबंधितत आहे. बाणगंगेच्या परिक्षेत्रात आणखीन एक जुने महादेवाचे मंदिर आहे. तसेच साधारण जानेवारी महिन्यामध्ये महाराष्ट्र टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे इथे सांगितिक बाणगंगा महोत्सवही करण्यात येतो. या महोत्सवात देशभरातून नावाजलेले आणि प्रसिद्ध संगीत क्षेत्रातील दिग्गज सहभागी होतात.

**मुंबा देवी** : मुंबई हे नाव मुळातच मुंबाई देवीवरुन घेतलं आहे. मुंबईची आई म्हणजेच मुंबा देवी... मुंबादेवी ही मुंबईची ग्रामदेवता आहे. ही कोळी जमातीची देवता आहे असे मानले जाते. हे मंदिर १६७५ मध्ये पूर्वीच्या बोरी बंदर खाडीच्या मुख्य लँडिंग साइटजवळ सेंट जॉर्ज किल्ल्याच्या उत्तर भिंतीजवळ बांधले गेले होते. इथे अनेक भाविक आपली मनोकामना घेऊन येतात आणि मुंबा देवी त्यांना आशीर्वाद देते. जेव्हा इंग्रजांनी तेथे व्हिक्टोरिया टर्मिनस हे रेल्वे स्टेशन बांधायचे ठरवले तेव्हा बांधकामाला अडथळा ठरलेले ते देऊळ त्यांनी काढून टाकले आणि मुंबईच्या काळबादेवी-भुलेश्वर भागात मुंबादेवीचे सध्याचे मंदिर बांधून दिले.

**मुंबईतील बाजार** : मुंबईत अनेक ठिकाणी बाजार भरतात आणि लोक आजही म्हणजे शॉपिंग मॉल्सच्या काळातही स्ट्रीट शॉपिंगला प्राधान्य देतात. चला तर जाणून घेऊया मुंबईतील खरेदी महत्वाची ठिकाणे.

**मालाड येथील सोमवार बाजार** : आजही मोठ्या प्रमाणात हा बाजार भरला जातो व असंख्य गर्दीने सोमवार बाजार गजबजलेला असतो. हा बाजार दर सोमवारी भरतो. म्हणून याचे नाव सोमवार बाजार असे आहे. दर सोमवारी सकाळी ६.३० वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत बाजार गजबजलेला असतो. एरव्ही सुद्धा मासळी बाजार, भाजी बाजार भरलेला असतो. परंतु सोमवारी याला महा-जत्रेचं स्वरूप प्राप्त होतं. येथे मासळी मंडई, किराणा दुकाने आहेत. त्याशिवाय फळभाज्या, पालेभाज्या, हार-फुले, नवे-जुने कपडे, भांडी, खेळणी, महिलांसाठीची आभुषणं, इमिटेशन ज्वेलरी, भंगार, व छान छान खाऊ सुद्धा मिळतो आणि या सगळ्या गोष्टी इतर दुकानांच्या तुलनेत स्वस्त दरात मिळतात. सण किंवा उत्सवाच्या वेळेस त्या त्या सणाच्या किंवा उत्सवोपयोगी वस्तूही सहज उपलब्ध होतात. मे महिन्यात आंबे आणि प्रत्येक हंगामात त्या हंगामातील विशिष्ट गोष्टी उपलब्ध होतात. स्वस्त आणि मस्त हे सोमवार बाजाराचे वैशिष्ट्य आहे.

**कुलाबा येथील बाजारपेठ** : कुलाबा कॉजवे मुंबईच्या सर्वात लोकप्रिय बाजारपेठांपैकी एक आहे. दागिने, विविध पोशाख, चप्पल, पिशव्या ते प्राचीन वस्तूंपर्यंत सर्व वस्तू येथे मिळतात. या बाजारपेठेत बरीच गर्दी आपल्याला बघायला मिळेल.

**हिंदमाता मार्केट** : ही सर्वात मोठी आणि सर्वात जुनी बाजारपेठ आहे. लग्नाच्या खरेदीसाठी उत्तम ठिकाण आहे. महत्वाचं म्हणजे तुमच्या खिशाल अपरवडेल अशी खरेदी इथे करु शकता. विविध प्रकारचे कपडे, साड्या, ड्रेस मटेरियल आणि भारतीय पोशाख इथे मिळतील.

**क्रॉफर्ड मार्केट** : खरेदीसाठी हे मुंबईचं खास आकर्षण आहे. मुंबईत आलात आणि क्रॉफर्ड मार्केट नाही बघितलं, तर काहीच बघितलं नाही असा याचा अर्थ होतो. हे शहरातील सर्वात जुन्या बाजारपेठांपैकी एक आहे. फळे, भाज्या, पिशव्या, मेकअप, घरातील सजावटीच्या वस्तूंपासून ते खेळण्यांपर्यंत येथे मिळतात.

**हिल रोड** : हिल रोड बाजारामध्ये नेहमीच वर्दळ बघायला मिळते. या बाजारामध्ये तुम्ही खूप कमी किंमतीत

कपडे खरेदी करू शकाल. इथे या आणि स्वस्तात कपडे विकत घ्या. खासकरुन कग्न सोहळ्यासाठी इथे चांगले कपडे मिळतील.

**नटराज मार्केट :** मालाड पश्चिम येथील हे सर्वात जुने आणि प्रसिद्ध मार्केट आहे. या मार्केटमध्ये तुम्हाला जे हवे ते मिळेल. खेळणी, कपडे, दागिने, औषधे, पूजेचं सामान सर्व काही. फक्त इच्छा व्यक्त करा, कल्पतरुप्रमाणे हे मार्केट तुम्हाला सर्व देतं.

**दादर मार्केट :** दादर पश्चिम येथील वसलेले हे खूप जुने मार्केट आहे. वर्षाचे बारा महिने इथे गर्दी पाहायला मिळते. इथले फुल मार्केट देखील खूप प्रसिद्ध आहे. बग्स, पुस्तके, कपडे, सणासुदीच्या आणि सभारंभाच्या वस्तू अशा सर्व गोष्टी इथे सहज मिळतात. इथे आलात तर तुम्हाला मॉलमध्ये जाण्याची इच्छा होणार नाही.

**चोर बाजार :** मुंबईचा चोर बाजार दक्षिण मुंबईच्या मटन स्ट्रीट मोहम्मद अली रोडच्या जवळ आहे. हे मार्केट जवळपास १५० वर्ष जुने आहे. हा बाजार पहिला 'शोर बाजार'च्या नावाने सुरू झाला होता, कारण इथे दुकानदार जोरात आवाज देऊन सामान विकत असत त्यामुळे इथे खूप आवाज असे.परंतु इंग्रज लोक 'शोर'ला चुकीने 'चोर' बोलत असल्याने याचे नाव 'चोर बाजार' पडले. एका अर्थी हे नाव सार्थच ठरले.इथे वापरलेले कपडे, ऑटो मोबाईल पार्ट्स, चोरलेली घड्याळे आणि ब्रँडेड घड्याळांचे ओरीजनल मॉडेल्स, तसेच विंटेज आणि अँटीक सजावटीचे सामान मिळते. येथील रेस्टॉरंट आणि कबाब खूप प्रसिद्ध आहे. असे म्हटले जाते की मुंबईच्या यात्रेवेळी राणी विक्टोरियाचे सामान जहाजात लोड करतेवेळी चोरी झाले होते. हेच सामान नंतर मुंबई चोर बाजारात मिळाले.दिवस उजाडण्यापूर्वी देखील हा बाजार अमूक दिवशी सुरू असतो.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**भास्कर मोरेश्वर महाशब्दे परिवार**
**यांसकडून**
**दीपावलीच्या शुभेच्छा!**




व्यास क्रिएशन्स्
project by
Vyas Infra
स्वतंत्र
भारताचा
७५
वर्षातील
प्रगतीचा आणि
वैभवाचा
आलेख
अमृत महोत्सवी
भारतीय स्वातंत्र्याचा
त्रिखंडात्मक संदर्भग्रंथ
अमृतगाथा
स्वातंत्र्याची
तीन खंडांचे
एकत्रित मूल्य
रु. २१००/-
सवलत मूल्य
रु. १६००/-
राष्ट्राच्या उद्धाराच्या दृष्टीने
आमच्या सोबत आपणही
या मोहिमेत सहभागी व्हा.
जय हिंद !
या यशस्वी
इतिहासाचा
3 खंडात
असलेला आलेख
आपल्या प्रत्येकाच्या
घरात असलाच
पाहिजे.
अधिक माहितीसाठी संपर्क 9967637255 / 9920949177



# संस्कृती

## विभाग ४



# कोकणी माणसाचे इरसाल नमुने

**वैभव साटम**

इथल्या निसर्गाने इथल्या माणसाला कणखरपणा दिला, त्याच्या मनगटात कर्तृत्व गाजवण्याची ताकद दिली. इथल्या मातीतले अनेक नमुने आपापली छाप लोकांच्या मनावर कोरून गेले. पालघर पासून ते कुडाळ पर्यंत अनेक लोकांना भेटता आलं आणि एक गोष्ट जाणवली की इथला प्रत्येक माणूस ही एक स्वतंत्र संस्था आहे. प्रत्येकाच्या जगण्याच्या तऱ्हा निराळ्या, जगण्याचे संदर्भ निराळे, त्याच्या सुखाच्या कल्पना निराळ्या.

कोकण म्हटले की सहज समोर येतात नारळाच्या बागा, एका समांतर नसलेला भूभाग, तिथल्या हापूस आंब्याचा बागा आणि लगडलेले काजू. तिथला समुद्र आणि त्यात चाललेली मासेमारी, गुंठ्याच्या हिशोबाने चाललेली इथली भातशेती आणि ह्या सगळ्यात रमणारा कोकणी माणूस. त्याच्या बोलण्यातील तिरमिरीतपणा, पाय ठेवीन तिथे पाणी काढण्याची हिंमत, बोलण्या-चालण्यातला त्याचा रुबाब ह्या सगळ्या गोष्टी आपसूकच डोळ्यासमोर उभ्या ठाकतात. मुंबईच्या अरबी समुद्रापासून ते तेरेखोलच्या खाडीपर्यंत पसरलेली ही कोकणभूमी, ह्या सातशे वीस किलोमीटर्स समुद्रकिनाऱ्याच्या खाऱ्या पाण्याच्या बाजूने रहाणारी ही खडबडीत पण गोड माणसं ह्या भूमीच्या एकंदरीत सौदर्यात भर घालतात. ह्या सगळ्या माणसानी आपल्या विशिष्ट बोलीने ह्या भूमीचे वैशिष्ट्यपण जपले, पालघर-वसई पट्ट्यातील सामवेदी बोली, रायगड, अलिबाग मधली आगरी बोली, खाली उतरताना रत्नागिरी, संगमेश्वर येथील बाणकोटी, संगमेश्वरी बोली आणि दक्षिण कोकणातील मालवणी बोली ही एकंदरीत मराठी भाषेतील सौंदर्यस्थळे आहेत.

इथल्या निसर्गाने इथल्या माणसाला कणखरपणा दिला, त्याच्या मनगटात कर्तृत्व गाजवण्याची ताकद दिली. इथल्या मातीतले अनेक नमुने आपापली छाप लोकांच्या मनावर कोरून गेले. पालघर पासून ते कुडाळ पर्यंत अनेक लोकांना भेटता आलं आणि एक गोष्ट जाणवली की इथला प्रत्येक माणूस ही एक स्वतंत्र संस्था आहे. प्रत्येकाच्या जगण्याच्या तऱ्हा निराळ्या, जगण्याचे संदर्भ निराळे, त्याच्या सुखाच्या कल्पना निराळ्या.पालघरच्या डहाणू भागातून येणारी सुनंदा ताई मला कॉलेजला जाताना रोज भेटायची. सुनंदाताई डोक्यावर खाऊच्या पानांचा आणि पाच सहाशे केळीच्या पानांचा गड्डा घेऊन दादरच्या फूल बाजारात सकाळी पाच वाजता हजर असायची. इथे पाच वाजता येण्यासाठी सकाळी तीनला तिने घर सोडलेलं असायचं. शटलच्या गर्दीत खाऊच्या पानाची पिशवी उशीला घेऊन रात्रीची उरलेली झोप पूर्ण करत दादरला आल्यावर मानेचा काटा मोडेल की काय असा कोणाला भास होईल एवढं वजन उचलून ती स्टेशनचे जिने चढून दादरच्या मार्केट मध्ये ठेलेवाल्यांना आपण सोबत आणलेला माल देऊन परत मागे फिरायची.वाटेत कोण ओळखीचा भेटला की, 'कटे जातस रे दादा' असं म्हणत पुन्हा शटल पकडायला धावायची. ही तिची धावपळ कोणासाठी होती?. घरात शिकणारी मुलं होती, त्यांच्या शिक्षणासाठी पैसा हवा म्हणून हा रेटा मोठ्या कष्टाने ढकलत होती. कोणी मला सांगितले की दहा वर्षाचा संसार केला आणि एका छोट्या आजारात तिचा नवरा गेला, पण ही बाई हिमतीने उभी राहिली. नवरा गेला तो दिवस सोडला आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी पुन्हा ती आपल्या वाडीत उभी राहिली. ह्या तीस वर्षाच्या बाईकडे ही धीरोदात्त वृत्ती कुठून आली, उत्तर कोकणातील माती ही अशीच आहे. ती माती एकदा पायाला लागली की माणसाच्या वृत्तीत आणि प्रकृती धर्मात हा बदल येतोच.

कोकण रेल्वे सुरू झाली आणि एसटीच्या प्रवासाला नको म्हणणारा कोकणीमाणूस पुन्हा कोकणातील आपल्या गावी वरच्यावर जाऊ लागला. सकाळी पाच वाजता दिवा स्टेशनला सहज फेरी मारली की अनेक कोकणी नमुने पाहायला मिळतात. दिवा गाडी म्हणजे लेकुरवाळी. अगदी पन्नास- साठ रुपयात माणूस आपल्या गावात पोचतो. रोहा, महाड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी पर्यंत जवळजवळ संपूर्ण गाडी खाली होते पण ह्या गाडीत भेटलेला हरी सावर्डेकर मला  शंकासुर वाटतो. मनात अनेक शंका घेऊन जगणारा हा हरी जगण्याच्या कुठल्या बाजूने कलत जातो हे कसे कळेल?. एकदा मी दिवा गाडीने प्रवास करत होतो. हंगामाचे दिवस नव्हते तरी गाडीला बऱ्यापैकी गर्दी होती. चिपळूणला बहुतेक लोक उतरले. डब्यात पुढचा प्रवास करणारे खूप कमी प्रवासी उरले, मी खालच्या सीटवर आडवा झालो, बाजूच्या सीटवर एक माणूस बसला होता. त्याने मी काय करतो, कुठे राहतो याची चौकशी केली.

'ट्रेनने गावी जायचं म्हणजे रीस्कीच हाय ना?'

मी म्हटलं, 'कसली रिस्क?.'

त्यावर तो माणूस म्हणाला, 'अव रिस्क नाय तर काय! एकादे वेली ही गाडी रुलावरून घसरली म्हंजे?.... किती रिस्क ना?'

त्यावर मी देखील, 'रिस्क कुठल्या गोष्टीत नाही. जेवताना ठसका लागला तरी ते रिस्की आहे वगैरे' माझ्या पदरची वाक्ये मी त्या माणसाला ऐकवली. त्यावर 'व्हा व्हा रिस्क सगल्याबाबतीत हाय' अशी प्रतिउत्तरे देत होता. गाडी काही वेग घेत नव्हती. हळूहळू एक एक स्टेशन येत होतं. शेवटी वैतागून त्या माणसाने वरच्या बर्थवर आडवे

होण्यासाठी मधला बर्थ काढला आणि त्याचे बंध व्यवस्थित लावून पुन्हा मधल्या बर्थवर दाब देऊन बंध व्यवस्थित लागले की नाही याची खात्री केली. सगळे सोपस्कार झाले आणि हा माणूस मधल्या बर्थवर झोपायला गेला. एखादे स्टेशन गेले आणि मला,

'वो सायेब जरा बगा माझी सिट बरोबर लागली ना?'

मी त्याला 'हो' म्हणालो.

दर दहा मिनिटाने मला तोच प्रश्न विचारत राहिला तेवढ्यावेळ मी त्याला तेच उत्तर दिले. शेवटी मी वैतागलो आणि त्या गृहस्थाला 'तुम्ही खाली या मी वर झोपतो' असं म्हणून आम्ही आमच्या बर्थचा खांदेपालट केला आणि बर्थवर आडवे झालो.

हा माणूस तरी अस्वस्थ. खालच्या बर्थवर झोपला पण सारखा उठून सीटचे बंध नीट आहेत की नाही याची खात्री करत राहिला. मी त्याला विचारले नक्की काय झाले त्यावर हा महापुरुष मला म्हणतो,

'आव, तुमी वर झोपलात पण एकादेवेली हा बंध तुटला तर तुमी खाली पडाल आणि माझा हाड मोडून जायल.'

मला हसावे की रडावे ते कळेना. कोकणातला माणूस अशा घटनाना विशेष महत्त्व न देणारा, पण त्याच्या मनात एक शंका नेहमी असते तो म्हणजे समोरचा माणूस खूप गोड बोलू लागला की आपल्या घबाडाकडे याचे लक्ष आहे याची त्याला सूक्ष्म शंका येतेच. आपल्या जमीनजाग्याबद्दल हा माणूस भलताच जागरुक. आपली दहा-पंधरा गुंठे जमीन असेल पण त्या जमिनीवर आपल्या सगळ्या वारसदारांचे नाव यायला हवे याबद्दल इथला माणूस तसा भलताच जागरूक. आपल्या जमिनीवर ह्या माणसाचे खूप प्रेम, प्रसंगी त्यासाठी कोर्टात दिवाणी दावे टाकले असतील पण जेव्हा कोकण रेल्वे आली, मुंबई-गोवा रस्त्याचे चौपरीकरण हे प्रकल्प राबवले गेले तेव्हा पिढ्यान्‌पिढ्या जपलेल्या आपल्या जमिनी इथल्या माणसाने हसत हसत दिल्या.

इथला माणूस तसा गोष्टीवेल्हाळ. ह्या गोष्टीवेल्हाळ माणसाच्या आत काही जळत असते. गौरी गणपतीला आजूबाजूच्या घरात मुंबई-पुण्याहून त्या त्या घरातल्या लेकी सुना, पोरं बाळे आली पण खारेपाटणच्या सुनंदामामीकडे कोणी येत नाही. ती आतून अस्वस्थ होते पण कोणापुढे दुःखाचे कड काढत बसत नाही पण बोलण्यात ह्या बाईंचा हात कोणी धरू शकणार नाही. पदोपदी एखाद्याला कोड टाकत बोलणारी ही बाई तशी महाखमकी. तिला कोणी विचारले की,

'गे आवशी, सदा कोकणेचे घर कुठे?'

त्यावर 'कोकाणेचा घर खाली आसा पण सदा काय कोण तो माका ठावक नाय. त्याच्या बापाशीन माका त्याच्या बारशाचे घुगरे खावक काय माका बोलावूक नाय.' ह्या बाईला ह्या सदा कोकणेचे घर खाली आहे हे सरळ सांगता आले असते पण इथली बोली इथल्या कोकणी रस्त्यासारखी नागमोडी!

आमच्या बाबी पेडणेकराला शिरी कुवळेकराचे घर कुठे आहे असं विचारले की, बाबी मागचा पुढचा कसलाही विचार न करता 'शिरीचा घर व्हात्या खालच्या पाणंदीन गेलास की दोन घरा सोडून त्याचा घर' असं उत्तर देतो मग पुढे त्याला जास्त लांब नाही ना असा प्रश्न केला की, 'लाम्ब खयचा त्याच्या घराक आग लागली की माझ्या मांडवात्सुन गमता' अशी उत्तरे ऐकताना विचारणारादेखील गार पडतो. इथल्या आंब्या फणसाचे सगळे गुण इथल्या माणसाच्या रक्तात उतरले आहेत.

कोकणची माणसे साधी भोळी असा गीतात उल्लेख असला तरी इथल्या समुद्राने इथल्या माणसाला त्याची गाथा गायला शिकवली. कोकणी माणूस आता परंपरेला धरून नाही पण आधुनिकतेला आपलेसे करतो आहे. अनेक नमुने ह्या मातीत मिसळले. त्यांच्या जगण्याला एक विशिष्ट आयाम आहे. दुपारी भात आणि माशाचे सार जेवून झोपी जाणारा कोकणी माणूस अंतर्यामी कुठेतरी जागा आहे. इथल्या माणसाचा फटकळपणा ठाई ठाई दिसून येतो. त्याची बोली शिवराळ आहे. अगदी प्रथमदर्शनी समोरच्या माणसाचा गैरसमज होईल इतका हा माणूस फटकळ. एखाद्या अनोळखी माणसालादेखील 'काय रे मायझया कोणाचो रे तू?' असं विचारायला इथला माणूस कचरत नाही. असे अनेक नमुने इथल्या मातीत आहेत, ज्यांचा उल्लेख कुठल्या पुस्तकात नाही, कुठल्या यशस्वी लोकांच्या यादीत नाही पण बोलणारा चालणारा प्रत्येक माणूस ह्यांची आठवण नक्की काढतो कारण माणुसकीचा एक निरंतन झरा ह्या माणसांच्या हृदयातून वाहत असतो.



# कोकणातील लोक संस्कृती आणि परंपरा

**सदानंद राणे**

चित्रकथी कलाकार मूळचे महाराष्ट्रातील नसून ते भटकत भटकत महाराष्ट्रात आले. राजाश्रय मिळविण्यासाठी चित्रकथांची निर्मिती झाली. सावंतवाडीचे संस्थानिक खेम सावंत, शिवराम राजे यांच्या अश्रयाने ते तिथे कायम स्वरूपी वस्ती करून राहिले आणि हळूहळू ती कला बहरत गेली. बहरलेली ही कला पाहून खूष होऊन राजांनी या कलाकार मंडळींना ठराविक देवळे वतन म्हणून दिली.

कोकण हा महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरेने समृद्ध असलेला प्रदेश. ठाणे, पालघरपासून ते सिंधुदुर्गापर्यंत पसरलेला कोकण प्रांत. परंपरेने चालत आलेली लोककला संस्कृती अजूनही आपला पाय रोवून उभी आहे. संस्कृती जतन करण्यासाठी या लोकांचा अतोनात प्रयत्न चाललेला असतो. सातासमुद्रापार पोहोचलेली ही कोकणातील लोक संस्कृती, परंपरा यांचा धावता आढावा घेण्याचा हा प्रयत्न.

**कांबड नाच - (कांबड्या नाच)**

ठाणे, पालघरमधील आदिवासी कांबड नाच करतात. कांब म्हणजे काठी या शब्दावरून ज्या हातात काठी तो कांबडी. असा शब्द रूढ झाला असावा. काही ठिकाणी त्याचा उच्चार 'कावडी' असा केला जातो.

कांबडी नाच हा पावसासाठी केला जातो. विशेष असलेल्या या नाचात गाणी, नृत्य आणि त्याबरोबर निरनिराळी सोंगे या गोष्टी असतात. कांबडी हा गावातील सर्वात वयोवृद्ध पुरुष असतो. त्यामुळे त्याच्या हातात काठी ही असतेच. अधिक वयामुळे तो अनुभवी व त्याला पुष्कळ गाणी येत असतात. म्हणून तो नाचाच्या वेळी गाण्याची सुरुवात करून देतो.

***धीना गायेला रं यो***
***नारान देवा मी धीना गायेला रं...***

या गाण्यापासून नाचाला सुरुवात होते. नाचात विविध सोंगे घेतलेले एक एक पुरुष झाडामागून किंवा झोपडी मागून येतात. ढोलकी वजा 'धीना' हे वाद्य नाचाच्या वेळी वाजविले जाते, तर तालाला मदत करण्यासाठी तांब्या उपडी ठेवून तो दगडाने वाजविला जातो किंवा 'काठा' नावाचे वाद्य वाजवितात. नाचणारे टाळ्या वाजवित नाचतात. पावशा देवाची (पाऊस देव) गाणी म्हणताना कनसरी देवता (धनधान्य देणारी) तिला साद घालणारी गाणी याप्रसंगी म्हटली जातात. विनवणी करून पाऊस आला की पेरणी करायची. गावातील पेरणी आटोपली की गावातील सर्वांनी मिळून एक दिवस ठरवायचा. प्रत्येक घरातील किमान एकाने (स्त्री/पुरुष) उपाशीपोटी निघायचे. जंगलात जाऊन 'कोली' भाजी आणायची. घरात हिरव्या देवाची (झाडाची फांदी) पूजा करायची, दिवा लावायचा, नारळ फोडायचा, कोली भाजी शिजवून देवाला त्याचा नैवेद्य दाखवायचा. घरातील सर्वांनी देवाला नमस्कार करून कोली भाजी खायची. त्याच दिवशी जेवणानंतर सर्व स्त्री-पुरुष-मुले एकत्र जमतात आणि कांबड्या नाचाची सुरुवात करतात. साधारण पंधरा दिवस हा नाच नाचला जातो.

**नमन खेळे**

नमन खेळे म्हणजे देवीचे विधी नाट्य. उत्तर कोकणातील अतिशय लोकप्रिय असा लोककला प्रकार आहे. रत्नागिरीच्या गणपतीला म्हणजे गणोबाला प्रसन्न करण्यासाठी 'खेळे' नाचविले जातात. बहुजन समाजातील कुणबी शेतकरी लोकांत हा खेळ खेळला जात असून तो धार्मिक विधी म्हणूनही याकडे पाहिले जाते. त्यामुळे आजमितीपर्यंत हा खेळ जतन करून ठेवला आहे. नमन खेळाची परंपरा पेशवाईपासून असावी असे वाटते. कारण की, खेळांच्या काही गीतांमध्ये राघोबादादांचा उल्लेख आढळतो. १७२८ साली शामजी नाईक-काळे यांनी कर्नाटकातून जो लोककला प्रकार आणला त्याचेच दोन भाग होऊन एक दक्षिण कोकणात दशावतार म्हणून प्रसिद्ध झाला, तर उत्तर कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात नमन-खेळे म्हणून होऊ लागला. खेळ्यातील नृत्य, नाट्य, वादन, संगीत, वेषभूषा हे कर्नाटकातील यक्षगान या लोककला प्रकारांशी साम्य दाखविते. तर दुसरी उपपत्ती अशी सांगतात की, अंदाजे अकराव्या, बाराव्या शतकात नमन खेळे उदयाला आले आहेत असा उल्लेख सापडतो.

नमन खेळाचा प्रारंभ फाल्गुन महिन्यात होळी सणांच्या वेळी कोकणात ठिकठिकाणी सुरू होतो तो वैशाखापर्यंत चालू राहतो. ग्रामदेवतेच्या पालखीबरोबर निघणाऱ्या खेळ्यांना देवीचे खेळे म्हणतात. हे खेळे पालखीबरोबर गावातील घरच्या अंगणात जातात. देवीच्या पालखीची पूजा गावचा मानकरी करतो आणि त्या ठिकाणी खेळे खेळले जातात. 'गावाला सुखशांती लाभू दे. संकट टळू दे' ही प्रमुख भूमिका नमन खेळाची आहे. गावातील लग्नकार्य, पूजा, नामकरण विधी अशाप्रसंगीही गावकऱ्यांच्या निमंत्रणावरून हे खेळे घरी जातात व अंगणात खेळे खेळतात. नमन खेळे दोन भागात सादर होतात. पहिला भाग पूर्व रंग आणि दुसरा भाग उत्तर रंग.

नमनाची सुरुवात प्रथम मृदुंग वाजविणाऱ्यांकडून होते. प्रत्येक नमन खेळात किमान दोन मृदुंग वाजवणारे असतात. मध्यभागी सूत्रधार असतो तो नमनाला सुरुवात

करतो. मागच्या बाजूला एका ओळीत अन्य कलाकार उभी भिंतीची ओळ दोन्ही टोकांनी जरा पुढे उभे असलेले मृदुंग वाजवणारे नमन सुरू झाले की मागची मानवी भिंत ढोपरापासून वाकून एकदा डाव्या बाजूला आणि एकदा उजव्या बाजूला वाजवित गीत म्हणतात -

***देव पयलं नमन... देव गणेश देवाला...***
***देव दुसरं नमन... देव...***

एकूण १२ नमनानंतर शंकासुर प्रवेश करतो. यात शंकासुर केवळ नृत्यप्रधान पात्र म्हणूनच रंगमंचावर येतो. नमनात मुख्यतः अलौकिक अशी दैवी सोंगे येत असतात आणि जात असतात. गणपतीचे सोंग गेल्यानंतर नटवा हे सोंग येतं. नटवा म्हणजे मानवी मुखवटा चढवलेले सोंग.

गणपती आला न् नाचून गेला... नटवा रं मांगराला (मागे राहिला) सूत्रधार आणि नटवा यांच्यात हास्य विनोदाच्या अंगाने सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक संवाद, सर्वसामान्यांना पडणारे प्रश्न व त्याच्या उत्तराचा शोध या साऱ्यांचा विचार त्यांच्या संभाषणात असतो. नंतर तमाशातील गौळणीसारखी गौळणी सादर होते. त्यात कृष्ण, पेंड्या, राधा, गौळणी या साऱ्या पात्रांची वर्णी तिथे लागते. कृष्ण आपली ओळख गीतांतून करून देतो. अशाप्रकारे पूर्व रंग संपतो आणि उत्तर रंगाला सुरुवात होते. उत्तर रंगात कथानक लावले जाते.

गुहागरपासून पाच किलोमीटर अंतरावर वरवेली गाव आहे. या गावातील जगन्नाथ शिंदे व त्यांचे सहकारी १९४७ पासून नमन खेळे प्रकार खेळतात. नमन खेळे हा पारंपरिक कला प्रकार जतन करण्यासाठी त्याची सतत धडपड चाललेली असते. कळंबट डोंगरांनी वेढलेल्या खेड्यात नमन खेळाचा कार्यक्रम चालतो. देवीची पालखी सजविली जाते. आपल्या देवीचे नाव घेऊन पालखी व खेळे प्रत्येकाच्या दारात जातात. तिथे खेळे खेळले जातात.

**घुमटाचा फाग**

कोकणातील गाबीत समाजाचा हा लोककलेचा नाट्यप्रकार आश्चर्यचकित करणारा आहे. कर्नाटकातील कारवारपासून ते कोकणातील गोवा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, मुंबई ते पार गुजरातच्या कच्छपर्यंत, समुद्र खाडीच्या काठाने मासेमारीसाठी हे गाबीत वस्ती करून आहेत. गाबीत समाजाचे लोक मनाने भावुक असून भागवत वारकरी संप्रदायांचा त्यांच्या मनावर मोठा प्रभाव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पेशवाईपर्यंत ही गाबीत मंडळी आरमारात होती. सरखेल कान्होजी आंग्रे हे विजयदुर्ग येथे आरमारी केंद्राचे प्रमुख होते. त्यावेळी या समाजातील लोककलावंतांनी, हिंदू, मुस्लीम यांच्यात ऐक्यभाव वाढावा, समाजातील विषमता नष्ट व्हावी यासाठी आपली लोककला सादर केली.

पारंपरिक लोककला प्रकारात लिखित संहिता नसते. त्याचप्रमाणे याही लोककलेत लिखित संहित नाही. घुमटाचे वादन, नमन, गण गायन, गणपती, सरस्वती, शिव-पार्वती यांचे अवतरण, फागाचे गायन, निरनिराळ्या सोंगांचे प्रवेश, सलामी आणि शेवटी आरती असे या लोककलेचे मूळ रूप आहे. या लोककलेचा आत्मा म्हणजे फाग रचना गायन-वादन. यांच्या गाण्याची रचना ही अठरा, बावीस आणि सव्वीस मात्रांत आढळते. देवदेवतांचे फाग, रामायण, महाभारतातील कथानकांचे फाग सरळ सोप्या भाषेत, बोली भाषेत रचलेले असतात. अलीकडच्या दोनशे पन्नास वर्षातील शिवकालापासून ते इंग्रजांच्या राजवटीपर्यंत फागच्या रचनांची नोंद बारा बलुतेदारांपैकी एक राऊळ सुतार यांनी केल्याचे दाखले मिळतात.

***पयले नमन घटतेर मातेला***
***दुसरे नमन माझे आकाशीला...***

घुमटावर थाप पडते आणि नमन सुरू होते. नमनानंतर गण गायला जातो आणि त्याची सुरुवात होते गणपती फागाने.

***गणपती इंगणी घागुरी चटणी***
***पहिले लोचनी... अहो पहिले लोचनी...***

हळूहळू घुमटाच्या थापेबरोबर खेळाला रंग चढू लागतो. गाबीत समाज समुद्र खाडीच्या किनारी राहून आपली रोजी रोटी सांभाळत, आपली लोककला जपण्याचा प्रयत्न करतो आहे. माझ्यावर कितीही संकटे येऊ देत, मी माझी लोककला जिवंत ठेवीन आणि तिला लोकाश्रय मिळवून देईन असे कोकणातील गाबीत समाजातील लोककलावंत म्हणतो.

**चित्रकथी**

चित्रकथी म्हणजे चित्र दाखवून कथाकथन करणे. महाराष्ट्रात चित्रकथीच्या पिंगुळी कुडाळ, सिंधुदुर्ग आणि पैठण अशा दोन शैली प्रचलित आहेत. निरुपण व संवाद घालून सादर होणारा चित्रकथीत दोन्ही शैलीत थोडाफार फरक आहे.

चित्रकथी सादर करताना चित्रकथांचा कागद

प्रेक्षकांना दाखवून त्याचा भावार्थ पदबंधात गुंफून गायला जातो. 'मानसोल्लास' या ग्रंथात म्हटले आहे की, चित्रकथी तालाशिवाय सादर होऊ शकते. असे जरी असले तरी झांज आणि विणा या वाद्यांच्या साहाय्याने चित्रकथी सादर करण्याची प्रथा रूढ झाली आहे. दोनशे वर्षांपूर्वीचे रामायण, महाभारतातील दुर्मिळ चित्रे दाखवून कथेकरी चित्रकथी सादर करतात. पारंपरिक पद्धतीची गीतबद्ध कथा सांगताना कथेतील प्रसंगांची चित्रे चित्रकथीत दाखविली जात असताना चित्ररूपाने कथा समोर येते.

चित्रकथी कलाकार मूळचे महाराष्ट्रातील नसून ते भटकत भटकत महाराष्ट्रात आले. राजाश्रय मिळविण्यासाठी चित्रकथांची निर्मिती झाली. सावंतवाडीचे संस्थानिक खेम सावंत, शिवराम राजे यांच्या आश्रयाने ते तिथे कायम स्वरूपी वस्ती करून राहिले आणि हळूहळू ती कला बहरत गेली. बहरलेली ही कला पाहून खूष होऊन राजांनी या कलाकार मंडळींना ठराविक देवळे वतन म्हणून दिली. दसरा, गणेशोत्सव, नवरात्र, लग्न समारंभ देवळातील ठराविक कार्यक्रम अशा प्रसंगी सावंतवाडी दरबारात चित्रकथीचे कार्यक्रम ठाकर जमातीचे कलाकार अशा प्रसंगी सादर करीत असत.

पिंगुळी इथली चित्रे शुद्ध मराठा शैलीतील आहेत. जगभर प्रसिद्ध असलेले मराठा चित्रशैलीतील परंपरागत पद्धतीने चित्रे काढणारी ठाकर जमात अजूनही सिंधुदुर्ग जिल्ह्यात अस्तित्वात आहेत. चित्रकथी कलाकारांच्या घरी एकतरी संच असतोच. आपल्या पारंपरिक कलेचे जतन करण्यासाठी. कुठल्या कुटुंबाकडे हा चित्रसंच नसेल त्यांना दंड ठोठावण्यात येतो. जेणेकरून ही कला जोपासली जाईल. आपली पारंपरिक कला जोपासताना देबू जीवबा गंगावणे व लाडू बाबू पालवे यांच्याकडे ८० वर्षांपूर्वीची चित्रे उपलब्ध आहेत.

गेल्या काही वर्षापासून पिंगुळीतील गुडीगावचे वसंत गंगावणे हे परदेशात उच्च शिक्षण घेऊन आले. ठाकर समाजातल्या या विद्वानाने आपल्या समाजाच्या विकासासाठी स्वतःला वाहून घेतले आहे. आपल्या पारंपरिक चित्रकथीच्या संशोधनासाठी आणि कलाविष्कारासाठी ते परिश्रम घेत आहेत, धडपडत आहेत.

**कळसूत्री बाहुल्या**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील पिंगुळी गावची कळसूत्री बाहुल्यांची परंपरा साडेतीनशे वर्षांची आहे. देशभरातील राजस्थानी कठपुतळी इतकाच महाराष्ट्राच्या कळसूत्री बाहुल्याचा खेळ प्रसिद्ध आहे. ठाकर समाजातील गावचे पोलीस पाटील असणारे गणपत मसगे आणि त्यांच्या तीन-चार पिढ्यांनी ही कळसूत्री बाहुल्यांची परंपरा जोपासली आहे. मसगे यांच्याकडे जवळपास अठ्याहत्तर बाहुल्यांचे संच तयार आहेत. मात्र या बाहुल्यांच्या खेळाची निश्चित अशी संहिता नाही. आमच्या वडिलांनी या पारंपरिक खेळाचे प्रकार लिहून काढले होते असे मसगे म्हणाले. परशुराम गंगावणे हे कळसूत्री बाहुलीकार आपल्या मुलांसह कळसूत्री बाहुल्यांचे खेळ करत जगभर फिरत असतात. पिंगुळी येथे त्यांनी आपली कला जतन करण्यासाठी कलादालन उभारले आहे. कळसूत्री बाहुल्यांची परंपरा संत ज्ञानेश्वर, संत रामदास यांच्या काळापासून असल्याचे दाखले मिळतात. ज्ञानेश्वरीतील अठराव्या अध्यायात.

***ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।***
***भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया।।***

या गीतेच्या श्लोकावर टीका लिहिताना ज्ञानेश्वरांनी असे म्हटले आहे की,

***स्व मायेचे आडवस्त्र, लेवूनि एकला खेळवी सूत्र।***
***बाहेरी नटी छायाचित्र, चौऱ्यांशी लक्ष।।***

जो आपल्या मायेचा आडपडदा लावून एकटाच सूत्र हलवून बाहेर चौऱ्यांशी लक्ष छायारूपी चित्र नाचवितो.

संत रामदासांच्या दासबोधामध्ये छायानाट्य व कळसूत्री बाहुल्यांचा उल्लेख केल्याचे आढळते.

***खांबसूत्रीची बाहुली। जेणे पुरुषें नाचविती।***
***तोचि बाहुली हे बोली। घडे केवी।***
***छाया मंडपी क्षेत्रा। सृष्टी सारखीच रचना***
***सूत्रे चाळी परी तो नाना। व्यक्ति नव्हे।।***

कळसूत्री बाहुल्यांचा खेळ विविध छोट्या छोट्या गोष्टींतून सुरू होतो. पौराणिक कथेबरोबर सामाजिक कथाही कळसूत्री बाहुल्यांच्या खेळातून साकार होतात. महाभारतातील कथा सांगताना जवळपास चाळीस ते पन्नास बाहुल्यांचा वापर केला जातो. प्रत्येक बाहुलीचं व्यक्तिमत्त्व केवळ संवादाच्या आणि त्या बाहुलीच्या हालचालीतून चपखलपणे साकार केले जाते.

कळसूत्री बाहुल्या तयार करताना सोईप्रमाणे त्यांची रचना केलेली असते. बाहुल्यांचे अवयव जसे

पाहिजे तसे हलविता यावेत म्हणून त्यांच्या अंगातून तारा नेलेल्या असतात आणि या तारांच्या साहाय्याने बाहुल्यांना युक्तीप्रयुक्तीने नाचविता येते. अशा प्रत्येक बाहुलीला सूत्री म्हणतात. कळा-कळ+सूत्र (दोरी) धरणारा, अदृश्य राहून निर्जीव बाहुल्या स्वयं प्रेरणेने चलनवलन करतात. ही जी त्यांची युक्ती म्हणजे कला ही त्या कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाच्या कल्पनेला अभिप्रेत आहे.

कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करताना पाच बाय दोन फुटाचा रंगमंच असतो. रंगमंचाच्या मागील भागावर गणपतीचे चित्र असलेला लाल रंगाचा पडदा असतो. सूत्रधार आपल्या दहा बोटांच्या करामतीवर तो या पात्रांचा अभिनय साकार करतो. अलिखित संहिता, पारंपरिक गीते, तबला, झांज या वाद्यांच्या साहाय्याने, संवादाच्या माध्यमातून रंगमंचावरील खेळ उत्तरोत्तर रंगत जातो. कथेतील पात्रे अनेक असतील तर दोन-तीन सूत्रधार आपली दहा बोटे वापरून कथा रंगवत नेतात.

पारंपरिक गीतांच्या आधारावर आपल्या कोकणातील ठाकरी भाषेचा उपयोग आणि तेही कळसूत्री बाहुल्यांचा खेळ सादर करणं एवढं सोपं नाही. ती कला आत्मसात करायला बाहुलीकाराला अपार कष्ट घ्यावे लागतात. बोटांच्या हालचालीवर हुकमी नृत्य करणाऱ्या कळसूत्री बाहुल्या हा खरंच कौतुकाचा विषय आहे.

लोक रंगभूमीवरील दक्षिण कोकणातील लोककला प्रकार, दशावतार, कोकणातल्या अस्सल मातीतील एक प्रमुख लोककला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या दशावताराला पाचशे वर्षांची परंपरा आहे.

परमेश्वराने मस्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, श्रीकृष्ण, बुद्ध आणि कल्की असे दहा अवतार घेतले. या प्रत्येक अवतारात देवाने विविध रूपे धारण केली आणि ज्या लीला केल्या, खेळ केले त्याचे हे लीला नाट्य होय. दशावतारात परमेश्वराने विविध सोंगे घेऊन लीला नाट्य सादर केले, अशी माणसाची धारणा आहे. तो  एक खेळ असतो याची अनुभूती माणसं घेतात. म्हणूनच 'दशावतार' खेळे ही संज्ञा रूढ झाली आहे. दशावतारातून निरनिराळ्या आरत्याद्वारे सत्त्व, तम आणि रज या तीन गुणांमधून निर्माण झालेले आणि अलौकिक रसांनी भरलेले लोकजीवन पहायला मिळते. कोकणी माणसाच्या दशावतारावर असलेल्या अतूट श्रद्धेमुळे विष्णूने घेतलेल्या  दहा अवताराचे नाट्य दर्शन त्यांना मोहून टाकते. मूळ परंपरा न सोडणाऱ्या कोकणी माणसाप्रमाणे दशावतारानेही आपली मूळ परंपरा सोडलेली नाही. कोकणातील निरनिराळ्या ग्रामदेवता आणि सीमेवरील देवतांचा दशावतार हा ग्रामविधी आहे. या ग्रामविधीमागे गावातील अज्ञान, अंधःकार, रोगराई नष्ट होऊन गावात सुखशांती, समृद्धी नांदावी यासाठी देवतेला याकडे (गाऱ्हाणे) घातले जाते. या धर्माचाराला, विधीला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि म्हणूनच दशावतारी नाट्यकलेला दक्षिण कोकण व गोवा या प्रदेशातील सामाजिक, सांस्कृतिक व कला जीवनाच्या दृष्टीने आदर्श मूल्ये प्रसारित करणारे एक माध्यम तसेच मनोरंजनाचे साधन मानतात. सन १७९८ या काळात कोणा शामजी काळे नावाच्या कीर्तनकार गृहस्थांनी कर्नाटकातून दशावतार खेळे कोकणात आडिवरे गावी आणले असे म्हणतात. आडिवऱ्याच्या महाकाली उत्सवात खेळे उभे करताना पहिला मानाचा नारळ या शामजी नाईक काळे यांच्या नावे ठेवला जातो. मात्र तेराव्या शतकाच्या आधीपासून अशा प्रकारचे खेळ प्रचलित आहेत असा उल्लेख ज्ञानेश्वरीत आहे. दशावताराचे पहिले सादरीकरण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील वालावल या गावी नारायणाच्या देवळात केशव गोरे भटांनी केले असल्याचे पुरावे सापडतात. केशव गोरे भटजींकडून दशावताराचा पेटारा वालावलकरांनी स्वीकारला. आज वालावलकर दशावतारी मंडळाचा सर्वात वरचा क्रमांक लागतो. त्या वालावलकरांची तेरावी पिढी तितक्याच समर्थपणे दशावतार सादर करत आहेत. ज्येष्ठ दशावतारी कलावंत बाबी नालंग या वालावलकर दशावतारी मंडळातील कलाकाराला संगीत नाटक अकादमीच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. वालावलकर दशावतारी मंडळाप्रमाणे नाईक मोचेमाडकर, मामा मोचेमाडकर, बाबी कलिंग, पार्सेकर आणि मंडळी यासारखी अनेक नामवंत दशावतारी मंडळे आपली पारंपरिक लोककला टिकवण्याचे काम, मानसन्मान, प्रतिष्ठा वा मानधन या कशाचीही अपेक्षा न करता वर्षानुवर्षे लोकरंजनाचे, प्रबोधनाचे तसेच लोकजागृतीचे काम इमाने इतबारे करीत आहेत.





# कोकण, नारळ आणि कोकम

वृंदा दाभोलकर

कोकण म्हणजे एक अंगठी मानली तर त्यात कोकम म्हणजे माणिक, पाचू म्हणजे हिरवागार निसर्ग आणि नारळ म्हणजे गोमेद अशी तीन रत्न त्यावर जडली आहेत असं म्हणायला हरकत नाही. आहे त्यात भागवण्यापेक्षा जे आहे त्यात साजरं कसं करता येईल असा स्वभाव असणाऱ्या कोकणी माणसाकडे आदरातिथ्य यथायोग्य होतंच.

***भटो भटो कुठे गेला होतात.. कोकणात..***
***कोकणातून काय आणलं..***

लहान असताना शालेय अभ्यासक्रमात असणारी ही कविता कोकणाबद्दल कुतूहल वाढवणारी.आमच्या लहानपणी गावाला जायचं असं म्हंटल की कोकणात जायचं असं पक्क ठरलेलं असायचं आणि येताना कोकणचा मेवा घेऊन यायचं हें ओघाने आलंच.

कोंक या धातूपासून तयार झालेला शब्द म्हणजे कोकण..

समुद्र आणि पर्वतरांगा हे कोकणचं वैशिष्ट्य. दोन्हीतली अथांगता पहात राहावी.समुद्राच्या पाण्यात पाय ठेवल्यावर आपसूक मोकळं होणारं मन आणि पर्वतराजीतून फिरताना लाभणारा शांतपणा याची तुलना करूच शकत नाही.

या पर्वतरांगांनी आणि समुद्राने कोकणाला समृद्ध केलंय.किनारपट्टीवर असणारी नारळाची बनं, डोंगरावर उभी असणारी रातांबा आणि काजूची झाडं ही तळकोकणाची खरी संस्कृती.

कोकणात फिरताना मोक्याच्या ठिकाणी तुम्ही कांदा भजी,बटाटा वडा, वडा उसळ पाव याचा आस्वाद घेऊ शकता. सोबतीला कडक चहा असतोच.

वेंगुर्ल्याच्या बंदरावर एका बाजूला बोटीतून माश्यांच्या पाट्या उतरत असतात आणि बाहेर मस्त खरपूस कांदा भजी, चहा, आणि आईसफ्रूट ची गाडी खुणावत असते. शिरोड्याला गेलात तर बटाटाभजी पाव, आणि मिसळ खाल्ल्याशिवाय तुम्ही किनाऱ्यावर जाणारच नाही.

तारकर्ली, देवबागमध्ये मिळणारी आंबोळी चटणी आणि उकडीचा मोदक बीच वर बसून खाण्यातली मौज काही वेगळीच.

नारळाचा आणि कोकमाचा यथेच्छ वापर तळकोकणातल्या खाद्यपदार्थांमध्ये होतो.

इथे फिरताना जर अगदी ताजी ताजी नारळ उतरवणी झाली असेल तर त्यातल्या पांढऱ्या नारळाचा रस तुम्ही सोलकढीत किंवा माशाच्या आमटीत वापरून पहा..किंवा घावणाबरोबर नारळाचं गुळ घालून केलेला रस.... रसना म्हणजे जिव्हा आणि उदर म्हणजे पोट तृप्त होऊन आशीर्वादच देतं त्या गृहिणीला.

शिरवाळे आणि रस असाही एक खाद्यपदार्थ आहे बरं का.. तो करायचा असेल तर दोन दिवस अगोदरपासून तयारी असते ती पांढरा कोवळा नारळ शोधण्याची. तो जोवर मिळत नाही तोवर काही खरं नसतं घरातल्या तरुण पोरांचं. पिटाळून पिटाळून नारळ शोधायला लावतात. तशीच कथा उकडीच्या मोदकांची आणि पातोळ्याची. नारळ खवताना त्यात एकही तूस किंवा करवंटीचा तुकडा नको अशा कडक सूचना असतात.

बरं अशी कितीशी सामग्री लागते या पदार्थांसाठी तर सुगंधीत तांदळाची पीठी, ओलं खोबरं,वेलची, जायफळ, खसखस,गुळ, तूप, थोडासा सुका मेवा, आणि हळदीची पानं. एक गुळ आणि वेलची, खसखस सोडली तर सगळं कसं घरचं.

नवीन जावई यायचा असेल तर त्या दिवशी कोकणातल्या घरात मटण किंवा चिकन चा घाट घातलाच जातो. बरोबर तळलेले मासे असतातच. मालवणी कोंबडी वडे ही डिश तर एकदम वल्ड फेमस. अनेक ठिकाणी ही स्पेशल डिश खाण्यासाठी लोकांची रांग लागते. चिकन मटण करायचं असेल तर चुलीवर खरपूस भाजलेलं कांदा खोबऱ्याचं वाटण आणि पाट्यावर वाटलेलं आलं लसूण आणि कांदा खोबऱ्याचं वाटण लावून केलेल्या चुलीवर रटरटणाऱ्या चिकन चा घमघमाट भूक चळवल्याशिवाय राहत नाही. आंबोळी, वडे, तांदळाच्या भाकऱ्या, चुरचुरीत तळलेले मासे, सुकटाची चटणी, लाल तांदळाचा भात, सोलकढी असा फक्कड बेत असतो.

नुसते मासे करायचे तर ओला नारळ खवून हात दुखतात कधीकधी.. पण जिभेचे चोचले पुरवायचे तर एवढं हवंच नै का?बांगड्याचं सुकं करायचं तर ओलं खोबरं, कांदा, तिरफळ, मिरी, धणे, एखादी सुकी लाल मिर्ची, हळद आणि मीठ घालून जरा सरसरीत वाटून घ्यावं लागतं... त्याची वेगळी तयारी, एखाद्याला सुरमईचं तिखलं खायचं असतं त्याची वेगळी तयारी, मग माझ्या आवडीचं कोलंबीचं खदखदं कर अशी वशारपव असतेच...आणि मग सोलकढी लागतेच. म्हणजे पहा किती नारळ खवायला लागतात.

पण तळकोकणात ओल्या नारळाशिवाय स्वयंपाक करण्यात मजा नाही. घरात दळलेल्या भाजणीच्या थालपीठा बरोबर कधीतरी ओलं खोबरं खाऊन पहा..

एहे रे test...

तसाच एक कृपा प्रसाद लाभलाय तो कोकम या फळाला. शहरात आमसुलं म्हणून ओळखलं जातं खरं पण खरा कोकणी माणूस कोकमाला कधीच आमसुलं म्हणणार नाही. आंबटपणासाठी कोकणात ह्याचा भरपूर वापर होतो. कुळथाचं पिठलं, रोजची डाळीची आमटी (ओलं खोबरं घातलेली) यात कोकमाचाच वापर होतो. घरी अचानक एखादा पाहुणा आला आणि चहा करण्याएवढा वेळ नसेल तर पटकन कोकम सरबताचा पेला त्याच्यासमोर ठेवला जातो.

एकदा का रातांबा झाडावरून काढला की कोकम, कोकम सरबत, कोकमाच्या बियांपासून केलं जाणारं तेल किंवा कोकम आगळ इतकं काय काय तयार होतं.

ओल्या काजूची उसळ, कुळथाची पिठी, वेगवेगळी कडधान्य वापरून बनवले जाणारे आमट्यांचे प्रकार, काळ्या वाटण्याची आमटी, समुद्री मेथीची भाजी, शहाळ्याची भाजी असे रुचकर पदार्थ रोजच्या जेवणात केले जातात. जिभेचे लाड एवढ्यावरच थांबत नाही तर आमसूल वापरून केलेल्या चटपटीत चटण्या, मोहरी घालून केलेलं आंब्याचे रायतं, आंबोशी याने केळीचं पानं सजतं.

संध्याकाळच्या खाण्यासाठी कोकणात घरी केलेले शेंगदाणा लाडू, शेवेचे खटखटे लाडू, चुरमुरे लाडू, फणसाचे तळलेले गरे असतातच.


आपल्या महाराष्ट्राला ७२० कि.मी.ची किनारपट्टी लाभली आहे. साधारण संस्कृती एकसारखी असली तरी दर दहा किलोमीटरवर बदललेली भाषा आणि खाद्यसंस्कृती कोकणच वेगळेपण अधोरेखित करते.

सुक्या नारळाचा वापर, चिंच असो वा सुक्या माशांचा रोजच्या वापरात केला गेलेला वापर अस्सल खवय्यांसाठी एक मोठी उपलब्धी आहे.

पदार्थाचं नाव सारखं असलं तरी करण्याची पद्धत आणि वापरले जाणारे मसाले यांनी जेवणाचं पान अगदी सुंदर दिसतं.

कोकण म्हणजे एक अंगठी मानली तर त्यात कोकम म्हणजे माणिक, पाचू म्हणजे हिरवागार निसर्ग आणि नारळ म्हणजे गोमेद अशी तीन रत्न त्यावर जडली आहेत असं म्हणायला हरकत नाही.


आहे त्यात भागवण्यापेक्षा जे आहे त्यात साजरं कसं करता येईल असा स्वभाव असणाऱ्या कोकणी माणसाकडे आदरातिथ्य यथायोग्य होतंच.


**हुतात्मा कोश**

डॉ. विजय कुलकर्णी


ज्या हुतात्म्यांनी पारतंत्र्याचा अंधकार छेदला त्यामुळे आपण स्वातंत्र्याची पहाट अनुभवू शकतो आहोत. अशा महाराष्ट्र प्रांताशी निगडित हुतात्म्यांचा मराठी कोश हुतात्मा कोश. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येकास हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल...




**ये मृत्यू ये**

साधना योगेश जोशी

महासागराच्या लाटांनी भारत भूमीच्या पायाशी लोळण घ्यावी त्याप्रमाणे मृत्यूला वीर सावरकरांनी स्वतःजवळ येण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. हा त्यांचा प्रवास साधना जोशी यांनी आपल्या ये मृत्यू ये या पुस्तकातून अचूक चितारला आहे...




**प्रवास... यशोदा ते**

**माई सावरकर**

साधना योगेश जोशी

हिरव्याघर झाडाला अबोलीची फुल आली काही काही न बोलता सारी सुकून गेली. भगव्या त्या फुलांचे हे एक दुखणे आहे. स्त्री जातीच्या व्यथेचे ते एक प्रतीक आहे माई सावरकर...

पोस्टल सेवा मोफत







# कोकणातील मंदिर वारसा

आशुतोष बापट

कोकणात मंदिरांबरोबरच विविध देवतांच्या सुट्या मूर्ती बघण्यासारख्या आहेत. कदाचित त्यांची इथे पूर्वी मंदिरे असावीत. पण आज ती कुठे दिसत नाहीत. आज मात्र या मूर्ती खास कोकणी पद्धतीच्या साध्यासुध्या कौलारू देवळात ठेवलेल्या दिसतात.

कोकण हा जसा निसर्गाने नटलेला प्रदेश आहे, तसाच तो असंख्य चालीरीती, रूढी-परंपरा आणि विविध मूर्ती आणि मंदिरांनी सजलेला प्रदेशही आहे. कोकणातली बरीच मंदिरे अगदी साधीसुधी कौलारू असली तरी त्यातल्या वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती आणि त्यांच्याशी निगडित असलेल्या कथा खूपच रोमांचक असतात. कोकणात खरंतर मंदिरांपेक्षा अनेकविध वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती जास्त दिसतात. ही शिल्पसमृद्धी खरंतर कोकणचं वैभव म्हणावं लागेल. विविध राजवटींनी या प्रांतावर राज्य केले. त्यातल्या शिलाहार, कल्याणी चालुक्य या राजवटींच्या काळातील स्थापत्य आणि विविध मूर्ती कोकणात आजही बघायला मिळतात.

त्यामुळे कोकणातले स्थापत्य वैभव किंवा मूर्तिवैभव बघताना त्यातल्या अगदी महत्त्वाच्या आणि अर्थातच खूपशा आगळ्यावेगळ्या ठिकाणांची माहिती करून घेणं योग्य होईल. या सर्व गोष्टींमध्ये सर्वात अग्रेसर म्हणावे लागेल ते अंबरनाथ इथले शिवमंदिर. मंदिर स्थापत्यातील भूमिज शैलीच्या मंदिरांमधले सर्वात आद्य मंदिर म्हणजे अंबरनाथ इथले शिवमंदिर होय. या मंदिरावर असलेल्या शिलालेखातच याचा उल्लेख आलेला आहे. इ.स. १०६० साली शिलाहार राजा मुम्मुणी याने हे मंदिर बांधले असा तो उल्लेख होय. हा शिलालेख मिळेपर्यंत मध्यप्रदेशातील भोजपूर इथले मंदिर या शैलीतील सर्वात प्राचीन मंदिर गणले जात होते. मात्र या शिलालेखाचे वाचन झाल्यावर तो मान कोकणाला मिळाला. पश्चिमाभिमुख असलेले हे मंदिर असंख्य शिल्पांनी नटलेले आहे. शिव देवता, आणि त्याच्या विविध कथांचे शिल्पांकन या मंदिरावर बघायला मिळते. अंबरनाथ इथले शिवमंदिर, त्यावर असलेली विविध शिल्पे, त्याच्याशी निगडित असलेला संप्रदाय यावर खूप सखोल अभ्यास डॉ. कुमुद कानिटकर या थोर विदुषीने केलेला आहे. त्यांच्या इतके अभ्यासपूर्ण लिखाण या मंदिरावर अजून कुणीही केलेले नाही. मंदिराच्या द्वारशाखासुद्धा खूप सुरेख सजवलेल्या आहेत. मंदिराच्या सभामंडपातील खांबांवरसुद्धा मोठी शिल्पकला केलेली दिसते.



अंबरनाथच्या मंदिराइतकंच सुंदर मंदिर आहे कर्णेश्वराचं. हे मंदिर वसलं आहे संगमेश्वरच्या कसब्यात. मंदिर अगदी प्राचीन. इसवी सनाच्या बाराव्या शतकातलं. चालुक्यांचा राजा कर्ण याने बांधलेलं. या मंदिरावर बाहेरच्या बाजूने शिल्पकाम नाही. मात्र या मंदिराचा अर्धमंडप म्हणजे पोर्च आणि त्याच्या द्वारशाखा फारच सुंदर आहेत. अर्धमंडपाच्या छतावर आठ दिशांचे स्वामी म्हणजेच अष्टदिक्पाल त्यांच्या वाहनांसकट कोरले आहेत. ललाटावर शेषशायी विष्णू आहे. आणि त्याच्या वरच्या पट्टीवर विष्णूचे दशावतार कोरलेले आहेत. शिव मंदिराच्या ललाटावर विष्णू आणि दशावतार म्हणजे जरा वेगळंच नाही का. या दशावतारांमध्येसुद्धा एक गंमत केलीये. इथे आठवा अवतार कृष्णाच्या ऐवजी ‘बलराम’ दाखवलेला आहे. मंदिराला सभामंडप असून त्यात रंगशिळा दिसते. आज त्याच रंगशिळेवर नंदीची मूर्ती ठेवली आहे. मंडपाचे जे खांब आहेत त्यावर आडव्या दगडी तुळया आहेत. जिथे त्या तुळया खांबांना छेडतात तिथे नेहमी यक्षांच्या प्रतिमा कोरलेल्या असतात. त्यांना कीचक असे म्हणतात. इथे यक्षांच्या जागी गणपती, नरसिंह आणि सरस्वती कोरलेली दिसते. हे अगदी आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. इतर कुठल्याही मंदिरात हे बघायला मिळत नाही. या मंदिराचे हे मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. याचसोबत मंदिरात एका कोनाड्यात ब्रह्मदेव तर दुसऱ्या कोनाड्यात आसन स्थितीतला अनंतविष्णू बघायला मिळतो. मंदिर प्राकार खूप विस्तीर्ण असून त्यात एका कोपऱ्यात सूर्याचे देऊळ आहे. संगमेश्वर माहात्म्य या ग्रंथात या

मंदिराविषयी बरीच माहिती मिळते. त्यात या मंदिराच्या देखभालीसाठी विविध गावे दान दिल्याचे उल्लेख आहेत.

कोकणात मंदिरांबरोबरच विविध देवतांच्या सुट्या मूर्ती बघण्यासारख्या आहेत. कदाचित त्यांची इथे पूर्वी मंदिरे असावीत. पण आज ती कुठे दिसत नाहीत. आज मात्र या मूर्ती खास कोकणी पद्धतीच्या साध्यासुध्या कौलारू देवळात ठेवलेल्या दिसतात. खारेपाटण इथे असलेली सूर्याची मूर्ती अशीच एक नितांतसुंदर मूर्ती आहे. ही शिलाहारकालीन मूर्ती देखणी तर आहेच पण त्याचबरोबर या मूर्तीच्या अंगावर विविध दागिने कोरलेले आहेत. दोन हातात कमळे धारण केलेला सूर्य फारच देखणा दिसतो. कोकणात सूर्याची काही विशेष मंदिरे आढळून येतात. त्यातले परुळे इथे असलेले आदित्य नारायणाचे मंदिर खूपच जुने. मात्र आता त्याचा जीर्णोद्धार झाल्याने ते अगदी नव्या स्वरुपात उभे आहे. मात्र आडिवरे या गावाजवळ असलेले कशेळी इथले सूर्यमंदिर, त्या मंदिरातली सूर्याची मूर्ती आणि त्याबद्दलची सुंदर कथा आवर्जून लक्ष द्यावी अशी आहे. गुजराथ इथल्या प्रभासपट्टण इथे परकीय आक्रमण आले म्हणून तिथल्या पुजाऱ्यांनी काही मूर्ती बोटीत घालून बाहेर पाठवल्या. त्यातलीच ही एक मूर्ती. बोटीतून ही मूर्ती पाण्यात पडली आणि एका गुहेत विसावली. कनका नावाच्या कुणा सूर्यभक्त असलेल्या स्त्रीच्या स्वप्नात दृष्टांत झाला आणि ही मूर्ती बाहेर काढून इथल्या देवळात वसवली. तेव्हापासून हा देव झाला 'कनकादित्य'. जुने सुंदर खास कोकणी देऊळ. प्रशस्त असा सभामंडप आणि ऐन गाभाऱ्यात उभा असलेला हा सूर्यदेव. आवर्जून भेट द्यावे असे हे ठिकाण.





सूर्यमूर्तींसारख्याच विष्णूच्या विविध मूर्ती कोकणात आढळतात. अगदी श्रीवर्धन पासून ते दापोलीजवळ सडवे, शेडवई, कोळीसरे सारख्या ठिकाणी एकाहून एक सुंदर विष्णू मूर्ती उभ्या आहेत. याच पंक्तीत बसणारी एक सर्वांगसुंदर विष्णू मूर्ती वसली आहे चिपळूणजवळच्या बिवली गावात. पेशवाईतील कर्तबगार न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांच्या नंतर नीळकंठशास्त्री थत्ते हे मराठी राज्याचे न्यायमूर्ती झाले. हे नीलकंठशास्त्री याच बिवली गावचे होत. त्यांना एक विष्णुमूर्ती मिळाली ती त्यांनी या मंदिरात आणून वसवली. देवाच्या डाव्या पायाजवळ श्रीदेवी असून उजव्या पायाशी नमस्कार मुद्रेत गरुड बसलेला आहे. देवाच्या अंगावरचे दागिने फारच सुंदर असून देवाची बोटे सुबक आहेत. दहाच्या दहा बोटात अंगठ्या घातलेल्या दिसतात. डोक्यावर करंड मुकुट असून त्रिवलयांकित गळा शोभून दिसतो. गळ्यात असलेल्या तीन माळांपैकी एका माळेतील पदकात आंबा कोरलेला आहे.

चिपळूण म्हटल्यावर हमखास बघण्यासारख्या दोन मूर्ती म्हणजे विंध्यवासिनी मंदिरात असलेली महिषासुरमर्दिनी आणि तिच्याच शेजारी असलेली कार्तिकेयाची मूर्ती. या दोन्ही मूर्ती अफलातून आहेत. अगदी सकाळी पूजेच्या वेळी गेल्यास या मूर्ती व्यवस्थित बघता येतात. अतिशय देखण्या मूर्ती आहेत या. अंदाजे ११-१२ व्या शतकातील या मूर्ती. कार्तिकेयाची मूर्ती तर दिवसभर झाकून ठेवलेली असते. आपल्याकडे असलेल्या काहीशा चुकीच्या समजामुळे कार्तिकेयाचे दर्शन स्त्रियांना



वर्ज्य ठरवले आहे. पण त्यामुळे इतक्या सुंदर आणि देखण्या वारशाचे दर्शन मात्र दुर्मिळ झाले आहे. मला तर वाटते की कोकणात आढळणाऱ्या कुठल्याही मूर्तीपेक्षा ही कार्तिकेयाची मूर्ती फारच अप्रतिम आहे. कल्याणी चालुक्यांच्या काळात घडवलेल्या या दोन्ही मूर्ती म्हणजे खरेतर कोकणाचे वैभव म्हणावे लागेल. मात्र हा ठेवा दिवसभर झाकून ठेवलेला असतो.

पावस जवळ असलेल्या गोळप गावात ब्रह्मा-विष्णू-आणि महेशाची मूर्ती ही कोकणातली एकमेवाद्वितीय मूर्ती असावी. अंदाजे इसवी सनाच्या चौदाव्या शतकातल्या या प्रत्येक मूर्तीवर बारीक बारीक काम केलेले दिसते. शिल्पसमृद्ध अशी ही मूर्ती म्हणजे या गावाचे वैभव म्हणावे लागेल. विविध देवदेवतांच्या मूर्तींचे वर्णन करताना मावळंगे या गावी असलेल्या नरसिंहाच्या मूर्तीचे वर्णन तर करावेच लागेल. आणि त्याचे दर्शनही मुद्दाम जाऊन घ्यावे लागेल. रियासतकार सरदेसाई आणि लोकसभेचे पहिले अध्यक्ष असलेल्या दादासाहेब मावळणकरांचे हे गाव. गावात प्राचीन नरसिंह मंदिर असून सरदेसाई घराण्याने त्याची उत्तम व्यवस्था ठेवलेली आहे. तुरळ गावावरून मावळंगे गावी जाता येते. या नरसिंहासारख्याच परशुरामाच्या वेगळ्या मूर्तीसुद्धा कोकणात वसलेल्या आहेत. त्यात लक्षवेधी मूर्ती म्हणजे देवाचे गोठणे इथे असलेली भार्गवरामाची मूर्ती आणि इथले मंदिर. छत्रपती शाहू, पेशवे आणि कान्होजी आंग्रे यांचे गुरु असलेल्या ब्रह्मेंद्रस्वामींनी इथे ही मूर्ती आणून वसवली. हात जोडून उभे असलेल्या परशुरामाची एकमेव मूर्ती इथे आहे. हा मंदिर परिसर, आणि इथली मूर्ती हे या गावाचे आकर्षण म्हणावे लागेल.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कोटकामते गावातल्या भगवती देवीचे मंदिरसुद्धा असेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. इथली देवीची मूर्ती तर देखणी आहेच मात्र या देवळात कान्होजी आंग्रे यांचा शिलालेख कोरलेला आहे. कान्होजी आंग्रे यांनी या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी मोठे दान दिले होते याचा उल्लेख इथे केलेला आहे. हे सगळे गाव देवी भगवतीच्या नावाने आंदण दिलेले असल्यामुळे या गावात सात बारा उताऱ्यावर जमिनीचा मालक म्हणून देवीचेच नाव सगळीकडे येते.

अनेक गूढ, रमणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण बाबींनी कोकण प्रांत बहरलेला आहे. वर उल्लेख केलेली मंदिरे आणि मूर्ती ह्या निव्वळ प्रातिनिधिक वाटाव्यात इतकी विपुल वारसा श्रीमंती कोकणात वसलेली आहे. जवळजवळ इथल्या प्रत्येक गावात काहीना काही नैसर्गिक वैभव, स्थापत्य वैभव किंवा एखादी लोककथा ऐकायला मिळते. कोकणात शिल्पसमृद्ध मंदिरे जरी अगदी कमी असली तरी एकाहून एक देखण्या शिल्पांची रेलचेल दिसून येते. त्यासाठी मुद्दाम वाट वाकडी करून हिंडायला हवे. नेहमीची गर्दीची ठिकाणे टाळून जरा आडबाजूला गेले तर मोठे वैभव सर्वत्र बघायला मिळते. हे शिल्पसमृद्ध कोकण व्यवस्थित वेळ काढू बघावे आणि आपली भटकंती समृद्ध व्हावी या दीपावलीच्या शुभेच्छा!!

**व्यास दीपोत्सव २०२२**
**अरविंद नारायणराव सोनावणे**
**यांसकडून**
**दीपावलीच्या शुभेच्छा!**



# कोंकणातील मंदिरे काल, आज आणि उद्या

प्रवीण कदम

कोकणात आढळणाऱ्या मंदिरांमध्ये मुख्यत: ग्रामदेवतेचे मंदिर महत्वाचे असते. त्याव्यतिरिक्त काही खाजगी मंदिरे सुद्धा आहेत. आज नोकरी व्यवसायाची साधने बदलल्यामुळे कोंकणातील बहुसंख्य लोक शहराकडे स्थायिक झाले आहेत. पण आपल्या गावाकडील ग्रामदेवतेचे मंदिर हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. कोकणातील मंदिरांमध्ये साजरे होणारे सण उत्सव, जत्रा यांच्या प्रथा-रूढी आणि परंपरांमुळे समाजातील एकोपा आणि बांधिलकी टिकून राहण्यास मदत होते.

कोकणाला निसर्ग सौंदर्याचा अमूल्य वरदहस्त लाभलेला आहे. त्याचबरोबर प्राचीन ऐतिहासिक वारसाही प्राप्त झाला आहे. कोकणातील कातळशिल्पांच्या अभ्यासामुळे येथील प्राचीन संस्कृतीचे अस्तित्व पाषाणयुगापर्यंत जाण्याची शक्यता दिसून येते. महाराष्ट्राच्या पश्चिम सीमेवर असलेला सागरकिनारा संपूर्ण कोकण व्यापतो. येथील सागरी दळणवळणाच्या व व्यापाराच्या निमित्ताने जगातील अनेक देशांशी कोकणचा संबंध आला. इथे नांदलेल्या प्राचीन काळातील चालुक्य, मौर्य, सातवाहन, कलचुरी, शिलाहार, देवगिरीचे यादव यांच्यानंतर चौदाव्या शतकातील बहामनी, आदिलशाही, निजामशाही, मोगल, मराठेशाही, पोर्तुगीज, फ्रेंच, युरोपियन, डच, इत्यादीच्या राजवटींमध्ये बांधण्यात आलेली अनेक वारसास्थळे कोकणच्या देवभूमीत आपले अस्तित्व राखून आहेत. त्यामुळे कोकणातील प्राचीन ऐतिहासिक स्थळांच्या स्थापत्यामध्ये एतद्देशीय तसेच परदेशी स्थापत्यशैलीच्या प्रभावाचे अंश दिसून येतात.

कोकणामध्ये असलेल्या किल्ले, लेणी, गुंफा, मशीद, दर्गे, सिनेगॉग, चर्च इत्यादी वारशाच्या रूपातून त्या त्या काळातील, धर्माची आणि संस्कृतीची झलक आपण पाहू शकतो. ह्या सर्व वास्तूंपैकी कोकणातील मंदिरांची येथील स्थानिक मूळ संस्कृतीशी अविभाज्य नाळ जुळलेली आहे. कोकणातील मंदिरे, येथील वेगवेगळ्या राज्यकर्त्यांच्या काळात आघात झेलून, प्रसंगी विध्वंस होऊन पुन्हा नव्याने निर्माण होऊनही गतकाळातील सांस्कृतिक बदलांची साक्ष देतात. इतर वारसास्थळांपेक्षा मंदिरांचा संबंध थेट स्थानिकांच्या दैनंदिन धार्मिक परंपरेशी व आचरणाशी निगडित असल्याने ही मंदिरे समाज जीवनाशी एकरूप झालेली आहेत.

कोकणातील मंदिरामध्ये खूप वैविध्य आढळते तसेच इथली मंदिरे अनेक कारणांनी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ठाणे जिल्ह्यातील हजार वर्षांपूर्वीचे शिलाहारकालीन आम्रनाथ (अंबरनाथ), लोणाड, कौपिनेश्वर, रत्नागिरीतील संगमेश्वर येथील कर्णेश्वर, रायगड जिल्ह्यातील कनकेश्वर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर इत्यादी प्राचीन मंदिरे आहेत. तर कुलाबा किल्ल्यातील गणेश मंदिर, सिंधुदुर्ग किल्ल्यातील शिवाजी महाराजांचे शिव राजेश्वर मंदिर, विजयदुर्गाचे रामेश्वर मंदिर, चौलचे रामेश्वर मंदिर, पालीचे बल्लाळेश्वर मंदिर अशी मंदिरे मध्ययुगातील आठवणी सांगतात. ही मंदिरे आणि त्यांच्या परिसरातील दीपमाळा, त्रिपुरे, पुष्करणी, जलकुंड ह्या सगळ्यामध्ये प्रत्येकाची एकमेवाद्वितीय खासियत आहे. कोकणातील मंदिरांमध्ये असणारी काष्ठ शिल्पे तर अतिशय मनमोहक आणि कलाकुसरीचे लोलकच आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यामधील माणगाव येथील यक्षिणीची काष्ठशिल्पे देखणी आणि विस्मयकारक आहेत. रत्नागिरीतील गोलप गावातील सत्येश्वर मंदिर आणि गुहागरमधील नरवण गावातील व्याघ्राम्बरी मंदिरासाठी लाकूड कामात खिळा न वापरता निव्वळ खाचांच्या साहाय्याने खांब व छताची जोडणी केलेली आहे. कोकणातील मंदिरांमध्ये प्रामुख्याने आकर्षक कौलारू छत, गोलाकार घुमट अथवा कधी कधी दोहोंचा संगम असे प्रकार आहेत. विजयदुर्गच्या रामेश्वर मंदिराच्या भिंतीवर रामायणातील प्रसंग असलेली मराठा शैलीतील चित्रे आहेत. चिपळूणमधील शिरंबे गावी असलेले मल्लिकार्जुन मंदिराच्या चारही बाजूला पाण्याचा हौद असून मध्यभागी मंदिर आहे. अलिबागमधील कनकेश्वर मंदिराच्या कळसावरील माणसाच्या शिल्पाच्या पायातील दगडी वाळा आणि तेथे असलेली वसई मोहिमेतील पोर्तुगीज घंटा, आकेरीच्या रामेश्वर मंदिरातील दगडी पलंग, तिथले वर्तुळाकार कलाकुसरीचे काळ्या पाषाणातील खांब, अशा अनेक अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या गोष्टी कोकणात आहेत. कोकणातील मंदिरांची अशी असंख्य वैशिष्ट्ये आहेत.

कोकणात आढळणाऱ्या मंदिरांमध्ये मुख्यतः ग्रामदेवतेचे मंदिर महत्वाचे असते. त्याव्यतिरिक्त काही खाजगी मंदिरे सुद्धा आहेत. आज नोकरी व्यवसायाची साधने बदलल्यामुळे कोंकणातील बहुसंख्य लोक शहराकडे स्थायिक झाले आहेत. पण आपल्या गावाकडील ग्रामदेवतेचे मंदिर हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. कोकणातील मंदिरांमध्ये साजरे होणारे सण उत्सव, जत्रा यांच्या प्रथा-रूढी आणि परंपरांमुळे समाजातील एकोपा आणि बांधिलकी टिकून राहण्यास मदत होते. ह्या मंदिरांच्या देखभाल दुरुस्ती आणि जतन-संवर्धनाच्या बाबतीत मात्र शासनस्तरावर उदासीनता आहे. दुसऱ्या बाजूला सामान्य ग्रामस्थ आपल्या गावामधील मंदिरांच्या पुरातत्वीय मूल्याच्या बाबत कमालीचे अनभिज्ञ असतात. त्यामुळे शास्त्रशुद्ध पद्धतीने त्यांच्या करावयाच्या संवर्धनाबाबत अनास्था आहे. मंदिरांच्या इतिहासातील अनमोल दायित्वाची महती त्यांना

अपवादानेच ठाऊक असते. कोकणातील मंदिरे प्राचीन व मध्ययुगीन काळातील असल्यामुळे आजपर्यंत त्यांनी अनेक उन्हाळे पावसाळे झेलले आहेत. मंदिरांच्या बांधकामात वापरले गेलेले लाकूड, चुना, दगडांची कालपरत्वे झालेली झीज तसेच वातावरणाचे रासायनिक परिणाम या सर्वामुळे त्यांची योग्य वेळी शास्त्रीय पद्धतीने पुरातत्वीय संकेतानुसार दुरुस्ती - जतन करणे अपरिहार्य आहे. परंतु शासनाकडून सर्वच मंदिरे अधिसूचित झालेली नसल्याने त्यांची दुरुस्ती शासन किंवा सामान्य ग्रामस्थांकडून होत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे संगमेश्वर येथे असलेले कर्णेश्वर मंदिर आणि त्याच परिसरातील असंख्य पाषाणी मंदिरे होय. शासनाकडे तुटपुंजा निधी आणि अपुरे मनुष्यबळ ही यामागची महत्त्वाची कारणे आहेत.

जवळपास प्रत्येक गावामध्ये ग्रामदेवतेचे मंदिर असतेच. त्याव्यतिरिक्त इतरही मंदिरे असतात. अलिबागसारख्या ठिकाणी मध्ययुगीन काळात उभारलेली कित्येक सुंदर, मनोहारी स्थापत्य असणारी आणि वेगवेगळ्या देवतांची मंदिरे आहेत. पण सुयोग्य काळजी अभावी, जमिनीच्या व मालकीच्या वादांमुळे किंवा क्वचित निधीच्या अनुपलब्धतेमुळे त्यांची अपरिमित हानी होत आहे. हा सांस्कृतिक ठेवा पुढच्या पिढीला हस्तांतरित होण्यापूर्वीच नष्ट होण्याची चिन्हे दिसत आहेत. कोंकणातील मंदिरांचा हा ठेवा सुरक्षित कसा करावा हा मोठा यक्ष प्रश्न आहे. गावातील किंवा शहरातील नागरिक यांना आपले मंदिर दुरुस्त करावे, छान दिसावे असे वाटत असते.त्यांना त्याचा जीर्णोद्धार करणे हा पर्याय आवडतो. परंतु जीर्णोद्धार करताना ते मंदिर पूर्णपणे जमीनदोस्त करून त्याजागी आधुनिक तंत्रज्ञानाने काँक्रिट-विटांच्या साहाय्याने भव्य आणि देखणे (त्यांच्या दृष्टीने) उभारणे हाच पर्याय प्राधान्याने निवडला जातो. समाजाच्या अशा अनाठायी हव्यासापोटी बरीच मंदिरे केंव्हाच मातीमोल झाली आहेत. असे करताना मंदिरातील शिलालेख, तक्तपोशी, खांब, वीरगळ, सतीशिळा किंवा तत्सम महत्त्वाचे ऐतिहासिक अवशेष एकतर नष्ट झालेत किंवा त्यांची तस्करी झाली आहे. अनेकदा हे पुरातत्वीय घटक भिंतीत चिणले जातात, त्यांच्यावर गिलावा दिला जातो किंवा उलट सुलट जागा बदलून लावले जातात. अशाने त्यांचे संदर्भ तर बदलतातच पण संशोधकांना व इतिहास अभ्यासकांना विभ्रमित करतात. जुने मंदिर आहे तसेच आणि ज्या साहित्याचा वापर करून बांधले होते तशाच



साहित्याचा वापर करून मंदिराच्या मूळ स्वरूपाला अजिबात धक्का न लावता संवर्धन करू शकतो हे लोकांना पटवून दिले पाहिजे.

चुकीच्या पद्धतीने संवर्धन अथवा जीर्णोद्धार झाल्याची अनेक उदाहरणे सिंधुदुर्ग येथील प्रसिद्ध कुणकेश्वर मंदिर आपले मूळ स्वरूप हरवून नव्याने ग्रॅनाईट च्या आच्छादनाखाली अदृश्य झाले आहे. त्या मंदिराच्या ऐतिहासिक प्रवेश द्वाराजवळ असलेला नगारखाना नष्ट होऊन तिथे आर सी सी प्रवेशद्वार व कमान उभी राहिली आहे. अलिबागच्या भीमेश्वर देवळाला तिथल्या पायरीमध्ये चिणलेल्या शिलालेखामुळे विशेष महत्व आहे. तो शिलालेख चांगल्या ठिकाणी स्थापण्याऐवजी आहे तिथेच ठेवून दिल्याने कुणाच्या दृष्टीसही पडत नाही. ह्या मंदिराचेही नुकतेच नूतनीकरण झाले. त्यावेळी मंदिराच्या भिंतींमध्ये असलेल्या देवळ्या नव्या गिलाव्याखाली विटांनी बंद केल्या गेल्या आहेत. कोंकणातील मंदिरांना ग्लेझ्ड फरशा बसवून त्यांचे विद्रुपीकरण सर्रास होत आहे. जुन्या काळात उभारलेली चुना आणि रेतीच्या मिश्रणाद्वारे केलेले बांधकाम आणि गिलावा ह्यावर आधुनिक सिमेंट सारख्या साहित्याने संवर्धन केल्यास काही काळाने जुन्या चुन्याच्या मिश्रणासह बाहेरील सिमेंट निखळते आणि अपरिमित नुकसान होते. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे आवश्यक आहे. लोकांना जुन्या स्थापत्याचे महत्व उमगले पाहिजे.

कोंकणात देवस्थानांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर संपूर्ण महाराष्ट्रातून तसेच परदेशी नागरिकांचे धार्मिक पर्यटन होत असते. कोंकणच्या विकासाला

आणि स्वयंपूर्णतेला चालना देणारी हि बाब आहे. परंतु प्राचीन मंदिरांचा मूळ जुना बाज उरला नाही तर ह्या पर्यटनातील महत्वाचे आकर्षण लोप पावेल आणि हे पर्यटन फक्त स्थानिक पातळीवर राहील ही भीती आहे. म्हणून ह्या सर्वाचा विचार करून कोंकणातील लोकांनी मंदिराच्या जीर्णोद्धाराची दिशा बदलायला हवी. ह्याबाबत स्थानिकांच्या अडचणी समजून घेत असताना, जुनी बांधकामे जीर्ण झाली आहेत, कारागीर मिळत नाहीत, त्या काळातील बांधकाम साहित्य उपलब्ध होत नाही, त्यामुळे अशी कामे खर्चिक होतात, योग्य मार्गदर्शन मिळत नाही. अशी अनेक कारणे ह्यानिमित्ताने समोर आली. पण हे खरे नाही. ह्यावर अनेक उपाय किंवा तोडगे काढता येतील. आजही जुन्या बांधकामांचे पुरातत्वीय शास्त्रानुसार दुरुस्ती करणारे कित्येक वास्तुशास्त्रज्ञ मुंबईत आणि पुण्यात कार्यरत आहेत. दगडी बांधकाम करणारे कारागीर सातारा, कर्नाटक, राजस्थान, केरळ राज्यातून येऊन इथे कामे करतात. हल्ली जुने वाडे दुरुस्त करून त्यांच्या माध्यमातून लग्न, वाढदिवस, कार्यशाळा, इत्यादी उपक्रमांसाठी भाडे तत्वावर देऊन उत्पन्न घेतले जाते. ते वाडे सुद्धा उत्तम प्रकारे दुरुस्त्या करून जतन होताना दिसतात. कोंकणातील मंदिरांचा जीर्णोद्धार करताना घाई न करता योग्य आढावा घेतल्यास वाजवी दरात उत्कृष्ट कारागीर, साहित्य तसेच मार्गदर्शन मिळू शकते. त्यासाठी इच्छा आणि समाजमन तयार व्हायला हवे.

अगदी नुकतंच पुण्यातील भाऊ रंगारी यांचा इसवी सन १८८२ मध्ये बांधलेला वाडा वास्तुशास्त्रज्ञ श्रीमती अर्चना देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणखी १०० वर्षे टिकेल अशा पद्धतीने दुरुस्त झाला आहे. आता ही वास्तु अभ्यासकांना आणि इतिहास प्रेमी पर्यटकांना पाहण्यासाठी उपलब्ध झाली आहे. पुण्यातील अठराव्या शतकातील विठ्ठलवाडी विठ्ठल मंदिर सुद्धा अशाच पद्धतीने दुरुस्त केले आहे. त्यामुळे ह्या क्षेत्रातील तज्ञ, कारागीर आणि बांधकाम साहित्य आजही उपलब्ध आहे. ह्यातील आर्थिक बाजूचा विचार केल्यास आर. सी. सी. च्या आधुनिक पद्धतीने उभारण्यात येणाऱ्या मंदिरांचा खर्च हा जुन्या पद्धतीच्या साहित्याने करावयाच्या खर्चा इतकाच असतो. पण आपण नीट अभ्यास न केल्यामुळे कोंकणातील लोकांना ते लक्षात येत नाही. शिवाय विशिष्ट तंत्राने दुरुस्त केलेली वास्तूसुद्धा भविष्यातील अनेक पिढ्या शाबूत राहण्यायोग्य होते. तिचे प्राचीनत्व आणि ऐतिहासिक सौंदर्य सगळ्यांना भुरळ पाडू शकते. हे लक्षात घ्यायला हवे. अनेक समाजसेवी संस्था, उद्योग त्यांच्या सी. एस. आर. निधीतून अशा कामाला आर्थिक पाठबळ देऊ शकतात. त्याची चाचपणी केली पाहिजे.

कोंकणातील मंदिरे ह्या देवभूमीच्या अलौकिक परंपरागत संस्कृतीचा आरसा आहे. त्यांच्या माध्यमातून कोकणच्या धार्मिक रूढी परंपरा पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होत आल्या आहेत. त्यांचे मूळ प्राचीन व तत्कालीन स्वरूप हा त्यांचा आत्मा आहे. म्हणून मंदिरांचे सुयोग्य शास्त्रीय पद्धतीने जतन व्हायला हवे. इथली काष्ठशिल्पे, भित्ती चित्रे, स्थापत्यातील विस्मयकारक प्रयोग, मंदिरांशी निगडित ऐतिहासिक घटना हे सारे अद्वितीय आहे. ही मंदिरे जुनी आणि काहीशी जीर्ण झालेली असल्यामुळे त्यांना योग्य प्रक्रियेच्या साहाय्याने सुदृढ केले व जपले पाहिजे. परंतु त्यासाठी सरसकट आधुनिक प्रकारच्या सिमेंट आणि स्टील चा वापर करून जीर्णोद्धार करण्याची जी अहमहमिका सुरु आहे त्यात हा वारसा दुर्मिळ होऊन एके दिवशी अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहे. याबाबत कोकणातील ग्रामस्थ आणि स्थानिक प्रशासन यांनी डोळसपणे जीर्णो द्धाराचे काम करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी लागणारे साहित्य, कारागीर, तज्ज्ञ इत्यादी आजही उपलब्ध आहे. जुन्या तत्कालीन साहित्याचा वापर करून आणि जे आहे त्याचे योग्य संवर्धन करुवून घेणे यासाठी लागणारा आर्थिक निधी, आधुनिक तंत्राने अपेक्षित खर्चाइतकाच समसमान असतो. यावर साकल्याने गंभीरपणे विचार व कृती होणे आज काळाची गरज आहे. अन्यथा कोकणवासीयांच्या मूळ संस्कृतीची ही तीर्थक्षेत्रे आधुनिक बांधकामांच्या गर्दीत धुळीस मिळतील. कोकणचे देवभूमी म्हणून असलेले बिरुद लयास जाईल. मंदिरांच्या आधुनिक जीर्णोद्धाराचे फॅड वेळीच सावध होऊन सोडायला हवे. कॉंक्रिट आणि टाईल्स च्या वापरातून वाढीस लागलेल्या नव्या जीर्णोद्धार संस्कृतीला आपण हद्दपार करायला हवे. म्हणून आपण आपापल्या गावातील मंदिरांचे मूळ स्वरूपातील स्थापत्य राखण्यासाठी आपापल्या परीने जनजागृती करण्याचा संकल्प करूया.



# कोकणातील राजकीय परंपरा

**संतोष वायंगणकर**

अखंड कोकणात जसे काँग्रेसी विचारांचे प्राबल्य होते तसे समाजवादी विचारांचा भारी पगडा होता. कार्यकर्ते आणि राजकारणही विचार, निष्ठा, सामाजिक बांधिलकी यावर आधारलेले होते. परंतु त्याकाळच्या शिवसेनेतही रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गातीलच कार्यकर्ते होते. शिवसेनेतही मुंबईचा पहिला महापौर होण्याच भाग्य प्रि. वामनराव महाडिकांना लाभलं होतं. तत्पूर्वी काँग्रेसच्या स. का. पाटील या मालवणी सूपूत्राची मुंबापुरीवर हुकमत होती. जवाहरलाल नेहरू यांचे स. का. पाटील यांच्याशी फार जवळीक होती.

कोकण म्हणजे परमेश्वराला पहाटेच्यावेळी पडलेलं सुंदर स्वप्न असं वर्णन साहित्यिक करतात. कोकणातील निसर्ग सौंदर्य हे कुणालाही हेवा वाटणारे, भुरळ घालणारे असेच आहे. इथला समुद्र, स्वच्छ समुद्र किनारे, माडा-पोफळीच्या बागा, आंबा, फणसांच्या बागा हे सारच अवर्णनिय असच आहे. पूर्वी कोकण म्हटलं की ठाणे, रायगड, रत्नागिरी, मुंबई असा कोकण म्हटला जायचा. नंतर त्यात थोडा बदल आणि वाढही झाली. पूर्वीच्या अखंड रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन सिंधुदुर्ग जिल्हा निर्माण करण्यात आला. तर ठाणे जिल्ह्याच विभाजन करून पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. आजही आणि पूर्वीही मुंबई शहर हे कोकणचाच भाग मानण्यात आला होता. आणि आजही आहे कोकणातील रायगड, पालघर, ठाणे हे जिल्हे मुंबईच्या शेजारीच आहेत. परंतु रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे जिल्हे मात्र ५०० कि.मी. अंतरावर आहेत. परंतु कोकणवासियांच मात्र मुंबईशी एक वेगळच भावनिक नातं जोडलं गेलं आहे. त्यामागची असंख्य कारण आहेत. यातल प्रमुख म्हणजे नोकरी व्यवसाय निर्माण करणार शहर असूनही आपलं शहर असं एक जडलेलं नातं आहे. म्हणूनच नोकरी व्यवसायानिमित्ताने मुंबईकडे जाणाऱ्यांची संख्या पूर्वी फारमोठी होती. कोकणात चाळीसवर्षापूर्वी शिक्षणाच्या सोयी सुविधांचा कमालीचा अभाव होता. तालुक्यात दोन-चार माध्यमिक शाळा होत्या. दोन-तीन तालुक्यात एखाद महाविद्यालय असायचं यामुळे जेमतेम दहावीपर्यंतच काय ते शिक्षण! पुढील शिक्षण घेण्यासाठीची आर्थिक स्थिती नसायची. त्यामुळे पुढे शिकण्याची इच्छा असूनही अनेकांना शिक्षणच थांबवावे लागले. रोजगाराच्या संधी शोधत मुंबईकडे जावं लागलं. शिक्षक, वकील, डॉक्टर, इंजिनिअर अशा विविध क्षेत्रात पुढील शिक्षण घेण्याची कोणतीही सुविधा कोकणात नव्हती. यामुळेच वसई, विरार, ठाणे, मुंबई, रायगड याभागात अखंड कोकणातील तरूण विस्तारला आहे.

राजकीयदृष्ट्या कोकणाचा विचार करताना काँग्रेसपक्ष, प्रजासमाजवादी, जनसंघ, शेका पक्ष या विचारधारेशी कोकणवासिय जोडले गेलेले होते. या अखंड कोकणात जसे काँग्रेसी विचारांचे प्राबल्य होते तसे समाजवादी विचारांचा भारी पगडा होता. कार्यकर्ते आणि राजकारणही विचार, निष्ठा, सामाजिक बांधिलकी यावर आधारलेले होते. मुंबईच्या राजकारणातही कै. मृणालताई गोरे, प्रि. वामनराव महाडिक, स. का. पाटील अशा नावाचा दबदबा होता. शिवसेनेचा वावर हा तेव्हा मुंबईबाहेर नव्हता. परंतु त्याकाळच्या शिवसेनेतही रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गातीलच कार्यकर्ते होते. शिवसेनेतही मुंबईचा पहिला महापौर होण्याचं भाग्य वामनराव महाडिकांना लाभलं होतं. तत्पूर्वी काँग्रेसच्या स. का. पाटील या मालवणी सूपुत्राची मुंबापुरीवर हुकमत होती. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे स. का.पाटील यांच्याशी फार जवळीक होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर मुंबईच राजकारण बदलत गेले. १९६६ साली स्थापन झालेल्या शिवसेनेला सत्तेपर्यंत पोहोचायला तब्बल २९ वर्षे लागली. मुंबई महानगरपालिकेत तत्पूर्वी शिवसेना सत्तेवर आलेली परंतु कोकणातही १९९० सालीच कोकणात शिवसेनेचे आमदार निवडून आले. तत्पूर्वी कोकणात रायगडमध्ये पाटील बंधू आणि रत्नागिरी आजचा सिंधुदुर्ग समाजवादी विचारांच्या बॅ. नाथ पै यांच्या विचारांच, भाषणाच गारूड समाजमनावर होते. कोकणात समाजवादी विचार फार तळागळापर्यंत रूजलेला होता. १९७७ च्या आणिबाणीनंतर तर तो अधिकार बहराला आला. त्यावेळच्या निवडणुकांमध्ये कोकण प्रांतात जनता पक्षाचे आमदार निवडुन आले. जयप्रकाश नारायण यांच्या विचारांनी अखंड भारत देश भारावुन गेला होता. यामुळे जनतापक्षाचे त्याकाळी आमदार निवडून आले. यातले अनेक चेहरे पुढच्या नंतरच्या काळात कुठे दिसलेही नाहीत. या काँग्रेस, समाजवादी वातावरणातही कुसूमताई अभ्यंकर या जनसंघाच्या आमदार म्हणून रत्नागिरीतून निवडून यायच्या त्याकाळच्या राजकारणाची आणि कोकणच्या जनतेचीही एक गंमत होती. लोकसभेत समाजवादी विचारांचे लोकप्रतिनिधी निवडून जायचे आणि विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसी लोकप्रतिनिधी म्हणून निवडून जायचे. मात्र, १९७७ च्या आणिबाणी नंतरच्या निवडणुकांमध्ये देशभरात काँग्रेसची पडझड झालेली असताना मात्र देवगड पंचायत समिती काँग्रेसने आपल्याकडे राखली होती. शिवसेना मुंबई, ठाणे या महानगरांमध्ये स्थिरावली होती. या दोन्ही शहरांच्या महानगरपालिका शिवसेनेकडे आल्या होत्या. १९८० नंतर कोकणातही काँग्रेस मजबुतीने उभी होती. तोपर्यंत समाजवादी विचारांची जनमाणसावरील पकड हळूहळू कमी होत गेली होती. मुंबईतही मोहन रावले खासदार म्हणून


लालबाग-परळ भागातून सतत लोकसभेत निवडून येत राहिले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची पहिली संधी बॅ. ए. आर. अंतुले यांच्या रूपाने कोकणाला मिळाली. तत्पूर्वी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात एखाद राज्यमंत्रीपद कोकणाच्या वाट्याला यायचे. बॅ. ए. आर. अंतुले यांच्यापूर्वी हंगामी मुख्यमंत्री म्हणून बाळासाहेब सावंत यांना संधी मिळाली होती. दळणवळणाच्या बाबतीत बॅ. ए. आर. अंतुले यांनी महत्त्वाचे निर्णय घेतले, तर बाळासाहेब सावंत यांनी कोकणात फलोद्यानातून विकासाची संकल्पना मांडली. त्यानंतर १९९७ मध्ये मुख्यमंत्री म्हणून नारायण राणे यांना संधी मिळाली. आठ महिन्यांचाच कालावधी त्यांना मिळाला. याकाळात रस्ते, पाणी, वीज आणि पर्यटन विकास यावर भर देऊन काम केलं गेलं. मधल्या कालावधीत शिवसेनेचे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोकणातीलच आहेत. १९९५ कोकणचे राजकारण बदलत गेले. काँग्रेस तर आजच्या घडीला नाहीच आहे. काँग्रेस फुटून तयार झालेल्या राष्ट्रवादीचा रायगडमध्ये थोडाफार प्रभाव दिसतो. परंतु उर्वरित भागात अस्तित्वापुरतेच अशी स्थिती आहे. भारतीय जनता पक्षाचा पूर्वी कोकणात प्रभाव होता. आताच्या बदलत्या राजकारणात तो अधिक वाढत गेला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील झालेले बदलाचे परिणामही कोकणातही आहेतच. कोकणातील औद्योगिकीकरण हे खरं तर ठाणे, रायगड पुरतेच मर्यादित राहिले. अन्यत्र बागायती, शेतीवर भर देत उदरनिर्वाह केला जातो. कोकणात उद्योग उभारणीही झाली पाहिजे. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि जनतेचा सकारात्मक प्रतिसाद यावरच कोकणातील समृद्धी आणि स्वयंसिद्धता अवलंबून आहे.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**शोभना अरविंद सोनावणे**
**यांसकडून**
**दीपावलीच्या शुभेच्छा!**





**गोष्टींचा मळा**
विशाल कुलकर्णी

आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटना गोष्टी रूपाने शब्दबद्ध करीत लेखक विशाल कुलकर्णी यांनी बाल विश्वाला अनोखी मेजवानी दिली आहे हे पुस्तक आपल्यासाठी गोष्टी रूप सहल होईल याची खात्री आहे




**रोज नवी गोष्ट होवी**
सुमन नवलकर

रोज रात्री गोष्ट ऐकत ऐकत झोपण्याचे सुख काही औरच असते अशा गोष्टी सांगताना पालकांची मोठी अडचण होते हीच अडचण समजून घेत लेखिका डॉक्टर सुमन नवलकर यांनी मुलांसाठीच्या खास पन्नास धमाल गोष्टी मुलांना भेट दिल्या आहेत...




**गोष्टीरूप गांधी**
रामदास खरे

हिंदुस्थानालाच नव्हे तर अवघ्या विश्वाला सत्य अहिंसा आणि शांतीचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जीवन प्रवासातल्या घटनांचा शोध व बोध घेणारे पुस्तक म्हणजेच गोष्टीरूप गांधी....

पोस्टल सेवा मोफत



# कोकणातील पारंपरिक पद्धतीने बांधलेली घरे

पर्णवी बांगर


कोकणात घरांच्या रचनेमागे महत्त्वाचे कारण म्हणजे तिथले वातावरण, जेव्हढे ऊन तेवढाच पाऊस. ओल्या दमट आणि गरम हवामानामुळे घरांमध्ये नैसर्गिक गोष्टींचा पारंपारिक पद्धतीने वापर केला जातो. पावसामुळे घरांमध्ये महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण बदल म्हणजे उतरत्या कौलांची घरे. या मातीच्या कौलांमुळे धुवांधार पावसाच्या पाण्यापासून संरक्षण होते आणि कडक उन्हाळ्यात देखील घरातील हवा थंड राहते.

अरबी समुद्राला लागून असलेला सह्याद्री पर्वत आणि पर्वत रांगांमधील सुंदर घाट आणि निळा समुद्र ही कोकणाची ओळख. तिथले किल्ले-गड, प्राचीन मंदिरे, जुनी पिढीजात घरे, हिरवीगार शेती, नारळी-पोफळीच्या बागा ही निसर्गशोभा काही औरच, सृष्टिदेवीने तर या भूमीवर अनुपम सौंदर्याची, अनंत हस्ते उधळण केली आहे. कोकण म्हणजे महाराष्ट्राचे नंदनवन. येथील डोंगर दऱ्यांत निसर्गाने आपले बहुविध सौंदर्य भरभरून ओतले आहे. सर्वात जास्त पावसाचे प्रमाण असलेला भूभाग म्हणूनही कोकण ओळखले जाते. या भागातील तापमान दमट तसेच समशीतोष्ण असते.

कोकणात पूर्वेकडून पश्चिमेकडे येताना किल्ल्यांपासून वाड्यांपर्यंत संरचनेत खास वैशिष्ट्य पहावयास मिळतात. कोकणात घरांच्या रचनेमागे महत्त्वाचे कारण म्हणजे तिथले वातावरण, जेव्हढे ऊन तेवढाच पाऊस. ओल्या दमट आणि गरम हवामानामुळे घरांमध्ये नैसर्गिक गोष्टींचा पारंपारिक पद्धतीने वापर केला जातो. पावसामुळे घरांमध्ये महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण बदल म्हणजे उतरत्या कौलांची घरे. या मातीच्या कौलांमुळे धुवांधार पावसाच्या पाण्यापासून संरक्षण होते आणि कडक उन्हाळ्यात देखील घरातील हवा थंड राहते. जिथे जे पिकते ते खावे आणि जे सहज मिळते ते वापरावे, ह्या विचारांमुळे आपल्या पूर्वजांनी चौथरा व भिंती म्हणून ठाणे, रायगड जिल्ह्यात मिळणारा काळा दगड आणि रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात मिळणारा चिरा मातीचा लाल रंगाचा जांभा दगड वापरला. मातीची घरे बांधली. कोकणवासीय स्थानिक लाकडांच्या फळ्यांवर माती लिंपतात, जमिनी व भिंती शेणाने सारवतात.

घराच्या रचनेप्रमाणे आपल्याला एक प्रकारची घरे कोकणात पहावयास मिळतात. त्या रचनेनुसार, बाहेरूनच आकर्षित करणारा पुढचा भाग म्हणजे घराचे अंगण. या अंगणात असते सुंदरसे, नक्षीदार, रंगीबेरंगी तुळशी वृंदावन. या तुळशी वृंदावनात, तिन्ही सांजेला घरातली लक्ष्मी निरांजन व फुले वाहते, हे दृश्य प्रत्येकाच्या दारोदारी दिसते. अंगण नेहमी शेणाने सारवलेले असते, त्यावर सुंदरशी रांगोळी, घराच्या दरवाजांना भाताचे लोंब्याचे तोरण, हे घर सजवण्याचे साधन. अंगणात चार किंवा सहा मेढी लावून करतात तो मांडव, म्हणजे माटव. शिवणीचे लाकूड त्यावर कोकणात मोठ्या प्रमाणात आढळणारा बांबू, तो सरळ वा आडवा टाकतात. सुगीच्या काळ आला की, भाताच्या पेंढ्या मांडवावर टाकतात आणि माटव तयार होतो. अंगणाचे महत्त्व म्हणजे लग्न, मुंज व तत्सम समारंभ ह्या माटवाखाली होत असतात. अंगणातून घरात जाताना २-३ पायऱ्या चढून लागतो तो व्हरांडा किंवा ओटी. व्हरांडा हा एक-दोन फूट उंच असतो. काही घरांमध्ये गरजेनुसार इथे गाय-गुरं ठेवण्याची जागा असते. तर काही घरांमध्ये सुंदर मोठे लाकडाचे झोपाळे असतात. बसायला सिमेंटचे ओटे असतात. पुरुष मंडळी या ओट्यांवर बसून गप्पा मारतात.

बहुतेक घरांमध्ये, माजघरात जाण्याच्या दरवाजावर वा दोन्ही बाजूंच्या भिंतीवर दहा-बारा देवांचे नि मागच्या पिढ्यांचे फोटो टांगलेले आढळतात. घरात जाण्याची ही वाट असते. याचा वापर म्हणजे उन्हाळी वातावरणात, बसायच्या खोलीत हवा येण्यासाठी अधिक ती थंड व्हावी



म्हणून त्यानुसार त्याची जागा अशाप्रकारे असते. तसेच पावसाळ्यात घरातील आतली खोली पावसापासून बचावते. व्हरांड्यात भिंत ही एका बाजूला आणि जिथे पायऱ्या त्या बाजूला लाकडी खांब असतात. या रचनेमुळे हवा ही थंड होऊन आत येते. हवा थंड करण्याचे काम अंगणामध्ये सारवलेले शेणही करते. सारवलेल्या शेणामुळे सूर्याची येणारी उष्णता ही शोषून घेतली जाते व हवा थंड वाहू लागते. ज्याला आपण वायुविजन म्हणतो. घरामध्ये मध्यभागी असलेले असे सगळ्यात महत्त्वाचे व जास्त वापरले जाणारे असे माजघर. ही घरातली सर्वात मोठी खोली. इथून एका बाजूला, माळ्यावर जायला लाकडी जिना किंवा शिडी असते, बसायची जागा असते मात्र माजघरात जाण्याचा दरवाजा व त्याच्या मागे पडवीत जाण्याचे दार हे एका रांगेत असतात. या माजघरात एक किंवा दोन भिंतीतील कपाटे (याला फडताळे असे म्हणतात). भिंतीत दोन-तीन ठिकाणी छोट्या त्रिकोनी वा उभट पोट-कपाटं असतात, त्यात कंदील, समया ठेवत असत. याला आपण घरातील येण्या-जाण्याचा मुख्य रेखा म्हणू शकतो. घरातील बाकी खोलींची ठेवण ही या रेघेवर अवलंबून असते. गरजेनुसार फरक केलेलेही असतात. तरी या रेघेमुळे ही सर्व दारे एक प्रकारची वाटतात. यानुसार पाहिल्यास माजघरापुढे स्वयंपाकघर असते किंवा पडवी असते. या स्वयंपाक घरात चूल असते बाजूला मोरी देखील आढळते. एक भली मोठी लाकडाची खिडकी असते. त्या खिडकीतून चुलीचा धूर बाहेर पडत असतो. पडवी मध्ये धान्य साठवणूक करण्याची जागा असते. ती माजघराच्या जवळ असल्याने पावसाळ्यात सुरक्षित रहाते. माळ्यावरती सुद्धा सामान ठेवण्याची-अडगळीची जागा असते. काही वेळा याचा उपयोग गरजेनुसार खोली सारखा केला जातो. पडवी मधून स्वयंपाकघर जवळ असते. यामुळे घरात दिवसभर एकटी असणारी स्त्री काहीही काम करत असताना स्वयंपाक घरात किंवा पडवीमध्ये तिला घराच्या अंगणापर्यंत सर्व काही दिसत असतं. यामुळे घरात कोण आलं-गेलं हे तिला बसल्या बसल्या समजते. स्वयंपाकघरामागे वाणशी हे जेवणाचे सामान, भांडी-कुंडी, पाटा-वरवंटा, जातं, सुप-रोवळी आणि लाकूडफाटा ठेवण्यासाठी जागा असते. काही वेळा वाणसीत पायऱ्या उतरून जावे लागते. त्या पुढे परसदार असते. या परसदारात आंघोळ करायची सोय असते. या मोरीत बसायला दगडी पाट असतो. या आंघोळीच्या पाण्यावर वाढणारी अळू, केळी, फुलझाडे, आढळतातच.

झाडे लावणे, सारवणे व परसदार ह्याची जागा घराच्या मधल्या रेषेमध्ये येणारे. हे सगळं पाहुण्यांना फिरता येऊ शकते. पण रहाण्याच्या खोल्या ह्या माजघराच्या आजूबाजूला बनविल्या जातात. त्यामुळे येण्या-जाण्याच्या वाटेत कोणत्याही खोल्या येत नाहीत. तसेच माजघराच्या डाव्या बाजूला गणपतीची पूजा खोली किंवा देवघर असते. खोलीची रचना ही चौकोनी किंवा आयताकृती असते. हे घराच्या मधल्या रेषेला धरून ग्रीडमध्ये बनविलेले असते. आयताकृती खोलीत येण्या-जाण्याची वाट सोडून चौकोन राहतो, जो वापरण्यासाठी फार योग्य आकार मानला जातो. अशा प्रकारची रचना फक्त कोकणातच पहायला मिळते.

अशी अनेक घरे सोबत आली की त्याची वाडी बनते, आणि अनेक वाड्या मिळून एक गांव होते. दोन घरांमध्ये जी जागा सोडली जाते, त्यात कुठे खेळायची जागा, कुठे मंदिर तर कुठे झाडाखाली गप्पा मारायची जागा असते. क्लस्टर तेव्हा बनतो, जेव्हा दोन घरातील परस हा जवळ असल्यामुळे तिथे बायकांची गप्पागोष्टी व देवाण-घेवाण होते. यामुळे घर एकमेकांना बांधली जातात. काही-काही घरांमध्ये खूपच अंतर असते. काहींची शेती घराजवळच असते, तर काहींची शेती लांबवर असते. तरी गावात एकजूट पहायला मिळते. यातील मोठा फरक जो आपल्याला शहरात फ्लॅट संस्कृतीत बघायला मिळतो. म्हणजे गावात असलेली माणूसकी या घरांमुळे की वागणुकीमुळे ते सांगता येत नाही. कोकणातली ही जुनी घरे, जुने वाडे ही आपली जुनी आठवण, आजोबांच्या गोष्टी आणि आजीच्या गप्पा या नवीन करणे योग्य नाही तर त्या जशा आहेत तशा सांभाळून ठेवणे गरजेचे आहे. म्हणजे कोकणात जाणाऱ्या प्रत्येक माणसाला त्याचे गाव जरी कोकणातनसले तरी त्याला माहेरी आल्यासारखे जाणवता आले पाहीजे.घरचे जेवण, ताजी मच्छी व सुंदर जुने घर हा अनुभव घेता आला पाहीजे.

समुद्रकाठी आपलं एखादं घर असावं अशी इच्छा मनामध्ये निर्माण होते. पण निळ्याशार समुद्राचे सुख मुंबईत वा अन्य शहरात कुठे? ही बाब काही अंशी खरी असली तरी, कोकणच्या भूमीत हे स्वप्न निश्चितपणे आकारास येऊ शकते. त्यामुळे कोकणात आपले एक घर बांधायचा विचार सगळ्यांचा मनात असतो व याच कारणांनी पर्यटक कोकणाचा आस्वाद घ्यायला या कोकणात ओढले जातात. शांत व निळीशार समुद्राची किनारपट्टी, भरपूर ताजे मासे व सुंदर बनावट असलेल्या घरी दोन घास खाता आल्याची मजा काही औरच असते.

## रसिक वाचक, साहित्यिक मान्यता लाभलेला खास अंक म्हणजे आपला चंद्रकांत दिवाळी विशेषांक


**या वर्षीचे खास आकर्षण**
**चार संपूर्ण कादंबऱ्या -**
उमेश कदम - **हारुकी योशिदा**
प्रा. डॉ. अरुण हेबळेकर - **अग्निदूत**
दिवाकर नेमाडे - **चर्च टॉवरची घंटी**
( पंकज भोसलेंनी संपादित केलेली अतिदुर्मिळ कादंबरी )
मूळ कादंबरी - धनगोपाल मुखर्जी
**सिक्रेट लिसनर्स ऑफ ईस्ट**
मराठी अनुवाद - मुकुंद वझे

**विशेष लेख -**
प्रा. मंगेश राजाध्यक्ष -
**रंगरेषेच्या दुनियेतील एक सुरेल कलावंत - रवी परांजपे**
यशोधरा काटकर -
**मिस्टरी ऑफ मधुमती**
गिरीश देसाई -
**सायकलवरी नेदरलंडची वारी**
शैलेंद्र शिर्के - **ते ३०० मैल**
मनोज आचार्य -
**अनुराधा आणि अंदाज ए बयाँ**

**चंद्रकांत दिवाळी २०२२**
**कादंबऱ्यांचे मुक्तपीठ मूल्य रुपये ३५०/-**
मागील वर्षी दिवाळी अंक प्रसिद्ध झाला. सर्वांनी या अंकाचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. त्याबद्दल सर्व रसिक वाचकांचे आणि वाचकांपर्यंत दिवाळी अंक पोचवणाऱ्या सर्व विक्रेत्यांचे हार्दिक अभिनंदन !

कादंबऱ्यांच्या जोडीने खास विशेष लेखांची रेलचेल असणारा हा अंक आहे. खास लिहून घेतलेल्या चौकटी ही चंद्रकांतची खासियत आहे. मुखपृष्ठावरील **दिवंगत ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे** यांनी रेखाटलेले आकर्षक **व्यक्तिचित्र** आणि अंकातील **चित्रांकन सजावटींनी** सजलेला **चंद्रकांत दिवाळी अंक** आता रसिक वाचकांच्या सेवेला हजर झाला आहे.

सर्व वाचक, लेखक, चित्रकार, जाहिरातदार आणि हितचिंतकांना ही **दिवाळी आणि नूतन वर्ष सुखसमृद्धीचे, भरभराटीचे जावो यासाठी शुभेच्छा !**




**चंद्रकांत दिवाळी २०२२**
**कादंबऱ्यांचे मुक्तपीठ आणि लेख**

**आपली अमूल्य प्रत आजच राखून ठेवा.**

**व्यवस्थापन -**
धनंजय कार्यालय, महाराजा बिल्डिंग, पहिला मजला, गिरगाव चर्चसमोर, गिरगाव, मुंबई - ४००००४
दूरध्वनी - २३८२३५५८ भ्रमणध्वनी - ९८२००१९७०३
इ मेल - neelimakulkarni19@gmail.com

**मुखपृष्ठ सजावट, अंतर्गत चित्रांकन सजावट** - अनीश दाते
**विशेष सहाय्य** - अतुल जोशी, देवयानी कानसे, अजय कदम, विजय बारगुडे



# दळणवळण

## विभाग ५




# कोकण रेल्वे :
## असामान्य आणि अफलातून इंजिनिअरिंग

**भारत नगरकर**

कोकण रेल्वे हा प्रोजेक्ट भारतासाठी स्वातंत्र्यानंतरचा सर्वात मोठा आणि अवघड असा इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट होता ह्यात संशय नाही. हा प्रोजेक्ट अनेक खडतर परिश्रमानंतर यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. आज कोकण रेल्वे रोज तीन राज्यातून ७४१ कि.मी.चा प्रवास करते. हा रेल्वेमार्ग महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक ह्या तीन राज्यांतून जातो. कोकण रेल्वेची हद्द मुंबई जवळील रोहा येथून सुरू होते ते थोकूर ह्या मंगलोर जवळील दक्षिण कर्नाटकमधील रेल्वे स्टेशनला संपते.

पंचवीस वर्षांपू उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये, शिमग्याला, गौरी-गणपतीला-सणावाराला किंवा लग्नकार्याला कोकणातल्या आपल्या घरी, जायचं असेल तर आधी बाय रोड, 'लाल परी' एसटीशिवाय पर्याय नव्हता. बायरोडने जायचे म्हटलं तर रस्ता कठीण, खडकाळ, लाल मातीचा आणि वेळसुध्दा खूप लागायचा. कपडे लाल, चेहरा-केस पण लाल, एसटी बस लाल आणि खिडक्या, आतल्या सीटस् लाले-लाल, लाल म्हणजे हे आताच्या पिढीला कळणार नाही. कोकणातली लाल माती. त्या लाल मातीचा धुरळा उडवत एसटी जायची, त्यामुळे लाल मातीची पावडर-धूळ उडून रंगपंचमी होई. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येक घरातील एक तरी व्यक्ती मुंबईत वास्तव्य करून आहे. ग्रामीण भागातील काही गावे तर संपूर्ण मुंबईला स्थलांतरित झाल्याची वस्तुस्थिती आहे. कोकण रेल्वे येण्यापूर्वी मुंबईतील चाकरमान्यांना गावी पोहोचण्यासाठी खडतर प्रवास करावा लागत होता. पंधरा ते वीस तासांचा प्रवास करावा लागत होता. अशावेळी कोकणातल्या सर्वांना व कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना असे वाटायचे की सगळीकडे मेली रेल्वे आली, आपल्या कोकणाक कधी यायची ही आगिनगाडी? पण गेल्या तीस वर्षात ही परिस्थिती आमूलाग्र बदललीय. कोकण रेल्वे सुरू झाल्यापासून दोन-तीन वर्षातून एकदाच गावी जाणारा चाकरमानी आता आठवडा-महिन्यालाही सहजरित्या गावी येऊ लागलाय.

१९९३ सालापर्यंत मुंबई ते मेंगलोर, कोकण, गोवा, कर्नाटक, केरळ तसेच दक्षिण भारतातील किनाऱ्यावरच्या गावांसाठी डायरेक्ट रेल्वेची सोय नव्हती. आम्ही भावंड आईबाबांबरोबर (आम्ही पूर्वी गिरगावात-दक्षिण मुंबई) पनवेलच्या मावशीकडे ६६-८० च्या दशकात राहायला जायचो, तेव्हा पनवेलला जायचे तर गिरगावातून बसने व्हीटी स्टेशनपर्यंत (आत्ताचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) नंतर ट्रेनने मुंब्रा स्टेशन, बाहेर पडल्यावर एसटीने पनवेलला, पुढे टांग्यातून मावशीच्या घरी. असा चार वेळा प्रवास करावा लागत असे. काही वर्षांनंतर सिडको बस सुरू झाली. तेव्हासुध्दा गिरगावातून बसने दादर स्टेशनरोड, नंतर सिडको बसने पनवेलला. ब्याऐंशीच्या आसपास दादर कोहीनूर समोर एशियाड बसने पनवेलला. त्याकाळी पनवेल स्टेशनला सिनेमा शूटींग व्हायचे. स्टेशन पहायला आम्ही जायचो. असे ऐकायचो की, पनवेल ते रोहा-आपटा रेल्वे ट्रॅक-रूळ टाकून झाले आहेत. त्या वीस-पंचवीस वर्षात असे वाटायचे की केंव्हा एकदा कोकण रेल्वे सुरू होते. अखेर आठ वर्षाच्या भगीरथ प्रयत्नानंतर प्रजासत्ताक दिनी म्हणजेच २६ जानेवारी १९९८ साली कोकण रेल्वेची सर्व किनारपट्टी कव्हर करणारी कोकण रेल्वे धावली.

कोकण रेल्वे सुरू व्हायच्या आधी दोन मोठी बंदरे असलेली शहरे म्हणजेच मुंबई आणि मेंगलोर एकमेकांशी डायरेक्ट रेल्वेने जोडलेली नव्हती. लोकांना त्या भागात जायचे असेल तर पुणे-सोलापूर-बेळगाव-बेंगळुरू रुटच्या ट्रेनने जावे लागत होते. मेंगलोरहून मुंबईला यायचे असल्यास प्रवाशांना आधी काटूर किंवा बिरुरला बसने जावे लागत होते आणि मग तेथून मुंबईसाठी ट्रेन पकडावी लागत असे.

कोकण रेल्वेचे जनक, कोकणचे सुपुत्र, कुडाळ तालुक्यातील वालावल रहिवासी, परंतु पश्चिम रेल्वे खात्यात इंजिनिअर असलेले कै. अ. ब. वालावलकर हे होत. त्यांनी त्या काळात कोकणात धावणाऱ्या रेल्वेचे स्वप्न पाहिले. त्यांनी केवळ कोकण रेल्वेची संकल्पना मांडली नाही तर वारंवार वर्तमानपत्रात लेख लिहून कोकण रेल्वेवर माहिती पुस्तिका प्रकाशित करून कोकणवासीयांमध्ये जनजागृती केली. भारताच्या पहिल्या लोकसभेत (१९५२) पहिले भाषण रत्नागिरी लोकसभा मतदारसंघातून निवडून गेलेले काँग्रेसचे खासदार स्वातंत्र्यसैनिक मोरोपंत जोशी यांनी केलं होतं. १९५७ ते १९७० या कालावधीत सलग तीन वेळा राजापूर मतदारसंघातून निवडून गेलेले बॅ. नाथ पै यांनी कोकण रेल्वेचा पाठपुरावा चालवला होता. १९७०च्या आसपास इंदिरा गांधी यांनी बॅ. पै यांच्याशी संपर्क साधून त्यांचा विचार काय आहे हे जाणून घेतले आणि तात्काळ कोकण रेल्वे सर्वेक्षणाचे आदेश दिले. पुढे १९७७ साली मोरारजी देसाई हे पंतप्रधान झाले ते जनता पक्षाच्या राजवटीत (बिगर काँग्रेस सरकार) आणि त्यांच्या मंत्रिमंडळात मधु दंडवते हे केंद्रिय रेल्वेमंत्री झाले. जुलै १९७९ मध्ये जनता सरकार पडले आणि पुन्हा काँग्रेस निवडून आली. १९८० ते १९९० या दहा वर्षाच्या कालावधीत काँग्रेस सरकारच्या कालावधीत एक इंच पण कोकण रेल्वे सरकली नाही. १९९० मध्ये पुन्हा एकदा बिगर



काँग्रेस सरकार आले. ते म्हणजे विश्वनाथ प्रताप सिंह हे पंतप्रधानपदी बसले. आणि जॉर्ज फर्नांडीस रेल्वेमंत्री झाले व राजापूर मतदार संघातून पाचव्यांदा लोकसभेवर निवडून गेलेले मधू दंडवते हे केंद्रिय अर्थमंत्री झाले.

कोकण रेल्वेची संकल्पना बॅ. नाथ पै, जॉर्ज फर्नांडीस व मधु दंडवते या त्रिकुटाने मांडली. पै आणि दंडवते कोकणातले व जॉर्ज फर्नांडिस मूळचे उडुपीचे होते. १९६६ साली दिवा आणि पनवेल येथे रेल्वे ट्रॅक बांधण्यात आला. त्यानंतर मधु दंडवते केंद्रात रेल्वेमंत्री झाले. त्यांच्या काळात हीच लाईन रायगड जिल्ह्यातील रोह्यापर्यंत वाढविण्यात आली. कारण ह्या भागात अनेक इंडस्ट्रीज होत्या. त्यांच्या कारकिर्दीत मेंगलोर आणि थोकूर ह्या रेल्वे मार्गालासुध्दा चालना मिळाली. तरीही रोहा ते मेंगलोर ह्या दरम्यान रेल्वेमार्ग अजूनही नव्हता. ऑक्टोबर १९८४ मध्ये रेल्वे मंत्रीमंडळाने एक फायनल स्थळ इंजिनिअरिंग आणि ट्रॅफिकचा सर्व्हे घेतला. हा सर्व्हे पश्चिम किनारपट्टीच्या गावांचा म्हणजे सुरतकल ते मडगांव दरम्यानच्या ५२५ कि.मी.च्या मार्गावर केला गेला. मार्च १९८५ साली रेल्वेने त्यांचा सर्व्हे मडगांव ते रोहापर्यंत ५८ कि.मी. एवढ्याच लांबीचा वाढविण्याचा निर्णय घेतला. ह्या सर्व्हेची जबाबदारी दक्षिण रेल्वेकडे सोपविण्यात आली होती. अखेर १९८८ मध्ये ह्या मार्गावरील सर्व्हेचा रिपोर्ट दक्षिण रेल्वेने रेल्वे मंत्रीमंडळाला दिला आणि ह्या प्रोजेक्टचे नाव कोकण रेल्वे असे ठेवण्यात आले.

कोकण रेल्वे हा प्रोजेक्ट भारतासाठी स्वातंत्र्यानंतरचा सर्वात मोठा आणि अवघड असा इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट होता ह्यात संशय नाही. हा प्रोजेक्ट अनेक खडतर परिश्रमानंतर यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. आज कोकण रेल्वे रोज तीन राज्यातून ७४१ कि.मी.चा प्रवास करते. हा रेल्वेमार्ग महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक ह्या तीन राज्यांतून जातो. कोकण रेल्वेची हद्द मुंबई जवळील रोहा येथून सुरू होते ते थोकूर ह्या मंगलोर जवळील दक्षिण कर्नाटकमधील रेल्वे स्टेशनला संपते.

कोकण रेल्वेच्या जन्माची कथा अत्यंत सुरस आहे, पण ती सर्वांनाच माहीत असेल असे नाही. एक ना एक दिवस निश्चितपणे कोकणात रेल्वे धावणार, यावर कोकणवासीयांचा ठाम विश्वास होता. कोकणात रेल्वे हवी, अशा मागणीचा पहिला ठराव पेण पालिकेने १८८४

साली केला होता. त्यानंतर ब्रिटिशांनी रेल्वेची चाचपणी केली. कोकण रेल्वेची संकल्पना इंग्रजांनी आधीच १८९४ मध्ये मांडली होती पण दुर्दैवाने हे काम अशक्य आणि महाकठीण असल्याचा समज करुन घेतल्याने हा प्रोजेक्ट मूर्तरूपास आला नाही. १९२८ मध्ये ब्रिटीश सरकारने दिवा ते दासगाव असा पहिला टप्पा पूर्ण करून घेतला. याच दरम्यान जागतिक मंदीची लाट आली आणि पुढील टप्प्याचा विचार झाला नाही. मात्र महाड-रत्नागिरी पुढील टप्पा दुर्गम, डोंगराळ असल्याने तेथे लोहमार्ग बांधणे तांत्रिकदृष्ट्या योग्य होणार नाही. या कारणातून ब्रिटिशांनी पुढील मार्गबांधणी सोडून दिली. इंजिनिअर वालावलकर यांनी मात्र कोकण तळकोकणापर्यंत न्यायचीच असा ध्यास घेतला. त्यांनी १९४८ पासून गोव्यापर्यंत कोकण रेल्वे मार्ग नेणे तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्याची बाब सर्वप्रथम मांडली. या प्रकल्पाचा आराखडा तयार केला गेला. अखेर ४०-४१ वर्षानंतर १९८९ साली ह्या कठीण गोष्टीस सुरुवात झाली. इंजिनिअर लोकांसाठी सर्वात मोठे आव्हान होते ते सह्याद्री पर्वताचा कठीण खडकाळ भाग पोखरून त्यातून बोगदे तयार करणे, मोठमोठ्या भयंकर खोल दऱ्यांवर लांबलचक पूल बांधणे आणि दीड हजारांपेक्षाही जास्त लहान-मोठ्या नद्या-ओढे-ओहोळ-नाले पार करणे. ह्या इतक्या मोठ्या आव्हानाला तोंड देण्यासाठी ह्या प्रोजेक्टचे नेतृत्व करणारे सुध्दा तितकेच सक्षम असायला हवे होते. तत्कालीन केंद्रिय रेल्वे मंत्री जॉर्ज फर्नांडीस हे उडुपीचे राहणारे होते. उडुपी हे ठिकाण सुध्दा कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावर आहे आणि हे प्रोजेक्ट पूर्ण व्हावे म्हणून ते अतिशय उत्साही होते. त्यांनी कामात निष्णात समजले जाणारे वरिष्ठ रेल्वे अधिकारी डॉ. ई. श्रीधरन ह्यांना संपर्क केला.

डॉ. ई. श्रीधरन ह्यांची कोकण रेल्वे कॉर्पोरेशन चेअरमनपदी आणि मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून निवड करण्यात आली. कोकण रेल्वे कॉर्पोरेशन १९९० साली स्थापन करण्यात आले. १५ सप्टेंबर १९९० राजी रोहा येथे कोकण रेल्वेचा पायाभरणी समारंभ पार पडला. (कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड हे नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे मुख्यालय असून हा सार्वजनिक उपक्रम असून जे कोकण रेल्वे चालवते आणि इतर रेल्वे संबंधित प्रकल्प देखील हाताळते.) पश्चिम घाटाचा भूभाग अतिशय खडकाळ आहे आणि दर काही किलोमीटरवर हा भूभाग बदलतो. कोकण रेल्वे निर्माण करणाऱ्यांना उंच कडा, खोल दऱ्या, खडकाळ पठारे, दलदलीचा प्रदेश, घनदाट वनराई, जोरात वाहणाऱ्या नद्या आणि समुद्राकडे जाणारे घाट ह्यांच्यातून मार्ग तयार करावा लागला. ह्या घाटात निसर्ग पावसाळ्यात अतिशय रौद्ररूप धारण करतो. पावसाळ्यात ह्या ठिकाणी वादळे व पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे तिथे पूर येणे, दरडी कोसळणे, बोगदे बंद होणे असे प्रकार रोज घडत असल्याने तेथे काम करणे अशावेळी अशक्यप्राय होते.

परदेशातून अद्ययावत बांधकाम तंत्रे वापरणारी यंत्रे मागवण्यात आली. लार्सन अ‍ॅण्ड टूब्रो, गॅमन इंडिया ह्या भारतातील नामांकित मोठ्या कंपन्याना बांधकामाची कंत्राटे दिली गेली. कोकण रेल्वे मार्गावरील येथे गाडीचा दर तासाला १६० किमी. इतका वेग असावा ह्यासाठी जवळजवळ सपाट  ट्रॅक असण्याची आवश्यकता होती, आणि १.२५ किमी. इतकी त्रिज्या असलेले कर्व्हेचर असणे क्रमप्राप्त होते. ह्यासाठी एकच मार्ग होता तो म्हणजे भूभागावर अनुरूप अशी रेल्वे लाईन तयार करणे. ह्यासाठी त्यांना भरपूर पूल बांधावे लागले, डोंगर फोडून बोगदे तयार करावे लागले, काही ठिकाणी बांध घालावे लागले. जेणे करून ट्रॅकची लेवल व्यवस्थित राखली जाईल. हे सगळे करण्यासाठी उपग्रहाने घेतलेल्या छायाचित्रांद्वारे संरेखन करण्यात आले आणि दोन्ही बाजूने काम सुरू करण्यात आले. हे इतके मोठे आणि संख्येने सुध्दा जास्त असल्याने बोगदे खणण्यासाठी स्वीडनहून हायड्रॉलिक टनेल डीगिंग यंत्र मागवण्यात आले. मोठ्या पूलांसाठी नदीकाठीच पियर तयार करण्यात आले आणि क्रेनच्या सहाय्याने ते नदीतल्या स्ट्रक्चरवर माऊंट करण्यात आले. ह्या प्रोजेक्टसाठी जवळजवळ २००० पूल बांधण्यात आले व ९१ बोगदे खणण्यात आले. ह्यातले काही बोगदे तर अक्षरशः हाताने एक एक मीटर मोजून खणण्यात आले कारण ह्या मशिनने डोंगरालगतची ओली मऊ माती खणणे शक्य नव्हते. हे बोगदे खणताना झालेल्या अपघातात १९ लोकांना जीव गमवावा लागला आणि हे काम पूर्ण होण्यासाठी चार वर्षे लागली. पावसाळ्यात अनेकवेळा खराब वातावरणामुळे काम थांबवावे लागले. काही वेळी खणलेले बोगदे बुजल्यामुळे परत पहिल्यापासून खणावे लागत असत. कोकण रेल्वेच्या निर्मितीमध्ये जवळपास ४७ हजार कुटुंबे विस्थापित झाली. उत्तर गोव्यातील पेडणे येथील एका बोगद्याचे काम पूर्ण होण्यास एकूण ७ वर्षे ३ महिन्याचा कालावधी लागला.

१९९४ साली महाडला सावित्री नदीला महापूर आला. रस्त्यांवर बारा फूटांपेक्षा जास्त पाणी आले. उक्षी ह्या भागात तर झालेले काम आणि कामासाठी लागणारे सामान सगळे दरडीखाली गाडले गेले. ह्या ठिकाणी काम करणारे इंजिनिअर कपूर तर ह्या दरडीखाली छातीपर्यंत गाडले गेले होते. त्यांना त्यांचे सहकारी जयशंकरन ह्यांनी वाचविले. ह्यासाठी त्यांना शौर्य पुरस्कार देण्यात आला. ह्याठिकाणी काम करताना अनेक लोक जखमी झाले तर १० लोक ठार झाले. कारण रेल्वे लाईन तयार करणे अतिशय अवघड आणि कठीण काम होते. ह्या ठिकाणी कामात इतके अडथळे आले तरी, जगाने त्यांच्या कामावर आक्षेप घेतला तरीही ही टीम त्यांचे काम अव्याहत करीत राहिली. त्यांच्या ह्या कामाची सिडा (एसआयडीए)च्या एका रिपोर्टमध्ये आवर्जून दखल घेतली गेली. सिडा (एसआयडीए) ही स्वीडन सरकारची एक एजन्सी आहे.

कोकण रेल्वे मार्गावरील पहिली रेल्वे २० मार्च १९९३ रोजी मंगळूर ते उडुपीदरम्यान धावली. रोहा-वीर-खेड-सावंतवाडी ह्या मार्गाचे काम डिसेंबर १९९६ साली पूर्ण झाले. अखेर आठ वर्षाच्या अथक कष्टानंतर २६ जानेवारी १९९८ रोजी पहिली पॅसेंजर ट्रेन कोकण रेल्वेच्या सुंदर आणि नयनरम्य, निसर्गरम्य वातावरण असलेल्या ट्रॅकवरून धावली. ह्या देशात जिथे एक पूल बांधायला वर्षानुवर्षे वेळ लागतो तिकडे हे इतके अवघड आव्हान फक्त आठ वर्षाच्या काळात पूर्ण होणे ही अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे. ह्यासाठी ४८५० हेक्टर्स इतक्या जमिनीची आवश्यकता होती. ही जमीन महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक ह्या राज्यांतल्या सरकारतर्फे ४२००० भूधारकांकडून घेण्यात आली. अनेक लोकांनी कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न बाळगता, अपेक्षा न करता स्वेच्छेने आपली जमिन ह्या कामासाठी रेल्वेला दिली कारण त्यांना ह्या प्रोजेक्टचे महत्त्व ठाऊक होते. ह्या ठिकाणची धार्मिक स्थळे किंवा महत्त्वाची स्थळे योग्य ठिकाणी स्थलांतरित करण्यात आली व शेतकऱ्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करण्यात आले.

कोकण रेल्वेची एकूण लांबी ७४१ कि.मी. (महाराष्ट्रात ३८२ कि.मी.) असून, या कोकण रेल्वेवर एकूण ५९ स्थानके आहेत, वळणे ३२० आहेत, मोठे पूल १७९ आहेत. लहान पूल तर एकूण १८१९ बांधले गेले, ह्या मार्गावर ४२४ लांबलचक पूल आहेत. तर सर्वाधिक लांबीचा पूल २,०६५ मी. (६७७८ फूट) होन्नावर येथे शरावती नदीवर आहे. कोकण रेल्वेच्या निसर्गरम्य मार्गावर भारतातील त्याकाळात सर्वात लांब बोगदा करबुडे येथे खणण्यात आला. हा बोगदा ६.५ कि.मी. लांब आहे. हा पूल दोन डोंगरांना जोडतो. ह्या पुलासाठी १२ कमानी आणि १० खांब बांधलेले आहेत. त्यापैकी ६ खांब कुतुबमिनारपेक्षा उंच आहेत. सद्यास्थितीत हा आशियातील सर्वात मोठा रेल्वेचा पूल आहे. रत्नागिरीतील पानवल नदीवर भारतातील तिसरा सर्वात उंच पुल ४२४ मीटर लांब ज्याला पानवल सेतू असे म्हणतात. पानवल व्हायाडक्ट जो सिंगल वाईड गेज ट्रॅकवर पसरलेला आहे. पुलाचा सर्वात उंच घाट लेड पातळीपासून ६४ मीटर उंच आहे. ब्रिज सुपरस्ट्रक्चर हे नऊ ईंटरमिजिएट ४० एम्. स्पॅन्स आणि प्रत्येकी ३० एम्. च्या दोन एंड स्पॅनसह सिंगल सेल सतत प्रीस्ट्रेस्ड कॉंक्रिट बॉक्स गर्डर आहे. १९९५ साली या पुलाला अमेरिकन कॉंक्रिट संस्थेकडून भारतातील मोस्ट आऊट स्टॅण्डिंग कॉंक्रिट स्ट्रक्चरचा पुरस्कार मिळाला.

कोकण रेल्वे मार्ग हा भारतातील महाराष्ट्रातील महाड, रत्नागिरी (उत्तर), रत्नागिरी (दक्षिण) कणकवली, कुडाळ, पणजी, कारवार व उडुपी ह्या प्रत्येकी १०० कि.मी. लांबीच्या ७ विभागांमध्ये विभागण्यात आला. गोवा आणि कर्नाटक राज्यांतील किनारी जिल्ह्यांचा समावेश होतो. १९९८ साली कोकण रेल्वे मार्गावरून धावणारी निजामुद्दीन-तिरुअनंतपुरम राजधानी एक्सप्रेस या गाडीचा शुभारंभ दिल्लीतील निजामुद्दीन स्थानकावरुन करण्यात आला. सध्या भारतातून विविध राज्यांमधील विविध रेल्वे स्थानकांमधून वेगवेगळ्या ट्रेन्स कोकण रेल्वे मार्गावरून कोकण किनारपट्टी-गोवा-कारवार कर्नाटक-केरळमधील तिरुअनंतपुरम या स्थानकांपर्यंत धावताहेत.

सध्या कोकण रेल्वेच्या संपूर्ण मार्गाच्या विद्युतीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. या प्रकल्पातील रोहा ते कर्नाटकातील थोकूर या टप्प्यातील विद्युतीकरण काम पूर्ण झाले आहे. यामुळे कोकणाचा विकास योग्य मार्गावर आहे. विद्युतीकरणाची पायाभरणी नोव्हेंबर २०१५ मध्ये करण्यात आली, या प्रकल्पाची किंमत सुमारे १२८७ कोटी रुपये खर्चून हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबवला गेला . या संपूर्ण कोकण रेल्वे मार्गाची सीआरएस तपासणी मार्च २०२० पासून सहा टप्पाटप्प्याने यशस्वीरित्या करण्यात आली. या विद्युतीकरणामुळे इंधनात मोठी बचत होणार असून प्रवासही वेगाने होईल. मा. पंतप्रधान मोदी यांनी

ऑगस्ट २०२२ मध्ये १०० टक्के विद्युतीकरण पूर्ण झाल्याबद्दल कोकण रेल्वेचे अभिनंदन केले.


रो-रो म्हणजे रोल ऑन/रेल ऑफ जेथे लोड केलेले ट्रक्स थेट रेल्वे वॅगनद्वारे त्यांच्या गंतव्यस्थानावर नेले जातात. भारतातील रो-रो सेवा कोकण रेल्वेने पहिल्यांदा चालवली आणि यशस्वी झाली. ट्रकचालकांना कोकणातील नागमोडी, वळणदार घाटांतून ट्रक चालविणे अत्यंत कठीण जाते. अरुंद घाट-रस्ते, कधी खराब रस्ते, धुवांधार कोसळणारा पाऊस, बदलणारे लहरी वातावरण/हवामान, या परिस्थितीत रो-रो सेवा उपयोगी पडते आणि वेळेची बचत, इंधनाची बचत, रस्ता-सेफ्टी, ट्रॅफिकची कटकट नाही, प्रदूषण नाही यामुळे ही संकल्पना ट्रक ड्रायव्हर, त्यांच्या कंपन्या, वाहतूक पोलिस आणि कोकण रेल्वे या सर्वांसाठी फायद्याची ठरली.

कोकण रेल्वे मार्गावरील प्रवास अधिक गतिमान करण्यासाठी दुपदरीकरण वेगाने सुरू आहे. दोन स्थानकांमधील अंतर कमी करण्यासाठी ११ नविन क्रॉसिंग स्थानके उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. माजी केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांनी कोकण रेल्वेचा प्रवास सुरक्षित आणि जलदगतीने व्हावा यासाठी केंद्राकडून भरीव निधी दिला होता. त्यामधून ही नवीन क्रॉसिंग स्थानके उभारण्यात येत आहे. त्यापैकी ३ रायगड जिल्ह्यात आहेत. कोलाड आणि माणगावमध्ये इंदापूर रोड हे स्थानकाचे काम वेगाने सुरू आहे. वीर-करंजाडी या दोन स्थानकांमध्ये सापे हे इंदापूर स्टेशनपासून सुमारे ५५ कि.मी. अंतरावरील स्थानक आहे. वामने येथेही क्रॉसिंग स्थानक सुरू करण्यात आले आहे. कर्नाटकातील उडुपी जवळील गावात ६ ते ७ नवीन स्थानके उभारण्यात येणार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात वेरवली स्थानकाचे काम प्रगतीपथावर असून क्रॉसिंगसाठी उपयुक्त आहे. सध्याच्या बातमीनुसार कोकण रेल्वे मार्गावर २१ नवीन स्थानके उभारण्यात येणार आहेत. भविष्यात ह्या नवीन स्थानकांमुळे कोकणमार्गावर एकूण ८७ स्थानके होणार आहेत.

### विस्टा-डोम

कोकण रेल्वेच्या शिरपेचात आणखीन एक भर पडली ती अशी की १८ सप्टेंबर २०१७ रोजी ट्रेन नं. १२०५१/१२०५२ दादर-मडगाव जनशताब्दी एक्सप्रेस ही विस्टा-डोम पद्धतीची म्हणजेच दोन्ही बाजूंच्या मोठाल्या काचेच्या खिडक्या, वरील छप्पर देखील काचेचं असा एक एसी डबा असलेली ट्रेन सोडण्यात आली. प्रवाशांना बसल्या-बसल्या दोन्ही बाजूंनी व वरच्या बाजूने कोकणातील निसर्ग सौंदर्य, दऱ्या-खोऱ्या, हिरवीदाट झाडी, वाहणाऱ्या नद्या, हिरवेगार डोंगर न्याहळता येणार. खुर्च्यादेखील सर्व बाजूने फिरू (रोटेट) शकतील, पुश-बॅक सीट, समोरा-समोर फिरवून गप्पा मारता येतील किंवा खिडकीकडे तोंड करून निसर्ग न्याहाळता येईल. या लक्झरी ट्रेनच्या डब्यांमुळे कोकण मार्गावरील प्रवास सुखकर, खुपसा निसर्गरम्य झाला आहे.

व्यास दीपोत्सव २०२२
सुभाष गणपत काळे
यांसकडून
दीपावलीच्या शुभेच्छा!







# ग्रामसडक ते हमरस्ता

**राजेंद्रप्रसाद मसुरकर**

वरवर पाहता प्रमुख रस्त्यांचं जाळं कोंकणात विणल्याचं दिसत असलं तरी राष्ट्रीय महामार्ग वगळता अन्य रस्त्यांमध्ये सलगता आणि थेट जोडलेपणा यांचा अभाव आहे.

कोकण किनाऱ्यावर प्राचीन काळात जहाजांच्या रहदारीने गजबजलेली अनेक बंदरं होती. तिथे जहाजातून उतरवला जाणारा नाना प्रकारचा माल केवळ कोंकणातच नव्हे तर महाराष्ट्राच्या अंतर्भागात दूर दूरवर वाहून नेला जाई. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातील गांवांमध्ये तयार होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू, जडजवाहीर, नीळ, एवढंच नव्हे मोर आणि माकडांसारखे प्राणीदेखील या बंदरांमध्ये आणून जहाजातून परदेशी पाठवले जात.

लेखाचा विषय 'ग्रामसडक ते हमरस्ता' असा आहे, त्याचा विचार या बंदरांपासून करूया. कोंकण हा चिंचोळा भूमीपट्टा. किनाऱ्यापासून सह्याद्रीपर्यंत जंगलं पसरलेली. त्यांतून जागा करत अनेक नागमोडी रस्ते पूर्वपश्चिम तयार केलेले होते. या रस्त्यांवर बैलगाड्या आणि पाठींवर माल लादलेल्या बैलांच्या तांड्यांची वर्दळ चालू असे. उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारे कोकण किनाऱ्याला समांतर रस्ते प्रामुख्याने मानवी प्रवासाकरिता वापरले जात, ते पायवाटा आणि पाखाड्यांनी युक्त होते. त्यावर ठिकठिकाणी डोंगरांच्या पोटात खोदलेल्या गुंफा होत्या, ती रात्रीच्या मुक्कामाची आणि पावसाळ्यात माल साठविण्याची केंद्र होती.

ब्रिटिशांनी मराठ्यांचं राज्य जिंकल्यावर त्यांना मुंबईत इमारती उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लाकडाची गरज भासू लागली, ती भागविण्यासाठी कोंकणातील, त्यातही रत्नागिरी जिल्ह्यातील जंगलांमध्ये वृक्षतोड होऊ लागली. तोडलेल्या झाडांचे ओंडके वाहून नेण्यासाठी पूर्वपश्चिम रस्ते तयारच होते. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात भारतात पहिली मोटारगाडी आली, हळूहळू मोटारींची संख्या वाढू लागली, तसे या दोन्ही रस्त्यांना महत्त्व प्राप्त झाले. उत्तर-दक्षिण जाणारे हे नवे रस्ते, ठिकठिकाणी त्यांना छेदणाऱ्या पूर्वपश्चिम प्राचीन रस्त्यांपेक्षा महत्त्वाचे ठरले. याला अपवाद पूर्वपश्चिम मुंबई पुणे रस्त्याचा, त्याचं कमी झालेलं महत्त्व ब्रिटिशकाळात वाढू लागलं. आता यातील गोवा रस्त्याचं चौपदरीकरण होतंय, आणि मुंबई आग्रा महामार्गाखेरीज मुंबई अहमदाबाद रस्ता आणि त्यांना समांतर जाणारे पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग तयार झालेत.

कोंकणातील या रस्त्यांचा पांच जिल्ह्यांच्या संदर्भात परामर्ष घ्यायचा तर एक मोठा प्रबंधच लिहावा लागेल. एक लक्षात घेतलं पाहिजे की मुंबईच्या भोवतालचा प्रदेश आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यापासून दक्षिणेस सिंधुदुर्गापर्यंतचा प्रदेश असे कोकणाचे दोन भाग पडतात आणि त्यातील उत्तरेकडचा शहरी तर दक्षिणेकडचा ग्रामीण व निमशहरी राहिला आहे. साहजिकच उत्तर भागात राष्ट्रीय महामार्गांशिवाय कित्येक रस्त्यांचं चौपदरीकरण झालं आहे. दक्षिण भागात मुंबई-गोवा रस्ता आणि रत्नागिरी-कोल्हापूर रस्ता हे दोनच राष्ट्रीय महामार्ग आहेत आणि किनाऱ्याजवळून जाणारा उत्तरदक्षिण 'सागरी महामार्ग' हा राज्य महामार्ग आहे. बाकी सारे ग्रामीण आणि जिल्हा मार्ग आहेत. पूर्वपश्चिम जाणारा आंबडवे-मंडणगड-लोणंद हा प्रस्तावित राष्ट्रीय महामार्ग जमीन संपादनाच्या गुंत्यात अडकला आहे, गुहागर-कराड मार्गही काही ठिकाणी याच कारणाने रखडला आहे आणि चिपळूण-जयगड मार्ग स्थानिकांच्या विरोधाच्या फेऱ्यात सापडलाय.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात 'सागरी महामार्गा'मुळे किनाऱ्यालगतच्या भागातील वाहतूक सुलभ झाली आहे. देवगड, मालवण आणि वेंगुर्ले ही समुद्रकिनाऱ्यावरील तिन्ही तालुक्यांची ठिकाणं त्याने जोडली आहेत. मुंबई गोवा महामार्ग पुढे कारवार, मंगळूरवरून कोची आणि कन्याकुमारीपर्यंत जातो. दोन वर्षांपूर्वी 'मुंबई-कन्याकुमारी कॉरिडॉर'च्या विकासासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली, मालवण ते कणकवली रस्त्याच्या रुंदीकरणासाठीही राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे योजना आहे.

वरवर पाहता प्रमुख रस्त्यांचं जाळं कोंकणात विणल्याचं दिसत असलं तरी राष्ट्रीय महामार्ग वगळता अन्य रस्त्यांमध्ये सलगता आणि थेट जोडलेपणा यांचा अभाव आहे. एकेकाळी 'रेवस-रेडी' म्हणून ओळखला जाणारा 'सागरी महामार्ग' शिरोड्यापासून जयगडपर्यंत सलग आहे. जयगडच्या खाडीवर पूल नाही, त्यामुळे या रस्त्याने येणाऱ्या खासगी रातराणी आरामबसेस रत्नागिरीस आल्यावर पुन्हा मुंबई-गोवा महामार्गाला मिळतात. हा पूल नसल्यानेच जयगड, चिपळूण हा औद्योगिक वाहतूक डोळ्यांपुढे ठेवून प्रस्तावित केलेला मार्ग होऊ शकला नाही. या रस्त्यावर जयगड, दाभोळ आणि केळशीच्या खाड्यांवर रत्नागिरी जिल्हा अंतर्गत, सावित्री नदी अर्थात बाणकोट खाडीवर रत्नागिरी व रायगड जोडणारा आणि रायगड जिल्ह्यात दिघी व आगरदांडा यांना जोडणारा असे पाच महत्त्वाचे पूल बांधल्याशिवाय त्यात सलगता येणार नाही.

रायगड जिल्ह्यात लोणेरे येथे बाहेर पडून रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेशून रत्नागिरी जिल्ह्याच्या मध्यभागातून उत्तर दक्षिण जाणारा एक महत्त्वाचा रस्ता 'कोकण रेल्वे' आल्यावर



मागे पडला. रत्नागिरी जिल्ह्यात पर्यटन विकासाला भरपूर संधी असल्याचं बोललं जातं, परंतु उत्तर रत्नागिरीत पुलांच्या अभावामुळे किनाऱ्यावरील दोन पर्यटन स्थळांमध्ये थेट प्रवास करता येत नाही, प्रवासाचं अंतर वाढतं.

रायगड जिल्ह्यात पश्चिमेस अनेक खाड्यांमुळे अंतर्भागातील रस्ते दक्षिणोत्तर जाण्याऐवजी आग्नेय वायव्य किंवा नैर्ऋत्य-ईशान्य असे तिरपागडे बनलेत. मुंबई गोवा महामार्गाच्या पूर्वेस पाली हे अष्टविनायक क्षेत्र आहे, ते रस्त्याने जोडले असले तरी तिथून अंबा नदी ओलांडून थेट रायगडकडे येणारा रस्ता बनविण्यात आतपर्यंत उतरलेल्या कठीण कातळाच्या डोंगर रांगांचा अडसर आहे. रायगड जिल्ह्यात महामार्गाच्या पश्चिमेला रोहा परिसर आणि पूर्वेस रसायनी आपटा परिसर अंतर्गत रस्त्यांबाबत समृद्ध आहे. मात्र त्या प्रमाणात या जिल्ह्याच्या अन्य भागात रस्त्याचं जाळं विरळच आहे.

शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे विकसित दिसणाऱ्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत महामार्गांचं जाळं मोठं आणि घट्ट आहे. तथापि, ठाणे जिल्ह्याच्या पूर्वेच्या मुरबाड परिसरात रस्त्यांची दुर्गमता आणि एकटेपणा चटकन जाणवतो. खरं म्हणजे अति जलदगती 'समृद्धी महामार्ग' याच भागातून जातो, त्याच्याशी 'कॉरिडॉर' म्हणून भोवतालचा प्रदेश जोडण्याचा वेग अनेक पटींनी वाढला पाहिजे. ठाणे आणि पालघर जिल्ह्यात लोकल रेल्वेची सेवा मुबलक आहे, परंतु तिथली प्रचंड लोकसंख्या पाहता 'सगळं सुधारलं पण इथले रस्ते काही सुधारले नाहीत', अशी तिथल्या जनतेची कुरकुर आहे.

एकूण पाहता, कोंकणात पुरेशा सलग रस्त्यांचा अभाव, चौपदरीकरण होत असता संलग्न गांवांमध्ये व्यावसायिक संकुलं उभारण्याच्या संधीबाबत अनभिज्ञता, दोन निकट रेल्वे स्थानकांना थेट जोडणाऱ्या रस्त्यांची कमतरता या त्रुटी आहेत, तर 'कॉरिडॉर'शी जोडले जाण्याची संधी व त्यासाठी करण्यात आलेली अर्थसंकल्पातील तरतूद, पर्यटकांना आकर्षित करणारं अभिजात निसर्गसौन्दर्य आणि 'ड्राय पोर्ट' संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पूर्वपश्चिम रस्त्यांची प्राथमिक उपलब्धता ही या विषयाची बलस्थानं आहेत.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**जया गोविंद सिंग,**
**गोविंद पान सिंग परिवार**
**यांसकडून**
**दीपावलीच्या शुभेच्छा!**



# कोकणातील बंदरे

**दिलीप भटकर**

दाभोळ, जयगड, रत्नागिरी, रनपार, मुसाकाझी, विजयदुर्ग, देवगड, मालवण अशा सर्वच बंदरातून या प्रवासी आगबोटी येता जाता थांबत होत्या आणि प्रवाशांची बंदरांवर वर्दळही होती. त्याकाळी किनारपट्टीवरील लहान लहान खाड्यांमधून गलबते व मचवे गर्दी करून असत. रेशनवरील तांदूळ, गहु, जोंधळा अशा अन्नधान्यातून मीठ, लाकूड, मंगलोरी कौले अशा सर्व स्तरावरील मालवाहतूक लहान–मोठ्या बंदरांतून गलबतांद्वारे मोठ्या प्रमाणात होत असे.

सुमारे ७२० किलोमीटर लांबीचा सागर किनारा, त्यावरील लहान मोठी बंदरे आणि सामावलेल्या खाड्या हे सारे कोकणाला लाभलेले निसर्गदत्त वरदान होय. गोव्याला लाभलेल्या मांडवी आणि झुआरी या दोन नद्यांच्या आधारे सारे गोवा राज्य पर्यटन आणि खनिज वाहतूक क्षेत्रात जगभर प्रसिद्ध पावले. उत्तरेकडे गुजरातमध्ये देखील अनेक लहान-मोठी बंदरे उदयास आली व तेथील समुद्री व्यवसाय विस्तारला. कोकण किनाऱ्यावरील बंदरांचा मात्र म्हणावा तसा विकास झालेला दिसून येत नाही. मुंबई आणि गोवादरम्यानच्या रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांपैकी रायगड जिल्ह्याला मुंबईची जवळीक लाभलेली आहे. शिवाय रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांची भौगोलिक परिस्थिती देखील रायगडपेक्षा वेगळी आहे. म्हणूनच खरेखुरे तळकोकण असलेल्या रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बंदराचा विचार या लेखासाठी करणे योग्य ठरेल.

रत्नागिरी जिल्ह्यातील साखरी-वेळास, केळशी, हर्णे, दाभोळ, पालशेत, बोरया, जयगड, तिवरे, भगवती, मांडवी, रनपार-पावस, मुसाकाझी, तुळसुंदे तर सिंधुदुर्गातील विजयदुर्ग, देवगड, आचरा, मालवण, निवती, वेंगुर्ला व रेडी अशा बंदरांची भलीमोठी नामावली घेता येईल. सुमारे ६० वर्षांपूर्वी म्हणजे सन १९६० ते १९७० च्या कालावधीत कोकण किनाऱ्यावरील लहान-मोठी सर्वच बंदरे गजबजलेली होती. रोहिदास, रत्नागिरी, ॲन्थनी, चंपावती अशा वाफेवरील इंजिनाच्या बोटी आणि त्यानंतर कोकण सेवक, कोकणशक्ती, रोहिणी अशा डिझेल इंजिनावरील प्रवासी आगबोटी कोकणच्या किनाऱ्यावर कार्यरत होत्या. तेव्हाच्या एकत्रित रत्नागिरी जिल्ह्याचा विचार केला तरी दाभोळ, जयगड, रत्नागिरी, रनपार, मुसाकाझी, विजयदुर्ग, देवगड, मालवण अशा सर्वच बंदरातून या प्रवासी आगबोटी येता जाता थांबत होत्या आणि प्रवाशांची बंदरांवर वर्दळही होती. त्याकाळी किनारपट्टीवरील लहान लहान खाड्यांमधून गलबते व मचवे गर्दी करून असत. रेशनवरील तांदूळ, गहु, जोंधळा अशा अन्नधान्यातून मीठ, लाकूड, मंगलोरी कौले अशा सर्व स्तरावरील मालवाहतूक लहान-मोठ्या बंदरांतून गलबतांद्वारे मोठ्या प्रमाणात होत असे.

साधारणतः १९८० नंतरच्या कालखंडात कोकणात गावोगावी रस्ते झाले व वाहतूक सुविधा निर्माण झाल्या. साहजिकच काळाच्या ओघात मुंबई-गोवामधील सागरी प्रवासी सेवा बंद पडली. कोकणातील लहान लहान बंदरांमधील पूर्वीची मालवाहतूक देखील थंडावली. एकेकाळी गजबजलेली बंदरे ओस पडली. बंदरावरील धक्के आणि अन्य सुविधा मोडकळीस आल्या. सन १९८० नंतर सुमारे २०/२५ वर्षांचा कालावधी म्हणजे कोकणातील बंदरे नामशेष झाल्यागत होती. आज सर्व क्षेत्रात खासगीकरणाचे वारे वाहत असल्याने शासन स्वतः काही कोकण किनाऱ्यावरील लहान बंदरे विकसित करण्याची शक्यता नाही. गेली काही वर्षे कोकण किनाऱ्यावर विविध बंदर विकासाच्या घोषणा आपण ऐकल्या. तथापि, जाहीर झालेल्या अनेक योजनांचा आरंभ देखील झालेला दिसत नाही. तर त्या योजना पूर्णत्वास जाणे दूर राहिले. दाभोळ खाडीत होऊ घातलेले तिंबलो शिपयार्ड प्रकल्प आणि गोव्याच्या प्रभाकर सावंतांचा जहाज बांधणी प्रकल्प शिवाय राजापूर तालुक्यातील तुळसुंदे किनाऱ्यावरील सेफ ॲण्ड शुअर कंपनीचा जहाज दुरुस्ती प्रकल्प आणि वेत्ये-आडिवरे जवळचा राजापूर शिपयार्ड हा जहाज बांधणी प्रकल्प असे सारे प्रकल्प थोडेफार भूसंपादन झाल्यावर प्रकल्प उभारणीच्या आरंभकाळातच बंद पडले व रद्द झाल्यात जमा झाले. आंबोळगड किनाऱ्यावर होऊ घातलेल्या आयलॉग बंदर प्रकल्पाची जाहीर जनसुनावणी योग्य नियोजनाअभावी आणि स्थानिक विरोधामुळे तीन ते चार वेळा रद्द झाली. नाणारच्या प्रस्तावित इंधन तेल रिफायनरी सारख्या मोठ्या प्रकल्पाला विरोध झालेला आपण पाहतो आहोतच. रत्नागिरी जिल्ह्यात होऊ घातलेले हे सारे प्रकल्प एव्हाना पूर्ण होऊन कार्यरत झाले असते तर रत्नागिरी जिल्ह्याचे अर्थकारण आमूलाग्र बदललेले दिसले असते. अनेक वर्षे उत्तम चाललेली रत्नागिरी आणि दाभोळ येथील भारती शिपयार्ड कंपनी बंद पडली. गतकाळात येथे





बांधलेली जहाजे साता समुद्रापार गेली हे अभिमानास्पद आहे. आज तेथे लहान मोठ्या अनेक जहाजांचे अर्धवट बांधकाम झालेले सांगाडे आणि यंत्रसामग्री अशी कोट्यवधी रुपयांची मालमत्ता अक्षरशः गंजत धूळ खात पडलेली आहे. ही कंपनी पुन्हा चालू होणे काळाची गरज आहे.

आधुनिकतेच्या वाटेवर उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झाले. साहजिकच बंदरांवरील कामकाजाचे स्वरूप बदलले. बंदर क्षेत्रात फार मोठा कायापालट झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड येथील जिंदाल बंदर प्रकल्प आणि चौगुले उद्योगाचे आंग्रे पोर्ट व लावगण डॉकयार्ड तसेच पावस-रनपार येथील फिनोलेक्स कंपनीचे बंदर ही सर्व खासगीकरणातून विकसित झालेली बंदरे आपण पाहतो. जिंदाल, चौगुले, फिनोलेक्स अशा मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांनी मोठी भांडवली गुंतवणूक केल्यामुळे वर उल्लेखिलेली त्यांची बंदरे भव्यदिव्य प्रमाणात विकसित झाली हे वास्तव सत्य आहे. दुसरीकडे लहान उद्योजकांना बंदराच्या छोट्या प्रमाणातील विकासासाठी आवश्यक असलेल्या २०/२५ कोटी रुपयांचा भांडवली खर्च करणे शक्य नसते ही देखील वस्तुस्थिती आहे. मंडणगड तालुक्यातील साखरी येथे एक लहानसा धक्का बांधून गेल्या काही वर्षात तेथून मोठ्या प्रमाणात बॉक्साईट खनिज निर्यात झाली. या धक्क्यापाशी ओहोटीचे वेळी अगदी दोन-चार फूट देखील पाणी उपलब्ध असत नाही म्हणून भरतीच्या वेळा साधूनच या ठिकाणाहून बार्जेसची वाहतूक करण्यात येते. असे असूनही येथून चांगल्या प्रकारे खनिज निर्यात होते हे कौतुकास्पद आहे. रत्नागिरी नजिकच्या भगवती बंदरात देखील अल्ट्राटेक सिमेंटचा कच्चा माल गेली अनेक वर्षे येत आहे. मध्यंतरीच्या काळात विजयदुर्ग बंदरातून उसमळी निर्यात झाली. सिंधुदुर्गातील रेडी बंदरातून लोहखनिज मोठ्या प्रमाणात निर्यात झाले.

जयगड खाडीत गुहागरता लुक्यातील काताळे गावच्या किनाऱ्यावर मरीन सिंडिकेटचा छोटेखानी बंदर प्रकल्प धिम्या गतीने साकारतो आहे. 'कोकणवासीयांचा कोकणातील स्वतःचा बंदर प्रकल्प' असे नामभिधान घेतलेला हा प्रकल्प स्थानिक कोकणवासीयांनी म्हणजेच रत्नागिरी परिसरातील तंत्रज्ञ व व्यावसायिक भूमिपुत्रांनी व भूमीकन्यांनी उभा केला आहे हे विशेष होय. पुरेशा सुविधा उपलब्ध नसतानाही मरीन सिंडिकेट परिवाराने आजवर श्रमपूर्वक काम केले. तराफ्यावर तरंगते पाईप सोडून त्याद्वारे लहान जहाजांना उसमळी चढविण्याचे यशस्वी काम झाले. प्रथम कन्व्हेअर बेल्ट आणि त्यानंतर कार्गो रॅम्प बांधून त्याद्वारे जहाजांवर बॉक्साईट आणि लॅटराईट खनिज चढवण्यात आले. भारत सरकारच्या वतीने आता या प्रकल्पाला पर्यावरण आणि सीआरझेड मान्यता मिळाली असून येथे लवकरच मालवाहतूक, जहाज दुरुस्ती आणि जुनी जहाजे तोडण्याची सुविधा अशी कामे चालतील. जुनी जहाजे तोडण्याचे काम गुजरातमध्ये अलंग येथे मोठ्या प्रमाणावर चालते. मुंबईत पोर्ट ट्रस्टच्या दारुखाना विभागात पूर्वापार चालत आलेले जुनी जहाजे तोडण्याचे काम आता बंद करण्यात आले आहे. साहजिकच मरीन सिंडिकेटचा कोकणातील जहाज तोडणी सुविधा प्रकल्प भविष्यात यशदायी ठरणारा आहे. या प्रकल्पाद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. जहाजांच्या तळाचे काम करण्यासाठी सुकी गोदी अथवा तरंगती गोदी आवश्यक असते. भारतात आजवर सहा/सात जुन्या तरंगत्या गोद्या परदेशातून आणण्यात आल्या. तथापि, मरीन सिंडिकेटच्या वतीने कोकणातील स्थानिक तंत्रज्ञानी आणि कारागिरांनी भारतातील पहिली तरंगती गोदी २०१६ सालात अन्य एका कंपनीला येथे बांधून दिली. त्यानंतर मरीन सिंडिकेट परिवाराने जयगड खाडीत ही तरंगती गोदी जहाजांच्या तळाच्या दुरुस्ती कामासाठी यशस्वीपणे वापरली. पश्चिम किनाऱ्यावर भरकटलेली, अर्धवट बुडालेली एकूण सात जहाजेदेखील मरीन सिंडिकेटने आजवर वाचविली आहेत.

कोकणातील किनारट्टीवरील पाण्याची उपलब्ध खोली, लगतच असलेले ७०/८० मीटर्स उंचीचे डोंगर, बंदराकडे जाण्या-येण्याचा चढ-उताराचा जोड रस्ता, नैर्ऋत्य पावसाळी वाऱ्यांपासूनचे संरक्षण, महामार्गापासून बंदरापर्यंतचे अंतर तसेच नजिकचे रेल्वेस्थानक आणि माल उतरविण्याची सोय, परिसरातील संभाव्य मालवाहतूक अशा

अनेक गोष्टींचा सारासार विचार करून विशेषतः बंदराच्या नैसर्गिक मर्यादा, क्षमता व आवाका ध्यानात घेऊन लहान व मध्यम स्वरूपाच्या बंदर विकासाचे नियोजन करणे अधिक व्यवहार्य आहे. बंदर विकास म्हणजे हजारो कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता हा विचार चुकीचा आहे. येथील बंदरांच्या मर्यादा, आवाका आणि समस्या विचारात घेऊन सुयोग्य नियोजन केले तर कोकणातील लहान बंदरांना आवश्यक असणाऱ्या सोई सुविधा व विकासासाठी अगदी१५/२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला तरी त्याद्वारे ही लहान बंदरे नवे रूप साकारतील व परिसरातील व्यापार, उद्योग उदिम भरभराटीस येईल. अर्थकारणात सुधारणा होईल, रोजगारात वाढ होईल.

व्यापारी बंदरांखेरीज जिल्ह्यातील मच्छीमारी बंदरांचा देखील विचार करणे गरजेचे आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे, जयगड, रत्नागिरी नजिकचे मिरकरवाडा, साखरी नाटे अशी बंदरे महत्त्वाची आहेत. आजघडीला येथे नियोजनाअभावी सोई सुविधा उपलब्ध नाहीत. समुद्रातून आलेल्या मासेमारी बोटी लावण्यासाठी पुरेसे सुरक्षित धक्के नाहीत. बोटीवरून ताजे मासे उतरवून घेणे, स्थानिक मासे विक्री तसेच प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यापर्यंतची वाहतूक व्यवस्था, शीतगृहांची व बर्फाची सोय, बोटींना करावयाचा पाणीपुरवठा व डिझेल पुरवठा, बोटींना आवश्यक भासणारी दुरुस्ती व्यवस्था, शासकीय परवाने, बोटीवरील कर्मचाऱ्यांसाठी ओळखपत्रे अशी येथील कामकाजाची व व्यवसायाची शृंखला असते. आज जिल्ह्यातील वर उल्लेख केलेल्या सर्वच मच्छीमारी बंदरातून नियोजनाचा अभाव आहे. मच्छीमारी बोटींच्या बंदराकडे येण्याजाण्याचे मार्ग हेरले गेले असल्याने ड्रेजिंगची आवश्यकता आहे. खरे म्हणजे कोट्यवधी रुपयांची उलाढाल साधणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमारी बंदरांचे सुयोग्य व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरेल. त्यासाठी थोडाफार निधी उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे.

रत्नागिरी जिल्ह्याच्या किनारपट्टीचा विचार करताना जलपर्यटनाचा देखील विचार होणे गरेजेचे आहे. उत्तरेकडे दापोली तालक्यातील कर्दे, केळशी, मुरुड, सालदूर, लाडघर, गुहागरचा रमणीय किनारा, गणपतीपुळे, आरे-वारे, भाट्ये अशा किनाऱ्यावर लहान लहान बोटीतून प्रत्येकी चार-सहा पर्यटकांना घेऊन जलपर्यटन चाललेले आपण पहातो. उघड्या समुद्रातील हे जलपर्यटन अचानक उसळलेल्या लाटा, जोरदार वारे व पाण्याचा प्रवाह या कारणांनी अनेकदा धोकादायक ठरते. वापरण्यात येणाऱ्या लहान बोटींमध्ये आवश्यक सुरक्षा साधनांची देखील वानवा असते. अनेकदा पर्यटकांचा अतिउत्साह देखील अपघातांना निमंत्रण देणारा ठरतो. अशा सर्व वस्तुस्थितीचा विचार करून गोव्याच्या धर्तीवर येथे जलपर्यटनाच्या योजना राबविणे गरजेचे आहे. उघड्या समुद्रातील धोकादायक जलपर्यटनापेक्षा येथील निसर्गरम्य खाडीमध्ये जलपर्यटन व्हावयास हवे. जिल्ह्यातील दाभोळ, जयगड, भाट्ये येथील खाड्या अशा जलपर्यटनास योग्य ठरतात. कॅटामरान पद्धतीच्या सुमारे ६० ते १०० प्रवासी क्षमतेच्या कमी पाण्यात फिरणाऱ्या पर्यटक बोटी सुयोग्य ठरतील. समुद्रमुखापासून खाडीमध्ये मैल-दीड मैल आत संथ पाण्यामध्ये या बोटी प्रवाशांना घेऊन फिरत राहतील. बोटीवर नाश्ता, जेवणाची देखील सोय असावी. पर्यटकांच्या मनोरंजनसाठी बोटीवर वाद्यवृंद, स्थानिक लोककला, लोकनृत्य व गाणी तसेच बोटींना दिव्यांची रोषणाई व सजावट देखील असावी. केवळ दिवसाचे वेळी नव्हे तर चांदण्या रात्रीच्या जलपर्यटनासाठी देखील रीघ लागेल. अशा बोटींना बंदर प्रशासनाकडून आवश्यक सर्व परवाने प्राप्त असतील, तसेच बोटचा कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असेल. बोटीवर पुरेशी सुरक्षा साधने देखील असतील. अशाप्रकारे रत्नागिरी जिल्ह्याच्या निसर्गरम्य खाड्यामधून सुरक्षित जलपर्यटनाची सोय झाल्यास जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांना जलपर्यटनाची पर्वणी लाभेल आणि परिसराला अर्थप्राप्तीचा मार्ग गवसेल.

कोकणाला लाभलेला सागर किनारा व त्यावरील व्यापारी बंदरे, मच्छीमारी बंदरे आणि विलोभनीय खाड्यांची पर्यटन स्थाने यांचा सुनियोजित विकास झाल्यास कोकणाची अर्थव्यवस्था बळकट होईल, रोजगार वाढेल. कोकणचा विकास साधण्याची क्षमता येथील सागर किनारा, बंदरे व खाड्यांमध्ये निश्चितच सामावलेली आहे हे निर्विवाद!

व्यास दीपोत्सव २०२२
माधवी कयाळ
यांसकडून
दीपावलीच्या शुभेच्छा!



# उद्योग

## विभाग ६



# 'वेलकम टू कोंकण'

डॉ. पराग कारुळकर

निसर्गरम्य, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जो कोकणाला लाभलेला आहे, तो वारसा कायमस्वरूपी जपण्यासाठी स्थानिक लोक, सरकार तसेच पर्यटन व्यावसायिक ह्या सर्वांनी एकत्र येऊन कोकणासाठी पर्यटन टिकविण्याच्या दृष्टिकोनातून काम केले पाहिजे.

'अतुल्य भारत ' म्हणजे भारताच्या जम्मू काश्मीर ते कन्याकुमारी तसेच अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय ते गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, गोवा ह्या सारख्या अनेक राज्यांना लाभलेला ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक वैभवाचा साज!

आपल्या भारतामध्ये, महाराष्ट्राचे ऐतिहासिक, सांस्कृतिक तसेच नैसर्गिक वैभव पर्यटनाच्या दृष्टीने अधिक महत्वाचे आहे. अशा वैभवशाली महाराष्ट्राच्या ७२० किमी. सागरी किनारा लगतच्या पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये निसर्गाचा लाभलेला वरदहस्त जणू आपल्याला खुणावतोय 'वेलकम टू कोंकण!'

श्री परशुरामाची पावन भूमी, श्री लोकमान्य टिळकांची जन्मभूमी, श्री छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्य भूमी अशा अनेक थोर मान्यवरांच्या पदस्पर्शाची, त्यांच्या अस्तित्वाची, कारकिर्दीची जाणीव करून देणारा आपला कोंकण प्रांत! पेशवे कालीन मंदिरे, सकाळचा नारळाच्या माडांवरून डोकावणारा सूर्योदय व संध्याकाळी सूर्यास्ताच्या सोनेरी किरणांची समुद्रावर पडणारी सुवर्ण छाया, पावसाळ्यात कडेकपारीतून वाहणारा धबधबा इतकचं नव्हे, तर नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात अंगावर शाल पांघरून अंगणात केलेली शेकोटी, सकाळच्या न्याहरीसाठी केलेल्या अंबोळी, पोहे, उपमा, थालीपीठ तसेच जेवणातील सुरमई, पापलेट, सोलकढी आणि मोदकाचा आस्वाद, ह्या सगळ्याचा आनंद लुटण्यासाठी कोंकण हे देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करते. आलेल्या पर्यटकांचे आदरातिथ्य करणे हे पर्यटकांच्या व पर्यटनाच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वाचे आहे. कोंकण समुद्र पर्यटनासाठी तर प्रसिद्ध आहेतच. परंतु या कोकणच्या सौंदर्य खाणीत श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीच्या शौर्यगाथेचा आवाज किल्ले रायगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, देवगड, जंजिरा इ. अनेक ठिकाणी घुमतो. एक प्रकारे किल्ले पर्यटन नावाची संकल्पना साहसी तसेच ऐतिहासिक पर्यटकांचे आकर्षण ठरते. कोकणातून मुंबई-पुणे इतरत्र स्थायिक झालेल्या लोकांना कोंकणात मामाच्या गावाला जाणे किंवा आजोळी जाणे हे तर प्रचलित आहेच. सिमेंटच्या भिंतीपेक्षा लालबुंद चिरांच्या भिंतीतील गारव्याची मज्जा, दगडाचा कैरीच्या झाडाला लागलेला अचूक नेम, परसातील विहिरीतून पोहऱ्याने काढलेल्या थंड पाण्याची आंघोळ, असं जीवन असलेल्या आपल्या मामाचे गाव किंवा आजोळ विसरेल का हो कुणी? अनवाणी पायाला लाल मातीचा झालेला स्पर्श व आपल्या कपड्याचा बदललेला लाल रंग घरी परतल्यावर कोकणात फिरून आलो हे न सांगताच शेजारच्यांना अगदी सहज समजते.

मुंबईच्या चाकरमान्याला ओढ असते ती गणपती उत्सवाची! त्या गणपती उत्सवाला कोकणात हिरवा गालिचा पसरलेला असतो, कोंकणातील जी मंडळी परदेशात स्थायिक आहेत त्यांनी आपल्या बरोबर परदेशी मित्र परिवार जर आणले आणि त्यांचे आदरातिथ्य केले तर कोंकण पर्यटनाची मौखिक प्रसिद्धी नक्कीच होईल. गुहागर येथील व्याडेश्वर मंदिर, सिंधुदुर्ग आचरा येथील श्री रामेश्वर मंदिर, कुणकेश्वर मंदिर, अलिबाग येथील बिर्ला मंदिर, रत्नागिरी येथील काशीविश्वेश्वर मंदिर, कोळीसरे येथील श्री लक्ष्मी केशव मंदिर, गणपतीपुळे, पावस, डहाणू येथील महालक्ष्मी मंदिर, दिवेआगर येथील गणपती, आसूद चे केशवराज मंदिर अशी अनेक प्राचीन मंदिरे धार्मिक पर्यटनाची ओळख करून देतात.

कोकणातील मालवणी, आगरी, कोळी भाषा तसेच त्यांची सांस्कृतिक परंपरा शिमगा नृत्य, तारपा नृत्य, आदिवासी नृत्य, कोळी नृत्य, जाखडी नृत्य, बाल्या नृत्य, वाडा पालघर येथील वारली पेंटिंग यांच्या सादरीकरणातून तेथील लोककला दिसून येते. उत्सवातील जत्रा, पालखी हे पाहण्यासाठी आपल्या बरोबर कोंकण बाहेरील राहणाऱ्या मित्र परिवारास नेऊन 'यावा कोंकण आपलोच असा!' हे जणू पुन्हा येण्याचे आमंत्रण देतो. गावागावांतील गावकऱ्यांनी सादर केलेली नाटक हौशी कलाकार, हौशी प्रेक्षकांना मेजवानीच ठरते. हापूस आंबा फळांचा राजा हे तर एप्रिल-मे महिन्यातील सर्वांचे आकर्षण! अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांना स्वाद देणारे फळ कोकणात जाऊन खाण्याची लज्जत काही औरच! डहाणू, पालघर येथील चिक्कू महोत्सव एक दिवसाची सफर सहज घडवून आणतो. कोंकण हा तसा लघुपर्यटनाकरिता अतिशय सुलभ! मध्यमवर्गाकरिता

कोंकण हे जणू कॅलिफोर्निया!

कोकण रेल्वे प्रकल्पामुळे तर कोकण अधिकच आपल्या जवळ आल्या सारखे वाटते. साधी भोळी असणारी कोकणची माणसे आलेल्या अथिती चे स्वागत अगदी दिलखुलास पणे करतात. मग त्यांचे स्मितहास्याने केलेले स्वागत पर्यटकांच्या मनाला भुरळ घालते. देशाच्या व जगाच्या कोनाकोपऱ्यातून पर्यटक येतात आणि नैसर्गिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक नजराणा आपल्या दृष्टीपटलावर साठवत पुन्हा एकदा कोकणची वाट धरतात. भारतीय लोक जम्मू काश्मीर, राजस्थान, मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, केरळ, कर्नाटक इ. अनेक ठिकाणी भ्रमंती करतात तसेच त्यांनी आयुष्यात कोकणाला देखील अधिकाधिक पसंती द्यावी आणि त्याची प्रसिद्धी करून 'The Konkan Island of Tourism' अशी ओळख संपूर्ण जगाला करून द्यावी. मला वाटते कोकणातील पर्यटन व आदरातिथ्य ह्या दोन्हीही गोष्टी परस्परावलंबी आहेत, किंबहुना त्या असायलाच हव्यात. कोकणातील पर्यटन व तेथील आदरातिथ्य याचा अभ्यास करताना, मी केलेले निरीक्षण ह्या लेखाद्वारे मांडण्याचा थोडाफार प्रयत्न करीत आहे.

निसर्गरम्य, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जो कोकणाला लाभलेला आहे, तो वारसा कायमस्वरूपी जपण्यासाठी स्थानिक लोक, सरकार तसेच पर्यटन व्यावसायिक ह्या सर्वांनी एकत्र येऊन कोकणासाठी पर्यटन टिकविण्याच्या दृष्टिकोनातून काम केले पाहिजे. अर्थात काही ठिकाणी उत्तम काम केले गेले आहे किंबहुना करत आहेतच, यात काहीच शंका नाही. परंतू शास्वत पर्यटन कोकणच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल असं मला वाटत. नवीन पर्यटन स्थळे शोधून काढणे व ती विकसित करणे, मूलभूत सोयीसुविधा प्रामुख्याने पर्यटनस्थळी स्वच्छतागृह, रस्ते, वीजप्रवाह, दळणवळणाची साधने उपलब्ध करून देणे इ. औरंगाबाद येथील अजंठा, वेरूळ या ठिकाणी जशा महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने एसटी बस सेवा सुरू केल्या आहेत तशा धर्तीवर कोकणातील पर्यटनस्थळी बस सेवा सुरू केल्यास दळणवळणाची सोय अधिक सुलभ होईल. कोकणामध्ये अधिक पर्यटन महिती केंद्रे उभारल्यास पर्यटकांना अल्पावधीतच पर्यटन ठिकाणची व त्या जवळील पर्यटनस्थळांची तसेच तेथे उपलब्ध असलेल्या आदरातिथ्य (हॉटेल) व्यवसायाची माहिती मिळू शकेल. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पुढाकाराने प्रशिक्षित पर्यटक मार्गदर्शकाचा छोटासा अभ्यासक्रम चालवावा, जेणे करून त्या स्थानिक तरुणांना पर्यटन मार्गदर्शक म्हणून अर्थार्जन करता येईल.

कोकणामध्ये आदरातिथ्य व्यवसाय करताना प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता प्रचंड जाणवते. त्याकरिता काही मोठ्या हॉटेल व्यावसायिकांनी एकत्र येवून हॉटेल मॅनेजमेंटची तालुका स्तरावर किमान एक कॉलेज काढावयास हवे, त्यामुळे त्यांना अपेक्षित असणारे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल. 'एमटीडीसी'ने नुकतेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात वॉटर स्पोर्ट्स चालविणाऱ्या नागरिकांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे, असे केंद्र प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत करावयास हवे. काही अंशी कोकणामध्ये स्थानिकांच्या पुढाकाराने वॉटर गेम्स सुरू केले आहेत, परंतु त्या वॉटर गेम्सची साधने व त्यांचा मेंटेनन्स खूप खर्चिक आहे. जर अशा स्पोर्ट्स साधनांना आर्थिक मदत केली तर कोकणामध्ये सर्वच पर्यटन ठिकाणी अशा प्रकारचे वॉटर गेम्स सुरू करता येईल. पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखाने, ऊस कारखाने, दुग्ध व्यवसाय जसे सहकार क्षेत्रावर आधारित आहेत, त्या प्रमाणे पर्यटन व्यवसायासाठी देखील सहकार क्षेत्राच्या माध्यमातून आर्थिक हातभार लावावा.

कोकणामध्ये कोकम, आवळा, कैरी ह्यांचे उत्पादन भरपूर प्रमाणात आहे. हॉटेलमध्ये आलेल्या पर्यटकाला कोकम सरबत, आवळा सरबत, कैरी पन्हे ह्यांचा आस्वाद 'वेलकम ड्रिंक' म्हणून द्यावा. हॉटेलमध्ये आलेल्या पर्यटकांचे स्मित हास्य व वेलकम ड्रिंकने केलेले स्वागत पर्यटकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील.

कोकणातील खाद्य संस्कृती फार मोठी आहे. विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, तारकर्ली ह्या पर्यटनस्थळी बहुतांशी पर्यटक विविध खाद्य पदार्थांची लज्जत लुटण्यासाठी जातात. प्रत्येक हॉटेल व्यवसायिकांनी हे बंधन कटाक्षाने पाळावे की, स्थानिक खाद्य पदार्थांशिवाय उदा. चायनीज, पंजाबी, दक्षिण भारतीय पदार्थ पर्यटकांना उपलब्ध करून देवू नये. आपण जर दक्षिण किंवा उत्तर भारतात गेलो

तर तेथे आपल्याला आढळून येईल की, त्या ठिकाणी पर्यटकांना स्थानिक खाद्यपदार्थाशिवाय इतर कोणतेही खाद्यपदार्थ सहसा उपलब्ध करून दिले जात नाही.

दक्षिण भारतामध्ये जसे सर्कल टुरिझम आहे त्याप्रमाणे, कोकणात देखील सिंधुदुर्ग-रत्नागिरी-रायगड-ठाणे-पालघर अशा जिल्ह्यांमध्ये असलेल्या पर्यटनस्थळांची जाहिरात करून, त्या प्रत्येक ठिकाणी पोहचण्यासाठी बस सेवा सातत्याने सुरू ठेवल्यास पर्यटन वाढीस मोठी चालना मिळेल. हॉटेल रूम्स ची स्वच्छता, तेथे असणाऱ्या सोयी - सुविधा जर सुयोग्य असतील तर त्या स्थळी पर्यटक जास्तीत जास्त आकर्षित होतात. आजकाल डिजिटल जाहिरातीचा उपयोग, प्रसिद्ध ट्रॅव्हल वेबसाईट व टूर ऑपरेटर यांच्या बरोबर सामंज्यस करार पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अधिक उपयुक्त ठरतात.

कोकणामध्ये पुरेशी जागा असताना देखील काही ठिकाणी पार्किंगची समस्या जाणवते! पर्यटकांना त्यांची गाडी पार्किंग चे भाडे मोजून देखील सुरक्षित पार्किंग करता येत नाही. ह्यासाठी त्या ठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढाकार घेऊन त्या शहरातील व गावांमधील काही जागा पर्यटकांच्या गाडी पार्किंग साठी राखीव ठेवली पाहिजे. उत्तराखंड मधील नैनीतालला जशी टुरिझम पोलिस ही संकल्पना आहे, त्या धर्तीवर कोकणात देखील टुरिझम पोलिस ही संकल्पना राबविली पाहिजे.

कोकणात प्राचीन काळातील अनेक मंदिरे आहेत. होळी, गणपती अशा सणांकरिता कोकणवासीय एकत्र जमतात. तेथील यात्रा, पालखी, उत्सव पाहण्यासारखे असतात. ह्या अनुषंगाने कोकणा मध्ये धार्मिक पर्यटनास चालना मिळेल. सध्या कोकण हे समुद्र पर्यटनाकरिता अतिशय प्रसिद्ध आहे. परंतु त्याबरोबरच धार्मिक पर्यटन, कृषी पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, साहस पर्यटन इ. पर्यटनाकरिता प्रसिद्धीस येऊ शकेल. फक्त त्यासाठी पर्यटन विपणनाची आवश्यकता आहे. रायगड मधील 'माथेरान' तसेच सिंधुदुर्गमधील 'आंबोली' ही ठिकाणे जशी थंड हवेसाठी प्रसिद्ध आहेत, तसेच ह्या ठिकाणी जैवविविधतादेखील आढळते. त्या जैवविविधतेचा अभ्यास जैवविविधता पर्यटनाच्या माध्यमातून निसर्गप्रेमींना करता येईल.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा जसा शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून लक्षकेंद्रित केला आहे तसेच कोकणातील इतर पाचही जिल्ह्यांना अर्थात संपूर्ण कोकणाला 'पर्यटन क्षेत्र' म्हणून घोषित करावे, म्हणजेच संपूर्ण कोकणाचा विकास होऊ शकेल. अशा या विविधतेने समृद्ध असलेल्या कोकणामध्ये १२ महिने पर्यटन सुरू राहू शकते. फक्त पर्यटन व येणाऱ्या पर्यटकांचे आदरातिथ्य जर सुनियोजित असेल, तर कोकणामधील पर्यटन हे दीर्घकाळ टिकेल. त्याकरिता पुढील ३ बाबी लक्षात घेतल्या पाहिजे.

१. पर्यटनास आवश्यक असलेल्या सोयीसुविधा

२. पर्यटन जाहिरात किंवा विपणन

३. सुयोग्य व सुनियोजित आदरातिथ्य

एक गोष्ट फार महत्त्वाची आहे की, कोणताही आर्थिक विकास करताना त्या ठिकाणाची नैसर्गिक क्षमता लक्षात घेतली पाहिजे तेथील नैसर्गिक क्षमता डावलून कोणत्याही प्रकारे आर्थिक विकास करता येत नाही. कोकणामध्ये खऱ्या अर्थाने पर्यटन टिकवायचे असेल तर ते कृत्रिमरीत्या न विकसित करता कोकणामध्ये असलेली नैसर्गिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक क्षमतेच्या आधारावर विकसित केली पाहिजे. परंतु हे सर्व अमलात आणण्यासाठी फक्त सरकारी यंत्रणेवर अवलंबून न राहता सरकार, पर्यटनावर आधारित उद्योजक व स्थानिक लोक ह्यांचा त्रिवेणी संगम कोकणातील पर्यटन व आदरातिथ्य उद्योगास दीर्घकाळ यशस्वी करेल, ह्यात शंका नाही.

**व्यास दीपोत्सव २०२२**

**गुरूनाथ मोकल**

**यांसकडून**

**दीपावलीच्या शुभेच्छा!**



# कोकणातील बागायती फळ शेती

डॉ. राजेंद्र मुंबरकर

आम्हाला विकास हवा आहे, पण त्यासाठी मेहनत, पुढाकार, चिकाटी, सहनशीलता या गोष्टींची सुद्धा गरज असते. पण त्या बाबतीत कोकणातला माणूस थोडा कमी पडताना दिसतो. सद्यस्थिती पाहिल्यास या समूहातील काही उद्योजकांनी काजू प्रक्रिया उद्योगात खूप मोठी भरारी घेतली आहे. यातील काही उद्योजक २००३ साली दिवसाला चाळीस ते पन्नास किलोच्या आसपास काजू बी वर प्रक्रिया करत होते. सद्यस्थिती ते दिवसाला अडीच ते तीन टन काजू बी वर प्रक्रिया करत आहेत.

द

क्षिण कोकण भाग म्हणजे रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे या जिल्ह्यांची भौगोलिक परिस्थिती पाहता जांभा खडक असलेली लॅटॅराईट सॉईल, उष्ण दमट हवामान ही प्रामुख्याने येतील नैसर्गिक वैशिष्ट्ये आहेत. फलोद्यान पिकाला हे वैशिष्ट्य खूपच उपयुक्त आहे. त्यामुळे या भागातील आंबा, काजू ,कोकम, फणस, जांभूळ, नारळ, सुपारी या फळांना विशिष्ट स्वरूपाची गुणवत्ता प्राप्त झालेली आहे. अलीकडे चिकू, पपया, केळी या पिकांच्या लागवडीकडे सुद्धा येथील शेतकरी लक्ष द्यायला लागला आहे. या गुणवत्तेमुळे येथील फलोद्यान देशपातळीवरच नव्हे तर जागतिक पातळीवर वैशिष्ट्यपूर्ण ठरलेले आहे. या वैशिष्ट्यांच्या संदर्भात येथील शेतकरी वर्गाने योग्य नियोजन आणि व्यवस्थापन केले तर दक्षिण कोकणात वर्तमान आणि भविष्य काळातही चिरस्थाई रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील.

**फलोद्यान लागवड व उत्पादन :-** फळ पिकांच्या लागवडीच्या बाबतीत दोन्ही जिल्ह्यात मिळून आंबा पिकाखाली २,४५,५६१ हेक्टर क्षेत्रावर आंबा लागवड आहे. १,५३,२८० हेक्टर क्षेत्रावर काजू लागवड आहे. १३,६७१ हेक्टर क्षेत्रावर नारळ लागवड आहे. याचबरोबर जांभूळ, कोकम, फणस, सुपारी, आवळा याही फळ पिकांच्या लागवडीकडे येथील नागरीक वळू लागला आहे. विशेषत: या पिकांच्या लागवडीबाबत काही प्रगतशील शेतकरी बांधवांनी प्रयोग सुरू करून उत्पादन व दर्जा याबाबत कृषी विद्यापीठाप्रमाणेच स्वतःही अभ्यास करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४४,३१५ मेट्रिक टन इतके आंबा उत्पादन होते. जिल्ह्यात हापूसची प्रतिहेक्टरी उत्पादकता ३.४ मॅट्रिक टन इतकी आहे, तर केसर आंब्याची दर हेक्टर उत्पादकता पाच ते सहा मॅट्रिक टन इतकी आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून दरवर्षी ६०,००० मेट्रिक टन आंबा मुंबईत कृषी उत्पन्न बाजार समितीत घाऊक व्यापारांकडे विक्रीला जातो. एकूण उत्पादनापैकी २० ते ३० टक्के आंबा कॅनिंग उद्योगात प्रक्रियेसाठी जातो. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात किमान ६० ते ७५ हजार मेट्रिक टन इतका काजू बी तयार होतो. या उत्पादनापैकी फक्त ३० ते ४० टक्के काजू बी वर या जिल्ह्यांत प्रक्रिया होते. नारळ, फणस, सुपारी, कोकम या पिकांचे हंगामी उत्पादन मिळते. अलीकडे आवळा पिकाची सुद्धा व्यावसायिक लागवड व्हायला लागली आहे.

**फळ प्रक्रिया उद्योगांना मोठी संधी :-** रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात होणाऱ्या फळ पिकावर स्थानिक ठिकाणी प्रक्रिया करणारे उद्योग मोठ्या प्रमाणात उभे राहिल्यास येथील श्रमशक्तीला कायमस्वरूपाचा रोजगार मिळण्यास मदत होईल. सद्यस्थिती सिंधुदुर्ग जिल्ह्यात १२५, रत्नागिरी जिल्ह्यात ७५ च्या आसपास फळ प्रक्रिया उद्योग सुरू आहेत. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात छोटे-मोठे मिळून ४०० काजू प्रक्रिया उद्योग सुरू झालेले आहेत. तर रत्नागिरी जिल्ह्यात ३२५ पेक्षा अधिक छोटे व मध्यम स्वरूपाचे काजू प्रक्रिया उद्योग सुरू आहेत. फळ प्रक्रिया उद्योगात आंबा फळाबरोबरच कोकम, जांभूळ, आवळा, फणस या फळ पिकावर प्रक्रिया करून त्यापासून प्रक्रिया पदार्थ तयार केले जातात. येथील नागरिकांनी मनावर घेतले तर या दोन्ही जिल्ह्यात अजूनही उद्योग सुरू होऊ शकतात.

**फळ प्रक्रिया उद्योगाकरिता मूलभूत सोयींची गरज :-** मुळात दोन्ही जिल्ह्यात होणारी फळ पिके ही हंगामात तयार होतात. ती वर्षभर टिकून ठेवण्यासाठीची व्यवस्था होणे गरजेचे आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे या दोन्ही जिल्ह्यात एकही कोल्ड स्टोरेज किंवा रायपनिंग चेंबर नाही. याबाबत कोणीही आवाज उठवताना दिसत नाही. जर या फॅसिलिटी उपलब्ध झाल्या तर येथील उद्योजकाला वर्षभर आपला उद्योग सुरू ठेवता येणे शक्य होईल. त्यांना वर्षभर कच्च्या मालाची उपलब्धता होण्यास यामुळे चांगली सोय होऊ शकेल. शेतकरी वर्गालाही त्याच्या कच्च्या मालाचा योग्य भाव मिळू शकेल. तसेच दोन्ही जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी प्रक्रिया माल टेस्टिंग करण्यासाठीची लॅबोरेटरी उपलब्ध होणे गरजेचे आहे, की ज्या लॅबोरेटरीमध्ये सर्व प्रकारच्या अध्ययावत अशा स्वरूपाच्या प्रक्रिया मालाच्या टेस्टिंगच्या सोयी उपलब्ध असतील. अलीकडे काही प्रगतशील शेतकरी उद्योजकांनी केंद्र सरकारची फळ प्रक्रिया उद्योगाची समूह विकासाची योजना घेऊन छोटी छोटी कोल्ड स्टोरेज निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा अनुभव सकारात्मक आहे

**फळ प्रक्रिया उद्योगातील संधीचा योग्य प्रकारे लाभ घेतला जात नाही :-** दोन्ही जिल्ह्यात शासन पातळीवर फळ प्रक्रिया उद्योगाच्या वाढीसाठी काही मूलभूत प्रयत्न केले जात आहेत. त्यात एक महत्त्वाचा भाग म्हणजे जागतिकीकरणातील बाजारपेठेच्या स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी फळ पिकांचे भौगोलिक मानांकन

(ऋश्रेसीरहिळलरश्र खपवळलरींळेप - ऋख) करून घेणे महत्त्वाचे आहे. आपल्या दोन्ही जिल्ह्यासाठी आंबा व कोकम या पिकांचे भौगोलिक नामांकन प्राप्त झालेले आहे. तर सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी काजू पिकाचे 'वेंगुर्ला काजू' म्हणून नामांकन मिळाले आहे.

भौगोलिक नामांकन म्हणजे त्या विशिष्ट भागातील असणारे हवामान, जमीन व इतर नैसर्गिक परिस्थितीमुळे त्या त्या भागात तयार होणाऱ्या पिकाचे खास वैशिष्ट्य असते की जे इतर कोणत्याही भागात नसते. भौगोलिक मानांकन टॅग घेतलेला शेतकरी उद्योजक, प्रक्रिया धारक यांना आपला उत्पादित माल डायरेक्ट निर्यात करण्याची संधी उपलब्ध झालेली आहे.शिवाय शेतमालाची किंमतही वाढते. परंतु ही प्रक्रिया सुरू होण्यासाठी प्रमाणपत्र धारक शेतकरी, उद्योजक,विक्रेते किती असावेत याची मर्यादा असते.

दुर्दैवाची बाब म्हणजे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात २०००० पेक्षा जास्त आंबा उत्पादक आहेत, पण सभासद मात्र २९० इतकेच झालेले आहेत. काजू पिकाच्या बाबतीतसुद्धा हीच स्थिती आहे. काजू पिकासाठी भौगोलिक नामांकन घेऊन चार वर्षे होऊन जाऊन सुद्धा अद्याप १२५ शेतकरी,उद्योजक व विक्रेत्यांनी काजू पिकासाठीचे भौगोलिक मानांकन प्रमाणपत्र घेतले आहे. कोकम पिकासाठी केवळ ३० शेतकऱ्यांनी भौगोलिक मानांकन घेतले. अशा स्वरूपाची आपल्या लोकांची मानसिकता आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पणन महामंडळाने भौगोलिक मानांकन प्राप्त शेतकऱ्यांच्या व उद्योजकांच्या प्रक्रिया मालाला हमखास बाजारपेठ संधी मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. परंतु शेतकऱ्यांचा व उत्पादकांचा प्रतिसाद पुरेसा मिळताना दिसून येत नाही.

**शेतकरी उद्योजकांची मानसिकता बदलणे हे मोठे आव्हान :-** आम्हाला विकास हवा आहे, पण त्यासाठी मेहनत, पुढाकार, चिकाटी, सहनशीलता या गोष्टींची सुद्धा गरज असते. पण त्या बाबतीत कोकणातला माणूस थोडा कमी पडताना दिसतो.

आम्ही कोकण गांधी अप्पासाहेब पटवर्धन प्रस्थापित गोपुरी आश्रम, वागदे तालुका कणकवली च्या माध्यमातून, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि नाबार्ड, पुणे यांच्या सहकार्याने २००३ साली काजू प्रक्रियेच्या 'समूह विकासाचा' प्रयोग राबवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी आम्ही सलग २० वर्ष नव उद्योजकांच्या पाठीशी उभे राहिलो. त्यांची मानसिकता तयार करण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू ठेवला. त्यांच्या समोर आलेल्या अडचणी सोडवण्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहिलो. त्याचा सकारात्मक परिणाम साधारण दहा वर्षानंतर अनुभवायला मिळाला.

सद्यस्थिती पाहिल्यास या समूहातील काही उद्योजकांनी काजू प्रक्रिया उद्योगात खूप मोठी भरारी घेतली आहे. यातील काही उद्योजक २००३ साली दिवसाला चाळीस ते पन्नास किलोच्या आसपास काजू बीवर प्रक्रिया करत होते. सद्यस्थिती ते दिवसाला अडीच ते तीन टन काजू बीवर प्रक्रिया करत आहेत. गोपुरी आश्रम, नाबार्ड, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, सिंधुदुर्ग या आम्ही तीनही संस्थानी याकरिता सहनशीलता बाळगण्यासाठीचे सातत्य ठेवण्याचा प्रयत्न केलां त्याचे हे फळ आहे असे मला प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते. जे काजू प्रक्रिया उद्योजक दिवसा दोन ते तीन टन काजू बीवर प्रक्रिया करतात त्यांच्या उद्योगात ७० ते ८० महिला व दहा ते पंधरा पुरुषांना सलग दहा महिने रोजगार प्राप्त होतो. फलोद्यान प्रक्रिया उद्योगात किती रोजगार क्षमता याची कल्पना येईल.

**नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची : -** मला सातत्याने गोष्ट जाणवते ती म्हणजेच कोकणातल्या नेतृत्वाला फळ प्रक्रिया उद्योगाबाबत सजगता असलेली दिसत नाही. विशेषतः केंद्र सरकारच्या फळ प्रक्रिया उद्योजकांकरिता आर्थिक पाठबळाच्या असंख्य योजना आहेत. यावर कोणीही अभ्यास करताना किंवा कृती करताना दिसत नाही. पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्वाने शेतमाल प्रक्रियेच्या माध्यमातून त्या भागाच्या विकासाचा कायापालट केला.

परंतु कोकणचे नेतृत्व याकरिता प्रयत्न करताना दिसत नाही. ते होणे गरजेचे आहे. विशेषतः सहकाराच्या माध्यमातून दोन्ही जिल्ह्यात आंबा, काजू या पिकावर प्रक्रिया करण्याचे उद्योग निर्माण होणे गरजेचे आहे, असे झाले तरच येथील भविष्यकालीन तरुण पिढीला शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध होईल. याचे भान येथील नागरिकांनी आणि विशेषतः सगळ्याच पक्षाच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवणे गरजेचे आहे. एवढेच या निमित्ताने मला सांगावयाचे आहे. एक मात्र महत्त्वाची गोष्ट अशी आहे की दक्षिण कोकणात फळ पिकांच्या माध्यमातून रोजगाराची प्रचंड संधी उपलब्ध आहे. परंतु त्यासाठी अभ्यास नियोजन आणि व्यवस्थापन होणे महत्त्वाचे आहे. त्याकरिता सर्व नागरिक आणि नेतृत्वाचा पुढाकार असणे गरजेचे आहे.



# कोकणभूमीतील घरगुती व्यवसाय

**अरविंद कोकजे**

रत्नागिरी–सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुसंख्य जनता मुंबईच्या चाकरमान्यावर अवलंबून असते. सुशिक्षिततेचे प्रमाण वाढल्याने या परिस्थितीत काही प्रमाणात फरक होताना दिसतो आहे. या सर्व परिस्थितीत सुधारणा व्हावी अशी नुसती अपेक्षा न करता त्यासाठी झटून काम करणारी कार्यकर्त्यांची फळी निर्माण झाली पाहिजे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आर्थिकविकास हा पर्यटन, फलोत्पादन आणि त्यावर आधारीत प्रक्रिया उद्योग याच्यातून होऊ शकतो असे सातत्याने सांगितले जाते. त्याचा एक भाग म्हणून सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन, तर रत्नागिरी जिल्हा फलोत्पादन म्हणून शासनाने जाहीर केलेले आहेत. पण त्या उद्योगांना लागणाऱ्या मूळ पायाभूत सुविधा म्हणाव्या तशा विकसित झालेल्या नाहीत. पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा वेग संथ आहे. या जोडीला महिला अल्प बचत निर्माण करून ग्रामीण भागात महिला बचत गट स्थापन केले जात आहेत. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हे मिळून किमान तीन हजाराचे आसपास अधिकृत-अनधिकृत महिला गट स्थापन झालेले आहेत. त्यापैकी प्रत्यक्षात किती गट कार्यरत आहेत? त्यात महिलांचा सहभागकिती आणि त्याची आर्थिक उन्नती किती झाली याचे सर्वेक्षण होऊन अभ्यास झाला पाहिजे. शासकीय अधिकारी नियमाचे बाहेर जाऊन काही करण्यास तयार नाहीत, तर लोकप्रतिनिधी त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात काम करताना दिसत नाहीत. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुसंख्य जनता मुंबईच्या चाकरमान्यावर अवलंबून असते. सुशिक्षिततेचे प्रमाण वाढल्याने या परिस्थितीत काही प्रमाणात फरक होताना दिसतो आहे. या सर्व परिस्थितीत सुधारणा व्हावी अशी नुसती अपेक्षा न करता त्यासाठी झटून काम करणारी कार्यकर्त्यांची फळी निर्माण झाली पाहिजे.

महिला सबली करणासाठी स्थापन होणारे अल्प बचत गट सर्वसाधारण चकली, कडबोळी, शेंगदाणा लाडू, मेतकूट, कोकम सरबत अशा पदार्थांची प्रामुख्याने उत्पादने केली जातात. पण त्या वस्तूच्या विक्रीसाठी मार्केटिंगची व्यवस्था नाही. तसेच केंद्र आणि राज्य शासनाच्या अन्न आणि प्रशासन खात्याचे नियम पाळून मालाची विक्री करणे छोट्या व्यावसायिकांना शक्य होत नाही. माल पॅकिंग ही त्यातील मोठी समस्या आहे.

अल्प बचत गटांना लागणारे भाग भांडवल, त्याची उपलब्धता ही समस्या सोडवण्यासाठी विविध बँक वा सहकारी संस्था पुढे येतात. त्या संस्थांची आर्थिकस्थिती लक्षात घेता उपलब्ध निधीच्या प्रमाणात निधी देतात. पण जोपर्यंत उत्पादित मालाची विक्री व्यवस्था सक्षम होत नाही, तोपर्यंत महिला गट सक्षम होण्याची प्रक्रिया संथच रहाणार आहे.

अशा या पार्श्वभूमीवर माजी आमदार गोविंदराव निकम यांनी महिलांसाठी महिलांनी चालवलेली व महिलाच ती चालवतील असे उद्दिष्ट ठेवून 'रत्नागिरी जिल्हा महिला सहकारी पतसंस्था' स्थापन केली. रौप्य महोत्सव साजरी करणारी ही संस्था महिलांचे सबली करणासाठी प्रयत्नशील आहे. रस्त्यावर भाजीविक्री करणाऱ्या महिलांपासून अशिक्षित बेकार महिलेला आर्थिक पायावर उभे करण्याचे काम करत आहे. रत्नागिरी जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या या संस्थेची सभासदसंख्या १२४६२ आहे. त्याचे भाग भांडवल दोन कोटीचे आहे. सावर्डा, खेड, दापोली, लांजा आणि रत्नागिरी तालुक्यात कार्यरत आहे. मागणीप्रमाणे कर्ज देत असताना सुरू करण्यात येणारा व्यवसाय त्यांना फायदेशीर होईल का नाही याची तपासणी केली जाते. या पतसंस्थेने सुमारे चार कोटींच्यावर कर्जवाटप करून महिलांना सक्षम केले आहे. घेतलेले कर्ज फेडण्याची वृत्ती महिलांची असल्याने ही नियंत्रित ठेवण्याचा संस्था प्रयत्न करत आहे. कुटीर उद्योग, लघु उद्योग, दुग्ध व्यवसाय, हॉटेल व्यवसाय, खानावळ, पानपट्टी असे उद्योग सुरू करण्यास प्राधान्य दिले जाते. नर्सरी हा एक व्यवसाय करण्यास महिला पुढे येतात. त्यासाठी त्यांना उत्तम मार्गदर्शन करण्यात येते. नारळाचे झाडापासून झाप तयार करून विक्री करण्याचा प्रयोगही यशस्वी झाला आहे. महिलांचे सबलीकरण करण्यासाठी प्रयत्नशील असलेली ही पतसंस्था आज जिल्ह्यात कार्यरत आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात महिला मच्छिमार सहकारी संस्था आहेत. मासे खरेदी-विक्री, मासळी सुकवून त्याची विक्री करणे असे या संस्था काम करतात. या व्यवसायासाठी महिलांना भांडवलाची गरज असते. ते भांडवल पुरविण्याचे काम या संस्था करतात. या व्यवसायासाठी लागणारे साहित्य, बर्फ, पुरविण्याचे काम संस्था करते. कोळी समाज, अल्पसंख्याक महिला यामध्ये मोठ्या प्रमाणावर काम करतात. शासनाच्या त्याच्यासाठीच्या योजना आहेत. पण हा व्यवसायात काम करणाऱ्या महिलांचे आरोग्य हा एक प्रश्न आहे. विमा संरक्षणाबरोबर उत्तम आरोग्य सेवा शासनाने त्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे. कोकणातील सहाही जिल्ह्यात मच्छिमारी व्यवसायाची वार्षिक उलाढाल १५०० ते २००० कोटीपर्यंतची आहे. त्यामध्ये कोळंबी प्रक्रिया आणि ती परदेशात पाठवली जाते. परदेशी चलनाचा काही भाग या व्यवसायाच्या विकासासाठी, या व्यवसायात असलेल्यांच्या कल्याणासाठी मिळावा अशी

मागणी आहे. पण त्याचा पाठपुरावा या पाच जिल्ह्यातील निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधीनी केला पाहिजे. रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार हुसेन दलवाई यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रयत्न केले होते. त्यानंतर प्रयत्न झाले नाहीत.

रत्नागिरी-देवगड भागात आंबा प्रक्रिया उद्योग छोट्या प्रमाणात आहेत. एखाद्या महिलेने तसा उद्योग चालविणे शक्य नाही. पण या उद्योगाला लगणारा मजूर ग्रामीण भागात मिळत असल्याने सिझनल त्यांना रोजगार मिळतो. तांत्रिक कामासाठी लागणाऱ्या कर्माचाऱ्यांमध्ये सुशिक्षित महिला मोठ्या प्रमाणावर आहेत. तसेच मांसाहारी, शाकाहारी भोजन उपलब्ध होण्यासाठी हातगाडीचा व्यवसाय करणाऱ्या महिला आहेत. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात महिलांचे प्रमाण जास्त असले तरी शिक्षणाचा प्रसार झाल्याने ग्रामीण भागातील मुलगी शिक्षण घेते. आपल्या कुवतीप्रमाणे एखादा कोर्स करून त्यातून रोजगार मिळवण्याचा प्रयत्न करते. हे तिचे प्रयत्न वैयक्तिक असतात. तिच्या आईचा पाठिंबा तिला असतो. अशा प्रकारे महिला सबलीकरणाचे प्रयत्न चालू असतात. आज रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊन इंटरनेट सेवा, झेरॉक्स, मोबाईल सेवा उपलब्ध करून देणाऱ्या मुली आहेत. हे प्रयत्न मोठे नाहीत, पण या क्षेत्रात येणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढत आहे याची कुठेतरी नोंद घ्यावीच लागेल. आपल्या बहिणीच्या शिक्षणासाठी इंटरनेटची गरज आहे हे लक्षात आल्यावर मालवण तालुक्यातील ग्रामीण भागातील भावाने तिला डोंगरावर छोटी झोपडी बांधून दिली व ती अभ्यास करताना जंगली प्राणी वा अन्य त्रास होऊ नये म्हणून तिचे संरक्षणही तो करत होता. यचा अर्थ ग्रामीण भागातही तांत्रिक शिक्षणाचा प्रभाव निर्माण झाला असून ते घेण्यासाठी धडपड केली जाते. मुलींना सबलीकरणासाठी अशा शिक्षणाची गरज ग्रामीण भागात समजली आहे. त्याप्रमाणे प्रयत्न केले जातात. पर्यटन व्यवसाय वाढत आहे. त्यामुळे अशा सेवांची गरज आहे. अशी सेवा केंद्र ही काळाची गरज आहे. सेवा केंद्र कोणाचे यापेक्षा केंद्रात सेवा देण्यासाठी मुलींचा भरणा अधिक असतो हेही लक्षात घेण्याची गरज आहे. या व्यवसायाच्या वाढीसाठी इंटरनेट सेवा अधिक प्रभावी आणि सक्षम करण्यासाठी टेलिफोन खात्याने उपाय योजना केल्या पाहिजेत.

महिला बचत गटाबरोबर वैयक्तिक छोटे-मोठे (मध्यम) उद्योग करणाऱ्या महिला आहेत. माझ्या माहितीप्रमाणे मेघना करवडे या महिला कोकण रेल्वेच्या स्टॉलना आणि रत्नागिरी शहरातील काही हॉटेल व्यावसायिकांना तिखट शंकर पाळे, चकली असे पदार्थ बनवून विकतात. त्यांनी आपल्या गावातील पाच-सहा महिलांना रोजगार दिला आहे. दिवाळी फराळही त्या करून विकतात. यांत्रिकी नौका, यांत्रिकी छोटी होडी, होडी ने मासेमारी करणाऱ्यांना प्रतिवर्षी परवाना द्यावा लागतो. त्यासाठी विविध फॉर्म भरून कागदपत्र सादर करावी लागतात. या व्यावसायिकांची कागदपत्रे तयार करून शासनाच्या मत्स्य व्यवसायाच्या कार्यालयात सादर करण्याचे काम शालिनी मुसळे या महिला करतात. संगणक, ऑनलाईन, इंटरनेट या आधुनिक तंत्रांचा वापर करतात.

या कोकणातील महिला बचत गट, वैयक्तिक व्यवसाय करणाऱ्या महिला आपल्यापरीने सक्षम होण्याचा प्रयत्न करत आहेत. पण त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. कारण ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत निवडून आलेले लोकप्रतिनिधी मनापासून लक्ष घालत नाहीत. यांच्या सहभागाशिवाय महिला सबलीकरणाचे कामाला गती येणार नाही याची सर्वांनीच नोंद घ्यावी.

**व्यास दीपोत्सव २०२२**
**प्रमोद मोरेश्वर पोरे**
Financial Advisior & Licensed,
Mutual Fund Distributor
Mob. : 9867611344/7021316583
**यांसकडून**
**दीपावलीच्या शुभेच्छा!**




# कोकण प्रांतातील औद्योगिक वाढ

**केशव भट**

हवाई वाहतुकीसाठी मुंबईला आंतरराष्ट्रीय आणि डोमेस्टिक विमानतळाबरोबर नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळ, रत्नागिरी येथील थोड्याच कालावधीत सुरू होणारा विमानतळ व सिंधुदुर्ग येथील चिपी-परुळे विमानतळ जोडले जातील. संपूर्ण भारतात ही हवाई वाहतूक आणि सागरमाला उपलब्ध होणार येत्या काही वर्षात! याचाच अर्थ माल वाहतूक त्वरेने भारतभर किंवा जगभर होऊन भारतात तयार होणाऱ्या नाशिवंत मालाला विस्तृत बाजारपेठ उपलब्ध होणार!

कोकण प्रांतातील उद्योग क्षेत्राचा विचार करताना एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की मुंबई ही कोकण प्रांतातच मोडते. परंतु राज्यातील फक्त मुंबई परिसराची भरभराट व इतर प्रांत अविकसित हे चित्र टाळण्यासाठी एमआयडीसी (Maharashtra Industrial Development Corporation) ची स्थापना झाली. त्यावेळी ठाणे जिल्ह्याची व्याप्ती खूप मोठी होती आताचा पालघर जिल्हा ठाणे जिल्ह्यातच. ठाणे जिल्ह्याचाच भाग म्हणजे आताची नवी मुंबई आणि रत्नागिरी जिल्हा म्हणजे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग एकत्र होते. राज्याची औद्योगिक प्रगती मुंबईच्या अवतीभवती जास्त होत होती.

सध्याच्या तारापूर (बोईसर) येथील अणुभट्टी, त्यानंतर अंबरनाथ, डोंबिवली, बदलापूर, तळोजा, रसायनी म्हणजेच पाताळगंगा येथे उद्योगांचे विस्तार होण्यासाठी एमआयडीसीच्या औद्योगिक वसाहती विकसित होत गेल्या. जेएनपीटीमुळे उद्योजकांना कच्चा माल व तयार माल वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध झाला. त्यानंतर रोहा,माणगाव, महाड रत्नागिरी, येथे उद्योगांचा विस्तार होण्यासाठी प्रयत्न झाले, रत्नागिरी औद्योगिक वसाहत तर महाड आणि लोटे परशुरामच्या अगोदरची. येथे १९६४ च्या सुमारास भारत ॲल्युमिनियम कंपनी हा महाकाय ॲल्युमिनियम निर्मितीचा प्रकल्प येणार होता. परंतु आंबा बागायतदारांच्या व प्रदूषणाचे भीतीपोटी झालेल्या विरोधामुळे तो प्रकल्प बारगळला. या प्रकल्पासाठी रत्नागिरीला बारमाही बंदर आणि विमानतळ विकसित होण्यास प्रारंभ झाला.

रत्नागिरी नजिक निवळी पंचतारांकित औद्योगिक वसाहत स्थानिक विरोधामुळे रत्नागिरी ऐवजी कोल्हापूर नजिकच्या कागल येथे स्थलांतरित झाली.आज तेथे ६०००० रोजगार निर्मिती झाली असून येथील जीवनमान कमालीचे उंचावले आहे. सिंधुदुर्गात कुडाळ येथेही औद्योगिक क्षेत्र आहे वायमन गार्डन हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कार्यरत होऊ शकला नाही आणि तेथील औद्योगिक वाढ खुंटली. चिपळूणच्या खेर्डी वसाहतीत महाटेक्स प्रकल्प बारगळल्याने ती तितकीशी विकसित झाली नाही. गाणे खडपोली व लोटे परशुराम हे रासायनिक औद्योगिक क्षेत्र तग धरून



आहे. कोकणात अलीकडच्या वीस वर्षात दापोली व देवरुख येथे लघु औद्योगिक क्षेत्र विकसित झाली आहेत. राजापूर नजिकच्या रिफायनरी प्रकल्पाचा खेळखंडोबा सर्वश्रुत आहे.

आता राजापूर नजिक नाटे येथे अणुऊर्जा प्रकल्प आकार घेत आहे. या परिसरापासून वीस बावीस किलोमीटर अंतरावर बारसू-सोलगाव येथे ग्रीन रिफायनरी प्रकल्प येऊ घातला आहे त्याच अनुषंगाने जवळच आयलॉग जेट्टी येऊ घातली आहे जेट्टी सोबतच पोर्ट ट्रस्ट ही होणार रायगड मधील माणगाव भागात दिघी बंदर आहे सागरमाला या जलवाहतूक योजनेला मुंबई-गोवा-केरळपर्यंत जोडले गेले की सर्वात किफायती जलवाहतूक संपूर्ण कोकणाला उपलब्ध होईल. हवाई वाहतुकीसाठी मुंबईला आंतरराष्ट्रीय आणि डोमेस्टिक विमानतळाबरोबर नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळ, रत्नागिरी येथील थोड्याच कालावधीत सुरू होणारा विमानतळ व सिंधुदुर्ग येथील चिपी-परुळे विमानतळ जोडले जातील. संपूर्ण भारतात ही हवाई वाहतूक आणि सागरमाला उपलब्ध होणार येत्या काही वर्षात! याचाच अर्थ माल वाहतूक त्वरेने भारतभर किंवा जगभर होऊन भारतात तयार होणाऱ्या नाशिवंत मालाला विस्तृत बाजारपेठ उपलब्ध होणार! हे विवेचन एवढ्यासाठीच की केंद्र व राज्य शासनाने कोकणाच्या औद्योगिक निर्मितीच्या सर्व पायाभूत सुविधा व संधी उपलब्ध करून देऊनही म्हणावी तेवढी प्रगती झाली नाही

यासाठी केंद्र शासनाने पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयामार्फत स्वयंरोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सूक्ष्म लघु व मध्यम प्रकल्प उभारणीसाठीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यामध्ये ग्रामीण भागात विखुरलेल्या पारंपरिक कामगारांना आणि शहरी बेरोजगारांना



स्थानिक पातळीवर स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यावर जोर देण्यात आला आहे. या योजनेतून अस्तित्वात असलेल्या उत्पादन क्षेत्रातील उद्योगधंद्यांसाठी कमाल प्रकल्प मर्यादा रु. २५ लक्ष, सेवा उद्योगासाठी १० लक्ष आहे. विशेष म्हणजे स्वगुंतवणूक व अनुदानाव्यतिरिक्त बँकेकडून मध्यम मुदतीचे कर्ज उपलब्ध होणार आहे व यासाठी वयोमर्यादा किमान १८ वर्षे असेल, उत्पन्नाची मर्यादा नाही. शैक्षणिक पात्रता खूपच शिथिल केली आहे. उत्पादन करणाऱ्या उद्योग घटकासाठी प्रकल्प किंमत रुपये १० लक्ष व सेवा उद्योगासाठी प्रकल्प किंमत ५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त असेल तर किमान आठवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. याखेरीज बचत गट, औद्योगिक सहकारी संस्था, विश्वस्त संस्था, या योजनेचा लाभ घेऊ शकतात. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाची मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना कार्यरत आहे. या योजनेत राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार पात्र आहेत. अनुसूचित जाती जमाती, महिला, अपंग, माजी सैनिक यांच्यासाठी वयोमर्यादा पाच वर्षांसाठी शिथिल केली आहे. या योजनेत १० लाखांवरील प्रकल्पासाठीची किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रुपये २५ लाखांवरील प्रकल्पासाठी १० वी पास, प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रुपये ५० लाख तसेच सेवा कृषी पूरक उद्योगांसाठी कमाल रुपये १० लाख इतकी प्रकल्प मर्यादा किंमत आहे. यासाठी वैयक्तिक मालकी, भागीदारी तसेच वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट, मालकी घटक म्हणून पात्र आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या कार्यक्रमाची संपूर्ण अंमलबजावणी ऑनलाइन पद्धतीने होते.

अर्ज प्राप्त झाल्यावर प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेते. मंजूर प्रकल्प किमतीनुसार प्रवर्गवार मंजूरीची मानके निश्चित आहेत. मात्र राज्य शासनाचे अनुदान तीन वर्षे कालावधीसाठी अनुज्ञेय नाही. प्रकल्प यशस्वीरित्या कार्यरत झाल्यावर अनुदान ऑनलाईन पद्धतीने वितरित होते.

एमआयडीसीनेही नव्याने स्थापन होणाऱ्या औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट पाडण्यास उपयुक्त क्षेत्रापैकी २०% जागा एमएसएमई प्रकल्पांसाठी राखीव ठेवण्याचे धोरण अवलंबिले आहे. यापैकी २०% क्षेत्र विशेष प्रवर्गासाठी राखीव ठेवले जाते तर प्रकल्पाच्या आकारानुसार ५०० चौ. मी. ते २५०० चौ. मी. आकाराचे भूखंड राखीव ठेवण्यात येतात. मात्र २०१५ पूर्वी अस्तित्वात असलेल्या औद्योगिक क्षेत्रासाठी हे धोरण लागू नाही. म्हणजेच २०१५ पूर्वीच्या औद्योगिक क्षेत्रात एमएसएमई योजने खालील पात्र लाभार्थ्याला संधी नाही. यासाठी त्याला आपल्या जवळच नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित होण्याची वाट पाहावी लागेल किंवा त्याला सोयीचा भूखंड स्वखर्चाने घेऊन त्याचा औद्योगिक एनए करून त्यासाठी पाणी, वीज, रस्ता स्वखर्चाने करावा लागेल. शिवाय २०१५ पूर्वीच्या औद्योगिक क्षेत्रात ८० टक्के पेक्षा जास्त भूखंड वितरित झाले असतील तर लिलाव पद्धतीने भूखंड घ्यावा लागणार, जे आर्थिकदृष्ट्या न परवडणारे आहे. यासाठी एमआयडीसी ने अशा प्रत्येक औद्योगिक क्षेत्राचा ड्रोन सर्व्हे करून प्रकल्प कार्यरत नसलेले भूखंड युद्धपातळीवर ताब्यात घेऊन परत घेतलेल्या भूखंडापैकी २०% क्षेत्र एमएसएमई प्रकल्पासाठी जमिनीच्या मूळ किमतीत वितरित केले पाहिजेत म्हणजेच कोकण प्रांतातील नवी मुंबई, तळोजा, पाताळगंगा, रोहा, माणगाव, महाड, लोटे परशुराम, खेर्डी, गाणेखडपोली, रत्नागिरी, देवरुख,

दापोली, कुडाळ येथील भूखंड उदयोन्मुख उद्योजकांना उपलब्ध होतील

त्यातल्या त्यात दिलासादायक बाब म्हणजे उदयोन्मुख उद्योजकांनी अकृषिक परवानगी घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे खेपा घालण्याची जरूर नाही राज्य शासनाचे महसूल कलम ४४(अ) च्या तरतुदीनुसार औद्योगिक एनए करण्यासाठी ज्या दिवशी बदल झाला असेल तो दिवस व त्यापासून तीस दिवसांच्या आत धारकाने ग्रामविकास अधिकाऱ्यामार्फत तहसीलदारांना लेखी कळवायचे आहे. असे कळल्यानंतर त्यांनी औद्योगिक एनए देण्यास कुचराई केल्यास जिल्हाधिकारी त्याला रु. ५०० पर्यंत दंड आकारू शकतात.

स्वयंरोजगार निर्मितीसाठी उत्सुक असलेल्या युवकांनी https://maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर गेल्यास तेथून प्रकल्पासाठी ऑनलाइन ॲप्लीकेशन होऊ शकते याच संकेतस्थळावर कच्चा प्रकल्प अहवाल मिळू शकतो. त्यात आपल्या आवश्यकतेप्रमाणे बदल करून तो प्रकल्प अहवाल इतर योग्य कागदपत्रांसह आपण अपलोड करू शकता. कुठल्याही कार्यालयात जाऊन उंबरठा शिजवण्याची गरज नाही. या योजनेअंतर्गत विविध कार्यशाळा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविल्या जातात त्यासाठी आवश्यक तर संबंधित जिल्हा उद्योग केंद्राकडे संपर्क साधने सहज शक्य आहे

माणसाने एकदा ठरवलं तर काहीही होऊ शकतं! फक्त जिद्द आणि चिकाटी हवी! याचे एक छोटसं उदाहरण म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील डोंगरगाव ही जेमतेम ५०० लोकवस्ती असलेली वाडी. तेथील सिराज साखरकर आणि बंधू यांचा पूर्वी मँगो स्लाईसचा उद्योग होता. परंतु रस्ते विकास प्रकल्पात त्यांची अंबाबाग कापली गेली. आणि त्यांना इतर ठिकाणाहून आंबा विकत घेऊन हा धंदा सुरू ठेवणे आर्थिक दृष्ट्या न परवडणारे झाले म्हणून त्यांनी लोणची बनवण्याचा उद्योग सुरू केला. परंतु तेथेही म्हणावी तितकी आर्थिक गणिते जमली नाहीत. परंतु सिराज व त्यांचे बंधू यांनी जिद्द सोडली नाही. नव्याने बेकरी व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला तेथे पाव, खारी, टोस्ट अशी साचेबद्ध उत्पादने सुरू केली. परंतु काहीतरी वेगळे करण्याची जिद्द त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती म्हणून त्यांनी इन्स्टंट पराठे बनविण्यास सुरुवात केली. स्वच्छतेचे सर्व नियम काटेकोरपणे पळून आता तेथे गहू पराठा, मेथी पराठा, पुरी, पुरणपोळी इत्यादी ३० दिवसापर्यंत टिकणारे पदार्थ शाही पराठा या ब्रँड नेमने बनवले जातात. कर्नाटक, गोवा, गुजरात, केरळ, महाराष्ट्रातील निवडक ठिकाणे येथे हे उत्पादन वितरित होते. यासाठी त्यांना रोज साधारण तीन ते साडेतीन टन मैदा/आटा लागतो. यासाठीचे त्यांना बँकेने अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले. त्यांची स्वतःची R & D आहे. या डोंगरवाडी परिसरातील ३५ महिला निर्मिती ते ऑन लाईन ऑर्डर घेऊन वितरण व्यवस्था पाहतात. वाहतूक व्यवस्था येथील तरुण सांभाळतात. कोणतेही अनुदान किंवा शासकीय लाभ न घेता साखरकर बंधूंच्या अथक प्रयत्नातून आणि जिद्दितून नकळत आत्मनिर्भर भारत ही योजना साकारली गेली.

आता स्वरोजगार निर्मिती करू इच्छिणाऱ्या युवकांनी कुठला प्रकल्प निवडायचा याचं उत्तर..... तुम्हाला जो सहजी शक्य असेल तो म्हणजे अगदी मोटार मेकॅनिक, लॉन्ड्री, फळ/भाजीपाला विक्री केंद्र, बेकरी, मिठाई उत्पादन, पिठाची गिरणी, फॅब्रिकेशन वर्कशॉप, मूर्ती बनविणे, टेलरिंग, कशिदाकारी, पेंटिंग, प्लंबिंग, फास्ट फूड निर्मिती/विक्री. थोडक्यात तुमची आवड व जिथे व्यवसाय उद्योग व्यवसाय करणार तेथील गरज/मागणी लक्षात घेऊन सातत्यपूर्ण कष्ट करायची तयारी हीच यशाची गुरुकिल्ली! आता नोकरीसाठी वाट पाहायची की बेकार रहायचं की स्वतः कमवून आणखी कोणाला रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यायची हे ज्याचं त्याने ठरवावं! निर्णय तुमच्या हातात! सरकार दोन पावलं पुढे आलंय तुम्ही एक पाऊल पुढे टाका!

व्यास दीपोत्सव २०२२
लहू रामचंद्र पवार
यांसकडून
दीपावलीच्या शुभेच्छा!



# समृद्ध शेती, श्रीमंत शेतकरी काल, आज आणि उद्या

**डॉ. हनुमंतराव जगताप**

शेती आणि शेतकरी देशातील सर्वात महत्त्वाचा घटक जो आपणास कधीही उपाशी ठेवत नाही मित्रहो आज आपण भारतीय शेतीचा इतिहास सुरुवात नवनिर्मिती तंत्रज्ञान प्रगती संशोधन उद्योग व्यवसाय निर्यात पर्यटन आणि बरेच काही  या लेखातून आपण चर्चा करूया.

शेती पूर्ण जगात शेतीचा शोध दहा हजार वर्षांपूर्वी सर्वात प्रथम मध्यपूर्वेत म्हणजे आजचे इजराइल, पॅलेस्टाईन, जॉर्डन, तुर्कस्तान, कुवेत आणि इराक या देशांमध्ये त्यांच्या जवळपासच्या सुपीक प्रदेशात लागला. या ठिकाणी प्रत्यक्ष शेतीला सुरुवात करण्याअगोदर मनुष्य आणि स्त्रिया जंगलात जाऊन वनस्पतींचे निरीक्षण करून खाद्य योग्य अन्नाची बियाणे राखून ठेवत असत. ती पुन्हा पेरता येतात आणि त्यातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळते हे मनुष्य प्राण्यांच्या लक्षात आले आणि यावरून तो बियाणे गोळा करू लागला लागवड कापणी मळणी करून तो जास्त अन्नधान्य मिळवू लागला, परंतु सुरुवातीच्या काळात मनुष्य आपल्या हाताने शेतीची मशागत पेरणी इतर कामे करत होता. त्याच्या पुढील काही काळात प्राण्यांचा वापर शेतीसाठी सुरू झाला.

फार वर्षांपूर्वी शेतीच्या प्रारंभिक स्थितीत गवतांच्या काही जातींमधून गव्हाचे एमर व आईन कॉन हे दोन पीक प्रकार असे धान्य निर्माण झाले आणि मसुरी सारख्या डाळी शोधण्यात आल्या तसेच जवस आणि वाटाणे यांचाही पुढे शोध लागला. आणि याच प्रदेशात शेळ्या आणि मेंढ्या याचा देखील शोध लागल्यानंतर दुग्धजन्य पदार्थ मिळवण्यास सुरुवात झाली. या प्रदेशातून शेतीचा प्रसार उत्तर आफ्रिकेतील इजिप्त भूमध्य सागरी देश आणि आशिया खंडातील देशांतून युरोपमध्ये झाला. मध्यपूर्वेतील शेती शोधानंतर भारतात ही शेती पद्धती तीन हजार पाचशे वर्षांनंतर पोहोचली म्हणजे भारतीय शेतीचा देखील साडेसहा हजार वर्षांपूर्वीचा इतिहास आहे असे म्हणायला हरकत नाही. रशियन वनस्पती शास्त्रज्ञ कॉफी लोन यांनी जगातील आठ पिकांची उगमस्थाने सांगितले आहेत त्यामध्ये भारत-म्यानमार हा प्रदेश देखील आहेत. ११७ वनस्पतीची नोंद झाली आहे त्यामध्ये तांदूळ तूर, मूग, उडीद, चणे, चवळी, तृणधान्य, कडधान्य, वांगे, मुळा, काकडी, भाज्या, आंबा, चिंच, लिंबू, फळवर्गीय पिके याशिवाय ऊस, कापूस, तीळ, करडई, ताग, काळीमिरी, दालचिनी, तीळ यासारखी विविध प्रकारची महत्त्वाची पिके आहेत.

**भारतातील पुरातन शेतीचे स्वरूप**

भारतीय शेतीत स्थानिक परिस्थितीशी सुसंगत काटक बियाणांचा वापर केल्याने माती आणि शेतीतील जैवविविधता टिकून राहिली. अर्थातच त्याने भारतीय शेती टिकून राहिली शेतीची शाश्वतता टिकवण्यासाठी पाणी, माती, जंगले यांचे संवर्धन महत्त्वाचे ठरले. म्हणून प्रत्येक गावात गावतळे सापडते आणि त्याचे पाणी शेतीसाठी तसेच त्यातील गाळ काढून शेतीची सुपीकता वाढवली जात असे. त्यामुळे स्वच्छ हवा झाडे पाणी आरोग्यदायी वातावरण निर्माण होत असेल.

**इंग्रजांच्या काळातील भारतीय शेती**

इंग्रज आपल्या देशात येण्यापूर्वी भारतातील ग्रामीण प्रदेश शेती व्यवस्थापनाबाबत स्वायत्त होता. शेतीत काय कसे कोणते कोणी पिकवायचे, उत्पादनाचा वापर विनियोग हे शेतकरी स्वतः ठरवत असे. तेव्हा शेतकरी स्वायत्त होते. इंग्रजी राजवटीमध्ये मात्र स्वायत्ततेवर बंधने घालण्यात आली. ग्रामस्थांच्या जंगलाचा अधिकार हिरावून घेण्यात आला. जमिनीवरील शेतसारा जो पाच टक्के होता तो ५० टक्के पर्यंत वाढवला. पीक येवो अथवा न येवो परंतु शेतसारा देणे अनिवार्य केले. इंग्रजांनी अन्नधान्याच्या पिकांना पसंती देण्याच्या ऐवजी कापूस, निळ, ऊस, भुईमूग अशा नगदी पिकांवर भर देण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्याचे अतोनात हाल झाले. इंग्रजांच्या या चुकीच्या धोरणामुळे जमीनदार आणि सावकार यांचा नवा वर्ग निर्माण झाला आणि शेतकऱ्यांच्या लुटीला सुरुवात झाली. शेतकरी कर्जबाजारी होऊ लागला. कर्जफेड वेळेवर न झाल्यामुळे शेती सावकाराच्या घशात जाऊ लागल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या गरिबीत प्रचंड वाढ झाली या सर्व बाबींमुळे देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या काळापर्यंत शेतीची दुरवस्था झाली. सरकारच्या धान्य चुकीच्या वितरणामुळे लाखो लोक मृत्यू पावले.

**स्वातंत्र्याच्या नंतरचा हरित क्रांतीचा काळ**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर १९५०- ५१ पासून भारतीय नियोजन मंडळाच्या नियोजनानुसार पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून विकास प्रक्रिया सुरू झाली. कृषी क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्रांचा विकास घडवून आणण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू, डॉक्टर राजेंद्र प्रसाद लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, अटल बिहारी वाजपेयी, राजीव गांधी, डॉक्टर मनमोहन सिंग आणि आता नरेंद्र मोदी अशा अनेक थोर नेत्यांनी देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. स्वातंत्र्यानंतर कारखानदारी वाढली. कृषी उद्योगात रासायनिक खतांचे प्रमाण वाढले. उद्योग, बंधारे, कॅनॉल, धरणे

बांधणे इत्यादी प्रकारे कृषी उत्पादन वाढवण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्यामुळे भारतात हरित क्रांती १९६६ ते १९६९ या काळात घडून आली.

**कोकणातील शेती आणि शेतकरी**

महाराष्ट्रातील कोकण वैभव संपन्न निसर्गाचे औदर्य आणि माणुसकीचे सौंदर्य म्हणजे कोकण. पालघर, ठाणे ते सिंधुदुर्ग, सावंतवाडी अगदी गोवा हद्दीपर्यंत. मुंबईचा समावेश कोकण विभागामध्ये आहे कोकणात शेती क्षेत्रातील विकासासाठी पुढील उपाययोजना करता येतील :

**नैसर्गिक शेती** - बासमती तांदूळ, वाडा कोलम, ब्राऊन तांदूळ, काळा तांदूळ, रासायनिक खतमुक्त उत्पादन यांना संपूर्ण भारतभर मोठ्या प्रमाणात मागणी आहे ते देखील उत्पादन आपल्याला कोकणात करता येऊ शकेल,

**भाजीपाला -** कमीत कमी कालावधीत जास्तीत जास्त उत्पादन शक्य. कोथिंबीर, मेथी, पालक, मुळा उत्पादन शक्य.

**फळभाजी -** वांगी, कारले, तोंडले, काकडी, टोमॅटो, पडवळ शिराळे, दुधी हे उत्पादन शेतीत थोड्याशा पाण्याच्या सुविधा घेतही करता येऊ शकते आणि अन्य उत्पादने म्हणजे सुरण, अळू, बटाटे, रताळे, कोणफळ, कनगर.

**फुल उत्पादन -** झेंडू, शेवंती, गुलाब, गुलछडी, तुळशी, चाफा इत्यादी उत्पादन अगदी सहज घेता येते हे सर्व उत्पादन मुंबई बाजारात दररोज विक्री करता येते आणि नगद पैसा मिळवता येतो.

**फळ उत्पादन** - आंबा, नारळ, चिकू, फणस, काजू, सुपारी यांचे नैसर्गिक आणि आधुनिक पद्धतीने उत्पादन घेता येते.

**दुधउत्पादन -** कपिला गाय, गीर गाय, जर्सी, न्यू जर्सी, म्हैस, बकरी यांच्या दुधाचे उत्पादन घेता येते. आपल्या कोकणात पाऊस भरपूर असल्यामुळे नैसर्गिक चारा उत्पादन भरपूर आहे. जुलै ते फेब्रुवारीपर्यंत सहजरित्या चारा उपलब्ध आहेत त्यामुळे दूध उत्पादन आणि दुधापासूनचे उत्पादन मिळवता येते. हे उत्पादन मुंबई बाजारात विक्री करता येते.


**बकरी पालन -** घरात अंगणात परसदारांमध्ये पाच दहा बकऱ्या सहज पाळता येतात आणि त्या संपूर्ण कुटुंबाचे अर्थशास्त्र सांभाळतात आणि चांगले उत्पन्न मिळवून देतात. त्यासाठी कोकण कन्या आणि उस्मानाबादी शेळ्यांच्या जाती उत्तम आहेत.

**कोंबडी पालन -** देशी कोंबड्या आर आर कोंबडी यासारख्या अंडी आणि मास उत्पादनासाठी उत्तम. फक्त २०० ते ३०० कोंबड्या पानातून दररोज ७० ते ८० देशी अंडी मिळतात या अंड्याची किंमत चांगली आहे. खाद्य कमी लागते नफा चांगला मिळतो. ज्यांना शेतीत काम करायचे नाही परंतु उत्पन्न कमवायचे आहे त्यांना असे उत्पादन घेता येते. शेतात जाऊन शेवग्याच्या शेंगा, कडीपत्ता, आले, हळद, केळी, पपई, तुळशी, अळू या कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून देतात.

**कोकणातील कारखानदारी**

ग्रीन टी, दंतमंजन, अर्जुन साल पावडर, बेलांच्या पानाची पावडर, शेवग्याच्या पानांची पावडर, कडीपत्ता पावडर, रताळ्याची वेफर्स, मसाले काजूगर, फणस पावडर, सुपारी पासून मुखशुद्धी, हळद पावडर, राजगिरा उत्पादन, शेंगदाणा प्रक्रिया उद्योग, खाद्य उत्पादन, कडधान्य, उत्पादन, आणि प्रक्रिया उद्योग बांबू उद्योग बांबू प्रक्रिया उद्योग बायो सीएनजी बायोडिझेल इथेनॉल फर्निचर उत्पादन कृषी पर्यटन, मत्स्य उत्पादन, मत्स्य प्रक्रिया, उद्योग फळ प्रक्रिया उद्योग, भाजीपाला प्रक्रिया उद्योग, फळे भाजीपाला निर्यात, कृषी अवजारे उद्योग, कृषी प्रशिक्षण व्यवसाय, आणि अनेक अशा प्रकारचे उद्योग जे आपणास सहज आणि कमीत कमी भांडवलात आपल्याला करता येतात. जे कोकणात चालू शकतात. ज्या आपल्या बांधवांना आर्थिक अडचणीमुळे उद्योग करता येणार नाहीत त्यांनी जिल्हा उद्योग केंद्र, नाबार्ड, राष्ट्रीय बँका, पंतप्रधान रोजगार, उद्योग विभाग लघुउद्योग, उद्योग यांच्याकडून सवलतीच्या दराने कर्ज मिळते तसेच सबसिडी देखील मिळते.

बस आपल्या मनाची तयारी पाहिजे उद्योग कोणताही करता येऊ शकेल, मुंबई सारखी जागतिक बाजारपेठ आपल्या हाकेच्या अंतरावर आहे. कोणतेही उत्पादन मुंबईत सहज विकता येते. मग काय? करूया ना आपण देखील कारखाना सुरुवात. शुभस्य शीघ्रम् आता चाकरमाने नाही तर कारखानदार, उद्योगपती, बांबू सम्राट, नैसर्गिक शेती, निर्यातदार आणि चहा उत्पादक, डेरी संस्थापक आणि भरपूर काही.. आपण चार पावले पुढे टाकली तर या आम्ही दहा पावले आपल्याकडे येऊ आणि सर्वतोपरी आपणास सहकार्य करू विना सहकार नाही उद्धार!




मूल्य रु.40/-

**असंच का?**
माधुरी बागडे- अलई

सोप्या गोष्टी सांगून समजावलं तर शिकण्यातली मजा, औरच असते. **असंच का?** या विज्ञान कथातून लेखिकेने मुलांच्या विचारशक्तीला चालना दिली आहे.




**विज्ञानरंजन**
संजय पाठक

मूल्य रु.150/-

साध्या सोप्या मराठी भाषेतून विज्ञान त्यातील मूलभूत आणि रंजक माहिती विद्यार्थ्यांना देणारे वैज्ञानिक संकल्पना रंजकपणे उलगडणारे पुस्तक **विज्ञान रंजन...**




**नैसर्गिक आश्चर्ये**
संजय पाठक

मूल्य रु.150/-

**निसर्गातल्या अनेक घडामोडी आपल्याला अचंबीत करतात आजची मुले खूप जिज्ञासू आहेत अशा मुलांना नैसर्गिक आश्चर्ये वाचून खूप आनंद मिळतो...**




संजय पाठक

**शक्तिमान अणू**

मूल्य रु.60/-

अणुउर्जा ही विविध क्षेत्रात आपल्याला वरदान ठरली आहे त्यामुळे ते समजून घेणे खूप गरजेचे आहे लेखक संजय पाठक यांनी हा विषय सहज समजेल अशा सोप्या भाषेत शक्तिमान आणू या चित्रमय पुस्तकाद्वारे मांडला आहे....




मूल्य रु.200/-

**आनंदकुळ**
डॉ. अरुंधती भालेराव

माझ्या ओंजळीत जे आहे ते खूप आहे असं म्हणत ती ओंजळ रीती करण्याचा आनंद शब्दांच्या पलीकडला असतो. हा आनंद कसा शोधायचा याचं सुरेख विवेचन डॉक्टर अरुंधती भालेराव यांच्या आनंदकुळ या पुस्तकात वाचावयास मिळते...

पोस्टल सेवा मोफत



# कोकणातील सागरी मासेमारी

**प्रा. डॉ. बाळासाहेब चव्हाण**

महाराष्ट्र राज्याला विशेषतः कोकणामध्ये खारे, गोडे आणि निमखारे पाणी असे तिन्ही प्रकारचे नैसर्गिक जलस्रोत उपलब्ध आहेत. या उपलब्ध असलेल्या नैसर्गिक जलस्रोतांच्या सुयोग्य नियोजनाद्वारे मत्स्य उत्पादन वाढवून नीलक्रांती घडविणे ही काळाजी गरज आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात मत्स्य व्यवसायाचा महत्त्वाचा वाटा आहे. कोकणामध्ये सागरी मासेमारी व्यवसायामुळे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील लोकांकरिता स्वस्त व पोषक अन्न उपलब्ध होते. त्याचबरोबर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. या अनुषंगाने या लेखामध्ये कोकणातील सागरी मासेमारी या विषयी आपण सविस्तर माहिती जाणून घेऊया.

**म कणामध्ये मासेमारी करण्यासाठी उपलब्ध असलेली साधनसंपत्ती आणि त्यामधून मिळणारे उत्पन्न.**

कोकणातील मुंबईसह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर आणि ठाणे या सहा जिल्ह्यात एकूण ७२० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून उत्तरेकडील झाई ते दक्षिणेकडील तेरेखोल खाडीपर्यंत या किनाऱ्याचा समावेश आहे. निसर्गाच्या कृपेने लाभलेल्या किनारपट्टीचा उपयोग येथील भूमिपुत्रांनी मत्स्योद्योगाच्या रूपात रोजगाराचे साधन म्हणून केला आहे. अनेक शतकांपासून पारंपरिक पद्धतीने सुरू असलेली कोकणातील मासेमारी बदलत्या काळानुसार मासेमारीच्या साधनसामग्रीत सुधारणा करून आज यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून प्रगती साधत आहे, ज्यावर येथील मच्छीमार उदरनिर्वाह करत आहेत.

समुद्रामध्ये जाऊन मासेमारी करणे हे खूप कठीण आणि अवघड काम आहे. महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या आकडेवारीनुसार ठाणे व पालघर या जिल्ह्यामध्ये ९८, मुंबईमध्ये ३६, रायगडमध्ये १९५, रत्नागिरीमध्ये ११० आणि सिंधुदुर्गमध्ये ८७ अशी एकूण ५२६ मत्स्यमारीची गावे आहेत. ठाणे/पालघर जिल्ह्यात मच्छीमार लोकसंख्या ११४८९९ इतकी आहे, तर मुंबई जिल्ह्यात ३२५१६, रायगडमध्ये ११३८४७, रत्नागिरी जिल्ह्यात ७१६२० आणि सिंधुदुर्गातील ३२०१७ मच्छीमार लोकसंख्या आढळून येते. तसेच कोकणातील सागरी जिल्ह्यांमध्ये मासेमारी बंदर, मासेमारी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या यांत्रिकी आणि अयांत्रिकी नौका, मासेमारी करणाऱ्या कुटुंबांचा आणि लोकसंख्येचा विचार केला तर यामध्ये ठाणे व पालघर जिल्ह्यामध्ये २९ बंदरे, मुंबईमध्ये १९, रायगड ४५, रत्नागिरीमध्ये ४६, तर सिंधुदुर्गमध्ये ३४ बंदरे आहेत. ठाणे व पालघर जिल्ह्यामध्ये २३५०, मुंबईमध्ये ४२९७, रायगडमध्ये २४१८, रत्नागिरीमध्ये २२६७, तर सिंधुदुर्गमध्ये १६१८ अशा एकूण १२९४६ यांत्रिकी नौका आहेत. तर ठाणे, पालघर जिल्ह्यामध्ये १४, मुंबई १५०, रायगड ५८०, रत्नागिरी ७७१, तर सिंधुदुर्ग ६६६७ अशा एकूण २२७२ अयांत्रिकी नौका आहेत. ठाणे व पालघरमध्ये २७८९४, मुंबई ८१४७, रायगड २४६७६, रत्नागिरी १६६९६ व सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७३०४ मच्छीमार कुटुंब आहेत.

कोकणातील सर्व सागरी जिल्ह्यामधून सन २०२०-२१ मध्ये ३९८५११ दशलक्ष टन सागरी मत्स्य उत्पादन झाले आहे. यामध्ये ठाणे व पालघर जिल्ह्याचे ६७५४७ दशलक्ष टन, मुंबई २१०२६० दशलक्ष टन, रायगड ३८०१९ दशलक्ष टन, रत्नागिरी ६५३७४ दशलक्ष टन व सिंधुदुर्ग १७३११ दशलक्ष टन सागरी मत्स्योपादन झाले आहे.

**कोकणात मिळणारे प्रमुख सागरी मासे**

महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाच्या आकडेवारीनुसार कोकणातील समुद्रामध्ये सुमारे ४९ व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या माशांच्या आणि इतर प्रजाती आढळतात. यामध्ये प्रामुख्याने सार्डिन, नॉन पेनाईड प्रॉन्स (कोळंबी), बोंबील, पेनाइड प्रॉन्स, प्रॉम्फ्रेट (पापलेट), सीअर फीश, ब्लॅक प्राम्फ्रेट (सारंगा), ईल्स, लॉबस्टर आणि मॅकरल (बांगडा) इत्यादी तसेच खेकडे आणि माकुळ यांचाही प्रामुख्याने समावेश असतो.

प्रमुख मासेमारीमध्ये बोंबीलाचे सरासरी वार्षिक उत्पादन ३१ हजार ५०० टन एवढे आहे. ही मासेमारी सप्टेंबर ते डिसेंबरमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. यानंतरही बोंबील मासेमारी केली जाते. सुके बोंबील मत्स्य खवय्यांचा आवडीचा मासा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बहुतांश लोकांपर्यंत याची विक्री होते. सारंगा जातीच्या माशामध्ये काटे कमी असल्याने खवय्यांमधून याची मागणी जास्त असते. याची किंमतही जास्त असते. मालवणचा बांगडा म्हणून जगभर प्रसिद्ध असणाऱ्या बांगडा माशाला अत्यंत लोकप्रियता आहे. मालवण, वेंगुर्ला किनारपट्टीवर हा मासा जास्त प्रमाणात आढळतो. रापण पद्धतीने या माशाची मासेमारी केली जाते. दाढ, घोळ हे मासे खोल समुद्रात सापडतात. या माशांचे आकारमान मोठे असल्याने मत्स्य उत्पादनात त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तसेच सुरमई, मुशी, ढोम, वाम, रावस, हलवा, सफेद कोळंबी, जवळा, शेवंड अशा विविध प्रकारच्या मासळी कोकणी किनारपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात आढळत असतात.

**मासेमारी साधने व पद्धती**

महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्रात सुमारे ७२ मीटर खोलीपर्यंत यांत्रिकी व बिगर यांत्रिकी नौकांद्वारे मासेमारी केली जाते. समुद्र किनाऱ्यापासून २ किमी अंतरापासून लहान लोड्या, मचवे याच्या माध्यमातून बोई, बोंबील, लहान शिंगाळी, काटी, शेवंड, कोळंबी, लहान मुशी

या प्रकारची मासेमारी केली जाते. किनाऱ्यापासून २२ सागरी मैलावर डोल, दालदा व ट्रॉलर या माध्यमातून विविध पद्धतीच्या मच्छीमारी जाळ्यांचा वापर करून सरंगा, रावस, घोळ, दाढा, कोता, वाम, शिंगाब, बांगडा, मुशी अशा मोठ्या जातीच्या माशांची केली जात असल्याने मासेमारी क्षेत्रात अमूलाग्र बदल झाला आहे.

**कोकणातील सागरी मासेमारी**

आंतरराष्ट्रीय सागरी सीमा नियमाप्रमाणे किनाऱ्यापासून २०० मैलापर्यंतचे क्षेत्र संपूर्ण आर्थिक क्षेत्र म्हणून मानले जाते. तसेच किनाऱ्यापासून १२ सागरी मैल या क्षेत्रांवर केंद्राने राज्यांना मत्स्यमारीसाठी कायदे करण्याचे अधिकार दिलेले आहेत. समुद्राच्या पाण्यात १०० फॅदम खोलीपर्यंतच्या भागात जिवंत प्लवंग वनस्पती जास्त प्रमाणात आढळतात. हे प्लवंग, माशांचे आवडते खाद्य असल्यामुळे मासेमारीसाठी हा भाग खूपच महत्त्वाचा ठरतो.

खोल समुद्रातील मासेमारी, उथळ पाण्यातील मासेमारी आणि खाडीतील मासेमारी अशा तीन पद्धतीने मासेमारी चालते. कोकणातील खाड्यांमध्ये बोई, ताऊस, काळुंद्रा इत्यादी प्रकारचे चविष्ट मासे सापडतात. यांचे संवर्धन मात्र पारंपरिक पद्धतीनेच केले जाते. यांच्या संवर्धनात विशेष लक्ष दिल्यास माशांचे उत्पादन चांगल्या रीतीने वाढू शकते.

मात्र समुद्रातील मत्स्यसाठा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. त्यामुळे मत्स्य उत्पादनही कमी होत आहे. यासाठी आपणाला निमखाऱ्या पाण्यातील आणि खाऱ्या पाण्यातील माशांचे योग्य संवर्धन करणे गरजेचे आहे. असे केल्याने राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये वाढ होण्यास मदत होईल.

कोळंबी संवर्धनाबरोबरच कालवे, काकई यांचे संवर्धन कोकणात समुद्रात देखील करता येणे शक्य आहे. अशा संवर्धनासाठी सहकारी संस्था तसेच स्थानिक नागरिकांना प्रोत्साहित करणे लाभदायक ठरेल. सागरी पिंजरा संवर्धनामध्ये विकास घडवून आणण्यासाठी बीजोत्पादन केंद्रे, सहकारी संस्था, शैक्षणिक-संशोधन संस्था, बँका, महामंडळे, सरकारी उपलब्ध सागरी क्षेत्राचा विचार करता, असे संवर्धन लोकप्रिय करणे काळाची गरज आहे.

**मत्स्य सहकारी संस्थांची महत्त्वाची भूमिका**

मच्छिमारांच्या हितांची जपणूक करण्यासाठी कोकण प्रांतातील सागरी किनारी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात विविध कार्यकारी मच्छिमारी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या संस्थांमार्फत मत्स्य खरेदी, विक्री, डिझेल विक्री, मच्छिमारांच्या नौकांसाठी लागणारे साहित्य माफक दरात पुरविले जाते. मत्स्य उत्पादन घटक असल्याने कार्यरत संस्थाही घसरत आहेत. परंतु बदलत्या काळात मत्स्य उत्पादनात वाढ होण्याकरिता या संस्थांच्या माध्यमातून वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत. कुलाबा येथील ससून व माझगाव बंदरातून मासेमारीची विक्री केली जाते. मुंबईमधील एक्स्पोर्ट कंपन्यामध्ये अत्याधुनिक शीतगृहे असल्याने शीतगृहे असल्याने हजारो टन मासळी साठवून ठेवण्याची क्षमता त्यांच्याजवळ असते. या कंपन्या येथील बंदरातून उच्च प्रतीचे मासे मोठ्या प्रमाणात खरेदी करतात.

**सागरी मत्स्य व्यवसाय, नौकानयन, सागरी इंजीन देखभाल व परिचालन प्रशिक्षण कार्यक्रम**

यांत्रिकीकरणाद्वारे प्रगत मच्छिमारी तंत्राचा अवलंब करून मत्स्योत्पादन कसे वाढवावे याचे मच्छिमार युवकांना सर्वांगिण प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सातपाटी व वसई (ठाणे), वर्सोवा (मुंबई), अलिबाग (रायगड), रत्नागिरी (रत्नागिरी) व मालवण (सिंधुदुर्ग) येथे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली आहेत. जिथे प्रशिक्षण कालावधी सहा महिने असून प्रशिक्षण सत्रांमध्ये २ (१ जानेवारी ते ३० जून) व (१ जुलै ते ३१ डिसेंबर) २२ प्रशिक्षणार्थी शिकू शकतात.

**मच्छिमारांवरील संकट**

मात्र सरकारने मासेमारीसंदर्भात लागू केलेले नियम पाळले जात नाहीत. १ जून, १५ ऑगस्ट हा कालावधी मत्स्य प्रजननाचा असल्याने या कालावधीत शासनाने मच्छिमारीवर बंदी घातलेली असते. असे असतानाही या काळात मासेमारी केली जाते. त्यामुळे मत्स्य उत्पादन घटत आहे.



# कोकणभूमीतील औषध निर्मिती आणि आयुर्वेद विकास

**वैद्य सुविनय दामले**

येवा कोकण आपलाच आसा ही टॅगलाईन सांगणारी आमची सिंधुसंस्कृती ! शब्द स्पर्श रूप रस आणि गंध यांची अनुभूती देत मन आत्मा आणि इंद्रियाना सुखावून टाकणारी इथली लाल माती.... इथेच दिसेल,कोणत्याही संकटांचा सहजपणे सामना करण्यासाठी आवश्यक असलेली निधडी छाती... आणि मना मनाने जोडून ठेवलेली कोकणची नाती...

कोकणप्रांत म्हटला हिरवागार निसर्ग डोळ्यासमोर झुलू लागतो.आकाशाशी स्पर्धा करणारे ऊंच ऊंच डोंगर, त्याच ऊंचीला साजेशा खोल खोल दऱ्या नेत्रसुख देतात, तर दऱ्यामधून थेट कानात घोंगावणारा अल्लड वारा, वाऱ्यासोबत डुलणारी नारळीपोफळीची बाग, त्याच्या बाजूची ऐकू येणारी फेसाळत्या समुद्राची गाज आणि अंगावर उडणारे धबधब्याचे तुषार, डोळ्याला सुखावणारे आकाशात तरंगणारे इंद्रधनुष्य आणि पक्ष्यांचे थवेच्या थवे, पायाला स्पर्शवणारा मऊ मऊ गार वाळूचा गालीचा, आंबा, काजू करवंद जांभळे या रसदार फळांच्या ठिबकणार्या चवी, आणि घमघवीत तिरफळाचा वास असलेली सोलकढी जीभेवर नाचू लागते. सोबत मत्स्याहारींना भुरळ घालणारे काही रांगडे सामुद्रीक तर काही ओल्या काजूच्या उसळीसारखे, अस्सल कोकणी घावन शेवयांसारखे लुसलुशीत पण चवदार खाद्यपदार्थ मनाला कोकणची आठवण करून देतात.

ईश्वराने निर्माण केलेली जगातील सर्वात सुंदर भौगोलिक रचना म्हणजे कोकण.. त्यातही कोकणात येणारे पाच सहा जिल्हे आणि त्यातही अत्यंत जैवविविधतेने नटलेला आमचा सिंधुदुर्ग.

अन्यत्र कुठेही दिसणार नाही अशा पश्चिम महाराष्ट्राच्या कडेकपारी....

त्यात समुद्रापर्यंत सामावलेली वनसंपत्ती....

तिथे असलेल्या वनौषधी...

येथील आहारपद्धती...

नद्यांच्या जाळ्यांनी विणलेली जलसंपदा...

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आमचे येथील लक्षात राहील असे आतिथ्य....

येवा कोकण आपलाच आसा ही टॅगलाईन सांगणारी आमची सिंधुसंस्कृती !

शब्द स्पर्श रूप रस आणि गंध यांची अनुभूती देत मन आत्मा आणि इंद्रियाना सुखावून टाकणारी इथली लाल माती....

इथेच दिसेल,

कोणत्याही संकटांचा सहजपणे सामना करण्यासाठी आवश्यक असलेली निधडी छाती..

आणि

मना मनाने जोडून ठेवलेली कोकणची नाती...

थेट गोव्यापासून सुरू होत सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे मुंबई पर्यंत पसरलेला हा कोकण प्रांत!

ही परशुराम भूमी म्हणजे अनेक वनौषधींचे माहेरघरच आहे. इथे मुद्दाम लागवड करण्याची आवश्यकताच नाही. एवढी संपत्ती आमच्याकडे ईश्वराने भरभरून दिलेली आहे. फक्त बाहेरून ओरबाडणारे हात आले आणि या जैवविविधतेचा पार बट्ट्याबोळ उडवून दिला. अशोक, नागकेशर सारख्या काही दुर्मिळ वनस्पती तर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

वावडिंग, कुडा, पळस, अर्जुन, बाहवा, शिंशप्पा, भोकर, किंजळ, सातवीण, हाडसांधी, शिवण, आईन, सप्तरंगी, सागवान, चंदना सारखे वृक्ष प्रत्येक गावातील संरक्षित जंगलात आढळतात. गुळवेल, सापसंद, करवंद, बेडकी, मंजिष्ठा, सारीवा, इ. छोट्या झुडुपापासून वेलीपर्यंत छोटीमोठी झाडे रस्त्यावरही आढळतात. कोहाळा, भोपळा, आवळा, नारळा सारखी फळे, हळद, मिरची, काळी मिरी, वेलची, लवंग, दालचिनी सारखे मसाले, कांदा, बटाटा, सुरणासारखे भूकंद, तांदूळ, नाचणी, भुईमूग, कुळीथ, पावटे, तूर, चणा, वाटाणा, वाल, कडवे, फजाव, उडीद, मूग, मोहोरी, तीळ इ. नगदी पिके तसेच आंबा, काजू, जांभूळ, कोकम, आवळा, जाम, अननस, केळी सारखी सुमधुर फळे कोकणभूमीत पिकवली जातात. आता तर त्यावर टिकण्याचा कालावधी वाढण्यासाठी विशेष प्रक्रिया उद्योग पण कोकणात आलेले आहेत.

औषधे निर्मिती म्हटली तर एमआयडीसीतील काही प्लॉटमध्ये लघुउद्योग म्हणून काही ठिकाणी प्रोसेस युनीट उभारली गेली आहेत. पण नगण्यच. अगदी हातापायाच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच.

या जैवसंपत्तीची रक्षण आणि पोषणाची योग्य रितीने काळजी घेतली तर भविष्यात त्याचे भक्षण होणार नाही.

ज्या वनस्पतीची पाळे, मुळे खोड, कंद वापरले जातात ते वृक्ष अथवा वेली कायमस्वरूपी नष्ट होतात. जसे शतावरी. पण जर एखादं मुळ जमिनीमधे ठेवून, योग्य रितीने या मुळांची तोड केली, तर परत निर्मिती

होण्यासाठी काही अडथळा येणार नाही. मुळ जंगली वाण कायम राहील आणि उत्पादनही मिळेल.

आता तर शतावरी, मुसळी, बांबू, आले, अळू, करांदा, कणगी, चीने याची मुद्दाम लागवडही केली जात आहे. अर्थात आयुर्वेद सांगतो, जंगलात आपोआप निर्माण होणाऱ्या वनस्पती या अधिक कार्यकारी औषधी तत्त्वे सांभाळणाऱ्या असतात. पण ज्याची तोड करायला सोपे जावे, यासाठी मुद्दाम सोयीस्कर ठिकाणी लागवड केली जाते अशा वनस्पतींच्या गुणवत्तेत फरक आढळतो. याचाही विचार व्हायला हवा.

कमी श्रमात जास्त फायदा असे भासवून काही वनस्पती-खरेदीदार, शेतकरी वर्गाकडून औषधी वनस्पतीची पाने फुले पाळे मुळे विकत घेतात. दर जास्त मिळावा, आपला माल लवकर विकला जावा, तोड जास्त मिळावी या कारणासाठी, आवश्यक त्या दर्ज्याची पाने फुले काढली जात नाही. त्यांच्या छोट्याश्या हव्यासापायी वैद्यांना परिणामी पुनः सामान्य लोकांनाच औषधांची परिपूर्ण गुणवत्ता मिळत नाही. हे सत्य आहे. कच्ची वावडिंग, वाढ न झालेली शतावरी, आकाराने लहान गुळवेल, पोकळ अश्वगंधा, कडू चव नसलेला अडुळसा, किडलेली हळद अशा अनेक वनस्पतीचे नमुने विकत घेऊन, फुकट जातात. औषधांमध्ये ही भेसळ म्हणता येणार नाही, पण गुण कमी होतात. भेसळ किंवा मिलावट हा दुसरा भाग झाला. काळ्या मिरीमधे पपईच्या बिया, ज्येष्ठमधामध्ये गुंजा, नकली नागकेशर इ. भेसळयुक्त औषधी बाजारात मिळतात, यापासून सावध रहायला हवे.

कोकणात फोंडाघाट परिसरात कोल्हापुरातून काही एजंट येतात. कुडाळ परिसरात बेळगाव कर्नाटक येथून दलाल येतात आणि औषधांची खरेदी करतात.

जिथे पिकते तिथेच ते मानवते, या न्यायाने ज्या भागातील औषधी वनस्पतीवर त्या भागातच प्रोसेस होऊन औषध तयार व्हायला पाहिजे. पण कोकणात औषधी निर्माण कारखाने त्यामानाने कमीच आहेत. जारमाव, लक्ष्मीकेशव, श्रीराम, श्रीकृष्ण औषधालय, संजीवनी, अशा मोजक्या नावामधेच ही यादी संपते.

कोल्हापूरातील बाचूळकर सर, डॉ अशोक वाली, डॉ. बाळकृष्ण गावडे, कुडाळमधील रामचंद्र शृंगारे, डॉ निलेश कोदे, डॉ. संदीप नाटेकर, यांच्या सारखी काही मोजकी मंडळीच या औषधी माहितगार वैदूंच्या संपर्कात आहेत.

कोकणातील जैवविविधता जपण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावणारा कोकणी रानमाणूस हीच काय ती जमेची बाजू आहे.

या वनसंपत्तीतून कोकणी माणूस समृद्ध व्हावा, पण जैवविविधतेला कुठेही धोका निर्माण होऊ नये असे वाटत असेल तर युक्तीने यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. सर्व गोष्टी कायदा करून होत नसतात. 'काही ठिकाणी कडक कायदा, काही ठिकाणी बघावा फायदा, पण निसर्गाशी करावा वायदा.' निसर्गाने भरभरून दिलेलं ओरबाडून घेण्याची वृत्ती निर्माण झाली तर निसर्ग तर कोपतोच, पण आपणच पुढील पिढीला आणखी संकटात टाकत आहोत. याची जाणीव प्रत्येक मनात निर्माण व्हायला हवी.

आयुर्वेदाचा 'विकास' होताना कोकणभूमी 'भकास' होऊ नये, हीच माफक अपेक्षा!

**व्यास दीपोत्सव २०२२**
**अशोक यशवंत प्रधान**
**यांसकडून**
**दीपावलीच्या शुभेच्छा!**



# कोकणातील पत्र(क)कारिता

अमित पंडित

कोकणातली पत्रकारिता विकसित व्हायची असेल तर इथला पत्रकार आर्थिकदृष्ट्या सक्षम होणं गरजेचं आहे. तो पूर्णवेळ पत्रकार असेल याची काळजी वृत्तपत्र मालकांनी घेणं आवश्यक आहे. आणि त्याच बरोबर पत्रकारांनीही केवळ आलेल्या पत्रकांवरून पत्रकारिता करणं सोडून देण्याचीही आवश्यकता आहे.

पत्रकारितेला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतात. ह्या चौथ्या स्तंभाची महाराष्ट्रात सुरुवात झाली ती बाळशास्त्री जांभेकर यांच्याकडून १८३२ साली त्यांनी पहिलं मराठी वृत्तपत्र 'दर्पण' हे सुरू केलं.

पण त्यानंतर लोकमान्यांच्या उदयापासून कोकणातील हे पत्रकारितेचं केंद्र पुण्याला स्थलांतरित झालं. 'दर्पण'च्या अस्तानंतर तब्बल ४० वर्षांनी १८८० साली लोकमान्यांनी 'केसरी' आणि 'मराठा' सुरू केली. 'केसरी' आणि 'मराठा'च्या यशामुळे पत्रकारिता ही अनेक वर्ष पुण्याच्या आसपास फिरत राहिली. त्यातच आगरकर टिळकांपासून वेगळे झाल्यानंतर त्यांच्या 'सुधारक'नं वेगळं स्थान निर्माण केलं. पाठोपाठ महात्मा फुलेंच्या 'सत्यशोधक'नं असंच स्वत:चं स्थान दलित आणि त्याकाळी अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजात निर्माण केलं होतं.

पत्रकारिता कोकणात पुन्हा रुजण्यासाठी स्वातंत्र्यानंतर बराच काळ जावा लागला ही वस्तुस्थिती आहे. मुळात स्वातंत्र्यानंतर बराच काळ सरला तरी कोकण दुर्लक्षित राहिलं हे नाकारता येणार नाही. सेवानिवृत्तांचं शहर अशी ओळख जशी पुण्याला काही काळ मिळाली होती तशीच कोकणाकडे, निष्क्रियांचा प्रदेश, म्हणून बघण्याची समाजाची दृष्टी होती. त्यामुळे कोकणात फार काही घडत नव्हतं. परिणामी पत्रकारितेला पोषक वातावरण कोकणात नव्हतं.

अर्थात ह्याला अन्य अनेक बाबी जबाबदार होत्या. पत्रकारितेला आवश्यक असलेल्या दळणवळणाच्या सोयी कोकणात नव्हत्या. कोकणाची भौगोलिक रचनाही एका ठिकाणाहून दुसरीकडे सहजासहजी जाण्यासारखी नव्हती, आजही नाही. कोकण हा प्रांत अनेक वर्ष औद्योगिकीकरणापासून वंचित राहिला आहे. कोकणातील तरुण हा नोकरी उद्योगासाठी कायम शहरात जात राहिल्यानं कोकणात अनेक काळ काही घडलंच नाही. आपण बरं की आपली शेती बरी, अशा विचारांनी इथला शेतकरी राहिल्यामुळे इथे पत्रकारितेला पोषक वातावरण निर्माण होऊ शकलं नाही.

अर्थात अशा परिस्थितीतही काही वृतापत्रांनी, साप्ताहिकांनी आणि नियतकालिकांनी पत्रकारिता धुगधुगती ठेवली हेही नाकारता येत नाही. एक काळ असा होता की रायगड, रत्नागिरी आणि सिंधूदुर्ग ह्या जिल्ह्यांचे वृत्तपत्र म्हणजे रायगड टाइम्स, रत्नागिरी टाइम्स आणि सिंधुदुर्ग टाइम्स अशी ह्या वृत्तपत्रांची ओळख होती; काही प्रमाणात आजही आहे. आजही कोणी नवीन पत्रकार ह्या क्षेत्रात आला तर गावातील लोकं, कुठे रत्नागिरी टाइम्सला का, असं विचारतात. किंवा कोणी बातमी दिल्यावर तो पत्रकार कुठल्या वृत्तपत्राचा आहे हे माहीत असूनही, रत्नागिरी टाइम्सला नाही का येणार बातमी, असं देणारा विचारतो.

असंच काहीसं स्थान निर्माण केलं होतं ते 'सागर' ह्या वृत्तपत्रानं. चिपळूणहून प्रसिद्ध होणारं हे वृत्तपत्र. मुंबई पुण्यासारख्या शहरात पाय रोवून नंतर कोकणात जिल्हा आवृत्ती सुरू करणाऱ्या वृत्तपत्रांच्या शर्यतीत स्वत:चं स्थान निर्माण केलेलं हे वृत्तपत्र.

पण सकाळ, लोकमत, तरुण भारत आणि पुढारी ह्या वृत्तपत्रांच्या आगमनानं स्थानिक वृत्तपत्रांचा श्वास कोंडून टाकला आणि हळूहळू ही वृत्तपत्रं मरणासन्न झाली. अर्थात त्याला आणखी एक कारण आहे. कोकणाबाहेरून आलेल्या ह्या सगळ्या वृत्तपत्रांच्या पाठीशी एखादा राजकारणी, एखादा उद्योजक आहे. त्यामुळे ह्या वृत्तपत्रांच्या जिल्हा आवृत्त्यांच्या पाठीशी भक्कम आर्थिक पाठबळ आहे. ती स्थिती कोकणातील स्थानिक वृत्तपत्रांची आणि नियतकालिकांची नाही. त्यामुळे आजच्या महागाईच्या काळात आर्थिक नियोजनात ह्या वृत्तपत्रांचा जीव मेटाकुटीला आला आहे. त्याचाच परिणाम म्हणून ठिकठिकाणी पत्रकारांच्या नियुक्त्या करणं, वृत्तपत्रांच्या छपाईसाठी चांगला कागद वापरणं, आजच्या तंत्रज्ञाच्या युगात ई आवृत्ती काढणं ह्यात ही वृत्तपत्रं मागे पडली आहेत.

कोकणात वृत्तपत्र व्यवसाय पाहिजे तेवढ्या प्रमाणात उदयास न येण्याचं आणखी एक कारण म्हणजे इथला पत्रकार. इथला पत्रकार आजही आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण नाही ही वस्तुस्थिती आहे. दोन तीन दशकांपूर्वी तर स्थानिक छायाचित्रकार नाहीतर वृत्तपत्र विक्रेताच पत्रकार म्हणून काम करत असे. शहरात, गावात जे थोडेफार कार्यक्रम होत त्यात छायाचित्रकार हा अपरीहार्य असे. त्यामुळे त्याच्याकडूनच झालेल्या प्रसंगाचा वृतांत लिहून घेऊन त्याची बातमी करण्याचा प्रघात बरेच वर्ष चालू होता. बातमीचा दूसरा स्रोत म्हणजे वृत्तपत्र विक्रेता. त्याच्याकडे वृत्तपत्र विकत घेण्यासाठी समाजातील सर्व स्तरातून लोक येत असत. त्यामुळे गावात काय घडलं हे त्याला बसल्या जागी काळात असे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांचे गठ्ठे विक्रीसाठी येत तेव्हा त्या वितरण विभागातील व्यक्तीकडे

आदल्या दिवशी घडलेल्या प्रसंगाचा वृतांत थोडक्यात लिहून देत असे. त्यावरून मग संपादकीय विभाग त्याची बातमी करत असे.

असा काही काळ गेल्यावर वृत्तपत्रांना स्वतंत्र पत्रकार असावेत याची गरज भासू लागली आणि त्यातून महत्त्वाच्या ठिकाणी पत्रकारांची नियुक्ती होऊ लागली. त्यातही अर्थात सुरुवातीला खूप अडचणी आल्या. महत्त्वाची अडचण म्हणजे दळणवळणाची. एक दीड दशकांपूर्वी बातमी कार्यालयात पोचवण्याचं एकमेव साधन म्हणजे एसटी हेच असे. पत्रकार बातम्या लिहून त्या लखोट्यात घालून एसटीच्या चालक वाहकाकडे देत असे. शहारातील कार्यालयातील माणूस तो लखोटा एसटी थांब्यावर जाऊन घेत असे. त्यानंतर त्या बातम्या कार्यालयात पोहोचून त्यांच्यावर पुढील संस्कार होत असत. ह्यात अर्थात अनेक अडचणी होत्याच. टपाल वेळेत नं मिळणं, कार्यालयातील व्यक्ती एसटी थांब्यावर वेळेत न पोचणं, परिणामी बातम्या कार्यालयात पोहोचत नसत.

हळूहळू काळ बदलला, मोबाइल आणि इंटरनेटनं जग व्यापलं. पण २१व्या शतकाचा एकचतुर्थांश काळ संपत आला, ५ जीचे वारे शहरात वाहू लागले, तरी कोकणात आजही मोबाइलला रेंज आणि इंटरनेटच्या उपलब्धतेच्या अनंत अडचणी आहेत. त्यामुळे पत्रकारांना मिळालेली बातमी कार्यालयात पोहोचवणं आजही अडचणीचं ठरत आहे.

आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे पत्रकारांचं आर्थिक गणित. वृत्तपत्रांच्या डेस्कवर काम करणाऱ्या कर्मचारी आणि प्रत्यक्ष फील्डवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये तफावत आहे. परिणामी पत्रकारिता हा मुख्य व्यवसाय न रहात त्याला जोड व्यवसायाचं स्वरूप आलं आहे. कार्यक्रमांना जाणं, तो कव्हर करणं असे प्रकार इथे अभावानंच पहायला मिळतात. तुटपुंज्या मानधनावर काम करणारे पत्रकार हे अनेक वेळा अनेक महत्त्वाच्या कार्यक्रमांना जात नाहीत. परिणामी कार्यक्रमाचे आयोजकच झालेल्या कार्यक्रमाचा वृतांत पत्रकाराला लिहून देतो. अशा पत्रकारांवरच सध्याची पत्रकारिता बहुतांश विसंबून राहिली आहे. परिणामी बातमी लिहून देणाऱ्यांची भाषाशैली, त्यातील अतिरंजीतपणा, आयोजक हा पत्रकार नसल्यामुळे बातमीत काय आवश्यक आहे याची नसलेली पुरेशी जाण अशा कारणांमुळे बातमीचा मूळ गाभा हा अनेकदा हरवून जातो.

इथला पत्रकार हा प्रशिक्षित नसणं हा आणखी एक अडथळा आहे. केवळ अंगभूत कलेवर किंवा वर्षानुवर्षे करत असलेल्या कामाच्या जोरावर त्या क्षेत्रात प्रावीण्य मिळविण्याचा काळ संपला आहे. ज्या क्षेत्रात काम करायचं त्या क्षेत्राचं रीतसर प्रशिक्षण घेणं आवश्यक असतं. पण आजही इथले बहुतांश पत्रकार हे प्रशिक्षित नाहीत. पत्रकारितेचे पदविका, पदवी अभ्यासक्रम आज अनेक विद्यापीठांकडून चालवले जात आहेत. त्यापैकी बहुतांश हे दूरस्थ पद्धतीनं आयोजित करण्यात येतात. त्यामुळे नोकरी उद्योग सांभाळून ते करणं शक्य आहे. काही संस्था पत्रकारितेची प्रशिक्षण शिबिरं आयोजित करत असतात. पण अशा शिबिरांनाही पत्रकारांची उपस्थिती अत्यल्प असते. विद्यार्थी होऊन ज्ञान संपादन करणं याची गरज पत्रकारांना वाटेनाशी झाली आहे.

एकूणच काय तर कोकणातली पत्रकारिता विकसित व्हायची असेल, तर इथला पत्रकार आर्थिकदृष्ट्या सक्षम होणं गरजेचं आहे. तो पूर्णवेळ पत्रकार असेल याची काळजी वृत्तपत्र मालकांनी घेणं आवश्यक आहे. आणि त्याचबरोबर पत्रकारांनीही केवळ आलेल्या पत्रकांवरून पत्रकारिता करणं सोडून देण्याचीही आवश्यकता आहे.


**व्यास दीपोत्सव २०२२**

**चंद्रशेखर उमेश पाटील**

**यांसकडून**

**दीपावलीच्या शुभेच्छा!**



# मनोरंजन

## विभाग ७



# शोध

**अनंत जोशी**

आम्ही दोघे रात्री बारा वाजता शिडीने कौलावर चढलो व शेजारच्या वाड्यात बघू लागलो. शुभ्र चांदणे असल्यामुळे सगळे नीट दिसत होते. खणण्याचे आवाज जोरात येत होते पण बाकी काहीच दिसत नव्हते. अशी पाचेक मिनिटे गेली असतील आणि अचानक एक गाईचे पांढरे वासरू या खोलीतून त्या खोलीत जाताना दिसले. आता इतक्या रात्री वासरू तिथे येणे शक्यच नव्हते. आमच्या दोघांच्या अंगावर सरसरून काटा आला. खरे तर आमची बोबडी वळली होती.

झाली असतील पन्नास एक वर्षे त्या गोष्टीला. त्यावेळी माझे वडील शिक्षण खात्यात नोकरीला होते. दर तीन ते पाच वर्षांनी त्यांच्या महाराष्ट्रात कुठेही बदल्या होत असत. त्यावेळी म्हणजे मी नववीत असताना बाबांची बदली कोंकणात सावंतवाडी गावी झाली. वडिलांकडे शाळा तपासणीचे काम असे. म्हणजे आम्ही नगर जिल्ह्यातून एकदम सावंतवाडी येथे राहण्यास गेलो होतो.

नवीन गाव, नवीन जागा बघणे आले. वडिलांनी आणि आईने मिळून सावंतवाडीतील उभा बाजार म्हणून एक भाग आहे. तिथे एक जागा पसंत केली. खानोलकर म्हणून घरमालक होते. त्यांचे स्वत:चे मेडिकल कम कटलरी असे दुकान बाजारपेठेत होते. भाडं इतर जागांपेक्षा कमी वाटले म्हणून बाबांनी ती जागा पसंत केली. घरमालक शेजारीच राहायचे. आमच्या पलीकडे एक घर होते. पण तिथे कुणी राहायचे नाही. चिऱ्याच्या भिंती होत्या पण कुणीच रहात नसल्यामुळे ते घर ओसाड वाटायचं. आमचे घर आणि ते घर यात जेमतेम तीन फुटांचे अंतर असेल. त्यावेळी स्लॅबची पद्धत नव्हती त्यामुळे सगळी घरे कौलारू असत. बाबांनी घर मालकांकडे त्या जागेची सहज म्हणून चौकशी केली, तर त्यांनी सांगितले त्या घराचे मालक मालक राजे म्हणून आहेत. ती सर्व मंडळी गेल्या दोन पिढ्या मुंबईत राहतात. त्यांना इथे परत येण्याची अजिबात इच्छा नाही. अपेक्षित किंमत येत नाही म्हणून विक्रीचा व्यवहार होत नाही.

आम्ही तिथे राहू लागलो. आजूबाजूची हिरवाई पाहून आई-बाबा मी आणि माझा धाकटा भाऊ अनिल खुश झालो. आम्हाला वडील शिक्षण खात्यातच असल्यामुळे शाळेत प्रवेश सहज मिळाला. वडील

नोकरीमुळे सतत फिरतीवर असत. मी आणि भाऊ नरेंद्र डोंगर, माणगाव, अगदी जवळ असलेली ठिकाणे पायी फिरत असू. वर्गातील मुले आपसात मालवणीत बोलत असत. त्यातले चेडवा, झील, खयसून असे कितीतरी शब्द आम्हाला कळत नसत. दिवस असे मजेत चालले होते. आणि हळूहळू आम्हाला रात्रीच्या वेळी शेजारच्या राजेंच्या घरात कुणीतरी जमीन खणत असल्याचे आवाज येऊ लागले. त्यावेळी पौर्णिमा जवळ येत होती आणि दिवसेंदिवस ते आवाज वाढू लागले. रात्री बाराच्या सुमारास ते आवाज भीतिदायक वाटावेत एवढ्या मोठ्याने येत असत. घरमालक मात्र या बाबतील ताकास तूर लागू देईनात. त्यावेळी आमच्याकडे हिरा नावाची मोलकरीण कामाला होती. एक दिवस आईने हिराकडे हा विषय काढला. पहिल्यांदा हिरा काहीच बोलेना. आईने खोदून खोदून विचारल्यावर हिराने त्या शेजारच्या जागेविषयी एक विचित्र गोष्ट सांगितली.

त्या जागेत पूर्वीपासून राजे कुटुंब रहात होते. मोठा भाऊ शाळेत मास्तर होता आणि धाकटा मिलिटरीत होता. मिलिटरीतला भाऊ दर महिन्याला जवळ जवळ सगळा पगार मोठ्या भावाला पाठवीत असे. ते पैसे निवृतीनंतर उपयोगी पडतील असे त्याचे नियोजन होते. पंधरा वर्षानंतर तो मिलिटरीतून निवृत्त होऊन घरी आला व पाठविलेले पैसे मोठ्या भावाला मागू लागला. मोठ्या भावाने सर्व पैसे कुटुंबासाठी खर्च झाले असे सांगून कानावर हात ठेवले. तो कुठला हिशोबही देईना. धाकट्याचा राग अनावर झाला. त्याने समोरच्या दगडावर डोके आपटले व रक्तस्राव होऊन त्याचा अंत झाला. काही दिवसांनी घरात जमीन खणण्याचे आवाज येऊ लागले आणि काहीवेळा खरोखर एकेका कोपऱ्यात जमीन उकरल्याचे दिसू लागले. आपल्या भावाचे भूतच हे करते आहे या कयासाने मोठा भाऊ कुटुंबासहित मुंबईला निघून गेला. तेव्हापासून त्या घरात कुणीही रहात नाही. ते घर कुणी विकतही घेत नाही. मोठ्या भावाने पाठविलेले पैसे सोनेरूपात जमिनीत पुरून ठेवले असतील व ते खणून शोधण्याचा प्रयत्न धाकटा भाऊ भूतरूपाने येऊन करतो अशी वदंता आहे. अमावास्या आणि पौर्णिमा जवळ आली की खणण्याचे आवाज वाढत जातात आणि नंतर काही दिवस शांत असते.

ही वदंता ऐकल्यावर आम्ही सगळेच हादरलो. आणि जागा बदलायचे विचार करू लागलो. पण घरमालक वडिलांना म्हणाले, 'तुम्ही काळजी करू नका. आवाज येतात हे जरी खरे असले तरी त्याचा इतर त्रास कुणालाही झालेला नाही त्यामुळे निश्चिंत रहा . शिवाय आपण आज विज्ञान युगात वावरतो आहोत. असल्या भाकडकथांवर किती विश्वास ठेवायचा?' तसं तर खरोखर दर पंधरा दिवसांनी येणाऱ्या आवाजाव्यतिरिक्त आम्हाला काही त्रास नव्हता. पण खणण्याचे आवाज का व कसे येतात ही उत्सुकता होती. एका पौर्णिमेला वडील कामानिमित्त बाहेरगावी गेले असतांना आम्ही दोघा भावंडांनी आईला विश्वासात घेऊन सांगितले की आम्ही दोघे शिडीने कौलावर चढून काही दिसतं आहे का ते पाहतो. आईला पण उत्सुकता होतीच, तिने नाखुशीने का होईना परवानगी दिली. ठरल्याप्रमाणे आम्ही दोघे रात्री बारा वाजता शिडीने कौलावर चढलो व शेजारच्या वाड्यात बघू लागलो. शुभ्र चांदणे असल्यामुळे सगळे नीट दिसत होते. खणण्याचे आवाज जोरात येत होते पण बाकी काहीच दिसत नव्हते. अशी पाचेक मिनिटे गेली असतील आणि अचानक एक गाईचे पांढरे वासरू या खोलीतून त्या खोलीत जाताना दिसले. आता इतक्या रात्री वासरू तिथे येणे शक्यच नव्हते आणि त्याच्या अगोदर कुणी जनावर तिथे दिसले नव्हते. आमच्या दोघांच्या अंगावर सरसरून काटा आला. खरे तर आमची बोबडी वळली होती. भूत भूत हे शब्द सुद्धा तोंडातून बाहेर पडत नव्हते. कसेतरी शिडीवरून धडपडत खाली आलो आणि आईला सगळे सांगितले. आईने पाणी प्यायला दिले. दोघांच्या डोक्यावर हात फिरवत राहिली व आम्ही झोपी गेलो.

सकाळी आम्हाला दोघांना सणसणून ताप भरला होता. सुदैवाने दोन दिवस डॉक्टरचे औषध घेतल्यावर बरे झालो. वडील परत आल्यावर आम्ही ती जागा सोडून दुसरीकडे राहायला गेलो. नंतर सहा महिन्यांनी वडिलांची बदली पुण्याला झाली व आमचे सावंतवाडी कायमचे सुटले. आता आम्हाला दिसले ते खरे की भास हे सांगता येत नाही. मात्र त्या सहा महिन्यात आम्ही त्या घराच्या आसपासही फिरकलो नाही. आता ते घर तसेच आहे की पाडून नवीन बांधले गेले याची कल्पना नाही. पुढच्या महिन्यात गाडीने गोव्याला जाण्याचा प्लॅन आहे. तेव्हा सावंतवाडीला थांबून ते घर पाहावे अशी इच्छा आहे. बघा कंपनी म्हणून येत असाल तर चला, जरा वेगळे साईट सीईंग.



# कोणाच्यो म्हशी ?

नितीन राणे

चांगदेव आणि कुटूमातली सगळीजणा म्हशीक  हाकीत हूती तरी म्हस जाग्यावरना हलत नाय हूती. चांगदेवान जावन बेडरूमातना भायर पडणारा दार उघडल्यान आणि म्हशीक हाकूक लागलो तरी म्हस जावक मागना. लय येळ प्रयत्न करून पण म्हस जागची हलना. अकेरेक चांगदेवान गाव गोळा केल्यान. संत्याकडे निरोप धाडल्यानी.संत्याची लाली म्हस मारकुटी हूती ती उभ्या गावाक म्हायती. म्हस बेडरूमात गेली कशी हेच्यावर चर्चा रंगली.

'संतू गोवेकाराची लाली म्हस गायब झाली' ही बातमी सगळ्या गावात पसारली. बरा दुभती म्हस अशी धापू झाली म्हटल्यावर संत्याचो जीव खालीवर झालो. म्हस धापू होवन रात उलटान गेली हूती तरी खयसर माग लागलो नाय हूतो. संत्यान वाडीतल्या चार पाच जणांका घेवन रातीच सोदूक निघालो हूतो. पोरांका संत्याची भगल करूची हूकी इली.

'संत्या लालीचा खय भायर लफडा नाय मा.'

'सतल्या तुका नंतर बघतंय. आदी म्हस गावांदे.' संतो सतल्यावर तरपासलो.

'अरे म्हसकरांचो वयात इलेलो रेडो तुझ्या कावनाकडे चार पाच येळा कारावताना बघलंय म्हणान इचारलंय.'

'गप सोदूक येतस तर चल. नुको ती आराळा फराळा लाव नूको.' संतो एका झाळीत ब्याटरी मारीत म्हणालो.

'मी काय म्हणतंय संत्या, सतलो म्हणता हा तर एकदा म्हसकरांच्या कावनात बघून तरी येवया.' लाली म्हस सोदूक इलेल्या डिगल्यान संत्याक इनवल्यान.

'इटंबना हा तुमच्यापुढे. न्हान पोरासारे करतास,' संतो म्हणालो.

'आणि थयसर लाली म्हस गावली तर कितीची पैज?'

'बाबांनू पैजी लावक माका आता घोपान नाया.. चला.'

सगळेजण म्हसकरांच्या कावनात बघूक गेले. लाली थयसर नाय हूती.

'गेली खय आसात लाली?' बरा तिच्यावांगडा माझो कसलो वाद पण नाय.. तिका काय बोलाक पण नाय.. मारूचा लांबच ऱ्हवला. एकवेळ मी बैलांका नाय नाय ता बोल्लंय आसान पण लाली म्हशीक चुकान एका शब्दान बोलाक नाय. खय गेली आसात?' संतो मनातल्या मनात बोलत हूतो.

'संत्या तुझी म्हस नक्कीच किडनॅप झाली आसतली.' डिगलो व्हाळातना जाताना म्हणालो.

'कायव बोलतंस.. अरे पोरा किडनॅप होतंत. म्हशी नाय.' सतल्यान आपला ज्ञान पाजळल्यान.

'कायवं हा.'

'पोरांका इंग्रजीत काय म्हणतंत?'

'किडस असा कायतरी म्हणतंत.'

'मगे शब्दातच उत्तार आसा मरे.. पोराच किडनॅप होतंत.'

'होय रे..' सतल्यान मान हलवल्यान.

'काय मेल्यानू तर्क करतास...' संतो परत दोघांवर चिडलो.

तेंच्यावांगडा लाली म्हशीक सोदूक इलेले कालेजात शिकणारे प्वार हसान हसान खळवाटले.

त्या पाच जणानी रातभर लाली म्हशीक सोदल्यानी. डिगल्याच्या म्हणण्यानुसार लाली म्हशीन आत्महत्या केल्यान आसात म्हणान.. गावतल्यो सगळ्यो बावडेंमधी वाकान बघल्यानी. नदीच्या कोंडीवर जावन इले. अकेरेक फाटपटी घराक येवन टकली टेकल्यानी.

संत्याक तेच्या बायलेन काय झोपाक देवक नाय. म्हशीबद्दल इचारून तेचे कान खाल्ल्यान. डेअरीवर दोन येळचा दूध जावक नाय हूता. नाय म्हटला तरी वीस लिटरचो फाडो पडलो हूतो . त्यावरना संत्याची बायल संत्याक बडबडत हूती.

'तुमका एक साधी म्हस सांभाळूक येयत नाय,' संत्याची बायल.

'एक कशी?' असा तिच्याकडे बघीत म्हटल्यावर संत्याची बायल आजूनच चिडली.

संत्याचो बारको झील दूधासाठी रडा हूतो. संत्याची आवस फुटी चाय पिवची लागता म्हणान पिरपिरत हूती. एकंदरीत लाली म्हस हरवल्यामुळा संत्याचा चक्रच बिघडान गेला हूता. संत्यान पाय मोकळे करूक म्हणान सोडलेल्या संत्याच्या लाली म्हशीन आपले पाय बरेच मोकळे केल्यान हूते.

हकडे त्याच दिवशी घाटावरचो चांगदेव आपल्या नवीन बांधलेल्या घराकडे निघालो. रस्त्यावर कांदे बटाटे इकून तेना कोकणात जागा घीतल्यान हूती.. थयसर टुमदार घरदूक बांधल्यान. गावातले लॉक आपले वयवरना बघून बघून जायचे. घर बांधल्यान ता दिसला पण तेना कसा बांधल्यान तो लॉक इचार करीत नाय हूते. चांगदेवान चांगला दुमजली घर बांधल्यान हूता.

आपली चारचाकी गाडी कंपाउंडमधी लावन तो घरात शिरलो. पाठोपाठ तेची बायल शिरली. थोड्या वेळान ती केकटत भायर इली.

'वराडायला काय झालसा?' चांगदेव बायकोवर खेकासलो.

'आव निजायच्या खोलीत कोणतरी हाय..'

'कोण आसणार... बघू,' असा म्हणान चांगदेव बेडरूमकडे धावलो.

हातात दांडो घेवन तेना लायट लावल्यान थयसर बघता तर नया कोऱ्या बेडवर संत्याची लाली म्हस बसान रवांथ करीत हूती.

चांगदेवाक आणि तेच्या बायलेक बघून लालील दात काढल्यान. असा चांगदेवाच्या झिलाक वाटला.

'आवं बाबा, म्हस बघा हसतीया.' झील पण दात काढून म्हणालो.

'एशी पण चालू हायसा' बायको असा बोलल्यावर चांगदेव आजूनच चिडलो पण तो कायपण बोलाच्या मनः स्थितीत नाय हूतो. म्हशीन खोलीभर बुळकान ठेवल्यान हूता.

बेडरूमचो एशी चालू कसो ऱ्हवलो हेचो इचार करताना लक्षात इला की. कल एशी बसवताना लायट गेली हूती. ती बसवून झाली तरी येवक नाय हूती. एशी म्याक्यानिक बाबू कंटाळान निघान गेलो पण एशीचा बटान बंद करूक इसारलो.

चांगदेव आणि कुटूमातली सगळीजणा म्हशीक हाकीत हूती तरी म्हस जाग्यावरना हलत नाय हूती. चांगदेवान जावन बेडरूमातना भायर पडणारा दार उघडल्यान आणि म्हशीक हाकूक लागलो तरी म्हस जावक मागना. लय येळ प्रयत्न करून पण म्हस जागची हलना. अकेरेक चांगदेवान गाव गोळा केल्यान. संत्याकडे निरोप धाडल्यानी.संत्याची लाली म्हस मारकुटी हूती ती उभ्या गावाक म्हायती. म्हस बेडरूमात गेली कशी हेच्यावर चर्चा रंगली.

'अवो चांगदेव राव.. मी काय म्हणतंय म्हस घरात गेली कशी ताच आमका कळत नाया.' पक्यान त्वांड उघडल्यान.

'मला बी काय समजना झालंया,' चांगदेव.

'म्हणजे काय?' कोणतरी बोलला.

'म्हणजे काय नाय ..हयता पत्र्यापेंडीचा पोता बघ दाराकडे ठेवला हा. तेच्या वासाक ती भुतूर गेली,' पको म्हणालो.

'आणि म्हशीन दार लावन घीतल्यान. काय मेल्या सकाळ पासना कोण गावाक नाय काय तुका?' खालच्या आवाटातले नाना म्हणाले.

'आवं ते दार मीच लावलं..काल सांचेला,' चांगदेव.

'तेवा भुतूर म्हस दिसाक नाय काय?' पको.

'नाय ना.. दार थोडं आड हूतं. काळोख पडला हूता. लाईट बी नाय हूती. मला बी लय घाई हूती. म्हनून पटकन दार लावनश्यान निघालू.'

'कर्म.. तुमी दार लावूनश्यान गेलास आणि भुतूर म्हशीन श्यान वाढून ठेवल्यान. आणि पत्री पेंड अर्धी अधिक करून पलंगावर चढान बसली,' नाना असा म्हणान हसाक लागले.

'बाकी पलंगतोड काम म्हशीचा,' पको म्हणालो. असा बोलल्यावर सगळेच खळवाटले.

इतक्यात थयसर संतो इलो.. संत्याचो आवाज आयकान नाय म्हणाक म्हस जाग्यावरना उठान उभी ऱ्हवली. पलंग करकरलो. हकडे चांगदेवाचो जीव हळहळलो. गाववाल्यानी सगळा कसा झाला ता संत्याक सांगल्यांनी. तेका आपली म्हस सुखरूप आसा ह्या बघून बरा वाटला.

'लाली खाली उतार बघू पयला.' संतो म्हशीच्या गळ्याखाली खाजवीत म्हणालो. संत्याक पण गार एशीत बरा वाटला. संत्याच्या पाठोपाठ एशीची हवा खावक चार पाच आजून खोलयेत घुसले आणि भितीक लिपान ऱ्हवले.

'म्हशीन कोतळो काढल्यान तर माका सांगा नुको.' संतो ओराडलो तशे सगळे भायर झाले.

संत्यान लाली बाबापुता करून बघल्यान पण म्हस हलना. बरा तेना म्हशीवर कधी काठी उगारूक नाय हूती. अकेरेक तेना चांगदेवाक मेन स्वीच बंद करूक सांगल्यान आणि पत्रे पेंडीचो गोण भायर घेवक सांगल्यान. तेवा खय लाली मुरडत खोलयेतना भायर पडली. पत्रे पेंडीच्या गोणाचो मालक बाबू ( एशी म्याक्यानिक ) थयसर इलो. मनातल्या मनात लालीक गाळी घातल्यान. उघडपणे बोलू शकत नाय हूतो. टेंपोचा भाडा वाचवूसाठी म्हणान चांगदेवाच्या एशी वांगडा हाडलेला पत्रे पेंडीचा पोता तेना चांगदेवाच्या खोलयेत ठेवल्यान थयच घात झालो. म्हशीन ता खाली केल्यान आणि बुळकान ठेवल्यान हूता.

चांगदेवाच्या बायकोन म्हस बुळाकलेला शान काढूक सपशेल नाय म्हटल्यान. अकेरेक टप घेवन चांगदेव ओणावलो. नाय म्हणाक गावातल्या टारगट पोरांनी चांगदेवाचे श्यान भरतानाचे चार फोटू काढून व्हाट्सएपवर टाकल्यानी.. आणि क्यापशन लिवल्यानी. 'कोणाच्यो म्हशी, कोणाक उठाबशी.. आणि चालू ऱ्हवली एशी..'

# म्हावरा

**- कॅप्टन वैभव दळवी**

खडखडे लाडू नि, मालवणी खाजा;
जेवणाक म्हावरा व्हया, फडफडीत ताजा
रोज आमच्या चुलीर, म्हावराच शिजो
झक मारत जावंदे तो, बर्गर नी पिझ्झो

जिताडा, सरंगो, रावस नि तारली;
डेंग्यांका मोडून आमी, खाताव ती कुर्ली
पापलेट , सुरमय , बांगडो का मिळो;
वासावर सांगतलाव, ताजो की शिळो

नीट करून झालो, सुंगठ्याचो वाटो;
की वाटपाक वल्या व्हयो, वरवंटो-पाटो
धणे-मिरी, लसूण नी, लागतलो कांदो;
बेडगी मिरची नसात तर, होतलो वांदो


चाटशाल बोटा असा, मोरीचा तिकला;
चवदार आमटीतला, एक एक शिपला
मांदेली, पेडव्याचा, असा खमंग सार ता;
खाशाल तर मटनाच्याव, तोंडात मारता

तांदळाच्यो भाकऱ्यो नी भाताची रास;
वांगडा आमकां लागताच, म्हावऱ्याचो वास
कुळदाची पीटी, नी सोलाची कढी;
म्हावरा जर मोठा तर, मेजवानी बडी

वला जर नसात तर, सुका तरी लागता;
करदी, जवल्याच्या, वासातंव भागता
खल्लास जर नाय तुम्ही, कुस्करला सुकट
सांगतंय मी तुमचो, जलमच फुकट

मालवणी मसालोच, असो असा खास;
आमसुलान, तिरफळान घमघम तो वास
चुलीवर रटरट, उकाळता कालवण;
तेवा वाटता स्वर्ग म्हंजे, आपला ह्या मालवण

◆◆◆





# माझं कोकण

- विकास भावे

स्वसामर्थ्याच्या तपोबलाने, सागरास मागे हटवून
परशुरामाने निर्माण केला, हा प्रदेश सुंदर कोकण

वळणावळणाची आहे, माझ्या कोकणची वाट
किती वर्णावे सौंदर्य तियेचे, सौंदर्याचा थाट

जरी बदलली अवघी दुनिया, जरी बदलला काळ
माझ्या कोकणच्या मातीसंगे, जुळली माझी नाळ

शहरात राहिलो, तरी खुणावते कोकणातली माती
कौलारू घर कोकणातले, दिसते या डोळ्यांपुढती

देशामध्ये स्वातंत्र्याची, ज्योत जयांनी चेतविली
स्वातंत्र्यवीरांनी रत्नागिरीची, ही भूमी पावन केली

स्वातंत्र्याचे वेड लावले, ज्यांनी ह्या देशाला
लोकमान्य टिळकांचा आहे, अभिमान आम्हाला

कौलारू घराशी जोडले गेले, प्रेमाचे सुंदर नाते
पै पाहुण्यांच्या स्वागतासाठी, सज्ज नेहमी असते

सागरावरती जाऊन पहावा, सूर्योदय देखावा
सागर लहरींचा धिंगाणा, गाजेमधूनी ऐकावा

खेळ पावसाचा रिमझिम चाले, कधी मुसळधार बरसे
इंद्रधनू आकाशी पडता, डोळ्यांना मोहक दृष्य दिसे

जांभळं, करवंदं, ओले काजू, आकर्षक मेवा कोकणचा
स्वाद रेंगाळतो रसनेवरती, तळलेल्या फणस गऱ्यांचा

फणस पोळी, आंबा पोळी, सरबत जांभूळ, करवंदाचे
रत्नागिरीच्या हापूसने नेले, दुनियेमध्ये नाव कोकणचे

छोट्या छोट्या उद्योगांमधूनी, पाऊल पडते प्रगतीचे
देशामध्ये, अन् परदेशातही नाव गाजते कोकणचे

लाल मातीमधूनी साकारली जाते, गणेशाची सुंदर मूर्ती
गणेश उत्सव साजरा करण्या, चाकरमानी नियमित येती

महत्त्व गडकिल्ल्यांचे कोकणच्या, शिवरायांनी ओळखिले
रायगड किल्ल्याला महाराजांनी, राजधानीचे बिरूद दिले

सागर मार्गाने स्वराज्यावरी, होईल गनिमाचा हल्ला
जाणून धोका शिवबाने, सिंधू सागरी सिंधुदुर्ग बांधला

दुष्कर स्वप्नाला कोकण रेल्वेच्या, प्रयत्नपूर्वक साकारले
कोकणी माणसाच्या या स्वप्नाला, मूर्त स्वरूप लाभले

कोकणातले विभ्रम पाहण्या, कमावते घर तिथे असावे
व्यास क्रिएशन्स्च्या मदतीने, या स्वप्नाला पंख फुटावे

◆◆◆

# कसबा संगमेश्वर

**- निबंध कानिटकर**

रत्नागिरी जिल्ह्यातील 'अलकनंदा' आणि 'वरुणा' या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले 'संगमेश्वर' हे 'कसबा संगमेश्वर' म्हणून ओळखले जाते. त्या गावात दोन गोष्टी प्रमुख आहेत, त्या म्हणजे चालुक्यकालीन श्रीकर्णेश्वर मंदिर आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे तेथील वास्तव्य.

'कसबा' या फारसी शब्दाचा अर्थ 'वस्ती'. 'संगमेश्वर' गावाचे खरे नाव 'नावडी'. इसवी सनापूर्वी महाराष्ट्रामध्ये जैन आणि लिंगायत धर्मीय राज्ये होती, त्यांपैकी जैन पंथीयांची राजधानी कपिलतीर्थ (कोल्हापूर) येथे होती, परंतु संगमेश्वर हे त्यांचे राज्यकारभाराचे प्रमुख केंद्र होते. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये सूर्यवंशी घराण्याचे राज्य आले. त्यांच्यापैकी एका राजाची राजधानी संगमेश्वर येथे होती.

राष्ट्रकूट वंशातील राजांनी चालुक्य घराण्याचा नाश सन ७५३ मध्ये करून येथे सुमारे दोनशे वर्षे राज्य केले. पुन्हा चालुक्य घराण्यातील काही राजांनी राष्ट्रकुटांचा पराभव केला. त्यांची सन ९७३ पासून सन ११३० पर्यंत सत्ता होती. इसवी सन ११३० च्या सुमारास कपिलतीर्थ येथील जैन राजा शोणभद्र याने चालुक्य राजांचा पराभव करून संगमेश्वरचे राज्य त्याच्या राज्याला जोडले. नंतर पुन्हा चालुक्य राजांनी राजा शोणभद्र याच्या वंशजांचा पराभव करून त्याचे राज्य प्रस्थापित केले, ते १४७० पर्यंत! त्या घराण्याचा शेवटचा राजा 'जाखुराय' याचा मुसलमानांनी पराभव केला आणि संगमेश्वर येथे मुसलमानांचा प्रवेश झाला. ती मुसलमानी सत्ता पुढे सुमारे एकशेएक्याण्णव वर्षे म्हणजे १६६१ पर्यंत होती. त्या सुमारास शिवाजी महाराजांनी तेथे स्वारी करून विजापूरकरांचे अंकित सरदार शिर्के, दळवी, सुर्वे, सावंत, मोहिते इत्यादींचा पराभव केला व मराठी राज्याची सत्ता स्थापन झाली. पुढे, संगमेश्वर मराठा सत्तेतच राहिले. पुढे संभाजी महाराज पकडले गेले, ते कसबा संगमेश्वरमध्ये. तावडे बंदरात मुकर्रबखानाचा मुलगा इखलासखान याने संभाजी महाराजांना अटक केली. त्या घटनेने संगमेश्वरचे नाव दु:खद, संतापजनक व तितक्याच दुर्दैवी घटनेने इतिहासात नोंदले गेले. ती तारीख होती, ३ फेब्रुवारी १६८२.

मराठी राज्यामध्ये त्या भागाची महसूल व्यवस्था ज्या सरदेसाई घराण्याकडे होती त्या सरदेसाई घराण्याचे वंशज कसब्यात आहेत. संभाजी महाराज सरदेसाईंच्या ज्या वाड्यामध्ये पकडले गेले त्या वाड्याच्या खाणाखुणा, त्याच्या मागील बाजूस असलेली काही शिल्पे, भग्नावस्थेतील काही शिवमंदिरे पाहण्यास मिळतात!

गुजरातचा चालुक्य (चौलुक्य) राजा कर्ण त्या ठिकाणी इसवी सन १०६४ च्या सुमारास राज्य करत होता. तो कदंब राजांचा जावई होता. त्याने त्या काळात दहा हजार सुवर्णमुद्रा खर्च करून तेथे शिवमंदिर बांधले. ते त्याच्या नावाने 'कर्णेश्वर शिवमंदिर' म्हणून ओळखले जाऊ लागले. ते मंदिर शिल्पकलेचा अप्रतिम नमुना आहे. मंदिराची रचना हेमाडपंथीय असल्याचे म्हटले जाते. मात्र हेमाद्री तथा हेमाडपंडित तेराव्या शतकातील आहे. त्यामुळे ते मंदिर हेमाडपंथी असू शकत नाही. प्रत्यक्षात ते भूमीज शैलीतील मंदिर आहे. श्रीकर्णेश्वर मंदिर सुमारे हजार वर्षांनंतरही सुस्थितीत पाहण्यास मिळते. सुमारे चारशे चौरस मीटर क्षेत्रात काळ्या पाषाणात कोरीव काम केलेले असे ते मंदिर कसब्याचे पौराणिक महत्त्व टिकवून आहे.

कर्णराजाने कर्णेश्वराच्या पूजाअर्चेच्या वेगवेगळ्या कामांसाठी सात गावे दिली होती. धर्मकार्यार्थ-धर्मपूर (धामापूर), सुपारीसाठी गुणवल्लिका, भेट म्हणून देवजी भूचल, तुपासाठी शिवनी (शिवने), यज्ञासाठी लवल (लोवले), फळांसाठी धमनी (धामणी), धर्मसेवकांसाठी करंबव (कळंबस्ते), निवासार्थ आम्रवल्ली (अंत्रवली). त्यां पैकी गुणवल्लिका आणि भूचल या गावांचे संदर्भ सापडत नाहीत. कर्णराजाने कर्णेश्वर मंदिराच्या निमित्ताने त्यावेळी तीनशेसाठ प्रासाद म्हणजे मंदिरे बांधली होती. त्यांतील काही मंदिरे त्या ठिकाणी पाहण्यास मिळतात. त्यांमध्ये कुंभेश्वर, सोमेश्वर, काशीविश्वेश्वर, रावणेश शंकर, जलयुक्त नंदिकेश (संगम मंदिर) व कालभैरव यांचा समावेश आहे. कोकण परिसरात वैष्णवपंथीयांचे प्रमाण अधिक आहे. त्यांनी नंतरच्या काळात कर्णेश्वर मंदिराला कळस चढवला असावा. कारण सबंध मंदिर एका दगडात आहे. कळस दगड, माती आणि विटा यांनी बांधलेला आहे. त्या काळात देवळे दगडात कोरली जात होती, त्यांचे कळस माती-विटांनी तयार झालेले नसत. वैष्णवपंथीयांनी बांधलेल्या देवळांना कळस उंच असतात. पण दक्षिणेकडील शैवपंथीयांनी बांधलेल्या मंदिरांना तसे उंच कळस नसतात. कर्णेश्वर मंदिरात पावसाचे पाणी गळत होते, म्हणून २००३-०४ या वर्षी मंदिराच्या तीन छोट्या कळसांमध्ये थोडी दुरुस्ती करण्यात आली. तेव्हा ते कळस दगडमाती, विटांचे आहेत आणि त्यांना गूळ आणि चुना यांचे प्लास्टर करण्यात आले आहे ही बाब स्पष्ट झाली.

कर्णेश्वर मंदिरात आतील बाजूच्या दगडात देवदेवतांच्या

मूर्ती कोरलेल्या आढळतात. मंदिरावर जे चार कळस आहेत ते खालच्या बाजूने झुंबरासारखे कोरण्यात आले आहेत. मूळ मंदिर हे कळसरहित होते. नंतरच्या काळात कधीतरी त्यावर कळस चढवण्यात आले. त्यातून पावसाचे पाणी गळते, म्हणून त्या कळसांचा जीर्णोद्धार करण्यात आला. त्याखेरीज त्या मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याची वेळ आलेली नाही. ते मंदिर आहे तसेच सुबक दिसते.

सह्याद्री खंडातील वर्णनाप्रमाणे कसबा क्षेत्राच्या आठ दिशांना आठ तीर्थे होती. पूर्वेला कमलजा तीर्थ, गोष्पदतीर्थ, दक्षिणेला अगस्तीतीर्थ, आग्नेयेला गौतमीतीर्थ, नैर्ऋत्येला एकवीरातीर्थ, पश्चिमेला वरुणतीर्थ, वायव्येला गणेशतीर्थ, उत्तरेला मल्हारी मयतीर्थ व ईशान्येला गौरीतीर्थ अशी त्यांची नावे आहेत. त्यांपैकी आग्नेय दिशेचे गौतमीतीर्थ युक्त असे ते तीर्थ भैरवाने व्यापले आहे (त्या ठिकाणी स्नान करून व ते जलप्राशन करून मनुष्यप्राणी ब्रह्मलोकाला जातो अशी समजूत) व त्याच्या पश्चिमेला ज्ञानव्यापी या नावाने विख्यात महातीर्थ अशी तीर्थे त्या ठिकाणी पाहण्यास मिळतात. दक्षिणकडे डोंगरात वसलेले सप्तेश (सप्तेश्वर) हे ठिकाणही कसब्याचे वैभव म्हणावे असे आहे. रामक्षेत्रामध्ये पवित्र अशी दहा क्षेत्रे सांगितली आहेत. त्यांपैकी सहा विशेष श्रेष्ठ आहेत. त्यांची नावे- गोकर्ण, सप्तकोटीश, कुणकेश, संगमेश्वर, हरिहर आणि त्र्यंबकेश्वर. म्हणजेच, रामक्षेत्रात सांगितलेल्या पहिल्या सहा श्रेष्ठ अशा क्षेत्रांत चौथे क्षेत्र 'संगमेश्वर' आहे.

कसबा संगमेश्वराचे आध्यात्मिक महत्त्वही सर्वोच्च आहे. कार्तिकस्वामी व सूर्यनारायण अशी अभावाने आढळणारी दोन मंदिरे कसब्यात आहेत. चालुक्य घराण्यातील शेवटचा राजा 'जाखुराय' याच्या नावावरूनच त्या गावाच्या ग्रामदेवतेचे नाव 'जाखामाता' असे पडले असावे असा एक समज आढळतो. मात्र जाखमाता ही स्त्रीदेवता आहे आणि पुरूषाची स्त्री देवता होत नाही. त्यामुळे तो अंदाज चुकीचा असल्याचा तर्क करता येतो. जाखामातेचा 'शिंपणे' उत्सव महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.

◆◆◆



# मनाने कोकणवासी झालो

**- किशोर महाबोले**

मी मूळ सोलापूरचा. सोलापूरजवळ नळदुर्ग म्हरणून गाव आहे, उस्मानाबाद जिल्ह्यात तिथे माझा जन्म! कोकणामध्ये माझा पहिला प्रवास झाला तो गोव्यावरून परत येताना मित्रांसमवेत आणि ती पहिली ओळख माझी कोकणची! त्यानंतर हेदवीला आमचा एक प्रयोग होता नाटकाचा, त्या निमित्त कोकणात उतरून असा पहिला प्रवास झाला. हळूहळू कोकणाशी संपर्क वाढला. त्यानंतर माझे सासरेबुवा कोकण रेल्वे मध्ये होते, त्यामुळे १९८८ मध्ये त्यांच्याकडे येणे-जाणे हळूहळू वाढू लागले. रत्नागिरीला पऱ्याच्या आळीमध्ये मयेकर बिल्डिंग - जी तेव्हा रेल्वे कॉर्टर केली गेली होती - तिथे ते राहत होते; दुसरी गोष्ट म्हणजे मी इंजिनिअर असल्याने कोकण रेल्वेच्या सर्व्हेला आम्ही काही जण गंमत म्हणून जायचो. कोकण रेल्वेचा पहिला ब्रिज बांधायचा होता, त्याच्या सर्व्हेला आम्ही जायचो आणि जे अगदी काठीने साप उचलून बाजूला टाकणं वगैरे प्रकार आम्ही केलेले आहेत. तिथले इंजिनियर्स म्हणजे तरुण मुलं होती. बऱ्याच जणांना माहीत नसेल, पण दुर्दैवाने तेव्हा जे तरुण इंजिनियर्स कोकण रेल्वेसाठी काम करत होते ते बरेचसे अँक्सीडेंटमध्ये त्या काळामध्ये गेले. खरं तर एखादा मोठा प्रोजेक्ट्स होत असताना असं काहीतरी घडत असतंच. तेव्हा त्याचाही अनुभव माझ्या पाठीशी आहे, कारण मी ते अपघात स्वतः समोर बघितलेले आहे. ते दुःख माझ्याबरोबर आहे.

नंतर मग मी काही थोडा काळ नाटकाचा कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करत होतो. मग चिपळूणचे प्रयोग वगैरे तेव्हा मी घेत होतो. असाच एक चिपळूणचा प्रयोग संपवून हेदवीला मग पुढे जायचं होतं आणि तिथे एक भयंकर घटना आमच्यासोबत घडली ती म्हणजे चकवा. जी मंडळी झोपली होती त्यांना काही कळलं नसावं, पण जी मंडळी जागी होती त्यांना मात्र ते कळत होतं; कारण फिरून-फिरून गाडी पुन्हा पुन्हा एकाच ठिकाणी यायची. असंच पुढे पुन्हा एकदा आम्ही कुठला तरी प्रयोग करून येत होतो, तेव्हा साखरप्याजवळ एक चकवा मला असाच एकदा लागला होता. असे दोन चकव्यांचे अनुभव कोकणात प्रत्यक्ष अनुभवलेले आहेत.

खास कोकणातले म्हणून जे काही पारंपरिक खाद्यपदार्थ आहेत, त्यांचा या प्रवासा वेळी मला आस्वाद घेता आला. मला अजूनही आठवणीत आहे ती कोकणातली कढीपत्ता घालून केलेली कढी! नारळाचे दूध वापरून ती केलेली असते, तिची चव काही औरच असते. आणि ती गरम गरम खाण्यातच मजा आहे. म्हणजे नुकतीच ती चुलीवरून किंवा गॅसवरून उतरवायची आणि गरम गरम चाखायची; गार झाल्यानंतर ती कढी खाण्यामध्ये फारशी मजा येत नाही असं म्हणतात. तसंच हंगामाप्रमाणे कोकणात फिश, आंबे यांची तर काय चंगळच असते. कोकणात गेलात आणि या गोष्टी खाल्ल्या नाहीत तर कोकणचा अनुभव घेतला नाही असं मी म्हणेन. त्यात मी 'खवय्या' असल्यामुळे बऱ्याच गोष्टी मी तिथून घेत असतो आणि खात असतो.

नाटकाची माझी कोकणातली अशीच आणखी एक आठवण आहे. चिपळूणला आम्ही एक नाटक घेऊन गेलो होतो आणि प्रयोग करता करता अचानक लाईट गेले. बराच वेळ लाईट येईनात, तेव्हा आम्ही नाटक तसंच करायचं ठरवलं आणि साउंड वगैरे नसताना

बॅटरीवर दोन फ्लड लाईट्स लावले नि तसा आम्ही प्रयोग केला. प्रयोग स्पर्धेतला होता. तेव्हा ते नाटक पहिलं आलं होतं आणि तेव्हा हे नाटकवाले कसे आहेत बघा, साऊंड नसतानाही यांचा आवाज कसा लोकांपर्यंत पोहोचतो आणि किती एनर्जी नि आवाज ही मंडळी लावतात वगैरे आमचं कौतुक छापून आलं होतं.

तेव्हाच मधु मंगेश कर्णिक यांच्याशी भेट झाली. नंतर मग गणपतीपुळेला गेल्यानंतर मुद्दामहून आम्ही केशवसुतांच्या गावी एक फेरफटका मारला आणि नंतर पुळ्याच्या गणपतीला सतत जाणं व्हायला लागलं. तिथे मग केळकरवाडी मध्ये जाणं झालं, राहणं झालं. तिथे केळकरवाडीत शेणाने सारवलेली जमीन, आजूबाजूला सुंदर वृक्ष, बाग आणि समोर समुद्र. तिथल्या एखाद्या डेरेदार आंब्याच्या वृक्षाला खालपर्यंत लागलेला आंबासुद्धा जरी कोणी तोडला, तरीही अगदी लहान मूल रडावं तशा पद्धतीने केळकर यांच्या डोळ्यात टचकन पाणी यायचं इतका तो झाडांच्या भावना समजून घेणारा माणूस आणि अशीही आंब्यावरही प्रेम करणारी कोकणी माणसं मी अनुभवली. तिथल्या शाळेचे जे हेडमास्तर होते, त्यांची ती केळकरवाडी आहे. गणपतीपुळे जवळ अगदी समुद्रकाठी आणि शेजारीच केतकीच बन वगैरे!

त्या सगळ्या सुंदर अनुभवानंतर माझा चिपळूणचा एक प्रयोग झाला, कोकण रेल्वेचा प्रवास झाला आणि मग कोकणाची अवीट आवड माझ्यात निर्माण झाली. पुढे जेव्हा जेव्हा प्रयोगानिमित्त किंवा फिरायला म्हणूनही गोव्याला जायचं असलं की, आम्ही कोकण मार्गेच जायला लागलो. मला एकच मुलगी आणि योगायोगाने तिचा जन्मही कोकणातलाच - करमरकर हॉस्पिटल, रत्नागिरी! कारण नोकरीच्या निमित्ताने सासरेबुवा तिकडे होते आणि माहेरपणाला गेलेल्या माझ्या पत्नीची प्रसूती तिथेच झाली. त्यानिमित्ताने रत्नागिरीशीही आमचं नातं जोडलं गेलं. मग कधीही गोव्यात जाणं झालं तर येता येता सावंतवाडीला उतरायचं. सावंतवाडीची ती प्रसिद्ध लाकडी खेळणी मुलीसाठी घ्यायची नि माघारी यायचं. अशा प्रकारे सोलापुरातल्या माझ्यासारख्या माणसाचं कोकणाशी नातं घट्ट होत गेलं, ते नातं वाढलं, वृद्धिंगत झालं आणि हळूहळू कोकण मनांत घर करून बसलं.

जेव्हा मी 'अवघाची संसार' मालिका करत होतो तेव्हा कोकणातून प्रतिक्रिया मात्र फार यायच्या. शूटिंगच्या निमित्ताने माझं फार कोकणात जाणं कधी झालं नाही. मला वाटतं एकाच चित्रपटाचं शूटिंग तिथे दोन-तीन दिवसासाठी म्हणून मी तिथे केलेलं होतं. कोकणवासीयांचं प्रेम मात्र माझ्यावरती भरपूर आहे. कारण आताही 'आई कुठे काय करते' सिरीयल करतोय, तेव्हा कोकणातून प्रतिक्रिया मला आवर्जून येतात. आप्पांच्या भूमिकेचं कौतुक होतं. कलेवर प्रेम करणारी ही माणसं आहेत आणि मला वाटतं पु. ल. देशपांडेंनी म्हटलंय ते खरंय - कोकणी माणूस म्हणजे फणस; बाहेरून काटे आणि आतून एक रसाळ फळ! पण मला वाटतं की, हेही समीकरण आता बदलत चाललंय. त्यामुळे आता आतून बाहेरून गोडवाच फक्त जास्त दिसतोय कोकणी माणसांचा! पिढी बदलतेय असं म्हणायला हरकत नाही.

मी MSEB त डेप्युटी इंजिनियर म्हणून काम करत असल्यामुळे माझं सहा महिन्यासाठी पोस्टिंग झालं ते चिपळूण जवळ पेडांब्याला, त्या निमित्ताने तिथं राहणं झालं. न्यू कोयना सबस्टेशनला सहा महिने होतो. तेव्हा 'पवित्र रिश्ता' नावाची सिरीयल सुरू होती आणि नोकरी करत करत जसं मला जमेल त्या दृष्टीने ती करत होतो. कोकणात सहा महिने असताना मग दाभोळ, गुहागरला नेहमी जायचो. गुहागरला तेव्हा समुद्रावर बसायचं, समुद्राची ती गाज कानात साठवून ठेवायची आणि पुन्हा नवीन उभारी घेऊन कामावर परत यायचं. तर असा मी मनाने पक्का कोकणवासी झालो.

---------------

**व्यास दीपोत्सव २०२२**
**उमेश हरिभाऊ पाटील**
**यांसकडून**
**दीपावलीच्या शुभेच्छा!**

## गंध व्हा

गंध व्हा, उधळा स्वतःला
फूल आधी व्हा तुम्ही
रंगवुनी ह्या जगाला
इंद्रधनुषी व्हा तुम्ही

उजळण्या हे विश्व सारे
उजळणारी ज्योत व्हा
ज्योत म्हणुनी मिरवताना
राख बनण्या सिध्द व्हा

विश्व सारे उजळताना
ज्योत जळते अंतरी
प्रेमपक्षी फुलवताना
चंद्र झुरतो अंबरी

व्हा प्रकाशी गा मनाशी
गीत व्हा विश्वातले
जीवनाचे व्हा प्रवासी
शब्द व्हा गीतातले

कोवळे ऊन व्हा
अन् बरसणारा मेघ व्हा
घन तमाला छेदणारी
ती विजेची रेघ व्हा

**- हेमंत बर्वे**

## कोकणचा कुलाचार

कोकणाचा कुलाचार भावे पाळतो वरूण
इथे निसर्ग भरतो अन्नपूर्णेचे बोडण

सह्याद्रिचे कातळकडे जणू मांडिले चौरंग
हिरवट रानवेली, रांगोळीत पुष्परंग

शेते-खाचरे रेखीव मांडलेल्या काथवटी
त्यात केळीची ग पाने हिरवळीची गोमटी

ताडामाडांसह उभे स्वागता आगर
सुवासिनींचे चरण धुतो अरबी सागर

सुरंगी-अबोलीचे देवीलागी वळेसर
आंबे फणस जांभळे नैवेद्याला फलाहार

अष्टगंधाचा दरवळ देती बनात केवडे
देवीच्या पूजेला नारळ-सुपारी अन् विडे

तृणकुसुमे शोभती देवीलागी अलंकार
रिमझिम सनईचा आकाशी झंकार

घन गर्जना करून गाती मंगल आरती
विद्युल्लता तळपती तबकात जणू ज्योती

वृक्षांच्या माथ्याला काजव्यांची रोषणाई
कोकणकन्यांची बोडणालागी घाई

मनःपूत कोसळती मग पर्जन्याच्या धारा
पंचपात्रे भरभरून जणू पंचामृतधारा

आनंदाचे झरे खळाळती हिरव्या रानी
भरे बोडण तृप्तीचे वसुंधरेच्या सदनी

पलिकडे मावळात वारकर्यांचे रिंगण
इथे कोकणात भरे अन्नपूर्णेचे बोडण!

**- गौरी बावडेकर**

# लावण्यखणी भूलोकीची!

लावण्यखणी ती भूलोकीची
निसर्गसखी कोकण दुहिता
रंगबावरी लाजलाजरी
इहलोकीची सुंदर कविता!

नागमोडी कितीक वळणे
खट्याळतेने वाट अडविती
पायघड्या अन् घाली सुंदर
लाल देखणी कोकणमाती

डोंगर माथ्यावरून खाली
अल्लड झरे झेपावत येती
पदन्यास ऐकून तयांचा
वेडी होते कोकण धरती!

समुद्र वैभव कोकणातले
भुरळ घाली मना-मनाला
पहाटवेळी शांत किनारा
देई विसावा जिवाशिवाला!

बहर हिरवा झाडे हिरवी
पाचूचे हिरवे अंगण
देवाजीने दिला कोकणा
असीम अद्भुत निसर्ग आंदण!

- **गौरी कुलकर्णी, मुंबई**

# संस्था एक स्पर्धा अनेक

## कोकणप्रेम व्यक्त करणारी अभूतपूर्व स्पर्धा

व्यास क्रिएशन्स्चे कोकण आणि कोकणातील भूमिपुत्रांशी एक अनोखे नाते आहे. त्याचप्रमाणे कोकणचे गणेशोत्सवाशीही एक अतूट नाते आहे. हाच धागा पकडून व्यास क्रिएशन्स्ने यावर्षी पर्यावरणपूरक गणेश आरास स्पर्धा आणि गणेश सेल्फी स्पर्धा असे काही अनोखे उपक्रम गणेशोत्सवाच्या काळात योजले. ज्यांला समस्त कोकणातून भरघोस प्रतिसाद मिळाला.

त्याचप्रमाणे कोकणप्रेमी भूमिपुत्रांच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशानेही व्यास क्रिएशन्स्ने कोकण ही मध्यवर्ती संकल्पना ठेवून निबंध, कविता, चित्रकला व घोषवाक्य स्पर्धा देखील योजल्या होत्या.

महाराष्ट्रातील सर्व वयोगटातील स्पर्धकांनी वारेमाप प्रतिसाद नोंदवला. चारही स्पर्धांसाठी जवळपास १७०० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग होता. तिसरी-चौथीतील शालेय विद्यार्थ्यांपासून ८० वर्षांच्या आजींपर्यंत सारे व्यक्त झाले, याचा आम्हाला आनंद वाटतो. आपल्या कोकणवर प्रत्येकाचे किती प्रेम आहे हे यानिमित्त आम्हाला जाणवलं.

सर्व स्पर्धक आणि विजेते यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा!!

**स्पर्धाप्रमुख : साक्षी नीलेश गायकवाड**

कोकण भूमीवरील निबंध व काव्य स्पर्धेचे निवडक विजेते

# कोकण विकासाची संधी

**- प्रतिक्षा गुरव**

या विषयाला सुरुवात करण्याआधी कोकणाबाबत थोडं...

कोकण

'कोकण' म्हणजे कौलारू घर, स्वच्छ अंगण, तुळस व तिला आधार देणारा दिवा.

'कोकण' म्हणजे गोठा, साठवून ठेवलेलं गवत आणि गाईच्या भोवती पिंगा घालत असलेलं तिचं वासरू.

'कोकण' म्हणजे बाहेरची पडवी, झोपाळा, त्यावर असलेली पानसुपारीची पिशवी, तिरक्या रिपी मारलेल्या खिडक्या.

'कोकण' म्हणजे माजघर, एका कोपऱ्यात पडलेलं जातं, आजीने सारवलेली चूल फुंकून ओलसर झालेला कारभारणीचा चेहरा.

'कोकण' म्हणजे देव, महापुरुष, वेतोबा, रवळनाथ, सातमी, सातेरी, गिरोबा, रामेश्वर, कुणकेश्वर, सागरेश्वर,

'कोकण' म्हणजे गर्द देवराई, त्यात नाहीशी होणारी देवाची वाट आणि वेशीवर दिलेला नारळ.

'कोकण' म्हणजे घुमत असलेले ढोल, येणारं निशाण, त्याला तोरण बांधण्यासाठी घरातल्यांची घाई.

'कोकण' म्हणजे देवाचार, त्याच्या चपलांचा आवाज. मनात असलेली भीत, वाडवडिलांची पुण्याई.

'कोकण' म्हणजे लाल माती, मोहरत असलेला आंबा. फणस आणि डोलणारी माडा-पोफळीची झाडं.

'कोकण' म्हणजे पतेरा, बकुळीचा धुंद वास, करवंदाची घनदाट जाळी आणि कण्हेरीची फुलं.

'कोकण' म्हणजे सुरमई, बांगडा, कुर्ल्या, कालवं, चिंबोरी आणि मोरी माश्याचं कालवण.

'कोकण' म्हणजे चुलीवर भाजला जात असलेला बांगडा, भाकरी आणि कांद्या-गोलम्याचा ठेचा.

'कोकण' म्हणजे उकड्या तांदळाची पेज, उकडलेल्या आठळा आणि फणसा-केळफुलाची भाजी.

'कोकण' म्हणजे भात, कैरी घातलेली डाळ, घावणे आणि वाटप घातलेली उसळ.

'कोकण' म्हणजे तळलेली सांडगी, कांडलेली पिठी, सुकत असलेली आंब्याची साठं आणि मुरत असलेलं लोणचं.

'कोकण' म्हणजे नदीला आलेला पूर, मुसळधार पाऊस आणि कोपऱ्यात पुढे सरकत असलेला नांगर.

'कोकण' म्हणजे पेप्सी खात जाताना दिसणारी पोरं, डांबरी रस्ता, पत्र्याचा पूल आणि खालून वाहणारा व्हाळ.

'कोकण' म्हणजे महापुरुषाची पूजा, वडा, भात, उसळ आणि डबलबाज्या.

'कोकण' म्हणजे दिवाळी, फोडलेलं कारीट, करंज्या आणि उंच निघून जात असलेले कंदिल.

'कोकण' म्हणजे होळी, गोडाचं जेवण, गाडलेला खांब, केली जाणारी किंवा केलेली शिकार आणि मारलेल्या बोंबा.

'कोकण' म्हणजे पाटीवर काढलेली सरस्वती, शाळेत नेलेल्या काकड्या, उदबत्त्या आणि पोरांचं भजन.

'कोकण' म्हणजे गावच्या ग्रामदेवतांच्या जत्रा, पूजा, शिरा, मुखवटे, फुगे आणि खाजं.

'कोकण' म्हणजे नांदी, तबल्यावर पडलेली थाप, धर्मराजाची एन्ट्री आणि दशावताराची समृद्ध कला.

'कोकण' म्हणजे समुद्रावरचं, देवळातलं, पिपळाखालचं मळ्यातलं क्रिकेट आणि 'टुर्नामेंट'.

'कोकण' म्हणजे समुद्र, किनारा, नाठाळ वारा, ती गाज आणि दूरवर गेलेली गलबतं.

'कोकण' म्हणजे चकवणारे मासे, लागलेली रापण, ओढणारे तांडेल आणि बघ्यांचा हा गलका.

'कोकण' म्हणजे सर्जेकोटची जेटी, चमचमणाऱ्या माश्यांचा लिलाव, दमून परत आलेल्या होड्या.

'कोकण' म्हणजे संपलेली सुट्टी. परत जायची तयारी, जड झालेल्या चाकरमान्याचा पाय आणि सगळ्यांच्या डोळ्यात आलेलं पाणी.

'कोकण' म्हणजे खूप काही सांगू पाहणारा पूर्ण न उलगडणारा, कसलाच अंत नसलेला असा काशीविश्वेश्वराचा एक डाव...

सह्याद्री पर्वत आणि अरबी समुद्र यांच्यातील अरुंद पट्टीला कोकण या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र राज्याचा एक भाग असलेला आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उत्तरेकडील झाई खाडीपासून दक्षिणेकडील

तेरेखोल खाडीपर्यंत ७२० किमीचा समुद्र किनारा लाभलेल्या कोकणावर निसर्गाने सृष्टी सौंदर्याची मुक्त हस्ते उधळण केली आहे.

आज मुंबई शहर उपनगर तसेच ठाणे, रत्नागिरी, रायगड किंवा सिंधुदुर्गचा कोकणात समावेश होत असला तरी चिनी प्रवासी युआन च्यांग याच्या वर्णनावरून वनवासी, बेळगाव, धारवाड इत्यादी घाटापलीकडील प्रदेशाचा कोकणात समावेश होता असे दिसते. मध्ययुगात कोकणचे तीन भाग मानले गेले होते. तापीपासून वसईपर्यंत 'बर्बर' बाणकोटपर्यंत 'विराट', देवगडपर्यंत 'किरात'. पूर्वी हा सारा प्रदेश अपरान्त नावाने ओळखला जाई त्याचे नाव कोकण कसे झाले याबाबत मतभिन्नता आहे. कोकण ही परशुरामाची भूमी म्हणून ओळखली जाते. परशुरामाची माता कुंकणा यावरून कोकण हे नाव पडले असावे असा मतप्रवाह आहे. कोणकोण म्हणजे डोंगरमाथा! यावरूनही कोकण हा शब्द आला असावा.

डॉ. कृष्णास्वामी अय्यंगार यांच्या मते कोकण हा शब्द तामिळ भाषेतून निर्माण झाला आहे. कोकण हे रूप कोळ व काणम या दोन शब्दांच्या संयोगातून झाले असावे. सातव्या शतकातील प्रपंच हृदय या ग्रंथात कुपक, केरळ, मूषक, आळूक, पशुकोकण, परकोकण ही नावे आहेत. ही सप्तकोकणे केरळपर्यंत पसरलेली आहेत. परदेशी प्रवासी टॉलेमी याने गुजरात व उत्तर कोकण यास 'लारिका' व दक्षिण कोकणास 'आरिका' म्हटले आहे. काही प्राचीन ग्रंथात कुंकण, कुकण असेही उल्लेख आहेत. परशुरामाने जिंकलेली भूमी ब्राह्मणांना दान दिल्यानंतर आपणास राहावयास जागा उरली नाही हे पाहून परशुरामाने समुद्र शंभर योजने मागे हटवून अपरान्ताची भूमी निर्माण केली अशी अख्यायिका आहे. तर कोकण हा प्रांत ज्वालामुखीच्या उत्पातात समुद्रतळापासून वर आलेला प्रदेश आहे असे भूगर्भ शास्त्रज्ञांचे मत आहे. रायगडचा इतिहास बघताना कोकणाची ओळख आवश्यक असते.

कोकण...! स्वर्गीय निसर्ग सौंदर्याची खाण असलेले कोकण..! अपरान्तभूमी म्हणून गौरविलेले कोकण...! प्राचीन इतिहासाचा, गड-किल्ल्यांचा समृद्ध वारसा सांगणारे कोकण...! बाजारूपणाचा स्पर्श न झालेले देवभूमी कोकण...! आणि आता कोकण रेल्वे पाठोपाठ येथील एकमेव मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या वेगाने होत असलेल्या विकास कामामुळे, येऊ घातलेल्या नवनवीन प्रकल्पामुळे 'कायमस्वरुपी निवासी वास्तव्य ठिकाण' म्हणून, निवांतपणासाठी, व्यापारासाठीही 'कोकण' जगभरातील अनेकांच्या मुखी घट्ट बसलंय! याची प्रचिती कोकणात सुरू असलेले विविध कल्पक वास्तुप्रकल्प आणि पर्यटन प्रकल्प त्यांना मिळणारा प्रतिसाद पाहता सहज येऊ शकते. त्या विषयीचे हे विवेचन...!

आधुनिक काळात कोकणही बदलतंय. विविध नवनव्या सुधारणांचा स्वीकार करताना आपले जुने आणि सर्वांना भावणारे कोकणीपण विविध वास्तू प्रकल्पांमध्ये जपताना दिसते. मोठाले वास्तू प्रकल्प, रोहाऊस, फार्महाऊस, सदनिका प्रकल्प यांना मिळणारा प्रतिसाद, त्यातील कोकणीपण अनेक 'विकास' जाणीवपूर्वक जपताना आढळत आहेत आणि यामागे येथे येऊ इच्छिणाऱ्यांची कोकणच्या प्रेमाने भारलेली मानसिकता आहे. या मानसिकतेचा उपयोग करून कोकणात अधिकची आर्थिक, व्यावसायिक समृद्धी आणणे सहज शक्य आहे. पण आता आधुनिक पद्धतीच्या पर्यटन व्यवसायात या कल्पनेला काही लोकांनी वेगळे स्वरूप दिले आहे. आज कोकणात पर्यटनाला येणाऱ्यांचे हॉटेलात उतरण्यासह इतर ठिकाणी उतरण्याचे प्रमाण वाढते आहे. यासाठी सेकंड होम म्हणून खरेदी केल्या जाणाऱ्या वास्तू प्रकल्पांचा उपयोग करून घेणे शक्य आहे. याचा विचार करून कोकणात काही प्रकल्पांनी आपली आखणी केली आहे.

भविष्यात या संपूर्ण व्यवसायात ही वाढती संधी आहे. कोकणातील तीर्थक्षेत्रदर्शन सांस्कृतिक पर्यटन, कोकणी संस्कृतीची ओळख यांचीही संधी येथे मिळते आणि याच आकर्षणापोटी मानवी समूह आज कोकणाकडे वळतो आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकजण शांत, निवांतपणे, आनंदात काही काळ जगता येईल अशी जागा शोधत असतात, अशा शोधकर्त्यांच्यासाठी कोकण सर्वोत्तम पर्याय म्हणून उभे राहिले आहे. आज कोकणातील अनेक वास्तूप्रकल्प केवळ विविध पर्यटनस्थळांच्या नजिक उभे राहत आहेत. त्यांना चांगले ग्राहक उपलब्ध होत आहेत. कामाचा आठवड्याभराचा ताणतणाव दूर करण्यासाठी गावात किंवा एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात घालवायला प्रत्येकालाच आवडते. हिरवीगार झाडे, रंगीबेरंगी फुले, निरनिराळे पक्षी आणि खळाळणारा धबधबा, पाण्याचा आवाज असे मनमोहक रूप कोकणचे विशेष असले तरी आज ही अनुभूती वास्तू प्रकल्पांतही घेता येते आहे. ज्यामुळे दिवसभराचा मानवी थकवा गायब होऊन मिळणाऱ्या समाधानामुळे अनेक पाऊले कोकणात गुंतवणुकीसाठी आकृष्ट होताना दिसत आहेत. त्यांना कोकणीपणा जपणारे पर्याय उपलब्ध करून देणारे 'विकासक' हमखास यात यशस्वी होत आहेत, होणार आहेत यात शंका नाही.

पाणी, पर्यटन, प्रगत शेती, फलोद्यान, प्रक्रिया, वनशेती व वनौषधी आणि मत्स्य उद्योग ही कोकणच्या शाश्वत विकासाची सप्त सुत्री आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय आणि नागरिकांना पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी राज्यात कृषी पर्यटन धोरण राबविण्यात आले आहे. या निर्णयाचा कोकणातील शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास, शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध, कृषी पूरक व्यवसायांना प्रोत्साहन, गावातील महिला तरुणींना रोजगाराची संधी देणे, लोककला आणि परंपरांचे दर्शन घडविणे. पर्यटकांना प्रत्यक्ष शेतीतील कामाचा अनुभव देणे, प्रदूषणमुक्त व निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा अनुभव देणे, असा या धोरणाचा उद्देश आहे. यासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांच्या कृषी सहकारी संस्था, कृषी विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालये, कृषी विद्यापीठे, शेतकऱ्यांच्या भागीदारी संस्था किंवा कंपन्या मिळून कृषी पर्यटन केंद्र उभारू शकतात. या पर्यटन केंद्रांना पर्यटन विभागाकडून नोंदणी प्रमाणपत्र मिळेल, म्हणजे त्यांना बँकेकडून कर्ज मिळू शकेल. वस्तू व सेवा कर तसेच विद्युत शुल्क सवलत इत्यादीचा लाभ घेता येईल. दोन एकर ते पाच एकरपर्यंत शेतीचे क्षेत्र असणाऱ्या ठिकाणी राहण्याची सोय असलेल्या खोल्या असल्या तर या ठिकाणी भोजन व्यवस्था व स्वयंपाक घर असणे आवश्यक आहे. यामुळे कृषी पर्यटन वाढीस लागेल आणि कोकणात यामुळे विकासाच्या संधी निर्माण होऊ शकतात.

लहानमोठ्या दऱ्या, समुद्राला जोडणाऱ्या खाड्या, समुद्रकिनारा यामुळे मत्स्यव्यवसाय हा कोकणातील प्रमुख व्यवसाय आहे. मत्स्यव्यवसायाचे प्रामुख्याने तीन विभाग पडतात. सागरी मत्स्यव्यवसाय, निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय आणि भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय. मासेमारीबरोबर मत्स्यसंवर्धन ही संकल्पना अलीकडे दृढ होत चालली आहे. कोकणात सागरी मत्स्यव्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. ठाणे व रायगड जिल्ह्यात तळी तलावांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याने या जिल्ह्यांमध्ये गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसायही करण्यात येतो. कोकणातील खाजण जमीन क्षेत्र कोळंबी संवर्धनासाठी उपयोगात आणण्यात येते. कोकणात मासेमारी या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाची संख्या फार मोठी आहे.

कोकणच्या किनाऱ्यावर १९६६-६७ सालापासून नौकांचे यांत्रिकीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. नौकांचे यांत्रिकीकरणाद्वारे प्रगत मच्छिमारी तंत्राचा अवलंब करून सागरी मत्स्योत्पादन कसे वाढवावे याचे मच्छिमार युवकांना सर्वांगीण प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सातपाटी व वसई (ठाणे), वर्सोवा (मुंबई), अलिबाग (रायगड), रत्नागिरी व मालवण (सिंधुदुर्ग) येथे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली आहेत. या केंद्रात सागरी मत्स्यव्यवसाय नौकायान, सागरी मासेमारी पद्धती, नौका इंजिनाची देखभाल व परीरक्षण इत्यादीबाबतचे प्रशिक्षण देण्यात येते.

महाराष्ट्राची संपूर्ण किनारपट्टी नैसर्गिक साधनांनी संपन्न आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका असणारे मत्स्यव्यवसाय क्षेत्र राज्याला कोट्यवधी रुपयाचे परकीय चलन मिळवून देते. मत्स्यव्यवसाय क्षेत्र रोजगार निर्मितीला पूरक आहे. उपलब्ध मत्स्य साठ्याचे योग्य रितीने व्यवस्थपन करून मत्स्यसंवर्धन तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. शासकीय योजनांचा लाभ मच्छिमार बांधवांनी घेतल्यास येणारा काळ या व्यवसायासाठी फलदायी ठरेल. कोकणातील विकासाला मासेमारी व्यवसाय चालना देणारा ठरेल.

स्वयं सहाय्यता महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी मोठी संधी उपलब्ध असून जवळच असलेल्या कारखानदारांनी महिला बचत गटांकडे कच्चा माल पुरवठा होण्याच्या दृष्टीने मागणी केल्यास अधिक सक्षम होतील. आज महिलांनी अनेक उद्योग व्यवसाय, बचत गटाच्या माध्यमातून उभारले आहेत. त्यांनी तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी म्हणून शासनही प्रयत्नशील आहे. गावागावातील बचत गट हे महिलांना आर्थिकदृष्ट्या सबल बनवण्यासाठी एक उत्तम संधी आहे. रोजगार आणि आत्मसन्मान या दोन्ही चांगल्या गोष्टी बचत गटाच्या माध्यमातून एखादी स्त्री कमावू शकते. संघभावनाही यातून जोपासली जाते. बचत गटामुळे महिलांमध्ये संघटनशक्ती, स्वविकास व सामाजिक विकासाची जाणीव निर्माण झाली. या यशातून प्रेरणा घेऊन भारतानेही बचत गटांच्या माध्यमातून लघुत्तम उद्योगांना चालना देण्यास सुरुवात केली. त्यामुळे कोकणाचा विकासही होत आहे.

आपल्या राज्यातील विशिष्ट भागांच्या विकासाची आणि अन्य भागांच्या मागासलेपणाची वारंवार चर्चा होते. वास्तविक स्थानिक जनतेने आपली प्रागतिक, कृतिशील मानसिकता पुढे आणणे, काही करण्याची क्षमता असलेल्यांनी आपल्या भागाचे पालकत्व स्वतःहून स्वीकारणे आणि राजकीय सत्तेवर दबाव आणून त्यांना या प्रक्रियेचे उत्प्रेरक होण्यास भाग पाडणे, हाच मागास भागांच्या विकासाचा मार्ग असू शकतो. मराठवाडा, विदर्भ, कोकण,

खान्देशासारख्या प्रदेशांतील जनतेने केवळ सरकार आणि नोकरशाहीवर अवलंबून न राहता प्रगतीच्या या त्रिसूत्रीच्या आधारे पुढची वाटचाल करायला हवी.

आज भारतात सर्वात जास्त रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या व्यवसायाला 'रिअल इस्टेट' क्षेत्र तसेच हे दुसऱ्या क्रमांकावर आहे. या उद्योगात खूपच सकारात्मकता आहे. यास्तव शासकीय स्तरावर या व्यवसायाच्या विकासासाठी पूरक वातावरण तयार व्हावे म्हणून काही महत्त्वाचे निर्णय घेतले जात असतात. कोकणात तर पर्यटन विकास, निसर्ग संवर्धनासाठीचे प्रयत्न, पायाभूत सुविधा विकास या साऱ्या व्यवसायाला अधिक बळ देत असतात. आणि म्हणूनच या क्षेत्रात कोकणही आघाडीवर आहे. या व्यवसायाला थेट परकीय गुंतवणुकीचे प्रमाणही गेल्या काही काळापासून वाढू लागले असून याचा कोकणालाही उपयोग करून घेता येईल. आज जगातील अनेक देशांची गुंतवणूक या व्यवसायात भारतात होते आहे. व्यवसाय म्हणून कोकण क्षेत्र नक्कीच फायदेशीर आहे. त्यामुळे कोकणात ही गुंतवणूक वाढल्यास कोकणचे अर्थकारणही काही प्रमाणात बदलू शकते. अधिकाधिक आर्थिक उपलब्धी झाल्यास होणाऱ्या विकासाचा आनंद गुंतवणूकदारांना सुद्धा मिळणार आहे. ज्यातून गुंतवणूक वाढून संपूर्ण प्रगतीस वाव मिळू शकतो.

***नवी संधी नवी आशा।***
***विकासाची नवी दिशा।।***

--------

## कोकणातलो पाऊस

कोकणातलो पाऊस मिरगाचो
बांधावर बळी नारळ  कोंब्याचो
पेरणीचे दिवस इले
शेतकरी कामाक लागले
पावस इलो कोपऱ्यात
मांगराच्या पत्र्यात, अळवाच्या पानात
मनाचो झोपाळो झुललो
मातयेच्या वासान, नाच नाचान गेलो
म्हातारी आजी, भाजता काजी,
आता रूजतली कुरडू भाजी
कोपऱ्यात, व्हाळात माझे चढले
राजो, सोनो आक्या घेवन धावले
बघता बघता सांज झाली,
कोकणातल्या पावसाक सुरवात झाली

**- आर्या सापळे**
इयत्ता तिसरी
जि.प. शाळा नं. ५,
हरकूळ बुद्रुक,
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.
९४२३५१३६०४

कोकण भूमीवरील निबंध व काव्य स्पर्धेचे निवडक विजेते

# कोकण म्हणजे स्वर्ग

**- लेखा मराठे**

'येवा, कोकण आपलोच आसा' असं म्हणत अख्ख्या जगाला मायेनं आणि अगत्यानं साद घालणारं आपलं कोकण. फणसासारख्या वरून थोड्या काटेरी, फटकळ, पण आतून मात्र गऱ्यांसारख्या गोड माणसांचं आपले कोकण. खवय्यांसाठी चटकदार माशांची मेजवानी, रानमेवा, सोलकढी आणि अस्सल कोकणी जेवणानं रसना तृप्त करणारं आपलं कोकण, माडा-पोफळीच्या गर्द महिरपीतून डोकावणारी जांभ्या दगडांची, उतरत्या कौलारू छपरांची सुंदर घरं, विस्तीर्ण समुद्रकिनारे, सुरूची बनं, गडकिल्ले, वळणावळणाचे रस्ते, देखणी मंदिरं दिमाखात मिरवणारं, नीतिमंत, बुद्धिमंत, कर्तृत्ववान अशा अनेक नररत्नानं मायभूमी, कर्मभूमी असणारं आणि वैशिष्ट्यपूर्ण लोकपरंपरांचा वारसा सांगणारं सर्वार्थानं समृद्ध, वैभवशाली असं आपलं कोकण म्हणजे 'स्वर्गादपि गरीयसी'च!

काय नाही आपल्या कोकणात? अगदी महाराष्ट्रापुरतं बोलायचं झालं तरी देशाची आर्थिक राजधानी महानगरी मुंबई, झपाट्यानं वाढणारं मुंबई उपनगर, ठाणे आणि पालघर, ऐतिहासिक वारसा सांगणारा रायगड, तर निसर्गानं सौंदर्याची मुक्तहस्ताने उधळण केलेले रत्नागिरी-सिंधुदुर्ग. कोकणाला स्वर्ग म्हणायला आणखी हवं तरी काय? स्कंदपुराणामध्ये गुजरातपासून ते थेट केरळपर्यंतचा प्रदेश म्हणजे 'सप्तकोकण' असा उल्लेख सापडतो, तर महाभारतामधल्या भीष्मपर्वात गोमंतक, गोपराष्ट्र, गोकर्ण, परांत, अपरान्त, केरळच्या उत्तरेला असलेल्या शूर्पारकापर्यंत विस्तारलेल्या प्रदेशाला 'कोकण' असं म्हटलेलं आहे. द्रविड भाषेत खडबडीत प्रदेश म्हणजे कोकण तर संस्कृतात 'क' म्हणजे पाणी तर 'अंक' म्हणजे मांडी किंवा कुशी, यापासून तयार झालेला धातू 'कोंक' आणि शब्द कोकण. अर्थात शब्दातूनच आपल्या सौंदर्याची अनुभूती देणारं हे देवभूमी, परशुराम भूमी कोकण.

या नंदनवनाचं वर्णन करण्याचा मोह प्रतिभावंत साहित्यिकांना तरी कसा बरं आवरेल? कोकणात पहिल्यांदाच जाणाऱ्या गोमूच्या 'घोवाला' निळी खाडी, काठावरची हिरवी झाडी, आबोलीच्या फुलांचा ताटवा, भेटणारी गोड, साधीभोळी कोकणी माणसं, उंचच उंच माड, शिडाची गलबतं दाखवायचा आग्रह गदिमा करतात. कविवर्य मंगेश पाडगावकरांना 'वेंगुर्ल्याचा पाऊस कसा माया करीत यायचा' असं म्हणताना 'तो आईसारखं थोपटून निजवणारा' वाटतो, तर वि. स. खांडेकर यांना कोकणातल्या जुन्या आठवणी या मुरलेल्या आंबट गोड लोणच्यासारख्या वाटतात. आरती प्रभू लिहितात, 'धुकें फेंसाळ पांढरे दर्वळून दंवे, शून्य शृंगारतें आतां होत हळदिवें', 'माझ्या गोव्याच्या भूमीत लाल माती, निळे पाणी' असं म्हणताना बाकीबाब बोरकर सारा निसर्ग डोळ्यांसमोर उभा करतात.

तैलबुद्धी लाभलेली, मोठं उघडं पोट सावरत चालणारी, पंचा नेसणारी बेरकी कोकणी माणसं दिसली की, 'देवगडचो हापूस म्हणजे सगळ्या आंब्यांचो बापूस' असं म्हणणाऱ्या पुलंचा 'अंतू बर्वा' हा आठवतोच! साने गुरुजींच्या लिखाणात कोकणातला साधेपणा गवसल्यावाचून राहत नाही, तर मधु मंगेश कर्णिक यांचं साहित्य सतत कोकणी संस्कृतीला गवसणी घालत राहतं. आता हे सगळं साहित्यवैभव वाचणारा या कोकणच्या प्रेमात पडला नाही तरच नवल!

उशाला सह्याद्री आणि पांघरायला समुद्र घेणारं कोकण लाल मातीच्या रांगडेपणानं धो-धो पाऊस अंगावर झेलतो आणि मग हिरवा शालू नेसून लाजणारी डोंगररांग पाहून सुखावतो. हिरवीगार भातखाचरं, नाचणी किंवा नागली, कुळीथ, माडा-पोफळीची वाडी, आंबे, काजू, रातांबे, फणस ही छोटी-मोठी शेतीबागायती, यातूनच बनणारे चविष्ट असे असंख्य पारंपरिक पदार्थ आणि मासे यात समाधानी असणारा साधा कोकणी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी त्याला उकड्या तांदळाच्या पेजेची आठवण आल्याशिवाय मात्र राहू शकत नाही. गौरीगणपतीचा सण आणि शिमगोत्सव म्हणजे कोकणात उत्साहाचं उधाण येतं. घरंदारं मुलामाणसांनी फुलून जातात. चाकरमानी गावी येतात आणि म्हाताऱ्या माणसांच्या अंगी दहा हत्तींचं बळ येतं. जत्रोत्सव, दहीकाला, छबिना, ऊरूस, नाताळ असे सगळे उत्सव आणि दशावतार, बाल्या नृत्य, कळसूत्री, भजन, डबलबारी या लोककलांतून कोकणी माणूस जगण्यातला आनंद शोधतो. कोकणी भाषा तर मधासारखी गोड! संपूर्ण कोकणपट्ट्यात भाषा खूप बदलत जाते, पण कानाला तो खास हेल मात्र जाणवतोच.

वळणावळणाच्या रम्य वाटा आणि त्यावर धावणारी लालपरी हा कोकणी लोकजीवनाचा आत्मा तर कोकण रेल्वे हा चाकरमान्यांचा आधार आहे. जलमार्गे आणि आता

हवाईमार्गे होणारी वाहतूक पर्यटन व्यवसायाला चालना देणारा आणि कोकणाला जगाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. निसर्ग, जैवविविधता, पर्यावरण संवर्धन या सगळ्याशी अगदी सहजपणे जोडलेल्या कोकणी माणसाला 'आणखी हवं' ही हाव नाही. सत्तेची चटक नाही, उपभोगाची भूक नाही. अगदी मिठाच्या पाण्यातही भात भिजवून तृप्तीची ढेकर देणारा साधाभोळा कोकणी माणूस कोणत्याही संकटात ताठ कण्याने आणि हिमतीने लढत राहतो. वृत्तीने सुशेगाद असणारा कोकणी 'बाबल्या' कष्ट करून पोटापुरता कमावतो आणि बायकोपोरांच्या चेहऱ्यावर आनंद बघत सुखानं निजतो. मूलतः अशा शांत आणि तृप्त असणाऱ्या आपल्या सुंदर कोकणाला स्वर्गापेक्षा कमी कोण म्हणेल?

पर्यटन हा तर कोकणाचा श्वास! ढगांनी गच्च भरून ओथंबून येणारं आकाश आणि सहस्रावधी जलकुंभांनी अभिषेक करावा असा अनिर्बंध कोसळणारा पाऊस कोकणातला पर्यटन हंगाम खऱ्या अर्थानं जिवंत करतो. ओसंडून वाहणारे धबधबे, धडकी भरवणारे पण डोळ्याचं पारणं फेडणारे घाटरस्ते, थंड हवेची ठिकाणं आणि स्वच्छ सुंदर समुद्रकिनारे पर्यटकांना खुणावतात. उत्तम सोयीसुविधांनी परिपूर्ण आतिथ्यशील रिसोर्ट्स् आणि होम स्टे, साहसी खेळ, नाविन्यपूर्ण बागा यामुळे स्थानिकांना रोजगार आणि पर्यटकांना सुविधा उपलब्ध होतात. गावाची राखण करणारी शस्त्रायुधांनी सज्ज ग्रामदैवतं आणि कोकणातील इतर प्रसिद्ध पुरातन देवस्थानं भक्ती, श्रद्धा आणि विश्वासाला बळकटी देतात. जागतिक वारसा सांगणाऱ्या ब्रिटिशकालीन भव्य इमारती आणि ऐतिहासिक स्थळं, चकित करणाऱ्या सुंदर लेण्या, इतिहासाची साक्ष देणारे भक्कम जलदुर्ग आणि सह्याद्रीचा वारा अंगावर झेलणारे उंच डोंगरी किल्ले हे तरुणांसाठी व अभ्यासकांसाठी मोठं आकर्षण आहे. निसर्गरम्य कोकण नररत्नांचीही खाण आहे. जगाला सहा भारतरत्न देणाऱ्या कोकणभूमीतील अनेक प्रतिभावंत कलाकार, साहित्यिक, स्वातंत्र्यसेनानी, धुरंधर राजकारणी, समाजसेवक आणि सर्वच क्षेत्रात यशाचं उत्तुंग शिखर गाठणारी कोकणी माणसं ही कोकणची शान आहे.

कोकणाबद्दल किती किती लिहावं? कोकण म्हणजे जणू महाराष्ट्राच्या पैठणीचा हिरवागार पदरच की ज्याच्याशिवाय पैठणीला शोभा नाही! आपलं कोकण जगात भारी आणि प्रत्येकाने त्याची स्वर्गीय अनुभूती प्रत्यक्ष घ्यावी हेच खरं. कारण -

'आयुष्याचे सार्थक होई असे सुख माझ्या कोकणात,
नको जाया कुठे दूर माझा स्वर्ग माझ्या दारात!'

## कोकणातील समुद्रकिनारा

कोकणातली खूप मंदिरे...
सागरकाठावरी!
भक्ती गाठते मुक्तीकिनारा,
बसून लाटांवरी!

कृतज्ञतेचे मीठ सांडते,
रात्रंदिन येथे,
जाळ्यामध्ये येती धावत,
माशांचेच जथे!

आकाशाचा रंग पांघरून
स्वच्छ निळे पाणी
ओठावरती लाटांच्या तर,
फेसांची गाणी!

होड्या झुलती दबा धरुनिया,
पकडाया मासे,
शकुनी मामा होऊनी कोळी,
जाळ्यांचे फासे!

समुद्र भेटे जिथे नभाला
क्षितीजरेषा निळी!
सांजसूर्य भेटाया येता,
क्षितीज त्याला गिळी!

दगडांचा आडोसा पाहून,
कुजबुज करते प्रेम,
चोरून बघणारांची दृष्टी,
अचूक साधी नेम!

विश्रांती ना चुकून घेती,
लाटा दमल्या तरी,
ओंकाराला स्मरते येथे,
वाऱ्यातून वैखरी!

अहंपणाचा अंश उरेना,
ऐकून सागरगाज!
आत्मपरीक्षण करता येते,
माजालाही लाज!

**- प्रमोद जोशी**
१०२ निर्मल अपार्टमेंट्स, श्रीकृष्णनगर,
मु.पो. जामसंडे,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग-४१६६१२.
९४२३५१३६०४

powered by

व्यास क्रिएशन्स

project by

Vyas Infra



एक गाव

'महा'ताऱ्यांचं...

BORN AGAIN...

नवे घर,
नवे मित्र,
नवी नाती,
नवे जीवन

म्हातारपण नव्हे, ही तर
आयुष्याची **नवलाई**
'महा'ताऱ्यांचं गाव,
नाव त्याचं **सांजराई**

सांजराई
गृहागर
ज्येष्ठांचे
आत्मनिर्भर घर

सांजराईमध्ये
या आणि
एक स्वतंत्र व
प्रशस्त जीवन
जगा

या भव्य प्रकल्पामध्ये आजच **गुंतवणूक करा** आणि आपल्या
निवृत्तीनंतरच्या **पुनर्जन्माची तजवीज करा.**

COMMUNITY LIVING FOR SENIOR CITIZEN

ज्येष्ठांसाठी COMMUNITY LIVING

आयुष्यात जे जे राहून गेलं, ते ते सर्व तुम्हाला इथे मिळेल.

Nilesh Gaikwad Regd. No. A51700023669

**6.75 एकरचा गृहप्रकल्प** (ज्येष्ठांकरिता वसलेली पहिली वहिली बंगले वसाहत)

• POSSESSION STARTS FROM MARCH 2023 • PROJECT COMPLITION AS ON NOV-DEC 2023

अधिक माहितीसाठी संपर्क **9967637255 / 9920949177**

www.sanjraaivc.com https://www.facebook.com/SanjraaiVyasCreations/

https://www.youtube.com/channel/UC9LsO1muxxtVBJoIE8rdHgA


project by
Vyas Infra
तारांकित सोयीसुविधांनी नटणार
कोकण भूमीतला...
स्वप्नवत प्रकल्प
फॅमिली कट्टा
शांततामय वातावरणात
आनंदाचे आत्मिक समाधान
देणारे ठिकाण
powered by
व्यास क्रिएशन्स्
66 बंगले आणि
3 इमारतींचा
10.75
एकरमध्ये भव्य प्रोजेक्ट
फॅमिली कट्टा
दापोली
आपलं कोकणातलं
कमावणारं घर
मागील सहा
महिन्यांत प्रोजेक्टच्या
बाजारमूल्यात
30% भरघोस वाढ
Nilesh Gaikwad Regd. No. A51700023669
1 BHK
STARTS 35 LACS
585 SQ.FT. CARPET
820 SQ.FT. BUILT-UP
2 BHK
STARTS 48 LACS
980 SQ.FT. CARPET
1370 SQ.FT. BUILT-UP
3 BHK
STARTS 71 LACS
1325 SQ.FT. CARPET
1855 SQ.FT. BUILT-UP
अधिक माहितीसाठी संपर्क
9967637255 / 9920949177